म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

REFBK-0002047

REFBK-0002047

भारतीय श्रेष्ठत्व.

कै० दत्तात्रय गोपाळ लिमये, बी. ए.

(माजी दुय्यम संपादक, केसरी)

व

रा. रा. शंकर रामचंद्र बेडेकर बी. ए.

सन १९२२

किंमत १॥४.

मुद्रक व प्रकाशक

रा. रा. **शंकर नरहर जोशी**, " चित्रशाळा प्रेस " १०२६

सदाशिव पेठ, पुणें शहर.

प्रकाशकाचे दोन शब्द.

' भारतीय श्रेष्ठत्व ' हा ग्रंथ चित्रमयजगत्मधून प्रकरणशः प्रसिद्ध झाला होता तो आतां कित्येक विद्वान लोकांच्या सूचनेवरून पुस्तकरूपानें लोकांपुढें मांडण्यांत आला आहे. याचा पहिला भाग केसरीचे दुय्यम संपादक कै. वा. दत्तात्रय गोपाळ लिमये यांनीं लिहिलेला आहे व सर्व ग्रंथ त्यांच्याच हातून पुरा झाला असता तर बरें झालें असतें. परंतु ईश्वरी संकेत निराळा असल्यामुळें लिमये यांच्यावर १९१५ सालीं काळानें झडप घातली. यानतर या ग्रंथाचा राहिलेलीं प्रकरणें पुरें करण्याचें काम योग्य गृहस्थ न लाभल्यामुळें चार वर्षें तसंच पडून राहिलें होतें. परंतु १९१९ मध्यें रा. शंकर रामचंद्र बेडेकर यांनीं परिश्रमपूर्वक उत्तरार्ध लिहून देण्याची जबाबदारी पत्करली व ती योग्य प्रकारें पार पाडली हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो.

हा ग्रंथ कोणत्या धोरणानें व काय आधावर लिहिण्यांत आला याचे दिग्दर्शन कै. वा लिमये यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत उत्तम रीतीनें केलेलेंच आहे तेव्हां त्याची पुनरुक्ति येथें करण्याचें कारण नाहीं तथापि वाचकांना एक सूचना देणें अगत्याचें दिसतें. ती ही कीं, या ग्रंथांत भारतीय वाङ्मय, गणीत, ज्योतिष, तत्त्वज्ञान, संगीतशास्त्र वगैरे सर्वच विषयांची माहिती दिलेली आहे ती वाचकांना बहुश्रुतपणा आणण्यीस चांगली उपयोगी पडेल. तथापि सर्वच प्रकरणें प्रत्येक वाचकास एकसारखीं मनोरंजक व सुबोध वाटणार नाहींत. याचें कारण, कोणास गणिताची गोडी असते तर कोणास संगीतशास्त्र अवगत असतें; आणि आपल्या आवडीच्या विषयासंबंधीचें विवेचन कोणासहि झालें तरी जसें बारकाईनें लक्षांत येतें, तसें इतर विषयासंबंधी म्हणतां येत नाहीं याकरितां आवडत्या विषयावरील प्रकरणें प्रथम वाचून ग्रंथपद्धति लक्षांत घेतली म्हणजे इतर भाग समजण्यास तादृश्य अडचण पडणार नाही. प्रत्येक भागांतील विवेचन अगदीं स्वतंत्रपणें करण्यांत आले असल्यामुळें मधलाच एखादा भाग वाचण्यास हरकत नाहीं. सारांश, आपल्या परिचयाच्या प्रकरणापासून सुरुवात करून

सर्व ग्रंथाचें लक्षपूर्वक अध्ययन करणाऱ्यास आमच्या संस्कृतीचें यथार्थ स्वरूप लक्षांत येऊन आज पाश्चात्य संस्कृतीपासून आम्हांस कोणता भाग उचलावयाचा आहे. याचा निर्णय करण्यास चांगली मदत व्हावी अशी ग्रंथाची मांडणी आहे ती लक्षांत घेऊन वाचक या ग्रंथाचें योग्य चीज करतील अशी आम्हांस आशा आहे.

व्यवस्थापक—चित्रशाळा, पुणें.

अनुक्रमणिका.

भाग १ ला

विषय.	पृष्ठ.
उपोद्घात	३
भारतीय समाजघटना	७
भारतीय संस्कृतीची प्राचीनता	१६
भारतीय राज्यव्यवस्था	२७
भारतीयांचें शील	३७
भारतीयांचा क्षात्रधर्म	५१
भारतीयांचा दांपत्यधर्म	६५
भारतीयांच्या वसाहती व परराष्ट्रसंबंध	९३
भारतीयांची भाषा व लिपि	११७

भाग २ रा

भारतीयांचें वाङ्मय	१
गीर्वाण वाङ्मय (वीणकाव्यें)	२५
आर्यांचें तत्वज्ञान	४१
सांख्यदर्शन	५२
भारतीय वैद्यशास्त्र	६१
गणीत	७३
ज्योतिषशास्त्र	८१
युद्धकला व युद्धशास्त्र	९०
संगीत व इतर शास्त्रें	१०२
भारतीय बांधकाम व खोदकाम	११९

व्यापार आणि संपत्ति १३०
खुष्कीचे व व्यापारी रस्ते १४०
भारतीय संपत्ति १४४
आर्यांचा धर्म १४७

प्रस्तावना.

कुस्तीमध्यें एका मल्लानें दुसऱ्या मल्लास चीत केलें, तर याचे अंगीं पहिल्यापेक्षां शरीरसामर्थ्य, चपळपणा किंवा पेंचांचें ज्ञान कमी आहे, इतकेंच फार झालें तर जग म्हणतें. याच न्यायानें, रणभूमीचे आखाड्यांत दोन राष्ट्रांची कुस्ती होऊन तींत एकाचा पराजय झाला, तर त्याजवळ पहिल्याइतकें लष्करी सामर्थ्य, हत्यारांचा सरंजाम, डावपेंचांचें ज्ञान, पैशाचा पुरवठा अगर शौर्य नाहीं, इतकेंच फार झालें तर जग न्यायानें म्हणूं शकेल. पण जग इतकेंच म्हणून राहत नाहीं. तें याच्याही पलीकडे जाऊन जित राष्ट्रास सर्व बाबतींत सर्व बाजूंनीं नादान ठरवूं पाहतें ! जगाच्या ह्या मनोवृत्तीस जेत्या राष्ट्राकडून स्वाभाविकपणेंच उत्तेजन मिळत असतें; किंबहुना जित राष्ट्राचा तेजोभंग करण्याच्या या कार्यांत विजयी राष्ट्रच अहंकारानें प्रेरित होऊन पुढारीपण घेत असतें. जेत्या राष्ट्रानें किंवा जगानें जित राष्ट्रासंबंधानें आपली अशी समजूत करून घ्यावी, हा दुष्टपणा किंवा अधमपणा यापेक्षां अहंकारी मानवी स्वभाव व तज्जन्य गैरसमज यांचाच खेळ आहे, हें सांगावयास नकोच.

हिंदुलोक, हिंदुराष्ट्र व हिंदुस्थान यांचा रणभूमीवर व मुत्सद्दीपणाच्या डावपेंचांत अखेरीस पुरता मोड व पराजय होऊन त्यांस राजकीय पारतंत्र्य आल्या दिवसापासून हिंदु लोकांचीही स्थिति बहुतांशीं वरील प्रकारचीच झाली होती. हिंदूंचा जातिभेद, हिंदूंची मूर्तिपूजा, हिंदूंचें तत्त्वज्ञान, हिंदूंचें वाङ्मय, हिंदूंचें शिल्प, हिंदूंची स्त्रियांविषयींची कल्पना, सारांश हिंदूंचें जें जें काय असेल तें तें त्याज्य, नादान, टाकाऊ व गचाळच आहे किंवा असलें पाहिजे, असें जगांतील सामान्य लोक गृहीतच धेऊन चालूं लागले ! यांतच युरोपियन मिशनरी व प्रवासी यांच्या पुस्तकांनीं व व्याख्यानांनीं भर घातली. विशेष दुःखाची व शोचनीय गोष्ट ही कीं, आमच्यांतीलही कांहीं पुढाऱ्यांत हीच कल्पना अतिशय जोरानें रुजून तेही हिंदुधर्म व हिंदुसमाज यांजवर निष्ठुरपणें प्रहार करीत सुटले ! याचा एकंदरींत हिंदुसमाजावर अत्यंत अनिष्ट परिणाम होऊन समाज-बंधनें शिथिल झालीं, व त्यामुळें त्याचें समष्टिरूपाचें सामर्थ्य ऱ्हास पावूं लागलें. आम्हींच काय ते सर्व जगांत सर्वतोपरि श्रेष्ठ आहों व पुढेंही श्रेष्ठच राहणार, ही कल्पना जितकी अभ्युन्नतीस अपायकारक आहे; तितकीच, आम्ही सर्व जगांत सर्व प्रकारें नादानच आहों व नादानच राहणार, ही मनोवृत्तिही उन्नतीस घातक असते, हें त्या कालीं कोणाचेंही

फारसें घ्यानांत आलें नाहीं. ' हिंदूंचें सर्व कांहीं नादान व टाकाऊ आहे; त्याचा त्यांनीं जोंपर्यंत सर्वस्वीं त्याग केला नाहीं, तोंपर्यंत त्यांचा हा ऱ्हास एकसारखा होऊन हिंदुराष्ट्र अखेर नष्ट होणार. त्यास हा मृत्यु टाळावयाचा असेल तर त्यानें आपलें गचाळ हिंदुत्व टाकून पाश्चात्त्य राष्ट्रांचा कित्ता सर्व बाबतींत गिरविला पाहिजे, तरच त्याची धडगत आहे.' ही कल्पना सिद्धांत म्हणून सर्वत्र वावरूं लागली !

पण ही आत्मविश्वासशून्य व म्हणूनच आत्मघातक कल्पना वास्तविक खरी आहे काय ? हिंदुराष्ट्र हें जगांतील सर्वांत जुनें व प्राचीन राष्ट्र आहे; व तें अद्यापही आपलें हिंदुत्व राखून जगलें आहे. हिंदुराष्ट्र इतकें नादान व गचाळ असेल तर तें आजपर्यंत जगाविण्यांत परमेश्वराचा हेतु तरी काय ? बाबिलोनिया, असीरिया, इजिप्त, ग्रीस, रोम, इराण येथील जुनी राष्ट्रें नामशेष कां झालीं व हिंदुराष्ट्र तेवढेंच कां टिकलें ? वरील राष्ट्रांचे वंशज आज पृथ्वीवर हयात आहेत, नाहीं असें नाहीं. पण धर्म, भाषा, वाङ्मय, परंपरा, संस्कृति या बाबतींत जुनें असें त्यांच्या राष्ट्रीय जीवनांत फारसें उरलेलें नाहीं. पण हिंदूंचा प्रकार तसा नाहीं. त्यांनीं आपली भाषा, समाजरचना, धर्म, तत्त्वज्ञान यांची परंपरा आपल्या राष्ट्रीय संसारांत अद्याप कायम राखलीं आहेत. पृथ्वीवरील इतर कोणत्याही राष्ट्रांत दिसून आला नाहीं इतका जिवटपणा जर हिंदु राष्ट्रांत प्रत्यक्ष दिसून येत आहे, तर हिंदुसमाजाचा पायाच कालासही दाद न देणाऱ्या अशा कांहीं विलक्षण भक्कम व टिकाऊ मालमसाल्याचा बनविला असला पाहिजे, असें मानण्यावांचून गत्यंतरच नाहीं. दुसरें असें कीं, हिंदुराष्ट्रास सर्वस्वीं नादान व गचाळ मानण्याची ही प्रवृत्ति एकोणिसाव्या शतकांतलीच आहे. त्यापूर्वी किंवा प्राचीनकाळीं हिंदुस्थानाबद्दल जगाचें असें हलकें मत मुळींच नव्हतें. उलट हिंदुस्थानांत संपत्तीचा धूर निघत असून तेथील सर्व कांहीं सोनें व हिरे, माणकें यांनीं मढविलेलें आहे व तेथें सर्वत्र दिव्य सुगंध भरून राहिलेला आहे, अशा दूरस्थांच्या या देशासंबंधानें कल्पना होत्या ! तसेंच एकोणिसाव्या शतकाचे अखेरच्या पादापासून हिंदूंच्या प्राचीन विद्या-कलांचा जसजसा ज्यास्त अभ्यास युरोपियन पंडित करूं लागले तसतसें वरील भ्रामक कल्पनांचें जाळेंही हळूहळू उडून जाऊं लागलें; आणि हिंदु राष्ट्राचे श्रेष्ठ गुण व श्रेष्ठ संस्कृति यांजबद्दल जगांत योग्य आदरबुद्धि उत्पन्न होऊं लागली. अर्थात् हिंदूंवर नादानपणाचा व गचाळपणाचा शिक्का मारणारें मध्यंतरीचें जगाचें मत केवळ विशिष्ट काळच्या व विशिष्ट स्थळाच्या हिंदु समाजाचें वरवर निरीक्षण करून बनलेलें होतें, असेंच मानलें पाहिजे. हिंदु लोकांची स्वतःबद्दलची पहिली तिरस्कारबुद्धिही हळूहळू नष्ट व्हावयास लागली असून, त्यांच्यांत स्वाभिमान व आत्म-

विश्वास यांची ज्योत पेटूं लागली आहे. ही ज्योत अद्यापही ज्या अंत:करणांत पेटली नसेल त्यांत ती उत्पन्न व्हावी व जेथें ती उत्पन्न झाली असेल तेथें ती ज्यास्त प्रज्वलित व सतेज व्हावी या हेतूनें, हिंदु राष्ट्रानें जगाच्या इतिहासांत आजपर्यंत कोणतीं महत्कार्यें केलीं व जगांतील प्रमुख राष्ट्रांत त्यानें कोणतें स्थान संपादिलें, याचें या पुस्तकांत पंडित हरविलास यांचा 'मागोवा' घेत विहंगमदृष्टया अवलोकन करण्याचें योजिलें आहे.या अवलोकनास मुख्य आधार सर विल्यम जोन्स, प्रो. विल्सन, कोलब्रुक, मॅक्समुलर कर्नल टॉड, पोकॉक, वगैरे युरोपियन पंडित व ग्रंथकार यांचाच घेतला आहे, हें सांगणें अवश्य आहे. ' युरोपियनचा शब्द म्हणजे वेदवाक्य ' अशा बुद्धीनें हे आधार घेतलेले नसून, अगदीं तिऱ्हाइत व प्रतिष्ठित साक्षीदारांच्या साक्षीस ज्या दृष्टीनें न्यायकोर्टांत विशेष महत्त्व दिलें जातें, त्या दृष्टीनेंच हे आधार घेतले आहेत. वास्तविक युरोपियन पंडित व ग्रंथकार यांचे मनांत हिंदुस्थानाविषयीं विशेष आदरबुद्धि नसणें व त्यांनीं त्यास नांवें ठेवणें हेंच स्वाभाविक आहे. पण असें असतांही जर त्यांनीं हिंदुस्थानचा आदर, गौरव व स्तुति केली असेल तर ती पूर्ण विचारांतीं पूर्ण खात्री झाल्यामुळेंच, कदाचित् नाइलाजानें, केली असली पाहिजे, असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. निव्वळ भाटाच्या स्तुतीपेक्षां आरंभीं निंदक असून पुढें गुणग्राहक व नंतर स्तुतिपाठक बनलेल्यांनीं केलेल्या स्तुतीची योग्यता अर्थातच अधिक आहे;व याच दृष्टीनें युरोपियन पंडित व ग्रंथकार यांचाच आधार या विहंगमावलोकनास घेतला आहे.सदरहू पंडित हरविलास सारदा बी. ए. यांच्या ' हिंदु सुपिरिऑरिटी ' नामक ग्रंथाचा हें पुस्तक तयार करण्यास फार उपयोग झाला; किंबहुना त्या ग्रंथाचेंच हें पुस्तक मराठी रूपांतर आहे, असेंच म्हणण्यास हरकत नाहीं.

दत्तात्रय गोपाळ लिमये.

भारतीय श्रेष्ठत्व.

हिंदुस्थानदेशाकडे अगदीं स्थूल दृष्टीनें पाहणारांसही, या देशावर सृष्टिदेवतेची पूर्ण कृपा आहे, असें तात्काळ दिसून येतें. ' हिंदुस्थान हा सगळ्या पृथ्वीचाच एक लहानसा नमुना आहे. (India is an epitome of the whole world) असें जें एका मार्मिक लेखकानें (Chamber's Encyclopedia P. 337) म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. जगांतील निरानिराळ्या देशांत सृष्टीचीं जीं भिन्नभिन्न विशिष्ट स्वरूपें दिसून येतात ती सर्व हिंदुस्थानांत एकत्र नांदतांना दिसतात. प्रेक्षकाचें मन आपल्या जादूनें भारून टाकणारें सृष्टिसौंदर्य, अत्यंत सुपीक जमीन, अति घनदाट अरण्यें, अत्युच्च पर्वत, प्रचंड नद्या आणि अतिशय कडक थंडी, यांचे बरोबरच या देशांत वृक्षशून्य व खडकाळ मैदानें, जलशून्य वालुकामय प्रदेश आणि अति कडक उष्णता हींही पाहावयास व अनुभवावयास सांपडतात ! मरेनामक इतिहासकार (हिंदुस्थानचा इतिहास पृ० १) म्हणतो कीं, ' हिंदुस्थानांतील सृष्टिशोभेची भव्यता, विशालत्व व विविधता आणि तेथील भूमींत उत्पन्न होणारी अनेक प्रकारची बहुमोल व मुबलक धान्यसंपत्ति या बाबतींत जगांतील कोणताही देश हिंदुस्थानाची बरोबरी करूं शकणार नाहीं. ' (The varied grandeur of its scenery and the rich production of its soils are scarcely equalled in any other country) कौंट जॉर्नस्टजर्ना (Theogony of the Hindus, P. 126,) लिहितोः–" या हिंदुस्थानदेशांतील सृष्टिदेवतेनें चित्रविचित्र व अनेक रंगांचें बहुमोल वस्त्रच पांघरलें आहेसें वाटतें. या देशांत उन्हाळ्यांत एकदम वर येणारी मुबलक वनस्पतीसंपत्ति व पावसाळ्यांत होणारीं भयंकर वादळें, त्याच्या हिमाच्छादित हिमालयाची भव्यता व वालुकामैदानांचा रखरखितपणा, उत्तर हिंदुस्थानांतील अतिविस्तीर्ण मैदानें व गगनचुंबित पर्वतांवरील सृष्टिशोभा, हीं पाहणाराचे मनावर तेथील सृष्टीची विलक्षणता, भव्यता व चमत्कृति यांचा कायमचा परिणाम झाल्यावांचून राहत नाहीं. " नगाधिराज हिमालयाच्या भव्य शोभेचें तर वर्णन कोणत्याशब्दांनीं करूं असेंच प्रयासांस होऊन जातें ! एल्फिन्स्टन इतिहासकार (हिंदुस्थानचा इतिहास पृ. १८१) लिहितो कीं, ' प्रवासी कितीही साधाभोळा, गंभीर किंवा कांटेतोल

लिहिणारा असो, हिमालयाच्या सृष्टिशोभेंत इतकें अपूर्व सामर्थ्य भरलेलें आहे कीं; ती एकदां त्याचे दृष्टीस पडली कीं त्याचें मन व त्याची लेखणी उत्साहानें भराऱ्यांच मारावयास लागते; त्या सृष्टिशोभेची स्मृति त्याचे मनांतून आमरणांत नष्ट होत नाहीं व तसली शोभा त्यास जगांत अन्यत्र पाहावयासही सांपडत नाहीं.' (The scenery of the Himalayas is a sight which the soberest traveler has never described without kindling into enthusiasm, and which, if once seen, leaves an impression that can never be equalled or effaced.)

हिंदुस्थानावर सृष्टिदेवतेचा जसा कृपाप्रसाद आहे तसा बुद्धिदेवतेचाही त्याजवर अखंड वरदहस्त आहे ! जसें विविध सृष्टिरचनेचें तसेंच मनुष्यसमाजाचें निरीक्षण व अध्ययन करण्यास हिंदुस्थान देश व हिंदुसमाज हा एक सनातन ग्रंथच आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. कौंट जॉर्नस्टजर्ना या ग्रंथकारानें लिहिल्याप्रमाणें, 'नखशिखांत लोखंडी चिलखत घातलेला राजपुतान्यांतील अश्वारूढ योद्धा व काशीच्या देवालयांतील ईश्वरधर्मनिष्ठ ब्राह्मण पहा; आपल्या लढाऊ जहाजांतून किंवा चपळ घोड्यांवरून त्वरेनें हालचाली करणारा कडवा मराठा व हत्तीवर बसून मंदगतीनें चालणारा नबाब यांजकडे दृष्टि फेंका; अगर जंगलांत वाघाची शिकार करणारी वीरस्त्री व आपली कामवासना देवासच अर्पण करणारी मुरळी यांजकडे नजर फेंका; तुम्हांस हिंदुस्थानांत विलक्षणता, भव्यपणा व चमत्कार हीं आढळल्यावांचून रहाणार नाहींत' (Theogony of the Hindus, P. 126). कर्नल टॉड राजस्थानचे इतिहासांत (पृ० ६०८, ६०९) लिहितोः–" ग्रीक तत्त्वज्ञानाच्या तोडीचीं किंवहुना प्लेटो, थेल्स, पायथागोरस वगैरे तत्त्ववेत्त्यांस गुरुस्थानीं असलेलीं तत्त्वज्ञानदर्शनें निर्माण करणारे ऋषि हिंदुस्थानाखेरीज अन्यत्र कोठें सांपडणार ? ज्यांचें ज्योतिषज्ञान पाहून सांप्रतही युरोपियन पांडितांस आश्चर्य वाटतें असे ज्योतिषशास्त्रज्ञ, युरोपियन तज्ज्ञांच्या अद्यापही आदरास पात्र होणारीं प्रचंड व सुंदर लेणीं कोरणारे शिल्पशास्त्रज्ञ व मूर्तिकार, आणि राग व स्वर बदलून श्रोत्यांचें अंतःकरण आनंदांतून दुःखांत व दुःखांश्रूंतून हर्षस्मितांत सहज लीलेनें नेणारे गायक हिंदुस्थानावांचून दुसऱ्या देशांत कोठचे सांपडणार ? " कलकत्ता रिव्ह्यूनामक मासिकांत (दिसेंबर १८६१) एक लेखक लिहितोः–" हिंदुराष्ट्र सांप्रत जरी हीन दीन झालेलें असलें, तरी प्राचीन काळीं ह्या राष्ट्रांत श्रेष्ठ कलाकौशल्य व युद्धविद्या, सुखकारक राज्य-

पद्धति, शहाणपणाचे कायदे व उच्च प्रकारचें ज्ञान हीं सर्व नांदत होतीं, यांत शंका नाहीं." एडिंवरो रिव्ह्यूमध्येंही (आक्टोबर १८७२) एक लेखक म्हणतोः— " जगाच्या उपलब्ध इतिहासांत जीं प्राचीन राष्ट्रें केवळ नाममात्रेंकरून सांप्रत हयात आहेत, त्यांच्यामध्यें संस्कृतीचा अरुणोदय होण्यापूर्वीच या प्राचीन हिंदुराष्ट्राचा संस्कृति-सूर्य मध्यान्हीं येऊन ठेपला होता ! ज्यांच्या प्राचीन संस्कृतीचे महत्त्वाचे अवशेष सांप्रत विद्यमान आहेत अशा जुन्या राष्ट्रांत हिंदुराष्ट्र हें सर्वांत जुनें आहे. असें असूनही सुसंस्कृति व सुधारणा या बाबतींत आजतागायत कोणत्याही राष्ट्राला हिंदुराष्ट्रास मागें टाकतां आलेलें नाहीं ! " ' सगळ्या जगांत मनुष्यप्राणी श्रेष्ठ असून मनुष्यांतही त्याचें मन अत्यंत श्रेष्ठ होय ' असें सर विल्यम हॅमिल्टननामक तत्त्ववेत्त्याचें एक सूत्र आहे. त्या सूत्राचे दृष्टीनें विचार केला तर ' हिंदुराष्ट्राच्या मनाची व बुद्धीची भरारी जितकी उंच व दूर पोंचलेली आहे, तितकी पृथ्वीच्या पाठींवरील कोणत्याही राष्ट्राची पोंचलेली नाहीं ' असें जें मिसेस मॅनिंग (Ancient & Mediaeval India vol II, P. 148) या ग्रंथकर्तीनें म्हटलें आहे त्याची सत्यता तेव्हांच पटते. दुसरा एक ग्रंथकार लिहितोः—" काव्य व गायन हीं प्राचीन हिंदुराष्ट्राच्या हाडींमासीं खिळलेलीं असून ते व्यापारधंद्यांतही तरबेज होते. शास्त्रशोधांत व शास्त्ररचनेंतही त्यांचा अचाट उद्योग व सूक्ष्म आणि तीव्र दृष्टि पदोपदीं दिसून येते. हिंदुस्थानांत कलाकौशल्यानें तर आपली अखेरची सीमाच गांठली आहे कीं काय असा भास होतो. त्याची संस्कृत भाषा ही जगांतील भाषांत सर्वोत्कृष्ट व अत्यंत मनोहर आहे. सत्यनिष्ठा, औदार्य व इमान या बाबतींतील हिंदूंच्या राष्ट्रीय शीलाची कोणासही बरोबरी करतां येणार नाहीं. त्यांच्याच वसाहतींनीं एका काळीं सर्व जग व्यापलेलें होतें, त्यांच्या राजांसच इतर राष्ट्रें अजूनही सागरदेवता म्हणून पूजित आहेत; किंबहुना सुधारलेल्या जगाच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यांत व प्रत्येक मनुष्याच्या भोंवतीं चाललेल्या सर्व व्यवहारांत प्राचीन हिंदूंचीच सुधारणा भरून राहिलेली आहे. " प्रो. हीरेन (Historical researches, Vol II, P. 45) म्हणतातः—" केवळ आशिया खंडाचेच नव्हे तर युरोपखंडांतील लोकांचेही सर्व ज्ञानाचा व धर्मांचा उगम हिंदुस्थानांतच आहे. "

हिंदुस्थान व हिंदुराष्ट्र यांच्या गुणांचा गौरव करतांना मॅक्समुलरसाहेबांच्या वाणीस तर वक्तृत्वाचें अतोनात भरतेंच आलेलें आहे !' हिंदुस्थान , व तें आम्हांस काय शिकवलि ? ' या आपल्या ग्रंथांत (India: what can it teach us P. 15) ते लिहितातः " सृष्टिदेवतेनें आपली समृद्धि, सामर्थ्य व सौंदर्य हीं सर्व पूर्णपणें ओतून कोणत्या देशास भृत्युलोकचें नंदनवन बनविलें आहे, हें पहाण्यास मी जर सर्व जग धुंडाळूं

लागलों तर मला अखेर हिंदुस्थानाकडेच बोट दाखवावें लागेल ! मानवी अंत:करणाच्या व बुद्धीच्या श्रेष्ठ वृत्ति व शक्ति कोणत्या देशांत पूर्णावस्थेस पोंचल्या आहेत ? सृष्टींतील व संसारांतील अत्यंत महत्त्वाच्या गूढ प्रमेयांचा सूक्ष्म व खोल विचार कोठें झाला आहे ? व प्लेटो, कँटप्रभृति तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांचें परिशीलन केलेल्या पांडितांच्याही अध्ययनास सर्वस्वीं पात्र होईल असा वरील गूढ प्रमेयांचा उलगडा कोठें झाला आहे ? असे प्रश्न मला कोणीं विचारले तर मी त्यांस ' हिंदुस्थान–हिंदुस्थान–हिंदुस्थान ' असें एकच उत्तर देईन ! ग्रीक, रोमन व यहुदी या तीनच राष्ट्रांचे विचार, वाङ्मय व संस्कृति यांजवर युरोपियन राष्ट्रांचें आजपर्यंत पोषण झालेलें असल्यामुळें त्यांचें आध्यात्मिक जीवन अपुरें, आकुंचित व खुरटें झालेलें आहे. हें जीवन खरोखर परिपूर्ण, विशाळ, सर्व मनुष्यता आकलन करणारें व विश्वव्यापक करावयाचें असल्यास, किंवहुना त्यांत नवीन व सनातन असें चैतन्य ओतून त्यास अजरामर करावयाचें असल्यास आपण कोणत्या देशाच्या वाङ्मयाकडे धांव घ्यावी, असा मी मनाशीं विचार करूं लागलों तर भाग्यशालीभरतखंडच माझ्या डोळ्यांपुढें उभें राहतें ! भाषा, धर्म, पुराण-कथा, कायदे, चालीरीती, प्राचीन कला, प्राचीन शास्त्रें वगैरे जे मानवी मनोवृद्धीचे निरनिराळे विकास व विलास आहेत त्यांपैकीं कोणत्याही एकाच्या विशेष अध्ययनास आरंभ केल्यावर, तुम्हांस आवडो वा न आवडो, तुम्हांस हिंदुस्थानाकडेच जाणें भाग पडेल ! कारण मानवी इतिहासाच्या सामुग्रीपैकीं अत्यंत महत्त्वाच्या व अत्यंत बोधकारक सामुग्रीचें भांडार हिंदुस्थानांत–केवळ एकट्या हिंदुस्थानांतच–साठविलेलें आहे " *

---

* If I were to look over the whole world to find out the country most richly endowed with all the wealth, power and beauty that nature can bestow – in some parts a very paradise on earth-I should point to India. If I were asked under what sky the human mind has most fully developed some of its choicest gifts, has most deeply pondered on the greatest problems of life, and has found solutions of some of them which well deserve the attention even of those who have studied Plato and Kant, I should point to India. And if I were to ask myself from what literature we here in Europe–we who have been nurtured almost exclusively on the thoughts of the Greeks and the Romans, and of one Semitic race the Jewish – may draw that corrective which is most wanted in order to make our inner life more perfect, more comprehensive,

सारांश, राष्ट्रीय प्रपंचाचें कोणतेंही अंग घ्या किंवा मानवी मनोबुद्धि-विकासाच्या कोण-त्याही शाखेचा विचार करा, त्या प्रत्येकांत प्राचीन हिंदुलोक श्रेष्ठ व अग्रगण्य होते, आणि हें वैशिष्ट्य जगांतील इतर कोणत्याही राष्ट्राचे ठायीं दिसून येत नाहीं, असेंच प्रत्ययास येईल. आजपर्यंत जगांत एकादें राष्ट्र युद्धविद्येंत तर दुसरें व्यापारांत श्रेष्ठ झालें असेल; कोणी तत्त्वज्ञानांत तर कोणी काव्यांत, कोणी शास्त्रांत तर कोणी कलाकौशल्यांत निष्णात झालें असेल. एखादें राष्ट्र राजकीय दृष्ट्या अति उच्च पदास पोंचलें असेल, पण तें नैतिक व बौद्धिक दृष्ट्याही तितकें उच्च असेलच असें नाहीं. पण वरील सर्व बाबतींत सारखेंच श्रेष्ठ व सारखेंच अग्रगण्य असें प्राचीन हिंदुराष्ट्राखेरीज पृथ्वीचे पाठीवर एकही राष्ट्र पूर्वीही नव्हतें व सांप्रतही नाहीं! 'प्राचीन हिंदुराष्ट्राचें असें भपकेदार रंगांत चित्र रेखाटून त्याचे दोष लपवून ठेवणें व गुण तेवढेच फुगवून वर्णन करणें हें अयोग्य आहे' असा कोणी टीकाकार यावर आक्षेप घेईल. पण पर्वताची उंची मोजतात ती त्याच्या लहान-सहान टेंकड्यांचें किंवा डोंगरांचें माप घेऊन कोणी मोजीत नाहींत; तर त्याचीं जीं अत्युच्च शिखरें असतात त्यांचें मोजमाप घेऊनच ती मोजीत असतात, हें या टीकाकारांनीं लक्षांत ठेवावें. हिमालय पर्वतास 'नगाधिराज' ही जी यथार्थ पदवी मिळाली आहे, ती मसुरी, दार्जिलिंग किंवा सिमला यांजजवळच्या उंच डोंगरांवरून नव्हे; तर गौरीशंकर, धवलगिरि व कांचनगंगा या गगनचुंबित शिखरांवरून मिळालेली आहे. याच न्यायानें हिंदूंची संस्कृति व हिंदुराष्ट्रानें जगाचे इतिहासांत केलेलीं महत्कार्यें यांचें मोजमाप करतांना त्यांच्या अत्युच्च शिखरांचेंच मोजमाप घेणें अवश्य आहे.

असीरियन, बाबिलोनियन, इजिप्शियन, फीनिशियन, ग्रीक, इराणी, रोमन वगैरे अनेक प्राचीन राष्ट्रें जगांत उदयास आलीं व वैभवाचे शिखरास चढलीं; आणि राजकीय क्रांत्या, सामाजिक उत्पात किंवा वर्णविद्वेषाचे भूकंप यांचे तडाक्यांत सांपडून

---

more universal, in fact more truly human--a life, not for this life only, but a transfigured and eternal life, again I should point to India.....Whatever sphere of human mind you may select for your special study, whether it be language, or religion, or mythology, or philosophy, whether it be laws or customs, primitive art or primitive Science, everywhere you have to go to India, whether you like it or not; because, some of the most valuable and most instructive materials in the history of man are treasured up in India and in India only."

नामशेषही झालीं. पण असल्या क्रांत्यांतून, उत्पातांतून व भूकंपांतूनही वर वर्णिल्य प्रकारचें भाग्यशाली हिंदुराष्ट्र आपला विशिष्ट हिंदूपणा कायम राखून अद्याप जिवंत राहिले आहे, याचें बीज कोणतें ? हिंदुधर्माची इमारत सनातन सत्याचे पायावर उभारली असून तिच्याच आश्रयानें जन्मलेली व वाढलेली जी हिंदु संस्कृति तींत विलक्षण जिवटपणा व श्रेष्ठता आहे; आणि म्हणूनच त्या धर्मांत वाढलेलें व संस्कृतीनें पोसिलेलें हिंदुराष्ट्र अजून जिवंत राहिलें आहे, यांत संशय नाहीं. असीरिया, बाबिलोनिया, इजिप्त, इराण ग्रीस, रोमन हीं राष्ट्रें व त्यांची संस्कृति वैभवशाली होती हें खरें. पण आकाशांतील एखादी उल्का पृथ्वीवर व आकाशांत क्षणमात्र दैदीप्यमान प्रकाश पाडीत व लोकांचे डोळे दिपवीत तात्काळ नष्ट होते; किंवा एकादा धूमकेतु आपल्या विलक्षण वेगानें व अपूर्व आकृतीनें जगास चकित करीत उदय पावून लवकरच अनंत आकाशांत भरारी मारून अदृश्य होतो, तशा स्वरूपाचें वर सांगितलेल्या राष्ट्राचें वैभव व संस्कृति हीं होतीं. परंतु हिंदुराष्ट्राचें वैभव व हिंदुसंस्कृति यांच्या सूर्यास मधूनमधून मेघांनीं झांकून टाकलें किंवा प्रसंगीं त्यास ग्रहण लागलें, तरी हा सूर्य सर्व जगाच्या दूरदूरच्या कोनांकोपऱ्यांतही आपला प्रकाश, उष्णता व चैतन्य पसरवीत आणि मानवजातीस समाधान व सौख्य लाभ करून देत अद्यापही एकसारखा प्रकाशत आहे !

सारांश, राष्ट्रीय प्रपंचाचें कोणतेंही अंग घ्या किंवा मानवी मनोबुद्धि-विकासाच्या कोणत्याही शाखेचा विचार करा, त्या प्रत्येकांत प्राचीन हिंदुलोक श्रेष्ठ व अग्रगण्य होते, आणि हें वैशिष्ट्य जगांतील इतर कोणत्याही राष्ट्राचे ठायीं दिसून येत नाहीं, असेंच प्रत्ययास येईल. आजपर्यंत जगांत एकादें राष्ट्र युद्धविद्येंत तर दुसरें व्यापारांत श्रेष्ठ झालें असेल; कोणी तत्त्वज्ञानांत तर कोणी काव्यांत, कोणी शास्त्रांत तर कोणी कलाकौशल्यांत निष्णात झालें असेल. एखादें राष्ट्र राजकीय दृष्ट्या अति उच्च पदास पोंचलें असेल, पण तें नैतिक व बौद्धिक दृष्ट्याही तितकें उच्च असेलच्य असें नाहीं. पण वरील सर्व बाबतींत सारखेंच श्रेष्ठ व सारखेंच अग्रगण्य असें प्राचीन हिंदुराष्ट्राखेरीज पृथ्वीचे पाठीवर एकही राष्ट्र पूर्वीही नव्हतें व सांप्रतही नाहीं! 'प्राचीन हिंदुराष्ट्राचें असें भपकेदार रंगांत चित्र रेखाटून त्याचे दोष लपवून ठेवणें व गुण तेवढेच फुगवून वर्णन करणें हें अयोग्य आहे' असा कोणी टीकाकार यावर आक्षेप घेईल. पण पर्वताची उंची मोजतात ती त्याच्या लहानसहान टेंकड्यांचें किंवा डोंगरांचें माप घेऊन कोणी मोजीत नाहींत; तर त्याचीं जीं अत्युच्च शिखरें असतात त्यांचें मोजमाप घेऊनच ती मोजीत असतात, हें या टीकाकारांनीं लक्षांत ठेवावें. हिमालय पर्वतास 'नगाधिराज' ही जी यथार्थ पदवी मिळाली आहे, ती मसुरी, दार्जिलिंग किंवा सिमला यांजजवळच्या उंच डोंगरांवरून नव्हे; तर गौरीशंकर, धवलगिरि व कांचनगंगा या गगनचुंबित शिखरांवरून मिळालेली आहे. याच न्यायानें हिंदूंची संस्कृति व हिंदुराष्ट्रानें जगाचे इतिहासांत केलेलीं महत्कार्यें यांचें मोजमाप करतांना त्यांच्या अत्युच्च शिखरांचेंच मोजमाप घेणें अवश्य आहे.

असीरियन, बाबिलोनियन, इजिप्शियन, फीनिशियन, ग्रीक, इराणी, रोमन वगैरे अनेक प्राचीन राष्ट्रें जगांत उदयास आलीं व वैभवाचे शिखरास चढलीं; आणि राजकीय क्रांत्या, सामाजिक उत्पात किंवा वर्णविद्वेषाचे भूकंप यांचे तडाक्यांत सांपडून

---

more universal, in fact more truly human-- a life, not for this life only, but a transfigured and eternal life, again I should point to India.....Whatever sphere of human mind you may select for your special study, whether it be language, or religion, or mythology, or philosophy, whether it be laws or customs, primitive art or primitive science, everywhere you have to go to India, whether you like it or not; because, some of the most valuable and most instructive materials in the history of man are treasured up in India and in India only.'"

नामशेषही झालीं. पण असल्या क्रांत्यांतून, उत्पातांतून व भूकंपांतूनही वर वर्णिल्या प्रकारचें भाग्यशाली हिंदुराष्ट्र आपला विशिष्ट हिंदूपणा कायम राखून अद्याप जिवंत राहिलें आहे, याचें बीज कोणतें ? हिंदुधर्माची इमारत सनातन सत्याचे पायावर उभारली असून तिच्याच आश्रयानें जन्मलेली व वाढलेली जी हिंदु संस्कृति तींत विलक्षण जिवटपणा व श्रेष्ठता आहे; आणि म्हणूनच त्या धर्मांत वाढलेलें व संस्कृतीनें पोसिलेलें हिंदुराष्ट्र अजून जिवंत राहिलें आहे, यांत संशय नाहीं. असीरिया, बाबिलोनिया, इजिप्त, इराण ग्रीस, रोमन हीं राष्ट्रें व त्यांची संस्कृति वैभवशाली होती हें खरें. पण आकाशांतील एखादी उल्का पृथ्वीवर व आकाशांत क्षणमात्र दैदीप्यमान प्रकाश पाडीत व लोकांचे डोळे दिपवीत तात्काळ नष्ट होते; किंवा एकादा धूमकेतु आपल्या विलक्षण वेगानें व अपूर्व आकृतीनें जगास चकित करीत उदय पावून लवकरच अनंत आकाशांत भरारी मारून अदृश्य होतो, तशा स्वरूपाचें वर सांगितलेल्या राष्ट्राचें वैभव व संस्कृति हीं होतीं. परंतु हिंदुराष्ट्राचें वैभव व हिंदुसंस्कृति यांच्या सूर्यास मधूनमधून मेघांनीं झांकून टाकलें किंवा प्रसंगीं त्यास ग्रहण लागलें, तरी हा सूर्य सर्व जगाच्या दूरदूरच्या कोनांकोपऱ्यांतही आपला प्रकाश, उष्णता व चैतन्य पसरवीत आणि मानवजातीस समाधान व सौख्य लाभ करून देत अद्यापही एकसारखा प्रकाशत आहे !

प्रकरण १ लें.

भारतीय समाजघटना.

जगांतील अनेक प्राचीन व वैभवशाली संस्कृति आणि राष्ट्रें नामशेष झालीं असतां हिंदु संस्कृति, हिंदु राष्ट्र व हिंदुधर्म हींच तेवढीं ' सनातन ' या विशेषणास कां पात्र झालीं, याचें सामान्य दिग्दर्शन गेल्या उपोद्घातांत केलें होतें. या प्रकरणांत या मुद्द्याचा थोड्या निराळ्या दृष्टीनें विचार करावयाचा आहे.

अनेक व्यक्तींच्या समुदायास ' समाज ' हें नांव प्राप्त होण्यास त्याचें स्वरूप कसें असावें लागतें ? आणि त्या समाजाची अभिवृद्धि व ऱ्हास हीं कोणत्या नियमांस अनुसरून होतात ? या प्रश्नांसंबंधानें युरोपियन समाजशास्त्र-वेत्त्यांमध्यें पुष्कळ भवति न भवति होऊन अखेर असा सिद्धांत सर्वमान्य झालेला आहे कीं, समाज म्हणजे वाळवंटांतील वाळूच्या अनेक कणांप्रमाणें एकमेकांपासून अगदीं स्वतंत्र व असंबद्ध अशा अनेक व्यक्तींचा एकत्र राहणारा समूह नसून, समाज ही एक (Organic body) सजीव व सचेतन वस्तु आहे; व तिचा उत्कर्षापकर्ष सृष्टींतील इतर सजीव व सचेतन वस्तूंची वाढ व ऱ्हास यांविषयींच्या नियमांसच अनुसरून होत असतो. अर्थात् समाज व राष्ट्र चिरस्थायी होण्यास त्याची घटना सृष्टीच्या नियमानुसार व शास्त्रशुद्ध पायावरच होणें अगत्याचें आहे. हजारों जातींच्या सचेतन वस्तूंच्या उत्क्रांतीचें सूक्ष्म निरीक्षण करून हर्बर्ट-स्पेन्सरप्रभृति पाश्चात्त्य उत्क्रांतिवाद्यांनीं असा सिद्धांत स्थापित केला आहे कीं, सजीव व सचेतन वस्तूची जसजशी उत्क्रांती होत जाते तसतसे त्याचे निरनिराळे शारीरिक व्यापार व कार्यें करण्यास निरनिराळे अवयव व इंद्रियें उत्पन्न होत जातात. जीवांच्या उत्क्रांतींतील अगदीं खालच्या पायरीवरचा अतिसूक्ष्म अणु–जीव असून त्यास निरनिराळे अवयव किंवा इंद्रियें मुळींच नाहींत; त्याचे सर्व व्यापार त्याचें अणुमात्र वाटोळें शरीरच करीत असतें प्रत्येक व्यापारासाठीं एकेक भिन्न व स्वतंत्र अवयव किंवा इंद्रिय उत्पन्न होणें ही उत्क्रांतीची शेवटची पायरी असून ती मनुष्य प्राण्यांत बहुतांशानें सिद्ध झालेली दिसून येते.

सृष्टींतील सजीव व सचेतन वस्तूंच्या उत्क्रांतीचा हाच नियम ज्या समाज-घटनेंत बऱ्याच अंशानें पाळलेला आढळून येईल, तो समाज चिरस्थायी किंबहुना सनातन राहू

ण्यास पात्र झाला, असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्या उत्क्रांति-तत्त्वाच्या दृष्टीनें विचार केल्यास जगांतील सर्व समाजांत हिंदुसमाजाचीच घटना वरील सृष्टिनियमांस अनुसरून झालेली आहे, असें कोणासही दिसून येईल. समाजाच्या अस्तित्वास, पोषणास व अभिवृद्धीस जे व्यापार व जीं कार्यें आवश्यक आहेत, तीं तीं चोख रीतीनें करण्यास त्या समाजाचे भिन्नभिन्न अवयव व इंद्रियें (अर्थात् वर्ग) उत्पन्न होणें, हीच त्या समाजाच्या अभिवृद्धीची मुख्य खूण होय. पुरुषसूक्तांत राष्ट्रपुरुषाच्या चार अवयवांचे स्थानीं चातुर्वर्ण्याची केलेली स्थापना किती मार्मिक आहे हें यावरून लक्षांत येतें. सामाजिक व्यापार व कार्यें यांचें हें पूर्ण विभेदीकरणाचें उत्क्रांतितत्त्व हिंदुसमाज-घटनेंत वर्णाश्रम-धर्मरूपानें परिणत झालेलें आहे; व म्हणूनच हिंदुसमाज, हिंदुराष्ट्र व हिंदुधर्म अजून जिवंत राहिला आहे. युरोपियन समाजांत अमक्या व्यक्तीनें किंवा अमुक व्यक्ति-समुदायानें समाजांतील अमुकच व्यापार किंवा कार्य केलें पाहिजे, असा तिकडे नियम नाहीं. व्यक्तीनें किंवा व्यक्तिसमुदायानें आपल्या स्वार्थास इष्ट किंवा मनास योग्य वाटेल ते कार्य उचलावें व वाटेल तेव्हां तें वदलावें; ह्या तत्त्वाचा अंमल व्यक्तिस्वातंत्र्य व प्रतिस्पर्धा या तत्त्वांचे नांवाखालीं तिकडे जारीनें चालू आहे. अर्थात् तिकडील समाज अजून वरील अणुजीवाच्या किंवा कांहींसे त्याच्या वरच्या पायरीचे आहेत; व त्यांचें शरीर आतां कोठें निरनिराळे अवयव व इंद्रियें फुटण्याच्या तयारीस लागलें आहे, असें म्हणणें भाग आहे. तिकडे (ट्रेड गिल्ड) व्यवसायसंघाच्या रूपानें विभेदीकरणाचें किंवा हिंदूंच्या वर्ण–व्यवस्थेचें तत्त्व हळुहळु दृग्गोचर होऊं लागलें आहे. म्हणजे युरोपांतले आजचे हे व्यवसाय-संघ कांहीं शतकांनीं आमचे वर्ण व जाती यांच्याच वळणावर जाणार, किंवहुना तसे ते गेले तरच तिकडील समाजास अभिवृद्धि व चिरस्थायित्व प्राप्त होईल, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

आमच्या प्राचीन समाजप्रवर्तक ऋषींनीं सृष्टीचा हा उत्क्रांति-नियम जाणून व त्या नियमास अनुसरून हिंदुसमाजघटना केली आहे. त्यांचें आत्मनिरीक्षण व आत्मज्ञान जसें श्रेष्ठ कोटींतलें होतें, त्याप्रमाणें सृष्टीच्या निरनिराळ्या गूढागूढ व स्थूल–सूक्ष्म व्यापारांचे व कार्यांचेंही सूक्ष्म अवलोकन करून त्यावरून समाजघटनेचे व व्यक्तीच्या सदाचाराचे सनातन सिद्धांत त्यांनीं काढले होते. या सिद्धांतांचे पायावर हिंदुसमाज-घटनेची इमारत त्यांनीं उभारल्यामुळेंच कर्तृत्वाबरोबर सौख्य, प्रगतीबरोबर स्थैर्य आणि अभिवृद्धीबरोबरच स्वत्व-संरक्षण यांचा या समाजास लाभ झाला; आणि या सृष्टिनियम-स्थापन

सिद्धांतांस अनुसरल्यामुळेंच हिंदूंचे समाज-नियम व संस्था यांस दृढता व स्थैर्य यांचे बरोबरच एक प्रकारची उज्ज्वलताही आली. मानवी शरीरांत भिन्नभिन्न अवयव व निरनिराळीं इंद्रियें एकाच अंतरात्म्याच्या प्रेरणेप्रमाणें वागून आपापले व्यापार व कार्यें इतरांच्या व्यापारांच्या व कार्यांच्या आड न येतां, पण एकमेकांस पोषकच होतील अशा रीतीनें, विनबोभाट करीत असतात, म्हणूनच तो मनुष्यप्राणी जोमदार राहून वाढत जातो. किंवा सूर्यमालेंतले निरनिराळे ग्रह, उपग्रह, लघुग्रह मध्यवर्ती सूर्याच्या आकर्षणशक्तीच्या अनुरोधानें आपापल्या विवक्षित कक्षेंत विवक्षित गतीनें इतरांच्या आड न येतां फिरत राहतात, म्हणूनच सूर्यमालेचें हें चक्र सुयंत्रित चाललेलें आहे. याच न्यायानें हिंदुसमाज जेव्हां आपल्या ऐन वैभवाच्या व सामर्थ्याच्या भरांत होता तेव्हां यांतील निरनिराळे वर्ण, वर्ग व जाती आपापले नियमित व्यवसाय नियमित रीतीनें आणि इतर वर्णांस व सर्व समाजास पोषक होतील अशा प्रकारें करीत असत.

सारांश, हिंदुसमाजाची घटना अशा रीतीनें शास्त्रशुद्ध पायावर झालेली असल्यामुळें अर्वाचीन युरोपीयन समाज-रचनेंतील व संस्कृतींतील दोष, उणीवा व वैगुण्य त्यांत आलेलें नाहीं. हिंदुसमाजांत स्पर्धा व कलह यांच्या मादक उत्तेजनाशिवाय शांतपणानें व स्थिरतेनें सर्व सामाजिक व्यवहार व सामाजिक प्रगति होत आलेली आहे. युरोपियन समाजाप्रमाणें हिंदुसमाजांतील एका वर्गांतच संपत्ति बेसुमार सांठून इतर वर्गांस दैन्य व दारिद्र्य आलेलें नाहीं; आणि श्रीमानांस अधिक धनिक व गरीबांस अधिक दरिद्री करणारीं समाज-बंधनें व समाज-नियमही त्यांत नाहींत. वर्णाश्रम-पद्धतीचें मुख्य मर्म व रहस्य हें आहे कीं, प्रत्येक वर्ण, जाती किंवा वर्ग आणि त्यांतील प्रत्येक व्यक्ति यांस ज्याच्या त्याच्या मानसिक व शारीरिक योग्यतेप्रमाणें व सामर्थ्याप्रमाणें कामें करण्याची संधी व साधनें तिनें आयतीं दिलेलीं असून तीं कार्यें करीत असतां सबंध समाजाचा व राष्ट्राचा व्यवहार, हित व प्रगति हींही सहज साधतात; व तीं साधतांना व्यक्तीच्या स्वाभाविक गुणांचा, शक्तीचा व कर्तृत्वाचा सुलभपणें व शांततेनें विकास होत जातो. हिंदुसमाजांतील या वर्णाश्रम-विभाग-पद्धतीमुळें संपत्ति एकाच वर्गांत सांठविली न जातां तिची सर्व वर्गांत योग्य विभागणी होऊन देशांत अठरा विश्वे दारिद्र्य व उपासमार हीं फारशीं राहिलीं नाहींत; लोकांची नैतिक व बौद्धिक प्रगति झाली; राष्ट्रीय व्यवहार चोख व विनबोभाट रीतीनें चालला; आणि विशेष हें कीं, शांतता व स्थैर्य कायम राहून राष्ट्राची विशेष प्रगति झाली.

हिंदूंच्या समाजघटनेचा मुख्य विशेष वर्णाश्रम-विभाग हा आहे हें वर सांगितलेंच आहे. ही समाज-घटना होऊं लागली त्या काळीं आरंभीं आर्य व अनार्य असे मनुष्य-जातीचे दोन ठळक विभाग होते. अर्वाचीन काळीं सुधारलेले (civilized) व रानटी (savage) असे जे दोन विभाग मानले जातात, त्याच प्रकारचा आर्य-अनार्य हा विभाग आहे. आर्यांमध्यें पुढील चार वर्ण होते:—

१ ब्राह्मण—ज्ञान-विज्ञान, विद्या व शास्त्रकला, अध्ययनाध्यापन व यजनयाजन, हीं यांचीं कर्में होतीं.

२ क्षत्रिय—धनुर्विद्येचें शास्त्र व युद्धकला यांचें संपादन आणि राज्यकारभार हीं यांचीं कामें होतीं.

३ वैश्य—शेती, गोरक्षण, व्यापार व इतर कारागिरीचे धंदे हे करीत.

४ शूद्र—मानसिक व बौद्धिक दृष्टीनें कमी दर्जाचे असलेले लोक वरील तीन वर्णांची सेवा-नोकरी-करीत.*

कोणत्याही सुधारलेल्या समाजांत वरील प्रकारचा कर्म-विभाग कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें अस्तित्वांत असतोच; पण या बाबतींतील भारतीयांची श्रेष्ठता हीं कीं, त्यांनीं ही कर्म-विभाग-पद्धति फार प्राचीन काळीं शास्त्रीय तत्त्वाच्या पायावर उभारून पूर्णावस्थेस नेली. हीं शास्त्रीय तत्त्वें म्हटलीं म्हणजे आनुवंशत्व (या तत्त्वाचें महत्त्व व व्यापकत्व अद्याप युरोपियन समाजशास्त्रवेत्त्यांस पुरतें समजलेलें नाहीं), श्रमविभाग, समाजाच्या कार्यशक्तीची काटकसर व संरक्षण, त्याच्या सामर्थ्याची सुलभ वाढ आणि विशिष्ट

---

*हिंदूंच्या चतुर्वर्णी समाजाचीं हीं 'स्वभावज' कर्में व गुण भगवद्गीतेंतील पुढील श्लोकांत स्पष्ट रीतीनें सांगितलेलीं आहेत :—

शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम्।
कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥

मनोबुद्धिगुणांचा विशिष्ट प्रकारें होणारा पूर्ण विकास हीं होत. विद्वान् लोक, योद्धे, वैद्य, कायदेपंडित, धर्माधिकारी, व्यापारी, कामकरी हे वर्ग जसे अर्वाचीन काळीं युरोप-अमेरिकेंतील सर्व सुधारलेल्या देशांत आहेत, तसे ते भरतखंडांतही होते व आहेत. पण त्यांत फरक इतकाच आहे कीं, पाश्चात्त्य समाजांतील ही कर्म-विभागणी शिथिल, अपूर्ण अस्पष्ट आणि चंचल असून तिचें कार्य अनियमित व यदृच्छेनें होत आहे; पण भारतीय समाजांतील ही विभागणी दृढ, परिपूर्ण, स्पष्ट व स्थिर असून ती एकाद्या यंत्राप्रमाणें आपलें कार्य नियमितपणें व विनचूक करीत असे.

हिंदुसमाज-घटनेस प्रारंभ झाला त्या वेळीं व त्यानंतरही बराच काळ वर्णव्यवस्थेस हल्लींच्या दृढ जातिव्यवस्थेचें स्वरूप प्राप्त झालेलें नव्हतें. चारी वर्णांतील लोक आपापल्या नवोदित गुणकर्माप्रमाणें खालच्या आणि वरच्या वर्णामध्यें प्रविष्ट होत असत; म्हणजे त्या कालीं व्यक्तींची उत्क्रांति व अपक्रांति, उन्नति आणि अधोगति हीं दोनही सारखी समरेषेनें समाजांत चालूं होतीं. समाज-घटनेच्या प्राथमिक अवस्थेंत असें होणें स्वाभाविक किंबहुना इष्टही होतें. ब्राह्मण आईबापांचे पोटीं जन्मलेला मनुष्य आपल्या गुणकर्माप्रमाणें कधीं क्षत्रिय, कधीं वैश्य व कधीं शूद्रही होत असे; व उलट शूद्रही ब्राह्मण किंवा क्षत्रिय होत असे. शांकरदिग्विजयकारांनीं सांगितलेल्या

जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते ।
वेदपाठी भवेद्विप्रो ब्रह्म जानाति ब्राह्मणः ॥

या न्यायानें त्या वेळीं सर्व लोक जन्मसमयीं एका दृष्टीनें शूद्र समजून व्यक्तीच्या गुणकर्मप्रवृत्तीप्रमाणें तिला वर्ण-व्यवस्थेंतील तें तें स्थान मिळे.

महाभारताच्या वनपर्वांतही म्हटलें आहे.—

सत्यं ज्ञानं क्षमा शीलमानृशंस्यं तपो घृणा ।
दृश्यंते यत्र नागेश स ब्राह्मण इति स्मृतः ॥

दुसऱ्या दृष्टीनें पाहिलें तर शांतिपर्वांत सांगितल्याप्रमाणें,

न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत् ।
ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतम् ॥

ब्रह्मदेवानें मनुष्यप्राणि निर्माण केले तेव्हां ते सर्व ब्राह्मणच होते; पण ते आपापल्या भिन्न गुणकर्मप्रवृत्तीप्रमाणें भिन्न भिन्न वर्णाचे झाले.

१२

कवष ऐलूष हा दासीपुत्र व शूद्र असूनही त्याची विद्वत्ता पाहून त्यास ऋषींनीं आपणांत समाविष्ट करून घेतलें; किंबहुना तो शूद्र असूनही ऋग्वेदांतील कांहीं मंत्रांचा तो द्रष्टा ऋषि झाला. (ऐतरेय ब्राह्मण, द्वितीय पंचिका, अ०. ३–१९ व ऋग्वेद १० वें मंडल, सूक्तें ३०–३४) सत्यकाम जाबाल यास गोत्र नसून त्याच्या मातेचें नांव 'जबाला' असें होतें; व त्यावरूनच त्याचें 'जाबाल' हें नांव पडलें. (छांदोग्य-उपनिषद्, ४।४) असें असूनही हा यजुर्वेदाच्या एका शाखेचा आद्य प्रवर्तक झाला. मनुस्मृति (अध्याय १० श्लोक ६५) सांगते कीं:—

' शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् ।

पाणिनीनें आपल्या अष्टाध्यायीच्या ६ व्या अध्यायांत (१–३०) चाक्रवर्मण-नामक एक प्राचीन वैय्याकरण उल्लेखिलेला असून तो ' वर्मण ' या प्रत्ययावरून क्षत्रिय होता, हें उघड सिद्ध होतें. विश्वामित्र जन्मानें क्षत्रिय व वाल्मिकी शूद्र होते, हें सुप्रसिद्धच आहे. शिकंदराची हिंदुस्थानावर स्वारी झाली त्या काळीं ही स्थिति कांहीं अंशीं कायम होतीसें दिसतें. ग्रीक ग्रंथकारांनीं हिंदूंच्या चारच जातींचा उल्लेख केलेला आहे. कोणत्याही जातीच्या हिंदूस ' सोफिस्ट ' (ब्राह्मण) होतां येत असे, असें मेगॅस्थनीस म्हणतो. सोफिस्ट, शेतकरी, धनगर, कारागीर, शिपाई, अधिकारी व मंत्री असे हिंदूंचे सात वर्ग एरियन ग्रंथकारानें नमूद केले आहेत. कर्नल टॉड राजस्थानाचे इतिहासांत लिहितो कीं, " सूर्य-चंद्रराजवंशाच्या पहिल्या कांहीं पिढ्यांचे काळीं उपाध्यायपण हा एक धंदा होता, त्यास वंशपरंपरेचें स्वरूप प्राप्त झालेलें नव्हतें. या राजवंशाची वंशावली पाहतां असें दिसून येतें कीं, या वंशांतील कांहीं शाखांनीं मध्यंतरींच क्षत्रिय कर्में सोडून देऊन व नवीन गोत्रास प्रारंभ करून ब्राह्मणकर्में अंगिकारिलीं होतीं; व पुढें यांच्याच वंशजांनीं आपलें पहिलें क्षात्रकर्म पुनः अंगिकारिलें होतें. "

वर्णव्यवस्थेचा हा लवचिकपणा पुढें पुढें नष्ट होत जाऊन त्यास सांप्रतच्या दृढ व परस्परांस अप्रवेश्य अशा जातिभेदाचें स्वरूप प्राप्त झालें. त्या काळीं अनुवंशत्वाचें तत्त्व प्रधान मानून जन्मावरून जाति निश्चित होऊं लागली. पण त्यांतही पूर्वीच्या लवचिक वर्ण-व्यवस्थेचें—गुणकर्म-विभागाचें—तत्त्व कायमच होतें. ब्राह्मणकुळांत जन्मलेल्यास ब्राह्मणत्व मिळे, पण ब्राह्मणाप्रमाणें आचरण करण्याची जबाबदारीही त्याचे शिरावर येई. ही जबाबदारी न ओळखतां जर तो अन्य कर्में करूं लागला, तर त्या काळचे वर्णाश्रम-पद्धतीचे अभिमानी असलेले क्षत्रिय राजे त्याच्या कर्मास योग्य अशा जातींत त्यास घालीत, किंवा

त्याची निराळीच जात बने. सारांश, या कालीं खालच्या जातींतून वरच्या जातींत प्रवेश होणें बंद होऊन वरच्या जातींतून खालच्या जातींत अधःपात होणें किंवा नवी जात बनणें हीं कार्यें माल चालू राहिलीं. पुढें भारतीयांचा परकीय राष्ट्रांशीं व भिन्न संस्कृतीशीं अत्यंत निकट संबंध येऊन त्यांचे राजे हिंदुस्थानावर राज्य करूं लागल्यापासून आमच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेंतील एक अंग अजीबात तुटून जाऊन समाज विकलांग झाला. चारी वर्ण व त्यांत अंतर्भूत झालेल्या जाती आपआपलीं नियमित कार्यें करीत आहेत कीं नाहींत हें पाहणें व कांहीं तसें करीत नसतील तर त्यांस समाजांतील खालच्या जातींतलें स्थान घेण्यास भाग पाडणें, हें जें हिंदुसमाजघटनेंतील क्षत्रिय राजांचें मुख्य काम तें लुप्त झाल्यामुळें समाज अत्यंत विस्खलित झाला आणि जाति-भेदास सांप्रतचें चमत्कारिक स्वरूप प्राप्त झालें. हल्लीं वरीष्ठ जातींतील मनुष्यानें कितीही भ्रष्टाचरण केलें तरी हिंदुधर्मीय राज्यशास्ता नसल्यामुळें, त्याचें सत्तीनें खालच्या जातींत अधःपतन होत नाहीं ! जाति-भेदास हल्लीं जें हीनस्वरूप प्राप्त झालें आहे व ज्यामुळें कनिष्ठ जातींना वरिष्ठ ब्राह्मणादि जातींचा मत्सर वाटावयास लागला आहे, त्याचें मुख्य कारण तरी जातिभेदाची वरील स्थिति हेंच आहे. ही स्थिति उत्पन्न होण्याचीं मुख्य कारणें अशीं झालीं कीं, भारतीय युद्धांतील क्षत्रिय-संहारामुळें राष्ट्राच्या युद्ध-सामर्थ्यास कमकुवतपणा आला; यामुळें आर्यावर्ताचें राज्य अन्यधर्मीयांचें हातीं गेलें आणि हिंदुसमाजघटनेंतील महत्त्वाचें कार्य करणारा हिंदुधर्मीय राज्यशास्ता न उरल्यामुळें समाज-व्यवस्थेची घडी विघडली!

भारतीययुद्ध संपल्यानंतर लागलीच कलिकालास कशी व कां सुरुवात झाली, अर्थात् हिंदुसमाजांत ऱ्हासाचें बीज कसें पेरलें गेलें, हें वरील विवेचनावरून वाचकांचे ध्यानांत येईल. भारतीय वैभवसूर्य द्वापराचे अंतीं म्हणजे भारतीय युद्धकालीं मध्यान्हीं येऊन तळपत होता तो कलियुगाचे आरंभाबरोबरच अस्ताचलाकडे कलूं लागला; तो, ठाणेश्वराच्या लढाईंत शहाबुद्दीन घोरीनें पृथ्वीराजाचा पराभव केला त्या वेळीं, संयोगितेचा अपूर्व अनुराग व पृथ्वीराजाचें अद्वितीय तेज, यांचा रक्तवर्ण संधिप्रकाश पाडीत अस्तास गेला; आणि पानपत ऊर्फ कुरुक्षेत्राच्या त्याच अपेशी रणभूमीवर अहमदशाहा दुराणी याच्या सैन्यानें मराठ्यांच्या फौजेचा मोड केला, त्या वेळीं या सूर्यानें अधःपतनाचा परम नीच बिंदु गांठला, असेंही म्हणतां येईल !

वर सांगितल्याप्रमाणें हिंदुसमाजाची वर्णाश्रमव्यवस्थेची घडी सांप्रत जरी विघडलेली आहे, तरीही ती अद्याप हिंदुसमाजाच्या स्वत्वसंरक्षणाचें कार्य बऱ्याच अंशानें करीत

आहे. वर्णाश्रमव्यवस्थेचीं स्वत्वसंरक्षण व प्रगति हीं दोन अंगें किंवा कार्यें असून, विपरीत परिस्थितीमुळें उत्तरोक्त कार्य तिजकडून होईनासें झालें आहे; तरीही ती स्वत्वसंरक्षणाचें पूर्वोक्त कार्य अद्यापही करीत राहिली आहे. व म्हणूनच हिंदुसमाज गेल्या एक हजार वर्षांतील राजकीय क्रांत्या व धार्मिक कलह यांतून निभावून जिवंत राहिला आहे. जातिव्यवस्थेची ही उपयुक्तता परकीय एकवर्णी समाजांतील समंजस व निःपक्षपाती निरीक्षकांचेही नजरेस आली आहे. सर हेनरी कॉटन लिहितातः-(The system of caste, far from being the source of all the troubles which can be traced in Hindu society, has renderd most important service in the past and still continues to sustain order and solidarity) "सांप्रतच्या हिंदुसमाजांत जे दोष, उणीवा, अडचणी किंवा भानगडी दिसून येतात, त्या सर्वांचा उगम जातिव्यवस्थेपासून झालेला नाहीं; येवढेंच नव्हे तर, या व्यवस्थेनें प्राचीन कालीं समाजघटनेचें मोठें कार्य केलेलें असून सांप्रतही त्यामुळेंच हिंदुसमाजाची सुव्यवस्था व दृढता कायम राहिली आहे. " युरोपियन समाजशास्त्राच्या दृष्टीनेंही आमच्या जाति-व्यवस्थेंत कोणते गुण आहेत, याचें वर्णन मि. सिडने लो यांनीं [A Vision of India] नांवाच्या आपल्या पुस्तकांत पुढीलप्रमाणें केलें आहेः-" जातिव्यवस्थेमुळेंच हिंदुसमाजाचा पाया खंबीर व मजबूत राहून त्यांत समाधान नांदलें; आणि या गुणामुळेंच राज्यक्रांत्या व पंचमहाभूतांचे उत्पात यांशीं अनेक शतकें एकसारखी टक्कर देत राहण्याचें हिंदुसमाजांत सामर्थ्य आलें, यांत तिळमात्र संदेह नाहीं. समाजांतील प्रत्येक माणसास त्याचें योग्य स्थान, योग्य धंदा, योग्य कर्तव्य व योग्य मित्र दाखवून देण्याचें कार्य ह्मीच जाति-व्यवस्था करते. प्रत्येक व्यक्ति एकटी, स्वतंत्र व असहाय्य अशी न राहतां तिला प्रारंभापासूनच एका वर्गाचा व जातीचा अवयव ही बनवून टाकते; आणि सामाजिक मत्सर व मनोरथ-भंगाची निराशा या दुर्धर रोगांची त्याला आमरणांत बाधा होऊं देत नाहीं. त्याचे स्थितीस व धंद्यास योग्य असे समशीलाचे स्नेही-सोबती व बांधव त्यांस मिळवून देऊन त्याचे मनांतही त्यांचेविषयीं स्नेहाची व बंधुत्वाची भावना ही दृढ करते. युरोपियन समाजांत क्लब, व्यवसाय संघ [ट्रेड युनियन], परस्पर साह्यकारी संस्था [बेनिफिट सोसायटी] व धर्मखातें या संस्था जीं कार्यें करतात, तीं सर्व एकटी जातिव्यवस्था हिंदुसमाजांत करिते. हिंदुस्थानांत युरोपप्रमाणें अनाथगृहें [वर्क हौसेस्]

नाहींत, व अजून त्यांची आवश्यकताही उत्पन्न झालेली नाहीं. यांचें तरी कारण हेंच कीं, आपले आप्तेष्ट, स्नेही व ज्ञातिबांधव यांस संकटकालीं सर्व प्रकारें सहाय्य करणें हें आपलें कर्तव्य आहे, अशी हिंदुसमाजांत सार्वत्रिक भावना आहे. आणि कुंटुंबाचे सांसारिक पाश, तसेंच सहवास व समव्यवसाय यांनीं उत्पन्न केलेलीं बंधनें जातिव्यवस्थेनें विशेष दृढ केल्यामुळेंच वर सांगितलेली सार्वत्रिक कर्तव्यभावना उत्पन्न झाली आहे, यांत शंका नाहीं. सारांश, हिंदुस्थान व जातिभेद यांचा इतका एकजीव झालेला आहे कीं जाति-भेदशून्य अशा हिंदुस्थानाची नुसती मनांत कल्पना करणेंही दुर्घट आहे."

There is no doubt that it is the main cause of the fundamental stability and contentment by which Indian society has been braced for centuries against the shocks of politics and the cataclysms of Nature. It provides every man with his place, his career, his occupation, his circle of friends. It makes him, at the outset, a member of a corporate body; it protects him through life from the canker of social jealousy and unfufilled aspirations; it ensures him companionship and a sense of community with others in like case with' himself. The caste organization is to the Hindu his club, his trade union, his benefit society, his philanthropic society; there are no work-houses in India, and none are as yet needed. The obligation to provide for kinsfolk and friends in distress is universally acknowledged; nor can it be questioned that this is due to the recognition of the strength of family ties and of the bonds created by associations and common pursuits which is fostered by caste principle. An India without caste, as things stand at present, is not quite easy to imagin.

प्रकरण २ रें.

भारतीय संस्कृतीची प्राचीनता.

हिंदुसमाजाची उभारणी अविनाशी व सनातन अशा तत्त्वांच्या पायावर सृष्टिनियमानुसार झालेली असल्यामुळें हिंदुसमाज, हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांच्या मध्यें विलक्षण जिवटपणा कसा आला आहे, याचें दिग्दर्शन मागील प्रकरणांत केलें. हिंदुसंस्कृतीचा हा जिवटपणा जसा आश्चर्यकारक आहे तशी तिची प्राचीनताही मन थक्क करून सोडणारी आहे, हें या प्रकरणांत दाखविण्याचा विचार आहे.

ग्रीक राष्ट्राच्या प्राचीनतेकडे पहा, इजिप्तमधील जगद्विख्यात मनोरे बांधणाऱ्या सौफी राजघराण्याचे प्राचीन काळाकडे नजर फेंका, किंवा अर्वाचीन युरोपियन शास्त्रज्ञांनीं मानलेल्या ' शिलायुगा ' चा* विचार करा; हिंदुसंस्कृतीच्या प्राचीनतेच्या दृष्टीनें हे काळ अगदींच अर्वाचीन भासतील. आपल्या या पृथ्वीचें आयुर्मान इतकें मोठें आहे कीं, तें हजारांनीं किंवा लक्षांनीं न मोजतां अब्जांनींच वास्तविक मोजलें पाहिजे ! आणि अशा या पुराणतम कालापर्यंत पसरलेल्या जगाच्या इतिहासांत ज्या ज्या संस्कृतींचा इतिहास सांप्रत उपलब्ध आहे, त्या सर्वांत हिंदुसंस्कृति अधिक प्राचीन आहे,ही गोष्ट निःपक्षपाती इतिहास-शोधकांस मान्य झालेली आहे. या जगांत आजपर्यंत अनेक राष्ट्रें जन्म पावलीं व नामशेष झालीं, अनेक साम्राज्यें उभारलीं व जमीन-दोस्त झालीं आणि अनेक राष्ट्रें उदयास आलीं व नष्ट झालीं. पण या सर्वांचा जन्म व मृत्यु, स्थापना व नाश, उदय व अस्त हीं दोनही हिंदुराष्ट्रानें पाहिलीं; अर्थात् त्यांच्या बारशाचा सोहळा व बाराव्याचा विधि हीं दोनही जिनें पाहिलीं, ती हिंदुसंस्कृति सर्वांत प्राचीनतम होय हें स्पष्ट आहे.

सर्व जुन्या राष्ट्रांच्या संस्कृतीच्या प्राचीनतेची परीक्षा करून कौंट जार्नस्टजर्ना यांनीं असा सिद्धांत नमूद केला आहे कीं, (Theogony of the Hindus पृ० ५०)

---

* मनुष्य प्रथमतः गारगोट्या वगैरेंचीं हत्यारें करीत असून त्यास पुढें क्रमानें तांबें, कांस्य, लोखंड वगैरे धातूंचा शोध लागला, असें कांहीं युरोपियन विद्वान् मानतात; त्यास अनुसरून मानवी सुधारणेचीं युगें मानण्याचा तिकडे प्रघात आहे.

" हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांच्या प्राचीनतेची बरोबरी करूं शकेल, असें एकही राष्ट्र या पृथ्वीचे पाठीवर नव्हतें व नाहीं. " अमेरिकेंतील येल कॉलेजचे प्रेसिडेंट डा. स्टाइल्स हे संस्कृत वाङ्मयाची प्राचीनता पाहून इतके थक्क झाले होते कीं, ' आडामचीं पुस्तकें ' हिंदुस्थानांत सांपडण्याचा संभव आहे, असें वाटून त्यांचा शोध करण्याची विनंति त्यांनीं सर विल्यम जोन्स यांस केली होती ! (Ward's Mythology पृष्ठ १४४)हिंदूंची चतुर्युगीची काल-गणना पाहून हालव्हेडनामक ग्रंथकाराचें मन आश्चर्यानें व पूज्य-बुद्धीनें भरून आलें, आणि ' हिंदूंच्या या कालगणनेची प्राचीनता पाहिली म्हणजे तिच्यापुढें यहुदी धर्मग्रंथांत वर्णिलेला सृष्टिरचनेचा काळ हा परवांचा वाटावयास लागतो ' असे उद्गार त्यांनें काढले ! कोणतेंही राष्ट्र बाल्यावस्थेंतून व तरुणपणांतून प्रौढ दशेस येईपर्यंत त्यामध्यें सृष्टिशास्त्रें निर्माण होत नाहींत; अशा शास्त्रांमध्येंही आकाशस्थ ग्रहगोलाचें [ज्योतिष] शास्त्र हें तर सर्वांचे मागून उदय पावतें. आणि या शास्त्रांत शोध व प्रगति हींही पायरी पायरीनें व हळू हळू होत असतात. या दृष्टीनें हिंदूंच्या ज्योतिष शास्त्राची प्राचीनता पाहिली तर तीवरून त्या शास्त्राचा उदय होण्यापूर्वी हिंदुराष्ट्र किती तरी सहस्र वर्षें अस्तित्वांत असलें पाहिजे, याची सहज कल्पना येते. हिंदुज्योतिषाच्या प्राचीनतेचा सर्व बाजूंनीं विचार करून अखेर कौंट जार्नस्टजर्नी लिहितात कीं,(Theogony of the Hindus पृ. ३७।३८)"बेलीनें केलेल्या गणितावरून असें दिसून येतें कीं,ख्रिस्तापूर्वी ३००० वर्षांचे सुमारास ज्योतिष व भूमिति या शास्त्रांत हिंदुराष्ट्राची पुष्कळ प्रगति होऊन चुकली होती;अर्थात् हिंदुराष्ट्राची सामान्य संस्कृति त्या कालाच्या किती तरी सहस्रकें आधीं जन्मास आलेली असली पाहिजे, असें मानावयास हरकत नाहीं. दुसरें असें कीं अजंठा, वेरूळ, घारापुरी वगैरे ठिकाणचीं लेणीं आणि इजिप्तच्या मनोऱ्याचीही प्रचंडपणांत बरोबरी करणारीं पण शिल्पसौंदर्यांत त्याहूनही श्रेष्ठ असलेलीं देवळें पाहिलीं, म्हणजे हिंदुसंस्कृतीची प्राचीनता मनास तेव्हांच पटते." बेकस्पासून शिकंदरापर्यंतचा काल ६४५१ वर्षांचा असून, त्या अवधींत हिंदुस्थानावर एकंदर १५३ राजांनीं राज्य केलें, असें प्लिनी इतिहासकार सांगतो. बेकसच्या पूर्वी इकडे किती राजे झाले असतील, हें मात्र इतिहासास मुळींच माहीत नाहीं. काश्मीरच्या प्राचीन इतिहासाचें वर्णन करणाऱ्या राजतरंगिणींत ज्या राजांच्या कारकीर्दींचें वर्णन आहे, त्यांच्या सर्व कारकीर्दींचा काळ ४१०९ वर्षें, ११ महिने, ९ दिवस इतका होत आहे. ' स्पटेंबस पासून संद्रकोटस [चंद्रगुप्त] पर्यंत ६०४२ वर्षें लोटलीं. ' असें मेगॅस्थनीस म्हणतो

[स्पर्टेंबसास कित्येक ग्रीक इतिहासकार ' डायोनिसियस ' म्हणत असून हिंदुस्थानांतील अतिप्राचीन काळच्या एका राजाच्या नांवाचा हा ग्रीक अपभ्रंश आहे.] प्रो. मॅक्सडंकर(History of Antiquity P. 218&74) लिहितातः-"विक्रमशकापूर्वी ३०४४ किंवा ख्रिस्ती शकापूर्वी ३१०० वर्षांचे सुमारास युधिष्ठिर-शक सुरू झाला;आणि त्याचेही पूर्वी म्हणजे ख्रिस्तीशकापूर्वी ६७१७ वर्षांचे सुमारास स्पर्टेबस् ऊर्फ डायोनिसियस् हा भारतवर्षांत राज्य करीत असावा." कौंट जार्नस्टजर्ना हे लिहितातः—(Theogony of the Hindus P.4) "चंद्रगुप्ताची राजधानी पाटलिपुत्र येथें शिकंदराचा वकील मेगॅस्थनीस हा आला असतां,त्यास तेथें कांहीं राजवंशावलि पाहावयास मिळाल्या.त्यांमध्यें डायोनिसियसपासून चंद्रगुप्तापर्यंत झालेल्या १५३ राजांची नांवें व प्रत्येकाच्या कारकीर्दींचीं वर्षें, हीं नक्की दिलेलीं आढळलीं. त्यावरून या १५३ राजांचा एकंदर राज्यकाळ ६४५१ वर्षें झाल्याचें त्यास कळून आलें. यावरून हिशेब करतां डायोनिसियस राजा ख्रिस्तापूर्वी सुमारें ७००० वर्षांचे सुमारास भरतखंडांत राज्य करीत होता, असें सिद्ध होतें. इजिप्तमधील सर्वांत जुना गिझे-मनोरा बांधणारा सौफी राजा ख्रिस्तापूर्वी ३८६७ चे सुमारास असून इजिप्तमधील सर्वांत जुन्या राजाचा काल ख्रिस्तीपूर्वी ५८६७ हा आहे; पण याच्याही पूर्वी भरतखंडांतील डायोनिसियस राजाचा हा काळ येत आहे!" सर विल्यम जोन्स लिहितातः-[त्यांचे ग्रथ Vol I, P.304.]" मगधदेशावर राज्य केलेल्या ८१ राजांचा निर्देश पुराणांत आहे; त्यांपैकीं पहिल्या २० राजांच्या कारकीर्दींचा काल दिलेला नाहीं. त्यापुढील ६१ राजे हे एकाच राजघराण्यांतील नसून ते पांच घराण्याचे आहेत. यांपैकीं पहिल्या राजघराण्यांतील प्रदिष्ट राजापासून तो नंदराजापर्यंत एकंदर सोळा राजांनीं ख्रि. पू. २१०० पासून ख्रि. पू. १५०० पर्यंत राज्य केलें. यानंतर दुसऱ्या राजघराण्याच्या १० राजांनीं ख्रि. पू. १३६५ पर्यंत राज्य केलें. शुंग घराण्यांतही दहाच राजे असून त्याची समाप्ति ख्रि. पू. १२५३ चे सुमाराची झाली; त्यानंतर आलेल्या काण्व राजघराण्याचे फक्त चारच राजे झाले व त्यांनीं ख्रि. पू. ९०८ पर्यंत राज्य केलें. पांचवें राजघराणें आंध्रांचें असून ख्रि. पू. ४५६ किंवा विक्रमपूर्व ४०० वर्षेंपर्यंत त्यांचें राज्य टिकलें. " " प्रद्योत ऊर्फ प्रदिष्ट राजघराणें स्थापन होण्यापूर्वी [ख्रि. पू. २१००] बार्हद्रथ घराणें मगधदेशावर राज्य करीत असून त्यांतील पहिला सोमपी व शेवटचा रिपुंजयनामक राजा झाला; व या घराण्यानें १००० वर्षें राज्य केलें. आणि या बार्हद्रथ घराण्याचे पूर्वी सहदेव, जरासंध व बृहद्रथ हे राजे झाले होते."

या वरील सर्व माहितीवरून असें दिसून येतें कीं, हिंदुराजांची काल-गणना करतांना पुराणकारांस प्रत्येक राजाचा काल घेण्याऐवजीं एकेक राजघराणें घेऊनच त्याची काल-गणना करावी लागली आहे. हिंदुसंस्कृतीची प्राचीनता सिद्ध करण्यास येवढी एकच गोष्ट पुरेशी आहे. प्रो. हीरनच्या मतें अयोध्या नगरी ख्रि. पू. १५००–२००० वर्षांचे दरम्यान वसविली असावी. कॅप्टन ट्रॉयर हे याच्याही पलीकडे जाऊन असें म्हणतात कीं, ख्रि. पू. ३००० चे सुमारास सुधारणेंत फार पुढें गेलेलीं अनेक मोठीं राज्यें हिंदुस्थानांत होतीं; व या कालाचे पूर्वी बरींच शतकें रामायणाचा नायक राम हा झाला असला पाहिजे. अयोध्या नगरीनें १५०० वर्षें वैभव उपभोगल्यानंतर शुंग घराण्याच्या एका राजानें कनोज शहर वसविलें, असें पुराणांतरीं वर्णन आहे; आणि या कनोज नगराची स्थापना ख्रि. पू. १००० चे सुमारास झाली असावी, असा रेनेलचा तर्क आहे. हस्तिनापुर व इंद्रप्रस्थ यांची स्थापना फारच प्राचीनकाळीं झाली असली पाहिजे, हें तर सर्व शोधकांस मान्य झालेंच आहे. दबिस्ताननामक एक बाक्ट्रियन लेख सर विल्यम जोन्स यांस काश्मिरांत सांपडला होता; व तो पुढें त्यांनीं युरोपांत नेला. या लेखांत अनेक राजांची मोठी नामावली दिलेली असून तींतील पहिला राजा बाक्ट्रिया देशांत शिकंदराचे स्वारीपूर्वी ५६०० वर्षांचे सुमारास राज्य करीत होता; आणि हा राजा हिंदुच होता.यावरून ख्रि. पू. ६००० चे सुमारास,म्हणजे पृथ्वीवर मनुष्यप्राणी निर्माण झाल्याचा जो काळ मध्ययुगीन युरोपियन ग्रंथकारांनीं दिला होता त्याचे आधीं अनेक शतकें, भरतखंडाची संस्कृति किती श्रेष्ठतेस पोंचली होती तें कळून येतें. " असें कौंट जार्नस्टजर्ना (Theogony of the Hindus P. 134) लिहितात. तसेंच जगांतील प्राचीन देशांत जीं नाणीं सांपडलीं आहेत, त्यांत सर्वांत जुनें नाणें हिंदुस्थानांतलेंच आहे; यावरूनही हिंदुसंस्कृतीच्या प्राचीनतेची कल्पना येईल. इजिप्त, ग्रीस, इराण, चीन, अमेरिका वगैरे देशांत फार प्राचीनकाळीं हिंदूंनींच वसाहती केल्या, आणि त्यांचेच वंशज पुढें तेथील नामांकित राष्ट्रें बनलीं. तसेंच स्कांडेनेव्हिया, जर्मनी व ब्रिटन येथील लोकांच्याही संस्कृति व धर्म हीं हिंदुस्थानापासूनच त्यांस मिळालीं आहेत. सारांश, सर्व जगास प्राचीनकालीं विद्या, संस्कृति व धर्म यांचा जो लाभ झाला, तो भरतखंडरूपी गुरूपासूनच होय. (ही गोष्ट पुढें एका प्रकरणांत विवेचावयाचीच आहे.) यावरूनही हिंदुसंस्कृतीची प्राचीनता कोणासही सहज पटेल.

पाश्चात्त्य विद्वान् शोधक कालनिर्णयाचे व कालगणनेचे बाबतींत विशेष चिकित्सक व प्रत्यक्ष-प्रमाणवादी असतात; आणि हें एका दृष्टीनें योग्य व इष्टही आहे. पण ही चिकित्सक बुद्धि अतिरिक्त झाली म्हणजे तिला संशयीपणाचें व विश्वास-शून्यतेचेंच स्वरूप प्राप्त होतें. प्रो. विल्सन यांनीं म्हटल्याप्रमाणें, भोळसरपणाचे पाशांत न सांपडण्याचे प्रयत्न करतां करतां ते त्याच्या उलट दिशेच्या पक्क्या संशयीपणाच्या भोंवऱ्यांत सांपडतात. या बाबतींत दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, सामान्य युरोपियन विद्वानांची ऐतिहासिक दृष्टि फार दूरवर न पोंचणारी, संकुचित व कोती असते. पाश्चात्त्यांची ही ऐतिहासिक नजर ५।६ हजार वर्षांपलीकडे फार करून पोंचतच नाहीं. युरोपखंडांतील सांप्रतची संस्कृति अगदीं अर्वाचीन काळची असल्यामुळें या संस्कृतीपूर्वी युरोपांत जगाच्या आरंभापासून रानटीपणा व अज्ञानच होतें, असा त्यांचा दृढ समज झालेला आहे. किंबहुना या जगाची व त्यावरील मनुष्यप्राण्याची जी उत्पत्ति झाली, तिच्या कालासंबंधानेंही त्यांची दृष्टि अशीच कोती व संकुचित होती व आहे. जग उत्पन्न होऊन १०।१२ हजार वर्षें व मनुष्यप्राणी निर्माण होऊन ५।६ हजार वर्षें झालीं, ही समजूत जेथें अनेक शतकें दृढ होऊन गेलेली आहे, तेथील शोधकांचेंही मन हिंदुस्थानांतील संस्कृतीची अवाढव्य प्राचीनता व त्यांच्या कालगणनेची प्रचंडता पाहून गोंधळून व बावरून जावें, यांत कांहीं नवल नाहीं. ४।५ हजार वर्षांपूर्वी बहुतेक युरोपखंडांत रानटी स्थितिच होती, असें त्यांस दिसून आल्यामुळें, इतर देशांत १०।१५ हजार वर्षांपूर्वीही लोक पुष्कळच सुधारलेले होते, असें त्यांस सांगितलें तर त्यांचा त्यावर विश्वासच बसत नाहीं. युरोपियन विद्वानांच्या ह्या मनःस्थितीचा परिणाम युरोपियन शोधकांच्याही मनावर त्यांस न कळत झाल्यावांचून राहत नाहीं. हिंदुस्थानांतील राजे, कवि किंवा ग्रंथ यांचा कालनिर्णय ठरवितांना त्यांस होतां होईल तितकें अर्वाचीन कालाकडे खेंचण्याचा प्रयत्न युरोपियन शोधकांकडून होतो, त्याचें तरी बीज हेंच आहे. कित्येक शोधक आधीं मनांत कांहीं तरी प्रमेय ठाम करून घेतात. आणि मग ते त्यास अनुकूल असे आधार शोधतात, कांहीं आधार ओढाताण करून जुळवतात व जीं वचनें त्यांचे प्रमेयास विरुद्ध असतील तीं ग्रंथिस्थांत ढकलून मोकळे होतात ! पण ही पूर्वग्रह-दूषित मनोवृत्ति खऱ्या शोधकतेस व्यत्यय आणणारी आहे, हें सांगावयास नकोच. आपल्या ह्या पृथ्वीचें आयुष्य हजारांनीं किंवा लक्षांनींही न मोजतां अब्ज वर्षांनीं मोजलें पाहिजे; तसेंच या पृथ्वीवर मनुष्य प्राणी निर्माण होऊनही लक्षांनीं मोजतां येतील इतकीं वर्षें झालेलीं आहेत. या गोष्टी भूस्तर

शास्त्रवेत्त्यांचे प्रयत्नानें आतां कोठें युरोपांत थोड्याबहुत मान्य व्हावयास लागल्या आहेत. अर्थात् सांप्रतकाळीं ज्या देशांत केवळ रानटी लोकांचीच वस्ती आहे, असे देश जगाचे आरंभापासून त्याच स्थितींत आहेत, असें गृहीत धरून राष्ट्रांच्या किंवा देशांच्या संस्कृतीची प्राचीनता ठरविण्याचें कांहींच कारण नाहीं. एकादा देश अत्यंत सुधारलेला असूनही तेथील संकृति प्रचंड भूकंप, ज्वालामुखीचे उद्रेक, जलप्रलय किंवा क्रांत्या यांनीं नामशेष होऊन, तेथें पुनः रानटी स्थिति येण्याचाही संभव आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये. तसेंच जगांत अति प्राचीनकाळीं एक देश अगदीं रानटी स्थितींत असला, म्हणजे त्या कालीं सबंध पृथ्वीवरील सर्वच देशांची तशीच स्थिति होती, असेंही गृहीत धरण्याचें कारण नाहीं. किंबहुना सांप्रत काळीं जेथें महासागर किंवा कडक थंडीनें गोठलेले समुद्र आहेत, तेथें ते जगाचे आरंभापासूनच आहेत असेंही नाहीं. त्या जागीं मोठीं खंडें, मोठीं राष्ट्रें व उच्च संस्कृति हीं अतिप्राचीन काळीं होतीं, असें आतां दिसून येऊं लागलें आहे. या सर्व गोष्टींचा विचार करतां युरोपियन विद्वान् व शोधक यांच्या, जगांतील निरनिराळ्या संस्कृतींच्या प्राचीनतेसंबंधाच्या, कल्पना संकुचित आणि चुकीच्या कशा व कां आहेत हें ध्यानांत येईल.

पृथ्वीच्या उत्पत्तीचा किंवा मनुष्यप्राण्याच्या निर्मितीचा काळ भारतीयांनीं अशा संकुचित किंवा कोत्या दृष्टीनें मुळींच ठरविलेला नाहीं. त्यांची युगपद्धतीची कालगणना अर्वाचीन भूस्तर-शास्त्र-वेत्त्यांच्या कालगणनेच्या बरीच जवळ जवळ येते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भारतीयांनीं आपल्या सूक्ष्म बुद्धीनें कालाचे विभाग जसे अतिसूक्ष्म परिमाणापर्यंत पाडले आहेत, तशीं त्यांनीं अनाद्यनंत काल मोजण्याचीं प्रचंड परिमाणेंही आपल्या विशाल बुद्धीनें ठरवून ठेवलीं आहेत, हें सहज सिद्ध करून देतां येईल.

हिंदूंच्या प्रत्येक लहान-मोठ्या धार्मिक विधीच्या व धर्म-कृत्याच्या आरंभीं जो संकल्प म्हणण्यांत येतो, त्यांत जगदुत्पत्तीचा काल स्पष्टपणें सांगितलेला आढळून येतो. ..

' अद्य श्री-ब्रह्मणो द्वितीय-प्रहरार्धे वैवस्वत-मन्वंतरे
अष्टाविंशतितमे कलियुगे कलिप्रथमचरणे दंडकारण्ये देशे ' इ०.

अशा प्रकारचा हा संकल्प आहे. या संकल्पाचा अर्थ काय व त्यावरून जगदुत्पत्तीच्या कालाची नक्की गणना कशी होते, तें आतां पाहूं.

जगदुत्पत्तीसंबंधानें भारतीयांचा असा सिद्धांत आहे कीं, एकदां जग उत्पन्न झालें म्हणजे त्याचें तें व्यक्त स्वरूप विवक्षित काल टिकतें; व नंतर त्या व्यक्त जगाचा नाश

होऊन तें अव्यक्त स्वरूपांत म्हणजे मूळ परमाणु-रूपांत तितकाच काल राहून त्यानंतर जगास पुनः व्यक्त स्वरूप प्राप्त होतें. जगास हें व्यक्त स्वरूप जितक्या कालपर्यंत असतें, त्या कालास ' ब्रह्मदिन ' म्हणजे सृष्टि-कर्त्याचा दिवस, व अव्यक्त स्वरूप असतें त्या कालास ' ब्रह्मरात्रि ' म्हणजे सृष्टि-कर्त्याची रात्र, अशीं अन्वर्थक परिभाषिक नांवें दिलेलीं आहेत. याच ब्रह्मदिन-ब्रह्मरात्रींस ' कल्प ' असाही एक दुसरा पर्याय शब्द आहे.

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ।
रात्र्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥
भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥

(भगवद्गीता अ० ८ श्लो० १८।१९)

सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥

(भ० गी० अ० ९ श्लो० ७)

या श्लोकांत जगदुत्पत्तीचें हेंच रहाटगाडगें किंवा चक्र कसें फिरत असतें तें सांगितलेलें आहे. आतां ब्रह्मदेवाचा हा दिवस व ही रात्र यांचें-कल्पाचें-मानवी वर्षांशीं प्रमाण काय, तें पाहिलें पाहिजे. भारतीयांच्या कालगणनेंत सामान्यतः ६ व ६० हीं दोन परिमाणें विशेष महत्त्वाचीं आहेत, हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

६० पळें= १ घटका; ६० घटका= १ अहोरात्र.

६० अहोरात्र= १ ऋतु; ६ ऋतु= १ वर्ष.

६० वर्षें= १ संवत्सरचक्र; ६ संवत्सरचक्रें= १ दिव्यवर्ष. (देवांचें एक वर्ष)

हें देवांचें एक वर्ष व ब्रह्मदेवाची अहोरात्र यांचें परस्पर-प्रमाण मनुस्मृतीच्या अ० १, श्लोक ६९-७२ या) चार श्लोकांत सांगितलेलें आहे.

चत्वार्याहुः सहस्राणि वर्षाणां तु कृतं युगम् ।
तस्य तावच्छती संध्या संध्यांशश्च तथाविधः ॥
इतरेषु ससंध्येषु ससंध्यांशेषु च त्रिषु ।
एकापायेन वर्तते सहस्राणि शतानि च ॥
यदेतत्परिसंख्यातमादावेव चतुर्युगम् ।
एतद् द्वादशसाहस्रं देवानां युगमुच्यते ॥

दैविकानां युगानां तु सहस्र-परिसंख्यया ।
ब्रह्ममेकमहर्ज्ञेयं तावती रात्रिरेव च ॥

या श्लोकांवरून पुढील हिशेब स्पष्ट दिसून येतोः—

सत्ययुग=४००० दिव्यवर्षे+४०० दिव्यवर्षे संध्या+४०० दिव्यवर्षे सध्यांश=
४८०० दिव्यवर्षे.

त्रेतायुग=३००० दि०व०+३०० दि०व० संध्या+३०० दि०व० संध्यांश=
३६०० दि०वर्षे.

द्वापारयुग=२००० दि०व०+२०० दि०व० संध्या+२०० संध्यांश=
२४०० दि०वर्षे.

कलियुग=१००० दि०व०+१०० दि०व० संध्या+१०० संध्यांश=
१२०० दिव्यवर्षे.

एकूण=१२००० दिव्यवर्षे.

चार युगें=१२००० दिव्यवर्षे=१ दिव्ययुग.
१००० दिव्ययुगें=१ ब्रह्मदिन
,, =१ ब्रह्मरात्रि.
३६० मानवीवर्षे=१ दिव्यवर्ष. म्हणूनः—

सत्ययुग= ४८०० दि०व०×३६०=१७२८००० मानवी वर्षे.
त्रेतायुग= ३६०० दि०व०×३६०=१२९६००० मा. वर्षे.
द्वापरयुग=२४०० दि०व०×३६०=८६४००० मा०वर्षे.
कलियुग=१२०० दि०व०×३६०=४३२००० मा०वर्षे.

एक चतुर्युगी=१ दिव्य युग=४३,२०,००० मा०वर्षे.
अर्थात् १ ब्रह्मदिन=४३२०००००० मानवी वर्षे.

इतका काळ जगताचें सांप्रतचें व्यक्त स्वरूप कायम राहणार आहे. आतां सांप्रतचा काळ हा ब्रह्मदिनापैकीं कोणता काळ आहे, म्हणजे जगदुत्पत्ति होऊन किती काळ लोटला, हें पहावयाचें आहे.

यत्प्राग् द्वादशसाहस्रमुदितं दैविकं युगम् ।
तदेकं सप्ततिगुणं मन्वंतरमिहोच्यते ॥

या मनुस्मृतींतील श्लोकावरून (अ० १, श्लोक ७९) असें दिसून येतें कीं, वर जें दिव्ययुग किंवा एक चतुर्युगी सांगितली, तशा ७१ चतुर्युग्या झाल्या म्हणजे एक मन्वंतर होतें; व अशीं १४ मन्वंतरें एका ब्रह्मदिनांत किंवा कल्पांत असतात. कालगणनेचीं हीं सर्व परिमाणें सूर्य सिद्धांतात (अ० १, श्लोक १८–२०) पुढील प्रमाणें दिलीं आहेत:–

युगानां सप्ततिः सैका मन्वंतरमिहोच्यते ।
कृताब्दसंख्या तस्यांते संधिः प्रोक्तो जलप्लवः ॥
ससंधयस्ते मनवः कल्पे ज्ञेयाश्चतुर्दश ।
कृतप्रमाणः कल्पादौ संधिः पंचदशः स्मृतः ॥
इत्थं युगसहस्रेण भूतसंहारकारकः ।
कल्पो ब्राह्ममहः प्रोक्तं शर्वरी तस्य तावती ॥

अर्थात् ७१ दिव्ययुगें किंवा चतुर्युगी=१ मन्वंतर; आणि संधीसह १४ मन्वंतरें=१ ब्रह्मदिन किंवा कल्प. आणि दोन मन्वंतरांचे संधीस जलप्लव किंवा जलप्रलय व्हावयाचा; व १४ मन्वंतरांचे अखेरीस जगाचें व्यक्त स्वरूप नष्ट होऊन तें अव्यक्त–परिमाणु–रूपांत जावयाचें, असें या श्लोकांवरून स्पष्ट होतें.

आतां वर दिलेल्या संकल्पांत असें सांगितलें आहे कीं, जगदुत्पत्ति होऊन आजपर्यंत (स्वायंभुव, स्वारोंचिष, औत्तमि, तामस, रैवत व चाक्षुस हीं) सहा मन्वंतरें होऊन गेलीं असून, सांप्रत सातवें वैवस्वत मन्वंतर चालू आहे.

यापुढें चालू मन्वंतराचीं शेष वर्षें व (सावर्णि, दक्ष-सावर्णि, ब्रह्म-सावर्णि, धर्म-सावर्णि, रुद्र-सावर्णि, रौच्य-सावर्णि किंवा देव-सावर्णि, व भौत्य-सावर्णि किंवा इंद्र-सावर्णि हीं) सात मन्वंतरें जावयाचीं असून त्यांचे अखेरीस कल्पांत होणार आहे. चालू असलेल्या वैवस्वत मन्वंतराच्या ७१ चतुर्युगींपैकीं २८ व्या चतुर्युगींतलें कलि-युग सांप्रत चालू आहे. याचा हिशोब प्रत्यक्ष मांडला असतां तो असा होईल :—

एक चतुर्युगी=४३,२०,००० मानवी वर्षें.

एक मन्वंतर=७१ चतुर्युगी=४३,२०,०००×७१=३०,६७,२०,००० वर्षें; अर्थात् सहा मन्वंतरें=३०,६७,२०,०००×६=१,८४,०३,२०,००० वर्षें.

सातव्या मन्वंतरापैकीं होऊन गेलेल्या २७ चतुर्युगी=४३,२०,०००×२७= ११,६६,४०,०००. वर्षें.

अट्ठाविसाव्या चतुर्युगीपैकीं तीन युगें संपून कलियुगाचींही ५०१४ वर्षें होऊन गेलीं; म्हणजे कलियुगाचीं ४२६९८६ वर्षें अद्याप शिल्लक आहेत.

अर्थात् २८ वी चतुर्युगी ... . =४३,२०,००० वर्षें.
राहिलेलीं कलि-वर्षें .... =४,२६,९८६.

वाकी ——————

अट्ठाविसाव्या चतुर्युगीचीं गेलेलीं वर्षें=३८,९३,०१४.
तेव्हां जगदुत्पत्तीपासून आजपर्यंत एकंदर
सहा मन्वंतरें ... ... =१,८४,०३,२०,००० वर्षें.
सातव्या मन्वंतरांतील २७ चतुर्युगी=११,६६,४०,००० ,,
२८ व्या चतुर्युगीचीं गेलेलीं वर्षें +३८,९३,०१४ ,,

——————

एकूण १,९६,०८,५३,०१४ वर्षें झालीं.

व राहिलेलीं शेवटचीं सात मन्वंतरें=३०,६७,२०,०००×७=२१४७०४०००० वर्षें.

सातव्या मन्वंतरापैकीं राहिलेल्या ४३ चतुर्युगी
४३२०००×४३ .... =१८५७६०००० .
चालू २८ व्या चतुर्युगीचीं शिल्कीं वर्षें ... ... = ४,२६,९८६

——————

विद्यमान जगाचा अंत–कल्पांत–होण्यास एकूण ... ... २,३३,३२,२६,९८६ वर्षें लोटलीं पाहिजेत असें होतें ! !

ज्यांच्या ऐतिहासिक दृष्टीचा किंवा कल्पनेचा मोठा पल्ला म्हटला तरी ६।७ हजार वर्षांचे पलीकडे जाऊं शकत नाहीं, त्यांची बुद्धि भारतीयांची ही विशाल काल-गणना पाहून गोंधळून जाऊन त्यांनीं तीवर अशक्यतेचा किंवा काल्पनिकतेचा शिक्का मारावा, हें साहजिकच आहे. पण पाश्चात्त्यांच्या या कोत्या व आकुंचित दृष्टीचे भ्रमास आमच्यातील विद्वान् शोधकांनींही भुलून जावें, हें मात्र मोठें आश्चर्य होय. अशा प्रकारचें अलीकडचें ताजें व ठळक उदाहरण म्हटलें म्हणजे रा. रा. त्र्यंबक गुरुनाथ काळे यांचें आहे. यानीं आपल्या ' पुराण-निरीक्षण ' ग्रंथांत भारतीय युद्धाचा काल ख्रि. पू. १२६३ वें वर्ष, हा ठरविला आहे. या कालनिर्णयास एक मुख्य आधार त्यांनीं असा दिला आहे कीं, लोक ज्या कालास कलियुगाचा आरंभ समजत आले आहेत, तो खरोखर '**कल्यारंभ**' नसून '**कल्पारंभ**' आहे; व हा '**य**' आणि '**प**' अक्षरांचा घोंटाळा आर्य-

भट्टादि ज्योतिष्यांनीं केला आहे. रा. काळे यांनीं आपली ही समजूत एकदां ठाम करून घेतल्यामुळें यांचें युग ४ वर्षांचें, एक मन्वंतर २८८ वर्षांचें व एक कल्प ४०३२ च वर्षांचा बनला आहे !! प्रो. फर्ग्युसन यांचें एक लटपटीत मत ग्राह्य धरल्यामुळेंच रा. काळे यांचा असा गोंधळ उडाला आहे. ख्रि. पू. ३१०१ हा काळ कालियुगारंभाचा नसून, आर्य लोकांनीं सिंधू नदी ओलांडून प्रथमतः सरस्वतीतीरीं वसाहत केली त्याचा आहे, असें एक आपलें 'निःसंशय पण प्रमाणशून्य' मत प्रो. फर्ग्युसन यांनीं दिलें आहे. तेंच रा. काळे यांनीं ग्राह्य धरलें आहे, येवढेंच नव्हे तर या साहेबांचेही पुढें जाऊन या वसाहत-कालास त्यांनीं कल्पारंभ असें नांव देऊन ठेवलें आहे! पण 'कल्प' शब्दाचा असा अर्थ रा. काळे कोणत्या आधारावरून करतात ? वर उल्लेख केलेला सूर्य-सिद्धांत एक वेळ बाजूस राहो; पण भगवद्गीता व मनुस्मृति यांतील जीं वचनें मागें दिलीं आहेत, त्यांत कल्प म्हणजे ब्रह्मदिन, कल्पारंभ म्हणजे जगाची नवीन व्यक्त रचना, आणि कल्पांत म्हणजे नुसता जल-प्रलय नव्हे तर जगाच्या व्यक्त स्वरूपाचा पूर्ण नाश, अशाच अर्थीं आहे. अमरकोशांतही कल्प म्हणजे ब्रह्मदिन किंवा जगत्क्षय, असे दोनच अर्थ दिलेले आहेत. त्यावरून भारतीय युद्धाचे पूर्वी जगदुत्पत्ति होऊन फक्त १८३९ च वर्षें झालीं होतीं, असा रा. काळे यांच्या या उपपत्तीचा हास्यास्पद अर्थ होत आहे ! तसेंच दोन मन्वंतराचे दरम्यान होणारा जलप्रलय, रा. काळे यांच्या उपपत्तीप्रमाणें प्रत्येक २८८ वर्षांनीं झाला पाहिजे असें होतें ! मनुस्मृति हीं युगाचीं वर्षें दिव्यवर्षांनीं सांगत आहे, मानवी वर्षांनीं नव्हे, हीही गोष्ट आर्यभट्टास दोष देणारे रा. काळे यांचे लक्षांत आलेली दिसत नाहीं. 'कल्प' शब्दास आपल्या मनचाच कांहीं तरी अर्थ चिकटवावयाचा, कल्पारंभ तोच खरोखर कल्पारंभ असें आधाराशिवाय विधान करावयाचें, आणि आर्यभट्ट त्यास कल्पारंभ न म्हणतां कल्पारंभ म्हणतो म्हणून, आपल्या डोक्यांतल्या घोंटाळ्याचें खापर त्याजवर फोडून मोकळें व्हावयाचें; हा भोळेपणा चिकित्सक शोधकास मुळींच शोभण्या-सारखा नाहीं, असें म्हणणें भाग आहे.

प्रकरण ३ रें.

भारतीय राज्यव्यवस्था.

मागील प्रकरणांत भारतीय संस्कृति किती प्राचीन आहे, याचें दिग्दर्शन केलें. या प्रकरणांत या संस्कृतीचें एक महत्त्वाचें अंग असलेल्या भारतीय राज्यव्यवस्थेचें त्रोटक वर्णन करावयाचें आहे. पण तें करण्यापूर्वी आधुनिक सामान्य सुशिक्षितांचे मनांमध्यें स्वातंत्र्य (Freedom), राज्यपद्धति (Constitution), राज्यव्यवस्था (Administration किंवा Government) यांचे स्वरूपासंबंधानें जो घोटाळा झालेला दिसून येतो, त्याचें निराकरण करणें अवश्य आहे.

' स्वातंत्र्य ' हा शब्द दिसावयास फार सुंदर असून, आधुनिक सुशिक्षितांस तर त्याचें महत्त्व प्रत्यक्ष ईश्वराहूनही ज्यास्त वाटतेंसें दिसतें. पण हा शब्द वास्तविक सापेक्ष असून नैसर्गिक व सामाजिक बंधनांनीं 'स्वातंत्र्य' मुळांतच फार मर्यादित होऊन बसलेलें आहे. पक्ष्यांस आकाशांत हवें तिकडे संचार करण्याचें स्वातंत्र्य आहे, असें आपणांस सकृद्दर्शनीं वाटतें. पण या स्वतंत्र पक्ष्यांस समुद्राचें उल्लंघन करतां येत नाहीं, किंवा वातावरणांतही विशिष्ट उंचीपलीकडे भरारी मारतां येत नाहीं. हीच स्थिति ' जन्मतः स्वतंत्र ' म्हटलेल्या मनुष्यार्चीही आहे. मनुष्याच्या मनानें इच्छेच्या कितीही भराऱ्या मारल्या, तरी त्यांची गति, सृष्टीनें व तो ज्या समाजांत राहतो त्या समाजाच्या मूळ नियमांनीं बरीच मर्यादित करून ठेवली आहे. ' मनुष्यप्राणी जन्मतः स्वतंत्र आहे, स्वातंत्र्य हा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे ' असें पाश्चात्त्यांच्या उसन्या तत्त्ववादावर उड्या मारणारे सुशिक्षित खुशाल म्हणोत; पण त्यांचें हें स्वातंत्र्य फारच मर्यादित आहे. किंबहुना आमच्या वेदान्त-दृष्टीनें, कर्मोपाधीमुळें जीव जन्मास आले कीं, त्यांचें स्वातंत्र्य नष्ट होऊन ते बंधनांतच पडतात, ही गोष्ट खऱ्या तत्त्वज्ञान्यास व सत्यनिष्ठास पटल्यावांचून राहणार नाहीं.

स्वातंत्र्याचा हा तात्त्विक विचार सोडून देऊन केवळ राजकीय स्वातंत्र्यासंबंधानें पाहिलें, तरी तेथेंही मर्यादा ही दिसून येतेच. राजकीय स्वातंत्र्यास दोन बाजू आहेत.एक बाजू अशी कीं, विशिष्ट देशाच्या राज्यपद्धतींत किंवा राज्यव्यवस्थेंत अन्य देशाची काडीचीही हुकमत नसली पाहिजे. स्वातंत्र्याच्या ह्या बाजूस ' बाह्यस्वातंत्र्य ' असें नांव देतां येईल. स्वातंत्र्याची दुसरी बाजू ही आहे कीं, राज्यव्यवस्थेस अत्यंत आवश्यक अशा बाबींखेरीज इतर सर्व गोष्टींत राज्यकर्त्यांची हुकमत प्रजेवर चालूं नये. स्वातंत्र्याच्या या स्वरूपास ' अंतःस्वातंत्र्य ' असें म्हणतां येईल बाह्यस्वातंत्र्यांत अनेक राष्ट्रें किंवा देश

यांचा परस्परसंबंध अपेक्षित आहे; व अंतःस्वातंत्र्यांत राजा किंवा राज्यकर्ते व प्रजा यांचा संबंध उल्लेखिलेला आहे. अर्थात् एकाद्या देशास वरील प्रकारचें बाह्यस्वातंत्र्य लाभण्या न लाभण्याशीं त्या देशांतील राज्यपद्धतीचा वास्तविक कांहीं संबंध नाहीं. देशांत अनियंत्रित राजसत्ताक पद्धति अंमलांत असतांनाही त्यास हें बाह्यस्वातंत्र्य असूं शकतें, व उलट प्रजासत्ताक राज्यपद्धति असूनही त्या देशास हें बाह्यस्वातंत्र्य कधीं कधीं पूर्णपणें नसतें. अंतःस्वातंत्र्याचा व राज्यपद्धतीचा (Constitution) मात्र निकट संबंध आहे, असें कोणासही सकृद्दर्शनीं वाटतें. जगांतील कांहीं अर्वाचीन प्रजासत्ताक राज्यांमुळें तेथील प्रजाजनांचें स्वातंत्र्य वृद्धिंगत झालेलें दिसून येतें; व त्यावरून अनियंत्रित राजसत्ताक राज्य पद्धति व प्रजेचें पारतंत्र्य, आणि प्रजासत्ताक राज्यपद्धति व प्रजास्वातंत्र्य यांचा दृढ संबंध आहे, असें साहाजिकच अनुमान करण्यांत येतें; व राज्यसत्तेचा वांटा प्रत्येक प्रजाजनास मिळाला, म्हणजे तो प्रजा स्वतंत्र आहे असें मानण्यांत येतें. पण वास्तविक हा संबंध नित्यसंबंध नाहीं.तसा तो आहे असें मानणें हा निव्वळ भ्रम आहे. राज्यपद्धति व राज्यव्यवस्था किंवा प्रजास्वातंत्र्य यांचा परस्पर संबंध वस्तुतः साधनसाध्यांसारखा आहे. विशिष्ट राज्यपद्धति हें एक साधन व सुखकारक राज्यव्यवस्था किंवा प्रजास्वातंत्र्य हें त्याचें एक साध्य आहे. पण हर्बर्ट स्पेन्सरनें म्हटल्याप्रमाणें (हर्बर्ट स्पेन्सरचें आत्मचरित्र-व्हाल्यूम १. पृ. ४३९) हा संबंध पुष्कळ सुशिक्षित लोक विसरतात; किंबहुना ह्या दोनही गोष्टी भिन्न नसून एकच आहेत, अशीच त्यांची समजूत असते ! राज्यपद्धति अनियंत्रित राजसत्ताक असूनही प्रजाजनांस स्वातंत्र्य असूं शकतें. उदाहरणार्थ,आपल्या प्राचीन ग्रामसंस्थांच्या लहान लहान लोकसत्ताक राज्यसंघांनीं बनलेली अनियंत्रित राजसत्ताक पद्धतिच पहा. तींत दिसावयाला राज्यपद्धति राजसत्ताक असली तरी प्रजेस या ग्रामसंस्थांमुळें बहुतेक बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असे. उलट राज्यपद्धति लोकसत्ताक असूनही तेथील राज्यकर्ते आपल्या खऱ्या कर्तव्यापलीकडे जाऊन, स्पेन्सरसाहेबांनीं अपायकारक ठरविलेली,(over-government) फाजील सत्ता गाजवीत असतील, तर तेथील प्रजा स्वतंत्र आहे, असें कदापि म्हणतां येणार नाहीं.

स्वतंत्र देशांतील राज्यपद्धति पाहिल्या असतां असें दिसून येतें कीं, तेथील समाजरचनेचें व समाजव्यवस्थेचें तें एक महत्त्वाचें अंग असतें. समाजाच्या अस्तित्वासाठीं, स्थैर्यासाठीं व अभिवृद्धीसाठीं त्यांस व्यक्तीकडून किंवा व्यक्तिसमुदायाकडून अनेक कार्यें करून घ्यावीं लागतात. त्यांपैकीं एक कार्य असें आहे कीं, त्या समाजाचें

परसमाजापासून व समाजांतील एका व्यक्तीचें किंवा वर्गाचें दुसऱ्या व्यक्तीपासून किंवा वर्गापासून संरक्षण करणें. समाजाचें हें एक कार्य ज्या संस्थेवर सोंपविलेलें असतें, ती राज्यसंस्था होय; आणि राज्यसंस्थेचें खरें व मुख्य कर्तव्य येवढेंच आहे. या कर्तव्यापलीकडच्या टापूंत राज्यसंस्था जितकी ज्यास्त ढवळाढवळ करूं लागेल–मग तिची राज्यपद्धति कोणतीही असो–तर तेथील प्रजेचें स्वातंत्र्य तितक्या प्रमाणानें कमीच होत जाणार; येवढेंच नव्हे, तर राज्यसंस्थेचें खरें कर्तव्य परिपूर्ण होण्यास व्यत्यय येणार, हें उघड आहे. राज्यसंस्था हें समाजव्यवस्थेचें एक अंग असल्यामुळें, सामाजिक व नैतिक ध्येय आणि त्यामुळें बनलेलें त्या समाजाचें शील ज्या स्वरूपाचें व दर्जाचें असेल, तशा स्वरूपाची सामान्यतः तेथील राज्यपद्धति व विशेषतः राज्यव्यस्था असते. राज्यपद्धति कोणतीही असली तरी, समाजाची आध्यात्मिक, नैतिक व सामाजिक ध्येयें उच्च प्रतीचीं असतील, तर तेथील राज्यव्यवस्थाही त्याच ध्येयास अनुसरून प्रजेस सुखावह अशी होत असते. समाजांत अशीं ध्येयें खेळत नसलीं म्हणजे, राज्यपद्धति कितीही उत्तम असली तरी, तेथील राज्यव्यवस्थेंत व्यक्तीव्यक्तीमध्यें, पक्षापक्षामध्यें व वर्गावर्गीमध्यें द्रव्यासाठीं, व हक्कासाठीं ('चढाओढ' हें गोंडस नांव मिळालेला) कलह माजल्यावांचून रहात नाहीं. युरोप व अमेरिकेंतील राज्यपद्धति बहुतांशीं लोकसत्तात्मक असूनही तेथें असा मोठा कलह माजून राहिलेला असतो, याचें तरी बीज हेंच होय. सत्तेच्या अधिष्ठानाचे दृष्टीनें राज्यपद्धतीचें वर्गीकरण केलें तर राजसत्ताक, महाजनसत्ताक, प्रतिनिधिसत्ताक, लोकसत्ताक वगैरे तिचे भेद होतील. पण प्रजाजनांचें सुख व भरभराट हीं एकच दृष्टि ठेवून विचार केला तर, असा सामान्य सिद्धांत निघेल कीं उच्च शीलाचे, उदार मनाचे, व्यापक सहानुभूतीचे, थोर सद्गुणाचे व श्रेष्ठ बुद्धिमत्तेचे लोकांस मात्र जी राज्यपद्धति श्रेष्ठपदास चढविते आणि शीलहीन, हलक्या मनाचे, संकुचित दृष्टीचे, दुराचरणी व बुद्धीहीन लोकांस श्रेष्ठतेस चढूं देत नाहीं, तीच राज्यपद्धति उत्तम होय.

कोणत्याही देशांतील विवक्षित काळची राज्यव्यवस्था चांगली होती का वाईट होती, हें निश्चितपणें ठरविण्याची आणखी एक बिनचूक कसोटी, इंग्लंडांतील प्रसिद्ध मुत्सद्दी व राजनीतिज्ञ एडमंड बर्क यानें नमूद करून ठेवली आहे. देशांतील लोकसंख्या व संपत्ति हीं मुबलक व वाढतीं असलीं म्हणजे,–मग तेथील राज्यपद्धति राजसत्ताक कां असेना–ती राज्यव्यवस्था चांगली आहे, असें निःसंशय समजावें. याचे उलट लोकसंख्या व संपत्ति यांतील एक किंवा दोनही कमी असून त्यांची वाढही चांगलीशी होत नसली तर,

तेथें लोकसत्तात्मक राज्यपद्धति असूनही ती राज्यव्यवस्था वाईट, असें ठाम मानावें. ही कसोटी प्राचीन भरतखंडासे लावून पाहिली तर, तेथील राज्यव्यवस्था उत्तम होती, असें कोणाचेंही मत झाल्यावांचून रहाणार नाहीं. ' हायडास्पिस (झेलम) व हायपनिस् ऊर्फ हायपासिस (बियास) या नद्यांचे दरम्यानच्या १ हजार नगरांवर युक्राटाइडीज् राजाची सत्ता चालत होती ' असें स्ट्रॅबोनामक ग्रीक इतिहासकार लिहितो. सद्रहू दोन नद्यांचे दरम्यान १५०० नगरें असून त्या प्रत्येकाची लोकसंख्या कॉस शहराहून कमी नाहीं, असें आपोलोडोरस म्हणतो (एलिफिन्स्टनचा हिंदुस्थानचा इतिहास पृ. २४१). हिंदुस्थानांत एकंदर निरानिराळीं १२० राष्ट्रें आहेत, असें मेगस्थनीसनें लिहिलें आहे ! आर्यावर्ताची लोकवस्ती अफाट असून त्यांतील शहरांची मोजदाद करणें अशक्य आहे, असें एरियन ग्रंथकारानें लिहिलें असून, पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत प्राचीन भारतीय राष्ट्र संख्येनें सर्वांहून श्रेष्ठ होतें, असें प्रो. मॅक्स डंकर यांनीं (History of Antiquity Vol. V. P. 18) मत दिलें आहे. ट्टेशियसनामक ग्रंथकारानें तर याचेही पलीकडे जाऊन असें म्हटलें आहे कीं, ' इतर सर्व समकालीन राष्ट्रांची लोकसंख्या एकत्र केली असतां जितकी होईल, तितकी प्राचीन हिंदूंची लोकसंख्या होती ! ' स्ट्रॅबो इतिहासकार लिहितो कीं, ' पॉलिबोथ्रा (पाटलीपुत्र) नगराची लांबी ८ मैल असून, त्याच्या विस्तीर्ण तटास ५७० बुरूज व ६४ वेशी होत्या ! ' किंबहुना सोळाव्या शतकांतही कनोज शहरांत ३० हजार तांबोळी व ६० हजार वाजंत्रीच होते, असेंही एके ठिकाणीं नमूद केलेलें आढळतें ! (Researches, Vol. II, P. 220). यावरून हिंदुस्थानांत पूर्वी लोकसंख्या किती होती, याची कोणासही सहज कल्पना होईल. प्राचीन काळीं भरतखंडांतून अनेक लोक देशत्याग करून युरोप-अमेरिकेंत वसाहत करण्यास अनेकदां गेले; व त्यांनीं तिकडे प्रबळ राष्ट्रें स्थापन केलीं, (यांचें वर्णन पुढें एका लेखांत येणार आहे) यावरूनही प्राचीन काळच्या येथील प्रचंड लोकसंख्येचें अनुमान करतां येईल.

संपत्तीची कसोटी लावून पाहिली असतांही भारतीयांची राज्यपद्धति पूर्णपणें कसास उतरते, असें दिसून येईल. केवळ संपत्तीच्या विपुलतेवरूनच या देशास ' सुवर्णभूमि ' हें सार्थ नांव मिळालें आहे. (याचीही सविस्तर माहिती पुढें एका लेखांत देण्याचा विचार आहे.) ' प्राचीन भरतखंडांत चोरीचें नांवही नव्हतें ' असें स्ट्रॅबोनें नमूद करून ठेवलें आहे ! अत्यंत सुधारलेल्या पाश्चात्त्य राष्ट्राची राजधानी म्हणजे सैतानाचें

माहेर घर असून, रात्रीं रस्त्यांतून फिरणें म्हणजे मरणाची तयारी करणें आहे व परक्याचे घरीं निजावयास जाण्यापूर्वी आपलें मृत्युपत्र करून ठेवणें आवश्यक आहे, असें ज्या काळाचें डॉ. जॉनसननें अत्युक्तीचें वर्णन केलेलें आहे, त्या काळीं घराचे दरवाजे कां लावावयाचे व त्यांस कडयाकुलपें कशासाठीं घालावयाचीं, हेंही हिंदुलोकांस माहीत नव्हतें ! मेगस्थनीस यानें असें लिहिलें आहे कीं, चंद्रगुप्ताचे छावणींत एकंदर ४ लक्ष लोक असूनही तेथें दररोज होणाऱ्या चोऱ्यांचा माल सरासरीनें ३० रुपयांहून ज्यास्त किंमतीचा नसे! यावरून त्या काळच्या पोलिसच्या चोखपणाचीही साक्ष पटेल. इंग्लंडमध्ये व्हिक्टोरिया महाराणींचे कारकीर्दीपर्यंत व्यवस्थित पोलिसखातें अस्तित्वांतही आलेलें नव्हतें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति हिंदूंच्या स्वप्नांतही आली नव्हती, किंबहुना ती त्यांच्या राजकीय प्रकृतीस कधीं मानवणारही नाहीं, असें पुष्कळ विद्वान् म्हणत असतात; पण हें म्हणणें साफ चुकीचें आहे. " प्राचीनकाळापासून हिंदुस्थानांतलें प्रत्येक गांव किंवा शहर म्हणजे एक लहानसें पण स्वयंपूर्ण लोकसत्ताक राज्यच असे; व सर्व हिंदुस्थान म्हणजे अशा छोट्या स्वराज्यांचा एक प्रचंड संघच होता. " असें ले. कर्नल मार्क विल्कस (Historical sketches of the South of India Vol.I. P. 119) म्हणतात. ' भरतखंडांतील प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र आहे ' असें जें एरियननें आदरपूर्वक म्हटलें आहे, तें याचकरतां होय. हिंदुस्थानची प्राचीन राज्यपद्धति व कायदे यांमध्यें लोकसत्ताक राज्याचीं बीजें स्पष्ट दिसत आहेत, असें मिलसारख्या दुराग्रही व अहंमन्य इतिहासकारासही कबूल करावें लागलें आहे ! सर चार्लस मेटकाफ यांनीं तर या ग्रामसंस्थांचें मोठेंच रसभरित गुणवर्णन केलें आहे. ते लिहितात:— " या ग्रामसंस्थारूपी छोट्या लोकसत्ताक राज्यांच्या बहुतेक सर्व गरजा गांवांतल्या गांवांत भागत; त्यांचेवर परकीय राजसत्तेचा शह कधींच बसला नाहीं. जेथें इतर सर्व गोष्टी क्षणभंगुर भासतात, तेथें या ग्रामसंस्था मात्र सनातन दिसतात. एकामागून दुसरें अशीं अनेक राजघराणीं जमीनदोस्त झालीं; एकामागून एक राज्यक्रांत्या अनेक होऊन गेल्या. पठाण, मोंगल, मराठे, शीख, इंग्रज वगैरेंच्या राजसत्ता आळीपाळीनें या देशावर बसल्या; पण या सर्व उलथापालथींत ग्रामसंस्था आपल्या पूर्ववत् कायमच्या कायमच आहेत ! या ग्रामसंस्थारूपी लहान लहान लोकसत्ताक राज्यांचा असा संघ बनल्यामुळेंच

हिंदुलोकांस राजकीय स्वातंत्र्य, स्वावलंबन व राजकीय सुख यांचा लाभ झाला आहे. "* पण ह्या लहान लहान ग्रामसंस्था वाळूच्या कणांप्रमाणें पृथक् असून त्यांचा एकजीव नव्हता असें कोणास वाटेल, पण खरी स्थिति तशी नव्हती. राजानें प्रत्येक गांवावर एकेक, दहा किंवा वीस गांवांच्या समुदायावर एक, अशा पांच किंवा दहा समुदायांवर एक,आणि अशा दहा महासमुदायांवर एक याप्रमाणें अधिकारी नेमावे;व त्यांनीं एकमेकांशीं चढत्या क्रमानें जवाबदारीनें वागावें,अशी पद्धत होती.(मनुस्मृति–अ. ७।१२३,१२४.)

धर्मशास्त्र किंवा कायदे यांचें स्वरूप व व्यापकता हींही राज्यव्यवस्थेच्या बरेवाईटपणाची एक कसोटी आहे. भारतीयांच्या धर्मशास्त्राचा मुख्य ग्रंथ मनुस्मृति हा होय. याची रचना जशी साधी आहे, तसे त्यांतील नियम दूरदृष्टीचे व शहाणपणाचे पूर्ण निदर्शक आहेत. हे नियम वारंवार बदलणारे नसूनही ते समाजांतील व्यक्तींच्या सर्व भिन्नभिन्न परस्परसंबंधांस पुरतील इतके व्यापक आहेत. सर विल्यम जोन्स लिहितातः–

"मनुस्मृति ही ग्रीक स्मृतिकार सोलन किंबहुना लायकरगस् यांच्या कायद्यांहूनही प्राचीनतर असली पाहिजे. तींत ग्रथित केलेले धर्मशास्त्राचे नियम समाजांत प्रथमतः अंमलांत आल्याचा काळ तर इजिप्त व भरतखंड येथें प्रथमतः राजसत्ता स्थापित झाली त्या सुमाराचा असावा. स्कीट बेटांतील प्राचीन कायदे मनूच्या धर्मशास्त्रासारखेच असल्याचें

---

* The village-communities are little republics having nearly everything they can want within themselves and almost independent of any foreign nation. They seem to last where nothing lasts. Dynasty after dynasty tumbles down, revolution succeeds revolution; and Pathan, Moghul, Marhatha, Sikh, English are all Masters in turn, but the village communities remain the same. This union of village communities, each one forming a little state in itself, is in a high degree conducive to their (Hindoo) happiness and to the enjoyment of a great portion of freedom and independence.(Report of the Select Committee Vol III. of the House of Commons 1832)

पातिव्रत्य हे गुण पाहून मेगस्तनीस यास त्यांचे बद्दल फारच आदरबुद्धि उत्पन्न झाली होती. तो लिहितो कीं, ' शौर्याचे बाबतींत ते इतर सर्व आशिआटिकांत श्रेष्ठ असून उद्योगी व व्यसनपराङ्मुख आहेत;त्यांचे शेतकरीही मेहनती व कुशल कारागीर असून ते स्वदेशी राजाचे अंमलाखालीं शांतपणानें रहातात, व ते कोर्टाची पायरी बहुधा चढतच नाहींत. ' (हंटरचें गॅझिटियर ' India पृ. २६६.) Religions of the World नामक ग्रंथांत (पृ. ४३) रे. मॉरिस लिहितात कीं, ' कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी शूद्र हे पूर्वी गुलामगिरींत असणें शक्य नाहीं, व ते सांप्रतही गुलाम नाहींत. हिंदुस्थानांतले सर्व लोक स्वतंत्र नागरिक असल्याचें पाहून ग्रीक लोकांस मोठाच अचंबा वाटला. ' (The sudras are not in any sense slaves, and never can have been such. The Greeks were surprised to find all classes in India free citizens). एल्फिन्स्टन साहेब हिंदुस्थानच्या इतिहासांत (पृ. २४३) लिहितातः—' हिंदूंच्या जुन्या नाटक-ग्रंथांतील इतर पात्रें राजाशीं बोलतांना तोंडपुजेपणा किंवा दैन्य मुळींच दाखवीत नाहींत, ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. ' ' धनी फाजिल कदरखोर नसला म्हणजे हिंदु नोकर त्याशीं मोकळ्या मनानें व विश्वासूकपणानें वागतात; वरिष्ठाशीं बोलतांना हिंदु लोक दैन्य किंवा हांजीहांजीखोरपणा मुळींच दाखवीत नाहींत. ' अशी साक्ष प्रो० विल्सन यांनीं दिली आहे. एल्फिन्स्टन साहेब आपल्या इतिहासांत (पृ. २०२) पुनः लिहितात, ' नोकरांशीं धनी जर खरोखर दयाळूपणानें व सुविचारानें वागत असला तर हिंदु नोकरही त्याशीं इतक्या इमानानें वागतात कीं, त्याहून अधिक इमानीपणा जगांत कोठेंच आढळणार नाहीं. आजारीपणांत किंवा एकाद्या अडचणीच्या व संकटाच्या वेळीं हिंदु नोकर इमान व स्वामिनिष्ठा यांचे कसोटींत पूर्णपणें उतरतात, असा युरोपियनांचा अनुभव आहे. ' हिंदु लोक धार्मिक, मोकळ्या मनाचे, परकीयांशीं सभ्यतेनें वागणारे, आनंदी, ज्ञाननिष्ठ, न्यायप्रिय, व्यवहारदक्ष, सत्यनिष्ठ आणि प्रत्येक व्यवहारांत अति इमानी असे आहेत ' असें अबुल फजल ह्या कुशल व चतुर लोकनिरीक्षक मुसलमान इतिहासकारानें नमूद करून ठेवलें आहे, (टॉडकृत राजस्थानचा इतिहास Vol I, P. 643). हिंदूंचा इमानीपणा, सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, निर्वाणीचें शौर्य, राजनिष्ठा आणि अब्रूच्या बचावाचा प्रश्न आला असतां त्यांचे अंगीं दिसून येणारी व तिन्हाइताचेही

मनास चटका लावणारी स्वामिनिष्ठा, या सद्गुणांची तारीफ, अजमीर–मारवाडचे कमिशनर कर्नल डिक्सन (सन १८५०) यांनीं केली आहे. नेबुहर लिहितो कीं, ' हिंदूंइतके परधर्मसहिष्णु लोक पृथ्वीचे पाठीवर दुसरे कोणीच नाहींत. तसेंच प्राणिमात्रास होतां होईल तों कोणतेंही दुःख द्यावयाचें नाहीं, ही प्रवृत्ति जगांत कोठें उत्कटत्वानें वसत असेल तर ती हिंदु लोकांतच वसत आहे. ' मॉनियर विल्यम्स Modern India & Indians या ग्रंथांत (पृ. ३३) लिहितात कीं, ' हिंदी लोक जाणूनबुजून केव्हांही प्राणिहत्या करीत नाहींत. जगांत आपणही जगावें व इतरांसही जगूं द्यावें, हें त्यांचें तत्त्व आहे. आकाश निरभ्र होऊन चक्र ऊन पडलें असतां इंग्रज गृहस्थास अति आनंद होतो; व या आनंदाचें प्रदर्शन म्हणून तो जंगलांत जाऊन कांहीं निरुपद्रवी प्राणी ठार मारून टाकतो ! इंग्रजांच्या ह्या चमत्कारिक मनोवृत्तीची हिंदु लोकांस कल्पनाच होत नाहीं. ' एल्फिन्स्टन साहेब आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत (पृ. १९९) लिहितातः— ' खेड्यांत राहणारे लोक निरुपद्रवी, गरीब, कुटुंबीयांवर प्रेम करणारे व शेजाऱ्यांशीं ममतेनें वागणारे असे असून सरकाराखेरीज इतर सर्वांशीं ते प्रामाणिकपणानें व सच्चा दिलानें वागतात.' सन १८१३ सालीं ब्रिटिशपार्लमेंटपुढें साक्ष देतांना कॅप्टन सिडेनहॅम हिंदूंच्या अनेक सद्गुणांचें वर्णन करून म्हणाले कीं, ' त्यांची ग्राहकशक्ति व बुद्धि तीव्र असून ते उद्योगी व इमानी आहेत. धर्मादाय, परोपकार व मातृपितृभक्ति यांसंबंधाचीं सर्व कर्तव्यें योग्य काळीं बिनचूकपणें व मनःपूर्वक करण्याचे कामांत हिंदु लोक जगांतील इतर कोणत्याही राष्ट्राची बरोबरी करतील (मिलचा हिंदुस्थानचा इतिहास पृ. ५२३). ' आपल्या बांधवांविषयींचीं आपलीं सामाजिक कर्तव्यें कोणतीं व तीं कशीं करावीं, हें हिंदु लोकांस युरोपियनांइतकेंच–किंबहुना त्यांचेपेक्षां ज्यास्त चांगलें–समजतें ' असें अबे डुबोईस या प्रवाशानें मत दिलें आहे. वर उल्लेख केलेल्या पार्लमेंटपुढील चौकशींत सर जॉन मालकम म्हणालेः—' बहार प्रांतांतले लोक शरीरानें जसे उंच व ताकदवान् आहेत तसेच ते मनानेंही शूर, उदार, दयाळु, सत्यनिष्ठ व धैर्यवान् आहेंत. इमान आणि अब्रू यांसंबंधाची त्यांची निष्ठा फार उच्च दर्जाची आहे; व तीसंबंधानें नेहमीं अशीं उदाहरणें घडून येत असतात कीं तीं इतिहासापेक्षां कादंबऱ्यांतच ज्यास्त शोभतील, असें कोणीही इंग्रज म्हणेल. त्यांच्या इतके विश्वासू लोक तर मला दुसरे कोणतेच माहीत नाहींत. ' इंग्लंडशीं हिंदुस्थानाचा व्यापार खुलेपणानें सुरू झाला तर हिंदूंच्या संस्कृतीची अभिवृद्धि होईल, असें तुम्हांस वाटतें काय ? असा प्रश्न विचारला

असतां सर थॉमस मनरो यांनीं उत्तर दिलें कीं, ' धर्मभोळेपणा व दुराग्रह नष्ट करणारें उदार शिक्षण आणि राजनीति या दोन गोष्टींत हिंदु लोक युरोपियनांपेक्षां कमी आहेत. परंतु श्रेष्ठ प्रतीची कृषिपद्धति, अद्वितीय हस्तकौशल्य, सोय किंवा चैन यांस आवश्यक असलेल्या सर्व वस्तु निर्माण करण्याची योग्यता, प्रत्येक गांवांत लिहिणें, वाचणें व गणित शिकविणारी शाळा असणें,* एकमेकांशीं सभ्यतेचें, आदरसत्काराचें व परोपकाराचें आणि विशेषतः स्त्रियांशीं विश्वासाचें, आदराचें व मार्दवयुक्त वर्तन ठेवणें, हे गुण अंगीं असणें हीं जर सुधारलेपणाचीं लक्षणें असतील, तर या बाबतींत हिंदु लोक कोणत्याही युरोपियन राष्ट्राहून कमी नाहींत. सुधारणा किंवा संस्कृति ह्या वस्तूंची जर दोन राष्ट्रांत देवघेव करावयाची असेल तर हिंदुस्थानचा हा माल आयात करण्यांत इंग्लंडचाच पुष्कळ फायदा होईल, अशी मला खात्री वाटते ! ' ' (If civilization is to become an article of trade between two countries, I am convinced that England will gain by the import cargo.)'

व्यक्तीचें किंवा राष्ट्राचें शील त्याच्या ग्रंथांत व वाङ्मयांत सहज व स्पष्टपणें दिसून येतें; विशेषतः वाङ्मयविषयक वादविवादाची तऱ्हा व स्वरूप यांवरून तर याची हटकून परीक्षा होते. अशा तऱ्हेचा वादविवाद हिंदुस्थानचे पंडित आणि युरोपियन संस्कृत ' स्कॉलर ' व इतर विद्वान् आपसांत व एकमेकांत कसा करतात, याचा २० वर्षें अनुभव घेतल्यानंतर मॅक्स मुलर साहेबांनीं असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे कीं, ' अशा तऱ्हेच्या वादविवादांत युरोपियन पंडित एकमेकांवर व्यक्तिविषयक हल्ला करतात; येवढेंच नव्हे तर वितंडवाद व सत्यापलाप यांचाही अवलंब करतात. असल्या वादविवादांत विजय व स्तुति यांपेक्षां सत्य व स्वाभिमान यांस जास्त किंमतवान् मानणारे पंडित कुचकामाचे होत, अशी त्यांची भावना असते. व तीस अनुसरून, वादविवाद करतांना ते जाणून-

---

* हें विधान कित्येकांस अतिशयोक्तीचें वाटेल; पण तशी वस्तुस्थिति नाहीं. सरकारी शाळा सुरू होण्यापूर्वी बंगाल्यात ८० हजार गांवठी शाळा होत्या; सन १८३५ मध्यें ह्या शाळांचें प्रमाण ४०० माणसांस १ असें पडत होतें; मद्रासमध्येंही ३ त १ मुलगा या गांवठी शाळांत शिकणारा असे, असे सरकारी रिपोर्टच आहेत.

बुज्रून खोटीं विधानें करण्यासही कमी करीत नाहीं. पण हिंदुस्थानच्या पंडितांची तऱ्हा याचे उलट आहे. वादविवादांत ग्राम्य शिव्या व उद्धट भाषा वापरणारा पंडित असभ्यच् नव्हे तर अज्ञानीही आहे, असें ते मानतात. युरोप–अमेरिकेंत वादविवाद चालला असतां पंडितांत जितकी सत्यनिष्ठा, औदार्य व उमदेपणा दिसून येतो, त्याहून ज्यास्त सत्यनिष्ठा, औदार्य व उमदेपणा हिंदी पंडितांत दिसून आला आहे. ते वादविवादांत चिकाटी व सत्याग्रह दाखवितात, पण उद्धटपणा त्यांच्यांत कधींही दिसून आला नाहीं. चुकी झाली तर ती कबूल करण्यास ते नेहमीं तयार असतात, व प्रतिपक्षाची चूक झाली तरी तीवद्दल ते त्याचा उपहासही करीत नाहींत. (They have displayed a far greater respect for truth, and a far more manly and generous spirit than we are accustomed to even in Europe and America. They haye shown strength but no rudeness. When they were wrong they have readily admitted their mistake; when they were right they have never sneered at their European adversaries.) ' जगांतील इतर कोणत्याही देशापेक्षां हिंदुस्थानांत व्यापारी दानत किंवा अब्रू हीं जास्त असून बिल नाकारल्याचीं उदाहरणें तिकडे बहुधा घडतच नाहींत ' अशी ग्वाही इंग्रज व्यापाऱ्यांनीं अनेकदां मजपाशीं दिलेली आहे (India, what can it teach us P.63). हिंदुस्थानचे पहिले गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स यांनीं पार्लमेंटच्या कमिटीपुढें साक्ष देतांना सांगितलें कीं, ' हिंदुलोक मानवी मनोविकारांच्या दुष्ट मार्गांपासून इतर कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राइतकेच पराङ्मुख असून अन्यायाचा सूड उगविण्यापेक्षां उपकाराबद्दल कृतज्ञता दर्शविण्याचीच त्यांची जास्त तयारी असते. ' बिशप हेबर यांनीं लिहिलें आहे कीं ' सौम्य व संयमी स्वभाव, नैसर्गिक ग्राहकशक्ति व कुशाग्र बुद्धि हे गुण मानवजातींत सामान्यतः आढळतात त्यांहून ते अधिक प्रमाणांत हिंदु लोकांत वसत आहेत, असा मला अनुभव आलेला आहे. ' प्रो० विल्सन यांनीं लिहिलें आहे कीं, ' हिंदुलोक सामान्यतः अगदीं साध्या व सरळ स्वभावाचे असून त्यांस व्यवहारांतले डावपेंच कळत नाहींत. युरोपियन सुधारणेचा प्रचार जेथें पुष्कळ काळ झाला आहे, तेथील

लोकांतून मात्र हे गुण नष्ट होत चालले आहेत.* विद्वान् हिंदु लोकही उद्योगी, बुद्धिमान्, आनंदी व मोकळ्या मनाचे असतात. बारा-तेरा वर्षांच्या हिंदु मुलांत पुष्कळ वेळां अपूर्व व आश्चर्यकारक ग्राहकशक्ति आढळते. बुद्धिमत्ता, ग्राहकशक्ति व अभ्यासिपणा या गुणांत हिंदु मुलें युरोपियन मुलांहून वरचढ आहेत. घरंदाज व श्रीमान् हिंदुलोकांतही सभ्य चालरीत, बुद्धीची विशदता व व्यापकता, मनाचें औदार्य व वर्तनाचा बाणेदारपणा हे गुण इतक्या प्रकटत्वानें दिसून येतात कीं, जगांतील कोणत्याही देशांत त्यांची गणना सद्गृहस्थांतच (Gentlemen) होईल. ' (मिलचा हिंदुस्थानचा इतिहास, Vol. I. P. 530-32.). ' हिंदु लोकांहून अधिक धार्मिक व कर्तव्यनिष्ठ लोक मला युरोपांत कोणीही आढळले नाहींत ' असें प्रो० मॉनियर विल्यम्स यांनीं लिहिलें आहे (Modern India & Indians P. 88 & 128). एल्फिन्स्टन साहेब आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत (पृ. ३७५-८१) लिहितातः--' हिंदु व इंग्रज यांची तुलना करतां असें आढळून येते कीं, हिंदूंत इतर कोणतेही दुर्गुण असले तरी त्यांच्यांत मद्यपानाचें व्यसन व असभ्यता हे दोष नसल्यामुळें त्यांची चालचलणूक इंग्रजांपेक्षां अधिक शुद्ध असते. इंग्लंडांतल्या मोठ्या शहरांतील अत्यंत कनिष्ठ दर्जाचे लोक जितके नीतिभ्रष्ट असतात, तितका हिंदूमधील अगदीं कनिष्ठ वर्गही नीतिभ्रष्ट नाहीं. ' सन १८३२ सालीं पार्लमेंटपुढें आलेल्या रिपोर्टावरून काढलेल्या चार वर्षांच्या आकड्यांची खालील तुलना या बाबतींत पहाण्यासारखी आहे.

	इंग्लंड व वेल्स.	बंगाल.
लोकसंख्या.	१३० लक्ष	६ कोट.
फांसी दिलेल्यांची वार्षिक सरासरी.	१२३२	५९
लोकसंख्येशीं यांचें प्रमाण.	२०३२८१:१	१००४१८२:१
जन्मठेपेच्या लोकांचें प्रमाण.	६७१७३:१	४०२०१०:१

. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डार्विन यानें प्रवासांत असतांना पोर्ट लुई येथील तुरुंगांत हिंदु

---

* ' The longer we possess a province, the more common and grave does perjury become' असें सर जी. कँबेल यांनीं लिहिलें आहे. (S. Johnson's Oriental Religions, India P. 288.)

कैदी पाहिले. तेव्हां त्यांची चालचलणूक पाहून या शास्त्रज्ञास आश्चर्य वाटलें, व त्याचे मनांत त्यांचेविषयीं मोठीच आदरबुद्धि उत्पन्न झाली. तो लिहितोः— ' हे कैदी शांत असून त्यांचें वर्तन चांगलें आहे. त्यांची बाह्य वर्तणूक, त्यांची स्वच्छता व रोजचे आपले धार्मिक आचार पाळण्यांतील त्यांची तत्परता हीं पाहणारांस, न्यू साौथ वेल्सच्या तुरुंगांतील आपल्या कैद्यांचा जसा आपणांस तिरस्कार वाटतो तसा त्यांचे संबंधानें वाटणें शक्यच नाहीं ' (A naturalist's Voyage round the world P. 454). हिंदूंच्या कृतज्ञतेसंबंधानें एल्फिन्स्टन साहेबांनीं असा अभिप्राय दिला आहे कीं, (हिंदुस्थानचा इतिहास पृ० २०१, २०२) ' बड्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं केलेल्या उपकाराबद्दल ते इतके कृतज्ञ असतात कीं, ते अधिकारी अधिकारच्युत व दरिद्री झाले तरी ते त्यांस मदत करतात; किंवहुना त्यांचे पश्चात् त्यांच्या कुटुंबाचाही परामर्ष घेतात. बंगाल्यांतील असाच एक बडा अधिकारी बडतर्फ होऊन इंग्लंडांत दारिद्र्यांत दिवस कंठीत होता. त्यास एका मराठा ब्राह्मणानें या संकटकालीं निरपेक्षपणें १ लक्ष रुपयांची मदत केली. येवढेंच नव्हे तर पुढें ही रक्कम परत करीत असतांही ती घेण्याचें त्यानें नाकारलें ! ' हिंदी शिपायांच्या इमानाबद्दल हाच इतिहासकार लिहितो कीं, ' आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदी शिपायांनीं आपल्या परकीय धन्यांबद्दल जितकी निष्ठा व जितकें इमान दाखविलें आहे, तितकी निष्ठा व तितकें इमान दुसऱ्या कोणत्याही देशांतील शिपायांचे वर्तनांत स्वदेशीय धन्यांसंबंधानेंही आढळणें कठीण आहे ' (The fidelity of our sepoys to their foreign masters has been shown in instances which it would be difficult to match even among national troops in any other country.)' शरीरें व घरेंदारें स्वच्छ ठेवण्याचे बाबतींत हिंदुलोक दक्षिण युरोपांतील लोकांहून श्रेष्ठ आहेत; येवढेंच नव्हे तर स्वच्छता ठेवण्याच्या त्यांच्या कांहीं चाली उत्तर युरोपांतील लोकांनींही अनुकरण करण्यासारख्या आहेत ! ' असें एकानें लिहिलें आहे.

मद्यमांसाविषयींचा हिंदूंचा तिटकारा जगप्रसिद्ध आहे. कांहीं हिंदुजातींस मांसाशन निषिद्ध नाहीं हें खरें; पण त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति प्राणिमात्रांशीं ममतेनें वागण्याची आहे. मांस निषिद्ध नसलेल्या जातींचेंही तें-मुसलमान किंवा युरोपियन यांचे प्रमाणें-रोजचें अन्न नाहीं. आणि असें असण्याचें कारण धर्मांधता किंवा फाजिल सोंवळें-

पणा हें नसून त्याचे मुळाशीं एक मोठेंच शास्त्रीय तत्त्व आहे. ' सुधारणेचा इतिहास ' नांवाच्या ग्रंथांत बकल नामक प्रसिद्ध इंग्रज इतिहासकारानें असा सिद्धांत प्रणीत केला आहे कीं, (Vol. I. P.64.) थंड देशांतल्या लोकांपेक्षां उष्ण देशांतल्या लोकांच्या शरीरपोषणास मांसादि कर्ब-विशिष्ट (Carbonaceous) अन्नापेक्षां पिष्टांश (Starch)-विशिष्ट व (Oxygenous) ऑक्सिजनविशिष्ट धान्यादिकांचीच जास्त आवश्यकता आहे. शिवाय उष्णदेशांतील हवेचाच नैसर्गिक परिणाम असा होतो कीं, मनुष्याचे हातून विशेष परिश्रमाचें काम एकसारखें होत नाहीं; तो लवकर थकतो व त्याचे मनास उत्साह राहत नाहीं. या गोष्टीचा अनुभव उष्ण देशांतल्या लोकांसही हिंवाळा व उन्हाळा यांतील कामाचे प्रमाणावरून सहज येतो. हे दोन सिद्धांत लक्षांत घेतले असतां हिंदुलोकांत मांसाशनाबद्दल इतकी पराङ्मुखता कां, ते मुख्यतः शाकाहारीच कां व त्यांतही तांदुळावरच येवढी त्यांची मदार कां, याचा सहजी उलगडा होतो. इतर धान्यांपेक्षां तांदुळांत पिष्टांश जास्त असून थोडया श्रमांत त्याचें पीक मुबलक येतें; कारण भाताचें पिक मूळ बियाण्याचे ६० पट येतें, असें प्रमाण आहे. अर्थात् हिंदुलोक भातखाऊ बनण्यांत केवळ निसर्ग–देवतेच्या नियमांचेंच पालन करीत आहेत हें यावरून दिसून येईल. इंद्रियजन्य विषयसुखाच्या अतिसेवनापासून शरीरावर व मनावर होणारा अनिष्ट परिणाम थंड हवेपेक्षां उष्ण हवेच्या देशांत अधिक प्रमाणांत व जास्त त्वरित होतो. अर्थात् उष्णदेशांत राहणाऱ्या लोकांस आपलें राष्ट्र शारीरिक, मानसिक व बौद्धिक बाबतींत जोमदार स्थितींत अखंड राखण्याकरतां शक्य तितकें विषयसुखपराङ्मुख होणें भागच पडतें. जीवनशास्त्र, मानसशास्त्र व अध्यात्मशास्त्र यांस लागू पडणारा हा महासिद्धांत आणि सामान्य माणसें वैद्याच्या उपदेशापेक्षां धर्माज्ञेवर जास्त विश्वास ठेवतात हा मनुष्यस्वभाव आर्य ऋषींस माहीत होता; म्हणूनच त्यांनीं आर्य राष्ट्रांचीं मनें धर्मबंधनांनीं जखडून प्रवृत्तीपेक्षां निवृत्तीचेच मार्गानें नेऊन त्यांचेवर महदुपकारच केले आहेत, असें कबूल करणें भाग आहे. असो; हिंदूंच्या या आहार-पद्धतीचा परिणाम त्यांच्या मानसिक, शारीरिक व बौद्धिक स्थितीवर इष्ट असाच झालेला आहे. सन १८८१ सालचे सुमारास इंग्लंडमध्यें वेड्यांचें प्रमाण दहा हजारांत ३० होतें, तेंच हिंदुस्थानांत त्या वेळीं सुमारें दहा हजारांत ३ असें होतें. गेल्या खाने-सुमारींत हिंदुस्थानांत हें प्रमाण एक लक्षांत २६ व २७ यांचे दरम्यान पडलें आहे

मुंबईइलाख्यांत हें प्रमाण पारशांत १६०, युरोपियनांत १३० व युरोजियनांत ४७६ पडलें आहे ! शरीराची प्रमाणवद्धता, सौंदर्य व चपळपणा यांतही हिंदुलोक कमी नाहींत. 'गुजराथच्या बनिया लोकांहून अधिक सुंदर पुरुष सगळ्या जगांत कोठेंही सांपडणार नाहींत' असें ऑर्म नांवाच्या ग्रंथकारानें मत दिलें आहे. 'हिंदूंच्या शरीराचा बांधेसूदपणा आश्चर्य करण्यासारखा आहे' असें चेंबर्सच्या विश्वकोशांतही (पृ. ५३९) म्हटलें आहे. हिंदूंविषयींचा दुराग्रह पूर्णपणें ज्याच्या मनांत वाणला होता त्या मिल इतिहासकारासही अशी कबुली द्यावी लागली आहे कीं. (हिंदुस्थानचा इतिहास Vol. I पृ.४७८.) 'हिंदूंच्या शरीरांतील चपळपणा असामान्य आहे. शरीर वाटेल तसें लववून त्याच्या द्वारें निरनिराळ्या आश्चर्यकारक व चतुराईच्या कसरती दाखविण्याचे कामांत जगांतील इतर कोणतेही लोक त्यांचा हात धरूं शकणार नाहींत; येवढेंच नव्हे तर दौड करण्यांत व लष्करी चालींतही अत्यंत मजबूत शरीरकाठीच्या इतर कोणत्याही लोकांची ते बरोबरी करूं शकतात !' हिंदूंचीं नीतिशास्त्रें व पंचतंत्रादि कथाग्रंथ यांवरून त्यांचें श्रेष्ठ नीतिज्ञान व व्यापक व्यवहारज्ञान यांचीही साक्ष पटते. 'गोष्टींच्या रूपानें नीतिशिक्षण देण्याची पद्धत, अंकांची दशक पद्धति व बुद्धिबळाचा खेळ हे तीन मोठे शोध हिंदूंचेच असून त्यांवरून त्यांचें चातुर्य व कल्पकता हीं पूर्णपणें सिद्ध होतात' असा सर विल्यम जोन्स यांनीं अभिप्राय दिला आहे (मिलचा इतिहास Vol II, P. 43) 'बुद्धिबळाचा खेळ हिंदूंनीं शोधून काढला, या म्हणण्यास त्यांच्या स्वतःच्या पोकळ वढाईशिवाय दुसरा पुरावा नाहीं' असें म्हणण्यास मिलसाहेब मात्र चुकले नाहींत. पण त्यांचा हा दुराग्रहमूलक शेरा प्रो० विल्सन यांनीं खोडून टाकला आहे. ते म्हणतातः– 'या बाबतींत हिंदूंनीं बढाई मुळींच मारलेली नाहीं. शाहानामा ग्रंथांत फारशी कवि फर्दूसी (१० वें शतक) लिहितो कीं, इराणचा बादशहा नशिरवान याजकडे एक हिंदु राजानें बुद्धिबळाचा एक पट व तो खेळ शिकविणारा शिक्षक पाठविला होता. फर्दूशीशिवाय इतर अनेक मुसलमान ग्रंथकारांनींही अशीच साक्ष दिली आहे. 'चतुरंग' असा बुद्धिबळाचे खेळाचा वाचक संस्कृत शब्द आहे; व त्यावरूनच 'शतरंग' हा फारशी शब्द बनला आहे. वाल्मीकि–रामायणांतही अयोध्येचे वर्णनांत तिचा आकार बुद्धिबळाचे पटा (अष्टापदा–) सारखा होता असा उल्लेख आला आहे (बालकांड, सर्ग ५।१६.). यांवरून मिलसाहेबांचें दुराग्रहमूलक अज्ञान किंवा अज्ञानमूलक दुराग्रह किती चुकीचा होता हें कोणासही दिसून येईल.

हिंदु लोकांच्या शीलासंबंधानें वर ज्या अनेक परकीयांच्या साक्षी दिल्या आहेत, त्यांवर कोणी असा आक्षेप घेतील कीं, प्राचीनकाळचे हिंदुलोक या स्तुतीस पात्र असतील; त्यांच्या हल्लींच्या वंशजांचे अंगांत हे गुण तितके कोठें आहेत ? आक्षेपकाचा हा प्रश्न एका दृष्टीनें बरोबर आहे. प्राचीन हिंदूंचें शील त्यांच्या सांप्रतच्या वंशजांत पूर्णपणें राहिलेलें नाहीं हें खरें; पण याबद्दल सर्वस्वीं त्यांसच जबाबदार धरतां येणार नाहीं. मध्यंतरीं हिंदुस्थानावर आलेल्या अनेक राष्ट्रीय विपत्तींतच त्याचें बीज आहे. एकाद्या देशावर तद्देशीयांहून कमी सुधारलेल्या अशा परकीय लोकांचा करडा अंमल सुरू झाला, म्हणजे पूर्वोक्त राष्ट्राचें शील ऱ्हास पावल्यावांचून राहत नाहीं. बेंथमनें म्हट-ल्याप्रमाणें, ' बेमालूम असत्य भाषण हेंच गुलामाचें स्वसंरक्षणाचें उत्कृष्ट साधन असतें. ' (Successful falsehood is the best defence of a slave.) हाच न्याय राजकीय गुलामगिरींत असलेल्या राष्ट्रासही लागू पडतो. अशा हीन स्थितींत राहिलेली व वाढलेली व्यक्ति किंवा राष्ट्र थोडेंबहुत शीलभ्रष्ट झालें तर त्यांत नवल नाहीं व त्याचा दोषही फारसा त्याजकडे नाहीं. मॅक्समुलरसाहेब या बाबीसंबंधानें लिहितात कीं, (India, What can it teach us. P. 54, 72) " इ. स. १००० पासून पुढें ६।७ शतकें मुसलमानांनीं हिंदुस्थानांत घातलेला अपूर्व धुडगूस व केलेला अमानुष धार्मिक छळ यांच्या हकीकती वाचणाराचे मनांत असा प्रश्न उभा राहतो कीं, असल्या जुलमामुळें हिंदुराष्ट्र कायमचें नीतिभ्रष्ट होऊन रसात-ळास कसें गेलें नाहीं किंवा तें स्वतःच सैतानस्वरूपी कसें बनलें नाहीं ? मुसलमानी अमदानींतील अनन्वित जुलूम अनेक शतकें सोशीत असतां हिंदुलोक थोडेबहुत शीलभ्रष्ट झाले यांत आश्चर्य नसून, अशा राष्ट्रीय यातनांतूनही हें राष्ट्र जिवंत राहिलें व त्याचे अंगीं अद्यापही बरेंच शील, नीति व संस्कृति हीं कायम राहिलीं आहेत, ही मात्र मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय. ' "

प्रकरण ५ वें.

भारतीयांचा क्षात्रधर्म.

मागील प्रकरणांत भारतीयांच्या एकंदर शीलासंबंधानें पाश्चात्त्य प्रवासी व ग्रंथकार यांच्या अभिप्रायांचे आधारें विवेचन केलें. या प्रकरणांत त्यांचें शौर्य, धैर्य,देशभक्ति, धर्म-युद्ध-प्रीति अर्थात् या सर्व गुणांचा अंतर्भाव करणारा जो त्यांचा क्षात्रधर्म त्यासंबंधानें लिहावयाचें आहे. शीलांत समाविष्ट होणाऱ्या येवढ्याच गुणांचा निराळा विचार करण्याचें कारणही उघड आहे. राष्ट्रांत काय किंवा व्यक्तींत काय इतर सात्त्विक व राजस सद्गुण कितीही असले, तरी त्याचे अंगीं शौर्य, धैर्य, -देशभक्ति, करारीपणा, इत्यादि क्षात्रवृत्ति कोणत्या तरी रूपानें वसत नसतील तर त्याला जगांत कोठेंही मान मिळणार नाहीं. ' यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः । स पंडितः सः श्रुतिमान् गुणज्ञः ॥ स एव वक्ता स च दर्शनीयः । सर्वे गुणाः कांचनमाश्रयंति ॥ ' हें सुभाषित सामान्य व्यक्तिविषयक व्यवहारांत खरें असलें तरी त्यांतील तत्त्व राष्ट्रास लागू करतांना, वित्त–कांचनाचे जागीं शौर्यादि शब्दच घालावे लागतील. जपानी राष्ट्रानें रणभूमीवर पराक्रम गाजवून रशियास चारी मुंड्या चीत केल्याबरोबर जपानचें वैभव, जपानचा व्यापार, जपानचें वाङ्मय, जपानची चित्रकला, जपानची समाजव्यवस्था यांचा चोंहोकडे जयजयकार होऊं लागला, त्याचें तरी बीज हेंच होय. सारांश, शारीरिक, नैतिक व मानसिक गोष्टींत मार्दव हा जसा स्त्रीजातीचा मुख्य गुण त्याचप्रमाणें या तीनही बाबतींत मर्दपणा अंगीं असणें हा पुरुषवर्गाचा मुख्य पौरुषगुण होय. तो ज्या राष्ट्राचे अंगीं नसेल त्याचेबद्दल इतरांना फार तर दया वाटेल व कींव येईल, पण आदर वाटणार नाहीं. करतां या पौरुषवृत्तीच्या किंवा क्षात्रधर्माच्या कसोटीस भारतीय राष्ट्र कितपत उतरतें तें आतां पाहूं.

वर सांगितलेल्या पौरुषगुणांच्या मुळाशीं एक महत्त्वाचें तत्त्व किंवा मनोवृत्ति आहे. ती ही कीं, मनुष्यास सामान्यतः जरी आपले प्राण अत्यंत प्रिय असले, तरी त्यास प्राणांहूनही अधिक प्रिय अशी कोणती तरी वस्तु , कोणतें तरी ध्येय, असावें लागतें. तें

नसेल तर त्याचे अंगीं पौरुषत्वाचाच नव्हे तर मनुष्यत्वाचाही तुटवडा आहे, असें खास समजावें. सामान्यतः गरीब असणारा शेतकरी जुलमी जबरदस्ताचे कोरडे दीनदुबळेपणानें पाठीवर सोशील; पण त्याच्या स्त्रीचें पातिव्रत्य किंवा त्याचा धर्म भ्रष्ट करूं पहाणाऱ्याच्या नरडीचा घोंट घेण्यास तो धांवून जाईल; प्रसंगीं तो त्याकरतां स्वप्राणत्यागही करील ! कुलीन पतिव्रता स्त्री दुष्ट चोरास भिऊन अंगावरचे सर्व दागिने स्वतः काढून त्याचे हवालीं करील; पण एकादा दुष्ट कामुक तिचा पातिव्रत्यालंकार हरण करूं पाहील तर अन्य उपाय हरल्यास ती त्याचा तरी प्राण घेईल किंवा आपला तरी देईल ! याचें कारण हेंच कीं, तिला दागिन्यांपेक्षां प्राणांची किंमत अधिक वाटते; पण प्राणांपेक्षांही ती पातिव्रत्यास जास्त मोलवान् मानते. क्षात्रवृत्तीच्या मुळाशींही अशाच प्रकारचें तत्त्व आहे. स्वदेश, स्वराज्य अगर आपला राजा, त्यांचें वैभव, इभ्रत किंवा स्वातंत्र्य, अगर आपलें इमान यांची योग्यता स्वप्राणांहूनही अधिक मानणें हें क्षात्रवृत्तीचें मूळ तत्त्व असून तें प्राचीन भारतीयांत उत्कटत्वानें व अर्वाचीन लढाऊ जातींतही बहुतांशानें वसत आहे. हें तत्त्व हाडामासांत व रोमरोमीं खिळण्यास जीवन व मरण याचेसंबंधाचें भारतीयांचें तत्त्वज्ञानही पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेलें आहे. पूर्वजन्म–पुनर्जन्म आणि कर्मफलवाद हा हिंदुधर्माचा एक मोठा विशेष असून तो त्यांच्या सर्व प्रकारच्या व्यवहारांत प्रविष्ट झालेला दिसून येतो. दोन दिवसांच्या मधील जशी रात्रींची निद्रा तशी मृत्यु ही दोन जन्मांचे मधील निद्रा होय; मरण म्हणजे जीवानें एक बिऱ्हाड सोडून नवें बिऱ्हाड करणें किंवा जुनीं वस्त्रें टाकून नवीं धारण करणें आहे. हें तत्त्व ज्यांच्या मनोभूमींत कायमचें रुजलें त्यांस विशिष्ट उच्च हेतूंकरितां येणाऱ्या मरणाचें किंवा प्राणत्यागाचें मुळींच भय वाटावयाचें नाहीं, हें उघड आहे. भरतखंडांतले प्राचीन भारतीय योद्धे किंवा अर्वाचीन लढाऊ जाती यांचे अंगीं दिसून येणाऱ्या मरणाविषयींच्या विलक्षण निर्भयतेचें खरें व मूळ कारण त्यांच्या या धर्मतत्त्वांतच आहे. ' जेव्हां एकादें अनिवारणीय संकट अंगावर येऊन कोसळतें, तेव्हां हिंदु लोकांतल्या अगदीं कनिष्ठ वर्गातलाही पुरुष जी शांतवृत्ति दाखवितो, ती पाहून युरोपियन लोक तोंडांत बोटच घालतील ' असें जें सर्टिफिकिट एल्फिन्स्टनसाहेबांनीं (हिंदुस्थानचा इतिहास–पृ. १९८–१९९) दिलें आहे, त्याचें तरी कारण वरील तत्त्वांतच सांपडणार आहे.

दिग्विजयी शिकंदर बादशहाच्या मोहिमेंत त्याच्या ग्रीक सैन्यास ज्या राष्ट्रांशीं लढावें लागलें, त्यांत त्यांस भारतीयांइतकें शूर राष्ट्र दुसरें कोणतेंच आढळलें नाहीं, अशी

त्यांनीं स्वत:च साक्ष दिलेली आहे (कित्ता पृ. १९७). शिकंदराच्या विजयी सैन्यानें पंजाबापलीकडे जाण्याचें नाकारलें व त्यास तेथूनच परतावें लागलें, यांचें मुख्य कारण मगधदेशच्या बलाढ्य हिंदु राजाच्या पराक्रमाची त्यांस दहशत वाटत होती, हेंच होय; व अलेक्झांडर पुढें चाल करून जाता, तर त्याच्या अखंड-विजयी सैन्यास कदाचित पराभूतही व्हावें लागलें असतें, असेंही कित्येक इतिहासकारांनीं लिहिलें आहे ! अकबर-कालीन इतिहासकार आबुल फाझल लिहितो कीं, ' विशेषत: संकटकाळीं हिंदूंचें शील जास्तच उज्ज्वलता पावलेलें दिसून येतें. रणभूमींतून पाय काढून पळून जाणें हें रजपुतास मुळीं माहीतच नाहीं. युद्धांत यश येणार नाहीं, असें दिसूं लागतांच तो पलायनाचा विचार करीत नाहीं; तर तो घोड्यावरून खालीं उतरतो व शत्रूंत घुसून प्राण जाई पर्यंत लढत राहतो ! ' प्राणांत होईपर्यंत लढण्याचा निश्चय झाला म्हणजे स्पार्टन योद्धे विशिष्ट केशरचना करीत; त्याप्रमाणें रजपूत शिपाई अशा वेळीं केशरी पोषाख करीत. दारा व अवरंगजेब-मुराद यांचेमध्यें झालेल्या धोलपूरच्या युद्धांत बादशाही फोजेसह दारानें पळ काढला; पण बुंदीचा रजपूत राजा मरेपर्यंत रणभूमीवर एकटाच लढत होता. ' रणांतून पळून जाणाऱ्या भ्याडांचा धिक्कार असो. मी बादशाही निमक खात असून माझे पाय या रणभूमीवर मीं कायमचेच रोंवले आहेत. विजय मिळाल्यावांचून येथून जिवंत परत जाईल, तो निमकहराम होय. ' असे उद्गार या वेळीं त्यानें काढले ! उज्जायिनी व धोलपूर या दोन लढायांत बुंदीच्या घराण्यांतील १२ राजपुत्र व हारा-रजपुतांच्या सर्व घराण्यांचे मुख्य कर्ते पुरुष ठार झाले ! अशी हकीगत देऊन कर्नल टॉड (Where are we to look for such examples), शौर्याचीं व निष्ठेचीं असलीं उदाहरणें आपणास कोठें सांपडतील ? असा आदराश्चर्ययुक्त प्रश्न विचारतात. (राजस्थानचा इतिहास Vol II. पृ . ४८१.)

जहांगीर बादशहा वैभवशिखरास चढला होता, अशा वेळीं त्यास त्यानेंच छावणींत अचानक कैद करण्याचें, मोंगलांचे इतिहासांतील जें अति अद्भुत धाडसाचें कृत्य, तें मोहबतखानानें सिसोदिया रजपुतांच्याच साह्यानें केलें. खुद्द मोहबतखानही धर्मानें मुसलमान पण जन्मानें रजपूत असून तो राणा प्रतापसिंह याच्या सावत्र भावाचा मुलगा होता. अकबर, जहांगीर व अवरंगझेब यांस मिळालेल्या महत्त्वाच्या सर्व विजयांचें श्रेय त्यांच्या रजपुत दोस्त राजांकडेच आहे. मोंगलांकरतां हेच रजपुत अफगाणिस्थानाच्या हिममय डोंगराळ प्रदेशांत आफगाणांसारख्या कडव्या लोकांशीं

लढले आहेत, अशी साक्ष खुद्द वरील बादशहांनींच दिलेली आहे. मोंगलांच्या राज्यविस्ताराचें निमें अधिक श्रेय (लाख तलवार रहाटोरन्) राहटोरांच्या लाख तलवारींकडेच आहे. पण मोंगलबादशहांनीं अशा शूर व इमानी दोस्तांच्या साह्याचें चीज केलें नाहीं. जोधपूरच्या जसवंतसिंगास काबूल येथें व त्याचा पुत्र पृथ्वीसिंग यास दिल्ली येथें अवरंगजेबाने विषप्रयोग करवून मारविलें, व मगच हिंदूंवर झिजियाची दुःसह डोईपट्टी बसाविण्याची त्यास छाती झाली ! उघड युद्धांत ज्याशी सामना करण्याचा आपणांत वकूब नसेल त्यास विषप्रयोगानें नाहींसें करण्याच्या ह्या युक्तीचा अवलंब एकदां अकबरानेंही केला होता, म्हणतात. अकबराचे पश्चात् सेलिमचे ऐवजीं अकबराचा पुतण्या खुसु यास गादी मिळावी, असा अंबरचा राजा मानसिंग याचा इरादा अकबरास कळला. तेव्हां त्यानें एक माजूमची वडी तयार करून तिच्या एका बाजूस विष लावलें. पण वडी मोडून मानसिंगास देतांना चुकून चांगला भाग मानसिंगाकडे गेला व विषारी भाग अकबरानें खाल्ला ! अशा प्रकारचें कपटाचरण, साम्राज्यमद व धार्मिक छळ यांनीं रजपूत लोकांस गांजून मोंगलांनीं आपले कट्टे शत्रू बनविलें नसतें तर त्यांनीं नादीरशहास दिल्लीची धूळदाण कदापि करूं दिली नसती. असो; रजपूत जसे शूर होते तसेंच त्यांचें शरीर-सामर्थ्यही अचाट होतें. खोरासानच्या बादशहानें दिल्लीच्या बादशहाकडे एक लोखंडी धनुष्य पाठवून तें वांकविणारा कोणी वीर तुम्हांपाशीं आहे काय, अशी उद्दामपणें पृच्छा केली होती. तेव्हां हें धनुष्य वांकविणारा दिल्लीस कोणीही निघाला नाही. पण भट्टीकुळांतला प्रचंड पुरुष सोनिंगदेव यानें हें धनुष्य वांकविले येवढेच नव्हे तर मोडूनही टाकलें ! कर्नल टॉड लिहितातः—' कुरूंशीं तुलना करतां त्यांचे पुढें होमरचे वीर पुरुष क्षुद्र वामनमूर्तीच ठरतील. कुरूंचे हातांतलें कडें अजॅक्सला नुसतें उचलतां तरी आलें असतें कीं नाहीं याची शंकाच वाटते.' (Homer's heroes were pigmies to the Kurus, whose bracelet we may doubt if Ajax could have lifted—टॉडचा इतिहास Vol II. पृ. ८१.)

प्राचीन भारतीय क्षत्रियांची परंपरा रजपुतांत मात्र कायम राहिली असून तीवरून प्राचीन क्षत्रियांच्या क्षात्रधर्माची बरीच स्पष्ट कल्पना करतां येईल. रजपुताइतकी शूर, इमानी व उमदी जात पृथ्वीच्या पाठीवर पूर्वीही कोणती झाली नाहीं व पुढेही होणार नाहीं. कर्नल टॉड यांनीं लिहिलेल्या इतिहासासारखा, महाकाव्यांतच शोभतील अशा अद्भुत शौर्याच्या पण खऱ्याखुऱ्या कथांनीं भरलेला, इतिहास जगांत दुसऱ्या कोणत्याही

प्राचीन व अर्वाचीन राष्ट्राचा नाहीं. अर्थात् रजपुतांच्या शौर्यादि क्षात्रवृत्तीचीं वरच्या सारखीं उदाहरणें त्यांच्या इतिहासांतून हजारों देतां येतील. येवढेंच नव्हे तर रजपुतांच्या उज्ज्वल इतिहासांत अस्सल क्षात्रधर्म मूर्तिमंत उतरलेला कोणासही दिसून येईल. रजपुतांच्या क्षात्रधर्माचें स्वरूप टॉडनें दिलेल्या पुढील आशयाच्या अभिप्रायावरून कोणाचेही सहज लक्षांत येईल. टॉडसाहेब (इतिहास Vol I. पृ. २५९) लिहितात कीं, " रजपुतांचे रक्तांत जसा उत्साह तसेंच धाडसही भरपूर आहे. परंतु शत्रूचा निःपात करण्याची योग्य वेळ येईपर्यंत बाह्यतः औदासिन्यासारख्या दिसणाऱ्या धिमेपणानें व सहनशीलतेनें वाट पाहण्याचेंही सामर्थ्य त्यांचे अंगीं आहे. अनेक शतकें राजकीय जुलूम, छल व पारतंत्र्य यांत दिवस कंठावे लागल्यामुळें बहुतेक जमीनदोस्त झाल्यानंतर ज्यांनीं पुनः डोकें वर काढलें आणि संकटांच्या घर्षणानें जणूं धैर्य तीक्ष्ण होऊन वाडवडीलांच्या चालीरीती व धर्म आणि संस्कृति ज्यांनीं कायम राखली असें मनुष्य जातीच्या इतिहासांत एकटें रजपूतराष्ट्र आहे; व याचें सर्व श्रेय त्यांच्या वरील गुणांकडेच आहे. कांहीं रजपूत मोगलाकडे गेले, कांहीं फितुर झाले; कांहींनीं धर्मांतर केलें व कांहींनीं आपल्या लेकीही मोंगल बादशहांस दिल्या. पण अशा अभिमानशून्य व भ्रष्ट घराण्यांचीं राज्यें नष्ट झालीं किंवा संपुष्टांत आलीं. पण ज्यानें अखेरपर्यंत स्वधर्माचें व स्वातंत्र्याचें रक्षण केलें व ज्यानें सुरक्षितपणाकरतां आपली अब्रू शत्रूस विकली नाहीं, तें मेवाडचें राज्य अद्याप अभंग कायम असून तें आपलें पूर्वचारित अभिमानानें संभाळीत आहे. रोमन लोकांच्या दडपणाखालीं प्राचीन ब्रिटन लोकांची काय अवस्था झाली ती पहा. त्यांनीं आपलीं मंदिरें, पुरोहितवर्ग व वृक्षवनें यांचें संरक्षण करण्याचा खूप प्रयत्न केला; पण तो अखेर निष्फळ ठरला. रोमन लोकांचे मागून सॅक्सन आले, त्यांजपुढेही त्यांनीं माना वांकविल्या; डेन लोक आले तेव्हांही हाच प्रकार झाला. ह्या सर्व जातींच्या लोकांपासून जन्मलेली मिश्र जातही अखेर नॉर्मन लोकांनीं पादाक्रांत केली. स्वारी करणाऱ्या शत्रूनें एकाच युद्धानें सबंध राज्य जिंकावें आणि जित्यांचा धर्म व समाज जेत्यांच्या धर्मांत व समाजांत पुरता बुडून मिसळून जावा, असाच प्रकार तेथें झाला. पण रजपुतांची स्थिति पहा. त्यांचीं कांहीं राज्यें नामशेष तर कांहीं संकुचित झालीं; पण त्यांनीं आपला धर्म व रीतीभाती यांचा अल्पांशही शत्रूला पादाक्रांत करूं दिला नाहीं. " (How did the Britons at once sink under the Romans and in vain strive to save their groves, their druids or the alters

of Bal from destruction ! To the Saxons they alike succumbed; they,again,to the Danes; and this heterogeneous breed to the Normans. Empire was lost and gained by a single battle, and the laws and religion of the conquered merged in those of the conquerors. Contrast with these the Rajputs; not an iota of their religion or customs have they lost though many a foot of land and some of their states have been expunged from the map.)

क्षात्रधर्मामध्यें अंतर्भूत होणारा दुसरा गुण म्हटला म्हणजे देशभक्ति हा होय. स्वामिनिष्ठा व इमान यांचाही अंतर्भाव याच व्यापक गुणांत केला पाहिजे. देशभक्ति-शून्य शौर्याची किंमत पातिव्रत्यशून्य सौंदर्याइतकीच मानली पाहिजे. जो धन देईल तो धनी, असें मानून त्याचे सेवेस आपलें सौन्दर्य व तारुण्य अर्पण करणाऱ्या वेश्या आणि त्यास आपलें शौर्य विकणारे भाडोत्री शिपाई, यांची योग्यता अर्थातच सारखी आहे. म्हणूनच क्षात्रधर्मांत शौर्याइतकेंच किंबहुना त्याहूनही जास्त देशभक्तीस महत्त्व दिलेलें असतें. या देशभक्तीच्या गुणांतही रजपुतांचा इतिहास भारतीय क्षत्रियांच्या श्रेष्ठत्वाची ग्वाही देत आहे. ' स्वदेशभूमीचे नांवांतील अपूर्व जादूनें रजपुतांचीं मनें विलक्षण रीतीनें भारून टाकलेलीं असतात. आपली धर्मपत्नी किंवा प्रेमसंबंधी स्त्री यांचा परक्या माणसानें नुसता नामोच्चार केलेला–त्यांचें नुसतें नांव* काढलेलेंही–अस्सल रजपुतास खपत नाहीं; तसेंच स्वदेशाचेंही नांव आदरशून्यतेनें कोणीं तोंडांतून काढलें तर तेंही तो सहन करीत नाहीं. अशा वेळीं अस्सल रजपुताची तरवार एकदम म्यानांतून बाहेर पडते ' असें कर्नेल टॉड यांनीं (राजस्थानचा इतिहास व्हा. २ पृ. ४२९.) लिहिलें आहे ! हिंदुधर्मशास्त्रकारांनीं परदेशागमन सर्वांस निषिद्ध केलें, यांत हिंदू मनाची राजकीय अवनति व राजकीय अदूरदृष्टि दिसून येत असली, तरी अवनत स्थितींत परदेशीं जाऊन आपली मानहानी करून घेण्यापेक्षां पवित्र स्वदेशभूमींतच आयुष्य घाल-

---

* नांव काढणें म्हणजे वाटेस जाणें; अपमान करणें; असा जो मराठींत अर्थ झाला आहे, त्याचे मुळाशीं हीच रजपूत अभिमानवृत्ति असावी.

विणें व तेथेंच देह ठेवणें, हेंच श्रेयस्कर होय व हीं दोन व्रतें जो पाळील त्यासच स्वर्ग-प्राप्ति होईल, ही देशभक्तिमय कल्पनाही या निषेधांत स्पष्ट दिसत आहे. रजपुतांचा सगळाच इतिहास देशभक्ति व इमान यांनीं भरलेला आहे. इंग्लंडचा राजसिंह (पहिला रिचर्ड,)—याचे प्रजाजन जर रजपूत असते तर तो आस्त्रियांतील अंधारकोठडींत इतकीं वर्षें खचित कुजत पडला नसता. मेवाडचा महाराणा प्रतापसिंह व मारवाडचा ठाकूर दुर्गादास यांच्या तोडीची देशभक्ति प्राचीन वा अर्वाचीन कोणत्याही देशच्या इतिहासांत अत्यंत दुर्मिळच होय. प्रतापसिंहाची बिकट परिस्थिति आणि त्याच्या प्रतिपक्षीयाचें सामर्थ्य यांचा विरोध लक्ष्यांत घेतां एकसारखें २५ वर्षें झगडणाऱ्या प्रतापसिंहाच्या देशभक्तीची जितकी कडक परीक्षा झाली तितकी कोणाचीच झाली नसेल व त्या परीक्षेंत त्याच्या इतका कोणीच कसोटीस उतरला नसेल, असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं. ' आशिआंतील प्राचीन व अर्वाचीन राजांमध्यें सर्वश्रेष्ठ ' असें नांव मिळालेला अकबरबादशहा प्रतापसिंहाचा प्रतिस्पर्धी होता. त्याला सबंध मोंगल साम्राज्याच्या सामर्थ्याचें पाठबळ होतें, येवढेंच नव्हे तर मारवाड, अंबर, बिकानेर, बुंदी वगैरे संस्थानचीं रजपूत राजघराणीं अकबरासच अनुकूळ होऊन त्याचेकरितां आपल्या तरवारी व आपली मुत्सद्दीगिरी स्वधर्मीय व स्वजातीय प्रतापसिंहावर चालविण्यास एका पायावर तयार होतीं; किंवहुना खुद्द प्रतापाचाच सावत्र भाऊ सगरजी हाही अकबराचे पक्षास जाऊन मिळाला होता. इकडे प्रतापसिंहाची राजधानी चितोड ही शत्रूचे स्वाधीन झाली होती; त्याचे कांहीं आप्तस्वकीय लोभानें फितूर तर कांहीं पराभवानें निराश होऊन गेले होते. इतर किल्येकांचें डोळ्यापुढें, अकबराचे पक्षास जाऊन मिळाल्यास प्राप्त होणाऱ्या पदव्या, धनदौलत, मानमान्यता व सुरक्षितपणा यांचा मोह मूर्तिमंत उभा होता. खुद्द प्रतापसिंहास वीसपंचवीस वर्षें राण्या व राजपुत्र आणि थोडेसे निर्धाराचे अनुयायी यांसह पर्वतांत व अरण्यांत भटकत व कंदमुळांवर उपजीविका करीत फिरावें लागलें. त्यांतच त्याला तान्हा राजपुत्र अमरा यास अरण्यांतील क्रूर श्वापदें व क्रूरतर माणचें यांचें सहवासांत वाढवावयाचें होतें. अशा विपन्न स्थितींत असतांही, चितोड व मेवाड पुनः परत मिळवून आपल्या घराण्याची कीर्ति उज्ज्वल करावयाची हा आपला निर्धार त्यानें आमरणांत पाळला. संधि साधेल तेव्हां पर्वतांतून बाहेर पडून मोंगली सैन्यावर विद्युद्वेगानें तुटून पडून त्याचा नाश करावयाचा व पुनः आरवली पर्वताचे आश्रयास जावयाचें, असा क्रम त्यानें अव्याहत २५ वर्षें चालविला होता ! तार्तर बाद-

शहापुढें बाप्पा रावळच्या वंशजानें मान वांकविणें किंवा आपल्या मुली त्याच्या जनानखान्यांत घालणें ही नुस्ती कल्पनाही त्याचे मनास मरणांतिक वेदना देई. सारांश, एका पक्षाकडे प्रबल महत्त्वाकांक्षा, अतुल सामर्थ्य, अपूर्व मुत्सद्दीगिरी, अमर्याद साधन-सामुग्री आणि धर्मप्रसारोत्साह असून दुसऱ्या पक्षाकडे अपूर्व शौर्य, अभंग धैर्य, अतुल इमान व अद्वितीय निष्ठा हीं असून उभयतांचा संग्राम पाव शतक सारखा चालला होता. पण अखेर त्यांत प्रतापाचीच अजिंक्य देशभक्ति विजयी झाली. कर्नल टॉड लिहितात:—'ग्रीसवर झर्सिसची जेव्हां स्वारी झाली तेव्हां ग्रीकांनीं जें शौर्य व जी देशभक्ति प्रगट केली, ती पाहून सर्व जग चकित होतें. पण अकबराचें राज्य तत्कालीन सर्व राज्यांत अत्यंत बलाढ्य असून त्याचें सैन्यही संख्येनें व लढाऊ तयारीनें झर्सिसच्या सैन्यापेक्षां किती तरी श्रेष्ठ होतें. अशा बलाढ्य शत्रूशीं अल्प सामुग्रीचे साह्यानें विकट परिस्थितींत २५ वर्षें लढणाऱ्या प्रतापाची सर कोणासही येणार नाहीं. आल्पसपर्वत-तुल्य अरवली पर्वतांत अशी एकही खिंड नाहीं कीं जी प्रतापानें आपल्या विजयशाली पराक्रमानें किंवा अधिक कीर्तिकर पराजयानें पुनीत केली नाहीं. हळदीघाट ही मेवाडची थर्मापिली व देवीरचें रणमैदान हें मेवाडचें मॅराथॉन होय.'

ठाकूर दुर्गादासाची स्थिति प्रतापाहून कांहीं अंशीं निराळी होती; तरी त्याचा निर्धार, देशभक्ति, शौर्य व इमान हीं प्रतापाइतकींच जाज्वल्य होतीं. दुर्गादास हा राजघराण्यांत-जन्मला नसून राहाटोर घराण्याचे अंकित असलेला लहानसा सरदार-ठाकूर-होता. राहाटोरांचा राजा जसवंत याचा काबुलास खून झाला; त्याचा अज्ञान मुलगा अजित याजवरही तोच प्रसंग यावयाचा. पण राहाटोरांनीं या तान्ह्या राजपुत्रास गुप्त सुरक्षितस्थलीं नेऊन ठेवलें; आणि सहा वर्षेंपर्यंत हा राजपुत्र कोठें आहे, याचा त्यांनीं मोंगलास सुगावाही लागूं दिला नाहीं. राजा जसवंताचा खून झाल्या वेळेपासून तों अजितसिंह मोठा होऊन स्वराज्य संपादन करीपर्यंतच्या ३० वर्षांच्या अवधींत राहाटोर रजपूत व ठाकूर दुर्गादास यांनीं प्रगट केलेल्या अपूर्व देशभक्तीस व राजभक्तीस जगांत इतरत्र कोठेंच तोड सांपडणार नाहीं. या अवधींत राहाटोरांचा प्रत्येक सरदार घरीं खाटेवर मरण न पावतां रणशय्येवरच मृत्यु पावला आहे! तो काळ असा होता कीं, देशभक्ति व राजनिष्ठा यांचा त्याग करून मोंगलपक्षाकडे जाणारांस संपत्ति, वैभव, सन्मान, अधिकार, वैगेर सर्व गोष्टी तात्काळ प्राप्त होत होत्या. दुर्गादासाचे मनापुढेंही ह्या मोहाचें जाळें पसरण्यांत आलें होतें. परंतु शौर्य व दूरदृष्टी यांचेप्रमाणेंच इमान व देशभक्ति या गुणांच

पुतळा असलेल्या दुर्गादासानें तिकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. मोंगल बादशहानीं त्यास पांच हजारांची मनसबदारी देऊं केली. तिला भुलून जर त्यानें मोंगलांचा अंकितपणा स्वीकारला असता, तर त्याचा ऐहिक दर्जा पुष्कळच वाढला असता. दुर्गादासानें मोंगलांकडे येण्याबद्दल वाटेल तें मोल मागितलें असतें, तरी तें मोंगल बादशहानीं त्यास तात्काळ दिलें असतें. पण दुर्गादासाची देशभक्ति व राजभक्ति 'अमोलिक' होती. दुर्गादासाच्या खुद्द सख्या भावाचा खून शत्रूपक्षानें करविला होता. पण शत्रु प्रत्यक्ष हातीं लागून सूड उगाविण्याची उत्तम संधि आली असतांही उच्च हेतूकडे लक्ष देऊन आणि औदार्य व धर्मयुद्धनीति यांस अनुसरून त्यानें त्यास जीवदान दिलें ! शत्रूचा जनानखाना हातीं लागल्यास मोंगल बादशहा कसें वागत, तें महशूरच आहे. पण मोंगल शहाजादा अकबर याचे प्राण वाचविण्यासच नव्हे तर त्याच्या जनान्याची अब्रू वचावण्या-सही दुर्गादासच कारणीभूत झाला ! आग्रा येथील तिहेरी कोटाच्या राजवाड्यांतील अंतःपुरांत मोंगलांच्या बादशाही जनानखान्याचें पावित्र्य जितकें सुरक्षित असेल, त्याहून तें राहाटोरांच्या छावण्यांत शतपट अधिक सुरक्षित होतें. अशा प्रकारच्या ठाकूर दुर्गादासाची स्मृति राजपुतान्यांत अद्यापिही जागृत आहे. पांढऱ्या घोड्यावर वसलेल्या वृद्ध पण ताकदवान दुर्गादासाची तसबीर नाहीं, असा चित्रसंग्रह राजपुतान्यांत एकही सांपडावयाचा नाहीं.

शौर्य व देशभक्ति यांचेप्रमाणेंच धर्मयुद्धप्रेम हा तिसरा गुणही खऱ्या क्षात्रधर्मास आवश्यक आहे. शौर्य व देशभक्ति हे गुण अंगीं असलेला योद्धा कदाचित् क्रूर, दुष्ट, निर्दय किंवा स्वार्थपरायण असूं शकेल. क्षात्रवृत्तींतून ह्या दुर्विकारांचा अंश नाहींसा करण्या-करितांच धर्मयुद्धाची कल्पना अस्तित्वांत आली. पशुपक्ष्यांतीलही नरजातींत युद्धप्रेम दिसून येतें; पण मनुष्यांतील युद्धप्रवृत्तींतून सर्व प्राण्यांस सामान्य असलेलें हें युद्धप्रेम जितकें कमी होईल व युद्धास परोपकाराचें किंवा कर्तव्याचें स्वरूप येईल, तितकें मनुष्य-त्वास अधिक श्रेयस्कर होय. दीन, अनाथ, अबला, शरणागत किंवा धर्मपरायण लोक यांचें अगर धर्म, देश, राजा यांचें संरक्षण करणें, याच हेतूनें केवळ कर्तव्य म्हणून युद्ध करणें हा अस्सल क्षात्रधर्म असून यांत अर्थातच स्वार्थास, सूड घेण्याच्या बुद्धीस किंवा शत्रूच्या द्वेषास अगर निर्दयतेस थाराच नाहीं.अशा प्रकारचे धर्मयुद्धाचे नियम पाळणारे क्षत्रिय आपल्या शत्रूच्या अडचणींचा अन्यायानें कधींही फायदा घेत नाहींत व तो पराभूत झाल्यास त्याशीं उदारपणानेंच वागतात. हें धर्मयुद्धप्रेम–किंवा इंग्रजींत जिला

(शिव्हलरी) Chivalry म्हणतात ती क्षात्रवृत्ति प्राचीन भारतीय क्षत्रियांत व अर्वाचीन रजपुतांत पूर्णत्वानें वसत होती; इतकी कीं, रजपुती बाणा व धर्मयुद्ध हीं राजपुताऱ्यांत समानार्थकच मानली जात, ह्या संबंधाचा पुरावा रजपुतांच्या इतिहासांत हवा तितका सांपडेल. युरोपांतील शिव्हलरीच्या युगांत तरुण व सुंदर स्त्रियांचें संरक्षण व सेवा करण्यांत तिकडील शिलेदार मंडळी मोठें भूषण मानीत. पण या युरोपियन मनोवृतींत राजस कामुकतेचा थोडा तरी अंश आहे. रजपुती शिव्हलरी याहून उच्च दर्जाची व सात्विक आहे. रजपुती वृत्तींत स्त्री तरुण किंवा सुंदर असलीच पाहिजे असें नाहीं; एखाद्या स्त्रीनें एखाद्या रजपूत वीराकडे राखी पाठविली व ती स्वीकारून त्यानें आपले हातांत बांधली, कीं येवढ्या राखीबंधनातें तीं स्त्रीपुरुषें एकमेकांचीं बहिणभांवंडें होत; व तो वीरपुरुष राखीबंद भाई या नात्यानें या आपल्या राखीबंद भगिनीचें संरक्षणाचें किंवा अन्य कोणतेंही कार्य प्रसंगीं प्राणत्याग करूनही आनंदानें करी. आणि यांत विशेष हा कीं, या भाऊबहिणींनीं एकमेकांस डोळ्यांनीं पाहिलेलेंही नसे ! या राखीबंधनाचे बाबतींत वय, जात किंवा वर्ण यांकडेही कोणी पहात नसे. चितोडच्या महाराणी कर्णावतीनें हुमायुनला याच रीतीनें आपला राखीबंदभाई केलें होतें; व हें नातें पाळूनच हुमायूनानें तिचे कुमकेस येऊन चितोडला पडलेला गुजरायच्या बहादुरशहाचा वढा उठवून त्याचें पारिपत्य केलें ! या शौर्यादि क्षात्रवृत्ति व धर्माकरतां प्राणत्यागही करण्याचा करारीपणा एकट्या रजपुतांतच आहे, असें नाहीं; तो इतर हिंदीलोकांतही आढळून येतो. एल्फिन्स्टन साहेब लिहितात (हिंदुस्थानचा इतिहास पृ. १९९):—' हे लोक पुष्कळ प्रसंगीं इतकें शौर्य प्रगट करतात कीं, जगांतील कोणत्याही लढाऊ लोकांस त्यांचेवर ताण करतां येणार नाहीं. धर्म किंवा अब्रू यांचें संरक्षणार्थ प्राणही अर्पण करण्यास ते नेहमीं एका पायावर तयार असतात. ' दोनशें वर्षांपूर्वी पंजाबांतील सिआलकोट येथील एका पाठशाळेंतील मुसलमान मुलानें हिंदुधर्माची निंदा केली. ती ऐकून संतापून जाऊन एका हिंदु मुलानें मुसलमानी धर्माचीही निंदा केली. हें प्रकरण काजीकडे गेल्यावर त्यानें हिंदु मुलास देहांत शासनाची शिक्षा सांगितली. लाहोरच्या सुभेदारानें यावर अशी तडजोड सुचविली कीं, हिंदु मुलानें जर मुसलमानी धर्म स्वीकारला तर त्याला ही शिक्षा माफ करावी. पण त्या हिंदु मुलानें धर्मत्याग करून प्राण वचावण्याची ही तडजोड साफ नाकारली. तेव्हां अखेर या मुलाचा शिरच्छेद करण्यांत आला ! या मुलाचें नांव ' हकीकतराय ' असें असून त्यानें देह ठेवला-

त्या जागीं रणजितसिंहानें समाधि बांधली आहे; व तिचे दर्शनास अद्यापिही हजारों भाविक लोक जातात !

भारतीय क्षत्रिय इतके शूर व इतके देशभक्त होते तर त्यांचा देश पारतंत्र्यांत का पडला, असा प्रश्न येथें सहजच उपस्थित होतो. भरतखंडाचा थोडा भाग कांहीं शतकें ग्रीकांचे अंमलाखालीं होता; पण लवकरच चंद्रगुप्तानें स्वदेशास स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें. पुनः मुसलमानी स्वाऱ्या होऊं लागून त्यांचीही सत्ता येथें स्थापित झाली. ही परकीय सत्ता नष्ट करण्याचें काम मराठे, शीख, रजपूत यांजकडून चालूं असतांनाच फ्रेंचादि युरोपियन राष्ट्रांचा इकडे प्रवेश झाला; आणि मोंगली सत्ता पूर्णपणें नष्ट होण्यापूर्वीच युरोपियनांची राजसत्ता इकडे बरीच दृढमूल होऊन चुकली. एक कुस्ती बराच वेळ झुंजून प्रतिपक्षी पाडाव होत असतांनाच ताज्या दमाच्या तिसऱ्या मल्लाशीं झुंज सुरू व्हावी, तसा प्रकार होऊन त्यांत हिंदुस्थान पराभूत झालें; व अखेर युरोपियन राज्य-सत्तेच्या अंकित झालें. असा प्रकार घडून येण्यांत अनेक भिन्न भिन्न गोष्टी अंशां शांनीं कारणीभूत झाल्या आहेत. पण त्यांतील मुख्य गोष्टी निवडून काढावयाच्या म्हटलें तर असें आढळून येईल कीं, भारतीयांची भूतदया व धर्मयुद्धप्रीति हे त्यांचे गुण, व आपसांतील भाऊबंदकी हा त्यांचा दोष हेच सदरहू कार्य घडवून आणण्यांत मुख्यतः कारणीभूत झालें हिंदूंच्या प्रतिपक्षीयांत त्यांच्या इतकी भूतदयाही नव्हती व धर्मयुद्ध-प्रीतिही नव्हती उलट ' प्रेमसंपादन व युद्ध या कार्यांत प्रत्येक उपाय न्याय्यच असतो. ' (Every-thing is fair in love & war) ह्या इंग्रजी म्हणीतलें तत्त्व पाळणारचे बहुतेक होते. याचे उलट, शरण आलेल्या शत्रूचा घात करावयाचा नाहीं, अडचणींत सांपडलेल्या वैऱ्याच्याही त्या परिस्थितीचा अन्यायानें फायदा घ्यावयाचा नाहीं, ही वृत्ति हिंदुलोकांतच असल्यामुळें त्याच गोष्टी त्यांच्या नाशास कांहीं अंशीं तरी कारण झाल्या. तिरोलिच्या लढाईत सुलतान शहाबुद्दीन घोरी हा कैद होऊन पृथ्वीराजाचे हातीं लागूला होता; पण त्यानें उदारपणें सुलतानास मुक्त करून परत स्वदेशीं जाऊं दिलें ! पण याचा परिणाम पुढें असा झाला कीं, शहाबुद्दीन पुनः मोठें सैन्य घेऊन हिंदुस्थानावर चाल करून आला; आणि कनोज व पट्टण येथील फितुरी राजांच्या मदतीनें त्यानें पृथ्वीराजाचें दिल्लीचें राज्य बुडविलें ! अवरंगझेबाची आवडती राणी उदेपुरी एका युद्धांत मेवाडचे महाराण्याचे हातीं लागली होती व अवरंगझेबाची फौजही एका पहाडांतील बिकट खिंडीचीं दोनही तोंडें झाडें तोडून बंद करून रजपुतांनीं दोन दिवस अडवून धरली

होती. हा वेढा असाच पुढें चालता तर अवरंगझेब सैन्यासह केवळ उपासमारीनेंच मेला असता ! पण शत्रूचा अशा रीतीनें नायनाट करणें उदार व दयाळु रजपुतांस आवडलें नाहीं; त्यांनीं वाट मोकळी करून अवरंगझेबास सैन्यासह खिंडीचे बाहेर पडूं दिलें; आणि नंतर त्याची उदेपुरीही सन्मानपूर्वक त्याजकडे परत पाठवून दिली ! अवरंगझेबाचा मुलगाही एकदां असाच रजपुतांच्या कचाट्यांत सांपडला होता; त्यासही त्यांनीं असेंच सैन्यासह सुरक्षित बाहेर जाऊं दिलें ! अकबर व ' जगद्विजयी ' जहांगीर यांच्या विजयांचें व काबूलपासून आराकानपर्यंत झालेल्या राज्यविस्ताराचें निम्में अधिक श्रेय जयपूरचा राजा मानसिंग व मुळचा रजपूत पण पुढें मुसलमानी धर्म स्वीकारलेला सगरजीचा पुत्र मोहबतखान यांजकडेच आहे. ' रजपुतांनीं अस्थानीं भूतदया किंवा औदार्य अगर अविचार दाखविला नसता तर मोंगली राज्य अधिक लवकर नामशेष झालें असतें ' असें कर्नल टॉड (Vol. I. पृ.३७९) लिहितात तें याचकरतां होय.

जगज्जेता अलेक्झांडर यानें पौरस (पौरव) राजाचा पराजय केला, त्या वेळींही असलीच भाऊबंदकी शत्रूचे उपयोगी पडली. शिकंदराचें सैन्य आधींच पोरस राजाच्या फौजेच्या दुप्पट होतें. पण तक्षशिलेचा हिंदु राजा व क्षुद्रक देशचे लोक हे ५००० फौजेसह शिकंदरास जाऊन मिळाले. या भाऊबंदकीचाच परिणाम असा झाला कीं, पोरसचा पराभव होऊन भरतखंडास परकीय राजसत्तेचा स्पर्श झाला ! आपसांतलें हें वैमनस्य अस्तित्वांत नसतें, तर असिरियाच्या सेमिरामीस राणीच्या स्वारीची जशी धुळधाण उडाली तशी शिकंदराच्याही स्वारीची झाली असती, यांत संशय नाहीं.

मुसलमानांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या त्या वेळचा हिंदु-राजा पृथ्वीराज हाही शूर व देशभक्त होता; व त्यानें गिझनीच्या घोरी घरण्याचे सुलतानांच्या स्वाऱ्या सात लढाया जिंकून परत फिरविल्या होत्या. पण जसें द्रौपदीचें स्वयंवर भारतीय युद्धास बीजरूपानें कारणीभूत झालें, त्याचप्रमाणें कनोजच्या संयोगितेचें स्वयंवरही भरतखंड परतंत्र करण्यास कारणीभूत झालें. संयोगितेचे मनांत पृथ्वीराजास वरावयाचें होतें पण तिचा बाप जयचंद यानें त्यास स्वयंवरास बोलावलें नाहीं, येवढच नव्हे तर त्याच अपमान करण्याचे इराद्यानें त्याचा पुतळा करून तो स्वयंवरमडपाचे दरवाजापाशीं रखवालदार या नात्यानें उभा केला ! पण संयोगितेनें आपल्या बापाची परवा न करतां आणि स्वयंवरासाठीं मंडपांत जमलेल्या सर्व राजांस धिक्कारून दरवाजावरच्या पृथ्वीराजाचे प्रत-

ळ्यासच माळ घातली ! इतक्यांत पृथ्वीराजानें अचानक तेथें येऊन संयोगितेचें हरण केलें; आणि सर्व राजांचा पराभव करून विजयी व यशस्वी होत्साता पृथ्वीराज राजधानीस परत आला. पण यावेळच्या पांच दिवस सारख्या चाललेल्या धांवत्या लढाईत त्याचे निवडक १०० शूरवीर सेनापति मृत्यु पावल्यामुळें त्याचें सामर्थ्य कमी झालें. पृथ्वीराजाच्या या पराक्रमानें कनोजचा जयचंद व इतर राजे जितके लज्जित तितकेच क्रुद्ध होऊन पृथ्वीराजाचा नाश करण्याची संधि पाहूं लागले. त्यांतच पृथ्वीराजास एकदम मुबलक भूमीगत द्रव्य सांपडल्याचें वर्तमान ऐकल्यामुळें त्यांचा मत्सराग्नि अधिकच भडकला. कनोजचा जयचंद, अन्हिलवाडा पट्टणचा राजा व हाओलीराव हमीर यांनीं संगनमत करून शहाबुद्दीनशीं गुप्त सख्य केलें व त्यास सैन्यानिशीं बोलावलें. त्यानें हिंदुस्थानावर स्वारी करून व जयचंदानें सांगितलेले डावपेंच लढवून पृथ्वीराजाशीं लढाई केली. तींत तो पराभूत होऊन सुलतानाचे हातीं लागला, त्यानें त्यास कैद करून गिझनीस नेलें, व त्याचे डोळे काढून त्यास कैदेंत टाकलें ! पण पृथ्वीराजाचा इमानी मित्र चंदभाट त्याचे मागोमाग गिझनीस गेला. त्यानें तेथें सुलतानाचे दरबारांत प्रवेश करून घेऊन त्याची मर्जी संपादन केली व पुढें युक्तिप्रयुक्तीनें सुलतानासमक्ष पृथ्वीराजाच्या शब्द वेधित्वाची तारीफ करून हें त्याचें कौशल्य पाहण्याविषयीं सुलतानाचें मन वळविलें. अंध पृथ्वीराजास सुलतानाचे समोर आणून त्याचे हातीं धनुष्यबाण देण्यांत आले. चंदभाट तेथें होताच. त्यानें

चार बांस चौबीस गज अंगुल अष्ट प्रमाण ।
जा उपर सुलतान है मत चूके चौहाण ॥

अशी पृथ्वीराजास इशारत दिली. तीप्रमाणें पृथ्वीराजानें बाण मारून खुद्द सुलतानाचाच प्राण घेऊन आपलें अपूर्व हस्तकौशल्य दाखविलें !

तैमूरलंगाचा वंशज बाबर ह्यानें हिंदुस्थानावर स्वारी केली, तेव्हांही अशीच इतिहासाची पुनरावृत्ति झाली. बाबर स्वतः शूर सेनापती होता, त्याचे शिपाई शूर व काटक होते, आणि त्या सर्वांचें रक्तही धर्मप्रसाराचे ईर्षेनें उसळलेलें होतें. पण अशा स्थितीतही बाबरास विजयाची आशा न वाटून तो मोठ्या फिकिरींत पडला होता. कारण दिल्ली व माळवा येथील मुसलमानी राजांशीं झालेल्या १८ युद्धांत विजयी झालेल्या राणा संगाशीं त्यास लढावयाचें होतें. अशा स्थितींत युद्ध सुरू होऊन तें ऐन रंगांत आलें असतां संगराण्याच्या आघाडीस असलेला एक तुवार सरदारच बाबरास जाऊन मिळाला;

तेव्हा निरुपाय होऊन राणा संगास माघार घ्यावी लागली ! सारांश, भरतखंडावर परकीय सत्ता जरी स्थापन झाली असली, तरी त्याचें खरें कारण परकीयांनीं भरतखंड जिंकलें हें नसून, भारतीयांनींच आपली मातृभूमी स्वःच्या :हातांनीं परकीयांचे हवालीं केली हेंच होय.

प्रकरण ६ वें.

भारतीयांचा दांपत्यधर्म.

एकादा देश किंवा राष्ट्र कितपत सुधारलेलें आहे व त्याच्या संस्कृतीचा दर्जा कोणता आहे, हें निश्चित करण्याचें एक प्रमुख साधन हर्बर्ट स्पेन्सर यानें असें सांगितलें आहे कीं, त्या देशांतील अथवा राष्ट्रांतील स्त्रियांचा समाजांत कोणता दर्जा आहे व त्यांस पुरुषवर्ग कितपत मान देतो याची परीक्षा करावी, व तीवरून त्या देशाच्या व राष्ट्राच्या संस्कृतीचें स्वरूप व उच्चनीचपणा बिनचूक ठरवावा. ही कसोटी लावून पाहिली असतां प्राचीन भारतीय संस्कृति किती श्रेष्ठ दर्जाची ठरते, याचें केवल दिग्दर्शन या प्रकरणांत करावयाचें आहे. दिग्दर्शन म्हणण्याचें कारण असें कीं, हा प्रश्न फारच व्यापक आणि समाजरचना व कुटुंबसंस्था यांशीं अत्यंत निकट संबंध असलेला असा असल्यामुळें तो प्रकरणापेक्षां एकाद्या पुस्तकाचाच विषय होण्याच्या लायखीचा आहे; व म्हणूनच या प्रश्नाचें विवेचन मर्यादित व केवळ दिग्दर्शन स्वरूपाचें करणें जरूर आहे.

कोणत्याही समाजव्यवस्थेच्या मुळाशीं असलेल्या मूल कल्पनांचें स्वरूप, त्या समाजाच्या धर्मसमजुती व तत्त्वज्ञान यांच्या स्वरूपावर बऱ्याच अंशांनीं अवलंबून असतें. जगाची उत्पत्ति व नैतिक व्यवस्था यांची उपपत्ति लावतांना पुरुषतत्त्व व स्त्रीतत्त्व–पुरुष व प्रकृति–यांचा जो परस्पर संबंध तत्त्वज्ञान्यांनीं ठरविलेला असेल त्याचेंच थोडेंबहुत प्रतिबिंब त्या समाजांतील स्त्री-पुरुषांच्या वैवाहिक व सामाजिक संबंधांत पुष्कळ अंशांनीं पडत असतें. या दृष्टीनें विचार करतां असें दिसून येतें कीं, जगदुत्पत्तीची ख्रिस्ती, महंमदी वगैरे धर्मांत जी उपपत्ति दिलेली आहे तींत स्त्रीतत्त्वास–प्रकृतीस–मुळींच स्थान मिळालेलें नाहीं. अर्थात् त्या धर्मांतील परमेश्वर केवळ पुरुषतत्त्वात्मकच आहे. भारतीयांची उपपत्ति याहून फार भिन्न आहे. ब्रह्म-माया, पुरुष-प्रकृति, शिव-शक्ति या जोडींची ताटातूट आमच्या तत्त्वज्ञानांत केलेली नाहीं. हीच कल्पना पुढें अधिक वाढून सगुण ईश्वराचें ध्यान व स्मरण यांतही हें युग्मतत्त्व कायमच राहिलें आहे. शची-पुरंदर, शंकर-पार्वती, विठ्ठल-रखुमाई, सीता-राम, वगैरे जोड्यांची ताटातूट करणें

आमच्या धार्मिक मनोवृत्तीस दुःसह वाटतें. शिवशक्तींच्या देहार्धधारी–अर्धनारीनटेश्वरी–स्वरूपांत तर ही कल्पना विशेषच परिणत झाली आहे. तींत पूर्वोक्त देवतांमधलें भिन्न–देहत्वही नष्ट झालेलें आहे! 'जगाचीं जनकें' असलेल्या शिवशक्तींचें –'देवो-देवींचें'–हें अभिन्नत्व ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवाचे प्रारंभींच अत्यंत मार्मिक व मनोहर रीतीनें वर्णिलें आहे.

सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः। ज्ञातुं न शक्यते लग्नं..... ॥ आवडीचेनि वेगें। एकएकातें गिळिती आंगें ॥ २ ॥ जेणें देवें संपूर्ण देवी। जियेविण कांहीं ना गोसावी ॥ किंबहुना एको-पजीवी। एकएकाची ॥ १० ॥ जिहीं एक एकावीण। न कीजे तृणा-चेंही निर्माण ॥ जिये दोघे जीवप्राण। जियां दोघां ॥ १२ ॥ स्त्री-पुरुष नामभेदें। शिवपण एकलें नांदे ॥ १७ ॥ दो दांडी एक श्रुती। दोहीं फुलीं एक दृती ॥ दोहीं दिवीं दीसी। एकीची जेवी ॥ १८ ॥ दो ओठीं एकी गोष्टी। दो डोळां एकी दृष्टी ॥ १९ ॥ जे स्वामीचिया सत्ता-। वीण असो नेणें पतिव्रता ॥ जियेविण सर्वकर्ता। कांहीं ना जो ॥ २१ ॥ जे कीं भातारायें दिसणें। भातारूचि जियेचें असणें ॥ नेणिजतीं दोघेजणें। निवडूं जिये ॥ २२ ॥

" शिव-शिवा समरूप असलेमुळें कोणाचें अर्धांग कोणाचे अर्धांगास संलग्न झालें आहे, हेंच कळत नाहीं! एकमेकाविषयींच्या प्रेमामुळें एकमेक एकमेकांस शरीरानें गिळीतच आहेत असें वाटतें! शिवदेवामुळेंच देवीस पूर्णत्व येतें; व देवीविण शिव-गोसावीसही कांहींच महत्त्व नाहीं! किंबहुना हें जोडपें परस्परोपजीवीच आहे. यांपैकीं कोणाही एकास दुसऱ्याचे साह्यावांचून गवताची काडीही निर्माण करतां येत नाहीं व हे दोघे एकमेकांचे जीव कीं प्राण आहेत! सारांश हें एकच शिवपण नांदत असून केवळ नामभेदानें तें स्त्रीपुरुष झालें आहे! दोन टिपऱ्यांपासून निघणारा आवाज जसा एक, दोन दिव्यांचा प्रकाश जसा एक, दोन ओठांनीं उच्चारलेला शब्द जसा एक व दोन डोळ्यांची दृष्टि जशी एक, तसेंच दोघा शिवशक्तींचें अस्तित्व एकरूपच आहे! ह्या पतिव्रता स्त्रीस पतीचें अस्तित्वावांचून असणें माहीत नाहीं; व हिच्यावांचून शिवासही सर्वकर्तृत्व नाहीं. भ्रतार दिसणें हेंच तिचें दर्शन व भ्रतारचें असणें हेंच हिचें अस्तित्व. सारांश, ह्या दोघांचें एकमेकांपासून भिन्नत्व दाखवितांच येत नाहीं!" पुरुष-प्रकृति-शिव-

शक्ति-यांच्या अभिन्नतेचें वर्णन करतां करतां पतिपत्नींचीही एकता इतक्या सुंदर रीतीनें वर्णन केलेली कोणत्याही वाङ्मयांत दुर्मिळ असल्यामुळें तिची माधुरी रसिक वाचकांनीं मुळांतच मनमुराद चाखावी, अशी त्यांस शिफारस केल्यावांचून राहवत नाहीं.

ख्रिस्तीधर्मांत प्रकृतितत्त्व मानीत नाहींत हें वर सांगितलेंच आहे. परंतु मनुष्यजातींचें पहिले मातापिता आडाम-ईव्ह यांची उत्पत्ति बायबलांत अशी दिली आहे कीं, ईश्वरानें स्वतःच्या स्वरूपास अनुसरून मातीचा पुतळा तयार केला, व त्याचे शरीरांत-नाकांत-आपला श्वास भरून त्यास सजीव केलें; तोच हा आडाम-आदिम पुरुष होय. पुढें त्यास एकटें राहण्याचा कंटाळा आला, म्हणून त्यानें आपल्याच मांडीचे हाडापासून एक स्त्री निर्माण केली; व तीच ईव्ह होय. स्त्रीपुरुषभेदोत्पत्तीची आमची कल्पना याहून भिन्न आहे.

द्विधा कृत्वाऽत्मनो देहमर्धेन पुरुषोऽभवत् ।
अर्धेन नारी तस्यां स विराजमसृजत् प्रभुः ॥

मनुस्मृति, अ. १।३२.

ब्रह्मदेवानेंच स्वतःच्या शरीराचे दोन भाग करून तो एका भागानें पुरुष व दुसऱ्या भागानें स्त्री झाला; व पुरुषरूपानें त्यानेंच त्या स्त्रीचे पोटीं विराट्स्वरूपी जग निर्माण केलें, असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. 'यो भर्ता सा स्मृतांगना' (मनु. ९।४५) असेंही तत्त्व याच स्मृतींत दुसरीकडे सांगितलेलें आहे. अर्थात् ही उपपत्ति किंवा वर सांगितलेली ज्ञानेश्वरांची उपपत्ति ख्रिस्ती कल्पनेहून निःसंशय श्रेष्ठ प्रतीची आहे हें सांगावयास नकोच. पत्नी ही पतीची 'अर्धांगी' ही कल्पना ख्रिस्तीधर्मांत नसली तरी समाजांत रूढ आहे. पण त्यांनीं या 'अर्धांगीस' आणखी उत्तमत्त्वही (better half, उत्तमार्धांगी) देऊन ठेवलेलें आहे. पुरुषरूपी अर्धांगापेक्षां स्त्रीरूपी अर्धांग उत्तम, श्रेष्ठ (better) आहे, असें ख्रिस्ती लोक मानतात; अर्थात् त्यांची कल्पना श्रेष्ठ, असें सकृद्दर्शनीं वाटेल; पण तें खरें नाहीं. एका दंपतीची पतिपत्नी हीं दोन अर्धांगें म्हटल्यावर त्यांत एकापेक्षां दुसरें उत्तम म्हटल्यानें त्यांचें एकत्व नष्ट होऊन त्यांत भेदभाव अवश्यमेव उत्पन्न होतो. अर्थात् श्रेष्ठ-कनिष्ठत्व-युक्त दोन अर्धांगें या कल्पनेपेक्षां अभिन्नत्वदर्शक केवळ दोन अर्धांगें ही कल्पना व ही उपपत्ति अधिक उच्च प्रतीची आहे. दुसरें असें कीं, ख्रिस्ती समाजांत 'उत्तमार्धांगी'ची कल्पना रूढ असली तरी तींत अलंकारिकत्व आणि पोकळ

व खोटें गौरव यांचा अंश बराच आहे. ख्रिस्ती राष्ट्रांतल्या पतिपत्नीसंबंधाचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास असें दिसून येईल कीं, धर्मार्थकाम या तीन पुरुषार्थांचे दृष्टीनें एकट्या कामाचे बाबतींत त्यांचें बरेंच ऐक्य असतें. पण धर्म (यास religion म्हणा कीं duty म्हणा) व अर्थ या बाबतींत त्यांचें थोड्याशा सहकार्यानें युक्त असें भिन्नत्वच असतें. भारतीयांमध्यें याच्या उलट प्रकार आहे.

' धर्मे चार्थे च कामे च नातिचरामि नातिचरामि नातिचरामि । '

असें अभिवचन पति विवाहसमयीं वधूस त्रिवार देतो. यांतही आणखी विशिष्टपणा असा आहे कीं, अर्थ व काम यांस गौणत्व देऊन पत्नीस तो ' सहधर्मचारिणी ' चें पद देतो. या पदाचा संपूर्ण अर्थ व्यक्त करणारा एकही शब्द ख्रिस्ती लोकांच्या भाषांत नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आर्यपद्धतीप्रमाणें ख्रिस्ती विवाहविधींतही वधूचा पिता कन्यादान करीत असतो. पण हा दानविधि तो एकटाच करतो, त्यांत वधूच्या मातेस मुळींच स्थान नसतें. पण आमच्याकडे कोणताही धार्मिक विधि सपत्नीक व्हावा लागतो, हीही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ख्रिस्ती विवाहविधींत वधूवर एकमेकांस अभिवचनें देऊन प्रतिज्ञापूर्वक शपथक्रिया करतात; अर्थात् या विधीस एक प्रकारच्या करारांचें स्वरूप आहे. आर्यांविवाहविधींत वधू कांहींच वचन देत नाहीं किंवा शपथक्रियाही करीत नाहीं; पण वर मात्र वधूस आत्मसमाविष्ट करतांना अग्निसाक्षिक प्रतिज्ञापूर्वक अभिवचनें देतो.

पुरुषप्रकृति-तत्त्वोपपत्तिसंबंधाच्या वरील भिन्न कल्पनांचे परिणाम भारतीय व पाश्चात्य यांच्या विवाहपद्धतींत व वैवाहिक स्थितींतल्या पतिपत्नींच्या परस्परसंबंधांत याहूनही अन्य रीतींनीं दृग्गोचर होतात. पाश्चात्य पद्धतींत व भारतीय पद्धतींत पहिला मोठा व ठळक भेद हा दिसतो कीं, तिकडे प्रत्येक स्त्रीचें लग्न झालेंच पाहिजे असा निर्बंध नाहीं; पण तेथें इकडे मात्र आहे. दोनही पद्धतींमधील यावांचून इतर भेद म्हटले म्हणजे पाश्चात्यांत वधूवर बरेच प्रौढ असून पुरुषास स्त्रीच्या व स्त्रीस पुरुषाच्या सहवासाची प्रबळ इच्छा-कामवासना-उत्पन्न झाल्यानंतरच वधूवरशोधन सुरू होतें; व त्या वरवधूशोधनाची मुख्य जबाबदारी सर्वांशीं त्यांचेवरच असते. आणि पुढें हा वैवाहिकसंबंध एकाही हितावह किंवा सुखावह न झाल्यास हा संबंध तोडून परस्परांस पुनः नवीन संबंधही करतां येतो. भारतीयांत कामवासनेचा प्रादुर्भाव होण्यापूर्वीच बहुधा वधूवरशोधन चालू होतें; पसंतीची जबाबदारी वधूवरांवर मुळींच नसते; आणि घडलेला विवाहसंबंध

आमरणांत पाळावयाचा, असें उच्च ध्येय डोळ्यापुढें ठेवलेलें असतें.* या दोनही पद्धतींतल्या वर सांगितलेल्या विशेषांचें याहून अधिक व्यापक व सूक्ष्म दृष्टीनें परीक्षण केल्यास् त्यांचें अंतःस्वरूप व मूल-तत्त्वें वाचकांचे लक्षांत येतील. स्थूलदृष्टीनें पाहणारासही असें दिसून येईल कीं, पाश्चात्य विवाह ते लोक कराराच्या स्वरूपाचे मानीत असून भारतीय पद्धतीचा विवाह जवळ जवळ ईश्वरघटित किंवा सृष्टिकर्तृकच आहे अशी आमची सर्वसामान्य समजूत आहे. उत्पत्ति व वाढ हीं सृष्टीचीं मुख्य व महत्त्वाचीं कार्यें असून त्यांचे दृष्टीनें स्त्रीपुरुषांची अविवाहित स्थिति सृष्टिक्रमाविरुद्ध आहे, तो सृष्टीदेवतेचा गुन्हा आहे, तें एक प्रकारचें पातक आहे, अशी आमची समजूत असल्यामुळें प्रत्येक स्त्रीचा विवाह अवश्यमेव झालाच पाहिजे, असा आमचेमध्यें निर्बंध आहे. विवाह हा एक महत्त्वाचा धर्मसंस्कार असून तो झाल्यावांचून स्त्रीपुरुषांस आमचे समाजव्यवस्थेंत नियमित व मान्य असें स्थान मिळत नाहीं.

वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
पतिसेवा गुरौ वासो गृहार्थेऽग्निपरिक्रिया ॥ मनु. २।६७

या मनुवचनांत सांगितल्याप्रमाणें स्त्रियांचे इतर संस्कार पौराणिक असले तरी मुख्य विवाहसंस्कार वैदिकच असतो; आणि पुरुषांस उपनयनानंतर अध्ययनार्थ गुरुगृहवास व गृहस्थाश्रम स्वीकारानंतर अग्निसेवा हीं जशीं कर्तव्यें असतात, तसेंच विवाह हेंच स्त्रियांचें उपनयन असून पतिसेवा हाच त्यांचा गुरुगृहवास व गृहकृत्यें हींच त्यांची अग्निसेवा होय. ब्राम्हणादि वर्णांत ८ ते १२ पर्यंतच्या वयांतच स्त्रियांचे विवाह कां होतात, याचें हें सर्वांत जुनें व मुख्य कारण आहे, ही गोष्ट बालविवाहावर हल्ला करणारे पुष्कळ लोक विसरतात.

---

*हिंदुस्थानांतील कनिष्ठ वर्गांत काडी मोडण्याचे व पाटाचे प्रकार सांप्रत सरसहा चालू आहेत. पूर्वी ही काडीमोड व पाट जातीचे संमतीशिवाय होत नसत. सांप्रतच्या व्यक्तिस्वातंत्र्याचे काळांत, हेंही बंधन उरलेलें नाही. पण या दोनही पद्धती हिंदुधर्मशास्त्राचें ध्येय व एकंदर धोरण यांचे विरुद्ध आहेत. वरिष्ठ जातींत मुद्दाम घुसडला जाणारा पुनर्विवाह हाही याच कोटीत येतो. मनुस्मृतींत नियोग व विधवावेदन (पुनर्विवाह) हीं दोनही सारख्या योग्यतेचीं मानलीं असून 'अयं द्विजैर्हि विद्वद्भिः पशुधर्मो विगर्हितः' (मनु. अ. ९।६६) अशी त्याची निंदा केली आहे. आणि विवाहमंत्रांत व विवाहविधींत नियोग व विधवावेदन मुळींच सांगितलेलें नाहीं, असें याचे मागल्या श्लोकांत स्पष्ट म्हटले आहे. ' न द्वितीयश्च साध्वीनां क्वचिद् भर्तोपदिश्यते । ' असेंही स्पष्ट वचन (अ. ५ १६) आहे.

त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीं ।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीदति सत्वरः ॥

या श्लोकांत (अ. ९।९४) मनूनें पुरुषाचा विवाहकाल जरी २४ ते ३० सांगितला आहे, तरी स्त्रियांचा विवाहकाल ८ ते १२ हाच प्रशस्त व ग्राह्य म्हणून नमूद केला आहे, याचें तरी वीज वरील कल्पनेंतच आहे. सारांश, आमच्यांत विवाह हा एक महत्त्वाचा व अवश्य असा धर्मसंस्कारच मानला आहे. तसेंच ह्या संस्कारांत वधूवरांची इच्छा किंवा पसंती पाहण्याचीही आमची वहिवाट नाहीं. याचें एक कारण असें कीं,

देवदत्तां पतिर्भार्यां विंदते नेच्छयाऽत्मनः । अ. ९।९५

पुरुषास त्याच्या इच्छेप्रमाणें नव्हे तर देवानें दिलेलीच भार्या मिळत असते, अर्थात् स्त्रीसही देवदत्तच पति मिळत असतो, अशी आमची पूर्वापार समजूत आहे व म्हणूनच

यस्मै दद्यात्पितात्वेनां भ्राता चानुमते पितुः ।
तं शुश्रूषेत जीवंतं संस्थितं च न लंघयेत् ॥

या श्लोकांत (मनु. अ. ५।१५१) पिता किंवा त्याच्या संमतीनें भ्राता आपणास ज्या पुरुषास देईल, तो जिवंत असेपर्यंत त्याची सेवा स्त्रीनें करावी, येवढेंच नव्हे तर तो मृत्यु पावल्यावरही पतिव्रताधर्माचें उल्लंघन करूं नये, अशी आज्ञा केली आहे. विवाहाचे बाबतींत वधूवरांची इच्छा किंवा पसंती यांस प्राधान्य न देण्याचें दुसरें कारण असें कीं, ही जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडण्यास ते अपात्र असतात, अशी आमची रूढ समजूत आहे. वधूवर निवडण्याचें काम त्यांचे पसंतीवरच सोंपवावयाचें म्हणजे तीं अर्थात् बरींच तरुण पाहिजेत. पण अंतःस्वरूपापेक्षां बाह्य स्वरूपाचे मोहास त्वरित भुलण्याचें हें वय असल्यामुळें वधूवरांकडून वास्तविक एकमेकांच्या अंतःस्वरूपाचें बहुधा नीट परीक्षण होत नाहीं; तीं एकमेकांच्या सौंदर्यादि बाह्य किंवा तात्पुरत्या अगर उसन्या अथवा कृत्रिम गुणांस लुब्ध होतात, व स्त्रीपुरुषांच्या या नैसर्गिक आकर्षणशक्तीस—एक प्रकारच्या कामवासनेस—प्रेम मानून विवाहानें बद्ध होतात; पण मग वैवाहिक स्थितींत अंतःस्वरूपें प्रगट झाल्यावर पश्चात्ताप पावून संसार दुःखांत कंठतात किंवा विवाहबंधनें तोडून टाकतात. पाश्चात्य व भारतीय समाज यांचें लक्षपूर्वक अवलोकन करणारे लोक अशी प्रत्यक्ष विवाही देतात कीं, पाश्चात्यांपेक्षां भारतीय समाजांत एकंदरीनें गृहसौख्याचें प्रमाण जास्त असतें व त्या सौख्यांत टिकाऊपणाही अधिक असतो. वधूवरांची पसंती त्यांचे त्यांचेवर सोंपविल्यामुळें एकमेकांचे स्वभावगुण पाहूनच केलेला व म्हणून प्रेमजन्य मानलेला हा

विवाहसंबंध वास्तविक कधींही न तुटणारा आणि कायमचा हितावह व सुखावह व्हाव-वयास नको काय ? पण पाश्चात्यांत पुष्कळ उदाहरणांत तसा तो होत नाहीं; असल्या-संबंधांत हनीमूनची आठवण घुजते न घुजते तोंच थोडीफार धुसपूस सुरू होते, व ती विकोपास गेल्यास विवाहसंबंधही तोडण्यांत येतो. पाश्चात्य समाजांत हल्लीं फार बोका-ळलेल्या व दिवसेंदिवस कायद्यानें अधिक सुलभ केल्या जाणाऱ्या घटस्फोटास वस्तुतः ख्रिस्तीधर्माचा आधार नाहीं. त्यांच्या विवाहांतील शपथविधींत (I will love, cherish and obey you till death do us part) 'मृत्यु आपली ताटातूट करीपर्यंत मी तुम्हाशीं प्रेमानें, एकनिष्ठेनें व आज्ञाधारकतेनें वागेन' अशी शपथ वधू घेते; व obey हा शब्द वगळून बाकीच्या शब्दांचा उच्चार वरही करतो. अर्थात् ख्रिस्तीधर्म एकाच्या मरणोत्तर दुसऱ्यास पुनर्विवाह करण्याची परवानगी देतो; पण एकमे-कांचे हयातींत घटस्फोट करणें व द्वितीय संबंध करणें ही गोष्ट त्यास मान्य नाहीं, हें स्पष्ट दिसतें. पण ख्रिस्ती राष्ट्रांतील बहुतेक व्यक्तींनीं, धर्म ही एक केवळ विश्वासाची बाब असून त्याचा आचरणाशीं संबंध नाहीं, असेंच जणूं काय ठरविल्याचें त्यांचे इतर बाबतींतील वर्तनावरून दिसून येत असतें, तोच प्रकार याही गोष्टींत झालेला आहे. वधू-वराची निवड करण्याचें काम ज्याचें त्याजवरच सोपवून जो होईल तोच विवाह अधिक सुखावह व हितावह होणार, असें म्हणणारे लोक किती तरी गोष्टी गृहीत धरीत असतात. १ प्रत्येक तरुण स्त्री व तरुण पुरुष दुसऱ्याचें स्वभावपरीक्षण करण्यांत तरबेज व गुणज्ञ असतात. २ ते हें काम निर्विकार मनानें व जबाबदारीनें करूं शकतात. ३ प्रत्येक तरुण स्त्रीपुरुष आपापले स्वभाव व अंतःस्वरूप गळ्यांतील दागिन्याप्रमाणें किंवा अस्तनीच्या बटनाप्रमाणें सर्वांस दिसेल अशा रीतीनें दाखवीत असतो. ४ कामवासना व प्रेम यांतील भेद जाणण्याइतकी निर्विकार मनःस्थिति त्यांची त्या वेळीं असते. ५ आणि कोर्टशिपचे—प्रेमाकर्षणाचे—वेळीं दिसलेले स्वभावगुण हे वज्रलेप असून यांत पालट केव्हांही होत नाहीं ! शेंकडा ८० उदाहरणांत असंभवनीय असलेल्या या गोष्टी शक्य झाल्या तर मात्र प्रौढ वधूवरांचा परस्पर पसंतीनें होणारा विवाह सुखावह व हितावह होण्यासारखा आहे. यापेक्षां " आदौ कुलं परीक्षेत ततो विद्यां ततो धनं । " ही वधूवरांचे पालकांस केलेली आमच्या धर्मशास्त्राची आज्ञा किती तरी जास्त समंजसपणाची व हितावह आहे ! वधू-पसंतीची जबाबदारी त्यांचेवर न टाकण्याचें तिसरें कारण असें कीं, स्त्रीविषयक शुद्धते-बद्दल आमची कल्पना अधिक सक्त व सूक्ष्म दृष्टीची आहे. ' कर्मणा ' च नव्हे तर ' मनर

वाचा 'ही स्त्रीचा व्यभिचार होतां कामा नये, असें आमचें श्रेष्ठ ध्येय आहे; व या ध्येयास अनुसरूनच स्त्रीची कामवासना एकपुरुषसंबद्धच असणें आवश्यक आहे. ही एकपुरुषसंबद्धता साध्य होण्यास कामवासना-प्रादुर्भावाचें वय येण्यापूर्वीच कामवासनेचा विषय जो पति तो विवाहानें निश्चित करून ठेवला पाहिजे; किंवा प्रौढ विवाहाची चाल असल्यास निवडीचें काम वधूवरांवर सोंपवावयाचें नाहीं, एवढेंच नव्हे तर विवाहापर्यंत वधूचें मन कामवासनेचे बाबतींत अगदीं निर्विकार राहील, अशी तजवीज तरी केली पाहिजे, असा आमच्या समाजाचा कटाक्ष आहे. हिंदुस्थानांत हे दोनही प्रकार आढळतात. उत्तर हिंदुस्थानांत प्रौढविवाह अधिक प्रचलित आहे, तर तेथें गोषाही आहे; दक्षिणेंत बालविवाह ज्यास्त प्रचलित आहे, व म्हणूनच तेथें गोषाची फारशी आवश्यकता नाहीं. आतां बालविवाहामुळें अकालसंभोगाचा संभव ब बालविधवांचा वर्ग उत्पन्न होणें हे सामाजिक दोष उत्पन्न होतात, हें कबूल केलें पाहिजे. पण कोणतीही विवाहपद्धति घेतली तरी ती सर्वस्वीं निर्दोष अशी कधींच असत नाहीं व असणें शक्यही नाहीं. बालविवाहानें बालविधवांचा वर्ग जसा निर्माण होतो तसा प्रौढ विवाहानें वृद्धकन्यांचा वर्ग उत्पन्न होतोच होतो. विवाहबद्ध स्त्रीपुरुषांस परस्पर सहवासापासून जें अवर्णनीय सुख होतें त्यास मुकणें, या दृष्टीनें आमच्या बालविधवा व पाश्चात्यांच्या वृद्धकन्या सारख्याच दुर्दैवी आहेत.बालविवाहांत अकालसंभोगाचा संभव आहे, तर प्रौढाविवाहांत-विशेषतः वधूवरांच्या स्वतःच्या निवडीनें होणाऱ्या विवाहांत–कामवासनेची म्हणा प्रेमोद्भवाची म्हणा, एकपुरुषनिबद्धता कायम रहात नाहीं. मनोभूमींत वरचेवर प्रेमांकुर उद्भवावे, व ते कांहीं कारणानें विवाहरूपानें सफल न झाले तर ते निर्दयपणानें उपटून टाकावे आणि पुनः प्रेमांकुर उत्पन्न होण्यास मनोभूमि तयार ठेवावी, असें अनेकदां करण्यांत विशेषतः तरुण स्त्रीहृदयांस किती दुःख होतें व एकंदरीनें त्यांच्या मनोवृत्तींची नैतिक धार किती बोथट होतें, याची कटु अनुभव सुदैवानें भारतीयांतील स्त्रियांस येत नाहीं; त्याचा भयंकरपणा पाहण्यास पाश्चात्यांतील वृद्धकन्यांच्याच हृदयांचा ठाव घेतला पाहिजे. कामवासनेचे किंवा प्रेमोद्भवाचे असले अपायकारक खेळ तरुण स्त्रीपुरुषांस खेळूं देण्यापेक्षां अकालसंभोगाचा संभव शतपट बरा, असें आमचे लोकांस नैतिकदृष्टीनें वाटत असतें. आम्हांत प्रत्येक स्त्रीस विवाहाची एक तरी संधी अवश्य मिळेल, अशी तजवीज असते. पाश्चात्य-विवाहपद्धतींत पुष्कळ स्त्रियांस इच्छा असूनही एकदां सुद्धां वैवाहिक सुख अनुभविण्याची संधी मिळत नाहीं.

वधूवरांच्या स्वतःच्या पसंतीनें होणाऱ्या पाश्चात्य विवाहपद्धतीचा दुसरा ठळक दोष म्हटला म्हणजे त्यांतील प्रेम निरपेक्ष नसतें, आणि त्यास सात्विक व कर्तव्याचें स्वरूप बहुधा नसतें. ह्यांतील प्रेम बहुधा सौंदर्यादि बाह्य किंवा स्वभावादि अंतर्गत गुणांमुळें उद्भवतें. अर्थात् हें प्रेम निरपेक्ष नसून विवाहानंतर सदरहू गुणांत कमतरता उत्पन्न झाल्यास किंवा या गुणांत अधिक असे स्त्रीपुरुष एकमेकांस भेटल्यास आणि विवाहबंधन तोडण्याची शक्यता असल्यास तें प्रेम डळमळावयास लागण्याचा फार संभव असतो. पण पालकांनीं घडवून आणलेल्या विवाहांतील–विशेषतः बालविवाहांतील–प्रेम गुणनिरपेक्ष, कामवासनानिरपेक्ष व सात्त्विककर्तव्यस्वरूपी असतें. या दोन विवाहपद्धतींतील भेद थोडक्यांत असा सांगतां येईल कीं, पाश्चात्यांत वधूवरांचें प्रेम एकमेकांवर वसतें म्हणून ते विवाह करतात; आणि आमचेकडे वधूवर विवाहानिबद्ध होतात म्हणूनच ते एकमेकांवर कर्तव्यबुद्धीनें प्रेम करीत असतात. आई, बाप, मुलें, भाऊ, बहिणी यांचीं एकमेकांवरील प्रेमें अशींच गुणनिरपेक्ष असतात. आई मुलावर प्रेम करते त्याचें कारण तें तिचें मूल आहे या पलीकडे कांहींच नसतें. पाश्चात्य तरुणीस 'तुझें आपल्या पतीवर प्रेम कां जडलें?' असा प्रश्न केल्यास (He was so Kind, so generous &) अशा प्रकारचें कांहीं तरी उत्तर ती देईल. पण तोच प्रश्न कुलीन हिंदु विवाहित स्त्रीस विचारून पाहिल्यास 'हें काय तुमचें विचारणें ?' येवढेंच उत्तर ती त्याला देईल. त्या उत्तराचा अर्थ असा कीं, 'पतीवर प्रेम हें केलेंच पाहिजे व तें प्रेम असावयाचेंच; तसें विचारण्याचें कारणच नाहीं.' आमच्या समाजांत क्वचित् पतिपत्नींचें प्रेम एकमेकांवर बसलें नाहीं; तरी विवाहित धर्मपत्नी या नात्याचें तिचे हक्क नवऱ्यास नष्ट करतां येत नाहींत; किंबहुना व्यभिचारादि दोषानें स्त्रिया पतित झाल्या तरी 'वस्त्रान्नपानं देयं तु वसेयुश्च गृहांतिके' त्यांस आपल्या घराजवळच ठेवून त्यांच्या अन्नवस्त्राची तजवीज करावी, अशी आमच्या धर्मशास्त्राची आज्ञा ('मनु'. अ. ११।१८८) आहे. पण पाश्चात्यांत पतिपत्नींचें परस्परप्रेम नष्ट झालें कीं, सगळ्याच संसाराची राखरांगोळी होऊन त्यांत गृहसौख्याची पूर्णाहुति पडते. आयर्लंडचे सुप्रसिद्ध पुढारी पार्नेल यांचें जें एक चरित्र त्यांच्या पुनरूढा पत्नीनें प्रसिद्ध केलें आहे, त्यांत हा दोष ठळकपणें नजरेस येतो. या बाईंचें पूर्वीचें नांव मिसेस ओशी असें असून ही पार्नेलचे जिवलग मित्र कॅप्टन ओशी यांची बायको होती. उभयतां पतिपत्नींचें प्रेम कांहीं कारणामुळें लोपूं लागलें, व याच वेळीं मिसेस ओशी व पार्नेल यांचें प्रेम

परस्परावर जडलें. उभयतांचा हा गुप्त प्रेमसंबंध दहा वर्षें सारखा चालला होता ! पार्नेल साहेब पार्लमेंटमधील होमरूलची प्रचंड लढाई लढून रोज रात्रीं ओशीबाईचे घरींच निजावयास जात ! या संबंधापासून त्यांस एक अपत्यही झालें ! ही सर्व हकीकत याच बाईनें या चरित्रांत सविस्तर दिली आहे; येवढेंच नव्हे, तर कॅप्टन ओशीचें व माझें परस्पर प्रेम नष्ट झाल्यामुळें असल्या प्रेमशून्य विवाहाच्या बंधनानें मी किंवा पार्नेल बांधलेले नव्हतों व म्हणूनच हा विवाहशून्य पण खराखुरा प्रेमसंबंध ठेवण्यास आम्हांस मोकळीक आहे, असें आम्हीं ठरविलें, अशा आशयाचें समर्थनही या बाईनें केलें आहे !

बालविवाह आणि विवाहाचे बाबतींत वधूवरांचे इच्छेचा किंवा पसंतीचा संबंध येऊं न देणें, या पद्धतीविरुद्ध पाश्चात्यांच्या उष्ट्या व उसन्या विचारांवर पुष्ट झालेल्यांचा असा आक्षेप येत असतो कीं, विवाहविधीचें महत्त्व व वैवाहिक स्थितीची जबाबदारी ज्यांना कळत नाहीं, किंवहुना नवरा म्हणजे काय व बायको म्हणजे काय ह्याची अस्पष्ट जाणीवही ज्यांस नाहीं, अशा अर्भकांस विवाहबंधनानें बद्ध करणें हा अन्याय आहे; आणि जन्माच्या गांठी ज्या विवाहानें पडावयाच्या त्या बाबतींत खुद्द त्यांचाच विचार न घेणें किंवा ही बाब त्यांचेच पसंतीवर न सोपविणें हा जुलूम आहे, असें या लोकांचें म्हणणें असतें. पण हा आक्षेप घेणारे लोक 'विवाह हा एक करार आहे' ही गोष्ट गृहीत धरून चालतात; पण ही गोष्ट भारतीय समाजव्यवस्था मुळींच मान्य करीत नाहीं, हें मात्र ते विसरतात. त्यांची अशी समजूत झालेली असते कीं, विवाह म्हणजे एक प्रकारची व्यावहारिक Partnership (भागीदारी) आहे. अर्थात् ह्या भागीदारीची जबाबदारी शिरावर घेणारे उभयतां भागीदार सज्ञान पाहिजेत, ती जबाबदारी त्यांनीं स्वखुषीनें व पसंतीनें स्वीकारली पाहिजे, त्या भागीदारीला शर्ती पाहिजेत, व शर्ती मोडल्यास भागीदारी बंद झाली पाहिजे, असें त्याचें म्हणणें ! पण आमचा समाज विधवाविधि हा एक धर्मसंस्कार आहे असें मानतो, तो एक भागीदारीचा व्यवहार आहे असें मानीत नाहीं. अर्थात् त्यांचे हे सर्व आक्षेप आमच्या विवाहविधीस गैरलागू आहेत. दुसरें असें कीं, संसारांत व्यक्तिव्यक्तीचे जे निकटचे संबंध जडतात, त्यांपैकीं एकासही सज्ञानावस्थेची किंवा परस्पर पसंतीची गरज लागत नाहीं. या संबंधांत त्यापैकीं एक किंवा दोनही व्यक्ति अज्ञानावस्थेंत असतांनाच हे संबंध जडतात. पतिपत्नीसंबंधाच्या जोडीस बसविण्यासारखे इतर निकट संबंध म्हटले म्हणचे आईबाप व मुलें आणि भाऊ व बहिणी ह्यांचे होत. हे संबंध जडण्याचे वेळीं उभय पक्ष सज्ञान

नसतात, या संबंधाची जबाबदारी त्यांस कळत नाहीं, व हे संबंध जडविण्यापूर्वी उभय-पक्षांची पसंती घेणें हेंही अशक्य असतें. असें असूनही हे संबंध जडणें म्हणजे अन्याय आहे व जुलूम आहे, असें ज्वलज्जहाल सुधारकही मानीत नाहींत ! आईबाप व मुलें आणि भाऊबहिणी यांचे संबंध अधिक नैसर्गिक असल्यामुळें त्यांचा न्याय पतिपत्नीसंबंधास लावतां येत नाहीं, असें कोणी म्हणतील. पण स्त्री-पुरुष-संयोग विवाहानें निर्बंधित होणें हाच कुटुंबसंस्थेचा व सुव्यवस्थित समाजसंस्थेचा पाया आहे. हा पाया जेथें नसेल तेथें कुटुंबसंस्थाच अस्तित्वांत येत नाहीं; व कुटुंबसंस्था नसेल तर आईबाप, मुलें, भाऊ, बहीण ह्या नैसर्गिक संबंधास सामाजिक महत्त्वही येत नाहीं. म्हणूनच पतिपत्नीसंबंध वरील संबंधाइतकाच किंबहुना त्याहूनही जास्त सात्विक व केवळ कर्तव्यमूलक आहे, निदान तसा तो असला पाहिजे; तरच संसार खरा हितावह व सुखावह होईल, अशी आमची समजूत आहे, व म्हणूनच आमची विवाहपद्धति तदनुरूप बनली आहे.

परस्पर पसंतीनेंच होणाऱ्या विवाहपद्धतीचा नैतिक व सामाजिक दृष्टीनें फार अनिष्ट असा आणखी एक परिणाम होत असतो. तो हा कीं, पुष्कळ स्त्रीपुरुषांस आजन्म अविवाहित स्थितींत दिवस कंठावे लागतात. कामवासना व कामव्यवहार विवाहानें नियमित व एकव्यक्तिनिबद्ध होणें हें पुरुषांपेक्षांही स्त्रियांच्या नैतिक हिताचे दृष्टीनें अधिक आवश्यक आहे. विवाहनिर्बंधरहित असा कामव्यवहार–व्यभिचार–हा पापपुण्याचे दृष्टीनें पुरुषास व स्त्रीस सारखाच त्याज्य व पातकावह आहे.

न हीदृशमनायुष्यं लोके किंचन विद्यते ।
यादृशं पुरुषस्येह परदारोपसेवनं ॥

मनु. अ. ४।१३४

परदारागमनाइतकें पुरुषाची आयुष्यहानि करणारें कांहींच नाहीं, या शास्त्रवचनाचा हाच इत्यर्थ आहे. पण या व्यवहाराकडे केवळ सामाजिक दृष्टीनें पाहिल्यास तो पुरुषापेक्षां स्त्रीचीच नैतिक हानि अधिक करतो. स्वैर कामव्यवहार करून पुरुष मोकळा होतो व त्या पातकी व्यवहाराचें दृश्यचिन्ह त्याजपाशीं कांहींच राहत नाहीं; पण या पापी व्यवहाराचें स्पष्ट चिन्ह गर्भरूपानें स्त्रीजवळ राहून तिच्या बेअब्रूची टिमकी सर्व समाजांत वाजते. असें होण्यास सृष्टीची घटनाच–तिला अन्यायाची म्हणा पाहिजे तर–कारणीभूत होत असते. याकरतां या बाबतींत पुरुषापेक्षां स्त्रियांस अधिक जपणें जरूर आहे. हीच गोष्ट लक्षांत घेऊन आम्हामध्यें प्रत्येक पुरुषाचें लग्न झालेंच पाहिजे, यापेक्षां प्रत्येक स्त्रीचा विवाह

झालाच पाहिजे, असा कटाक्ष विशेष ठेवलेला आहे, व तो याच दृष्टीनें हितावह आहे असा कटाक्ष ज्या समाजांत नाहीं, तेथें अविवाहित वृद्धकन्यांचा मोठा वर्ग निर्माण होतो; त्यांस उदरपोषणार्थ परस्परांशीं व पुरुषांशीं भयंकर चढाओढ करावी लागते; या चढाओढींत त्यांची शारीरिक, मानसिक व नैतिक अधोगति-निदान हानि–होते; आणि विनवारशी व वेकायदा संततीचाही वर्ग-सामाजिक ढिलेपणाचें एक जिवंत स्मारक म्हणून–समाजांत कायमचा घुसून बसतो ! पाश्चात्य सामाजांतील विचारी पुरुषांस ही स्थिति स्पृहणीय वाटत नाहीं;व म्हणूनच ' इंग्लंडांतील अविवाहित स्त्रियांपैकीं शें.५०,विधवांतील शें. ३० व विवाहित स्त्रियांतील शे. १० स्त्रियांस स्वोदरपोषणार्थ शारीरिक व मानसिक कष्ट करावे लागतात ' असा हिशेब **लॉर्ड कोर्टने** यांनीं प्रसिद्ध करून स्त्रियांच्या या दुःस्थितीबद्दल कळवळा व्यक्त केला आहे ! परस्परपसंतीनें होणारा प्रौढविवाह सुधारकांचे इच्छेप्रमाणें आमच्या समाजांत जारीनें सुरू झाल्यास येथेंही हीच नैतिक व सामाजिक संकटें ओढवल्यावांचून राहणार नाहींत. सालीना ४।५ हजार रु. प्राप्ति असणारे बॅरिस्टर, वकील, प्रोफेसर किंवा सरकारी नोकरच जोंपर्यंत परस्पर पसंतीच्या विवाहाचा खेळ आपल्या तरुण मुलांमुलींकडून खेळवीत आहेत, तोंपर्यंत त्यांच्या अविवाहित प्रौढ कन्यांवर हा प्रसंग येणार नाहीं. पण ही सुधारणा मध्यम वर्गांत त्यांचे इच्छेप्रमाणें दुर्दैवानें शिरल्यास इंग्लंडांतील परिस्थितीची घातक पुनरावृत्ति इकडेही झाल्यावांचून राहणार नाहीं !

पुरुष-प्रकृतींच्या परस्परसंबंधाविषयींच्या आमच्यांतील तात्विक व धार्मिक उपपत्तीचा आमच्या विवाहपद्धतीवर कोणता इष्ट परिणाम झाला, याचें विवेचन येथपर्यंत केलें. आतां या उपपत्तीचा आमच्यांतील पतिपत्नींच्या परस्परसंबंधावर काय परिणाम झाला हें पहावयाचें आहे. नवरा-बायको, पति-पत्नी असे निकटसंबंधदर्शक शब्द इतर भाषांप्रमाणें आमच्याही भाषांत आहेत. इंग्रजींतल्या ' Couple ' प्रमाणें आम्हांतही ' जोडपें ' हा शब्द आहे. पण पतिपत्नींचें सांसारिक व अध्यात्मिक अभिन्नत्व दर्शविणाऱ्या ' दंपती ' शब्दासारखा किंवा इंग्रजींतल्या family व wife या दोन्ही अर्थांचें एकीकरण करणाऱ्या मराठी ' कुटुंब ' शब्दासारखा शब्द मात्र इतर भाषांत असलेला दिसून येत नाहीं. पाश्चात्यांत Home ची–स्वगृहाची–"Home Home, Sweet Home, There is no Place like Home," अशी स्तुति कवि गात असतात. पण आम्ही या 'मधुर स्वगृहा'ची व त्या गृहाच्या देवतेची-गृहिणीचीही–एकाच श्लोकांत मोजक्या पण खोल अर्थाच्या शब्दांनीं अशी स्तुति करतों कीं–

न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।
गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते ॥

शहाणे लोक 'गृहाला गृह न म्हणतां गृहिणीलाच गृह म्हणतात; कारण गृहिणी नसलेलें गृह अरण्याहूनही भयंकर असतें.' गृहिणीचें व गृहस्थाश्रमाचें माहात्म्य वर्णन करणारीं अशीं किती तरी सुभाषितें आमच्यांत असून ' धन्यो गृहस्थाश्रमः ' असा आम्हीं सिद्धांतच काढलेला आहे ! सारांश, पाश्चात्यांत पतिपत्नींचा जीवितक्रम एकमेकांसन्निध पण भिन्नपणें एकाच दिशेकडे जाणाऱ्या समांतर रेषांसारखा असतो. या रेषा एकमेकांस फारशा भिडत नाहींत, प्रसंगीं त्या एकमेकांस छेदूनही भलत्या दिशांकडे जातात. पण आम्हांत पतिपत्नींचा जीवितक्रम असा आहे कीं, भिन्न दिशेनें येणाऱ्या दोन रेषा एकदां एकमेकांस येऊन मिळाल्या म्हणजे त्या एकरूपानेंच एकाच दिशेस बहुधा सतत जात राहतात. पाश्चात्यांत पतिपत्नीचें नातें भिन्नत्वयुक्त समानतेचें असतें असें म्हटलें, तर आम्हांतील हे नातें भिन्नत्व नष्ट करून समानतेच्या पलीकडेच जें एकत्व तें संपादन करतें !

पण असलें हें श्रेष्ठ नातेंही समतेच्या खोट्या कल्पनेच्या नादीं लागलेल्या आमच्यांतील कांहीं सुशिक्षितांस आवडत नाहीं. ' स्त्रियांची परवशता ' या मिलच्या ग्रंथांतील सगळीं प्रमाणें उसनीं आणून तीं ते आमच्या पतिपत्नीसंबंधाविषयींच्या कल्पनांवर फेकीत असतात ! पण मिलच्या या ग्रंथांतील तत्वज्ञान तिकडे आतां जुनेंपुराणें झालें असून तें अमलांत आणल्यानें स्त्रीसुधारणेचा व अबलोन्नतीचा प्रश्न सुटलेला नाहीं; तर विवाहबंधनाचा कंटाळा, विवाहितांचा संततीसंबंधाचा कंटाळा आणि लोकसंख्या हटत जाणें वगैरे अनेक अधिकच भानगडीचे, बिकट व नाजुक असे नवेनवे प्रश्न उपस्थित होऊं लागले आहेत. साहेब लोकांचें जुनें फर्नीचर व जुने कपडे सेकंड हँड किंवा लिलावांत खरेदी करून त्यांनीं आपलीं घरें व शरीरें शृंगारणारे जसे लोक आमच्यांत आहेत, त्याचप्रमाणें इंग्लंडांत जुनीं पुराणीं झालेलीं व सत्यतेबद्दल संशय उत्पन्न झालेलीं मतें आमच्यांतील आळशी, निरीक्षणशून्य व स्वाभिमानशून्य मंडळी आयतीं उचलून आणून हिंदुसमाजावर त्यांचें अस्त्रक्षेपण करावयास लागतात ! पण उसन्या जिन्सांवर आपली मालकी कधींच स्थापन होत नाहीं, ते केव्हांना केव्हां खऱ्या मालकास परत करावे लागतात; व पुरतें कह्यांत न आलेलें अस्त्र तें सोडणारावरच उलटत असतें, हें या मंडळींनीं लक्षांत ठेवावें. " आम्ही आमच्या स्त्रियांस अज्ञानांत ठेवतों, त्यांस समान मानीत नाहीं, त्यांस गुलामाप्रमाणें किंवा जनावरासारखें लेखतों; त्यांना आम्ही कसलेंही

स्वातंत्र्य न देतां कायमच्या पारतंत्र्यांत व गोषांत कोंडून ठेवतों. " इ. इ. आमच्यांतील दांपत्यधर्मावर या मंडळीचे आक्षेप असतात. परक्या घराण्यांतील कन्या पतिगृहीं येऊन तेथील संसाराशीं व पतीशीं एकरूप होऊन तिच्या संसाराचें स्वतंत्र अस्तित्व राहत नाहीं, या दृष्टीनें आमच्यांत पत्नीस स्वतंत्रता नाहीं ही गोष्ट कोणीही मान्य करील. पण यांत वाईट काय आहे तें मात्र कळत नाहीं. कृष्णा व कोयना नद्यांचा प्रीतिसंगम होईपर्यंत कोयनेचें स्वतंत्र अस्तित्व आहे; पण पुढें कोयनेचें नांव व स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन कृष्णेचेंच नांव पुढील ओघास चालू राहतें. पण तेवढ्यावरून कृष्णेच्या पुढील ओघांत कोयनेचें पाणी मुळींच नसतें, असें म्हणतां येत नाहीं.याच न्यायानें परकीय कन्येचें पतिगृहीं आल्यानंतर जरी स्वतंत्र सांसारिक अस्तित्व नष्ट झालें,तरी तिला संसारांत कांहींच महत्त्व नसतें,तिची योग्यता गुलामापलीकडे नसते, हें म्हणणें खोटें आहे. स्त्रियांच्या अज्ञानाबद्दलची हाकाटी याच मासल्याची आहे. हिंदु स्त्रिया अज्ञान, अशिक्षित आहेत असें म्हणणाऱ्यांच्या आक्षेपाचा खरा अर्थ एवढाच असतो कीं, पुरुषास हल्लीं मिळतें तसलें पुस्तकी शिक्षण त्यांस मिळत नाहीं, म्हणून त्या अशिक्षित व अज्ञान होत ! पण आपण साक्षरता व सुशिक्षितपणा हीं एकार्थच मानून चालत आहों हें मात्र यांच्या लक्षांत येत नाहीं. आमचा सामान्य स्त्रीसमाज 'निरक्षर' असेल, पण तो तेवढ्यावरून केवळ 'अज्ञान' व 'अशिक्षित' असतो असें मात्र म्हणतां येणार नाहीं. साक्षरता हें ज्ञानाचें व शिक्षणाचें 'एक' साधन आहे; तें नसलें तरीही मनुष्य सज्ञान व शिक्षित असूं शकतो. निरक्षर असलेल्या आमच्या स्त्रीपुरुषांसही धर्माची, नीतीची व सदाचाराची जाणीव व स्पष्ट कल्पना असते, त्यांचें महत्त्वही कळतें व त्याप्रमाणें तीं यथामति आचरणही करतात; तर त्यांस अशिक्षित किंवा अज्ञान म्हणणें अयोग्य होय. सांप्रतकाळीं स्त्रियांनाही साक्षरतेची, पुस्तकी ज्ञानाची व बहुश्रुतपणाची जरूर नाहीं, असें कोणींही म्हणत नाहीं. पण आमच्या स्त्रिया व त्यांचे द्वारें आमचा समाज पाश्चात्य वळणावर नेण्याची सुधारणा घडवून आणण्याचें एक मुख्य साधन याच हेतूनें जोंपर्यंत स्त्रीशिक्षणप्रसार आमच्या सुधारकांकडून करण्यांत येईल, तोंपर्यंत जुनीं ध्येयें व जुना आचार यांचा अभिमान बाळगणारे लोक या शिक्षणापासून आपल्या स्त्रिया अलिप्तच ठेवणार, व तें त्यांचें करणें रास्तही आहे. मग याबद्दल सुधारकांनीं त्यांस कितीही शिव्याशाप दिले तरी त्यांची ते परवा करणार नाहींत. स्त्रियांस आम्ही समान मानीत नाहीं, या आक्षेपाचें उत्तर वर दिलेंच

आहे. गोषासंबंधाचीं औरडही अशीच दुराग्रह, विपरीत ग्रह आणि अज्ञान यांनीं दूषित झालेली आहे. गोषाचा खरा हेतु स्त्रीचें पावित्र्य व शुद्धता कायम राखणे हाच आहे; यांत स्त्रियांवर जुलूम करण्याचा किंवा त्यांस गुलामगिरींत कोंडण्याचा मुळींच उद्देश नाहीं. गुलामगिरी हा गोषाचा अवश्य परिणाम असता, तर ज्या रजपुतांत गोषा फारच सक्त आहे त्यांच्या स्त्रियांत तर गुलामगिरीपासून उत्पन्न होणारे दुर्गुण ओतप्रोत भरलेले दिसले असते पण रजपुत स्त्रियांचा खरा बाणा काय आहे, ह्याची साक्ष देण्यास टॉड साहेबांचा रजपुतांचा इतिहास मूर्तिमंत उभा आहे. गोषांतल्या रजपुत स्त्रियांइतकें तेज, बाणेदारपणा, स्वार्थत्याग, सत्यनिष्ठा, मानीपणा, धर्माभिमान व देशाभिमान पूर्णपणें स्वातंत्र्य मिळविलेल्या पाश्चात्य स्त्रियांतही आढळून येणार नाहीं. ' आपल्या चालीरीती सर्वोत्कृष्ट असें मानून त्याच मापानें परकीय राष्ट्रांच्या चालींचें मोजमाप घेणारा उथळ दृष्टीचा परकीय प्रवासी किंवा ग्रंथकार परोपकार बुद्धीचा मोठा आव घालून व हिंदु स्त्रियांच्या दीन व अवनत स्थितीबद्दल अश्रु ढालून दुःखोद्गार काढीत असतो; पण खुद्द हिंदु स्त्रियांस आपली स्थिति अवनत व दीन आहे, असें मुळींच वाटत नाहीं. ' असा अभिप्राय देऊन पुढें कर्नल टाड लिहितातः—

He perticularly laments her want of liberty and calls seclusion, imprisonment. From the knowledge I possess of the freedom, the respect, the happiness, which Rajput women enjoy, I am by no means inclined to deplore their state as captivity (हिंदु स्त्रियांस स्वातंत्र्य नाहीं, याबद्दल या भल्या गृहस्थास विशेषच वाईट वाटत असतें; आणि या स्त्रियांच्या मर्यादेस व पडदपोशीस हा कैद असें नांव ठेवतो ! पण पडद्यांतील रजपुत स्त्रियांस वास्तविक किती स्वातंत्र्य असतें, त्या किती सुखी,असतात आणि त्यांजबद्दल पुरुषांस किती आदर वाटतो, याची मला प्रत्यक्ष माहिती असल्यामुळें त्यांच्या ह्या स्थितीस " कैद " हें नांव देण्यास मी मुळींच तयार नाहीं !) स्त्रियांचा गोषा म्हणजे त्यांची गुलामगिरी, हें अनुमान कोणत्या तर्कशास्त्राचे आधारें आक्षेपक काढतात तेंच आधीं कळत नाहीं. मनुष्य पुष्कळ गोष्टी गुप्त ठेवतो. त्यांतील कांहींचा गुप्तपणा त्यांच्या हीनतेमुळें त्यास ठेवावा लागतो; पण इतर कांहींचा गुप्तपणा त्यांच्या अंगच्या पावित्र्यामुळें किंवा किमतवान्पणामुळें तो राखीत असतो. पातकांचा गुप्तपणा

पहिल्या प्रकारचा आहे. घरचे देव अगदीं एका बाजूस स्वतंत्र व बंदिस्त देवघरांत ठेवून आंत जाण्याची मोकळीक फारच थोड्यांस असते. तसेंच आपली धनदौलतही मनुष्य एका बाजूच्या खोलींत अवजड तिजोरींत बंद करून ठेवीत असतो. अर्थात् स्त्रियांस आम्ही विशेष पवित्र मानीत असल्यामुळें व त्यांच्या पावित्र्याची आम्हांस फार किंमत वाटत असल्यामुळें आमच्या या गृहदेवतांस व गृहलक्ष्मींस शक्य तितकें गृहांतच ठेवण्याची व त्यांचा परपुरुषांशीं फारसा संबंध न येऊं देण्याची आमची वहिवाट आहे. पण आमच्या या शुद्धहेतुमूलक कृतीचा विपर्यास होऊन आक्षेपकांचे दृष्टीस गोषा व पडदापोशी यांचे जागीं गुलामांचे गुलामखानेच दिसूं लागतात !!

स्त्रियांच्या गुलामगिरीसंबंधानें ओरड करणाऱ्या या स्त्रीस्वातंत्र्यवादी लोकांचा मनुस्मृतींतील एक श्लोक फारच आवडता आहे; व या प्रश्नाच्या वादांत तो ते वारंवार प्रतिपक्षाचे तोंडावर फेंकीत असतात. पण हा श्लोक त्यांचें तोंड बंद करण्यास समर्थ असल्यामुळें उलट खाऊन शिवधनुष्याप्रमाणें आक्षेपकांचे छातीवर जाऊन बसतो !

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
रक्षंति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥

मनु. अ. ९।३

असा हा श्लोक आहे. याचे मदतीस 'न भजेत् स्त्री स्वतंत्रताम्' (अ. ५।१४८) हेंही वचन कधीं कधीं देण्यांत येत असतें. या वचनांवरून स्त्रिया स्वातंत्र्यास पात्र नाहींत, अर्थात् त्यांस पारतंत्र्यांत, गुलामगिरींतच ठेविलें पाहिजे असें भारतीयांचें ध्येय ही मंडळी अनुमित करतात. पण हा अर्थ साफ चुकीचा आहे, हें संदर्भाचा विचार करणारांस तेव्हांच कळून येतें. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या वाक्याचे पूर्वीच्या तीन वाक्यांत 'रक्षणा' संबंधाचा त्रिवार उल्लेख केला आहे; आणि त्यांत कौमार्य, यौवन व वार्धक्य या तीनही काळांत अनुक्रमें पिता, पति व पुत्र यांनीं स्त्रियांचें संरक्षण करावें असें सांगितलें आहे. हें संरक्षण अर्थात् केवळ शारीरिक नसून मानसिक व विशेषतः नैतिक स्वरूपाचेंच आहे. शिवाय त्यांत पालनाबरोबर पोषणाचाही अंतर्भाव होतो. ह्या मागील तीन वाक्यांचा विचार करतां 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' याचा खरा अर्थ, स्त्रियांस गुलामगिरींत कोंडावें हा नसून, कोणत्याही स्थितींत स्वतःच्या पालनपोषणाची जबाबदारी स्त्रियांवर टाकूं नये, त्यांचें शारीरिक, मानसिक व नैतिक पालन आणि पोषण पुरुषांनींच करावें, हाच याचा खरा अर्थ आहे.

भार्यायां भरणाद्भर्ता पालनाच्च पतिः स्मृतः ।

महाभारत, आदि. अ. १०४

भार्येचें पोषण करतो म्हणून 'भर्ता' व पालन करतो म्हणून 'पति' असें जें महाभारतांत वचन आहे, त्यावरून हाच अर्थ सिद्ध होतो. 'भर्तव्या रक्षणीया च पत्नी हि पतिना सदा ।' (म. भा. वन. अ. ६९) हें व्यासवचनही हेंच स्पष्टपणें सांगत आहे. स्त्रियांचें अशा प्रकारें पालनपोषण करावयाचें तें त्यांच्यावर सत्ता गाजविण्याकरतां नव्हे, तर त्यांचें सामाजिक, धार्मिक व पारलौकिक बाबतींत फारच महत्त्व आहे, याच दृष्टीनें करावयाचें आहे. व या विधानास खुद्द मनुस्मृतींतच भरपूर पुरावा आहे. उदा० स्त्रियांना घरांत कोंडून व गुलामगिरींत पचवून शुद्ध ठेवूं पाहणें निंद्यच नव्हे तर अशक्यही आहे, स्त्रियांस स्वतःच स्वतःचें संरक्षण करण्यास समर्थ केल्यानेंच त्या अधिक सुरक्षित होतात, असें मनुस्मृतींतील

न कश्चिद्योषितः शक्तः प्रसह्य परिरक्षितुम् । मनु. अ. ९।१०
अरक्षिता गृहे रुद्धाः पुरुषैराप्तकारिभिः ।
आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः ॥ अ. ९।१२

या श्लोकांत स्पष्ट सांगितलें आहे. रक्षणीय अशा ज्या अनेक मोलवान वस्तु असतात, त्यांत स्त्री ही सर्वांहून मोलवान् आहे; व म्हणून तिचें संरक्षण चारी वर्णांच्या लोकांनीं सर्वांहून अधिक केलें पाहिजे; (**चतुर्णामपि वर्णानां दारा रक्ष्यतमाः सदा ।** अ. ८।३५९) येवढेंच नव्हे तर (**सूक्ष्मेभ्योऽपि प्रसंगेभ्यः स्त्रियो रक्ष्या विशेषतः। द्वयोर्हि कुलयोः शोकमावहेयुररक्षिताः॥**) अगदीं क्षुल्लक वाटणाऱ्या लहानसहान मोहोत्पादक प्रसंगांपासूनही त्यांचें विशेष दक्षतेनें रक्षण केलें पाहिजे. कारण तसें न केल्यास माहेर व सासर या दोनही कुळांवर दुःख व पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येईल; असा (अ. ९।५) मनुस्मृतींत स्त्रियांच्या नैतिक संरक्षणासंबंधानें विशेष कटाक्ष ठेवला आहे, व त्यास अनुसरूनच भारतीय समाज अजूनही बहुतांशीं वागत आहे.

विवाहित स्त्री-पुरुषांनीं एकमेकांशीं अव्यभिचारी निष्ठेनें आमरणांत राहणें हें नैतिक व सामाजिक दृष्ट्या अगत्याचें आहे, असेंच मनूचें मत असून त्यानें यांत पुरुषाविषयीं पक्षपात दाखविलेला नाहीं. परदारागमनासारखी पुरुषाच्या आयुष्याची हानि करणारी दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं, अशा आशयाचें मनुवचन मागें दिलेंच आहे.

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥

मनु. अ. ३।६०.

अन्योन्यस्याव्यभीचारो भवेदामरणांतिकः ।
एष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्रीपुंसयोः परः ॥

मनु. अ. ९।१०१

" भार्या व भर्ता हीं ज्या कुलांत एकमेकांसंबंधानें सदैव संतुष्ट असतात, त्या कुळाचें शाश्वत कल्याण होतें. आमरणांत एकमेकांसंबंधानें अव्यभिचाराचें–अनन्यत्वाचें–वर्तन असणें, हेंच विवाहित स्त्री-पुरुषांच्या श्रेष्ठ वैवाहिक नीतीचें सार आहे " असें **मनुस्मृ**तींत स्पष्ट सांगितलें आहे. याबरोबरच स्त्रियांच्या नैतिक शुद्धतेसंबंधानें व पावित्र्यासंबंधानें विशेष कटाक्ष ठेवला आहे. पण तो पुरुषांविषयींच्या पक्षपातामुळें नव्हे, तर स्त्रियांच्याच नैतिक पक्षपातामुळें ठेवला आहे. स्त्रियांचें इतक्या दक्षतेनें संरक्षण कां करावयाचें यासंबंधाचीं कारणें व हेतु हींही **मनुस्मृ**तींत स्पष्ट शब्दांनीं सांगितलीं आहेत. तीं पाहिलीं असतां **मनुप्रभृति** स्मृतिकार पक्षपाती नव्हते, जुलमी नव्हते व रानटीही नव्हते, हें कोणीही **समंजस** व विचारी माणसाच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. **मनुस्मृ**तींतील हीं वचनें पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—

स्वां प्रसूतिं चरित्रं च कुलमात्मानमेव च ।
स्वं च धर्मं प्रयत्नेन जायां रक्षन् हि रक्षति ॥
पतिर्भार्यां संप्रविश्य गर्भो भूत्वेह जायते ।
जायायास्तद्धि जायात्वं यदस्यां जायते पुनः ॥
तस्मात्प्रजाविशुद्ध्यर्थं स्त्रियं रक्षेत्प्रयत्नतः ॥

मनु. अ. ९।७ ते ९

" प्रयत्नपूर्वक पत्नीचें नैतिक संरक्षण केलें असतां आपली संतति, आपलें चारित्र्य, आपलें कुळ, आपण स्वतः व आपला धर्म या सर्वांचेंच आपोआप व सहज संरक्षण होतें. पति हाच स्वतः भार्येचे पोटीं प्रवेश करून गर्भरूपानें पुनः जन्मतो. अर्थात् भार्येचे पोटीं पतिच पुनः जन्म घेत असतो, म्हणूनच भार्येस ' जाया ' असें म्हणतात. यासाठीं संततीची शुद्धता राखण्याकरतां पुरुषांनीं प्रयत्नपूर्वक–मोठ्या दक्षतेनें–स्त्रियांचें नैतिक संर-

क्षण करीत असावे. " या वचनांत ' रक्षण ' सांगितलें असून रक्षणाचा हेतुही तितक्याच स्पष्ट शब्दांनी सांगितला आहे.

लोकानन्त्यं दिवः प्राप्तिः पुत्रपौत्रप्रपौत्रकैः ।
यस्मात्तस्मात्स्त्रियः सेव्याः कर्तव्याश्च सुरक्षिताः ॥

मुलगे, नातू, पणतु इत्यादींचें उत्पादन करून तद्वारा आपणांस स्वर्गप्राप्ति करून देणाऱ्या व लोकसमाजाची परंपरा अविच्छिन्न ठेवणाऱ्या ज्या अर्थीं स्त्रियाच आहेत, त्याअर्थीं त्यांचें विवाहबंधनपूर्वक सेवन करावें व त्यांचें चांगलें रक्षणही करावें, असें याज्ञवल्क्य स्मृतींतही स्पष्ट वचन आहे. (अ. २।७८) ' योऽकामां दूषयेत्कन्यां स सद्यो वधमर्हति ' (अ. ४।३६४) या मनुवचनांत कन्येवरील बलात्कारास वधाची कडक शिक्षा सांगितली आहे, तिचा तरी कटाक्ष स्त्रीशुद्धतेवरच आहे. स्त्रियांच्या नैतिक संरक्षणाचें सामाजिक व धार्मिक महत्त्व तेवढेंच सांगून मनुस्मृति स्वस्थ बसलेली नाहीं. स्त्रियांची ही शुद्धता कायम राहण्यासाठीं काय उपाय योजावे यांचेंही तिनें स्पष्ट दिग्दर्शन केलें आहे; आणि स्त्रियांचे स्वभाव, नैसर्गिक मनोधर्म व शारीरिक रचना हीं पूर्णपणें लक्षांत घेऊन त्यांशीं विरोध न करतां त्यांचा विकासच होईल अशा धोरणानें या उपायांची योजना केलेली आहे. यासंबंधानें मनुस्मृति स्पष्ट सांगते कीं—

अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत् ।
शौचे धर्मेऽन्नपक्त्यां च परिणाहस्य चेक्षणे ॥

मनु. अ. ९।११

सदा प्रहृष्टया भाव्यं गृहकार्येषु दक्षया ।
सुसंस्कृतोपस्करया व्यये चामुक्तहस्तया ॥

अ. ५।१५०

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥

अ. ३।५५

" द्रव्यसंग्रह व द्रव्यव्यय, गृहादिकांची स्वच्छता, अन्नपाकक्रिया व गृहांतील सामानसुमानाची देखरेख हीं कामें पुरुषांनीं स्त्रियांवर सोंपवावीं. स्वतः स्त्रीनेंही सदोदित आनंदित राहून गृहकृत्यांत दक्ष असावें. तसेंच घरांतील सर्व वस्तु स्वच्छ व टापटिपीनें ठेवून खर्चही तिनें काटकसरीनें करावा. " अशा प्रकारें गृहकार्यांकडे नियोजित केलेल्या स्त्रियांस

पुरुषांनीं कार्यदृष्टीनें स्वयंपाकीण किंवा मोलकरीण यांचे पलीकडे मान देऊं नये असें, सुधारकांच्या म्हणण्याप्रमाणें, मनुस्मृति सांगत नसून उलट तिची पुरुषांस अशी आज्ञा आहे कीं, " स्वतःचें व स्वकुलाचें कल्याण इच्छिणाऱ्या बापांनीं व भावांनीं, नवऱ्यांनीं व दिरांनीं स्त्रियांस भूषणादिक द्यावें व त्यांजविषयीं पूज्यभाव मनांत बाळगवून त्यांशीं वर्तन ठेवावें. " सुधारक मंडळी प्रतिपादितात त्याप्रमाणें स्त्रियांस जर मनुप्रभृति स्मृतिकार गुलाम मानीत असते, तर गृहें म्हणजे गुलामखाने आणि संसार म्हणजे स्त्रियांची गुलामगरी व पुरुषांची या गुलामांवर धनीपणा गाजविण्याची सुसंधी असल्याच दृष्टीनें त्यांनीं स्त्रियांकडे व संसाराकडे पाहिलें असतें; पण तसा प्रकार मुळींच दिसत नाहीं. उलट स्त्रियांच्या नैसर्गिक व संपादित गुणांची आणि त्या गुणांच्या कौटुंबिक व सामाजिक महत्त्वाची त्यांनीं सहृदय व मार्मिक दृष्टीनें इतकी स्तुति केली आहे कीं, तितकी स्तुति स्त्रियांचें दास्यविमोचन करून त्यांस समानतेच्या पायरीवर ठेवणाऱ्या लोकांचे वाङ्मयांत तरी सांपडेल कीं नाहीं याची वानवाच आहे. देवीची स्तुति करणाऱ्या एका स्तोत्रकारानें तर तिला उद्देशून, ' तूंच ' राजलक्ष्मी राजगेहे गृहलक्ष्मी गृहे गृहे ' आहेस ' असें म्हटलें आहे ! सामान्यतः स्त्रियांच्या—विशेषतः पत्नीपदारूढ स्त्रियांच्या—आमच्या स्मृतिकारांनीं गाइलेल्या महात्म्याचा थोडासा मासला पुढें देत आहें, त्यावरून ही गोष्ट कळून येईलः—

यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राऽफलाः क्रियाः ॥
शोचंति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलं ।
न शोचंति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ॥

मनु. अ. ३।५६, ५७.

प्रजनार्थं महाभागाः पूजार्हाः गृहदीप्तयः ।
स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति किंचन ॥
उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम् ।
प्रत्यहं लोकयात्रायाः प्रत्यक्षं स्त्रीनिबंधनम् ॥
अपत्यं धर्मकार्याणि शुश्रूषा रतिरुत्तमा ।
दाराधीनस्तथा स्वर्गः पितॄणामात्मनश्च ह ॥

मनु. अ. ९।२६ ते २८

अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।
भार्यामूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥
भार्यावंतः क्रियावंतो भार्यावंतः श्रियान्विताः ।
भार्यावंतः प्रमोदंते सभार्या गृहमेधिनः ॥
सखायः प्राविविक्तेषु भवंत्येताः प्रियंवदाः ॥
पितरो धर्मकार्येषु भवंत्यार्तस्य मातरः ॥
आत्माऽत्मनैव जनितः पुत्र इत्युच्यते बुधैः ।
तस्माद्भार्यां नरः पश्येन्मातृवत्पुत्रमातरम् ॥

महाभारत, आदि. अ. ७४

न च भार्यासमं किंचिद्विद्यते भिषजां मतम् ।
औषधं सर्वदुःखेषु.....वन. अ. ६१

" जेथें स्त्रियांस पूज्य भावानें वागविलें जातें तेथें प्रत्यक्ष देवताच आनंदानें रमत असतात; पण जेथें त्यांचेविषयीं पूज्यभाव नसतो तेथील सर्व क्रिया निष्फळ होतात. ज्या कुलांतील स्त्रिया शोकमग्न असतात, तें कुल लवकरच नष्ट होतें; पण जेथील स्त्रिया दुःखित नसतात त्या कुळाची नेहमीं अभिवृद्धिच होते. प्रजोत्पत्तीचें मुख्य साधन या नात्यानें या महाभाग्यशाली स्त्रियांस पूज्य भावानें वागविलें पाहिजे; शिवाय स्त्रिया ह्या गृह प्रकाशमय करणाऱ्या दीपज्योतीच आहेत; किंबहुना स्त्रिया ह्याच गृहाची शोभा व वैभव आहेत; दोहोंत फरक मुळींच नाहीं. अपत्यांचें उत्पादन, जन्मलेल्यांचें परिपालन किंबहुना रोजची लोकयात्रा किंवा सामाजिक संसार हा प्रत्यक्ष स्त्रियांवरच अवलंबून आहे. अपत्योत्पादन, धर्मकार्यें, शुश्रूषादिसेवा, श्रेष्ठ प्रकारचा सात्त्विक कामोपभोग, किंबहुना आपली स्वतःची व आपल्या पितरांची स्वर्गप्राप्तिही विवाहित स्त्रियांचेच हातीं आहे. "

" भार्या ही मनुष्याची अर्धांगी आहे. तसेंच भार्या हाच सर्वांहून श्रेष्ठ असा मित्र धर्मादि तीन पुरुषार्थांचें मूळ व संसार तरून जाण्याचें मुख्य साधन आहे. भार्यावान् पुरुषच कर्तृत्ववान् व वैभवशाली असतो, भार्यावंतांनाच खरा आनंदानुभव मिळतो, व भार्यावंतच खरे गृहस्थाश्रमी होत. भार्या ही एकांतांत प्रियभाषण करणाऱ्या मित्रासारखी, धर्मकार्यांचे बाबतींत पित्यासारखी व आजारांत मातेसारखी असते. आपणच आपणास जें उत्पन्न करतों त्यासच ' पुत्र ' असें शहाणे लोक म्हणत असतात; म्हणून पुरुषानें

आपल्या पुत्राच्या आईस स्वमातेप्रमाणेंच पूज्य मानावें. सर्वच प्रकारच्या दुःखामध्यें वैद्यांसही संमत असें भार्येसारखें दुसरें औषधच नाहीं."

आमचे स्मृतिकार पत्नीपदारूढ स्त्रियांचें महात्म्य इतकें मोकळ्या मनानें गाणारे असूनही, स्त्रियांविषयीं तिरस्कारबुद्धि व पुरुषांविषयीं पक्षपातबुद्धि मनांत बाळगूनच त्यांनीं धर्मशास्त्रें रचलीं, असें वरचेवर प्रतिपादन करणारांचें तोंड ब्रह्मदेवासही धरतां येणार नाहीं. स्त्रियांना गृहकार्यांत व अपत्योत्पादनांतच गुंतवून ठेवून त्यांस सांपत्तिक व इतर स्वातंत्र्य स्मृतिकारांनीं दिलें नाहीं हीच गुलामगिरी होय, असें कोणी म्हणतील; पण हें त्यांचें म्हणणें अज्ञानमूलक किंवा दुराग्रहमूलक आहे, ही गोष्ट कोणासही थोड्या विचारांतीं कळून येईल. मनुष्याच्या ज्या अनेक लहानमोठ्या गरजा आहेत, त्यांत त्याच्या मूळ अस्तित्वासच कारणीभूत होणारें खाद्यपेय व त्या अस्तित्वावर घाला न येण्यास जरूर असें संरक्षण या दोन गरजा अत्यंत महत्वाच्या आहेत. त्याचप्रमाणें समाजाचें पोषण, संरक्षण व संवर्धन होऊन त्याची परंपरा अव्याहत राखणें, हें सामाजिक नियमांचें पहिलें व मुख्य कार्य आहे. हें कार्य चांगल्या प्रकारें पार पडेल अशा प्रकारचीं बंधनें समाजांतील घटकांनीं मुकाट्यानें स्वहितास्तव मान्य केलीं पाहिजेत. समाजबंधनाचें हें जें महत्त्वाचें पहिलें कार्य त्याचे दृष्टीनें विवाहशून्य व म्हणूनच पशुतुल्य स्त्रीपुरुषसंबंधास सामाजिक महत्त्व काडीचेंही नाहीं; उलट असले संबंध समाजाचा पाया व महत्त्वाचा मूळघटक जें कुटुंब त्याच्या उत्पत्तीस विघातक असल्यामुळें ते संबंध सामाजिक दृष्ट्या हानिकारकच आहेत. विवाहबद्ध होऊन केवळ रतिसुखावर आसक्ति ठेवून तदनुरूप वर्तन करणाऱ्या व या सुखाचे आड येणाऱ्या संततीचा कंटाळा किंवा हयगय करणाऱ्या लोकांसही सामाजिक दृष्टीनें मुळींच किंमत नाहीं. अपत्योत्पादन, अपत्यसंगोपन व अपत्यसंवर्धन योग्य प्रकारें व कर्तव्यबुद्धीनें करून कुटुंबसंस्था स्थिर, शुद्ध व अजरामर राखणारे लोकच समाजाचें अस्तित्व अखंड कायम ठेवण्यास खरी मदत करीत असतात. म्हणूनच स्त्रियांच्या इतर गुणांपेक्षां त्यांची मातृत्वशक्ति ह्या गुणाचेंच महत्त्व आम्हांस अधिक वाटतें, व म्हणूनच आमचे शास्त्रकार ' न मातुः परदैवतं ' असें कंठरवानें सांगतात. अशा प्रकारें ' उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनं ' हें ' लोकयात्रेचें मुख्य व रोजचें निबंधन ' प्रत्यक्ष स्त्रियांचेच हातीं असून तें योग्य प्रकारें करण्याची जबाबदारी शिरावर घेण्यास स्त्रियाच नैसर्गिक व मानसिक गुणांनीं विशेष लायख आहेत. सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्वाच्या ह्या कार्याचा बोजा त्यांस उचलावयाचा असल्यामुळें उदरपोषणार्थ पुरु-

षांप्रमाणें घराबाहेरचे धंदे करण्याचा व पुरुषांशीं समानत्व येण्याकरितां त्यांसच योग्य असलेलें सर्व शिक्षण संपादण्याचा बोजाही, सांपत्तिक स्वातंत्र्याच्या व समानतेच्या खोट्या व घातक मोहास बळी पडून, त्यांचेवर सुधारणावादी लादतील किंवा स्त्रियाच स्वतः उचलतील तर त्यांची शारीरिक, मानसिक व नैतिक हानि होईल येवढेंच नव्हे, तर त्यांच्या संततीचे संगोपनावर अर्थात् समाजाच्या भावी अस्तित्वावरही अनिष्ट परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. इंग्लंडादि पाश्चात्य देशांत हा विकट प्रश्न उपस्थित झाला असून तो सोडविण्यास तिकडील समाजशास्त्रवेत्ते अटोकाट प्रयत्न करीत आहेत, तरी तो त्यांस अद्याप सुटलेला नाहीं. पाश्चात्यांतला हा प्रकार सांप्रत मुंबईच्या गिरण्या वैगरेंमध्यें जाऊन काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रियांमध्यें थोडथोडा दिसून येऊं लागला असून त्यांचेमध्यें बालकांच्या मृत्यूचें प्रमाण भयंकर वाढलें आहे. तेवढ्यांवर वेळींच सावध होण्याची सुबुद्धि, स्त्रियांस सांपत्तिक स्वातंत्र्याचा लाभ देऊं इच्छिणाऱ्यांस होणार नाहीं काय ? अपत्योत्पादन व अपत्यपरिपालन हीं कार्यें फार महत्त्वाचीं, फार विकट, फार कष्टाचीं व फार नाजुक आहेत. हीं ज्यांचे शिरावर आहेत त्यांजवर इतर सामाजिक कर्तव्यांचे बोजे जितके कमी बसतील तितकें समाजदृष्टीनें हितावह आहे. वरील प्रकारचें महत्त्वाचें सामाजिक कार्य करणाऱ्या स्त्रियांस जर इतर कोणतें कार्य झेंपण्यासारखें आणि मुख्य कार्यास सोयीचें व पोषक असें असेल तर तें गृहकार्य हेंच आहे; व तेंच आमच्या "स्मृतिकारांनी त्यांजवर सोंपविलें आहे. स्त्रियांची दृष्टि व्यापक व मनें प्रगल्भ होऊन त्यांनीं बहुश्रुत होणें सध्यांचे काळीं फार जरूर आहे हें कोणीही नाकबूल करीत नाहीं. तसेंच दुर्दैवानें बालवैधव्य आल्यामुळें ज्यांचेवर अपत्योत्पादन व अपत्यपरिपालन ह्या कर्तव्यांचा बोजा येतच नाहीं, त्यांनीं मनमुराद सुशिक्षण संपादून इतर सामाजिक कर्तव्यांचे बोजे शिरावर घेतल्यास तें सामाजिक दृष्टीनें अपायकारक नसून उलट हितावहही आहे. प्राचीन ब्रह्मचारिणींचें ध्येय डोळ्यापुढें ठेवून ज्ञानसंपादन करण्यास लायक अशा आमच्या स्त्रीसमाजांत जर कोणता वर्ग असेल तर हाच आहे. पण आमचे सुधारकबंधु यांस पुनः संसारांत पाडण्याचाच अटोकाट प्रयत्न करीत असतात; किंवा त्यांस ' सुशिक्षित ' बनवून ' अशिक्षित ' स्त्रीसमाजांतून फोडून काढून सुशिक्षित स्त्रीपुरुषांशींच दळणवळण ठेवावयास लावीत असतात ! आधुनिक साधनांचा पूर्ण उपयोग करून पण प्राचीन ब्रह्मचारिणींचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून बालविधवांचा वर्ग सुशिक्षणसंपन्न केला, आणि सुशिक्षित होतांच आपल्या अशिक्षित भगिनींची संगति त्याज्य मानून सुशिक्षित स्त्री-पुरु-

षांतच मिसळण्याची त्यांची प्रवृत्ति सुटेल व अशिक्षित म्हटलेल्या संसारी स्त्रियांतच पूर्ववत् मिलाफानें तो वर्ग वागेल, तर या उत्तरोक्त स्त्रियांचीही दृष्टि व मन त्यांचे सहवासानें व्यापक व बहुश्रुत होईल; आणि तेंही अनायासें व त्यांच्या मुख्य सामाजिक कर्तव्याची हानि न होतां होईल.

वरील कारणांकरितां स्त्रियांस सांपत्तिक स्वातंत्र्य न दिल्यामुळें त्यांच्या पोषणाची हयगय कोणत्याही स्थितींत होऊं नये, अशीही आमच्या धर्मशास्त्रकारांनीं तजवीज केलेली आहे. मुलांबरोबर मुलींनाही वडिलार्जित मालमत्तेचा वांटा मिळत नाहीं, म्हणून आमच्या स्त्रिया गुलाम व आमची संस्कृति खालच्या दर्जाची, असें म्हणतां येत नाहीं. संस्कृतीच्या उच्चनीचतेची ही कसोटी खरी मानली तर आरब लोक सर्वांहून जास्त सुधारलेले आहेत असें मानावें लागेल ! मुलगे हयात असल्यावर मुली वारस होत नसल्या, तरी त्यांना मालमत्तेचा कांहींच अंश मिळत नाहीं, हें म्हणणें साफ चुकीचें आहे. भाऊ हयींत असतां मुलींना जरी बापाच्या मालमत्तेचा वारसा मिळत नाहीं, तरी त्यांच्या व मातेच्या अभावीं मुलीच वारस होतात; व बापाकडून मिळालेल्या या इस्टेटीची मालकी त्यांचे नवऱ्याकडे न जातां हयातीपर्यंत त्यांचेकडेच राहून पश्चात् त्यांचे मुलाकडे जाते. शिवाय स्त्रीधनावर स्त्रीचीच अप्रतिबद्ध सत्ता असते. त्याचा विनियोग ती स्वसंपादित मालमत्तेप्रमाणें वाटेल तसा करूं शकते. अशा विनियोगानंतर राहिलेली मालमत्ता तिचे मुलांस न मिळतां मुलींस मिळते. दुसरें असें कीं, दीर किंवा इतर नातेवाईक यांस वडिलार्जित इस्टेट काडीची जरी मिळाली नाहीं, तरी त्यांजपासून व त्यांचे अभावीं इतर आप्तांपासून तिला हक्कानें पोटगी मागतां येते. तसेंच निपुत्रिक नवऱ्याच्या इस्टेटीची पत्नीच आपल्या हयातीपर्यंत मालक होत असते व तिचे अभावीं मग मुलीच मालक होतात. सारांश, आमची कौटुंबिक रचना पुत्र-परंपरामूलक असल्यामुळें स्त्रियांस जरी वारसदारींत गौण मानलें असलें, तरी सांपत्तिक किंवा इतर कोणत्याही दृष्टीनें त्यांस गुलामासारखी स्थिति खास पूर्वी नव्हती व हल्लींही नाहीं; आणि आमचा दांपत्यधर्म अनेक दृष्टींनीं श्रेष्ठ दर्जाचा आहे, हें वरील विवेचनावरून कोणासही सहज दिसून येईल.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनांत पति वगैरे पुरुषांनी स्त्रियांशीं कसें वागावें, या संबंधाच्या भारतीय ध्येयाचें मुख्यतः निरूपण केलें. स्त्रियांनीं पति वगैरे पुरुषांशीं कसें वर्तन ठेवावयाचें यासंबंधाचें भारतीय ध्येय जगजाहीरच आहे. हिंदु स्त्रियांची अद्वितीय व निरपेक्ष पतिनिष्ठा तर सर्व जगांत मान्य व उपमानभूतच होऊन बसली आहे.

त्यांची ही पतिनिष्ठा व पतिप्रेम अलौकिक व दिव्य पदास पोंचून त्या पतिबरोबर सहगमन करीत, तो प्रकार प्रत्यक्ष पाहून तर परदेशीय प्रवाशांनीं थक्क होऊन तोंडांत बोटेंच घातलीं आहेत !

विशीलः कामवृत्तो वा गुणैर्वा परिवर्जितः ।
उपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत्पतिः ॥
नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम् ।
पतिं शुश्रूषते येन तेन स्वर्गे महीयते ॥

मनु. अ. ५।१५४,१५५.

" पति शीलभ्रष्ट, चैनी किंवा गुणहीन असला तरीही साध्वी स्त्रियांनीं पतीस देव मानून त्याची सतत सेवा करावी. पतिसेवेवांचून स्त्रियांस निराळा यज्ञ, व्रत किंवा उपावास सांगितलेला नाहीं. तिनें पतिची शुश्रूषा केली म्हणजे तेवढ्यानेंच तिची स्वर्गी मानमान्यता होते " या मनुवचनाप्रमाणें भारतीय स्त्रिया अद्यापही वागत आहेत. पण या त्यांच्या निरपेक्ष व उच्च कर्मयोगासच व्यक्तिस्वातंत्र्यवादी सुधारक गुलामगिरी हें नांव देत असतात. व्यक्तिस्वातंत्र्याचें हें तत्त्व वेदवाक्य मानून त्याप्रमाणें संसारांतील वेगवेगळे संबंध व नातीं मोजूं गेल्यास बालकाकरतां प्राण टाकणारी माता व देशाकरतां तळहातावर शीर घेणारा देशभक्त आणि राजाकरतां रणांत प्राणांतापर्यंत लढणारा राजनिष्ठ शिपाई हेही गुलामांच्याच सदरांत येतील ! हिंदु स्त्रिया आपल्या पतीची एकनिष्ठेनें जी सेवा करतात तिची किंमत व तिचें स्वरूप सुधारकांस मनांतून कळत नाहीं असें नाहीं; पण तें बाहेर दाखविणें त्यांस अडचणीचें व अनिष्ट वाटतें. तथापि प्रसंग पडला म्हणजे तें कळत किंवा न कळत बाहेर पडल्यावांचून रहात नाहीं. स्त्रिया सुशिक्षित झाल्या, म्हणजे आपल्या योग्यतेची जाणीव त्यांचेमध्यें उत्पन्न होऊन त्या अधिक स्वाभिमानी होतील व मग त्या नवऱ्यापुढें बटकीप्रमाणें न वागतां समान योग्यतेच्या मित्राप्रमाणें वागतील, असें सुधारक प्रतिपादन करीत असतात. पण हा त्यांचा अंदाज कांहीं थोड्या ' सुशिक्षित ' स्त्रियांचे बाबतींत खरा ठरला तरी, तो इतरांचे बाबतींत व सर्वांशीं खरा ठरेल असें म्हणवत नाहीं. ह्याचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास श्री. रमाबाई रानडे यांचें ' आमच्या आयुष्यांतील आठवणी ' हें एकाद्या कादंबरीहूनही सरस असलेलें व कुलीन हिंदु स्त्रीचीं हृद्गतें प्रकट करणारें पुस्तक वाचावें. जुन्या चालीची एकादी अशिक्षित म्हटलेली स्त्री स्वयंपाकपाणी वगैरे गृहकृत्यें करून पतीचे पाय चेपणें

वगैरे प्रकारची त्याची सेवा करीत असते. पण श्री. रमाबाइ ह्या ही सर्व सेवा करून शिवाय न्यायमूर्तींचा शिष्य, रीडर, प्रायव्हेट सेक्रेटरी व नोकरहि बनत; आणि न्यायमूर्तीस पुस्तकें वाचून दाखविणें, त्यांचीं खाजगीं पत्रें लिहिणें, पुरुषांनीं पाहावयाच्या संसारांतील अनेक बाबींची तजवीज करणें, किंबहुना ते वाहेरून घरांत आले म्हणजे त्यांच्या अंगावरचे कपडे स्वतः काढून जेथल्या तेथें ठेवणें हींही कामें त्या करीत ! हिंदु ध्येय मान्य करणारे लोक या कर्तव्यमूलक वर्तनास मुळींच नांवें ठेवणार नाहींत. व्यक्तिस्वातंत्र्यवादी व समानतेचे अभिमानी असलेल्या सुधारकांच्या कोटिक्रमाप्रमाणें मात्र या वर्तनास वास्तविक गुलामगिरी नांव मिळावयास पाहिजे; पण ना. गोखले यांनीं या पुस्तकाचे प्रस्तावनेंत ह्या वर्तनास ' उच्च प्रकारची सेवावृत्ति ' असें नांव दिलें आहे, व तें हिंदुध्येयाचे दृष्टीनें योग्यही आहे. एका सुधारकाग्रणीच्या पत्नीच्या एकनिष्ठ वर्तनास ' श्रेष्ठ पतिसेवा ' हें नांव जर द्यावयाचें तर जुन्या चालीच्या स्त्रियांनीं त्याच भावनेनें केलेल्या तसल्याच स्वरूपाच्या वर्तनास गुलामगिरी कां म्हणावयाचें, याचा खुलासा झाला पाहिजे. पत्नी जुन्या चालीची म्हणून तिचा त्याग–निदान तिरस्कार–करणारे सुधारक पुरुष सांपडतील. पण त्यांच्या स्त्रियांकडे पाहिलें तर–पतीस देव मानण्याचें वरील ध्येय पिढ्यानुपिढ्या अंगीं मुरल्यामुळें–त्याही बहुतेक लवकरच स्वतः सुधारक बनतात. ज्या स्वतः सुधारक न बनतां जुन्या चालींस व ध्येयास चिकटून राहतात, त्याही आपल्या सुधारक पतीचा धिक्कार किंवा त्याग न करतां त्याचे पाशींच राहून संसार करीत असतात ! हिंदु स्त्रियांच्या या श्रेष्ठ कर्मयोगाचें रहस्य व महत्त्व, स्वातंत्र्य व समता यांच्या खोट्या कल्पनांनीं डोकें फिरलेल्या सुधारक पुरुषांस जर कळलें नाहीं तर तें त्यांचेंच दुर्दैव होय !

पाश्चात्य व भारतीय यांच्या दांपत्यधर्मांचें आतांपर्यंत जें तुलनात्मक विवेचन केलें, त्यावरून वाचकांचा गैरसमज होऊं नये, यासाठीं त्यांस शेवटीं एक इषारा देऊन हें बरेंच लांबलेलें प्रकरण पुरें करतों. पाश्चात्यांचा दांपत्यधर्म आमच्याहून कमी प्रतीचा आहे, असें म्हटल्यानें आमच्यांतील सगळ्याच स्त्रिया पाश्चात्यांतील सर्व स्त्रियांहून वैवाहिक नीतीनें श्रेष्ठ आहेत, असें म्हणण्याचा रोंख आहे असें कोणीं समजूं नये. (एका समाजशास्त्रज्ञानें असा एक ठोकळ नियम सांगितला आहे कीं, समाजांतील बंधनें किंवा इतर परिस्थिति कशीही असली, तरी त्यांतले एकतृतीयांश लोक सद्वर्तन कदापि सोडीत नाहींत आणि दुसरे एकतृतीयांश लोक असद्वर्तनी व नीतिभ्रष्टच असतात. पण

मधला जो तिसरा एकतृतीयांश वर्ग उरला तो मात्र समाजबंधनें किंवा सामाजिक परिस्थिति जशी अनुकूल प्रतिकूल असेल त्या मानानें नीतिमान् किंवा नीतिभ्रष्ट बनतो. अर्थात् समाजिक निबंधन व नियमन करणाऱ्यांनीं अशीं समाजबंधनें निर्माण केलीं पाहिजेत कीं, हा मध्यवर्ग कनिष्ठ वर्गांत न जातां वरिष्ठ वर्गांतच समाविष्ट होईल; मग अशा बंधनांनीं श्रेष्ठ वर्गांतल्या एकतृतीयांश लोकांचें व्यक्तिस्वातंत्र्य थोडेंबहुत मर्यादित झालें, तरी हरकत नाहीं. या दृष्टीनें विचार करतां भारतीयांचा दांपत्यधर्म पाश्चात्यांहून नीतिमत्तेस अधिक अनुकूल आहे, एवढेंच वरील विवेचनाचें तात्पर्य आहे. पाश्चात्यांचा दांपत्यधर्म व स्त्रीपुरुषांचा सामाजिकसंबंध व्यक्तिस्वातंत्र्य–प्रधान आहे; तर आमचा व्यक्तिपावित्र्य–प्रधान आहे. पावित्र्यास श्रेष्ठ मानणारांचें स्वातंत्र्य बरेंच कमी होणार व स्वातंत्र्यास श्रेष्ठ मानणाऱ्यांच्या पावित्र्यासंबंधाच्या कल्पना बऱ्याच ढिल्या असणार. आमच्यामध्यें या पावित्र्याकरतांच स्त्रीपुरुषांचें–विशेषतः तरुणपणांत–सामाजिक दळण-वळण सक्त रीतीनें नियमित व मर्यादित केलेलें आहे.

मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।
बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥

मनु. अ. २।२१५

" इंद्रियसमूह बळवान् असल्यासुळें तो ज्ञात्या व शहाण्या माणसांसही बलात्कारानें मोहाकडे ओढून नेतो; याकरतां तरुण सावत्र आई, बहिण किंवा मुलगी यांजबरोबर पुरुषानें एकांतांत राहूं नये. " अशा प्रकारचा सक्त नियम पाळणारांचें पावित्र्य राहिलें, तरी स्वातंत्र्य बरेंच कमी व्हावयाचेंच. उलट सामाजिक स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या लोकांत पावित्र्य इतक्या श्रेष्ठ दर्जाचें असणेंही अशक्य आहे. पाश्चात्यांपैकीं पुष्कळ स्त्रीपुरुषांचें पातिव्रत्य व पत्नीव्रत्य श्रेष्ठ प्रतीचें असलें, तरी योग्य वय झाल्यानंतर समाजांत मोकळेपणानें वावरूं लागणाऱ्या तरुण स्त्रिया प्रेमाकर्षणाचें—वरशोधनाचें व वरपसंतीचें—कार्य करीत असतां त्यांस परपुरुषस्पर्शाचे बाबतींतच नव्हे तर चुंबनादिकांमध्येंही आमच्या इकडच्याइतकी सक्त दृष्टि ठेवतां येत नाहीं, ठेवतां येणें शक्यही नाहीं व ती ठेवणें तिकडे जरूरही मानीत नाहींत. त्यांच्या मधले बॉलच्या नाचाचे प्रकार त्यांस जरी निरुपद्रवी वाटत असले, तरी वरील मनुवचन शेकडों पिढ्या अंगवळणीं पडलेल्या आमच्या समाजांतील पूर्णस्त्रीस्वातंत्र्यवाद्यांसही ते नुसते पाहवणारही नाहींत, मग प्रचारांत आणण्याची गोष्ट दूरच राहिली. धर्म व नीति या बाबतींत विशेष कटाक्ष

ठेवणाऱ्या पाश्चात्यांतील कांहीं पुरुषांस बॉलचे प्रकार मुळींच संमत नसून, पतिपत्नींतील वितुष्टें व अखेरचा घटस्फोट यांचीं बीजें प्रथमतः 'बॉलरूम' मध्येंच पेरलीं जातात, असें त्यांचें मत आहे. तसेंच विवाहापूर्वी स्त्रीशीं संबंध ठेवला तरी तिजशीं त्या पुरुषानें पुढें विवाह लावला म्हणजे त्याचें पूर्वीचें पातक धुवून निघालें, असें मानण्याचा तिकडे जो एक प्रघात आहे त्यावरूनही वरील गोष्टच स्पष्ट होते. स्वातंत्र्यास श्रेष्ठ मानणाऱ्या पाश्चात्यांचें पावित्र्य तुलनेनें कमी असलें तरी तो त्यांतील व्यक्तींचा बिलकूल दोष नसून समाजव्यवस्था व सामाजिक ध्येय यांचाच तो दोष आहे; व याच तात्त्विक दृष्टीनें आतांपर्यंतचें तुलनात्मक विवेचन केलेलें आहे, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.



प्रकरण ७ वें.

भारतीयांच्या वसाहती व परराष्ट्रसंबंध.

जगांतील निरनिराळ्या देशांत सांप्रत जे अनेक आर्यवंशीय लोक आहेत, त्यांचें मूळ-स्थान कोणतें ? आणि त्या मूळस्थानापासून ते कां, कसे व केव्हां देशोदेशीं वसाहत करीत गेले ? यासंबंधानें प्राचीन शोधकांत तीन प्रकारच्या उपपत्ति प्रचलित आहेत. या उपपत्तींतील मुख्य मतभेद मूळस्थानासंबंधानेच उत्पन्न झालेले आहेत. उत्तर ध्रुव-प्रदेश आणि कॉकेशस पर्वत अथवा मध्य आशिया अशीं दोन वेगळीं मूळस्थानें दोन उपपत्तींचे पुरस्कर्ते मानतात. ह्या दोनही उपपत्ति खऱ्या असण्याचा संभव आहे. म्हणजे आर्यलोक उत्तर-ध्रुव-प्रदेशांतून हिमप्रलयामुळें जे दक्षिणेकडे निघाले, ते प्रथम कॉकेशस पर्वत व मध्य आशियापर्यंत येऊन तेथें त्यांनीं वसती केली; व तेथून पुढें कांहीं कारणांनी आर्यांची एक शाखा युरोपांत, एक शाखा असिरियापासून इराणपर्यंतच्या मुलखांत व तिसरी शाखा अफगाणिस्थान, हिंदुस्थानाकडे गेली असण्याचा संभव आहे पण या दोन उपपत्तींहून भिन्न अशी एक तिसरी उपपत्ति असून तिचेहीं पुरस्कर्ते बरेच आहेत. मनुष्यप्राण्याचें, निदान आर्यवंशीय मनुष्यजातीचें, मूळस्थान भरतखंडच असून येथूनच त्यांच्या वसाहती जगांतील निरनिराळ्या देशांत भिन्न भिन्न काळीं पसरल्या, असे या उपपत्तीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. या वसाहती परदेशीं होण्यास अतिप्राचीन काळापासून सुरुवात झाली असून ती पुढें अनेक सहस्रके चालूच होती. अखेरची जी प्रचंड वसाहत भरतखंडांतून गेली ती भारतीय युद्धानंतर लवकरच गेली, असे या उपपत्तीच्या पुरस्कर्त्यांचे मत आहे. त्यांचे मतें भारतीय युद्धानें भरतखंडाच्याच नव्हे तर सगळ्या जगाच्याच इतिहासांत मोठी क्रांति घडवून आणली. भारतीय युद्धाचें मूळ कारण हस्तिनापूरच्या गादीसंबंधाचे तंटे हेंच होतें. पण या तंट्यांचे पायीं भरतखंडांतील बहुतेक सर्व आर्यवंशीय क्षत्रियच नव्हे, तर म्लेच्छ-यवन-शाबर-शक या आर्येतर ज्ञातींचे क्षत्रियही नष्ट झाले; आणि त्यामुळें कलियुगास व तदुत्पन्न अधोगतीस प्रारंभ होऊन पुढील परदेशीयांच्या मोहिमा व राज्यस्थापना यांची संभवनीयता पक्की होऊन बसली. भारतीय युद्धानंतर लवकरच अनेक

क्षत्रियज्ञाति थोडथोड्या ब्राह्मणांसह देशत्याग करून परदेशांत वसाहत करावयास गेल्या; व त्यांनीं इराणपासून इंग्लंडपर्यंतच्या पश्चिमखंडांत आधुनिक सुधारणेचीं व इतिहासाचीं मूळ बीजें पेरलीं, असें वरील तिसऱ्या उपपत्तिवाद्यांचें म्हणणें आहे. सदरहू वसाहती केव्हां व कसकशा होत गेल्या, त्याचा अंदाज करण्याकरितां कलियुग व भारतीय युद्ध यांचा काल टोकळ मानानें निश्चित करणें जरूर आहे. करितां यासंबंधानें जुन्या भारतीय पंडितांचें काय मत आहे, तें आतां पाहूं.

भरतखंडाच्या विस्तीर्ण इतिहासांतील निरनिराळ्या गोष्टींचे काळ निश्चित करण्याचे कामीं मोठी अडचण इतिहासग्रंथांची अत्यंत उणीव ही होय. या ग्रंथांचे अभावीं तुटक वाक्यें, तुरळक उल्लेख व फुटकळ शिलालेख यांच्या पायावर कल्पनांची व अनुमानांची इमारत रचूनच कालनिर्णय करणें शोधकांस भाग पडतें. पण प्राचीन इतिहासग्रंथांची भरतखंडांत उणीव आहे यावरून भारतीयांस इतिहासलेखनाची कला अवगतच नव्हती किंवा त्यांनीं इतिहास लिहिलेच नव्हते, असें मात्र कोणीं उतावळेपणानें अनुमान करूं नये. इतिहासविषयकच नव्हे, तर इतर शास्त्रकलांसंबंधाचेंही आमचें प्राचीन वाङ्मय अडाणी, दुराग्रही व निर्दय परकीय मुसलमान राजांनीं हरप्रयत्न करून बुडविलें आहे. कांहीं विषयांचें वाङ्मय समूळ नष्ट झालें आहे, तर कांहींचें वाङ्मय अत्यंत छिन्न व त्रुटित स्वरूपांत अवशिष्ट राहिलेलें आहे. सारांश; हल्लीं हिंदुस्थान देश दरिद्री आहे म्हणून तो पूर्वी कधींही श्रीमान् व संपन्न नव्हता हें अनुमान जसें खोटें, तसेंच सांप्रत प्राचीन ऐतिहासिक वाङ्मय उपलब्ध नाहीं म्हणून आम्हांत पूर्वी हें वाङ्मय मुळींच नव्हतें किंवा तें लिहिण्याची कलाच आम्हांस अवगत नव्हती, हें अनुमानही तितकेंच निर्मूळ व असत्य आहे.

अरब, अफगाण, तार्तर इ० अर्ध सुधारलेल्या लोकांचा इतिहास पहा; यांनीं हिंदुस्थानच काय, पण इजिप्त, ग्रीस, इराण यांतीलही जुन्या ग्रंथांचा सरसहा नाशच केला आहे. अलेक्झांड्रिया येथील पुरातन व प्रचंड ग्रंथसंग्रहालयाचा विध्वंस करून मुसलमानांनीं तिकडील संस्कृति १ हजार वर्षें मागें हटविली ! पण भरतखंडांतील जुनीं ग्रंथसंग्रहालयें नष्ट करणारांनीं तर अवघ्या जगाचें अपरिमित नुकसान केलें आहे. बुद्धगया येथील प्राचीन संग्रहालयास महागंधोला (महाग्रंथालय) असें म्हणत असून त्याची इमारत नऊ मजली होती ! तींत प्राचीन बुद्धांच्या अनेक मूर्ति बसविलेल्या होत्या. नालंद येथील ' धर्मगंज ' संस्थेचें ' रत्ननिधि ' नामक ग्रंथालयही नऊ मजली असून त्यांत बौद्ध-

धर्माच्या महायान व हीनयान पंथांचे सर्व ग्रंथ संग्रहीत केलेले होते. उदंतपुरी येथील विहारांत तर बौद्ध व ब्राह्मणी धर्मग्रंथांचा फारच मोठा संग्रह असून त्याची इमारत वरील दोहोंहूनही प्रचंड होती ! पण बखत्यार खिलजीचा सेनापति महंमद बेनसामं यानें सन १२१२ सालीं ह्या ग्रंथांची होळी केली ! (हिंदुस्थान रिव्हयू, मार्च सन १९०६.) गुजराथेंतील अन्हलवाडा पाटण येथील ग्रंथालय अल्लाउद्दीन खिलजीनें जाळलें ! कोहाना येथील असेंच एक मोठें ग्रंथालय फिरोजशहा तखलधानें जाळलें, असें ' तारीख फिरोजशाही ' या मुसलमानी ग्रंथांत म्हटलें आहे. अवरंगझेब स्वतःस सुलतान शिकंदर म्हणवी. याशीं समकालीन असलेल्या सय्यद गुलाम हुसेन नामक मुसलमान इतिहासकारानें ' सैर मुताखरीन ' नामक ग्रंथांत लिहिलें आहे कीं, हिंदूंचे ग्रंथ जेव्हां जेव्हां व जेथें जेथें सांपडतील तेव्हां तेव्हां व तेथें तेथें तो ते जाळीत असे ! सारांश; युरोपांत पूर्वी गॉथ व वँडल लोकांनीं जो धुमाकूळ घातला त्याचेंच अनुकरण आरब व तार्तर लोकांनीं केलें !

हिंदुलोक खरा इतिहास मुळींच लिहून ठेवीत नसत; इतिहास म्हणून त्यांच्यांत जे ग्रंथ आहेत, त्या ब्राह्मणांनीं रचलेल्या निव्वळ भाकडकथा आहेत, असें फेरिस्ताचें मत होतें. पण तें साफ चुकीचें आहे, असें मि. डौ हे आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासाचे प्रस्तावनेंत लिहितात. दक्षिणेंत हिंदूंनीं लिहिलेले अनेक इतिहास अजूनही आढळतात; ओरिसामध्यें अनेक बखरी स्टर्लिंगसाहेबांस आढळल्या; व टॉडसाहेबांस तर त्या राजपुतान्यांत मुबलकच मिळाल्या; असें सांगून मि. विल्सन लिहितात (Mills India, Vol. II. पृ. ६७. टीप) कीं, "It is incorrect to say that the Hindus never compiled history." (हिंदूंनीं कधींच इतिहास लिहिले नाहींत, हें म्हणणें चुकीचें आहे.) काश्मीरचा इतिहास ग्रथित करणाऱ्या ' राजतरंगिणी '-वरून तर असलें वाङ्मय पूर्वी भरतखंडांत मुबलक होतें असें दिसतें व अजूनही शोध केल्यास असले ग्रंथ आणखी सांपडण्याचा संभवही आहे, असें प्रो. हीरन लिहितात. हिंदुस्थानांत सर्वत्र वंशावळी व बखरी लिहिण्याची पद्धत अद्यापही कायम आहे. राजपुतान्यांत तर ' जागे ' नांवाच्या लोकांचा हा धंदाच असून तिकडील रजपुतांस आपल्या पूर्वीच्या वीसवीस पिढ्यांतील पुरुषांचीं नांवें व त्यांचीं राहण्याचीं ठिकाणें माहीत असतात ! टॉडसाहेब राजपुतान्याच्या इतिहासाचे प्रस्तावनेंत लिहितातः-' महंमुदाच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्यापासून तेथें झालेल्या अनेक क्रांत्या व मुसलमानी बाद-

शहांची निष्ठुर धर्मांधता, यांचा विचार करतां हिंदुस्थानांत इतिहासग्रंथ शिल्लक राहिले नाहींत, याचें आश्चर्य वाटावयास नको, व हिंदूंना इतिहास लिहिणें माहीतच नव्हतें, असें अशक्य अनुमानही काढावयास नको. इतर सुधारलेल्या देशांत अतिप्राचीन काळापासूनच इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति दिसून येत असून ती अति सुधारलेल्या हिंदुराष्ट्रांत मात्र नव्हती, हें म्हणणें मुळींच शोभत नाहीं. सूक्ष्म व व्यापक दृष्टीवर अवलंबून असणारीं ज्योतिष-गणितादि शास्त्रें ज्यांनीं पूर्णत्वास नेलीं; शिल्प, मूर्ति, काव्य, गायन ह्या कला ज्यांनीं निर्माण केल्या येवढेंच नव्हे, तर त्यांसंबंधाचे अति सूक्ष्म व व्यापक नियमही ज्यांनीं घालून देऊन त्यांचीं शास्त्रें बनाविलीं; त्यांस राजाचे स्वभाव, त्यांचीं चरित्रें व त्यांचे कारकीर्दींत घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याची साधी व सोपी कला मुळींच माहीत नव्हती, अशी कल्पना तरी करतां येईल काय ? (Is it to be imagined that a nation so highly civilized as Hindus, amongst whom the exact sciences flourished in perfection, by whom the fine arts, architecture, sculpture, poetry, music were not only cultivated, but taught and defined by the nicest and most elaborate rules, were totally unacquainted with the simple art of recording the events of their history, the characters of their princes and the acts of their reigns ?) राजतरंगिणीचे काळीं तशाच प्रकारचे दुसरे इतिहास नव्हते असें म्हणावें तर आबूल फाझलनें हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची जी माहिती दिली, ती त्यानें कशावरून घेतली याचा खुलासा व्हावयास पाहिजे. चंदाच्या ' पृथ्वीराज रासा ' ग्रंथांतील उल्लेखांवरून असें अनुमान होतें कीं, त्याचे वेळीं असलेचें दुसरेही बरेच ग्रंथ प्रचलित असले पाहिजेत. चंद वगैरे भाट अडाणी होते असें कोणीं मानूं नये. राज्यकारभार, परराष्ट्रसंबंध, राजनीति वगैरे संबंधाचेही जे अध्याय चंदाचे ग्रंथांत आहेत, त्यांवरून भाट अडाणी होते असें दिसत नाहीं. राजपुताऱ्यांत विजयविलास, सूर्यप्रकाश, खिमात, जगद्विलास, राजप्रकाश, जयविलास, खोमानरासा, मानचरित्र इ. अनेक इतिहासग्रंथ सांप्रतही उपलब्ध असून गुजराथचा प्राचीन इतिहास सांगणारी ' रासमाला ' तर सुप्रसिद्धच आहे.

कलियुगारंभ, युधिष्ठिरकाल व भारतीय युद्ध हीं जवळ जवळ समकालीनच आहेत, अशी सामान्य लोकांची समजूत आहे. पण हिंदु सिद्धांतज्योतिषी यांचें यासंबंधानें थोडें निराळें मत आहे.

यातः षण्मनवो युगानि भमितान्यन्यग्युगांघ्रित्रयं ।
नंदाद्रीन्दुगुणास्तथा शकनृपस्यांते कलेर्वत्सराः ॥

असें 'सिद्धांतशिरोमणी' त वचन आहे. या श्लोकाच्या दुसऱ्या चरणांत असें सांगितलें आहे कीं, शककालारंभीं (नंद–अद्रि–इंदु–गुण) कलियुगाचीं ३१७९ वर्षें झालीं होतीं. अर्थात् सांप्रत ३१७९ + शक १८३६=५०१५ इतकीं वर्षें कलियुगाचीं झालीं आहेत.

'ज्योतिर्विदाभरण' नामक ग्रंथ संवत् २४ सालीं लिहिलेला असून त्यांत विक्रमाच्या कारकीर्दीचा इतिहास दिलेला आहे. या ग्रंथलेखनाचे काळीं कलियुगाचीं ३०६८ वर्षें होऊन गेलीं होतीं, असें त्यांत म्हटलें आहे. अर्थात् सांप्रत ३०६८+२४+ संवत् १९७१=५०१५ वर्षें कलियुगास सुरुवात होऊन झालीं.

आसन् मघासु मुनयः शासति पृथ्वीं युधिष्ठिरे नृपतौ ।
षट्द्विकपंचद्वि (२५२६)–युतः शककालस्तस्य राज्ञश्च ॥

असें वचन वराहमिहिराचे वाराहीसंहितेंत आहे. युधिष्ठिरकालीं सप्तर्षि मघा नक्षत्रांत असून शककालांत २५२६ वर्षें मिळविलीं म्हणजे युधिष्ठिर शक येतो, असें हें वचन सांगतें. अर्थात् २५२६+१८३६=४३६२ वर्षांपूर्वीं म्हणजे कलियुगाचीं ६५३ वर्षें झाल्यानंतर युधिष्ठिर जन्मला, असें यांत सांगितलें आहे.

शतेषु षट्सु सार्धेषु त्र्यधिकेषु (६५३) च भूतले ।
कलेर्गतेषु वर्षाणामभवन् कुरुपांडवाः ॥

असें कल्हणानें राजतरंगिणींत सांगितलें आहे, तें वरील वाराही संहितेंतील वचनाशीं जुळत आहे.

कलियुगारंभानंतर ६६६८$\frac{१}{२}$ व ६६२$\frac{३}{४}$ वर्षांनीं भारतीय युद्ध झालें, असें अनुक्रमें आर्यभट व आर्यभट या ज्योतिष्यांचें मत आहे. पण वृद्ध गर्गाचे मतें कलि-द्वापर-संधीला सप्तर्षि मघा नक्षत्रांत होते, अर्थात् त्याच वेळीं युधिष्ठिर झाला, असें आहे. युधिष्ठिर शकाचीं ३०४४ वर्षें झाल्यानंतर विक्रम सिंहासनावर बसला, असें ग्रेनी अकबरांत म्हटलें आहे. म्हणजे ३०४४+१९७१=५०१५ वर्षेंच येतात.

कलादगी जिल्ह्यांत 'यहोला' गांवीं नजीकच्या एका टेंकडीवर एक जैनमंदिर असून त्यावरील शिलालेखांत पुढील वचन आहे:–

त्रिंशत्सु त्रिसहस्रेषु भारतादाहवादितः ।
सप्ताब्दशतयुक्तेषु गतेष्वब्देषु पंचसु ॥ (३७३५)
पंचाशत्सु कलौ काले षट्सु पंच शतासु च । (५५६)
समासु समतीतासु शकानामपि भूभुजाम् ॥

हें मंदिर चालुक्यवंशीय दुसऱ्या पुलकेशीनें जेव्हां बांधलें, त्या वेळीं भारतीय युद्ध होऊन ३७३५ व शककालाचीं ५५६ वर्षें झालीं होतीं, असें वरील शिलालेखांत म्हटलें आहे. अर्थात् शककालापूर्वी ३७३५–५५६=३१७९ व्या वर्षीं म्हणजे ३१७९+१८३६= ५०१५ वर्षांपूर्वीं भारतीय युद्ध झालें, असें होतें.

सारांश; कलियुगास सांप्रत ५०१५ वर्षें होऊन गेलीं, या बाबतींत सर्व हिंदु ग्रंथकारांचें एकमतच आहे. पण भारतीय युद्धकालासंबंधानें मात्र ज्योतिष्यांत मतभेद आहे तें युद्ध कलि-द्वापरसंधीला न होतां कलीच्या सातव्या शकाचे मध्याचे सुमारास (६५३ राजतरंगिणा, ६६६$\frac{2}{3}$ पाराशर, व ६६२$\frac{1}{2}$ आर्यभट.) झालें, अशीं त्यांचीं मतें आहेत.

भारतीय युद्धकालासंबंधानें लौकिक समजूत व हिंदु ज्योतिषसिद्धांतकार यांचे मध्यें व खुद्द सिद्धांतकारांत कसाही मतभेद असला तरी सुमारें ४॥ हजार वर्षांपूर्वी भारतीय युद्धानंतर हिंदुस्थानांतून पूर्व, पश्चिम व उत्तर दिशांकडे हजारों लोकांनीं दूर दूर जाऊन मोठ-मोठ्या वसाहती स्थापिल्या, यांत शंका नाहीं. पूर्वेकडील वसाहती ब्रह्मदेश, सयाम, चीन, जपान, जावा, सुमात्रा वगैरे बेटें व अमेरिका यांत; उत्तरेकडच्या तुर्कस्थान, सायबिरिया, स्कांदिनीविया, जर्मनी, ब्रिटन, इराण, ग्रीस, रोम या भागांत आणि पश्चिमेकडील वसाहती पूर्व आफ्रिका व इजिप्त यांत झाल्या. इजिपाशियन, असीरियन, ग्रीक, जर्मन, स्कांदिनीवियन व द्रुइद लोकांचा धर्म, तत्त्वज्ञान, प्राचीन पौराणिक कथा व संस्कृति यांचा उगम भरतखंडांतूनच झाला आहे, असें मागें सांगितलेल्या पंथाच्या शोधक पंडितांचें मत आहे. सर वाल्टर राले यांनीं आपल्या जगाचे इतिहासांत (पृ. ९९.) भरतखंडांतच प्रथमतः मनुष्यप्राणी जन्मास आला व तेथूनच तो सर्व पृथ्वीवर पसरला, असें म्हटलें आहे. 'आरारात' हें आशियामायनरमधील प्रसिद्ध पर्वताचें नांव 'आर्यावर्त' शब्दाचाच अपभ्रंश होय, असें या पंथाच्या पंडितांचें म्हणणें आहे.

कौंट जॉर्न्स्टजर्ना (Theogony of Hindus, पृ. १६८.) व कर्नल आल्कॉट-(थिआसफिस्ट, मार्च १८८१.) यांनींही हिंदुस्थान हेंच मानवजातीचें व मानव-संस्कृतीचें मूळस्थान होय, असें प्रतिपादन केलें आहे. पाथागोरस, साकेतिस, प्लेटो, अरिस्टाटल, होमर, झेनो, सिसरो, व्हर्जिल वगैरेंचीं मतें—वेदव्यास, कपिल, गौतम, पतंजलि, कणाद, जैमिनी, नारद, मरीचि, पाणिनी यांच्या ग्रंथांतील तत्त्वांशीं तुलना करून पाहतां तीं दुसऱ्याचीं प्रतिबिंबेंच दिसतात. एकमेकांचा दृढसंबंध असल्यावांचून इतकें सादृश्य उत्पन्न होणें अशक्य आहे. आणि प्राचीन इजिप्शियन लोक हिंदुस्थानांतूनच गेले असून ग्रीस-रोमचे प्राचीन पंडित ज्ञानसंपादनार्थ इजिप्तमध्येंच गेलेले होते, असें आल्कॉटसाहेबांचें म्हणणें आहे. बहार प्रांतास ' पलश ' असें दुसरें नांव असून त्यांतून पुष्कळ लोक युरोपांत वसाहत करण्यास गेले; व म्हणूनच ग्रीसच्या प्राचीन लोकांस ' पेलासजिक ' हें सामान्य नांव मिळालेलें आहे, असें मि. पोकॉक (India in Greece, पृ. २९–३२.) लिहितात.

या पंथाच्या पंडितांचें व शोधकांचें आणखी एक प्रमाण ज्योतिषविषयक आहे. हिंदु-पारसीक, इजिप्शियन व चिनी लोकांचे प्राचीन पूर्वज वर्षाचे दिवस ३६५¼ व महिने १२ च मानीत; तसेंच दिवसाचे तास २४, क्रांतिवृत्ताचे विभाग १२ व आठवड्याचे दिवसही ७ च मानीत. हें विभागकरण नियमबद्ध नसूनही या चारी प्राचीन लोकांत सारखेंच कसें झालें, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या चारी लोकांहून प्राचीन व सुसंस्कृत असें एखादें पांचवें राष्ट्र असून त्याजपासून हे विभाग चारी लोकांनीं उचलले असले पाहिजेत, किंवा या चारींपैकीं एकापासून तरी बाकीच्यांनीं घेतले असले पाहिजेत. या चारांहून प्राचीनतर असें पांचवें राष्ट्र जगावर असल्याचा पुरावा नसल्यामुळें दुसराच पंथ स्वीकारावा लागतो व वरील विभागीकरणाचा उगम भरतखंडांतच मानावा लागतो. वरील चार प्राचीन लोकांचें जुनें ज्योतिषवाङ्मय हें बाल्यावस्थेत असलेलें शास्त्र दिसत नसून अतिसुसंस्कृत अशा प्राचीन शास्त्राचा अल्प असा अवशिष्ट भाग असलेलें दिसत असल्यामुळें, प्रत्येकानें आपापल्या परी स्वतंत्र रीतीनें वरील विभाग पाडले असेंही म्हणतां येत नाहीं.

भरतखंड हींच जगांतील सुधारलेल्या मनुष्यांची व त्यांच्या संस्कृतीची जन्मभूमि आहे; आणि येथूनच गेलेल्या लोकांची सर्व जगांतील निरनिराळ्या देशांत भिन्नभिन्न कालीं वसा-

हत झाली, असें मानणाऱ्या पंडितांचीं व शोधकांचीं या संबंधाचीं प्रमाणें पुढें दिल्या. प्रमाणें आहेतः—

१. **इजिप्त व इथिओपिया**—आपण 'पंत' नामक देशांतून इजिप्तांत आलों, असें प्राचीन इजिप्ती लोकांचें म्हणणें आहे. या मूळ देशाचें वर्णन दर-एल-बाबरी येथील हासलीटोप राणीच्या देवालयाचे भिंतीवर चित्रलिपीनें लिहून ठेवलेलें आहे. या वर्णनांत त्या मूळ देशांतील पशु व वनस्पति-विशेषतः किंमतवान् लांकडें-यांचीं जीं नांवें व माहिती आली आहे, ते पशु व वनस्पति निवळ हिंदुस्थानांतलेच आहेत, ते इतर देशांत उत्पन्नच होत नाहींत, असें दिसून येतें. अर्थात् इजिप्ती लोकांचे प्राचीन पूर्वज हिंदुस्थानांतून-विशेषतः सिंधुनदीच्या मुखाजवळच्या भागांतून-तिकडे गेले असें दिसून येतें. हे लोक ८।१० हजार वर्षांपूर्वी जहाजांत बसून समुद्रकिनाऱ्यानें सफर करीत जे निघाले ते बलुचिस्थान, इराण, अरबस्थान यांच्या किनाऱ्यांनीं प्रवास करीत करीत व इराणचें आखात, आरबी समुद्र, तांबडा समुद्र, पहात पहात अखेर इजिप्तच्या न्यूबिया व इथिओपिया यांच्या पूर्व किनाऱ्यावर उतरले, असें कर्नल आल्कॉट (थिऑसफिस्ट, मार्च १८८१.) व पोकॉक (India in Greece, पृ० ४२.) यांचें म्हणणें आहे. अटकेच्या दक्षिणेस सुमारें १० मैलांपर्यंत सिंधुनदाचें पाणी खोल व स्वच्छ असून त्याचा वेगही मोठा आहे; त्याचे खाली काळाबागपर्यंतच्या १०० मैलांत तर त्याचा ओघ फारच जोरदार असून पाण्याचा रंग काळसर निळसर झालेला आहे. तेथें सिंधुनदीस 'नीलाब्' (नील+आप्) हें नांव मिळालें आहे; व याच नांवाचें एक गांवही अटकेचे दक्षिणेस १२ मैलांवर नदीकांठीं आहे. अर्थात् येथील लोकांनीं इजिप्तमध्यें वसाहत केल्यानंतर तेथील मोठ्या नदीसही तेंच (नाईल-नीला) नांव दिलें. याशिवाय इजिप्तमधील इतर नद्यांचीं व प्रांतांचींही नांवें हिंदुस्थानच्या नद्यांचे, शहरांचे व प्रांतांचे नांवांवरून पडलेलीं आहेत; कांहीं राजांचीं नांवें (रामेसीस) भारतीय रामवंशीयांवरून पडलेलीं आहेत; उभय देशांतील शिल्पपद्धतीचे विषय व स्वरूप यांचेंही निकट साम्य आहे; व बऱ्याच प्राचीन इजिप्ती शब्दांचें रूपांतर व भाषांतर संस्कृतांतून सहज व स्वाभाविक रीतीनें होतें. असेंही मि. पोकॉक यांनीं (India in Greece, पृ. २०१.) म्हटलें आहे. स्मि, पृ. १७ व्या शतकाच्या सुमाराच्या ग्रीसमधील चित्रलिपीतील एका लेखांत माकडाला "कपि' हाच संस्कृत शब्द दिलेला आहे! मॉ. ब्लूमेनबाश यांनीं जगांतील निरनिराळ्या वर्णाच्या लोकांच्या डोकींच्या कवट्यांचा संग्रह केला असून त्यांतील भारतीय

व इजिप्ती लोकांच्या कवच्यांचा आकार व रंग यांत विशेषच साम्य दिसून येतें, असा प्रो. हीरन यांचा अभिप्राय आहे. (Asiatic nations, Vol. II. पृ. ३७३.) प्राचीन इजिप्ती लोकांच्या रीतीभाती, समाजरचना, धर्मसमजुती व राज्यसंस्था यांचें भारतीयांच्याशीं विलक्षण साम्य आहे, असेंही यांचें म्हणणें आहे.

प्राचीन इथिओपियामध्यें अर्वाचीन न्यूबिया, अबिसीनिया, डोंगाला वगैरे प्रांतांचा समावेश होत असे. यांतही सिंधुप्रांतांतूनच जाऊन लोकांनीं वसाहत केली. सिंधूला ' अबुसिन ' असें ग्रीक नांव असून तेथील लोकांनीं वसाहत केलेल्या प्रांतास ते सहजच ' अबुसिनिया ' म्हणूं लागले. फिलोस्ट्रेटस, युसेबियस, ज्यूलियस आफ्रिकेनस वगैरे प्राचीन ग्रीक ग्रंथकारांनींही असेंच नमूद केलें आहे. हिंदुस्थानांतील एका राजाचा विश्वासघातानें खून केला म्हणून कांहीं लोकांस भरतखंडांतून हांकून देण्यांत आलें व त्यांनींच इथिओपियांत वसती केली, असेंही फिलोस्ट्रेटसनें लिहिलें आहे. अबुसिनिया व भरतखंड यांचा व्यापारीसंबंध पुढेंही पुष्कळ वर्षें चालू होता; व अनेक हिंदु व्यापाऱ्यांनीं त्या भागांत जाऊन वसतीही केली होती. गँबिया व सेनिगाल नद्यांच्या खाड्यांतील मुख्य व्यापारी बंदरांस जीं नांवें आहेत, त्यांचें अंत्य ' कुंड ' (उदा० तंबा-कुंड) असें आहे ! सांप्रत युद्ध चालू असलेल्या जर्मन ईस्ट आफ्रिकेंतही मोठमोठ्या पर्वतांस मौंट शंभू व मौंट मेरू अशीं नांवें दिलेलीं आढळतात ! मंगो पार्कनें आफ्रिकेंत केलेल्या प्रवासाचें वर्णन लिहिलें असून त्यांतील ज्या ज्या शहरें वगैरेंचीं नांवें संस्कृत किंवा संस्कृतोत्पन्न आहेत, त्यांची एक यादच एशिआटिक जर्नल (Vol. IV. पृ. ३२४.) मध्यें दिलेली आहे !

२. इराण—परशुरामाचे अनुयायी ' परसू ' नांवाचे असून त्यांचें मुख्य शस्त्र ' परशु ' हें होतें; यांनीं भरतखंडांतून येऊन परशियांत वसाहत केली व त्या देशास हें नांव दिलें. शिवाय युफ्रेटिस हें तेथील मुख्य नदीचें नांवही ' यु-भारत-ईश ' या शब्दापासूनच निघालें आहे, असें मि. पोकॉक यांचें मत आहे (India in Greece, पृ. ४५.). हिंदुस्थानच्या वायव्य व उत्तर भागांतून येऊन प्राचीन इराणी लोकांनीं इराणांत वसती केली; आणि 'आर्य' हा शब्दच नव्हे तर कांहीं अंशीं धर्मविधिही त्यांनीं झोरोआस्ट्रियन धर्मांत शुद्ध स्वरूपांत राखले, असें मॅक्समुलरही म्हणतात (Science of Language, २४३-२५३.) प्राचीन इराणी किंवा ' पल्हवी ' जातीचे लोक मूळचे भारतीय क्षत्रियच असून कर्मलोपानें वृषल झाले, असें मनुस्मृतींत

(अध्याय १०, श्लोक ४३–४५.) म्हटलें आहे. संस्कृत व झेंद भाषांचें अत्यंत निकट साम्य आहे. झेंदच्या कोशांतल्या दहा शब्दांतले नऊ सहासात तरी शब्द शुद्ध संस्कृत असतात, हें पाहून सर विल्यम जोन्स यांस फार आश्चर्य वाटलें. चंद्रवंशीय बुधाचा पुत्र पुरूरवा. या पुरूरव्यास त्याच्या आईच्या 'इला' नांवावरून ऐल किंवा ऐर म्हणतात. त्याचे वंशज आपणास ऐरान् म्हणवूं लागले, आणि यांनींच इराणांत वसती करून त्यास इराण हें नांव दिलें. इराण व तुराण यांचे मध्यें मोठी युद्धें झाल्यानंतर प्राचीन इराणी लोक इराणांत वसाहत करण्यास आले, असें इराणचे जुने इतिहासकार लिहितात. याचा अर्थ असा कीं, (इराणी) ऐरान् व (तुराण) सूर्यान् –चंद्रवंशी व सूर्यवंशी–राजांचीं मोठीं युद्धें झाल्यानंतर पराभूत झालेले ऐरान् इराणांत रहावयास आले. तैग्रीस नदीवर (Cossoei) 'कौसी' नांवाचे लोक प्राचीन काळीं रहात होते, ते काशीहून तेथें गेले असें इतर शोधकांचें मत आहे. ब्राह्मणी धर्मांतील कांहीं बाबींसंबंधानें मतभेद झाला व तो पुढें तीव्र होऊन त्यावर धार्मिक रणें माजलीं; आणि त्यांचे अंखेरीस प्राचीन इराणी लोक इराणांत जाऊन राहिले, असें दोनही लोकांचे देव, देवता, विभूति, यज्ञविधि, गृह्यसंस्कार यांची तुलना करून मि. हौग यांनीं मत दिलें आहे. (Essays on the Parsees, पृ. २८७–२८८.) अजमीढ व नीला किंवा नीलिनी यांस पांच पुत्र होते; त्यांपैकीं फक्त दोघांचें वर्णन पुराणांत आहे, इतरांचें नाहीं. अर्थात् हे तिघे व त्यांचा वंश दूर देशीं गेला असावा. अजमीढाच्या या तीन पुत्रांचे वंशजच असिरियांतील 'मीडी' लोक असावेत. या मीडी लोकांचें सांकेतिक चिन्ह 'मेंढा' (अज) हेंच दिलेलें आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे, असें टॉड लिहितो. (राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ४१.) इराणांत वसती होऊन बरींच वर्षें झाल्यानंतर झोरोआस्टर–जरदुष्ट्र–जन्मास आला. त्याच्या काल ग्रीक लेखकांनीं निरनिराळा दिला आहे. ट्रोजन युद्ध ख्रि. पू. १८०० चे सुमारास झालें. त्याचे पूर्वी सुमारें ६०० वर्षें हा जरदुष्ट्राचा काल, असें ख्रि. पू. ४७० तला 'झंथुस' ग्रंथकार लिहितो. आरिस्टॉटलचे मतें प्लेटोचे आधीं ६००० वर्षें व इतरांचे मतें ट्रोजन युद्धाचे पूर्वी ५००० वर्षें असे त्याचे काळ आहेत. बाबिलोनियाचा ग्रीक इतिहासकार बरोसोस यानें हा काल ख्रि. पू. २२०० असा दिला आहे. तथापि इराणची वसाहत भारतीय युद्धापूर्वी बराच काळ झालेली होती, असें ठोकळ मानानें म्हणतां येईल. 'मनुष्यप्राण्यास मीं अत्यंत सुपीक भूमि दिली; ही भूमि (इराणचे) पूर्वेस

उंच भागीं आहे. तेथून जमशेद आपल्या अनुयायांसह इराणांत आला; तेव्हां तेथें ग्राम्य किंवा वन्य पशु अगर मनुष्यप्राणी मुळींच नव्हता ' असें हुरमज्द-ईश्वर-जरदुष्ट्राला सांगत असल्याचें ' वेंदिदाद ' मध्यें वर्णन आहे. वरील सुपीक, पूर्वेकडील व उंचावरची भूमि म्हणजे काश्मीर व अफगाणिस्थान हींच होय, असें (Theogony of the Hindus.) कौंट जार्न्स्टजर्ना हे लिहितात.

२. आशियामायनर—या प्रांतांतले प्राचीन ' खाल्डियन ' लोक हे हिंदुस्थानचेच प्राचीन आर्य होते. ' कुल-देव ' नामक ब्राह्मणांनीं वसाहत केलेला जो देश तो ' अपभ्रंश होत होत ' खालडिया ' बनला. ' प्राचीन खाल्डियन व बाबिलोनियन लोकांची संस्कृति हिंदुस्थानांतूनच आलेली होती ' असें कौंट जॉर्न्स्टजर्ना लिहितात. (Theogony of the Hindus, पृ. १६८.) सांप्रतच्या युरोपियन महायुद्धाप्रमाणेंच ट्रोजन महायुद्धांत ' अबंती ' (Abanti) नांवाच्या एका जातीचे योद्धे सामील झाले होते; ते माळव्यांतील सुप्रसिद्ध ' अवंती ' च्या राज्यांतलेच होत, असें मि. पोकॉक यांचें मत आहे. (India in Greece, पृ. ३३ .) असीरियनांचा प्राचीन राजा ' बेल ' किंवा ' बेल ' (Boal, Bel) या नांवाचा होता. हा राजा म्हणजे भरतखंडावर व कांबोडियापासून ग्रीसपर्यंतच्या देशांवर प्राचीनकाळीं ज्याचें विस्तीर्ण साम्राज्य होतें तो ' बलि ' राजाच होय, असें कित्येक ग्रंथकारांचें म्हणणें आहे. पालेस्टाइनमधील इस्त्रायली लोकांच्या पूर्वीची वसती तार्तार देशांतून आलेली असून तार्तार व हिंदुस्थान यांतलीं गांवें वगैरेंचीं पुष्कळ नांवें एकसारखींच आढळतात. यहुद्यांपूर्वीच्या पालेस्टाईनमधील लोकांची व हिंदुस्थानच्या प्राचीन लोकांची मूर्तिपूजा सारख्याच स्वरूपाची आहे; आणि पालेस्टाईनमधील प्राचीन क्षत्रिय व भरतखंडांतले रजपूत यांचेमध्येंही चालरीतींत विलक्षण साम्य आढळून येतें. म्हणून पालेस्टाईनमधील प्राचीन लोक-हिंदुस्थानांतून निघून तार्तर देशांतून तेथें वसाहतीस गेले असावे, असें मि. पोकॉक यांचें अनुमान आहे. (India in Greece, पृ. २२९.)

४. ग्रीस—ग्रीक व संस्कृत या दोनही भाषा बहिणीबहिणी असून त्यांची जननी निराळीच असावी, असें म्हणणाऱ्या शोधकांचा एक पक्ष आहे. पण ग्रीक भाषा संस्कृतोत्पन्न आहे, असें पुष्कळ भाषाशास्त्रज्ञांचें मत आहे. ग्रीक भाषा जर संस्कृतोत्पन्न तर ग्रीक लोक मूळचे भरतखंडांतलेच, हें अनुमान ओघानेंच निघतें. ग्रीक लोकांचें मूळस्थान भरतखंडच होय, हें मत प्रथमतः कर्नल टॉड व कर्नल विल्फोर्ड यांनीं प्रतिपादिलें; व पुढें अनेक

पुरावे गोळा करून मि. पोकॉक यांनी याच मताची परिपूर्ति करून 'India in Greece' नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथच लिहिला. होमरचे काव्यांत वर्णिलेल्या समाजव्यवस्थेचे सूक्ष्म व विस्तृत परीक्षण केल्यावर, ही व्यवस्था आशिआटिक-विशेषतः भारतीय-स्वरूपाची आहे, येवढेंच नव्हे तर दोन्ही देशांतील भाषा, धर्म, तत्त्वज्ञान, राज्यसंस्था, किंवहुना पर्वतांचीं व नद्यांचीं नांवें यांतही विलक्षण साम्य आहे, असें मि. पोकॉक यांनीं सिद्ध केलें आहे. ग्रीसमधील वसाहती मुख्यतः मगध देशांतूनच येऊन भारतीयांनीं केल्या. मगधाची राजधानी 'राजगृह' त्यावरून तेथील या लोकांचें 'राजग्रैहिक' किंवा नुसतें 'ग्रैहिक' असें नांव पडलें. या 'ग्रैहिक' नांवावरूनच क्रमानें ग्रैकोस, ग्रीकस् व ग्रीक हीं नांवें उत्पन्न झालीं आहेत. ग्रीकांचे आधीं ग्रीसमध्यें जे आले त्यांचें नांव 'पेलासजी' असें होतें; बहार प्रांताचें प्राचीन नांव 'पलाश' असें आहे. अर्थात् सदर पेलासजी लोकांचें मूळस्थान 'पलाश' देशच होय. या लोकांचा पहिला राजा पिलासगस हा (Gaia) गैयापासून झाला, असें एशियस नामक प्राचीन ग्रीक कवि म्हणतो. बहारची राजधानी 'गया' याशीं याचें विलक्षण साम्य आहे. याचप्रमाणें (मॉसिडोनिया-माकिडोन--मगध; यूबिया,-यू-बाबू-याज,-यु-बाहुजाः) मासिडोनियांत मगधांनीं व युबियांत बाहुजांनीं-क्षत्रियांनीं-वसाहती केल्या. 'कैलास' हें नांव देवांचें वसतिस्थान या अर्थी ग्रीकांत 'सिलास' व 'कैलॉन' आणि रोमनांत 'कोचीम' अशीं रूपांतरें पावलें आहे. बेहूट(झेलम)नदीवरील लोक ग्रीसमध्यें बिओशियन बनले. त्याचप्रमाणें काश्मीरचा मूळ संस्थापक काश्यप यावरून 'कोसोपी' लोकांनीं आपलें नांव ठेवलें. क्षत्रियईन=क्षत्रियैन हे ग्रीसमध्यें केस्ट्राईन बनले. हेलपांचें 'हेलिपॉस' व हेल देशाचें 'हेलेडॉस' अशीं रूपांतरें झालीं. हेलनामक पर्वताची मोठी रांग बलुचिस्थानांत असून त्याचे भोंवतालच्या प्रदेशास हेल आणि तेथील लोकांस व राजास हेल-ईन हेलेन म्हणत; याचें ग्रीक रूपांतर 'हेलेनीस' असें झालें आहे. उत्तर कुरूंचेंही ओटोरोक्युरी असें ग्रीक रूपांतर झालें. अशा प्रकारचीं अनेक साम्यें दाखवून त्यांवरच मि. पोकॉक यांनीं 'India in Greece.' ह्या ग्रंथाची इमारत उभारली आहे.

५. रोम--प्राचीन ग्रीकांप्रमाणें प्राचीन रोमन लोकांच्या देवदेवता ह्या दुसऱ्या कोणी नसून हिंदुस्थानांतल्या प्राचीनतर वीरपुरुषांचींच तीं दैविक रूपांतरें होत. रोमन लोक ज्या ट्रोजनांचे वंशज ते स्वतःही हिंदुस्थानांतून आलेल्या आर्यवसाहतवाल्यांचेच वंशज होते. 'रोम' नांव वास्तविक लॅटिन नाहीं. त्याचें मूळचें रूप 'राम' हें आहे !

संस्कृतांतील ' आ ' चा लॅटिनमध्यें 'ओ ' होतो, असें मि. पोकॉक म्हणतात (India in Greece, पृ. १४२ व १६६). ग्रीसमध्यें भारतीयांची वसाहत झाली, त्याच काळाचे सुमारास त्यांचेपैकीं कांहीं लोकांनीं इतालींतही वसती केली; व हेच प्राचीन ' इस्ट्रुस्कन ' लोक होत. यांचा धर्म व त्यांतील अनेक धर्मविधि यांचें इजिपशियन, हिंदु धर्मविधींशी विलक्षण साम्य आहे, असें कौंट जॉर्न्स्टर्जनाप्रभृतींचें मत आहे.

६. तुर्कस्थान व सायबीरिया—शापग्रस्त तुर्वसु व त्याचे वंशज हे तुरानियनांचे प्राचीन पूर्वज होत, असें मॅक्स मुलर यांचे मत आहे. (Science of language, पृ. २४२.) कित्येकांचे मतें तुर्क तुरुष्काचे वंशज होत. चंद्रवंशाच्या यादव व बाल्हीक शाखांनीं भारतीय युद्धानंतर खोरासानमध्यें राज्यें स्थापिलीं, असें जेसलमीरच्या रजपुती इतिहासांत लिहिलें आहे. श्रीकृष्णाचे पुत्र प्रद्युम्न, गद व सांब यांनीं वज्रपुराचा राजा लढाईंत मारला गेल्यावर तेथें अनक ब्राह्मण–क्षत्रियांसह जाऊन राज्य स्थापलें, व श्रीकृष्ण निजधामास गेल्यावर यादवांचे सांत्वनार्थ ते भरतखंडांत पुनः एकदा आले होते, असें हरिवंशांत (विष्णुपर्व, अ. ९७.) वर्णन आहे. हें वज्रपूर आलताई पर्वताचे उत्तरेस होतें. सायबिरियांतील सामोयेदीज व जोदीस जातींचे लोक या श्याम यादवांचेच वंशज असून त्यांची भाषा संस्कृतला जवळ आहे. सायबीरियांत जातांना वाटेंत मध्यआशियांत ते जेथें थांबले, त्यास अद्याप यदूकी–डांग (टेंकडी) असें म्हणतात ! यादवांच्या कांहीं शाखा झावुलीस्थान व समरकंद या भागांत गेल्या व गजनीही त्यांनींच वसविली. (टॉडकृत राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ८५.) हिरातचें प्राचीन नांव 'हेरी' असें असून सीस्तानचें शति-स्थान हें मूळरूप आहे, असेंही टॉड लिहितो. इराण, सायबिरिया व तुर्कस्थान यांतील कांहीं शहरांतून कांहीं हिंदु अद्यापही तुरळक आढळतात. देवमिता व अजाश्व यांचा पुत्र ' अश्व ' हा चंद्रवंशीय असून त्याचे नांवावरूनच ' अस्सा ' ही ग्रीक जात झालेली आहे; व एशिया हें नांवही याच लोकांवरून पडले आहे, असेंही त्याचें म्हणणें आहे. युरोप–याचें प्राचीन मूळरूप यू–रूप (संस्कृत सु-रूप) असें आहे. संस्कृत सु व ग्रीक यू यांचा अर्थ एकच आहे.

७. जर्मनी—जर्मन लोक 'टयूटॉन' वंशाचे असून या वंशाचा मूळ पुरुष (Manus ' मेनस् ' होता असें जर्मनपुराणकथांत म्हटल आहे. भारतीय आर्यांतही ' मनुः ' हाच सांप्रतच्या मन्वंतरांतला आदिपुरुष मानला आहे. इंग्रजींतील 'Man' व जर्मनमधील 'Mann' हे शब्द संस्कृतांतील ' मनुः ' शब्दापासूनच झालेले असून

जर्मनमधील ' Mensch ' व संस्कृतांतील ' मानुष ' हे शब्द एकच होत. (मॅनिंगकृत Ancient and Mediaeval India, Vol. I. पृ. ११८.) प्राचीन जर्मनांचा सैल व फैलावलेला झगा आणि डोक्यावर आणून गांठ देऊन बांधलेले सडक केंस हे दोनही प्राचीन ब्राह्मणांच्या सारखेच होते. तसेंच प्राचीन जर्मन लोकांत सकाळीं निजून उठल्याबरोबर शौचमुखमार्जनोत्तरचें पहिलें कृत्य म्हटलें म्हणजे प्रातःस्नान हें असे. ही चाल अर्थातच जर्मनीसारख्या थंड देशांत उत्पन्न होणें शक्य नसून ती आशियाखंडांतील उष्णदेशांतूनच आलेली असावी, असें कर्नल टॉड यांचें अनुमान आहे. (राजस्थानचा इतिहास, भाग १, पृ. ६३ व ८०.) प्राचीन जर्मन सूर्य, चंद्र, अग्नि यांची उपासना करीत; प्रेतें न पुरतां दहन करीत; त्यांच्यांत सतीची चाल असून पुनर्विवाह नव्हता, असें ' टॅसिटस ' या ग्रीक इतिहासकारानें नमूद केलें आहे ! ब्राह्मणांच्या प्राचीन नांवांचे पुढें बहुधा ' शर्मा ' असें पद लावीत असत. ब्राह्मणापासून ' ब्राह्मण्य ' हें जसें भाववाचक किंवा समुदायवाचक नाम झालें, तसेंच ' शार्मण्य ' हेंही नांव बनलें. श, ज, य हीं तीन अक्षरें पुष्कळ शब्दांत समान मानतात व म्हणूनच 'शार्मण्या ' चें 'जर्मन ' झालेलें आहे, असें कांहीं भाषापंडितांचें मत आहे ! अर्वाचीन हंगेरियन लोकही तेथील प्राचीन हिंदु वसाहतवाल्यांचेच वंशज असून त्यांची भाषा, चालरीत व वंश यांचें मूळ संस्कृतांतच सांपडेल असें, तिबेटी भाषेचा कोश तयार करणाऱ्या एका युरोपियन पंडितानें त्याचे प्रस्तावनेत लिहिलें आहे जर्मनींतील ' सॅक्सन ' लोकही वास्तविक भरतखंडाच्या वायव्यभागांत रहाणाऱ्या शकांचेच वंशज होत. ' शक-सूनुः ' व ' सॅक्सन ' यांचें साद्दश्य उघडच आहे. शिवाय प्राचीन सॅक्सन लोकांत स्वर्गास ' हिम्मेल ' (Himmel) असें नांव असून तें ' हिमालया ' पासूनच झालेलें स्पष्ट दिसत आहे. इंग्लंड वगैरे देशांतल्या अत्यंत प्राचीन सॅक्सन प्रार्थनामंदिरावरील जुन्या चित्रांचें हिंदुस्थानांतील कन्हया व गोपी यांच्या चित्रांशीं असलेलें साद्दश्य पाहून कर्नल टॉड यांचें असें मत झालें आहे कीं, सॅक्सन लोकांचे पूर्वज असलेल्या स्कँडिनेवियांतल्या ' अश्वी ' लोकांनीं भरतखंडांतून जातांनाच हीं चित्रें बरोबर नेलीं असावीं. (राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ५७.)

८. स्कांदिनीविया-(स्वीडन-नॉर्वे) या देशांतील लोकांचे प्राचीन पूर्वज हिंदुस्थानांतूनच आलेले क्षत्रिय होते. ' स्कंदनाभी' पासून वरील नांव निघालें आहे. 'स्कंद' ही क्षत्रियांचीच देवता असून ' स्कंदनाभि ' हें एखाद्या क्षत्रिय कुलाचें नांव असावें

स्कांदिनीवियन लोकांचा प्राचीन धर्मग्रंथ ' एद्द ' (Edda) नांवाचा असून त्याचें 'वेदा'शीं असलेलें साम्य स्पष्टच दिसत आहे, असें कौंट जॉर्न्स्टजर्ना म्हणतात. (Theogony of the Hindus, पृ. १०८.). त्या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, स्कांदिनीवियांत प्रथम वसाहत करावयास ' जीटी ' किंवा ' जित् ' (Getes किंवा Jits) लोक आले असून त्यांचें दुसरें नांव ' अशी ' (Asi) असें होतें; व त्यांचें मूळस्थान (Asigard) ' असिगर्ड ' होतें. असिगर्ड म्हणजे असिगड होय. ख्रि. पू. ५०० चे सुमारास ' आदिन ' स्कांदिनीवियांत आला व त्याचा वारस ' गोतम ' होय. अखेरचा बुद्ध ' महावीर ' असून (ख्रि. पू. ५३३) त्याचाही पट्ट शिष्य गौतमच होता. स्कांदिनीवियनांचीं प्राचीन वीररसप्रधान पुराणें व काव्यें यांचें इकडील तसल्या वाङ्मयांशीं पुष्कळच साम्य आढळतें. (राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ६४,६८.)

साती वारांस नांवें देण्याची तऱ्हा भरतखंड व स्कांदिनीविया यांत सारखीच दिसून येते; हें खालील कोष्टकावरून कळून येईल.

भारतीय नांव.	स्कांदिनीवियन नांव.
आदित्यवार	Sondag (Son=सूर्य.)
सोमवार	Mondag (Mon=चंद्र.)
मंगळवार	Tis-dag (This=एक वीरपुरुष.)
बुधवार	Ons-dag (oden=वोडन.) (वोद्धम्, बुद्ध.)
बृहस्पतिवार	Thors-dag (Thor=मुख्य देवता.)
शुक्रवार	Frej-dag(Freja=सौंदर्यदेवता.)
शनिवार	Lordag(Loge†=स्नान)

यावरून स्कांदिनीवियन-पुराणकथांचा मूळ उगम भरतखंडच होय, असें कौंट जार्न्स्टजर्ना–हे स्वतः स्कांदिनीवियन आहेत–म्हणतात ! (Theogony of the Hindus, पृ. १६९.)

" आशिया व युरोपखंडांचे उत्तरेस राहणारे प्राचीन ' हायपरबोरियन ' लोक हे मूळ कैवरपुराहून येऊन वसाहत करून राहिलेले होत. कैवरपुरी लोकांची दुसरी वसाहत थेसली प्रांतांत फीनिक्स नदीचे तीरीं झाली होती; व ते लोकही आपणास

'खिफारा' किंवा 'खिफेरा' म्हणवीत. हायपरबोरियनांच्या शेजारचे लोक 'पेशावारन' (Pashwaran) हे असून यांनी To-Maros (तो-मारोस) पर्वताचे दक्षिणेस वसाहत केली होती. तो-मारोस म्हणजे सुमेरु; व पेशवारन लोक पेशावरचे असून त्यांचें ग्रीक भाषेंत Passaron (पासारोन) असें रूप झालेलें आढळतें." असें मि. पोकॉक (India in Greece, पृ. १२७,१२९.) लिहितात.

९. ग्रेटब्रिटन–या देशांतल्या प्राचीन लोकांचा पहिला सुगावा 'ड्रुइड' नांवाचे जे मठवासी असत, त्यांचे हकीकतींत सांपडतो. पोकॉक वगैरे शोधकांच्या मतें हे मूळचे बौद्धधर्मीय ब्राह्मण असून काश्मीर वगैरे प्रांतांतल्या रजपूत जाती बरोबर घेऊन ब्रिटनमध्ये वसाहत करण्यास गेले. ड्रूइड लोक पूर्वजन्म व पुनर्जन्म मानीत. विश्वाची उत्पत्ति, पालन व क्षय करणाऱ्या तीन भिन्न देवताही यांच्यांत होत्या. धर्मज्ञानरक्षण व त्याचें अध्यापन यांनींही सर्वस्वीं आपणाकडेच ठेवलें होतें. हे द्रुइद लोक राजाचाही मुलाजा न ठेवतां त्यास शाप देत; 'कोयत्याचे झाड्यापुढें गवत जसें तुटून पडतें तसे राजे लोक द्रुइदाच्या शापामुळें जमीनदोस्त होत' असें वर्णन आहे ! (Theogony of the Hindus, पृ. १०४.) ब्रिटनांतील लोकांचा सुप्रसिद्ध जयघोष 'हुरा ! हुरा' हा तेथील प्राचीन रजपुतांच्या 'हरो ! हरो !' (हरहर) या सिंहनादाचाच अपभ्रंश होय, असें मि. पोकॉक यांचें म्हणणें आहे ! (India in Greece, पृ. ११४.). ब्रिटनांतील 'स्टोन हेंज' नांवाचे इमारतीचे प्राचीनावशेष हे या बौद्धधर्मीय लोकांचेच होत. ड्रूइड-द्रुइद–द्रुइ-देश–द्रुहयुदेशीय अशी यांची पीठिका असावी, असें कित्येकांचें अनुमान आहे. द्रुइद लोक अर्धचंद्र चिन्ह वापरीत; यावरून ते इंदुवंशीय असावे असें पोकॉक प्रभृतींचें म्हणणें आहे. रोमन लोकांनीं ब्रिटन जिंकल्यानंतर हे द्रुइद लोक 'आइल ऑफ मॅन-मध्यें जाऊन राहिले. त्या नांवाचें प्राचीन रूप 'आइल ऑफ मॉन' किंवा 'मॉनचें बेट, असें होतें. 'मॉन'=Saint असा अर्थ असून तो संस्कृत 'मुनी' सारखाच आहे. अर्थात् 'आइल ऑफ मॅन' म्हणजे द्रुइदांचें 'मुनिद्वीप' च होय ! कित्येक पाश्चात्त्य पंडितांनीं 'केल्टिक' व 'संस्कृत' भाषांचें व त्यांतील प्रयोगांचें विलक्षण साम्य दाखवून त्या भाषा बोलणाऱ्यांचा निकट संबंध सिद्ध केला आहे. हिंदुस्थानांतून जाऊन ब्रिटनांत वसाहत केलेल्या प्राचीन हिंदूंचेच द्रुइद लोक हे उपाध्याय होते, असें मत गॉडफ्रे हिगिन्स या ग्रंथकाराने 'Celtic Druids" या ग्रंथांत सप्रमाण प्रतिपादलें आहे.

१०. पूर्व आशिया—भरतखंडातून पूर्वदेशकडे गेलेल्या वसाहतींनी ब्रह्मदेश, कांबोडिया, जावा-सुमात्रादि बेटें, चीन, आष्ट्रेलिया व दक्षिण अमेरिकेंतील पेरू वगैरे देश व्यापले होते. ब्रह्मदेशांतील लोकांच्या चालीरीती, धर्मनीति व समाजव्यवस्था यांचें जसे चिनी तसेंच हिंदी संस्कृतीशींही साम्य आहे. ब्रह्मी लोक मूळचे भरतखंडांतले म्हणून व बौद्ध धर्माचा प्रसार चिनांत झाल्यापासून त्यांशीं निकट संबंध आल्यामुळें ब्रह्मी लोकांत या दोन्ही संस्कृतींचें मिश्रण झालेलें आढळतें. मुसलमानी अंमलानंतर हिंदुसमाजांत जारीनें सुरू झालेली सक्त पडद्याची चाल ब्रह्मी लोकांत न शिरतां ते तिजपासून अलिप्तच राहिले, यांचें तरी कारण हेंच होय. मनुस्मृतीवरील एक विस्तृत टीका हा ब्रह्मी लोकांचा धर्मशास्त्र ग्रंथ असून त्यास ते 'धर्मसाथ' म्हणतात, असें आवा येथील ब्रह्मी राजाकडे गेलेले इंग्रज वकील सिम यांनीं लिहिलें आहे. तिबेटी व ब्रह्मी संस्कृतींचा उगम भरतखंडांतच आहे, असें विल्सनसाहेबही म्हणतात. जसा ब्रह्मदेश तसाच कांबोडिया हा शब्दही उघड उघड संस्कृतोत्पन्न आहे. 'कांबोज' पासूनच 'कांबोडिया' रूप बनलें आहे एरियन नामक ग्रीक इतिहासकारानें 'कंबिस्थोली' असें एका जातीचें नांव दिलें आहे. त्याचें मूळ रूप अर्थातच 'कंब-स्थळ' असें असलें पाहिजे. अर्थात् या कंबस्थळांतील लोकांनीं कंबजांनीं-कांबोजांनीं—कांबोडियांत वस्ती केली असली पाहिजे. (Wilsons Vishnu Purana, Vol. II. पृ. १८२.) सदरहू कांबोडियांत १८८२ सालीं एका मोठ्या हिंदु देवालयाचे अवशेष एका फ्रेंच शोधकानें जमिनीतून उकरून काढले. चीनची वसाहतही मूळची हिंदुस्थानांतील लोकांनींच केली. चीन व तार्तरी यांतील प्राचीन वंशावळींत मूळ पुरुष 'अवर' हा दिलेला असून तो पुरूरव्याच्या पुत्र होता. (राजस्थानचा इतिहास, Vol. I पृ. ३५.) फोही नामक पुरुषाबरोबर चिनी लोकांचे प्राचीन पूर्वज ख्रि. पू. २९०० चे सुमारास पश्चिमेकडील डोंगराळ व उंच प्रदेशांतून येऊन चिनांत वसती करून राहिले, असें 'शू-किंग' नामक चिनी ग्रंथांत लिहिलें आहे. अर्थात् चीनची वसाहत काश्मीर, लदक, तिबेट व पंजाब येथील लोकांनीं वसविली असें दिसून येतें. चिनी लोकांचा धर्म व संस्कृति यांचा उगम भरतखंडांतच आहे हें सांगावयास नकोच; खुद्द 'चीन' हें नांव संस्कृतच असून बायबलांत त्याचें रूप 'सिनिम' असें आढळतें. 'मगध' शब्दाचें चिनी रूपांतर 'मो-किआतो' असें झालें आहे. मगधाच्या राजधानीस कुसुमपूर व पाटलीपुत्र अशीं दोन नांवें होतीं. यांची 'किआ-सो-मो-पानलो' व 'पाटोली-त्से' अशीं रूपांतरें चिनी लोकांनीं केलीं.

शेवटल्या शब्दांतल्या ' त्से ' पदाचा अर्थ ' पुत्र ' (मुलगा) असाच आहे. (रॉयल ए. सो. जर्नल, Vol. V.) नांवांची रूपांतरें किंवा अपभ्रंश करतांना चिनी लोकांनी अशी भाषांतरें केल्यामुळें पुष्कळ नांवांचा संस्कृत मागमूस उरलेला नाही. चीन व हिंदुस्थान यांचा फार प्राचीन कालापासून संबंध होता, याबद्दल हवे तितके पुरावे आहेत. काली-दासानें रेशमी वस्त्र या अर्थी ' चीनांशुक ' असा योजलेला शब्द सुप्रसिद्धच आहे. चिनी दरबारांत हिंदुस्थानांतून अनेकदां वकील आल्याचे उल्लेख जुन्या चिनी इतिहास-कारांचे ग्रंथांत आहेत.

अमेरिकेंतील पेरूकडे जाणाऱ्या लोकांनीं आरंभीं जावा व सुमात्रा द्वीपसमूहांत वसती केली होती. हे लोक सूर्य-सूर्यवंशीय क्षत्रिय–होत; आणि त्यांच्या पुराणकथा व ऐतिहासिक वीरकथा अजूनही तिकडील देवालयांत चित्रित केलेल्या व ग्रंथांत लेहिलेल्या आढळतात. कलिंगांतील ब्राह्मणादि लोकांना प्रथमतः जावाबेटांत वसती करून मूळचे लोक सुधारून राज्यें स्थापलीं. तेथें त्यांचा जुना शक अद्याप चालू असून त्याचा आरंभ ख्रि. पू. ७५ हा आहे. (एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास, पृ. १६८.) या बेटांतील दुसरी वसाहत सातव्या शतकाचे आरंभीं गुजराथेंतील एका राजानें केली; त्याजबेराबर आरंभीं ५००० व मागाहून २००० लोक तेथें रहावयास गेले. ह्यांचा धर्म बौद्ध होता व त्यांनींच त्या बेटांत या धर्माचा प्रसार केला. (रॉयल एशि. सोसा. चें जर्नल, १९०६. पृ. ४०२.) चौथ्या शतकांत या बेटांत प्रवास केलेल्या चिनी प्रवाशांसही तेथें हिंदूंचीच वसती आढळली. या बाजूचें सर्वांत मोठें बेट बोर्निओ हें आहे. हिंदु पुराणांतील कथाप्रसंगांचीं चित्रें काढलेलीं अनेक देवळें या बेटांतील अंतर्भागींही आढळतात. किनाऱ्यापासून ४०० मैल आंत असलेलीं देवालयें तर फारच श्रेष्ठ शिल्पकलेचीं दर्शक आहेत. जावाचे पूर्वेस असलेल्या ' बली ' द्वीपांत तर अद्यापही प्राचीन हिंदु वसाहतवाल्यांचे वंशज रहात असून त्यांचे मध्यें भारत-रामायणांच्या कविभाषेंतल्या प्रतीही आढळतात. आपला मूळ पुरुष सवीर गोदिंग हा होता, व तो आपला मूळ धर्मसंस्थापक ' बैतारा गुरु ' याचा पुत्र होय, असें सेलिबीज बेटांतले बुगीलोक सांगतात. धर्मसंस्थापकाचें वरील नांव उघड भारतीय दिसत आहे. सुमात्रा बेटांतही अंडरसन नामक मिशनऱ्यास अनेक जुनीं हिंदु देवालयें व जुन्या भग्नमूर्ति आढळल्या. आस्ट्रेलियांत सांपडणारे बरेच अवशेष भरतखंडाशीं संबंध असलेले आढळतात. तेथील रानटी लोक ' बूमरंग ' नांवाचें

एक लांकडी हत्यार वापरतात. याचा आकार बांकदार व एका टोंकाकडे चपटा असून तें शत्रूस प्रहार करून फेंकणाराकडे पुन्हा परत येतें। शत्रूस प्रहार करून पुन्हा वर्तुळाकार गतीनें परत येणाऱ्या व भारतांत वर्णिलेल्या बाणाची ही ओबडधोबड नक्कल असावी तथापि आस्त्रेलियांत फार वर्षें न राहतां भारतीय लोक तेथून निघून दक्षिण अमेरिकेंत पेरूदेशांत गेले असावे, असें अनुमान आहे.

११. **अमेरिका**—प्राचीन काळीं बहुतेक उत्तर अमेरिकाखंड दाट जंगलानें व्याप्त झालेलें होतें; पण मध्य व दक्षिण अमेरिकेची स्थिति तशी नव्हती. प्राचीन शहरें किल्ले, पूल, तलाव, पाट, रस्ते यांचे अवशेष बॅरन हंबोल्टप्रभृति प्रवासी व इतर शोधक यांस तिकडे इतके सांपडले आहेत कीं. प्राचीन काळीं या खंडांत अत्यंत सुधारलेले लोक राहत होते, याबद्दल आतां संशय राहिलेला नाहीं. या अवशेषांच्य शिल्पाचें स्वरूप भारतीय शिल्पपद्धतीशीं फारच जुळून आहे. प्राचीन अमेरिकनांच्या धार्मिक चालीरीती व समजुती यांतही असेंच साम्य आढळतें. (१) भारतीय लोक ज्याप्रमाणें धरित्री माता किंवा पृथ्वी माता ही एक देवता मानतात, त्याचप्रमाणें प्राचीन अमेरिकन मानीत. (२) बौद्ध, हिंदु व मारवाडी लोक ज्याप्रमाणें बुद्ध, कृष्ण व अजयपाळ यांच्या दगडावर उमटलेल्या पावलांची पूजा करतात, तींच तऱ्हा मेक्सिकन लोकांत आहे. (३) ग्रहणकाळीं राहु व केतु, चंद्र-सूर्यांस गिळतात. ह्या इकडच्या कल्पनेप्रमाणेंच अमेरिकनांची समजूत असून त्यांचा राहु-केतु 'माली-ओयो' नांवाचा आहे. (४) इकडील शिव, काली यांचेप्रमाणें अमेरिकन धर्मसंस्थापकांचे व उपाध्यायांचे चित्रांतही गळ्याभोंवतीं सर्पांचीं वेटोळीं काढतात. (५) 'गजवदन' गणेशाच्या मूर्तीची पूजा मेक्सिकन लोकांतही आढळते. हा प्रकार पाहून बॅरन हंबोल्ट यांनीं असें लिहिलें आहे कीं, 'It presents some remarkable and apparently not accidental resemblance with the Hindus'Ganesh'(ही मेक्सिकन देवता हिंदूंच्या गणेशासारखी थेट दिसत असून हें आश्चर्यकारक साम्य केवळ काकतालीयन्यायानें आलेलें दिसत नाहीं.) (६) जलप्रलयाची कल्पना अमेरिकनांतही आहे. (७) पृथ्वी एका प्रचंड कूर्माचे पाठीवर असून हें कांसव समुद्रावर पोहत आहे व हें जेव्हां समुद्रांत बुडतें, तेव्हां पृथ्वीवर जलप्रलय होतो, ही कल्पना उत्तर अमेरिकेंतील इंडियनांत आहे. (८) सर्प व नाग यांची पूजा हिंदु व प्राचीन अमेरिकनांतच नव्हे तर इजिप्ती, सिरियन, ग्रीक, चिनी व स्कांदिनीवियन या लोकांचेही पुराणग्रंथांतूनही आढळते. प्राचीन अमेरिकन

लोक पूर्वजन्म व पुनर्जन्मही मानीत. मूळच्या अमेरिकन लोकांचा पेहेराव हिंदुप्रमाणेंच असुन ते वाहाणाचे वापरीत; त्यांच्या स्त्रियांची लुगडें नेसण्याची तऱ्हा तर थेट भारतीय स्त्रीती म्हणतात ! दक्षिण अमेरिकेची ही वसाहत केव्हां झाली तें नक्की कळत नाहीं; पण ही वसाहत रामाचे कालानंतर केव्हां तरी झाली असली पाहिजे. कारण पेरू देशांतल्या मूळच्या अमेरिकनांचा मोठा उत्सव उत्तर हिंदुस्थानांतल्या प्रमाणें रामलीलेचच आहे. येवढेंच नव्हे तर या उत्सवास ते ' राम-सित्वा ' असेंच म्हणतात ! राम हा सूर्यवंशीय असून त्याच्या आईचें नांव कौसल्या व पत्नीचें नांव सीता, असेंच पेरूवियन लोक सांगतात; हें पाहून सर विल्यम जोन्सप्रभृति शोधकांस फार आश्चर्य वाटून पेरूवियन लोकांचें मूळस्थान भरतखंड याबद्दल त्यांस संशय राहिलेला नाहीं ! (Asiatic researches, Vol. I. p. ४२६.)

मनुष्यजातीचें, निदान आर्यवंशीय लोकांचें, मूळस्थान हिंदुस्थानच असून येथूनच त्यांच्या वसाहती जगांतील निरनिराळ्या देशांत झाल्या, अशा उपपत्तीचे पुरस्कर्ते तिच्या समर्थनार्थ जे पुरावे पुढें आणतात, त्यांचा गोषवारा अतांपर्यंत वर दिला. भरतखंडांतील प्राचीन पौराणिक परंपरा पाहिली तर ती याच उपपत्तीस अनुकूल असलेली दिसून येते. ' पृथ्वीवरील सर्व मनुष्यांनीं आपापला सदाचार भरतखंडांतील ब्राह्मणांपासून समजून घ्यावा ' अशी जी मनूची आज्ञा (अध्याय २, श्लोक २०) आहे, ती जगांतील सर्व देशांत चातुर्वर्ण्यविशिष्ट-निदान चातुर्वर्ण्य मानणारा-समाज अस्तित्वांत होता त्या काळास अनुलक्षून केलेली आहे. पृथ्वीवरील दूर दूर देशांत पसरलेल्या शेंकडों क्षत्रिय ज्ञातींचा ब्राह्मणांशीं संबंध तुटला, त्यांचा सदाचार व धर्माचारही सुटला व त्यामुळें या सर्व जाती आर्यधर्मास व समाजव्यवस्थेस आंचवल्या. पण त्यांचेपैकीं कांहीं आर्यभाषा बोलणारे राहिले, इतर मात्र भाषाही म्लेंच्छ बोलूं लागले व सर्व दस्यु बनले, असें आमच्या धर्म-शास्त्रकारांचें मत आहे. एका प्राचीन संस्कृत ग्रंथकाराने आर्येतर मुख्य भाषा पारसीक, यवन, रोमक व बर्बर या आहेत, असें लिहिलें आहे. यांपैकीं पहिल्या तीन फारशी, ग्रीक व लातिन या होत; पण चौथी कोणती ते कळत नाहीं, असें मि. कोलब्रुक यांचें म्हणणें आहे. मनुस्मृति व महाभारत यांत (मनु. अध्या. १०; म. भा. अनुशासन पर्व, अ. ३४; शांतिपर्व, अ. ६४; व हरिवंश.) अशा क्षात्रियजातींचा नामनिर्देश आला आहे. पौंड्रक, चौंड्र, द्रविड, कांबोज, यवन, शक, पारद, पल्हव, चीन, किरात, दरद, खश. कर्थिद, पुलिंद, उशीनर, कोलिसर्प, माहिषक, मेकल, लाट, कोन्वशिर, शौंडिक,

दर्व, चौर, शर्वर, बर्बर, गांधार, तुषार, कंक, आन्ध्र, मद्रक, पुलिन्द, रमठ, केरल वगैरे, सुमारें ३२।३३ परदेशीय पण आचारभ्रष्ट आर्य क्षत्रियज्ञातींचा उल्लेख वर सांगितलेल्या ग्रंथांत आला आहे. विष्णुपुराणांत तर हूणादि इतर मिळून २०० जातींची याद दिली आहे ! सगरानें आपला पिता बाहुक याचेबद्दल सूड उगविण्याकरतां सर्व हैहय वंशाचे लोक ठार मारले. शक, यवन, काबोज, पारद व पल्हव यांजवरही हाच प्रसंग आला होता. पण ते वसिष्ठास शरण गेले; व त्यांचे आज्ञेवरून सगरानें वेदाध्ययन व वषट्कार यांची त्यांस मनाई केली; (अ. ३२६.) आणि यवनांनीं शिर मुंडावें, शकांनीं निमें डोकें मुंडावें, पारदांनीं डोक्याचे केस सबंध ठेवावे व पल्हवांनीं दाढ्या राखाव्या, अशी सगरानें आज्ञा केली; आणि त्यांस आर्य समाजांतून हांकून दिलें, असें विष्णुपुराणांत वर्णन आहे. वरील पांचांत कोलिसर्प, माहिष, दर्व, चोल व केरळ या आणखी पांच जातींचा समावेश करून हीच कथा हरिवंशांतही दिली आहे. या वरील इतर जाति म्हणजे कोणत्या, त्यांचे अर्वाचीन वंशज कोण व त्यांनीं कोणत्या देशांत वसाहती केल्या, या संबंधानें अनेकांनी अनेक तर्क केले आहेत; पण सर्वांची निश्चित ओळख अद्याप झालेली नाहीं. यवन (ग्रीक), पल्हव (पेहलवी भाषा बोलणारे मीडी), कांबोज (कांबोडियांतले), चीन (चिनांतले), वगैरे कांहीं स्थलें मात्र निश्चित झालीं आहेत. भारतीयांच्या प्राचीन पूर्वजांस पृथ्वीची भौगोलिक स्थूल माहिती होती यांत संशय नाहीं. ' सप्तद्वीपा वसुंधरा ' हें वचन महशूरच आहे. हीं द्वीपें म्हणजे जंबु, प्लक्ष, पुष्कर, क्रौंच, शाक, शाल्मलि व कुश हीं होत. येथें द्वीप म्हणजे बेट असा अर्थ नसून इंग्रजींत ज्यास (continent) किंवा मराठींत खंड म्हणतात, त्या अर्थीं हा शब्द योजलेला आहे. जंबुद्वीपाचा एक लहान भाग भारतवर्ष आहे, असें सांगितलें आहे, त्यावरून हेंच सिद्ध होतें. ह्या सात द्वीपांचीं वर्णनें पुराणांतून विस्तृत रीतीनें केलेलीं आहेत; पण त्यांजवरून हीं द्वीपें म्हणजे खंडें कोणतीं याचा बिनचूक उलगडा होत नाहीं. त्यासंबंधानें अनेकांनीं अनेक तर्क मात्र केलेले आहेत. पृथ्वीच्या सांप्रतच्या अवस्थेचा भौगोलिक दृष्टीनें विचार केला तर उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, आफ्रिका आशिया-युरोप, आस्त्रेलेशिया आणि दक्षिण व उत्तरध्रुवप्रदेश अशीं सात खंडें होतील. आशिया-युरोप यांचें भिन्नत्व भौगोलिक नसून भाषा व वर्ण या दृष्टीचेंच आहे. या सात खंडांसच वरील द्वीपांचीं नांवें दिलेलीं आहेत, कीं हीं द्वीपें अति जुनीं असून जलप्रलयामुळें त्यांतलीं कांहीं बुडून व कांहींचें स्वरूप बदलून हल्लींचीं खंडें निर्माण झालीं आहेत; हें निश्चयात्मक रीतीनें ठरविण्यास तूर्त कांहींच साधन नाहीं.

भरतखंड हें मनुष्यजातीचें किंवा आर्यवंशाचें मूळस्थान नव्हे; त्यांचें मूळस्थान मध्य आशिया किंवा उत्तर ध्रुव प्रदेशच होय, अशा उपपत्तीच्या पुरस्कर्त्यांचेंच म्हणणें खरें आहे असें मानलें किंवा सिद्ध झालें तरी भारतीयांचा इतर सुधारलेल्या परराष्ट्रांशीं प्राचीनकाळापासून निकट संबंध आहे, ही गोष्ट निःसंशय पुराव्यावरून सिद्ध होण्यासारखी आहे. सुदास सम्राटानें सगळें जग व त्यांतील सर्व देश जिंकले होते, असें ऐतरेय ब्राह्मणांत वर्णन आहे. 'त्रिदशाः समुद्रे या द्वीपा आसन् पुरूरवाः' असें महाभारताचे आदिपर्वांत वचन आहे; त्यावरून पुरूरव्याचा अंमल समुद्रांतील १३ बेटांवर चालत होता, असें कांहींनीं अनुमान केलें आहे. तसेंच सगर व त्याचे ६० हजार पुत्र यांचे कथेवरून, ह्या राजाचें सागरावर वर्चस्व असून त्याचे जवळ ६० हजार खलाशी होते, असा अर्थ कर्नल टॉड यांनीं काढला आहे (राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ६०२.) अति पुराणकाळीं या राजांजवळ सर्व पृथ्वी जिंकण्यास जरूर इतके शूर शिपाई कोठून आले? असा कोणी प्रश्न करतील. पण भारतीय युद्धांत झालेला भयंकर संहार व त्यानंतर लवकरच भरतखंडांतून बाहेर वसाहती करण्यास गेलेले लक्षावधि लोक, यांचा विचार करितां भारतीय युद्ध काळाचे पूर्वीं भरतखंडाची लोकवसती पुष्कळच अधिक होती, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. ब्रिटिश जनरल सर हामिल्टन यांनीं रूसो-जपानी युद्ध प्रत्यक्ष पाहून त्यासंबंधानें कांहीं टिपणें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांत ते लिहितात कीं, "There is material in North of India and in Nepal sufficient and fit, under good leadership, to shake the artificial society of Europe to its foundation." (उत्तर हिंदुस्थानांत व नेपाळांत शूर व लढवय्ये जातीचे पुरेसे व लायक लोक असून ते चांगल्या सेनापतीचे नेतृत्वाखालीं दिले तर युरोपांतील कृत्रिम समाजव्यवस्थेची इमारत पायापर्यंत गदगदा हलवितील!) सन १८८८ सालांतील 'कॉंटेंपोररी रिव्हयू' मासिकाचे जूनचे अंकांत मि. टौनशेंड यांनीं दिलेला अभिप्राय तर याहून स्पष्ट आहे. प्रशियांतील सक्तीच्या लष्करी शिक्षणाची पद्धति हिंदुस्थानांत अंमलांत आणली, तर बैठें व स्थानिक सैन्य वगळून २५ लक्षांचें खडें सैन्य हिंदुस्थानांत तयार होऊन त्यांत दरसाल ८ लक्ष नवे लोक लष्करी शिक्षण मिळविण्यास येतील; असें कळवून मि. टौनशेंड म्हणतात कीं, "A force with which not only Asia but the whole world

might be subdued " (या सैन्याचे बलावर आशियाखंडच नव्हे, तर सगळेंच जग जिंकतां येईल !) सांप्रतच्या हिंदुस्थानवासीयांच्या संबंधानें जर ही स्थिति तर प्राचीनकाळच्या मुबलक लोकवसतीच्या क्षात्र काळांत जग जिंकणें ही गोष्ट अशक्य होती, असें म्हणतां यावयाचें नाहीं.

हा अतिप्राचीन काळ सोडून देऊन थोडें अलीकडच्या काळांत आल्यास प्लिनी नामक ग्रीक इतिहासकाराचे सांगण्यावरून असें कळतें कीं, एका काळीं इराणचा तीन चतुर्थांश भाग भारतीयांचे अंमलाखालीं होता. इराणचा बराच मोठा भाग मासिडोनियन लोकांनीं हिंदूंस दिला होता, असें स्ट्रॅबोही सांगतो. अफगाणिस्थानांतील गझनी शहर गजसिंग नामक यादववंशीय राजानेंच मूळ वसविलें होतें. व ही गोष्ट शहराचे नांवांतही स्पष्ट दिसते. जेसलमीरच्या यादववंशाच्या जुन्या बखरींतून असें सांगितलें आहे कीं, भारतीय युद्धानंतर यादववंशीय लोक पश्चिमेकडे गेले, त्यांनीं गझनीपासून समरकंदपर्यंत राज्य स्थापिलें; पण मुसलमानी धर्माचा उदय झाल्यावर त्यांनीं पुन्हा सिंधुनदीचे अलीकडे येऊन वसती केली. मेवाडच्या राण्यांचा मूळपुरुष बाप्पा रावळ यानें चितोड येथें आपला राजवंश स्थापल्यावर खोरासानला जाऊन तेथेंही राज्य स्थापिलें. मुसलमानी धर्म स्थापित होण्याचे सुमारास अफगाणिस्थान, इराण व मध्य आशियांत हिंदूंचींच राज्यें होतीं, असें कर्नल टॉड यांनीं (राजस्थानचा इतिहास, Vol. II. पृ. २२२–२३१.) अनुमान काढलें आहे.

सेल्युकसचा वकील मेगस्थनीस, अँटिओकस् व डायोनिशिअस यांचा डिमेकस व दुसऱ्या टॉलमीचा बासिलिस हे वकील चंद्रगुप्त व त्याचा मुलगा अमृतघट यांचे दरबारीं आले होते. ख्रि. पू. २१० चे सुमारास अँटिओकस (धि ग्रेट) यानें यादवकुलांतील सुभगसेन राजाशीं संयोग–संधि केला होता; पण पुढें दोघांत बितुष्ट झालें, व अखेर यादवराजनें अँटिओकसचा पराजय करून त्यास लढाईत ठार मारलें. (राजस्थानचा इतिहास, Vol. II. पृ. २३०.) ग्रीकराजा सेल्युकस यानें तर आपली कन्या चंद्रगुप्तास दिली होती. या ग्रीक राजकन्येबरोबर ग्रीसमधून अनेक तरुण व सुंदर दासी पाटलीपुत्रास आल्या होत्या. तेव्हांपासून या यवनींस दासी म्हणून ठेवण्याची चाल भारतीय राजांनीं पाडली. या यवनी मोल देऊन आणीत किंवा खंडणी म्हणून घेत. नेहमीं राजांबरोबर राहून त्यांची हरएक कामें या करीत. इराणचा राजा नशिरवान यानेंही आपली मुलगी चितोडच्या महाराण्यास

दिली होती. उज्जयिनीच्या राजाचा ऑगस्टसशीं पत्रव्यवहार होता, असें जस्टिन नामक ग्रंथकार लिहितो. या ऑगस्टसला सामोस येथें भरतखंडांतून आलेले वकील भेटले; व त्यांनीं त्यास हत्ती, मोतीं व हिरे यांचे नजराणे भारतीय राजातर्फे दिले. आणखी एकदां क्लॉडियसकडे हिंदुस्थानांतून ४ वकील असेच आल्याचें प्लिनी सांगतो. याच वकिलाकडून प्लिनीला लंकेची माहिती कळली व ती त्यानें आपल्या ग्रंथांत लिहिली. ट्राजन व अँटोनियस पायस या रोमन बादशहांकडेही हिंदुस्थानांतून दोनदां असेच वकील आले असून रोम व भरतखंड यांचा हा दरबारीसंबंध इसवी सन ५३० पर्यंत अखंड चालला होता. पांड्याचे राज्याची स्थापना दक्षिण हिंदुस्थानांत ख्रि. पू. ५ वे शतकांत झाली. यानंतर कांहीं वर्षांनीं या राज्यांतून एक वकील ऑगस्टसकडे आला व उभयतांची मुलाखत सिरियांत झाली, असें स्ट्रॅबो लिहितो. या वकिलाबरोबर एक ब्राह्मण अथेन्सला गेला होता; तेथें कांहीं कारणानें या ब्राह्मणानें अग्निकाष्ठें भक्षण केलीं, तें पाहून ग्रीकांस अत्यंत आश्चर्य वाटलें. सिरियाचा अँटिओकस, इजिप्तचा टॉलमी फिलॅडेल्फास, मसिडॉनचा अँटिगोनस गोनेटस, केरिनीचा मगस व एपिरसचा दुसरा अलेक्झांडर, इतक्या ग्रीक राजांचीं नांवें अशोकाचे शिलालेखांत आलेलीं आहेत.

भारतीय युद्ध झाल्यापासून भरतखंडांत कलियुग सुरू होऊन त्याची अनेक बाजूंनीं सारखी अवनति होत होती, तरीही त्याचेबद्दल बाहेरच्या जगांत एक प्रकारचा पूज्यभाव, आदरबुद्धि व दरारा वाटत होता. पडत्या काळीं सुद्धां अलेक्झांडरचे स्वारीपर्यंत हिंदुस्थानानें अनेक परकीयांच्या मोहिमांस दाद दिली नाहीं. असिरियाचे साम्राज्याच्या वैभवाचा कळस सेमिरामिस राणीचे काळीं झाला. तिनें तीन वर्षें जंगी तयारी करून हिंदुस्थानावर स्वारी केली. तिजबरोबर ३ लक्ष पायदळ, ५ लक्ष स्वार व २००० नावा असून उंटाच्या पाठीवर घालून तिनें पुष्कळ कृत्रिम हत्तीही बरोबर घेतले होते म्हणतात ! पण अखेर ह्या सैन्याचा पूर्ण मोड होऊन त्यांतलें पुरें $\frac{2}{3}$ सैन्यही परत गेलें नाहीं ! कित्येकांचे मतें सेमिरामिस राणीही याच लढाईंत मारली गेली. अलेक्झांडरशीं लढण्यांत भारतीयांनीं कसा पराक्रम दाखविला आणि अखेर आपसांतील फूट व भाऊबंदकी यांनीं ग्रस्त झाल्यामुळें भरतखंड परकीय सत्तेखालीं कसें गेलें, त्याचें वर्णन पूर्वी एका प्रकरणांत केलेंच आहे.

भारतीयांचे भाषा, लिपी व वाङ्मय.

जगांतील कोणत्याही रानटी लोकांच्या जीवनक्रमाकडे पाहिलें असतां असें दिसून येतें, कीं, त्यांचेमध्यें भाषा अगदीं आरंभीं उदयास ये ो. भाषेंतील भिन्नभिन्न ध्वनींचीं भिन्नभिन्न चिन्हें कल्पून भाषेचीं लिपी बनावयास बराच काळ लोटावा लागतो. हा काळ लोटून लिपी बनली म्हणजे तो समाज संस्कृतींत बराच उच्च दर्जास पोंचला आहे, असें खास समजावें. भाषा व लिपी यांचा हा प्रचार पुष्कळ काळ चालू राहिला म्हणजे त्या लोकांत हळुहळू वाङ्मय निर्माण होत जातें. सारांश; कोणत्याही राष्ट्राची संस्कृति, बुद्धिवैभव व मोठेपणा यांचें नक्की मोजमाप करावयाचें असल्यास त्याची भाषा, लिपी व विशेषतः वाङ्मय यांची रचना, स्वरूप व योग्यता ठरविणें हें एक मुख्य व अचूक साधन आहे. राष्ट्राची विद्वत्ता, शहाणपण, संस्कृति, विद्याकला व सुधारणा या सर्वांची नोंद वाङ्मयांत झालेली असते; वाङ्मय हें राष्ट्राच्या बुद्धिवैभवाचें व मनोरचनेचें स्पष्ट चित्र असतें; आणि राष्ट्राचे विचार, उच्चार व आचार हीं त्याच्या वाङ्मयांत आरशाप्रमाणें स्पष्ट पहावयास सांपडतात. म्हणूनच राष्ट्राची वरीवाईट स्थिति आणि त्याच्या संस्कृतीचा दर्जा व स्वरूप ठरवितांना त्याची भाषा, लिपी व वाङ्मय यांचाच विचार समाजशास्त्रवेत्ते व इतिहासकार नेहमीं प्रथमारंभीं करीत असतात. भारतीयांची संस्कृत भाषा, लिपी व वाङ्मय आणि तिजपासून निर्माण झालेल्या हिंदुस्थानांतील अनेक देशी भाषा, लिपी व वाङ्मयें यांची जगांतील कोणतीही प्राचीन व अर्वाचीन भाषा, लिपी व वाङ्मय यांशीं तुलना करणारांस भारतीयांच्या श्रेष्ठत्वाचा सहज व तात्काळ प्रत्यय पूर्वीं आलेला आहे व पुढेंही येईल.

संस्कृत वाङ्मयाच्या युरोपियन पंडितांत सर विल्यम जोन्स हे बुद्धीची कुशाग्रता व मर्मज्ञता या गुणांत सर्वांहून श्रेष्ठ होते. ते संस्कृत भाषेसंबंधानें लिहितातः—"संस्कृत भाषेचें स्वरूप व घटना हीं आश्चर्यकारक असून तिची रचना ग्रीक भाषेहून परिपूर्ण व तिची शब्दसंपत्ति लॅटिनहून जास्त आहे, आणि शिवाय या दोहोंहूनही तींत अद्वितीय सुसंस्कृतता आहे. (More perfect than the Greek, more copious than the Latin and more exquisitely refined than either. Asiatic Researches, Vol. I. पृ. ४२२). संस्कृत भाषेइतके दीर्घ

समास जगांतील कोणत्याही भाषेंत नाहींत; कित्येक समास तर १५६ अक्षरांचे आहेत !" (Asiatic Re. Vol. I. पृ. ३६०). अनेकभाषाकोविद **प्रो. बॉप्** लिहितात कीं, "**ग्रीक** व **लॅटिन** भाषांहून **संस्कृत** भाषा अधिक परिपूर्ण व शब्दसंपन्न असून त्या दोहोंहून तींत सौंदर्य व वक्तृत्व जास्त भरलेलें आहे." (एडिंबरो रिव्ह्यू, व्हा. ३३, पृ. ४३). **प्रो. मॅक्स म्युलर** म्हणतात कीं, "**संस्कृत** ही भाषांची भाषा (Language of Languages) आहे ! ज्योतिषाशीं गणिताचा जो संबंध तोच **संस्कृत** भाषेचा भाषाशास्त्राशीं आहे, हें विधान अगदीं खरें आहे." (Science of Language, पृ. २०३). सदरहू **प्रो. बॉप्** यांनीं सन १८४८ सालीं **संस्कृत** व इतर **आर्य** भाषा यांचे तुलनात्मक व्याकरणावर एक ग्रंथ लिहिला, तेव्हांपासूनच **पाश्चात्त्यां**चें तौलनिक भाषाशास्त्र निर्माण झालें. अर्थात्, **संस्कृत** भाषा व वाङ्मय यांचा **युरोपियनां**स परिचय झाल्यामुळेंच हें शास्त्र जन्मास आलें आहे, ही **सर विल्यम हंटर** यांनीं दिलेली कबुली (गॅझिटियर, इंडियन, पृ. २६४.) यथार्थच आहे. **प्रो. हीरन** लिहितातः—" जगांत अत्यंत संपन्न व सुसंस्कृत अशा ज्या भाषा आहेत, त्यांत **संस्कृत** भाषेची गणना केली पाहिजे. शिवाय या भाषेची वाङ्मयसंपत्तिही फार मोठी आहे. तिच्यांतील काव्यें जितकीं मनोहर व सुंदर आहेत, तितकेंच तिच्यांतील तत्त्वज्ञानविषयक वाङ्मयही संपन्न आहे; कारण अत्यंत सूक्ष्म अमूर्त कल्पनांचे निदर्शक असे हजारों पारिभाषिक शब्द त्यांत आहेत !" (Historical Researches, Vol. II. पृ. १०९।११०). **संस्कृत** भाषेच्या **लॅटिन**हून श्रेष्ठ अशा शब्दसंपन्नतेचा गौरव करतांना **लीपेरी पाओलिनो** नामक ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं, " या भाषेंत एकाच वस्तूचे दर्शक असे अनेक शब्द आहेत. उदाहरणार्थ; सूर्यवाचक ३०, चंद्रवाचक २०, गृहवाचक २०, दगड या अर्थी ६, पर्णवाचक ५, कविवाचक १० व गाईचे वाचक ९ वेगवेगळे शब्द आहेत !" **पाओलिनो**च्या या मतावर टीका करून **मिल** इतिहासकारानें **हिंदूं**विषयींचा आपला दुराग्रह व भ्रष्ट अभिरुचि प्रगट केली आहे. " एका वस्तूचा दर्शक एकच शब्द असावा, जास्त असूं नये, हा भाषेचा मोठाच गुण मानला पाहिजे. " असें हे साहेब म्हणतात. पण यावर प्रो. **विल्सन** यांचा असा सवाल आहे कीं, " भाषेंत एकवस्तुवाचक

अनेक शब्द आहेत म्हणूनच तींत सौंदर्य, विविधता, सौष्ठव व ओज येतें. याऐवजीं भाषेंत एका वस्तूचा वाचक एकेकच शब्द असता तर तींत काव्य, वक्तृत्व, वाङ्मय, बुद्धिविलास यांपैकीं काय बरें शिल्लक राहील?" (मिल्लकृत हिंदुस्थानचा इतिहास, Vol. II. पृ. ९१). सुप्रसिद्ध जर्मन पंडित श्लेजेल लिहितात कीं, "संस्कृत भाषा खरोखरच 'सुसंस्कृत' व परिपूर्ण आहे. घटना व व्याकरणनियम आणि शब्दसंपत्ति यांमध्यें ती ग्रीक भाषेसारखीच आहे; पण तिची रचना ग्रीकहून अधिक प्रमाणबद्ध व म्हणून जास्त सोपी आहे. ग्रीक भाषेचें घटनासौंदर्य आणि कोणताही अर्थ थोड्या शब्दांत विनचूक सांगण्याचें लॅटिनचें सामर्थ्य संस्कृत भाषेंत आहे. शिवाय तिचे मूळ धातु फारशी व जर्मन भाषेंतल्या धातूंशीं सदृश असून या दोनही भाषांतील उत्साह व ओज हीं तिजमध्यें आहेत. ग्रीक भाषेची शब्दसंपन्नता, रोमनचें गांभीर्य व ओज आणि हिब्रू भाषेंतील दैविकस्फूर्ति हीं संस्कृतांत आहेत. व्याकरणदृष्टीची प्रमाणबद्ध घटना आणि परिपूर्ण वाढ या दृष्टींनीं विचार करतां संस्कृत भाषा ग्रीक व लॅटिनहूनही श्रेष्ठ ठरते." श्लेजेल (History of Literature, पृ. १०५, १०६, ११७). मि. टेलरनामक ग्रंथकार लिहितो, "अनेक राज्यक्रांत्या व कालपरिवर्तनें झालीं तरीही, हिंदुस्थानांत संस्कृतसारखी अद्वितीय, संपन्न व विविधस्वरूपी भाषा कायम आहे. युरोपांतील ज्या लॅटिन, ग्रीक वगैरे भाषांस आम्ही 'क्लासिकल' (अभिजात) मानतों, त्या सर्वांची ती जननी आहे, व तीमुळेंच ग्रीक भाषेंतील लवचिकपणा व रोमन भाषेंतील ओज यांचा उगम संस्कृतांतच आहे; ही गोष्ट जेव्हां युरोपला प्रथमतः कळून आली तेव्हां तें आश्चर्यानें थक्कच झालें." (रॉ. एशि. सोसा. जर्नल, Vol. II. १८३४).

"पश्चिम आशिआखंडांतील सर्व प्रकारच्या वर्णमालांचा उगम 'देवनागरी' लिपींतच आहे" असें सर विल्यम जोन्स हे लिहितात (Asiatic researches, Vol. I. पृ. ४२३) अर्थात भारतीयांचें तत्त्वज्ञान, विद्वत्ता व संस्कृति यांचा तिकडे व पुढें युरोपांत प्रसार होण्यास वर्णमालांचा हा संबंधच कारणीभूत झाला. जगांतील ज्या भाषांस इंडोयुरोपियन ही संज्ञा आहे, त्या सर्वांची जननी संस्कृतच आहे. या भाषांतले मूळ धातु व इतर आवश्यक शब्द संस्कृतपासूनच निघाले आहेत. इंडो-युरोपियन भाषांतील जो कांहीं भाग सर्वांत सारखा आहे, तो त्यांस संस्कृतापासूनच मिळालेला आहे. ग्रीक

व इराणची प्राचीन भाषा झेंद या संस्कृतपासूनच झाल्या आहेत, असें मि. पोकॉक, डा. प्रिचर्ड व प्रो. हीरन यांचें मत आहे. झेंद भाषेच्या कोशांतल्या प्रत्येक दहा शब्दांत ह्रिल्लान ६।७ शब्द संस्कृतोत्पन्न आहेत ! एकपासून दहापर्यंतच्या अंकांचीं जुन्या भाषांतील नांवेंही संस्कृतोत्पन्नच आहेत.

संस्कृत.	लॅटिन.	ग्रीक.
एक	युन्	हेन
द्वि	डु	डु
त्रि	ट्रि	ट्रि
चतुर	क्वाडुर	तसर
पंच	क्विक	पेंटि
षष्ठ	सेक्स	हेक्स
सप्त	सेप्तेम	हेप्त
अष्ट	आक्टो	ओक्टो
नव	नोवेम	एनिया
दश	डिसेम	डेका.

संस्कृत.	झेंद.	ग्रीक. (डोरिक)	लॅटिन.
प्रथम	फ्रथेंमा	प्रोटा	प्रायमा
द्वितीय	बित्य	डुटेरा	आल्टेरा
तृतीय	थ्रित्य	ट्रिटा	टर्शिया
चतुर्थ	तुरिय	टरटार्टा	क्वार्टा
पंचम	पुग्धा	पेम्पटा	क्विंटा
षष्ठ	क्षत्व	हेक्टा	सेक्सटा
सप्तम	हप्तथ	हेब्डोमा	सेप्तिमा
अष्टम	अष्टेमा	ओग्डोआ	आक्टेवा
नवम	नौमा	एनोटा	नोवा
दशम	दशेमा	डेकाटा	डेसिमा

इतर कांहीं शब्दांचीं व रूपांचीं साम्यें पुढील कोष्टकांवरून कळून येतील.

संस्कृत.	झेंद.	ग्रीक.	लॅटिन.
तिष्ठामि	हिस्टामि	हिस्टेमि	स्टो
तिष्ठति	हिस्टोति	हिस्टेटि	स्टाट्
ददामि	दधामि	डिडोमि	डो
ददति	दधैति	डिडोटि	डाट
अस्मि	अहमी	एम्मि	सुम्
अस्ति	अष्टि	एस्टिं	एस्ट
भरामि	बरामि	फेरो	फेरो
भरति	बरैति	फेरेई	फर्ट
वहामि	वझामि	एखो	व्हेहो

संस्कृत.	लॅटिन.	संस्कृत.	लॅटिन.
स्थातुं	स्टेटम्	अंक्तुं	अंक्टम्
दातुं	डेटम्	स्वनितुं	सोनिटं
ज्ञातुं	नोटम्	वमितुं	व्होमिटं
पातुं	पोटम्	पेष्टुं	पिष्टं.
एतुं	इटम्	जनितुं	जेनिटं

सारांश; अति प्राचीनकाळीं जगांतील सर्व **आर्य**जाति **संस्कृत** भाषा बोलत असून सांप्रतच्या सर्व **आर्य**भाषांची जननी **संस्कृत**च आहे, ही गोष्ट सर्व प्रमाणांनीं सिद्ध होत असून ती **डा. बालंटाइन प्रो. बॉप्**, डुबोइस, **मिस कापेंटर, मॅक्स म्युलर** वगैरे शोधकांनीं व पंडितांनींही मान्य केली आहे.

भारतीयांची असामान्य वाक्शक्ति आणि त्यांची आश्चर्यकारक कल्पनाशक्ति या दोहोंच्या साहाय्यानें त्यांनीं **संस्कृत** भाषा निर्माण केली. ह्या भाषेची पुढें इतकी वाढ झाली कीं, त्यांच्या बुद्धिवैभवास व बुद्धिविलासास ती सर्वतोपरी साजूं लागली; इतकेंच नव्हे तर **संस्कृत** वाङ्मयांत अद्वितीय सुसंपन्नता, व्यापकता व उदात्तपणा उत्पन्न करण्यासही या भाषेचें फारच साहाय्य झालें. या भाषेची वाढ व परिणति शास्त्रशुद्ध पायावर व प्रमाणबद्ध झाली असल्यामुळें जगांतील कोणत्याही जुन्या नव्या भाषांहून ती अधिक परिपूर्ण असून ' देववाणी ' हें तिला मिळालेलें नांव नांवाचें नसून सर्वांशीं सार्थच आहे. **संस्कृत** भाषेचें हें अद्वितीय स्वरूप पाहून ही भाषा कधीं काळीं सामान्य लोकांच्या

बोलण्यांतली नसून अर्वाचीन ' एस्परंटो ' भाषेप्रमाणें ही ब्राह्मण पंडितांनीं कृत्रिम बनविली असावी, असेंही अनुमान पाश्चात्त्य पंडित काढीत असत, परंतु हा त्यांचा निव्वळ भ्रम किंवा दुराग्रह असून पाणिनिकालीं व तत्पूर्वी संस्कृत ही भाषा सामान्य लोकांच्याही नित्य व्यवहारांतली होती असें पंडित श्यामजी कृष्णवर्मा यांनीं सन १८८१ सालीं बर्लिन येथें भरलेल्या ओरिएंटालिस्ट कांग्रेसपुढें वाचलेल्या निबंधांत सिद्ध केलें आहे. संस्कृत भाषेला ' मृत भाषा ' असेंही कोणी कोणी म्हणतात; पण त्यांतही फारसें तथ्य नाहीं. हिंदुस्थानांतल्या हिंदी, बंगाली, मराठी वगैरे निरनिराळ्या देशी भाषा संस्कृतचींच रूपांतरें आहेत ही गोष्ट सोडून दिली; तरी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जुन्या परंपरेचे पंडित हीच भाषा आपसांतील संभाषणांत व पत्रव्यवहारांत उपयोजीत आहेत, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. मॅक्स म्युलर म्हणतातः–(India, what can it teach us ? पृ. ७८, ७९). " हिंदुस्थानच्या भूत व वर्तमान काळांत इतकी पूर्ण संगति व सातत्य आहे कीं, अनेक सामाजिक क्रांत्या, धर्मक्रांत्या व राज्यक्रांत्या झाल्या तरी अद्याप हिंदुस्थानांत सर्वत्र बोलली जाणारी संस्कृत हीच भाषा आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजी राज्य व इंग्रजी विद्या यांचा प्रसार होऊन एका शतकाहून ज्यास्त काळ सांप्रत लोटला आहे. तरीही डांटे कवीचे कालीं युरोपांत लॅटिनचा जितका प्रचार होता त्याहून अधिक प्रचार संस्कृत भाषेचा अद्यापही हिंदुस्थानांत आहे. "

भाषा व लिपी यांचा परस्परसंबंध कोणता, हें आरंभीं थोडक्यांत सांगितलेंच आहे. आकाशांतील ' सूर्य ' या वस्तूचा ' सू ' व ' र्य ' या दोन संयुक्त ध्वनींचा लागोपाठ केलेला उच्चार हा निदर्शक ऊर्फ प्रतिनिधि होय; पुनः या दोन ध्वनींच्या उच्चाराची ' सू ' व ' र्य ' या दोन अक्षरांनीं बनलेली संयुक्त आकृति निदर्शक ऊर्फ प्रतिनिधि होय. ग्रहगजे देव, त्याची मूर्ति व मूर्तीचें चित्र यांचा जो परस्परसंबंध तोच–मूळ वस्तु, ध्वन्यात्मक शब्द व वर्णात्मक शब्द यांमध्यें आहे. ध्वनि व वर्ण किंवा भाषा व लिपी यांचा हा संबंध लक्षांत आणल्यास शास्त्रीय दृष्टीनें कोणती लिपी किंवा वर्णमाला श्रेष्ठ व निर्दोष आणि कोणती कनिष्ठ व सदोष याची कोणासही सहज कल्पना करतां येईल. लिपींमध्यें पहिला गुण हा असला पाहिजे कीं, भाषेंत जितके मूळ ध्वनि असतील तितकीं अक्षरें किंवा वर्ण लिपींत असले पाहिजेत. हा गुण देवनागरी लिपींत पूर्णपणें आहे, म्हणजे संस्कृत भाषेंत स्वरात्मक व व्यंजनात्मक मूळ ध्वनि अनुक्रमें १६ व ३६

आहेत, तर तिच्या लिपींतहीं तितकेच वर्ण आहेत. इंग्रजी लिपी या दृष्टानें फार सदोष आहे; कारण तींतिल ४३ भिन्न भिन्न मूळ ध्वनींचें चिन्हींकरण फक्त २६ च वर्णांवर भागवावें लागतें ! या एका दोषामुळेंच इंग्रजी व इतर सर्व युरोपियन लिपींत दुसरेही अनेक दोष उत्पन्न झाले आहेत. लिपीमध्यें दुसरा गुण हा पाहिजे कीं, एका ध्वनीचें दर्शक एकच चिन्ह किंवा वर्ण असला पाहिजे; व अर्थातच एका चिन्हाचा एकच उच्चार झाला पाहिजे. देवनागरी लिपींत ' क ' ध्वनीचा दर्शक ' क ' हा एकच वर्ण आहे; व ' क ' या वर्णाचा अन्य ध्वनि किंवा उच्चार कदापि होत नाहीं. आतां या गुणाचे दृष्टीनें इंग्रजी वर्णमाला किती सदोष आहे पहा. पहिली गोष्ट ही कीं, इंग्रजी वर्ण ध्वनींचे मानानें एकीकडून अपुरे आहेत तर दुसरीकडून जरूरीहून ज्यास्त आहेत. उदाहरणार्थ; C या इंग्रजी अक्षराच्या ' स ' या ध्वनीचें कार्य S नें होत आहे; या वर्णाच्या ' क ' ध्वनींचें कार्य K नें होत आहे. व X या वर्णाच्या ' क्स ' या ध्वनीचें कार्य KS या वर्णांनीं होत आहे. अर्थात् C व X हे वर्ण इंग्रजी वर्णमालेंत फालतु आहेत ! असा फालतु वर्ण देवनागरींत मुळींच नाहीं. इंग्रजींत g चा उच्चार कधीं ' ग ' होतो तर कधीं ' ज ' होतो! इंग्रजींतिल a, e, i, o, u, या स्वरांच्या उच्चारासंबंधानें तर अतिशयच घोंटाळा आहे. a या वर्णाचे उच्चार अ, आ, ऑ, दीर्घ ए वगैरे अनेक होतात ! पुढच्या स्वरांचाही हाच प्रकार. but बट् कां ? व put पुट् कां ? हे प्रश्न तर सुप्रसिद्धच आहेत ! देवनागरी लिपीनें असला भोंगळेपणा मुळींच ठेवलेला नाहीं. तिनें एका ध्वनीस एक वर्ण निश्चित व कायमचा करून दिलेला आहे. अ, आ, इ व उ या मूलस्वरांचींच नव्हे तर त्यांच्या दीर्घांची आणि ए, ऐ, ओ, औ या संयुक्त स्वरांचींही वेगळीं चिन्हें नियमित करून लिपींत ज्यास्त सुगमता व शास्त्रशुद्धता आणली आहे. इंग्रजीप्रभृति वर्णमालेचा क्रमही शास्त्रशुद्ध नाहीं; देवनागरींत आधीं मूळ स्वर, नंतर संयुक्त स्वर, नंतर कंठापासून क्रमानें ओष्ठापर्यंतच्या अवयवांच्या साहाय्यानें उच्चारलीं जाणारीं व्यंजनें व पुढें इतर व्यंजनें असा क्रम असून पुनः त्यांतही मृदु, कठोर, महाप्राणादि शास्त्रीय भेद व क्रमही दाखविले आहेत. इंग्रजी वगैरे वर्णमालेंत या प्रकारांचा अभावच आहे. हे सर्व दोष लक्षांत आणूनच डेविडसन व ऑलकॉक या इंग्रज वैय्याकरणांनीं " English alphabet is redundant, defective and inconsistant. " (इंग्रजी वर्णमाला फालतु, सदोष व असंबद्ध आहे.) असा सूत्रात्मक अभिप्राय दिलेला आहे !

देवनागरी लिपीच्या श्रेष्ठत्वासंबंधानें विचार करतांना भारतीय आर्यांस लेखनकला केव्हांपासून अवगत झाली, ह्या प्रश्नाचा पाश्चात्त्य पंडित वारंवार खल करीत असतात. युरोपियन सुधारणेचा उगम ग्रीक वाङ्मयापासूनच झालेला आहे; तेव्हां संस्कृत लिपी ग्रीक लिपिहून प्राचीन आहे, अशी कबुली देण्यास युरोपियन पंडिताचें मन बरेंच कचरतें. पण या बाबतींत विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, मॅक्स म्युलरसारख्या विद्वान्, शोधक व समदृष्टि पंडिताच्याही बुद्धीची या बाबतींत चक्रभूल झाली असून ख्रि. पू. ३५० च्या पूर्वी भारतीयांस लेखनकला अवगत नव्हती, असें त्यांनीं विलक्षण प्रतिपादन केलें आहे ! मॅक्स म्युलरखेरीज दुसऱ्या एकाद्या पंडितानें जर असें मत प्रतिपादिलें असतें, तर त्यास इतरांनीं वेड्यांतच काढलें असतें ! ' भारतीयांस लेखनकला फार प्राचीनकाळापासून माहीत होती ' असे प्रो. वेबर यांचें मत आहे. (Indian Literature, पृ. ५). प्रो. विल्सन यांचे मतें तर ' भारतीयांची लेखनकला त्यांच्या वाङ्मयाइतकीच प्राचीन आहे. (मिलकृत हिंदुस्थानचा इतिहास, पृ. ४५). प्रो. हीरन यांचेंही असेंच मत असून, ' प्राचीन काळीं भरतखंडांत लेखनकलेचा उपयोग शिलालेख, ताम्रपटापुरताच होत नसून लोकांच्या रोजच्या सामान्य व्यवहारांतही तो होत असे ' असेंही त्यांचें म्हणणें आहे. (हीरनकृत Historical Researches, Vol. II. पृ.२०२). "हिंदु लोकांस लेखनकला ख्रि.पू. २८०० वर्षांपासून अवगत असून, त्यांजजवळ हस्तलिखित धर्मग्रंथ त्या काळापासून होते " असें कौंट जार्न्स्टजर्ना म्हणतात. (Theogony of the Hindus, पृ. २६). वैदिक वाङ्मयांतल्या ' प्रातिशाख्यां ' च्या कर्त्यांपुढें हस्तलिखित ग्रंथ होते, असें प्रो. गोल्डस्टकर, बोथलिंग, व्हिटने व रॉथ यांचेंही मत आहे.

प्रो. मॅक्स म्युलरप्रभृतींचें स्वपक्षसमर्थनाचें मोठें प्रमाण म्हणजे हें कीं, वेदास ' श्रुति ' हे नांव आहे; (श्रु=ऐकणें) अर्थात् संहितांचें अध्ययन निवळ श्रुतिद्वारा तोंडीं चालत असून, वेदकाळीं लेखनकला माहीत नव्हती. पण असला कोटिक्रम लढवूं लागल्यास ' स्मृ=आठवणें ' या धातूच्या अनुरोधानें स्मृतिकाळींही लेखनकला माहीत नव्हती, असें मानावें लागेल ! पण स्मृतिकारांस लेखनकला अवगत असल्याचे स्पष्ट व निर्विवाद उल्लेख स्मृतिग्रंथांतून शेंकडों सांपडतात. दुसरें असें कीं, लेखनकलेवांचून वाङ्मयाचें केवळ तोंडीं अध्ययन होण्यास वाङ्मय पद्यमयच असावें लागतें. पण मॅक्स म्युलर यांनीं ठरविलेल्या ख्रि. पू. ३५० च्या पूर्वी संस्कृत वाङ्मयांत शास्त्रीय विषयावरही

किती तरी गद्य ग्रंथ झालेले होते ! ' जैली ' नामक ज्योतिष्याच्या गणितावरून ख्रि. पू. ३००० वर्षांच्या काळीं भारतीयांत ज्योतिष व भूमिति हीं शास्त्रें फार श्रेष्ठ पदास पोंचलीं होतीं, असें सिद्ध होतें. प्रो. मॅक्स डंकर यांसही मॅक्स म्युलर यांचें वरील मत मुळींच मान्य नाहीं. 'ब्राह्मण ' ग्रंथांचा काळ पाश्चात्त्य पंडित सामान्यतः ख्रि. पू. ८०० ते ३०० यांचे दरम्यानचा मानतात. " या ग्रंथांत ' शब्दां ' चाच नव्हे तर ' अक्षरां ' चाही जर उल्लेख आला आहे, तर ख्रि. पू. ८०० वर्षांच्या पूर्वीच वेदसंहितांचे हस्तालिखित ग्रंथ झाले होते व ते ' ब्राह्मण ' कर्त्यांच्या समोर होते असें मानावेंच लागतें. " असें प्रो. मॅक्स डंकर लिहितात. (History of Antiquity, Vol. II. पृ. १५६, १५७).

ऑक्सफोर्डच्या बेलियल कॉलेजचे ओरिएंटल लेक्चरर पंडित श्यामजी कृष्णवर्मा हे हिंदुस्थानसरकारचे प्रतिनिधि या नात्यानें सन १८८३ सालीं ' लंडन ' येथें भरलेल्या ओरिएंटलिस्ट कांग्रेसला हजर होते. त्यांनीं त्या वेळीं याच विषयावर एक निबंध वाचून मॅक्स म्युलर प्रभृतींच्या तर्कांचें मार्मिक व सप्रमाण खंडण केलें आहे; व लेखनकला भारतीयांस वैदिककालापासूनच माहीत आहे, असें सिद्ध केलें आहे. त्यांच्या विवेचनातील पहिला मुद्दा हा आहे कीं, पाणिनिकाळीं व त्या पूर्वीही गद्य वाङ्मय बरेंच निर्माण झालें होतें; किंबहुना वैदिक वाङ्मयांतील ऋग्वेदसंहिता खेरीजकरून इतर बहुतेक सर्व ग्रंथ गद्यात्मकच आहेत. अर्थात् येवढें विस्तृत वाङ्मय कांहीं तरी कृत्रिम लेखनाचें साधन असल्याशिवाय कसें निर्माण झालें व कायम राहिलें, याचा खुलासा व्हावयास पाहिजे. दुसरी गोष्ट अशी कीं, यज्ञयागांत लागणाऱ्या वेदी व कुंडें यांच्या रचनेचे जे सूक्ष्म नियम सांगितले आहेत, त्यांवरून व वेदांगज्योतिषावरून त्या काळीं भूमिति, गणित व ज्योतिष हीं शास्त्रेंही बरींच श्रेष्ठ दर्जास पोंचलीं होतीं, असें स्पष्ट दिसून येतें. मग भूमिति, गणित व ज्योतिष हीं शास्त्रें लेखनकलेशिवाय इतक्या ऊर्जित दशेस कशीं आलीं, हें गूढ मॅक्स म्युलरप्रभृतींसही उकलतां यावयाचें नाहीं ! ' यत्र पंचत्वमापन्नो लेखकः सहसाक्षिभिः ' (दस्तऐवजाचा लेखक व साक्षीदार हे जेव्हां हयात नसतील) असें कात्यायनाचें वचन आहे. नारद, याज्ञवल्क्य व इतर स्मृतींत दस्तऐवजांचा उल्लेख आला आहे. सूत्रकारांस लेखनकला अवगत होती, असें खुद्द मॅक्स म्युलर यांसही कबूल करावें लागलें आहे. पण लेखनकला याहूनही प्राचीन आहे, असें दाखवितां येतें.

उत त्वः पश्यन्न ददर्श वाचमुत त्वः शृण्वन्न शृणोत्येनाम् ॥

असें ऋग्वेदांत (मंडळ १० वें, सूक्त ७१।४) म्हटलेलें आहे. " वाणीला पहात असूनही ती एकाला दिसत नाहीं; व वाणीला ऐकत असून ती दुसऱ्यास ऐकूं येत नाहीं–" (उदाहरणार्थ; निरक्षर माणसानें लेख पाहिला तरी तो न पाहिल्यासारखा होतो; तसेंच वेदवचन ऐकलें तरी तें न ऐकल्यासारखेंच असतें, कारण त्याचा त्यास अर्थ कळत नाहीं.) असा या वचनाचा अर्थ आहे. ' वाणी पाहणें ' ही पदें सार्थ होण्यास ह्या सूक्तरचनाकाळीं लेखनकला व ग्रंथ अस्तित्वांत असणें जरूर आहे. लेखनकला ज्ञात होण्यापूर्वी **ग्रीक** लोकांत १० हजार आंकड्यांपर्यंतच संख्यावाचक पारिभाषिक शब्द होते; व **रोमन** लोकांत फक्त १००० पर्यंतच होते ! पण **शुक्ल यजुर्वेदांत** दशलक्षांपर्यंत संख्येची प्रत्यक्ष मोजदादच असून दश लक्ष, दश कोटि किंबहुना दश सहस्र कोटिसंख्येपर्यंत पारिभाषिक नांवेंही आलेलीं आहेत. संख्यांना अशीं नांवें मिळणें व त्यांची मोजदाद होणें ही गोष्ट संख्यावाचक कांहीं दृश्य चिन्हें अस्तित्वांत आल्यावांचून शक्य नाहीं. **वैदिक** वाङ्मयांत ' कांड व पटल ' असे शब्द ' भाग, प्रकरण, अध्याय ' या अर्थीं येतात; त्यांवरूनही ह्या वाङ्मयास ग्रंथाचें रूप पूर्वीच प्राप्त झालें होतें असें दिसून येतें. **पा**णिनीचे काळीं अनेक हस्तलिखित ग्रंथ उपलब्ध असले पाहिजेत; कारण त्याखेरीज त्यास अष्टाध्यायीसारखें अद्वितीय व्याकरण रचतांच आलें नसतें. शिवाय यास खुद्द अष्टाध्यायींतही पुरावे आहेत. अष्टाध्यायींतील ' अधिकार ' (प्रकरणांचे शिरोलेख) ' स्वरित ' दाखविलेले आहेत. यावरून **पा**णिनीनें आपलें व्याकरण तोंडीं न सांगतां लिहून काढलें होतें, असें सिद्ध होतें. शिवाय, तींत ' अष्टकर्ण्या, पंचकर्ण्या ' गाईंचा उल्लेख आला आहे; अर्थात् लोक आपल्या गाईंच्या कानांवर खुणेसाठीं आठ व पांच हे आंकडे डागीत, असें स्पष्ट दिसतें. ' निष्क व रूप्य ' या नाण्यांचा उल्लेख आणि ' लिपि व लिबि ' हे दोन शब्दही अष्टाध्यायींत आले आहेत; त्यावरून **पा**णिनिकाळापूर्वी पुष्कळ काळ लेखनकला प्रचारांत येऊन चुकली होती असेंच म्हणावें लागतें.

भारतीयांच्या लिपीचें सौंदर्य **ग्री**क लोक नेहमीं वाखाणीत. (Strabo Lib, XV. पृ. ४९३). मैलांच्या दगडांवर अंतरें व धर्मशाळा दर्शविण्यासाठीं **भा**रतीय लोक अक्षरांचा उपयोग करतात, असें **मे**गॅस्थानीस म्हणतो. ' **भा**रतीय लोक झाडांच्या मऊ सालींवर लिहितात ' असें **कर्टि**यस लिहितो. ' कापूस चोपून घट्ट करून त्यावर **भार**-

तीय लोक लिहितात ' असें **नी**रकस म्हणतो. ' ख्रिस्ती शकापूर्वीपासून **आर्या**वर्तांत कापसाच्या कागदांचा उपयोग करीत आहेत ' असें **फा**दर **पॉ**टिनो यानें लिहिलें आहे. (Historical Researches, Vol. II. पृ. १०७).

संस्कृत भाषा व लिपी यांचेप्रमाणेंच **संस्कृत** वाङ्मयासंबंधानेंही **युरो**पियन पंडितांनीं आश्चर्याचे, आदराचे व आनंदाचे उद्गार काढले आहेत ! **मि. टेलर** लिहितात कीं, " **संस्कृत** भाषेंतील तत्त्वज्ञानाचा जुनेपणाचे दृष्टीनें विचार केला, तर त्याचे पुढें **पाय**थागोरसचें तत्त्वज्ञान कालपरवांचेंच ठरेल; आणि कल्पनेच्या व बुद्धीच्या उच्च भराऱ्यांचे दृष्टीनें तुलना केली तर **प्लेटो**च्या उच्चतम कल्पनाही नीरस व सामान्य भासतील. आपणास पूर्वी माहीत असलेल्या सर्व काव्यांहून **संस्कृत** काव्यांत शुद्धबुद्धीचे विलास ज्यास्त दिसून येतात. त्या भाषेंतील शास्त्रें तर इतकीं प्राचीन आहेत कीं, त्यांचा कालनिर्णय करतांना **ज्यो**तिषशास्त्रासही हात टेंकावे लागतात ! अशा प्रकारच्या या प्रचंड वाङ्मयाचें खरें स्वरूप वर्णन केलें तरीही तें अतिशयोक्तीचें व फाजील घमेंडीचें वाटण्याचा संभव आहे ! पण हें वाङ्मय आपल्या स्वतंत्र व श्रेष्ठ पदावर दुसऱ्या कोणच्याही आधारावांचून आरूढ होऊन आज तागायत तेथेंच उभें राहिलें आहे ! **संस्कृत** भाषा व वाङ्मय यांत प्रावीण्य मिळविण्यास जवळ जवळ जन्मभर परिश्रम करावे लागतात. कारण त्याचें वाङ्मय अमर्याद असल्याचा भास होतो. मनुष्यानें आपली कल्पनाशक्ति कितीही ताणली, तरी त्यास **संस्कृ**तांतील पुराणकथांच्या अमर्याद विस्ताराची कल्पनाही करतां येणार नाहीं. **संस्कृत** तत्त्वज्ञानांत मानसशास्त्रांतील प्रत्येक गूढ व बिकट प्रश्नाचा विचार केलेला आहे. **संस्कृ**तांतलें धर्मशास्त्रही, तें ज्यांचेकरतां रचिलें त्या ज्ञातींइतकेंच, विविधस्वरूपी आहे. " (A philosophy, compared with which, in point of age, the lessons of Pythagoras are but of yesterday, and in point of daring speculation Plato's boldest efforts are tame and common-place. A poetry more purely intellectual than any of those of which we had before any conception ; and systems of science whose antiquity baffled all power of astronomical calculation This literature, with all its colossal proportions, which can scarcely be described without the semblance o

bombast and exaggeration, claimed of course a place for itself —it stood alone and it was able to stand alone. To acquire the mastery of this language is almost the labour of a life ; its literature seems exhaustless. The utmost stretch of imagination can scarcely comprehend its boundless mythology. Its philosophy has touched upon every metaphysical difficulty ; its legislation is as varied as the castes for which it was designed. रॉयल एशि. सोसा. चें जर्नल, Vol. II १८३४).

कौंट जॉर्न्स्टजर्ना लिहितात (Theogony of the Hindus, पृ. ८५):-

" हिंदुस्थानचें वाङ्मय प्राचीन काळांतील एका थोर राष्ट्राचा आपणास परिचय करून देतें; आणि या राष्ट्रानें विद्येची प्रत्येक शाखा हस्तगत केली असून मानवी सुधारणेच्या इतिहासांत या राष्ट्रांत सदैव श्रेष्ठ पदच मिळेल अशीही तें आपली खात्री पटवितें. " **मि. ब्रौन** नामक लेखकानें तर असें लिहिलें आहे कीं, (दि डेली ट्रिब्यून–सॉल्टलेक सिटी, ता० २०।२।१८८४) जगांतील निरनिराळीं सर्व वाङ्मयें व धर्मकल्पना यांचा मूळ जनक **भा**रतीय राष्ट्रच आहे !" **प्रो. मॅक्स म्युलर** लिहितातः—" विद्येची व ज्ञानाची कोणतीही शाखा घ्या; **हिंदुस्थानां**तील प्राचीन वाङ्मयानें तिंवर नवीन प्रकाश पाडला नाहीं किंवा तींत नवें चैतन्य उत्पन्न केलें नाहीं, असें घडलेंच नाहीं. पण त्यांतले त्यांत जगांतील निरनिराळे धर्म व पुराणकथा यांजवर या वाङ्मयामुळें पडलेला प्रकाश तर फारच अपूर्व महत्त्वाचा व अत्यंत उज्ज्वल आहे यांत संशय नाहीं." (India : what can it teach us ? पृ. १४०). **जनरल कनिंगहॅम** हे आपल्या **शी**खांचे तिहासांत लिहितात कीं, " **भा**रतीयांचें प्राचीन गणितशास्त्र इतकें पूर्णावस्थेस पोंचलें होतें व ज्योतिषविषयक गणित तर ते इतकें बिनचूक करीत कीं, **सूर्यचंद्रां**चे गमनमार्ग व गति हीं त्यांनीं अचूक मापलीं होतीं. सामान्य जनसमूहाच्या धर्मकल्पना व थोड्या-विद्वानांचें तत्त्वज्ञान यांची इतर देशांत बहुधा फारखत असते; पण **भा**रतखंडांत विद्वानांचें तत्त्वज्ञान सामन्य जनसमूहाचे धर्मकल्पनांत पूर्णपणें मिसळूनगेलें आहे. ईश्वराचें एकमेवाद्वितीयत्व व सृष्टिकर्तृत्व, आत्म्याचें अमृतत्व व जीवांची कर्मबद्धता हीं **भा**रतीय तत्त्वज्ञानांतील चार मूलतत्त्वें सामान्य लोकांच्या धर्मांचींही मूलतत्त्वें बनलीं आहेत. ज्या

पुनर्जन्मतत्त्वाचा **मो**झेसनें मुळींच उल्लेख केलेला नाहीं किंवा केला असेल तर फारच संदिग्ध व अस्पष्ट केला आहे; तसेंच ईश्वराचें जें एकत्व व सर्वशक्तिमत्व अनेक देवतावादी **ग्री**क व **रो**मन सामान्य जनसमूहास किंवा द्वैती **मि**श्रेइक धर्मशास्त्रकारांसहीं अज्ञात होतें तें तत्त्व **गं**गानदीतीरावरील **ऋ**षींनीं **भ**रतखंडांतील सगळ्या जनतेस पूर्वीच पटविलें होतें. शिवाय पापाचरणाबद्दल फार भयंकर शासन होतें हा सिद्धांत सामान्य जनसमूहाचे मनांत ठसवून त्यांची पापभीरुता जाज्वल्य राखण्याचे कामीं **व्या**सांनीं **प्लु**टोवरही ताण केली आहे." **प्रो. हो**रन यांनीं असा अभिप्राय दिला आहे कीं,' "**सं**स्कृत वाङ्मय–शास्त्रीय विषय, गद्य आणि पद्य–या सर्व शाखांतही सुसंपन्न आहे.' "भारतीय वाङ्मयाच्या एक दोन शाखांचें संपूर्ण अध्ययन करूं म्हटलें तरी त्यास एक जन्माचें संबंध आयुष्य पुरें होणार नाहीं" असें **सर विल्यम जो**न्स यांनीं मत दिलें आहे. "ज्यांचीं हस्तलिखितें सांप्रत उपलब्ध आहेत, असे **सं**स्कृत भाषेंत दहा हजार निराळे ग्रंथ आहेत" असा, **मॅ**क्स **म्यु**लर यांनीं हिशेब केला आहे! "**ग्री**स व **रो**म या दोनही देशांचें सर्व प्राचीन वाङ्मय एकत्र केलें तरीही येवढी ग्रंथसंख्या भरणार नाहीं" असें **मॅ**क्स **म्यु**लर (India; what can it teach us? पृ. ८४) म्हणतात. **रे. वा**र्ड लिहितात (Antiquity of Hinduism, Vol. IV. conclusion) कीं, "**भा**रतीयांत बहुतेक प्रत्येक शास्त्राचें अध्ययन चालू होतें,असें त्यांचे वाङ्मयावरूनच दिसून येतें; शिवाय त्यांची ज्या ज्या विषयाची प्रतिपादनशैली पाहिली तर विद्वत्तेंत ते कोणत्याही लोकांस हार जाणारे नाहींत, ह्याचाही प्रत्यय येतो. त्यांचें तत्त्वज्ञानविषयक वाङ्मय व धर्मशास्त्रें यांचें जसजसें परिशीलन करावें, तसतशी त्यांच्या विद्वत्तेची व शहाणपणाची खात्री पटत जाते." **मि**सेस **मॅ**निंगबाई (Ancient and medieval India, Vol.II. पृ. १४८) लिहितात कीं, "मानवी मन व बुद्धि यांची मजल जेथपर्यंत पोंचणें शक्य आहे, तेथपर्यंतचा पल्ला **भा**रतीयांच्या मनोबुद्धीनें खास गांठला आहे!"

सारांश; **भा**रतीयांच्या बुद्धीचें व मनोवृत्तींचें श्रेष्ठत्व इतकें होतें कीं, त्यांचे हातून फार व्यापक व उदात्त असेंच वाङ्मय कांहीं झालें तरी निर्माण झालें असतें. पण त्यांच्या या मनोबुद्धिगुणांस आपला प्रभाव दाखविण्यास **सं**स्कृतसारखी सर्वांगपरिपूर्ण, कर्णमनोहर व शब्दसंपन्न भाषा मिळाल्यामुळें तर त्यांचें **सं**स्कृत वाङ्मय सर्वांत सुसंपन्न व सुंदर निर्माण झालें; येवढेंच नव्हे तर त्याची व्यापकता व सूक्ष्मता हीं पाहून सगळ्या जगानें आश्चर्यानें तोंडांत बोट घातलें, तर त्यांत नवल तें काय?

भाग २ रा.

प्रकरण १ लें.

भारतीयांचें वाङ्मय.

कोणत्या राष्ट्राच्या इतिहासाचा योग्य बोध होण्यास ज्याप्रमाणें त्या राष्ट्राची संस्कृति, त्याचें ध्येय, त्याची विचारपरंपरा, त्याचें सृष्टिनिर्मित कर्तव्यक्षेत्र आणि शील यांचें ज्ञान असणें जरूर आहे. त्याचप्रमाणें वाङ्मयाचीही स्थिति आहे. वाङ्मय हें राष्ट्राच्या विचारांचें प्रतिबिंब असतें. वाङ्मयाचें ज्ञान सुबोध होण्यास इतिहासाचा फारच उपयोग आहे.

इतिहासाचे कालमानानें व विषयमानानें भाग पाडले, म्हणजे तो आकलन करण्यास जसा सोपा होतो, त्याचप्रमाणें वाङ्मयाचेंही वर्गीकरण विषय समजण्यास फार सोईचें असतें.

संस्कृत वाङ्मयाचा परिच्छेद तीन प्रकारें करतात. (१) वैदिक वाङ्मय, (२) पौराणिक वाङ्मय व (३) ललित वाङ्मय. आतां या अंगाचीं निरनिराळीं उपांगें आहेत. त्यांचा क्रमशः विचार करूं.

वैदिक वाङ्मय.

वैदिक वाङ्मयाचे वेद, ब्राह्मणें व सूत्रें असे तीन प्रकार आहेत.

ऋक्, यजुस्, साम आणि अथर्व असे वेदांचे चार भाग आहेत; परंतु त्यांपैकीं ऋग्वेद आणि यजुर्वेद हे फार महत्त्वाचे आहेत. जडसृष्टि, मन व आत्मा यांचें सत्यरूप ज्ञान संपादन करून त्याचा उपयोग कसा व कोठें करावा हाच या दोन वेदांचा प्रतिपाद्य विषय आहे. संस्कृत वाङ्मयांतच नव्हे तर जगांतील सर्व वाङ्मयांत वेदग्रंथांचा अत्यंत श्रेष्ठ दर्जा आहे. मॅक्समुल्लर साहेब म्हणतात कीं, " मानव वंशाच्या शिक्षणरूप ग्रंथांत वैदिक वाङ्मयाचा एक स्वतंत्र भाग असून त्याला कोठेंच तोड नाहीं. "

प्राचीन भारतवर्षांत ज्ञानाच्या सर्व शाखांचा पूर्ण विकास झाला होता व त्यावर ग्रंथरचनाही भरपूर झाली होती; परंतु महत्त्वाचे असे सर्व शास्त्रांवरील ग्रंथ सर्वभक्षक काळाच्या उदरांत लुप्त होऊन गेले आहेत, व त्यांचा मागमूसही लागण्याची आशा नाहीं. असें असतां त्या सर्व श्रेष्ठ ग्रंथांतील रत्नें असे जे वेद, ते पूर्ण सुरक्षित व शाबूद रहावे हा एक दैवी चमत्काराचाच प्रकार आहे असें म्हणावें लागतें. धर्मग्रंथांतील फार जुना असा मनुस्मृति ग्रंथ व त्या काळांतील इतर ग्रंथ, रामायण, महाभारत वगैरे सर्वमान्य व श्रेष्ठ ग्रंथ ह्यांमध्यें कित्येक ठिकाणीं पाठभेद, पाठलोप व नवीन भर असे प्रकार घडून आले आहेत; परंतु वेदांच्या अतुल भाषासौंदर्यानें आणि अप्रतिम विषयगांभीर्यानें त्यामध्यें असा प्रकार घडून येणेंच अशक्य झालें.

वेदांचा उगम केव्हां झाला हें अद्यापही एक मोठें कोडें आहे आणि याच कारणामुळें त्यांस कालमर्यादा नाहीं व ते अपौरुषेय आहेत असें हिंदु लोक मानतात. ज्ञानगंगेचा उगम वेदांत असून, जगांतील सर्व वाङ्मयाचें जनकत्वही याकडेच आहे; वेदांतील तत्वें आधुनिक सूक्ष्मशास्त्रांच्या (True science) प्रमेयांशीं पूर्णपणें जुळतात याचा एक मजेदार मासला खालीं दिला आहे.

स्वामी दयानंद सरस्वतीच्या टीकाधारें लाहोरचे पंडित गुरुदत्त यांनीं वेदांतील कांहीं थोड्या मंत्रांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला होता. ऋग्वेदाच्या दुसऱ्या सूक्तांतील सातव्या मंत्राचा अर्थ लावतांना त्यांस खालील चमत्कारिक शोध लागला व यावद्दल त्यास पराकाष्ठेचें आश्चर्यही वाटलें तो मंत्र असा आहे:—

मित्रं हुवे पूतं दक्षं वरुणं च रिशादसम् । धियं घृताचीं साधन्ता

ऋ. अ. १ । सू. २ । मंत्र ७

पंडित गुरुदत्त म्हणतात कीं, " घृताचीं व साधन्ता या दोन द्रव्यांच्या मिश्रणापासून पाणी कसें तयार होतें याची पद्धति त्यांत दिली आहे. साधन्ता शब्दाच्या द्विवचनावरून असें दिसतें कीं, पाणी दोन भिन्न मूलद्रव्याच्या संयोगापासून तयार होतें. हीं दोन मूलद्रव्यें कोणतीं, हें ठरविणें हेंच फार महत्वाचें आहे. त्या दोन मूलद्रव्यांचीं मित्र व वरुण अशीं नांवें या मंत्रांत दिलीं आहेत.

मित्र या शब्दाचा मूल अर्थ मोजणारा असा आहे व पुढें ज्या पदार्थास हें मापनाचें कार्य करावें लागे त्यास ' मित्र ' हें नांव देण्यांत येऊं लागलें व तेंच पुढें परिमाण बनलें.

मित्र हें किंमत अथवा घनता यांचें परिमाण आहे.

मित्र याचा दुसरा अर्थ जोडीदार असा आहे, व तोच या मंत्रांत अभिप्रेत आहे. मित्र हा वरुणाचा जोडीदार आहे असें या मंत्रांत म्हटलें आहे. आतां वरुण म्हणजे " आक्सीजन " वायु हा अर्थ कसा तें पाहूं. हायड्रोजन हा सर्वांत हलका वायु असून इतर वायूंची घनता मोजण्याचें तो परिमाण आहे. आक्सीजनपाशीं याचा फार शीघ्र संयोग होतो, म्हणून मित्र यास वरुणाचा–म्हणजे आक्सीजनचा-जोडीदार असें म्हटलें आहे. वेदांतील मित्र व वरुण हेच आधुनिक शास्त्रांतील हायड्रोजन व आक्सीजन असावेत, असें त्यांच्या गुणधर्मांच्या अनुमानावरून व तुलनेवरून दिसून येतें. वेदांत कित्येक ठिकाणीं मित्र हा शब्द उदानवायूच्या समानार्थी योजलेला दिसतो; आणि हलकेपणा व उड्डाणक्षमत्व या दोन अर्थांनीं तो सर्वश्रुत आहे.

" त्यानंतर आपणास वरुण या तत्त्वाचा विचार करणें प्राप्त आहे. वरुणाची सर्व सजीव प्राण्यास फार जरूरी आहे. कारण त्याशिवाय प्राणधारणेचें कार्य होणार नाहीं. अशोधित धातूवर गंज चढणें, दहनक्रिया होणें, शारीरशास्त्रदृष्ट्या रक्ताशीं संयोग होऊन तें शुद्ध रहाणें व शरीरांत जीवनकला चालू रहाणें इत्यादि विज्ञानदृष्ट्या (Science) याचे धर्म आहेत. परंतु रिशादह याच अर्थावर येथें विशेष कटाक्ष आहे; मुख्यत्वें करून हा अर्थ व वर दिलेले इतर अर्थ या सर्वांचा विचार केला असतां वरुण म्हणजे ऑक्सीजन असला पाहिजे अशी खात्री पटते.

याच मंत्रांत आणखी " पूत-दक्ष " असा एक शब्द योजिलेला आहे. त्यापैकीं पूत—म्हणजे शुद्ध, मलाभाव व दक्ष म्हणजे सामर्थ्य, शक्ति.

या मंत्राचा संपूर्ण अर्थ असा आहेः—" ज्या कोणाची दोन मूलपदार्थांच्या संयोगापासून पाणी तयार करण्याची इच्छा असेल त्यानें अत्यंत तप्त असा शुद्ध मित्र वायु (Hydrogen) व रिशादहधर्मी वरुणवायु (Oxygen) घेऊन त्यांचा संयोग करावा म्हणजे पाणी तयार होतें. "

वेदांचें प्राचीनत्व सर्वमान्य आहेच, परंतु सर्व ज्ञानजनकत्व, त्रिकालसत्यसिद्धांतधारणसामर्थ्य, भाषासौष्ठव परमात्मज्ञानसंग्रह, ऋजुता व प्रेमळपणा, मानववंशाचा प्राचीन इतिहास इत्यादि गुणांच्या दृष्टीनें त्यांचें महत्व अत्यंत थोर आहे. परंतु दुर्दैवानें भूरतभूमींत त्यांचा अभ्यास बंद पडला आहे; सूत्रें व वेदांगें हीं वेदार्थाचीं मुख्य साधनें असून, त्यांचें ज्ञानही फार थोड्यांस आहे; अशी स्थिति असल्यामुळें हिंदु लोकांतील अत्यंत विद्वान म्हणून वाखाणलेल्या फारच थोड्या लोकांस ते समजतात. अशी शोच-

नीय स्थिति आमची आम्ही आणून घेतली आहे; त्यांतून पार पडावें, अशी परमेश्वरी इच्छा दिसतें; आणि आमच्या हलगर्जीपणाबद्दल योग्य शासन मिळावें, म्हणून आमच्या पूज्य ग्रंथांबद्दल आम्हांस इशारारूप सूचना पाश्चात्य पंडितांनीं आपआपल्या ग्रंथांत दिल्या आहेत. एवढ्यानें तरी आमचे डोळे उघडून आपल्या खऱ्याखुऱ्या स्थितीचा बोध व्हावा व खऱ्या कार्यास लागावें अशीही ईश्वरी-इच्छा असेल; ज्यांच्या चालीरीति भिन्न, विचारपरंपरा निराळी, संस्कार अत्यंत विसदृश आणि नैसर्गिक गोष्टी व परिस्थिति यांच्यामध्येंही एकरूपता सुद्धांच नाहीं, अशा पाश्चात्य पंडितांनीं आजन्म परिश्रम करून वेदार्थ समजून द्यावा, त्यांतील अत्यंत घोर विचारांनीं मोहून जावें, गंभीर तत्वज्ञानानें त्यांचे डोळे दिपून जावे, मोहक, शुद्ध व गोड भाषासरणीनें व सरस-काव्यमाधुर्यानें ज्यांनीं आपल्या आयुष्यांतील सर्व दुःखें विसरून जावीत, त्यांकडून वेदाबद्दल अत्यंत प्रशंसापर उद्गार निघाल्यास आश्चर्य नाहीं. मात्र आम्हास आमच्या हलगर्जीपणाबद्दल अत्यंत लज्जा वाटावी हेंच युक्त. झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. आतां तरी यापुढें आमचे ग्रंथ आम्ही अभ्यासिल्यास फार मदत होईल व त्यांचा अर्थ समजण्यास पाश्चात्य विद्वानांचे श्रमही सहायभूत होतील. आम्ही पाश्चात्य ग्रंथांची मदत घेतलीच पाहिजे. अशीही दैवी इच्छा असेल व तदनुरूप वागण्याशिवाय आम्हास इलाजच नाहीं. आम्हीं स्वतः त्यांचें अध्ययन करण्यास सुरवात केली कीं, त्यांतील तत्वावबोध व आनंद ही आपोआपच आम्हांस प्राप्त होतील. सध्यां पाश्चात्य पंडितांचे निवडक प्रशंसापर अभिप्राय उद्धृत करितों.

सर हंटर साहेब म्हणतो कीं, " ह्या पूज्य ऋग्वेदाचा काळ अगम्य आहे, " " मानवजातीच्या पुस्तकसंग्रहांतील वेद हे अत्यंत जुने ग्रंथ आहेत " असा मॅक्समुल्लर साहेबांचा अभिप्राय आहे. हीरन नामक प्रोफेसरास हा अभिप्राय मान्य आहे.

यजुर्वेदाची एक प्रत जेव्हां व्हॉलटेअर यास अर्पण करण्यांत आली तेव्हां तो म्हणाला कीं, ही देणगी खरोखर अमूल्य असून त्याबद्दल पौरस्त्य राष्ट्रांचें पाश्चात्य राष्ट्रांनीं अखंड ऋणीच राहिलें पाहिजे. वेदाच्या गांभीर्यानें व श्रेष्ठत्वानें लेऑन डेलवॉस साहेबांचा उत्साह व आनंद अमर्याद होऊन ते म्हणतात कीं, " ग्रीस व रोम मधील प्रत्येक स्मारकांची योग्यता ऋग्वेदाच्या खालींच लागेल. " शेवटी मॅक्समुल्लर साहेबांचा सर्वांस असा कळकळीचा उपदेश आहे कीं, " इतर कोणत्याहि भाषेंतील ग्रंथानें जें काम झालें नसतें ते वेदांनीं जगाच्या इतिहासांत केलें आहे; सघव ज्याला ज्याला म्हणून

स्वतःचा, पूर्वजांचा व आपल्या इतिहासाचा अभिमान आहे व जो आपल्या बौद्धिक विकासाची इच्छा करतो, त्या प्रत्येकानें वेदांचा अभ्यास करणें जरूर आहे. " वेद हे ईश्वर-प्रकाशरूप (revelation) असल्यामुळें त्यांचें ज्ञान प्रत्येकास असणें फार अगत्याचें आहे असें हिंदु लोक मानतात.

भारतवर्ष व संस्कृत भाषा ह्या क्षेत्राखेरीज तिसऱ्यास अशा प्राचीन व मूल्यवान् ठेव्याची बढाई मारता येणार नाहीं. ज्यांच्या सौंदर्ययुक्त भव्यपणाची सर इतरास येणार नाहीं, आणि ज्यांची ओजस्विताही इतरास दुष्प्राप्य आहे अशा त्या पवित्र वेदरूपी जिन्नगीवर जगांतील हिंदु-राष्ट्राखेरीज इतरांस हक्कही सांगता येणार नाहीं. आपल्या अतुल तेजानें सर्व मानव्याच्या प्रगतीस दिव्य प्रकाश देत हे वेद एकटेच असें चिरंतन रहाणार यांत बिलकुल संशय नाहीं.

वेदांच्या खालोखाल ब्राह्मणास महत्त्व आहे. ब्राह्मण हे ग्रंथ वेदांचेच भाग आहेत असें कित्येक मानतात; परंतु ही त्यांची चूक आहे. हे ग्रंथ टीका अथवा भाष्य या स्वरूपाचे आहेत. यज्ञयागाचे वेळीं कोणते मंत्र केव्हां म्हणावे, अगर यज्ञक्रियेला आरंभ कोणत्या देवतेच्या आवाहनानें करावा, यज्ञाची अधिष्ठात्री देवता कोणती असावी, ती तशी कां मानावी यासंबंधीं दृष्टांतपूर्वक माहिती या ग्रंथांत दिलेली आहे. एवंच कर्म-कांडाचें आचरण कसें करावें, याचें ज्ञान होण्यास हे फार उपयोगी पडतात आणि वैदिक वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्यास यांचें ज्ञान असणें अवश्य आहे. प्रत्येक वेदाचे असे टीकारूप ब्राह्मणग्रंथ आहेत. उदाहरणार्थ; ऐतरेय अथवा आश्वलायन आणि कौषितकी अथवा सांख्यायन हे ऋग्वेदाचे; शतपथ हा यजुर्वेदाचा इत्यादि. ब्राह्मणग्रंथाची रचना ज्या काळीं झाली त्यासंबंधी प्रो. वेबर म्हणतो, " ज्या काळीं मानवी मनाला अत्यंत कंठिण अशा वाटणाऱ्या विषयांचें विवेचन व उद्घाटन करण्यांत ब्राह्मण मोठ्या उत्साहानें व आनंदानें मग्न असत; आणि वेदांतासारख्या पवित्र विषयांतील सिद्धान्त क्रियापुढें मांडण्यांत येऊन त्या आपल्या उत्साहयुक्त कळकळीनें व ज्ञानजिज्ञासेनें त्या सिद्धान्तांच्या गूढ प्रदेशांत शिरून व मर्म हुडकून काढून पुरुषांसही विचारांच्या गांभीर्यानें, खोलपणानें व वजनानें आश्चर्यचकित करून सोडीत त्या काळाची प्रतिमा या ग्रंथांत उठलेली आपणास दिसते. "

सूत्रें हा वैदिक वाङ्मयांतील तिसरा व शेवटचा भाग आहे. त्यांचे सहा भाग खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

१ शिक्षा (स्वर-विधि संहिता.) २ छंदस्. ३ व्याकरण. ४ निरुक्त (वेदशब्द-प्रकाश.) ५ ज्योतिष. ६ कल्प (वैदिक कर्मांची विधिसंहिता.)

सूत्रें हीं वेदांचें एक अंग असून त्यांचाही वेदार्थबोध होण्यास फार उपयोग होतो. त्यांचे सहा विभाग पाडले आहेत व ते वर अनुक्रमानें दिले आहेत. त्यापैकीं आपण व्याकरण हा भाग घेऊं, व त्याचा वैदिक काळीं किती ऊहापोह झाला होता तें पाहूं. या एका भागाची वैदिक काळांत झालेली चर्चा पाहिली म्हणजे प्राचीन आर्यांच्या ज्ञानाभिरुचीचें किती कौतुक करावें असें होतें, व त्यांची ज्ञानलालसा व शास्त्राभ्यास केवढा जबर होता आणि त्या मानानेंच त्या काळाची संस्कृति किती थोर होती याची कल्पना सहज करता येईल. यांचें अध्ययन त्या काळीं चार पांच प्रकारें झालें होतें. व्याकरण हें स्वतंत्र शास्त्र मानण्यांत येत असे व त्याकरितां अभ्यासशील ऋषींनीं आजन्म खटपट केली होती व व्यासंग ठेविला होता असें दिसून येतें. व्याकरणाचे (१) स्वरशास्त्र, (२) स्वर व व्यंजनें यांचें योग्य वर्गीकरण, (३) व्याकरणाची यथायोग्य व सुबोध परिभाषा, (४) शब्दव्युत्पत्तिशास्त्र, (५) शब्दजातिभेद इत्यादि प्रकारें त्याचें फार खोल व सूक्ष्म विवेचन झालें होतें असें दिसतें. शिक्षेचा प्रातिशाख्य म्हणून एक पोटविभाग आहे, त्यामध्यें वेदांतील स्वरांच्या संबंधीं फार बारकाईनें विचार केला असून, त्यांच्या स्थानासंबंधी अर्थाच्या दृष्टीनें किती काळजी घेतली पाहिजे हें दाखविलें आहे. स्वरांचे स्थान चुकल्यास किती अर्थहानि होते हेंही त्यांत फार विस्तृतपणें सांगितलें आहे. प्रत्येक वेदावर असें एकेक स्वराववबोधक प्रातिशाख्य आहे. प्रो. विल्सनसाहेब प्रातिशाख्यासंबंधानें म्हणतो, " इतर कोणत्याहि राष्ट्राच्या वाङ्मयांत मानवी भाषाशास्त्राच्या स्वरूप-लक्षणाचें इतकें सूक्ष्म, व्यापक, खोल आणि विस्तृत विवेचन झालेलें नाहीं. "

" प्रातिशाख्यांत नाम, क्रियापद, सर्वनाम, विशेषण, अव्यय इत्यादि व्याकरणाच्या सर्व अंगांचा विचार अत्यंत विस्तृतपणें व सावधानतेनें झालेला आहे. परंतु प्रातिशाख्यानंतर किती तरी काळानें ग्रीक लोकांस अशा वर्गीकरणाची आवश्यकता भासली ! प्लेटोचें सर्व काम नाम व क्रियापद यांजवरच भागलें. त्याचा. शिष्य ॲरिस्टॉटल यालाही बराच वेळपर्यंत यापलीकडे जाण्याची आवश्यकता भासली नाहीं. परंतु भाषाशास्त्राचें विवेचन व नियमसंघटना करतांना, त्यास उपपदें व उभयान्वयी अव्ययें यांची भर घालावी लागली; झेनोडोटस यानें सर्वनाम व ॲरिस्टार्कस् यानें शब्दयोगी अव्ययांची भर घातली. "

आग्रा कॉलेजचे मुख्याध्यापक व प्रसिद्ध शब्दव्युत्पत्तिशास्त्रज्ञ थॉमसन यांच्यामतें संस्कृतांतील व्यंजनव्यवस्था अपूर्व असून मानवी बुद्धिमत्तेच्या विलासाचा तो एक

उत्कृष्ट मासला आहे. युरोप या बाबतींत अशा विज्ञानशास्त्रप्रकर्षाच्या (Scientific age) कालीं २५०० वर्षें मागें आहे व सर्व ध्वनींचीं वाचक अशीं अक्षरें इंग्लिश-भाषेंत नाहीं. याबद्दल त्यांनीं खेद व्यक्त केला आहे. रे. वॉर्ड म्हणतो कीं आर्यांच्या शब्दव्युत्पत्तीशास्त्रानें तर इतर प्राचीन व अर्वाचीन राष्ट्रांवरही मात केली आहे.

प्राचीन भारतामध्यें भाषाशास्त्राच्या व्याकरण या अंगाची इतकी वाढ झाली होती कीं त्याची तुलना करणेंच अशक्य आहे; अथवा साहित्यशास्त्राच्या इतिहासांतील तो एक चमत्कारच आहे असें म्हटल्यास कांहीं अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. पाणिनि हा व्याकरणशास्त्राचा प्रवर्तक आहे व त्याचा ग्रंथ म्हणजे मानवी मनाच्या अत्यंत प्रगल्भतेची कसोटीच आहे. साहित्यप्रासादांतील अत्यंत मान्य व पूज्य सिंहासनावर जगांतील सर्व पंडितांनीं मोठ्या कृतज्ञतेनें थोर प्रशंसेनें आणि उदार बुद्धीनें त्यास आरूढ केलें असून त्यांस तेथून पदभ्रष्ट होण्याची भीति आहे असें कोणाहि विद्वानास वाटत नाहीं. पाणिनीची अलौकिक व असामान्य बुद्धिमत्ता पाहून पाश्चात्य पंडित किती भारून गेले आहेत, त्यांचें मन आदर व आश्चर्य यांनीं कसें भरून गेलें आहे; त्याच्या प्रखर बुद्धितेजानें ते कसे दिपून गेले आहेत व त्याचें गुणवर्णन करून अल्पांशानें तरी ऋणमुक्त व्हावें म्हणून कसे उत्सुक झाले आहेत, हें खालील एक दोन उताऱ्यांवरून व्यक्त होईल. प्रो. वेबर म्हणतो, " पाणिनीचे ग्रंथ उघडतांच असें वाटतें कीं आपण एका अत्यंत भव्य प्रासादांत शिरलों आहों. त्या भव्य मंदिराच्या द्वारतोरणावरील कर्त्याचा नामलेख पाहिला म्हणजे मन क्षणभर आश्चर्यानें व कौतुकानें भरून येतें; भाषासृष्टींतील सर्व प्रसंगांचें यथायोग्य व समर्पक स्पष्टीकरण केलेलें पाहून त्या पुरुषाची आश्चर्यकारक कल्पकबुद्धि व साधनसामुग्रीचें सखोल व परिपूर्ण आकलन यांविषयीं पूर्ण खात्री पटते व मनावर त्याच्या बुद्धिप्रकर्षाबद्दल सकौतुक आदराचे फार वजनदार दडपण पडतें. "

सर हंटर म्हणतो, " विधानांचा बिनचुकपणा, धातुपृथक्करणाची परिपूर्णता, आणि शब्दघटनातत्वांची शुद्धता या तीन बाबतींत जगांतील सर्व व्याकरणग्रंथांत पाणिनीचा ग्रंथ अत्यंत श्रेष्ठ आहे. कित्येक ठिकाणीं थोडी दुर्बोधता आली आहे, तेवढी सोडून दिली तर बीजगणितासारखी परिभाषा निर्माण करून त्यानें आपल्या ग्रंथांत जो खोचदार संक्षिप्तपणा आणला आहे तो तर केवळ निरुपमच आहे. मानवी प्रयत्नानें व कल्पकतेनें केवढी उज्वल कामगिरी करतां येते याचें त्यानें संस्कृत भाषेंतील सर्व गोष्टींची

तार्किक पद्धतीनें जो मेळ घालून दिला आहे त्यावरून प्रत्यंतर येतें. संस्कृत भाषामंदिरांतील शब्दनिर्मितीचे असंख्य नियम व स्वरभेद, अनेकावयवी साधित शब्द, दहा गण, बहुविध भूतकाळ व काळांची एक लांबच लांब रांग इत्यादि बहुविध गोष्टींचा पसारा पाहिला म्हणजे कधीं काळीं ही व्यवहाराची भाषा होती किंवा नाहीं, अशाबद्दल जबरदस्त शंका येऊ लागते. ”

भाषेची प्राणधारणा व जोपासना ज्या व्याकरणाच्या थोर व उदात्त तत्त्वांनीं होते त्यांचा अजून यूरोपास मागमूसही नाहीं. अशा स्थितींत पाणिनीची अर्वाचीन पाश्चात्य व्याकरणकाराशीं तुलना करणें म्हणजे शुद्ध अन्यायाचें आहे.

मॅनिंगबाई म्हणते, “ यूरोपांतील व्याकरणकारांचें समाधान ज्या प्रकारच्या व्याकरणग्रंथांनीं होतें त्यापेक्षां संस्कृतांतील व्याकरणग्रंथ निःसंशय किती तरी पटीनें श्रेष्ठ आहेत.

हंटर व प्रोफेसर मॅक्समुल्लर यांच्या मतें “ व्याकरणांतील पृथक्करण ” व “ मानवी भाषाशास्त्रांतील तत्त्वांचीं मांडणी ” या दोन वाबतींत प्राचीन आर्यांचा हात धरण्याचें साहस व योग्यता कोणाही अर्वाचीनाच्या अंगीं नाहीं.

पाणिनीसारखा अद्वितीय व्याकरणकर्ता निर्माण होण्यापूर्वी व्याकरणाच्या भूमीची मशागत ‘ आपिशली ’, ‘ काश्यप ’, गार्ग्य, ‘ गालव ’, ‘ शुक्रवर्मन् ’, ‘ भारद्वाज ’, ‘ शाकटायन ’, ‘ शाकल्य ’, ‘स्फोटायन ’ इत्यादि व्याकरणकारांनीं करून ठेविली होती; व त्यांत पाणिनीसारखें सुंदर कलम तयार होऊन त्यापासून पुढें भव्य व जगड्व्याळ वृक्ष तयार झाल्यास त्यांत कांहीं विशेष आश्चर्य नाहीं.

पाणिनीच्या व्याकरणावर वृत्तिकाकार कात्यायन यानें भाष्य लिहिलें व व्याकरण महाभाष्यकार पतंजली यानें साधकबाधक टीका लिहिली. पाणिनि, पतंजली व कात्यायन या त्रिमूर्ति व्याकरणशास्त्रांत अधिकारसंपन्न व जगमान्य आहेत. या त्रिकुटानें व्याकरणशास्त्रास असामान्य ऊर्जितावस्थेस आणून, त्याची शास्त्रीयदृष्ट्या जी थोरवी वाढविली आहे, याबद्दल त्यांच्या वंशजांनीं व अखिल जगानें त्यांचें ऋणी झालें पाहिजे हेंच सरळ व न्याय्य आहे.

व्याकरणाप्रमाणेंच कोशग्रंथांचीही प्राचीन कालीं वाढ झाली होती. संस्कृतामध्यें लहानमोठे असे ५२ कोश आहेत असें म्हणतात; परंतु त्यापैकीं फारच थोडे प्रचारांत आहेत. निघंटु, मेदिनी, हेमचंद्र, वाचस्पत्य, अमरकोश इत्यादि प्रमुख असून व्यवहारांत यांचाच उपयोग नेहमीं करतात. कोशवाङ्मयासंबंधी रेव्हरंड वार्ड म्हणतो, “ प्राचीनकालीं संस्कृतभाषा किती परिणतावस्थेस आली होती हें कोश ग्रंथावरून स्पष्ट दिसून येतें आणि याबद्दल हिंदु विद्वान लोक अत्यंत थोर आदरास पात्र आहेत. ”

प्रकरण २ रें.

येथवर वैदिक वाङ्मयाचा विचार झाला. आतां भारतीयांच्या काव्यसंपत्तीकडे वळूं. ही काव्यसंपत्ती एवढी अफाट आहे कीं, परकीय लोकांस त्याबद्दल राहून राहून अत्यंत आश्चर्य वाटतें; प्रो. मॅक्स डंकर म्हणतो कीं, संस्कृतांमधील काव्यभांडाराचा मुळी ठावच लागत नाहीं. परंतु भारतीयांची नैसर्गिक प्रवृत्ति काव्यमय असल्यानें त्यांच्या हातून इतके असंख्य काव्यग्रंथ निर्माण झाले यांत काय आश्चर्य ? सध्या उपलब्ध असलेल्या ग्रंथसंख्येनें जर आपण इतके मोहित झालों, तर पुच्छ विषाणहीन नर-पशूंच्या धार्मिक अत्याचारास बळी पडून ज्यांची राखरांगोळी झाली, त्या ग्रंथांची नक्की संख्या आम्हांस माहीत झाली तर आमच्या आश्चर्यास सीमाच उरणार नाही. नैसर्गिक काव्यप्रकृति हीच या अफाट ग्रंथसंपत्तीचें कारण होय. कायदेशास्त्र काव्यमय, जोतिष-शास्त्राची उभारणी काव्याच्या पायावर, इतर विज्ञानशास्त्राची भाषा काव्य–युक्त, धर्म-शास्त्र काव्यवाणीनें बोललेलें, सारांश कोणत्याही लेखनाचें कामीं काव्याचा सहज लीलेनें उपयोग करण्याचें त्यांस मुळीच जड जात नसे. जे ऋषी त्रिकाल सत्यवेद आपल्या अत्यंत रसाळ, सरळ, मोहक आणि काव्यरसानें थबथबलेल्या वाणीनें बोलले त्यांच्या वंशजास कवित्वशक्ति परंपरेनें प्राप्त झाली असल्यास त्यांत नवल तें कोणतें? काउंट जानस्टर्ना म्हणतो,–" भरतभूमींत काव्याचेंच साम्राज्य आहे; अमूर्त भावनामय शास्त्रांचीच नव्हें तर धर्मग्रंथाची सुद्धा भाषा काव्यछटेनें रंगलेली असून शिवाय त्यांत काव्याचा मोहकपणा आणि आकारसादृश्य हे दोन गुणही कांहीं कमी नाहींत. "

प्रो. हरीनच्या मतें हिंदुलोक हे निसर्गतःच काव्यप्रवृत्त आहेत; यास्तव अशा लोकांच्या हातून काव्याची विलक्षण वाढ आणि विकास झाला व निरनिराळ्या शाखांचे संवर्धन, होऊन तीं विलक्षण पूर्णत्वास पोचलीं, तर त्यांत काय आश्चर्य? वृत्तान्तपर, नाट्यविषयक, भावपूर्ण, बोधपर, अख्यायिकात्मक इत्यादि शाखांची संस्कृतकाव्यांत पूर्ण वाढ झालेली आपणांस दिसते, आणि त्या त्या शाखामध्यें अत्यंत श्रेष्ठ प्रतीची ग्रंथफलेंही भरपूर निर्माण झालेलीं होतीं.

एल्फिन्स्टन साहेब म्हणतो–" ज्यांनीं ज्यांनीं संस्कृतांमधील वीररसप्रधान काव्यें वाचलीं आहेत, त्यांनीं त्यांनीं हर्षभरित चित्तानें व मोठ्या प्रेमानें त्यांचें गुणवर्णन करून

फारच वाहवा केली आहे; स्वतः त्याच प्रकारचीं काव्यें रचण्याची ज्यास शक्ती आहे अशा तज्ज्ञ व रसिकवर्यांचा त्या काव्यांच्या रसाळपणा व सौंदर्याविषयींचा अभिप्राय फारच स्पष्ट व हृदयस्पर्शी आहे. केवळ पौर्वात्यभाषांचा चिकीत्सक दृष्टीनें अभ्यास करणाऱ्या विद्वानांनाच संस्कृत वाङ्मयानें मोहून टाकले आहे असें नाहीं; तर इतर पाश्चात्य पंडितही प्रत्यक्ष संस्कृत ग्रंथ न वाचतां, केवळ भाषांतरादि इतर रीतीनें मिळालेल्या ज्ञानामें लुब्ध होऊन गेले आहेत. विल्सन जोन्स या संस्कृत पंडिताइतकेंच मिल्मन आणि श्लेजेल हेही संस्कृत वाङमयाची तारीफ करण्यांत रंगून जातात. कोणापासून सरळ भाषासरणी ऋजूता व स्वतंत्र विचारशक्ति; तर कोणापासून गांभिर्य, सौंदर्य व हृदयभेदी कारुण्यभाव हे आम्हांस शिकतां येतील; संस्कृत नाटकांतील पात्राचें नैसर्गिक धीरोदात्त वर्तन; आचारांतील धार्मिक पवित्रपणा व ग्रंथकाराचें गाढ कल्पनाचातुर्य इत्यादि गुण इतर अनेक पाश्चात्य पंडितांनीं निर्दिष्ट केले आहेत.

या नंतर आपण महाकाव्याकडे वळूंः—

भारतीय वाङमयांत महाकाव्याचा भाग बराच आहे. लहानमोठी अशी विविध महाकाव्यें संस्कृत वाङमयाकाशांत सूर्य चंद्र व तारकाप्रमाणें चमकतांना व प्रकाशतांना पाहून अखिल मानवजातीस कौतुक व आनंद वाटला, तर त्यांत आश्चर्य तें कोणतें? रामायण व महाभारत हीं त्या पैकीं दोन अत्यंत श्रेष्ठ आहेत; जगांतील इतर कोणत्याही वाङमयांत त्यांच्या तोडीचीं महाकाव्यें मिळणार नाहींत.

ग्रीक भाषेंतील दोन विख्यात महाकाव्यें " इलियड " व " ओडिसी " होत. परंतु प्रोफेसर मोनियर विल्यम्ससारख्या आंग्लपंडितानें असें म्हटलें आहे कीं, "या दोन ग्रीक महाकाव्यांना रामायण व महाभारत यांच्या पंक्तिस केव्हांच बसवितां येणार नाहीं. त्यांची व यांची तुलना करणें, हें नगाधिराज हिमालयांतील बर्फाच्छादित प्रदेशांत उगम पावून ठिकठिकाणीं लहानमोठ्या नद्यानाल्यांच्या संयोगानें विस्तृत होणाऱ्या; कांहीं ठिकाणीं अफाट उथळ पात्रांतून वहाणाऱ्या, तर कित्येक ठिकाणीं भिन्न दिग्गामी खोल, अनेक प्रवाहांत रूपांतरित होणाऱ्या ' गंगा ' ' यमुना ' यासारख्या महानद्यांना व ' ॲटिका ' आणि ' थेसाली ' प्रांतांतील डोंगरी ओढ्यांना एकाच मापेंत ओघ-ण्यासारखें आहे. संस्कृत वाङमयाच्या इतर शाखामध्यें जशी अफाट ग्रंथसंपत्ति आहे तीच गोष्ट महाकाव्याची. परंतु यूरोपांतील विद्याप्रिय मनुष्याच्या दृष्टीला एवढा अफाट ग्रंथसमूह अपरिचित असल्यानें त्यास संस्कृतांतील ग्रंथभांडार पाहून फार अचंबा वाटतो "

अशा महाकाव्यापैकीं, रामायण हें जुनें असून महाभारत हें अत्यंत विस्तृत आहे. काव्यविषयक अत्युच्च गुणासंबंधानें तर बोलावयासच नको; कारण त्यांची बरोबरी करणें हें काम इतर कोणत्याही भाषेंतील वाङमयाच्या अवसानाबाहेर आहे, परंतु पाश्चात्य मार्मिक पंडितांना ह्या दोन ग्रंथाच्या विस्ताराचेंच कोडें अजून सुटत नाहीं. कारण 'महाभारताच्या' २२००० ओळी आहेत व 'रामायणाच्या' ४८००० ओळी आहेत. परंतु होमरच्या 'इलियडच्या' फक्त १५६९३ ओळी आहेत तर व्हर्जिलच्या 'इनियडच्या' फक्त ९८६८ च ओळी आहेत होमरच्या दोन्ही (इलियड व ओडिसी) महाकाव्याची ओळींची संख्या अवघी ३०००० भरते. अर्थात् रामायण यांच्या दिडपटीपेक्षां मोठें आहे, हें निराळें सांगणें नकोच.

आतां रामायणाच्या अंतरंगाकडे वळूं. रामायण हा ग्रंथ कोणासंबंधीं लिहिला आहे, त्यांतील कथाभाग काय आहे, त्यांत कोणतीं तत्त्वें कवीस सांगावयाचीं होतीं, व त्या ग्रंथापासून समाजावर काय परिणाम झाला आहे, हें सांगण्याची मुळींच गरज नाहीं. कारण हिंदूलोक त्या ग्रंथास वेदाप्रमाणें पूज्य मानतात व त्याची शिकवण कथा, पुराणें, प्रवचन इत्यादि मार्गांनीं प्राचीन कालापासून सुरु आहे. कोणाही कुणाल्यास विचारलें, तरी सुद्धां त्यास रामचरित्र माहीत नाहीं असें कधींही होणार नाहीं; आणि समाजांत ह्या काव्यातील नायक, नायिका, व इतर लक्ष्मण, बलभीम, अंगद ह्या उपपात्रास देवाप्रमाणें मानण्याची चाल आहे. उत्तर हिंदुस्थानांत तुलसीदास, आपल्या इकडे रामदास व इतर अनेक साधुसंतांनीं आपल्या रसाळ, भक्तिप्रचुर, मोहक व प्रासादिक वाणीनें राममहिमा गाऊन समाजास अनेक धर्मक्रांत्यांतून सुखरूप पार नेलें आहे. व लोकांची धार्मिकबुद्धि कायम ठेऊन त्यांचे ठिकाणीं परचक्राचे, जुलुमाचे व इतर आपत्तींचें आघात सहन करण्यास समर्थ केलें आहे. तेव्हां याठिकाणीं मूलग्रंथाचें सार अथवा त्यांतील मुख्य पात्रांचें सविस्तर गुणवर्णन न करितां फक्त या ग्रंथासंबंधीं पाश्चात्य पंडितास केवढा आदर वाटतो व त्यांचे राम व सीता यासंबंधीं काय म्हणणें आहे, हें थोड्क्यांत देण्याचें योजिलें आहे. कारण कीं, मानसिक दौर्बल्य व परवशता आपल्या समाजांत फार वाढल्यानें प्रत्येक गोष्ट–चांगली अगर वाईट–पाश्चात्यांच्या दृष्टिनें पाहण्याची आम्हांस संवय जडली आहे. आमच्या संस्था, संस्कृति, रितीभाती, धार्मिक चाली, आमचे धर्मग्रंथ; आमचें वाङमय व इतिहास, आमचे वीर, राष्ट्रपुरुष, साधु, धर्मसंस्थापक इत्यादि राष्ट्रसंवर्धनाच्या ज्या ज्या बाबी आजपर्यंत घडल्या, अथवा ज्यायोगें आमचें राष्ट्र हीन स्थितीप्रत पोचलें; त्याविषयीं स्वतः विचार करून, त्या संबंधीं चर्चा-

करून उपाय चिंतनाच्या व योजनेच्या मार्गास आमच्या समाजांतील फारच थोडे पुढारी लागले आहेत. जरी गेल्या १०।१२ वर्षांच्या अवधींत थोडी इष्ट मार्गानें सुधारणा चालूं आहे व लोकांत स्वाभिमानाची अंधुक ज्योत पेटली आहे, तरी त्या पूर्वीच्या काळांत वर निर्दिष्ट केलेलीं मानसिक अवस्था फार प्रामुख्यानें आढळून येत होती; आणि अद्यापी सुद्धां तिचा पगडा समाजांत बराच आहे; तरी तिचा निरास व्हावा व पाश्चात्य ग्रंथकार जें जें म्हणतील, तें तें वेदवाक्य असें मानण्याची प्रवृत्ती पार नष्ट व्हावी अशी इच्छा असणें अगदीं स्वाभाविक आहे, व त्यासच अनुसरून या पाश्चात्य पंडितांच्या अभिप्रायानें कांहीं विवेक-शून्य व विचारशून्य लोक असतील त्यांच्या डोळ्यांत अंजन, पडावें व आमच्या आवतारी राष्ट्रपुरुषाबद्दल योग्य अभिमान उत्पन्न व्हावा, म्हणून खालीं कांहीं अभिप्राय उद्धृत करणार आहों.

रामायण ग्रंथामध्यें कोठेंही परस्पर भेद आढळून येत नाहीं. भाषा अत्यंत सुंदर असून कल्पना तर फारच बहारीच्या आहेत. सर मोनियर विल्यम्स म्हणतो कीं, " संस्कृत वाङमयामध्यें रामायणाइतकें मोहक काव्य दुसरें कोणतेंच नाहीं. भाषेंतील साधेपणा, स्पष्टता व निर्दोषत्व हे अभिजात काव्यांतील गुण, शुद्ध काव्यभावनेच्या सुंदर छटांची विपूलता, वीररसात्मक प्रसंगाचीं अक्षरशः वर्णनें, सृष्टींतील अत्यंत भव्य देखाव्यांचीं शब्दचित्रें, मानवी चित्तांतील निरनिराळ्या विचारांचें कसकसें युद्ध चालतें, याविषयीं पूर्ण ज्ञान आणि त्यांतील अत्यंत विशुद्ध भावनाशीं पूर्ण परिचय इत्यादि गुणांनीं जगतांतील कोणत्याही भागांत, कोणत्याही काळीं निर्माण झालेल्या अत्यंत सुंदर व मनोरम काव्यांमध्यें याची (रामायणाची) योग्यता फारच मोठी आहे. निसर्गप्राप्त वाडीनें भरारलेल्या व विस्तारलेल्या उपवनांची उपमा रामायणास दिल्यास खरोखर कांहींही वावगें होणार नाहीं. गोड व सुंदर उपदेशपर-श्लोक हींच कोणीं फलपुष्पें, त्रिकालाबाधित सत्य तत्वें हेच चिरंजीव, अच्छोदकाचे झरे व परस्परपरान्वयी विस्तृत हृद्य उदात्त कथाभाग ही गर्द वृक्षराजी अशाप्रकारें ही उपमा किती तरी सार्थ होणार आहे बरें?" रामचरित्र तर किती उत्तम रितीनें रेखाटलें गेलें आहे? रामचरित्रांत अव्वलपासून अखेरपर्यंत जें निस्वार्थी वर्तन दृग्गोचर होत आहे, त्यावरून त्याची मानुषी जीवनक्रमाबद्दल मनांत मोठी शंका येऊन हा खरोखर परमेश्वरी अंशच असला पाहिजे, अशी मनाची समजूत होते. त्याच्या अतिमानुष कृत्यांनीं कधीं कधीं आमच्या मनाची मोठी चमत्कारिक स्थिति होऊन कांहीं वेळ तर मन केवळ भांबावून जातें, परंतु असे प्रसंग फार वेळ टिकत नाहींत. निदान पूर्वभागांत तरी एकाद्या शूर, उदारमनस्क पवित्र व सद्गुणी

मनुष्यापेक्षां कवीनें जास्त असें रामचरित्रांत मुद्दामच दाखविले नाहीं. आज त्याचें शौर्य, निर्लोभता, औदार्य, पित्राज्ञाप्रामाण्य, विमल पत्नीप्रेम, सहोदरप्रेम व क्रोधमय विचारांचा पूर्ण अभाव इत्यादि गुणांची मात्र जितकी तारिफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. आपल्या सापत्नमातेच्या क्रोधास जेव्हां तो बळी पडतो, तेव्हां त्याच्या मुखावाटे एकही रागाचा शब्द निघत नाहीं; जेव्हां त्याचा पिता त्यास वनवासास पाठविण्याचें ठरवितो, तेव्हां तो ब्रूं कां चूं सुद्धां करित नाहीं; आपल्या पित्याच्या माथीं प्रतिज्ञाभंगाचें पाप येण्यापेक्षां आपल्या स्वतःच्या सुखाची होळी करण्यास तो तयार होतो; व सीतेविषयीं तर बोलावयासच नको; कारण ती केवळ गृहलक्ष्मीच होय व तिजमध्यें सद्गुण मुर्तिमंतच अवतरले होते असे दिसतें. ''

'स्त्रीजातीला सीता हा उत्तमोत्तम आदर्श आहे. तिची थोर पति-निष्ठा, तिचें अमर्याद प्रेम, पतिपत्नींच्या शाश्वत व दैवी संबंधाविषयीं तिची अत्युच्च कल्पना इत्यादि बाबतींत कवीनें जीं ध्येयें कल्पिलेलीं आहेत, तीं श्रेष्ठपणाच्या व उदात्तपणाच्या दृष्टीनें इतर कोणत्याही भाषेंत अगर वाङ्मयांत कोठेंही पहावयास मिळणार नाहींत.

प्रोफेसर डाउडन, प्रिन्सिपॉल ग्रिफिथ, मिस मेरी स्कॉट इत्यादि विद्वानांनीं व विदुषींनीं राम व सीता या दांपत्याच्या गुणवर्णनपर काव्यांनीं आपल्या प्रेममय व स्तुतीपूर्ण निर्झरास वाट मोकळी करून आपलें सहृदयत्व गुणग्राहकत्व व प्रकट करून रामायण काव्याची थोरवी, संस्कृत भाषेची प्रभुता व कवीचें अलौकिक रचनाचातुर्य, अप्रतिम शब्दचित्रकौशल्य व गाढविद्वान इत्यादि गोष्टी आपल्या ग्रंथांत ठिकठिकाणीं कबूल केल्या आहेत.

आतापर्यंत दिलेल्या उताऱ्यावरून रामायणाबद्दल पाश्चात्यांच्या हृदयांत केवढी पूज्यबुद्धि आहे, त्यांचें अध्ययन युरोपियन पंडित व विदुषी किती आस्थेनें करीत आहेत, त्यांना रामायणाच्या कर्त्याबद्दल केवढा आदर आहे व खुद्द ग्रंथांतील प्रत्येक पात्रोपपात्रांचा स्वभावपरिपोष, सृष्टि निरीक्षण, नैतिक शिक्षण, रसपरिपोष, वाग्योजनाचातुर्य इत्यादि दृष्टिनें त्यांचा त्या ग्रंथाचा अभ्यास कसा काळजीपूर्वक व आस्थेनें चालला आहे हें दिसून येईल.

आतां आपण महाभारत ग्रंथासंबंधीं पाश्चात्य व अमेरिकन पंडित, वर्तमानपत्रांचे संपादक व इतर विद्याव्यासंगी लोक काय बोलतात तें थोडक्यांत पाहूं.

महाभारत ग्रंथाची निर्व्याज स्तुती करण्याच्या भरांत डॉक्टर हॅसलर नामक अमेरिकन पंडित म्हणतो कीं, '' दैवी स्फूर्तीनें भारलेले प्राचीन आर्यावर्तांतील अत्यंत थोर महात्मे यांनीं जो महाभारतनामक ग्रंथ निर्माण केला आहे, त्याच्याइतका थोर ग्रंथ आजपर्यंत

माझें पहाण्यांत दुसरा नाहीं; व माझ्या पूर्व आयुष्यांतील अनुभवावरून मी असें म्हणतो कीं, या ग्रंथानें मला जितकें वेड लावून सोडलें, तितकें वेड मला इतर कोणत्याही ग्रंथाचें यापूर्वी लागलें नाहीं. या ग्रंथाचा अहर्निश अभ्यास करून मी त्यांतून एक हजारावर उतारे घेऊन माझ्यापुढील आयुष्यांतील अभ्यासाकरितां त्यांची मांडणी केली आहे. महाभारत म्हणजे एक अभिनव सृष्टित्व आहे असें मला वाटते व त्यांतील सत्पक्षप्रीति, ज्ञान, चातुर्य व सत्य इत्यादि गुणसमुच्चयाचें वर्णन वांचून तर मी अगदी तल्लीन होऊन जातो. परंतु एवढ्यानेंच त्याचा मोठेपणा संपला असें नाहीं, तर माझ्या मनानें परमात्मा व जगदुत्पत्ति यासंबंधीं जे कांहीं सिद्धान्त बांधले होते, तेच या ग्रंथांत सुंदर व स्पष्ट भाषेंत सांगितलेले पाहून मला या ग्रंथाबद्दल फारच आदर वाटू लागला; व त्याची थोरवी किती गाऊं असें मला होऊन गेले आहे. ”

हॅमिल्टन डेली स्पेक्टेटर या पत्राच्या ३१ मे १८८८ च्या अंकात खालील उतारा आहेः—“ हें काव्य म्हणजे धर्म, नीति, मानसशास्त्र तत्वज्ञान व राजकारण इत्यादि विषयामधील तत्व-रत्नांचा कथारूप सूत्रामध्ये गुंफलेला हारच होय. दोन हजारापेक्षां अधिक वर्षांपूर्वी आर्यावर्तांतील लोकांचा जीवनक्रम, रितीभाती, राजकारण, धर्म व तत्वज्ञान यांचे हुबेहूब चित्र आम्हांस या ग्रंथांतून पहावयास मिळतें, एवढेंच नव्हे तर अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें काव्य आणि अत्यंत थोर व गहन विचारांची पैदास जी या जगावर झालेली दिसते, त्यापैकीं बरेच या ग्रंथांत आढळून आल्यानें याची अपूर्वता व महती फार वाढते. ”

बाबू पी सी. रॉय यांनीं मोठ्या नेटानें महाभारताचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध करण्याचे काम चालविलें होतें व त्यावेळीं त्यांस अमेरिकेतून जेरोमिआकर्टिन नामक मानववंशशास्त्रज्ञाकडून असें पत्र आलें कीं, ‘ महाभारताचे २४ भाग सावंतपणें व काळजीपूर्वक मी नुकतेच वाचून संपविले आहेत; व त्यावरून माझी खरोखर अशी खात्री समजूत झाली आहे कीं, या ग्रंथाइतका श्रेष्ठ ग्रंथ दुसरा नाहीं; व यापासून मला जेवढा आनंद झाला, तेवढा इतर कोणत्याही ग्रंथामुळें आजन्मांत झाला नाहीं. आर्यांच्या बुद्धिमत्तेविषयीं व खऱ्या शीलाविषयीं या ग्रंथवाचनानें सर्व लोकांच्या नेत्रांत चांगलेंच अंजन पडेल. तुम्हीं जें कार्य हातीं घेतलें आहे त्यायोगें केवळ हिंदुस्थानचेंच हित होईल असें नाहीं, तर सर्व आर्यवंशाचेंही कल्याण त्यायोगें होणार आहे. महाभारत ही एक फार विशाल खाण आहे व तीमधील संपत्तीचा अद्यमास अजून जगाला लागलेला नाहीं. यांतील रत्नें जसजशी बाहेर येतील तसतसें याचें महत्त्व जगास कळूं लागेल. या ग्रंथांतील माहि-

तींनें आर्यवंशाचा इतिहास कळावा, अशी ज्यास तीव्र लालसा आहे त्यांचें समाधान होईल; व दीनदुबळा मानव आणि अत्यंत शक्तिमान सर्वव्यापी परमात्मा यांचें काय नातें आहे याचाही बोध स्पष्टपणे यावरून होणार आहे. '

१८८६ च्या सप्टेंबरच्या अंकांत सान्नहिलेर बार्थोलेमी नामक एक फ्रेंच मासिककार म्हणतो कीं, " सुमारें शंभर वर्षांपूर्वी विल्किन्स नांवाच्या गृहस्थानें महाभारतांतील कांहीं वेंचे छापून प्रसिद्ध केले, आाण भगवद्गीतेच्या प्रसंगानें या प्रचंड ग्रंथाचा परिचय जगास करून दिला. या ग्रंथाचा भव्यपणा ऐकून सर्व पाश्चात्य जग थक्क झालें. होमर हा महाभारतकार व्यास याजपुढें कःपदार्थ असें सर्व लोक मानू लागले व आर्यावर्त ग्रीसपेक्षां श्रेष्ठ आहे, अशी सर्वांची खात्री झाली, आणि गतकालीन मानवी बुद्धिमत्ता व परिश्रम यांचे हें भारतीय महाकाव्य म्हणजे अतिश्रेष्ठ व भव्य स्मारकच होय; याबद्दल सर्वांचे ऐकमत्य झालें. " सर एडविन् आरनोल्ड, टॉटस मनसन्कोन, ए. बार्थ इत्यादि पंडित व वाटर-टाऊन पोस्ट, हॅमिल्टन डेली स्पेक्टेटर वगैरे वर्तमानपत्रांचे संपादक यांच्या मतांचा निष्कर्ष काढला असतां खालीं दिलेले विशेष महाभारतांत आढळून येतात.

' महाभारताचे कांहीं भाग लेखनकला अवगत होण्यापूर्वीं तयार झाले आहेत, कांहीं पौराणिक कालापूर्वीं रचलेले आहे व कांहीं होमर आणि इजिप्शीयन लोकांचा आद्य मनु मोसेस यांच्याही कालापूर्वीं लिहिलेले आहेत. एकंदरींत पाहतां जगांतील कोणत्याही भाषेंतील महाकाव्यापेक्षां हें संस्कृतांमधील महाभारत नांवाचे महाकाव्य अत्यंत श्रेष्ठ, जुनें, मोठें, मजेदार व चमत्कृति-जनक आहे. यांत नैतिक, मानवधर्मप्रचुर, अद्भुतरसात्मक भाग ठिकठिकाणीं बरेच असून, एकंदर कथाभाग फारच मोठ्या प्रमाणावर आखलेला आहे; व यांतील वीर व पतिव्रता स्त्रिया इतर कोणत्याही भाषेंतील पौराणिक-कथेमधील वीरापेक्षां व साध्वी स्त्रियापेक्षां फारच श्रेष्ठ प्रतीच्या आहेत. यांत कित्येक ठिकाणीं जे अनुपम उत्साहातिरेकाचे प्रसंग, आणि अतुल, कोमल व हृदयस्पर्शी कथाभाग आहेत तसे इतरत्र कोठेही आढळणार नाहींत. राष्ट्रीय नीतीचें, वाङ्मयाचें व प्राचीनकथांचें हें भांडारच आहे. काव्याचा पेशाख चढविलेलें मूर्तीमंत नीतिशास्त्र ज्यास पाहणें असेल त्यानें महाभारताचें अवलोकन करावें. पात्रांचें स्वभावलेखनकार्य इतक्या कुशलतेनें झालें आहे कीं, असंख्य पात्रें असून प्रत्येकाचें स्वभाववैशिष्ट्य कायमच राहिलें आहे. इतकेंच नव्हे तर अत्यंत कौशल्यपूर्वक निरनिराळ्या स्वभावछटांचा योग्य उठाव झाल्यानें, प्रत्येकाचा स्वतंत्र मनोधर्म एकमेकांच्या स्वभाववैशिष्ट्यवृद्धीला सहायभूतच

झाला आहे. पहिल्या प्रतीचें काव्यसौंदर्य, मनोरंजक रितीभाती, विचित्र राहणी व नैसर्गिक आनंदी मनोभावना, यांचाही चित्रपट फारच सुंदर रंगलेला आहे. एकंदर ग्रंथाची भाषा प्रौढ, नियमबद्ध व दीर्घ परिशीलनानें सुसंस्कृत असून भाषाभिवृद्धिच्या ज्या कांहीं पायऱ्या म्हणून मानल्या जातात, त्यांपैकी फारच वरच्या पायरीवर बसण्यायोग्य खास आहे. यांत वर्णिलेलीं शहरें व राजगृहें पूर्व वैभवशील व अलंकृत आहेत; यांतील रणक्षेत्रेंसुद्धां एका प्रकारानें पवित्रच आहेत. कारण यांत कोठेंही बेसुमार व किळसवाण्या क्रौर्याचे प्रकार वर्णिलेले नाहींत. प्रत्येक कथेच्या मुळाशीं धार्मिकतत्व अस्पष्टपणें का असेना पण आरोपीत केलेलें आहे; जितकी जितकी एकादी कल्पित गोष्ट जास्त असंभाव्य दिसेल, तितके तितकें तिच्यामध्यें सत्यासत्ययुद्धाचें गहन तत्त्व अत्यंत मार्मिकतेनें प्रतिपादलेलें आढळून येईल; व आत्मसंयमन, इंद्रियविजय, आत्मपावित्र्य इत्यादि गोष्टींनीं परिकरबद्ध चिरंजीव सत्याच्या भयंकर युद्धामध्यें सज्ज होऊन व विजयाची आशा सोडून लढत कशी चालू ठेविली पाहिजे, याचेंही शिक्षण फार सुंदरपणें यांत दिलेलें आपणास आढळेल. मनुष्याचें जीवन सात्विकभावनामय झालें पाहिजे, असा सर्वत्र कटाक्ष दिसून येतो व म्हणूनच मनुष्यांमधील रानटी, क्रूर व मनोभावना उत्तेजित कोणत्याही प्रकारें होऊं नयेत म्हणून फार खबरदारी घेण्यांत आली आहे. सर मोनियर विल्यम्स म्हणतो कीं, 'गार्हस्पत्यधर्म व पातिव्रताधर्म या दोहोंचें उद्घाटन यांत फारच सुंदर आहे व अनेक प्रकारच्या उदाहरणांनीं हे धर्म मनावर बिंबवण्याचा अत्यंत श्लाघ्य प्रयत्न सफल झाला आहे. कौटुंबिक व सामाजिक सुखाचे मनोहर व मर्मस्पर्शी चित्र तर फारच बहारीचें आहे. सर्वत्रसिद्ध व सर्वकाल सत्य अशा मानवीस्वभावांतील सर्वजनसामान्य भावना व स्फूर्ती यांचें यथायोग्य निदर्शन व कौटुंबिक प्रेमप्रसंगाचें चित्रकर्म या बाबतींत संस्कृत महाकाव्याची सर कोणासच येणार नाहीं. आतापर्यंत निरनिराळ्या पंडितांच्या अभिप्रायांचा जो गजरा विणण्यांत आला, त्यावर जरतारीच्या सूत्रांचें आच्छादन घालण्याकरितां आपण असें म्हणूं कीं, मानवी बुद्धि-सुंदरीच्या अत्यंत विशुद्ध व सुंदर विलासांचें महाभारत म्हणजे केवळ क्रीडांगणच होय.

मधुर, दिव्य गीर्वाण भाषेंतील जी अत्यंत श्रेष्ठ अशीं दोन महाकाव्यें, त्यांचा येथवर विचार झाला. आतां यापुढें महाकाव्याच्या जातीचीं अर्थात् महाकाव्याचे गुणधर्म कमीअधिक प्रमाणानें असलेलीं इतर जीं कांहीं आहेत, त्यांचा फक्त जातां जातां नाम-निर्देश करूं. रघुवंश, शिशुपालवध, किरातार्जुनीय, भट्टीकाव्य, कुमारसंभव, नलोदय, राघवपांडवविजय व नलदमयंति इत्यादि काव्यांमध्यें वर निर्दिष्ट केलेले गुण कमी अधिक प्रमाणानें आढळून येतात.

वरील काव्यामध्यें जे जे गुण अथवा रस कवीच्या. अचाट बुद्धि सामर्थ्यानें, अलोट कल्पना शक्तिनें, संस्कृत भाषेच्या अनुपम प्रगल्भतेनें व माधुर्यानें परिपक्व दशेस आणले गेले आहेत, ते पाहून यूरोपियन पंडितांची बुद्धि कुंठितच होऊन जाते. याला कारण त्यांचे ठिकाणीं बुद्धिप्रकर्षाचा अभाव आहे असें नाहीं; परंतु हा भेद दोन राष्ट्रांतील परिस्थिती भिन्नत्वामुळें उत्पन्न झाला आहे; भिन्न विचारसरणी, व संस्कृति यांचाही थोडाबहुत परिणाम या कामीं झाला असलाच पाहिजे. ग्रीस, रोम व आर्यावर्त यांच्या नैसर्गिक मांडणीकडे लक्ष दिलें तर आपणास असें आढळून येईल कीं, या कामीं निसर्गाची भारतीयास फार मदत झाली आहे. ज्या परिस्थितींत आपण वाढतों तत्सदृश होणें हा स्वभावसिद्ध धर्मच आहे. यादृष्टीनें पाहिल्यास संस्कृत महाकाव्यांतील पात्रें अद्भुत शक्तिमान्, महातेजस्वी, अग्नितुल्य पवित्र, पर्वताप्रमाणें धैर्यवान्, पृथ्वीप्रमाणें सहनशील, सत्वाला जागण्याकरितां जीवावर उदार; या प्रकारचीं आपणास आढळून येतात. प्रत्येक गुण घेऊन तो परांकोटीला पोचविला आहे, असेंच पात्रांच्या वर्णनावरून दिसतें. या कामीं आर्यग्रंथकाराच्या अप्रतिहत कल्पनाप्राचुर्याची व मनश्चक्षूंच्या अफाट पल्ल्याची जरी बरीच मदत झाली असली, तरी सभोंवतालच्या परिस्थितीचाही तितकाच उपयोग झाला आहे.

आर्य–आचार्य, कवी व ऋषि यांचा अखंड सहवास गननभेदी पर्वत, प्रशांत गंभीर व विस्तृत पात्रें आणि सभोंवार पसरलेला अफाट व अमर्याद भूभाग, ह्या नैसर्गिक वस्तूंशीं जडल्यामुळें त्यांच्या स्वरूपाची प्रतिक्रिया यांच्या काव्यनिर्भर मनावर झाल्याशिवाय राहिली नाहीं. ती कशा प्रकारची झाली याची साक्ष संस्कृत वाङ्मयावरून मिळतच आहे. यूरोप व आर्यावर्त यांमधील निसर्गभिन्नत्व सर्वप्रसिद्धच आहे. यूरोपांतील भूमीवर वाढलेल्या पाश्चात्यांच्या बुद्धींत संकुचितपणा व तनुत्व फार आहे, याचें कारण नैसर्गिक स्थितीच होय. कारण कांहींही असो त्यांची विचिकित्सा करण्याचें हें स्थळ नव्हे; परंतु यूरोपियन पंडिताच्या ग्रंथावरून असें स्पष्ट दिसतें कीं, त्यांना प्रत्येक भारतीय वस्तू वैभवसंपन्न, श्रेष्ठ, विशाल व कौतुकपूर्ण दिसते. प्रोफेसर हरिन्सारखा विद्वान म्हणतो कीं, हिंदूच्या पौराणिक कथा इतर राष्ट्रांतील कथाप्रमाणें भरपूर तर आहेतच. पण शिवाय सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें त्या अत्यंत सरस असून, काव्यगुणांची, भाषासौंदर्याची, नीतिबोधाची तर त्यांत अगदीं रेलचेल आहे.

आतां शेवटीं एका गोष्टीचा विचार करून हें बरेच लांबलेलें प्रकरण पुरें करूं. असा

एक वाद बरेच दिवसापासून प्रचलित आहे कीं, इलियडचा कथाभाग रामायणावरून घेतला आहे; आणि त्याच्या पुष्टयर्थ निरनिराळ्या पांडितांनीं त्या दोन काव्यांमधील पात्रांची अनेक दृष्टींनीं तुलना करून ही गोष्ट सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. ' आर्यांच्या वसाहती ' या प्रकरणामध्यें असें स्पष्ट दाखविण्यांत आलें आहे कीं, तेथील वसाहतकार मूळचे आर्यावर्तांमधील होते, आणि ही गोष्ट एकदां मान्य केली म्हणजे मग हिंदु लोकांच्या पौराणिक कथावरून आणि महाविख्यात व दुर्गम प्रतीच्या महाकाव्यावरून स्वपरिस्थितीला साजेल, चालिरितीला जमेल व संस्कृति, लोकरुचि याला पटेल अशा स्वरूपांत त्यांचें रूपांतर झाले असेल यांत कोणासही शंका येणार नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, ग्रीक लोकांच्या वाङ्मयामध्यें एक जो विशेष आढळून येतो, तो इतर वाङ्मयांत कोठेंही दिसत नाहीं. वाङ्मयाची भूमिका बरेच दिवस कसावी लागते, अप्रसिद्ध लेखरूपी असंख्य कृषीवलांनीं बहुत कष्ट करून व बरीच मशागत करून ती महाकाव्याच्या पिकाला तयार करावी लागते. वाल्मिकी व व्यास हे महाकवी निर्माण होण्यापूर्वी किती तरी दिवस संस्कृत वाङ्मयाची मेहनत सुरू होती. रोमन लोकांमध्यें व्हर्जिल व इंग्लिश लोकामध्यें मिल्टन हेच रोमन व इंग्लिश वाङ्मयाचे आद्यजनक नसून त्यांच्यापूर्वी फार दिवस या दोन्ही भाषेमध्यें तत्पूर्व ग्रंथकाराचे परिश्रम चालू होते, आणि व्हर्जिल व मिल्टन यांना आपलीं काव्यें रचण्यास व अभिप्राय प्रसिद्ध करण्यास त्या तयार झाल्या होत्या. ग्रीक लेखांच्या वाङ्मयाशीं येऊन पोचलों म्हणजे मात्र सर्वच उलट दिसून येतें. होमरच्यापूर्वी कोणीही कवी झाला नसून, त्यानेंच ग्रीक वाङ्मयाचा पाया घातला व त्यानें जीं काव्यें निर्माण केलीं तीं अपरिपक्व, अप्रगल्भ व असंस्कृत भाषेमध्यें लिहिलीं नसून, महाकाव्यांचे सर्वगुण सुश्लिष्टपणें व छानदारपणें धारण करणाऱ्या भाषेमध्यें लिहिलीं आहेत. परंतु ही गोष्ट सृष्टिक्रमाच्या व इतर वाङ्मयाच्या वृद्धीच्या इतिहासाला सोडून असल्यामुळें वर जो सिद्धान्त मांडला आहे, त्याला बळकटी येते. ग्रीक काव्यांमधील व इतर सर्व प्रबंधामधील पात्रें, कथासूत्रें व प्रसंग यांची संस्कृत ग्रंथामधील पात्राशीं, प्रसंगाशीं व कथासूत्राशीं इतकी एकरूपता आहे कीं, संस्कृतावरील हा ग्रीक पोशाख असावा अथवा निदान संस्कृतामधील पुष्कळ विचार तरी घेतले असावे हे खास. कर्नल विल्फोर्ड, काऊंट जॉनस्टर्ना व प्रोफेसर मॅक्स डंकर या पाश्चात्य पंडितांच्या मतानें ही गोष्ट जवळ जवळ सर्वसंमत झाली आहे. ते असें स्पष्ट म्हणतात कीं, रामायण व महाभारत या ग्रंथामधून पुष्कळ कथाप्रसंग घेऊन प्राचीन ग्रीक लोकांनीं

आपल्या भाषेंत, आपल्या रुचीप्रमाणें, देशरिवाजाप्रमाणें व संस्कृतीला धरून त्यावर पुष्कळ काव्यें लिहिलीं आहेत.

येथवर दाखविल्याप्रमाणें महाकाव्यें जितकीं महत्त्वाचीं, सुंदर व मननीय आहेत तितकेच संस्कृतांमधील नाट्यग्रंथही आहेत. हिंदुस्थान म्हणजे सर्व जगाचा लहान मासला आहे, असें मानण्याचा बराच प्रघात आहे. अर्थात जगांतील लहानमोठी प्रत्येक वस्तू, वनस्पती, सर्व प्रकारची हवा, सर्व रुचीचें पाणी बहुतेक सर्व धान्यें, नानाप्रकारचें रमणीय देखावे, बहुतेक प्रकारचे धातू वगैरे जिन्नस हिंदुस्थानांत पैदा होतात ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. वर वर्णन केल्याप्रमाणें जरी स्थिति असली, तरी काव्य व नाटकें याविषयीं बोलतांना फक्त हिंदुस्थानांतील भूभाग व नैसर्गिक परिस्थिती हींच स्पष्टपणें अभिप्रेत असली पाहिजेत; आणि याचे प्रत्यंतर आपणास संस्कृत काव्यें व नाटकें वांचून येणारे आहे. सृष्ट-वर्णन हा संस्कृत कवींचा विशेष गुण आहे व त्याचें संवर्धन संस्कृत वाङ्मयामध्यें जितकें झालेलें अढळेल, तितके प्राचीन अथवा अर्वाचीन इतर कोणत्याही वाङ्मयामध्यें झालेलें आढळणार नाहीं. हिंदुलोकांत असलेली सौंदर्याभिरुचि व कौतुकास्पद सूक्ष्म निरीक्षणशक्ति, यांच्यायोगें सृष्टींतील अत्यंत विस्मयकारक देखावे व मनोवेधक रमणीय स्थळें यांजकडे त्याचें लक्ष आकर्षिलें जावें हें अगदी साहजीक आहे; परंतु हिंदुलोकांमध्यें जरी हे गुण असले, तरी यांच्यापेक्षा श्रेष्ठ प्रतीचे इतरही गुण त्यांचेमध्यें आहेत व त्या सर्वांमध्यें अत्यंत श्रेष्ठ म्हटला म्हणजे मानसीक परिस्थितीचें संशोधन व विचार आणि भावना यांचे सूक्ष्म पृथक्करण करण्याची तीव्र लालसा.

याच गुणाच्या बळावर मानवी मनाच्या अंधकारमय कोठडीमध्यें अज्ञात असलेल्या वांच्छा, भावना, विचार, आवडींनावडी, प्रेमविषय, प्रवृत्ति, गुणावगुण यांचा मार्मिक परिपोष व बरोबर चित्र नैसर्गिक काव्यप्रचुर प्रतिभेनें काढलेलें, आपणास संस्कृतामधील ग्रंथांत ठिकठिकाणीं पहावयास सापडतें. म्हणून या बाबतींत संस्कृत वाङ्मयाची बरोबरी इतर कोणत्याही वाङ्मयास करितां न आल्यानें तें सर्व जगास अत्यंत वंदनीय झालें आहे यांत कांहीं नवल नाहीं. निसर्गधर्माचें यथास्थित आकलन करून त्यांचें बरोबर शब्दचित्र उठविणें, हा संस्कृत नाटकाचा विशेष गुण आहे. त्याचप्रमाणें पात्रांचा स्वभावपरिपोष यथासांग पूर्ण करून, प्रत्यक्ष सृष्टींत दिसणाऱ्या परिस्थितीशीं किमपि विरोध कधींही घडलेला दिसावयाचा नाहीं. अप्रस्तुत वर्णन, विषमता आणि अतिक्रम हे अवगुण पात्रांच्या स्वभावांत अथवा कथानकांत कोठेंही आढळून येणार

नाहींत. या कडक शिस्तीमुळें व योग्य वाङ्मयप्रदेशांचे यथास्थित आचरण केल्यामुळें फक्त शेक्सपियरखेरीज इतर कोणत्याही पाश्चात्य कवींना संस्कृत कवींची बरोबरी करितां आली नाहीं.

भाषेची तर गोष्टच काढावयास नको. कारण सौंदर्य व गांभीर्य या बाबतींत इतर भाषांनीं गीर्वाणवाणीचें प्रभुत्व मान्य केलेंच पाहिजे, अशी तिची योग्यता आहे याबद्दल कोठेंही द्वैतमत आढळून येणार नाहीं.

येथवर सामान्यपणें संस्कृत नाट्यकवींचा प्रतिभा-विशेष वर्णन केल्यावर नंतर नाट्य-संपत्तिकडे वळणें हें ओघानेंच प्राप्त होतें. खिस्ती शकाच्या पूर्वी एक शतक विक्रमादित्य हा साहित्यप्रेमी व विद्वज्जन पुरस्कर्ता राजा होऊन गेला. यांचे कारकीर्दीत कवि, तत्व-ज्ञानी, गणिती इत्यादि गुणीजनांच्या बुद्धिसामर्थ्याचे योग्य चीज होऊन एकंदर वाङ्मयाची सर्वांगीण वाढ होण्यास बरीच मदत झाली असली पाहिजे. प्रोफेसर हीरनच्या मतें कालिदास उत्पन्न होण्यापूर्वी पुष्कळ वर्षें सर्व राष्ट्राची बौद्धिक प्रगती बरीच झाली असली पाहिजे; कारण अशा जगद्विख्यात कवि-कृतीचा रसास्वाद घेण्यास राष्ट्रामध्यें एक प्रकारची लोकांची तयारी असावी लागते. एरवी असे कवि निर्माण होणें व त्यास उत्तेजन मिळणें अशक्य असतें. कालिदास होण्यापूर्वी पुष्कळं थोर कवि होऊन गेले असले पाहिजेत. आणि त्यापैकीं दंडी हा एक होय. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, त्याच्या ग्रंथापैकीं आज एकही उपलब्ध नाहीं, व याबद्दल सर्व सुधारलेल्या गुणज्ञ जगाला अखंड वाईट वाटून, तें आपल्याला दुर्दैवी समजेल यांत कांहीं शंका नाहीं. साहित्याच्या इतर शाखा व विज्ञान यांची त्या रसशून्य व नाशप्रिय काळानें ज्या प्रकारची संभावना केली तीच दंडीच्या ग्रंथाची केली असली पाहिजे. काळाच्या हातून जें कांहीं चुकून राहिलें होतें, त्याची वाट मुसलमानांनीं लाविली. यावरून आपणांस असें म्हणतां येईल कीं, ह्या देशीं मुसलमानांचें आगमन होण्यापूर्वीं काळाच्या तडाक्यांतून जें कांहीं शिल्लक राहिलें होतें, त्यांचा विध्वंस करण्यांत मुसलमानांनीं आपल्या गुरुवर उत्तमच ताण केली. अर्थात् आतां जें शिल्लक राहिलेलें दिसत आहे, तें वरील दोन मानुष व अमानुष संहारकांच्या हातून. परंतु सर विल्यम जोन्सच्या मतें ही अवशिष्ट ग्रंथसंख्यासुद्धां यूरोपांतील आधुनिक एका वाङमयाच्या किती तरी पट आहे ! यावरून संस्कृत ग्रंथसंपत्तीची विपूलता किती होती याचा कोणा-सही अदमास करतां येईल. परंतु नष्ट संपत्तीची मोजदाद जरी बुद्धिसामर्थ्याचा थांग घेण्यास उपयोगीं पडली तरी शेवटीं मनुष्यस्वभावानुरूप दुःख होणें हें साहाजिकच आहे.

मनाची अशी विव्हल स्थिती बाजूस सारून प्रत्यक्ष असलेल्या ग्रंथसंपत्तीचा उपभोग घेणें, व गुणावगुणाची चर्चा करणें, त्यांत तल्लीन होऊन जाणें, हेंच समाधानाचें साधन आहे. याकरितां आपणसुद्धां तेंच काम हातीं घ्यावें हें बरें.

प्रोफेसर विल्सन म्हणतो कीं, "जे थोडे नाट्यग्रंथ उपलब्ध आहेत ते केवळ आपल्या स्वतःच्याच तेजानें व सामर्थ्यानें काळाच्या कात्रींतून निसटले असले पाहिजेत. अशाच नाट्यविषयक ग्रंथांपैकीं 'दशरूपक' या नांवाचा ग्रंथ आज हयात आहे. संस्कृतमध्यें नाटकाला रूपक असें नांव आहे. या 'दशरूपक' ग्रंथांत नाटकाचे दहा प्रकार दिलें आहेत, त्यावरून हिंदुलोकांमध्यें या शास्त्राची केवढी वाढ झाली होती हें स्पष्ट दिसून येईल.

प्राचीन ग्रीक वाङ्मयामध्यें नाट्यविषयाची चांगलीच वाढ झाली होती; परंतु तिची बरोबरी संस्कृत नाट्यशास्त्र व ग्रंथसंपत्ती याजपाशीं केव्हांही करितां येणार नाहीं. संस्कृत नाट्यशास्त्रांत खालीं दिलेलें ठळक महत्वाचें गुण आढळतात.

(१) संस्कृत नाट्यशास्त्रांत नऊ रस सांगितलें आहेतः—शृंगार, वीर, करुण, भयत्सा, भानक, भीम, हास्य, अद्भुत, शांतरस.

(२) संस्कृत नाटकांतील शृंगार इंद्रियविशिष्ट नसून भावनाजन्य आहे. अर्थात् इंद्रियादि सौष्ठवामुळें त्याची उत्पत्ति नसून केवळ शुद्ध प्रेमरूप भावनेंमुळेंच असते. तसा प्रकार ग्रीक अथवा लातीन भाषेंतील आनंद पर्यवसायीं नाटकांत आढळत नाहीं.

(३) संस्कृतांतील वीररस विवेकहीन नसून प्रशांत व स्वाधीन असतो.

(४) स्त्रिपात्रांच्या बाबतींत भूमिकांतराचा प्रकार क्वचितच आढळेल.

(५) योग्यप्रसंगीं व कथासूत्रास धरून नाटकाचे अंक पाडण्याची पद्धति ग्रीक लोकांत केव्हांही ठाऊक नव्हती.

(६) आधुनिक नाटकामध्यें "स्वगत" "एकीकडे" इत्यादि प्रकार रंगभूमीवरील कामाकरितां ज्याप्रमाणें उपयोगांत आले आहेत, तसेच ते संस्कृत नाटकांतही त्याच कार्याकरितां उपयोगांत आणलेले आहेत.

(७) शोक व गांभिर्य यांचें हास्यविनोद व लघुता—यांजबरोबर असलेलें अव्याहत व अवश्य साहचार्य संस्कृत नाटकामध्यें उत्तम रीतीनें रंगविलेलें सर्वत्र दिसेल.

(८) नाट्यकलेपासून थोर उद्देश व मोठे परिणाम घडून येणें शक्य आहे, या गोष्टीची संस्कृत नाटककारांस केव्हांही विस्मृति झालेली नाहीं, आणि संस्कृत नाटकाची थोरवी आहे ती यांतच. प्रोफेसर विल्सन एक उदाहरण घेऊन असें म्हणतो कीं, परस्त्री

हा नाटकांतील कृष्णकारस्थानांचा, कपटकृत्यांचा अथवा शाठ्यविलासाचा विषय झाला आहे, असें संस्कृत भाषेंत एकही नाटक आढळून येणार नाहीं. या जगांत भुकेच्या खालोखाल देहधर्मांमध्यें शृंगाराची योग्यता आहे, व जगांतील प्रत्येक नाठ्यवाङ्मयांचा तर तो केवळ प्राणच आहे. मिसेस मॅनिंग नांवाची विदुषी म्हणते कीं, भारतीय काव्याखेरीज जोरदारपणें, परंतु मार्दवानें शृंगाररसाची मांडणी केलेली इतरत्र आढळून येणें दुरापास्त आहे.

वर दिल्याप्रमाणें संस्कृत नाटकाचे आठ विशेष गुण आहेत; व प्रोफेसर विल्सन प्रभृति पाश्चात्य पंडितांसुद्धां संस्कृत नाट्यशास्त्राची सर्वांगीण वाढ किती मान्य आहे, हें त्यांच्या अभिप्रायावरून कळून येईल. यापुढें आपण जगमान्य संस्कृत नाटककार कालिदास व भवभूती यासंबंधानें पाश्चात्य पंडित प्रेमानें, आदरानें, कौतुकानें व अंतःकरणपूर्वक काय काय म्हणतात तें सहज थोंडक्यांत पाहूं,

ख्रिस्ती शकाच्यापूर्वी एक शतक राजा विक्रमादित्य यानें कारकीर्दीत कालिदास होऊन गेला व त्यानंतर बऱ्याच शतकांनीं भवभूती निर्माण झाला. कालिदास हा या जगांत अत्यंत श्रेष्ठ नाटककार होऊन गेले, त्यांपैकीं एक होता असें सर्वांचे मत आहे. 'शाकुंतल' ही त्याची अत्यंत श्रेष्ठ कृति होय. यांतील कथाभाग महाभारतांतून घेतलेला आहे हें हिंदिवाचकांस नव्यानें सांगणें नकोच. ह्या नाटकाची कीर्ती अत्यंत लांबवर पसरलेली आहे. यांतील सौंदर्य, मोहकपणा, कोमलता व सृष्टीची बरोबर नक्कल इत्यादि गुणांनीं जगांतील नाट्यवाङ्मयांत तें प्रमुखस्थानीं जाऊन बसलेलें आहे. प्रोफेसर हरीन नामक पंडित आनंदातिरेकानें म्हणतो कीं, " कालिदास जन्माला येऊन त्यानें आपल्या राष्ट्राचेंच नांव अजरामर केलें, असें नसून सर्व सुधारलेल्या जगाच्या कीर्तीत त्यानें अपूर्व भर टाकली "

आगस्टस श्लेजेल, अलेक्झांडर हंबोल्ट, गटे इत्यादि गीर्वाण भक्तांनीं कालिदासाच्या शाकुंतल कृतीविषयीं अंतःकरणपूर्वक अत्यंत प्रशंसोद्गार काढलेले आपणांस सर्वत्र ऐकावयास सांपडतात.

शकुंतलेचा शोक व प्रेम यावर गटे नामक महाविख्यात जर्मन कवीनें, एक काव्य रचलें आहे. एकंदरींत संस्कृत नाटकाच्या भाषेविषयीं प्रोफेसर विल्सन म्हणतो कीं, कालिदास व भवभूती यांच्या नाटकांतील श्लोकांची भाषा इतकी मंजुळ, सुस्वर, भारदस्त व उदात्त आहे कीं, त्याप्रमाणें दुसरी भाषा कोठें पहावयास मिळेल अशी आशा करणें हें सुद्धां वेडेपणाचें होईल.

ख्रिस्ती शकाच्यापूर्वी एक शतक अथवा त्याहून पूर्वीच्या काळांतील नाट्यवाङ्मय आपणांस उपलब्धच नसल्यानें त्याच्या गुणावगुणासंबंधीं कांहीं बोलताच येत नाहीं. परंतु ज्या काळांतील अत्यंत जुनें म्हणून नाट्य-वाङ्मय आपणांस मिळालें आहे, त्यावरून पाहतां भाषा, व काव्य-रचना यांच्या अभ्यासाची परमावधि झालेली आपणास पहावयास मिळेल, आणि प्रो. हरीनच्या मतें विक्रमादित्याची कारकीर्द म्हणजे जगविख्यात कवींच्या अत्यंत थोर कृतींचा प्रसवकाळच होय.

शाकुंतलच्या खालोखाल विक्रमोर्वशी या नाटकांची योग्यता आहे. प्रो. विल्सन यानें ह्या दोन नाटकांची फार बारकाइनें तुलना करून असा अभिप्राय दिला आहे कीं, "दोन्हीं नाटकांतील वर्णनसौंदर्य, भावनामार्दव, कोमलविचार, चारुता व भाषासरणींतील अत्यंत श्रेष्ठ थाटमाट, हे गुण दोहोमध्यें सारखेच आहेत. कोणाला सरस ठरवावें हा प्रश्न फार अवघड आहे. परंतु विक्रमोर्वशीच्या कथेची रचना इतक्या चातुर्यानें व खुबीनें झाली आहे, आणि त्यांतील प्रसंग एकामागून एक असे इतक्या नैसर्गिक पद्धतीनें व क्रमानें आले आहेत कीं, क्षणभर शाकुंतलसुद्धां त्या बाबतींत मागें पडेल. त्याचप्रमाणें दुसरा प्रमुख गुण म्हटला म्हणजे त्यांतील काव्य हा असून, एकंदर गोष्ट परिस्थिती व पात्रें या बाबतींत उच्च प्रकारचें कल्पना-प्रभुत्व दिसून येतें. उर्वशीची गोष्ट कालिदासानें कोठून घेतली व मुळांतील पुराणकथेंत त्यानें नाटकाच्या दृष्टीनें काय काय फरक केले, हें पाहिलें म्हणजे त्याच्या बुद्धि-चातुर्याबद्दल, कविकल्पनेबद्दल व नूतन रचनाकौशल्याबद्दल मन अगदीं आश्चर्यस्तंभित होऊन जातें.

आतां थोडेंबहुत भवभूतीकडे वळणें बरें. याचीं "उत्तररामचरित" व "मालती-माधव" अशीं दोन फार प्रख्यात नाटकें आहेत. पैकीं पहिल्यांत म्हणजे "उत्तररामचरित्रांत करुणरसावर फार भर दिलेली आहे. ह्याच्यांतील विशुद्ध व नैसर्गिक करुणरसासारखा करुणरस इतर संस्कृत नाटकांत कोठेंच पहावयास मिळणार नाहीं. कुसुमकोमल भावनांचें अद्भुत हातोटीनें केलेलें प्रदर्शन खेरीज करून रणशूर राजपुत्राच्या आदर्शभूत स्वभावाचें चित्रही फारच मार्मिकपणें व सुबकपणें काढलेलें आहे. राम व सीता या जोडप्याच्या जीवनक्रमास, अत्यंत सफाईनें या नाटकांत जो तेजोमयपणा व दैदीप्यपणा आणलेला आहे, त्यापेक्षां जास्त आणणें, हे मानवी काव्यकारागीराच्या शक्तीबाहेरचें काम आहे. सरळपणा व सौंदर्य या दृष्टीनें पाहिलें असतां, ह्या नाटकांत आणखीही जी निरतिशय व थोर प्रभेची विचाररत्नें सर्वत्र विखुरलेलीं दिसतात त्यांना तर इतर कोणत्याही वाङ्मयांत तोडच नाहीं.

अत्यंत दुराराध्य, असें जरी कोणाचें मन असलें, तरीसुद्धां त्यांचें या नाटकानें क्षणभर समाधान झाल्यावांचून राहणार नाहीं, हें नाटक व यूरोपांतील इतर निरनिराळ्या भाषेंतील बरींच नाटकें, याजमध्यें एक प्रकारचें मजेदार साधर्म्य आहे. त्यांचा व याचा समानधर्म मनोविकारांत आहे. यूरोपियन लेखकांना आशियामधील लोकांविषयीं लिहितांना ते फार मनोविकारवश असतात; त्यांची मनें बेताल असून त्यांचेवर विवेकाचें दडपण फारच थोडें असतें, इत्यादि प्रकारें लिहिण्याची फार दुष्ट खोड लागलेली आहे; ती या नाटकांच्या अभ्यासानें व यांत दाखविलेल्या समतोल मनोविकारानें बरीच दूर होईल, अशी आशा करण्यास बरीच जागा आहे. मालतीमाधवामध्यें अनुरागाचे जें रमणीय, जोरदार, उठावदार व स्पष्ट चित्र काढलेलें आहे; तशासारखें इतरत्र आपणास कोठेंच पहावयास मिळत नाहीं.

येथवर अतिश्रेष्ठ अशा कवींच्या दोन शृंगारप्रधान कृतींतील उत्तमोत्तम गुणांचें कथन केलें. आतां हिंदूच्या चालिरिती व राजकीय जीवनक्रम ज्यांत प्रतिबिंबित झाला आहे, असें विशाखदत्ताचें मुद्राराक्षस नाटक पाहूं. शहरांतील गजबजाट व कार्यमग्नता, राजकीय व दरबारीं कारस्थानामध्यें दिसून येणारी अफाट कल्पकता, आणि सेवकजनांची निस्सीम व दृढनिष्ठा इत्यादि प्रकार या नाटकांत परिपूर्ण आहेत. अर्वाचीन काळांतील कपटनीतीचा प्रख्यात पुरस्कर्ता मार्किऍव्हेली याला प्राचीन काळांतील आर्यचाणाक्य असें म्हणतात. ह्या आर्यचाणाक्याची राजकीय कणिक नीति ह्या नाटकांत उत्तम रीतीनें दाखविलेली आहे. दुर्ग्यम प्रकारच्या अनेक कथानकांचा उपयोग करून मुख्य कथानक रंगविण्याची अप्रतिम हातोटी यांत दिसून येते. वरील नाटकांच्या खालोखाल मृच्छकटिक, प्रबोधचंद्रोदय, वेणीसंहार. इत्यादि फार चांगलीं नाटकें अगदीं अलीकडील काळापर्यंत निर्माण होत होतीं. ही सुंदर नाटकनिर्माण परंपरा मुसलमानांच्या ह्या देशावर स्वाऱ्या होऊन त्यांची वस्ती व राज्य या देशांत चालू होईपर्यंत अव्याहत सुरू होती परंतु पारतंत्र्य शृंखलेनें राष्ट्र शरीर जखडून गेलें म्हणजे मन सुद्धां खुरटूं लागतें व चलनवलन व्यापाररहित पाणी ज्याप्रमाणें नासून जातें, त्याप्रमाणें हें प्रत्यही खुरटणारें व जीवनक्रियेच्या जोरदार प्रवाहाच्या अभावामुळें तें रोगट होत जातें म्हणतात. त्याचा उत्तम मासला आपणांस येथें पहावयास मिळतो. अस्तु. यापुढें स्वाभाविक प्रेरणेनें उत्पन्न होणारी ग्रंथाचीं वाढ कां बंद पडली त्याचें विवेचन येथें अप्रस्तुत होणार आहे. मात्र सूज्ञ वाचकांच्या एवढें ध्यानांत येईल कीं, स्वातंत्र्य नष्ट झाल्याबरोबर स्वतंत्र ग्रंथही उत्पन्न होण्याचे बंद पडलें, व यांचें प्रत्यंतर संस्कृत नाटकांच्या अभ्यासावरून मिळणार आहे.

प्रकरण ११ वें.

गीर्वाण वाङ्मय.

वीणाकाव्यें.

वीणाकाव्यें रचतांना कथासूत्र फारच लहान अथवा क्वचित् एकाद्या वस्तूच्या दर्शनानें—उदाहरणार्थ नदी, नाला, मेघाडंबर, पर्वत, नीलशिखरें, धवधवा, पक्षी, कूजित, रम्य उपवन, कोमल बाल, फूल इत्यादि इत्यादि—कवीच्या प्रतिभेला धक्का बसून स्यास स्फुरण आलें, तर वर्ण्य विषयाच्या तनुत्वामुळें त्याचीं वीणाकाव्यें फारच लहान होतील व त्रुटितही असतील. आणि श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर म्हणतात त्याप्रमाणें " असल्या वीणाकाव्यामधून कवीच्या प्रतिभेचें तेज चमकून गेलें, तरी त्याच्या मनाचा विस्तार किंवा खोली यांची कल्पना त्यावरून करतां येत नाहीं. एका सुवर्णाच्या कणांतील सोनें आणि सबंद सोन्याच्या लगडींतील सोनें हीं कसाला सारखींच भरतील; परंतु सोन्याची लगड पाहून त्याविषयीं जी महत्त्वबुद्धी वाटते, ती कसोटीच्या दगडाच्या पृष्ठभागास चिकटलेला एखादा कण पाहून वाटत नाहीं. " हा आरोप अर्थात् आधुनिक वीणाकाव्याच्या त्रुटित कवितांवरील होय वगैरे त्यांना यथार्थपणें लागू पडतो पण आपणांस येथें मराठी वीणाकाव्याचें परीक्षण करावयाचें नसून संस्कृत वीणाकाव्यासंबंधीं पहाणें आहे.

या ठिकाणीं ज्या संस्कृत वीणाकाव्यासंबंधीं लिहावयाचें आहे, तीं ' गीतगोविंद ' ' ऋतुसंहार ' व 'मेघदूत ' होत. हीं काव्यें बरींच विस्तृत असून त्यांतील वर्ण्य विषय चिरपरिणामी आहे (Impressive). त्या काव्यांचे कर्ते सरस्वतीच्या कंठांतील हारामधील अत्यंत उज्ज्वल रत्नें आहेत. त्यांची कीर्ति अखिल अवनीवर दुमदुमून गेली आहे व त्यांच्या काव्यांनीं जगाच्या सर्व भागांतील विद्वानांस वेड लावलें आहे.

जी गोष्ट प्रथम विचारांत घेणें अत्यंत अगत्याचें आहे ती ही कीं, ह्या जगद्वंद्य काव्यांच्या भाषांतरानें त्यांची मूळ गोडी कळणें अशक्य आहे. तीं मुळांतच वाचलीं पाहिजेत. नाहीं तर त्यांची यथार्थ कल्पना होणें बाजूस राहून भलताच ग्रह होणें संभवतें. ज्या संस्कृत भाषेंत हीं काव्यें रचलेलीं आहेत, ती भाषा अत्यंत मधुर व काव्यमय आहे. हिंदूंचीं हीं वीणाकाव्यें सर्व जगतीतलावर आपल्या अतुल तेजानें व लखलखाटानें केवळ निरुपमेय अशीं झालेलीं आहेत.

आर्यांच्या विशिष्ट चालीरीति, जीवनक्रम, भावना व चारित्र्य यांचा भाषांतरांत हुबेहुब ठसा उमटणें अशक्य होतें, व त्यामुळें यूरोपियन लोकांना अशा काव्यांचें संपूर्ण आकलन होत नाहीं, व त्यांची माधुरी चाखणें ही गोष्ट त्यांच्या आवांक्याबाहेरील होते. वरील गोष्टींचीं आपण १।२ उदाहरणें घेऊं, म्हणजे तिची यथार्थता पटल्याशिवाय राहणार नाहीं. ' राम वनवासास निघून गेल्यावर भरत त्याच्या पाठोपाठ जातो व त्यास परत फिरण्याचा आग्रह करतो' ही गोष्ट हिंदूला इतकी साधी व सहज वाटते कीं, त्याबद्दल कोणासच आश्चर्य वाटत नाहीं; उलट बंधुप्रेमाचें उदात्त उदाहरण म्हणून आम्ही त्याची वाहवा करतों. परंतु " टालबाईस् व्हीलर " यांसारखे हिंदुस्थानचे इतिहासकार यांस ही गोष्ट मानवी मनोधर्माच्या अगदीं विरुद्ध दिसते. रुचिवैचित्र्याचा व भिन्न संस्कृतीचा हा परिणाम आहे, याखेरीज ह्या आरोपाचें आपण कसें परिमार्जन करणार? कैकेयीला वचनबद्ध झालेला दशरथ, राम वनास जाण्यास निघालेला पाहून जेव्हां धाय मोकलून रडूं लागतो तेव्हां तो हें निव्वळ ढोंग करतो, असा यूरोपियन इतिहासकार व्हीलर याच्या दृष्टीस भास होतो, परंतु हेंसुद्धां वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या संस्कृतीचें सर्वस्वीं अज्ञान होय. एरवीं इतका तीव्र विरोध कशा उलगडावयाचा ? सबब ज्यास एकाद्या राष्ट्राच्या काव्याचें यथार्थ अध्ययन करावयाचें असेल, त्यानें केवळ शब्द व व्याकरण यांचें ज्ञान संपादून पुरें करीन म्हटलें तर भागणार नाहीं. त्यानें त्या राष्ट्रामध्यें राहून तेथील देशास्थिति, आचारविचार, रीतिभाति नैतिक व धर्मिक समजुतीं आणि ईश्वरज्ञानकल्पना यांचें पूर्ण अध्ययन केलें पाहिजे व सर्वस्वीं तन्मय बनलें पाहिजे; तेव्हांच त्यास परकीय काव्यांचे पूर्ण आकलन होईल, व त्याच्या शब्दास कांहीं मोल येईल. नाहीं तर हल्लीं ज्याप्रमाणें आपण पहातों, त्याप्रमाणें केवळ गौरवर्ण हा कांहीं सर्वज्ञतेचा निष्कर्ष नव्हे; एका काळीं भारदस्त व प्रमाणभूत म्हणून मानलेल्या ह्या परकीयांच्या शिफारसपत्रांना

त्यांच्या कागदाइतकी सुद्धां हल्लीं कोणी किंमत देत नाहीं. स्वतःचा जीव घोक्यांत असला, तरी सुद्धां विनयदृष्टीनें आपल्या जिवलग माणसाशीं बोलणें हें लौकिक नीतीच्या आड येतें असें वाटल्यास मरण पतकरून अशा प्रकारें बोलणें हें अप्रशस्त असें ठरविणाऱ्या आर्य स्त्रियांना पाहून परकीय पंडितांना काय बरें वाटेल? विनय, आज्ञाधारकपणा, कर्तव्यजागृति इत्यादि बाबतींत हिंदूंच्या कल्पना इतर लोकांप्रमाणें अगदीं साध्या, कामचलाऊ व सोयीच्या स्वरूपाच्या नसून जरा जास्त गुंतागुंतीच्या, क्लिष्ट व गूढ स्वरूपाच्या आहेत. सबब अपूर्ण ज्ञानानें परकीय इतिहासकार व पंडित आम्हांविषयीं बोलतांना ज्या चुका करतात, त्यांमुळें आमच्या संस्कृतीवर टपका येत नसून उलट पक्षीं त्यांची विद्वत्ताच नकली व बेगडी दिसते, असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें. परंतु एकंदरींत पाहतां वीणाकाव्यासंबंधीं यूरोपियन पंडितांचें मत फार उदार व स्तुतिप्रचुरच आहे. त्याचे थोडे मासले खालीं दिले आहेत.

'गीतगोविंद,' हा हयात असलेल्या अत्युत्कृष्ट वीणाकाव्यांचा एक सुंदर मासला आहे व त्याच्या सारखें सौंदर्य व माधुर्य दुसऱ्या कोठेंहि पहावयास मिळत नाहीं. ग्रिफिथ म्हणतो कीं, "हें काव्य मूळ संस्कृतामधून वाचल्याखेरीज त्याच्या कवितेची समग्र सुस्वरता प्रत्ययास येणार नाहीं." सर विल्यम जोन्स व जर्मन पंडित लासेन, रुकर्ट, श्लेजेल इत्यादिकांनीं या काव्यावर अत्यंत परिश्रम करून तें समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे; त्यांपैकीं श्लेजेल म्हणतो कीं, "कोमल व नाजूक भावना आणि "Elegaic love यांच्या प्रखर प्रभेचें विशाल आवरण हिंदूंच्या काव्यावर पडलेलें दिसतें." प्रोफेसर हीरन म्हणतो कीं, "नियमकपणा व अनुप्रास या बाबतींत ग्रीक वीणाकाव्यें हिंदूंच्या वीणाकाव्यांबरोबर केव्हांच तुलनेंत टिकणार नाहींत. गद्य भाषांतरानें मूळकाव्याच्या रूपाची केवढी हानि होते याचें वर्णन करणें अगदीं अशक्य व अस्थानीं आहे. परंतु असें गद्य भाषांतर वाचून सुद्धां "गीतगोविंदाचा" परिणाम मनावर झाल्याशिवाय रहात नाहीं. अशा भाषांतरांत सुद्धां कवीच्या कल्पनेची अत्यंत विपुलता व सुंदर, मोहक वस्तूंच्या विषयीं असलेली तीव्र, निर्दोष व कोमल लालसा यांचें जोरदार व रसरशीत वर्णन आपणास पदोपदीं दिसून येतें.

ऋतुसंहार हें दुसरें वीणाकाव्य असून त्याचेवर ग्रिफिथ, मिसेस मॅनिंगबाई, सर विल्यम जोन्स, हंटर प्रभृति पंडितांनीं फार व्यासंग केला आहे. त्यांपैकीं जोन्स म्हणतो

कीं, "सृष्टिविषयक सुंदर व हुबेहुब वर्णनांनीं हें काव्य भरलेलें असून त्याचें माझ्या हातून पूर्ण भाषांतर होत नाहीं, यावद्दल वाईट वाटतें." वीणाकाव्याची कला आर्यावर्तांत फारच पूर्णावस्थेस गेली होती. सर हंटर म्हणतो कीं, "मध्ययुगांतील ब्राह्मणांनीं ईश्वर-स्वरूपज्ञान (theology) वीणाकाव्यें इत्यादि बाबतींत विस्मयकारक दीर्घोद्योग केलेला आढळतो." एकंदरींत मॅनिंग बाईच्या मतें हिंदूंनीं जें "प्रेमवृत्तींचें कित्येक स्थलीं नाजूकपणें व कित्येक स्थलीं फार जोरदारपणें वर्णन केलें आहे, तें तर केवळ अपूर्वच होय." वर्णनपर काव्याचा मेघदूत हा उत्तमोत्तम मासला होय.

मॅनिंगबाई म्हणते कीं, " असल्याप्रकारच्या काव्यामध्यें हें फारच महत्त्वाचें आहे व सर्व यूरोपियन लोकांना तें फार आवडलें आहे. "

शेवटीं प्रोफेसर विल्सन साहेबांचा अभिप्राय देऊन विराम पावणें बरें. मेघदूतामध्यें समासांचा भरणा बराच आहे; परंतु तेणेंकरून त्यांत कसलाही दोष आलेला नाहीं व एकंदर वाक्यरचना अगदीं साहजिक व सरळ आहे. सुस्वरपणा व भारदस्तपणा यांचें विलक्षण संमिश्रण मेघदूताच्या वृत्तानें फारच उठावदार व गोड झालेलें आहे. कोणत्याही मृत अथवा चालू भाषेमधील समवृत्तविषयक काव्यांशीं या मेघदूत काव्याची तुलना केल्यास हें सर्वतऱ्हेनें श्रेष्ठ ठरेल यांत तिलप्राय शंका नाहीं.

नीतिबोधपर काव्यें.

कथासरित्सागर, वेतालपंचविशी, सिंहासनद्वात्रिंशती, शुकसप्तति, हितोपदेश, पंचतंत्र इत्यादि जीं नीतिबोधपर काव्यें आर्यपुरुषांनीं रचिलीं, त्यांवरून त्यांची लोकोत्तर बौद्धिक श्रेष्ठता सर्व जगाच्या निदर्शनास आली आहे. वाङ्मयाच्या सर्व बाजूंबरोबर याहि भागाची आर्यांनीं केलेली वाढ पाहून सर्व जग आश्चर्यानें तोंडात बोटें घालीत आहे. या वाङ्मयानें यूरोप, अमेरिका इत्यादि जगाच्या दूर कोपऱ्यांत असलेल्या प्रदेशांत सुद्धां प्रवेश केला आहे, व याची तेथील लोकांवर पडलेली छाप व त्यांच्या मनोवर बसलेला जबरदस्त अम्मल पाहिला, म्हणजे या काव्यजनकांच्या बुद्धीच्या सर्वग्राहकतेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच असें वाटतें.

प्रोफेसर विल्सन म्हणतो कीं, सुस्थितींत असलेल्या व उत्कर्षाभिमुख समाजामधील लोकांचे खाजगी व सार्वजनिक व्यवहार सर्व बाबतींत सुयंत्रित चालून समाजाचा सर्व बाजूनें उत्तम विकास व्हावा याकरितां कांहीं तरी नीतिनियमांची जरूरी असते व याकरितां अनेक शास्त्रशाखांपैकीं त्यांची एक स्वतंत्र शाखाच करावी लागते. अशा

प्रकारची नीतिशास्त्राची उभारणी संस्कृतामध्यें सुरस काल्पित कथांवर केलेली आहे व त्यायोगें दररोजच्या व्यवहारामधील वर्तन कसें असावें याबद्दल सुंदर उपदेश केलेला आहे. अशा प्रकारच्या काल्पित कथामध्यें राजपुत्र, राजकन्या, मंत्री, साधु, यति व कित्येक ठिकाणीं अगदीं हलके लोक, पशुपक्षी इत्यादिकांमध्यें संभाषणाचे प्रसंग मोठ्या चातुर्यानें घालून त्यायोगें राजपुत्र, दरबारी लोक व साधारण व्यवहारांतील माणसें यांनीं कसें वर्तन ठेवावें याचें फार मार्मिक विवेचन केलेलें आहे. या गोष्टींचे विषय वर सांगितलेले आहेत तेवढेच नसून आंतरराष्ट्रीय संबंध, साम, दान, भेद दंड, जीवनयात्रेंतील निरनिराळ्या अडचणी व प्रसंग इत्यादि कालचक्राच्या परिक्रमणामध्यें आपण कसें वागावें, धर्म कोणता अधर्म कोणता, कर्तव्य काय इत्यादि बाबींची चर्चा गोष्टीरूपानें व सहजरीतीनें बोधप्रद करण्याची हिंदूंची हातोटी कांहीं अजब आहे खरी. ''

हल्लींच्या दळणवळणाच्या साधनविपुलतेमुळें व इंग्लिश भाषेसारख्या जगमान्य भाषेच्या योगानें दुसऱ्या राष्ट्रांत अशा प्रकारचें वाङ्मय कसकसें वाढत गेलें आहे हें समजणें फार सोपें झालें आहे. इतर राष्ट्रांतील अशा प्रकारचें वाङ्मय भाषांतरावरून वाचलें असतां एक चमत्कारिक गोष्ट आमच्या प्रत्ययास आल्यावांचून रहात नाहीं; ती अशी कीं, त्यांतील पुष्कळशा कल्पना, प्रसंग व पात्रें हीं आमच्या कथांमधूनच घेतलीं आहेत असें वाटतें व कित्येक ठिकाणीं तर शब्दशः अनुवाद केलेला आढळतो; तर हें असें कसें झालें, आमच्या गोष्टींवर परप्रांतांतील अथवा देशांतील समजुतींचा चालिरितींचा, कल्पनांचा, देशपरिस्थितीचा पोषाख कसा चढला; आमच्या समाजांत तरुण मुलामुलींकरितां जो उपदेशपर, मनोरंजक व चटकदार कथासंग्रह तयार झाला होता तो यूरोप अगर अमेरिका यासारख्या दूरदूरच्या देशामध्यें जाणें संभवनीय आहे काय, इत्यादि विचार परकीय देशांतील याच प्रकारच्या वाङ्मयाचा अभ्यास सुरूं केला असतां डोक्यांत घोळूं लागतात व पूर्ण विचारांतीं ही गोष्ट शक्य आहे असें आपणांस मानण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं व ही गोष्ट आपण प्रत्यक्ष प्रमाणांनींही सिद्ध करूं. परंतु असें करण्यापेक्षां परकीय भाषेंतील पंडितांची जर कबूली मिळाली तर आपल्या संशयाचें आपोआप निरसन होईल व त्यांनीं आपल्या पूर्वजांविषयीं सकौतुक व आदरपूर्ण काढलेले उद्गार वाचले म्हणजे धन्यताहि वाटेल व थोडी बहुत स्वाभिमानाची स्फूर्तीहि होईल; याकरितां त्यांचेच अभिप्राय येथें देणें जास्त श्रेयस्कर आहे.

पंचतंत्र हा कल्पित गोष्टींच्या वाङ्मयामधील अत्युत्कुष्ट ग्रंथ आहे. केवळ

हिंदुस्थानांतच हा सर्वोत्कृष्ट ठरला आहे असें नसून जगाच्या कल्पित कथा-वाङ्मयामध्यें सुद्धां हा अपूर्व असल्यानें सर्व विद्वज्जनांस त्यानें माना तुकवावयास लाविल्या आहेत. सर्व जगांतील कल्पित गोष्टी याच ग्रंथाच्या कमिअधिक आधारानें रचलेल्या आहेत असेंहि म्हणावयास हरकत नाहीं. एलफिन्स्टन म्हणतो कीं, " कल्पित गोष्टी व इतर प्रकारच्या नीतिपर कथा रचण्याच्या कामीं हिंदु लोक सर्व जगाच्या गुरुस्थानीं बसण्यास सर्वप्रकारें योग्य आहेत असें दिसतें. पाश्चात्य राष्ट्रांत अत्यंत पुराणकालीन गोष्टी म्हटल्या म्हणजे बिडपाईच्या; परंतु त्यांचें काळजीपूर्वक निरीक्षण केलें असतां असें दिसतें कीं, भाषा खेरीज करून विचार, कल्पना इत्यादि बाबतींत त्या सर्व तऱ्हेनें हिंदीच आहेत. यूरोपियन भाषेच्या झिरझिरीत पोषाखांतून त्यांचें स्वाभाविक हिंदी रूपच जास्त स्पष्टपणें नजरेत भरतें.

कोलब्रूक, बॅरन् डी सॉसी, प्रो. विल्सन इत्यादि पंडितांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक असें सिद्ध केलें आहे कीं, यूरोपांतील सर्व देशांच्या कल्पित नीतिबोधपर वाङ्मयांत ज्या ज्या गोष्टी कथन केलेल्या आहेत त्या कमिजास्त प्रमाणांत बिडपाईच्या गोष्टींचीं भिन्न भिन्न रूपेंच होत व पर्यायानें अर्थात त्यांचाहि अपत्यसंबंध पंचतंत्राशींच येतो.

डॉ. सर डब्ल्यू हंटर म्हणतो कीं, " इसॉपच्या काळापासून आज तागायत पाश्चात्य राष्ट्रामध्यें प्राण्यासंबंधीं ज्या गोष्टीं प्रचलित आहेत त्यांचें मूलस्थान हिंदुस्थानांतच आहे. ग्रीक भाषेंतील सिंह व खोकड यांची जी गोष्ट आहे ती वस्तुस्थितीस धरून नाहीं; परंतु संस्कृतामधील सिंह व कोल्हा यांच्या मधील संबंधाचा आधार घेऊन त्यावर ती रचलेली आहे. पंचतंत्राचें प्रथम भाषांतर प्राचीन इराणी भाषेमध्यें झालें आणि त्यावरून आशियामायनर व यूरोप यांतील देशांच्या भाषांत त्याचीं निरानिराळीं रूपांतरें झालीं. हिंदुस्थानांत अत्यंत प्राचीन काळीं निरनिराळ्या प्राण्यावरून ज्या कल्पित गोष्टी रचिलेल्या आहेत त्याच सांप्रत काळीं इंग्लंड व अमेरिका या देशांतील प्रत्येक घरांत लहानमुलांस मोठ्या प्रेमानें मुलांस सांगितल्या जातात. वनदेवता, अप्सरा, यक्ष, किन्नर इत्यादि देवकोटींतील उपदेवतांवरून ज्या गोष्टी बसविलेल्या आहेत त्यांत हिंदूंच्या बुद्धिप्रभावाचें सुंदर चित्र उमटलेलें आहे; व इराण, अरबस्थान आणि ख्रिस्तधर्मीय देश यांच्या वाङ्मयांत पुढें ज्या अशाच प्रकारच्या गोष्टी गुंफल्या गेल्या त्यांच्या मातृस्थानीं संस्कृतामधील मूळ गोष्टीच आहेत. "

प्रो. मॅक्समुल्लर म्हणतो कीं, " इराणचा राजा खुस्रू नौशेरखान (५३१–

५७९) यानें बारझोईनामक आपला राजवैद्य पाठवून पंचतंत्राचें पल्हवी भाषेमध्यें भाषांतर करविलें. " आणि मॅनिंग बाईच्या मतें जगांतील साधारण विख्यात भाषेमध्यें ज्या ज्या म्हणून बोधपर गोष्टी आहेत त्या सर्व हितोपदेशांतून घेतलेल्या आहेत. हिंदुस्थान व ग्रीस या दोन देशांमधील कल्पित गोष्टी बहुतेक एकाच ठिकाणीं उगम पावलेल्या आहेत; त्यावरून त्या किती प्राचीन काळीं रचल्या गेल्या असतील याची कोणासहि सहज कल्पना येईल. " वर ज्या प्रकारच्या गोष्टीसंबंधानें ऊहापोह केला त्याच प्रकारच्या, परंतु थोडा विषय बदलून वनदेवता, यक्षिणी, डंकिणी यासंबंधी अद्भुतरसानें भरलेल्या गोष्टीहि संस्कृतवाङ्मयांत फार आहेत; आणि त्यामध्यें हिंदूंच्या सुविकसित बुद्धीची विशिष्ट चारुता व चित्ताकर्षकपणा हे गुण फारच ठळकपणानें दृष्टीस पडतात. " असें प्रो. बेवर लिहितो. शेवटीं पंचतंत्रासंबंधीं आणखी एकच अभिप्राय नमूद करून आपण इतर ग्रंथांकडे वळूं.

मॅनिंगबाई म्हणते कीं, " पंचतंत्रांतील प्रत्येक गोष्टींत ऐहिक जीवनक्रमांतील विविध प्रसंगाचें सोदाहरण उपपादन केलेलें आहे अथवा आचारधर्मांतील निरनिराळीं तत्त्वें घेऊन तीं गोष्टीरूपानें शिकविण्याचा फारच नामी प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणें ह्यांतील गोष्टी असंबद्ध रीतीनें व अव्यवस्थितपणें मांडलेल्या नसून त्याची एका विशिष्ट क्रमानें व हेतूनें मांडणी केली असून एकांतील कथासूत्र दुसऱ्यांत गोवून दिलेलें आहे. अथवा कांहीं तत्त्वें अनेक कथांच्या साखळीनें एकत्र केलेलीं आहेत व त्यांचें प्रतिपादनही क्रमप्राप्त व पद्धतशीर आहे असें आढळून आल्याशिवाय रहाणार नाहीं. "

' आरबी भाषेंतील सुरस गोष्टी ' या पुस्तकाचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास असें आढळून येईल कीं, त्या पुस्तकांतील गोष्टी जरी इराणी विशिष्ट पेहरावांत व चालिरीतींनीं रंगलेल्या अशा दिसल्या तरी मुळांत त्या हिंदीच आहेत व त्यांतील विचारांचा एकंदर रोख व कल्पनांचें मूलस्वरूप भारतीयच आहे. काउंट जॉनस्टर्ना व लासेन ह्या पंडितद्वयाचें असेंच मत असून त्यापैकीं पहिला म्हणतो कीं, ह्या पुस्तकाचें संस्कृत नांव बृहत्कथा असें आहे. प्राच्यविद्याकोविदांनीं ' अरेबियन नाइट्स ' बद्दल असें सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं, त्याचा मूळ उगम संस्कृतवाङ्मयांतून झालेला आहे आणि हें संस्कृतवाङ्मय इराण, अरबस्थान वगैरे देशांत कसें व कोणी नेलें याबद्दलहि ऐतिहासिक भरपूर पुरावा आहे. परंतु एवढ्यावरच न थांबतां अंतःप्रमाणावरून असें सिद्ध करितां येईल कीं, याप्रकारच्या .वाङ्मयशाखेचा धडा प्राचीन आर्यावर्तानें सर्व जगास

घालून दिलेला आहे. अर्थात् हिंदुस्थानाकडे गुरुपणाचा मान येणें हेंही अगदीं साहजीक आहे. जरी कोणी विकारवशतेनें अथवा सांप्रतच्या सुस्थितीनें, भरभराटीनें, विद्याधनमदानें, हिंदुस्थानच्या दुःस्थितीमुळें व पडत्या काळामुळें ही गोष्ट छपवून ठेविली व आपल्या ज्ञानाचा टेंभा व संस्कृतीची दिवटी सर्व जगभर नाचविण्याचा प्रयत्न केला तरी त्याची ती घमेंड प्रत्यक्ष प्रमाणापुढें जिरलीच पाहिजे. ' अरेबियन नाइट्स ' मध्यें टिटवीच्या जोडप्याची जी गोष्ट आहे तीवरून वरील विधानास फारच पुष्टि मिळते. अरेबियन नाइट्समध्यें ही गोष्ट आहे काय ? आरबीभाषेंत टिटवी हा शब्द आहे; परंतु त्याचा मूलार्थ काय, तो कोणत्या शब्दापासून सिद्ध झाला ह्याचा कांहींच समाधानकारक तपास लागत नाहीं. परंतु संस्कृतमधील टिट्टिभ शब्दाशीं त्याचें निकट साम्य दिसतें. बंगाली टिटिव व हिंदुस्थानी टिटिही हीं रूपें जशीं टिट्टिभ शब्दाचीं अपभ्रष्ट-आहेत त्याचप्रमाणें टिटवी हें सुद्धां असेल असें मानण्यास हरकत नाहीं. दुसरी गोष्ट कलाल व दम्न ही घेतली तरी हें नांव सुद्धां संस्कृत नामाशीं बरेंच जुळत आहे. बरोबर उच्चार काय आहे ? पंचतंत्रांतील गोष्टींत बैलाचें नांव ' संजीवक ' असें असून त्याचें आरबीमध्यें ' शान्झेबेह् ' असें रूपांतर झालें असलें पाहिजे; आणि कोल्ह्याचीं नावें करटक दमनक अशीं आहेत त्यापासून कलाल दम्न अशी रूपें होणें अगदीं साहजीक आहे.

अहंमद व प्यारीबानू या गोष्टींतील प्यारीबानू हा शब्द हिंदी नाहीं असा कोणासच संशय येणार नाहीं. हुसेन राजपुत्राला नूरन निहरची प्राप्ति होण्याकरितां अशी एक अट होती कीं, त्यानें आजपर्यंत माहित नसलेली अशी एकादी अद्भुत व लोकविलक्षण वस्तु पैदा करावी; याकरितां तो भटकत असतां अत्यंत धनाढ्य व लोकांनीं अतिशय गजबजलेल्या अशा विसानगर नामक शहरीं तो येऊन पोंचला. या गोष्टींतील ' विसानगर ' शहर हें हिंदुस्थानांत नसेल असें कोणालाहि म्हणतां येणार नाहीं.

डेस्लॉगशॅम्यस म्हणतो कीं, " सिंदबाद दर्यावर्दी याची गोष्ट मूळची संस्कृतच आहे: आणि त्याशिवाय पुढें दिलेल्या तीन गोष्टी याही मुळांत संस्कृतच असल्या पाहिजेत. (१) आरबी राजा, राजपुत्र, खुशामत्ये व सात वजीर (२) हिब्रूभाषेंतील सेंडेबारची गोष्टीरूप अद्भुत कथा (३) ग्रीकभाषेंतील सिंटीपासची कल्पितकथा. दुसऱ्या गोष्टीच्या आधारें रोमनभाषेंत लिहिलेलें " सातसाधु " नामक पुस्तक तीन शतकें फार लोकप्रिय झालेलें होतें.

प्रो. विल्सन असें लिहितो कीं, " ब्रिटिश म्युझिअममध्यें सेंडेवारच्या गोष्टींच्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत होती. त्याला लाटीन भाषेंत लिहिलेल्या ज्या टिपा जोडलेल्या होत्या त्यांत असें स्पष्ट म्हटलेलें होतें कीं, हें पुस्तक हिब्रूभाषेंत आरबी अथवा इराणी यांपैकीं एकामधून भाषांतरित केलेलें आहे. परंतु आरबी व इराणी भाषेमध्यें जेव्हां तें लिहिण्यांत आलें तेव्हां त्यास आधार संस्कृताचा हिंदी भाषेंतून घेतलेला होता अशी या पुस्तकाची थोडक्यांत पूर्वपीठिका आहे. "

मसूदी नामक प्रख्यात आरबी लेखकानें आपल्या ' मिराजुल झेहेब ' नांवाच्या पुस्तकांत एक प्रकरण हिंदुस्थानांतील प्राचीन राजे या विषयाला खर्ची घातलें आहे; त्यांत तो लिहितो कीं, कुरुश राजाच्या समकालीन सिंदबाद नामक हिंदू तत्त्वज्ञानी होता व त्यानें " सात वझीर, अध्यापक, राजपुत्र व राणी " या नांवाचें एक पुस्तक लिहिलें होतें आणि यावरूनच सिंदबाद दर्यावर्दी याची गोष्ट लिहिलेली असली पाहिजे.

प्रो. विल्सन यानें ' सिंटीपास ' ' सेंडेवादचे दृष्टान्त ' या पुस्तकांचें मनोरंजक विवरण करून तीं सुद्धां आर्यांच्याच मेंदूरूप खाणींतून निघालेलीं आहेत असें सिद्ध केलें आहे. यांखेरीज आणखीही पुष्कळ पुस्तकांचें माहेरघर हिंदुस्थानच आहे असें त्यानें सप्रमाण दाखविलें आहे. सर जॉन मालकम् म्हणतो कीं, " प्राच्य राष्ट्रांत ज्यांचीं नावें बुद्धिप्रकर्षावद्दल सर्वतोमुखीं झालेलीं आहेत अशा कवींनीं आपल्या बुद्धीची सर्व करामत नीतिबोधपर कल्पित कथा रचण्यांत खर्ची घातलेली आहे; व ज्या नीतितत्त्वांचा पुरस्कार करण्याची त्याची इच्छा होती त्यांच्या सौंदर्यांत इतकी भर घालून त्यावर असे सुंदर ग्रंथ रचले कीं, जगांतील प्रत्येक देशाच्या पुस्तकसंग्रहालयांत त्यांचा प्रवेश होऊन त्यांस फार उच्च स्थान मिळालें आहे. "

सोनारानें कान टोचले म्हणजें हूं का चूं होत नाहीं; सर्व कांहीं मुकाट्यानें चालतें. त्याचप्रमाणें पाश्चात्त्य ग्रंथकारांनीं स्पष्ट दिलेले कबूलीवजा अभिप्राय वाचले म्हणजे आम्हामधील आत्मनिंदकांचीं निदान तोंडे तरी बंद होतात व ज्यांचे ठिकाणीं स्वाभिमान सुप्तावस्थेंत असतो त्यांस अशा प्रयत्नानें जागृत केल्याचें श्रेय मिळतें व उद्दिष्ट हेतू थोड्या बहुत अंशानें साध्य होतो. म्हणून वर दिलेला मार्ग आम्ही मुद्दाम पत्करला; जरी त्यायोगें त्यास उच्छिष्टान्नाचें किंचित् स्वरूप आलें तरी पत्करलें; परंतु दुष्काळांत जिवावर प्रसंग आला म्हणजे नेहमीचे सर्व नीतिनियम बाजूस ठेवून प्रथम आत्मसंरक्षण करावें लागतें. त्याचप्रमाणे हल्लीं आपल्यामध्यें स्वाभिमानाचें व आत्मनि-

ह्रेचें प्राणोत्क्रमण सुरू असतां त्यास वर दिलेल्या जलपानाच्या घुटक्यांनीं शुद्धीवर आणलें म्हणजे क्षणभर उच्छिष्टत्वाचा आरोपसुद्धां पत्करण्यास दिक्कत वाटत नाहीं; याच हेतूनें वर भरपूर उतारे घेतलेले आहेत व त्यांवरून वाङ्मयाच्या या शाखेमध्यें आर्यांच्या बुद्धीनें केवढी अलौकिक कामगिरी बजावली आहे हें स्पष्ट दिसून येईल. प्राचीन, अर्वाचीन, यूरोपीय अथवा आशियामधील कोणत्याहि राष्ट्रानें केव्हांहि अशा प्रकारचें बुद्धिकौशल्य, रचनानैपुण्य उपदेशलालसा आणि नीतिप्रेम यांचें प्रदर्शन पुष्कळ ग्रंथ रचून त्यांत केलेलें दिसत नाहीं.

प्रो. हीरन म्हणतो कीं, " हिंदूंच्या काव्यांत नीतीची जी मजेदार शिकवणूक आहे तशी अन्यत्र कोठेंहि पहावयास मिळत नाहीं. या जगांत नवीं नवीं तत्त्वें शिकणें व शिकविणें हेंच मानवजातीचें पवित्र कार्य आहे. अखिल जीवनावधींत हीच आमची इतिकर्तव्यता आहे आणि ऐहिक जीवनाचें हेंच रहस्य आहे; हें आर्यांनीं जसें ओळखिलें तसें इतर कोणीहि ओळखिलें नाहीं.

पुराणें.

उत्तरकालीन संस्कृत वाङ्मयामध्यें पुराणांनीं फारच मोठें स्थान पटकाविलें आहे. यांतील विषय एकच नसून नानाविध आहेत. त्यांची मुख्य कामगिरी धार्मिक बाबतींत दिसून येते. ईश्वरविषयक चर्चा, ईश्वरोत्पत्ति, निरनिराळे अवतार, सृष्टयुत्पत्ति, नीतिबोध-चर्चा व धार्मिक प्रवचनें इत्यादि विषयांचें विवेचन यांत केलेलें आहे. हिंदुलोक या ग्रंथास अर्धवट धार्मिक ग्रंथ असें मानतात. परंतु खरोखर पहातां यास संस्कृत ज्ञानकोष हेंच नामाभिधान बरोबर शोभेल. परमेश्वरस्वरूपज्ञान, (ईशस्वरूपज्ञान) प्राचीन कथा, इतिहास, युद्धनीति, राजनीति, तत्वज्ञान, भौतिक शास्त्रें, (विज्ञान) कला इत्यादि विषय प्रसंगाप्रसंगानें सुबोध व रसाळ भाषेंत यांत प्रतिपादलेले आहेत. वर दिलेल्या विषयांची चर्चा अत्यंत भारदस्तपणें केलेली जरी यांत आपणास दिसते तरी वेदांचें महत्त्व या ग्रंथास केव्हांहि देतां येणार नाहीं. परंतु आर्य जातीच्या अवनतीचा काळ जसजसा ओकावूं लागला, आर्यांच्या प्राचीन उदात्त कल्पना, जोरदार व तेजस्वी प्रार्थना व अत्यंत तेजस्वी अशा अंतःकरणांत उचंबळणाऱ्या सर्व विषयांसंबंधीं कल्पना व विचार जसजसे खुरटत जाऊन त्यांचा भरधांव ओघ ओसरूं लागला आणि साधी रहाणी व विशाल विचार-सरणी हा त्यांच्या जीवन-क्रमांतील मनोधर्म नष्ट झाला तेव्हां ते पुराणांना जास्त महत्त्व

देऊं लागले. वेद, उपनिषदें या दिव्य ज्ञानाच्या खाणींतून अमूल्य विचाररत्नें काढण्याची शक्ति जसजशी कमी होत गेली तसतशी या ज्ञानकोशरूपी पुराणावर जास्त जास्त भिस्त ठेवणें बरें असें त्यांस वाटूं लागलें. व कालांतरानें विचार करण्याची, स्वतंत्र स्फूर्तीनें ग्रंथ रचण्याची आणि मूळ असलेलें अवलोकन करण्याची हिंमत पूर्णपणें नाहींशी झाली व पुराणें सर्व वैदिकधर्माचें रहस्य होऊन बसलीं. वेदांतील देवता मागें पडून नवीन नवीन देवता पुराणांत घुसूं लागल्या. त्यांची उन्नति, त्यांची अन्योन्यश्रेष्ठता, त्यांची वर्गवारी, त्यांच्या आवडीनिवडी, इत्यादि गोष्टी, त्याचप्रमाणें व्रतें, वैकल्यें, नेमधर्म, यात्रा, जत्रा, या गोष्टींस फाजील महत्व चढून खरा धर्म मागें पडला. या नवीन बोजड परावलंबी आचारविशिष्ट व कर्मकांडात्मक धर्मानें मूळच्या अध्यात्मिक व शास्त्रशुद्ध वैदिकधर्मास हुसकून लावून जिकडे तिकडे आपला अंमल बसविला. समाजशास्त्र, पौराणिक कथा, ईशस्वरूपज्ञान इत्यादि प्रकारांनीं बनवलेलीं पुराणें ही एक गोधडीच आहे असें वाटल्या शिवाय रहात नाहीं.

परराष्ट्रांतील लोकांच्या टोळधाडी जेव्हां हिंदुस्थानावर पडूं लागल्या तेव्हां तत्कालीन नेत्या पुरुषांना असें वाटलें कीं आपलीं क्रियाकर्में बरोबर चालणें अशक्य आहे; वेद, उपनिषदें इत्यादि ज्ञान लुप्त होऊन जाणार; अधर्म प्रबल होणार; सर्व राष्ट्र क्षत्रियकामामध्यें गढून गेल्यामुळें देवदेवतांदिकांची पूजाअर्चा बरोबर होणार नाहीं. सबब ह्या कारणानें होणारा ईश्वरी कोप टाळावा आणि अपौरुषेय वेद व परंपरागत संचित झालेलें ब्रह्मज्ञान यांचें योग्य संरक्षण व्हावें म्हणून त्यांनीं हें काम ब्राह्मणवर्गाकडे सोपविलें.हें काम फार जोखमीचें, मेहनतीचें बुद्धिमत्तेचें,दृढनिश्चयाचें,असल्यानें ब्राह्मणाखेरीज तें उचलण्यास कोणी पुढें झाला नाहीं हें साहजिक आहे. कामाच्या रंगरूपाप्रमाणें तें अंगावर घेणाऱ्याच्या ठायीं तत्सिद्ध्यर्थ व तत्पोषक गुणहि असावे लागतात. अर्थात ते गुण त्याकाळीं ब्राह्मणांपे ठायीं असल्याशिवाय इतर वर्णांनीं तें त्यांच्याकडे सोपविलें असें म्हणतां येणार नाहीं. ब्राह्मणांनीं तें काम फार चोख रीतीनें बजाविलें यावद्दल सर्व जग आज त्यांस धन्यवाद देत आहे. व केवळ त्यांच्याच परिश्रमानें जगांतील अत्यंत प्राचीन धर्म आपल्या सर्व धर्मग्रंथांसह व तत्त्वज्ञानग्रंथांसह आज हयात असून आजपर्यंत अनेक धर्मप्रवर्तकांना त्यानें स्फूर्ति देऊन जगामध्यें नवीन ज्ञानाची भर घातली आहे. लोकांनी वेळोवेळीं नवीन धर्मसंस्थापनेच्या रूपानें मनःशुद्धि केली आहे व आपण शेवटीं सर्व जगांतील अर्ध्यापेक्षां जरा कमी लोकांचा मोक्षमार्ग बनून शिवाय जगास आज तत्त्वज्ञान शिकवीत आहे. धन्य आहे

तुझी आर्यधर्मा ! असंख्य कालचक्राच्या फेऱ्यांतून सुटून तुझें मूळ रूप इतकें विशुद्ध व इतकें तेजोमय कसें राहिलें, म्हणून आज सर्व जग आश्चर्यानें तोंडांत बोट घालीत आहे. परंतु या कामीं तत्कालीन ब्राम्हणांचे निरपेक्ष श्रम, श्रद्धा, शुचिर्भूतपणा इत्यादि कडकडीत गुणच कामीं आले यांत संशय नाहीं. अशा गुणिजनांना इतर वर्गांतील लोकांनीं मान दिला व देवासमान मानिलें म्हणून कांहीं आश्चर्य नाही. परंतु मनुष्यानें ही मर्त्यभूमि जोंपर्यंत सोडली नाहीं, तोंपर्यंत त्यास अखंड देवत्व येणें अशक्यच आहे. याच न्यायानें कांहीं कालांतरानें मूळच्या तेजस्वी, कडकडीत, तपोनिष्ठ, व स्वाध्यायरत ब्राह्मणांचे वर निर्दिष्ट केलेले गुण लोपले व त्यांचे ठिकाणीं स्वार्थाची पुंजी वाढत चालली. स्वार्थ व परार्थ हे पूर्वपश्चिम दिशांप्रमाणें अगदीं भिन्न असल्यानें स्वार्थाची सरशी होण्याबरोबर परार्थानें मागें पाय काढला व त्याबरोबरच तदनुषंगिक दैवी व सात्विक गुण अस्तंगत झाले. परंतु चमत्कार असा झाला कीं, पूर्वकालीन ब्राह्मणांचा दरारा, वचक व वजनहि समाजांत कायम राहून गुण मात्र तेवढे नष्ट झाले; तेणेंकरून उत्तरोत्तर स्वार्थाची बेसुमार बाढ होऊन ब्राह्मणांनीं इतर वर्णांतील लोकांच्या हयगयीपणामुळें ह्या ब्रह्मज्ञानाचा ठेवा आपल्याकडे ठेवून दिला. मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं, त्यास देणें व दुसणें ही दकारांची दुक्कल नको असते. तशांत ब्राह्मणांनीं हा ठाव परिश्रमानें संपादन केलेला, जतन करून वाढविलेला, तेव्हां त्याबद्दल त्यांचे ठिकाणीं ममत्व उत्पन्न होऊन त्यावर परक्यांनीं हक्क सांगू नये असें वाटणें मनुष्यस्वभावास धरूनच आहे. दुसरें कारण असें आहे कीं, हें वेदपठनाचें काम अत्यंत दगदगीचें, सोशिकपणाचें, निष्कामाचरणाचें, व किफायत तर मुळींच नाहीं; तेव्हां इतर वर्णांनीं तिकडें दुर्लक्ष केलें यांतहि कांहीं सृष्टिक्रमास सोडून आहे असें नाहीं; कोणी म्हणतील कीं, जर ब्राह्मण हे सर्व वर्णांचे गुरू असें मानलें जात होतें, तर त्यांनीं गुरूच्या ठिकाणीं असणाऱ्या शिष्यप्रेमानें इतर वर्णास त्यांनीं न विचारतां हें अध्यापनाचें काम करावयास पाहिजे होतें; व सर्वांस सारखेंच सज्ञान ठेवावयास पाहिजे होतें. परंतु हें म्हणणें अगदीं अनुचित आहे. कारण ' शीक ' ' शीक ' म्हणून पाठीस लागल्यानें कोणी शिकत नसतो व जेव्हां हें गुरुपण एकाद्या वर्णाकडे असतें तेव्हां त्या सबंध वर्णानें इतर वर्णास शिकविण्यासाठीं त्यांच्या पाठीस लागावें हें सयुक्तिक दिसत नाहीं.

अशा रीतीनें इतर वर्णांची हयगय व ब्राह्मणांचा वाढता स्वार्थ याचा परिणाम असा झाला कीं, ब्राह्मणास हें ज्ञान म्हणजे खासगत मालमत्ता असें वाटूं लागलें; व

त्याची पूर्ण मालकी पुढें या उभयविध कारणांनीं त्यांचेकडेच राहिली. पुढें चालरीतींचे अभेद्य तट पडून विचारसरणीहि दूषित झाली आणि निकृष्टवर्गांनीं वेदविद्येचा अभ्यास करूं नये अशी समाजांत दुष्ट चाल पडली. मात्र याला कारण सर्वस्वी ब्राह्मणच होतें असें केव्हांहि म्हणतां येणार नाहीं.

पुराणांचा जरी कोणी वर वर अभ्यास केला तरी सुद्धां त्यास त्यांतील रहस्य कळून आल्याशिवाय रहाणार नाहीं व त्यांची वास्तविक योग्यता केवढी आहे हेंहि सहज प्रत्ययाला येईल. तरी अशा पुस्तकांचा योग्य अभ्यास होऊन त्यांतील ज्ञान सर्व जनतेला मिळावें हेंच सर्वांचे म्हणणें असणार दुसरें काय ?

जगाच्या सुधारणेचा गाडा फार भरधांव सुटला आहे. विचारांत भयंकर क्रांति होऊन एकंदर जीवनक्रमाला फार निराळें वळण मिळालें आहे. पूर्वीच्या कल्पना व आचार आतां अक्षरशः पाळणें अशक्य असून तसें करण्याचा कोणी अविचार केल्यास त्याचें अपरिमित नुकसान झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हिंदुस्थान देश निसर्गतःच सर्व बाजूंनीं नैसर्गिक मर्यादांनीं परिवेष्टिलेला आहे, आणि त्यांत शास्त्रांनीं परदेशगमन बंद केलें ! देश धनधान्यसमृद्ध असून सर्व तऱ्हेनें आत्मतंत्र व स्वावलंबी असा होता तेणेंकरून लोकांस बाहेर जाणें अवश्य नव्हतें. परंतु सांठलेलें फार खोल पाणी सुद्धां विघडतें, तशी स्थिति या भारतभूची झाली ! लोक अडाणी, व संकुचित दृष्टिचे झाले; दळणवळणानें खळवळ व हालचाल सुरु असते ती बंद झाल्यानें आचाराविचारांत शैथिल्य आलें, नवीन विचारांचे झरे कोंदाटले, संघट्टण, घर्षण व सहवास यांनीं विचारांची अदलाबदल होऊन सफाई होते व आध्यात्मिक जीवन सतेज व पुष्ट राहतें; परंतु या देशाची स्थिति सर्व उलट. येथें परका म्हणजे तो अतिशूद्रापलीकडे मानण्याचा प्रघात पडला; लोक चालिरीतींचे गुलाम बनले. मग परदेशस्थ प्रवाशाची वास्तपूस्त घेणें अर्थातच बंद झालें. दुराग्रह व हेका असा कीं ते अतिशूद्र, चाडाल; सर्व ज्ञान काय तें आम्हापाशीं ! स्वदृष्टीच्या टप्याबाहेर जग आहे, तेथें येथल्याप्रमाणें व्यवहार चालतात, लोक विचारी, धनवान, नीतिमान. अभ्यासशील, विद्याप्रिय आहेत ही जाणीव कोणाला ? अशा रीतीनें अहंभाव वाढून सुधारणेचे बुद्धिच्या सफाईचे, नूतन संस्काराचे व ज्ञानवृद्धीचे सर्व मार्ग बंद झाले; स्वदेशांत खालील वर्ग जास्त पतित होत चालले; असा भयंकर अधःपात झाला तरी राष्ट्रांतील कर्त्या वर्गाचे डोळे उघडूं नयेत हें आश्चर्य होय ! विचारी वर्गाची अशी दिशाभूल होऊं नये व सामर्थ्याची हानि बंद व्हावी ! !

इजिप्त, इराण, बॅबिलोनिया, ग्रीस या राष्ट्रांची जी अवस्था झाली व काळाच्या उदरांत त्यांचा स्मृतिरोपरहित जसा वळी पडला, तसा प्रसंग आपल्या आर्यावर्तावर येऊं नये याकरितां ऋषिकालीन केवढी भरभराट व समृद्धि होती, चालू काळ कसा पूर्ण दैन्यवाणा आहे व योग्य समयीं उपाययोजना न झाल्यास वरच्या राष्ट्राप्रमाणें आपलीही गति झाल्याशिवाय रहाणार नाहीं अशा रीतीचें यथार्थ दर्शक व भडक चित्र राष्ट्रापुढें मांडून त्यास सन्मार्गावर आणणें हाच एक उपाय आहे. निकृष्ट वर्गास वरिष्ठ वर्गानें वधूप्रमाणें हाताशीं धरून एकमेकांनीं एकमेकास सहाय्य करून राष्ट्राच्या जीवन-संवर्धनाचे उपाय योजिले पाहिजेत, त्यास पूर्वीच्या कीर्तीस शोभेल असें वागविलें पाहिजे, प्रगतीच्या मार्गावर आणून सोडलें पाहिजे, आणि कोणाच्याहि मागें न राहतां हल्लीं जगांत जें जोरदार प्रवाहाचें आंदोलन सुरू आहे त्यांत आपणहि सामील होऊन आपलें प्राक्कालीन श्रेष्ठत्व प्रस्थापित करणें आणि हल्लींहि आपणामध्यें तसेंच अपूर्व वैशिष्ट्य आहे व यापुढें अभूतपूर्व कामगिरी करण्याचें सामर्थ्य आहे हें दाखविणे हेंच उचित आहे. याकामीं अनेक रसप्रधान पुराणांचा उपयोग करून घेणें हें किती बरें प्रशस्त आहे? पुराणें झालीं तरी वेदोपनिषदांचींच विकृत, मलिन व अपकृष्ट रूपांतरें आहेत. त्यांमध्यें कांहीं हीन भाग आहे ही गोष्ट खरी; परंतु लोकांना त्यांचा आज फार दिवसांपासून परिचय असल्यानें त्यास दूर लोटून चालावयाचें नाहीं. शिवाय यांत सुद्धां तात्विक व ब्रह्मज्ञानाचा भाग कांहीं थोडा नाहीं. म्हणून त्यांच्याच सहाय्यानें, त्यासच धरून, त्यांच्याच द्वारें लोकांस उपदेश करून, शहाणें करून वेद व उपनिषदें यांनीं घालून दिलेलीं थोर व पवित्र नीतितत्त्वें व सिद्धान्त आपलेसे करून घेणें हें चालू काळांत अत्यंत शहाणपणाचें व धोरणीपणाचें काम आहे; आणि त्याविना अन्य गति नाहीं हें निश्चित आहे.

व्यास, वाल्मिकासारख्या जगद्वंद्य महाकवींच्या हातून पुराणांची रचना झाली नाहीं ही गोष्ट खरी आहे. परंतु एकंदरीनें पाहतां प्रस्तुत पुराणांच्या रचनाकारांनीं शक्य तेवढी मेहनत घेऊन आपल्या अहर्निश वाचनाचा, विद्याव्यासंगाचा व त्या योगानें प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उत्तम ठसा यांत उठवून दिला आहे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. पुराण या शब्दाचा अर्थ गत काल असा आहे; आणि एकंदर ग्रंथाचा रोख असा आहे कीं, सार्वजनिक उत्सवप्रसंगीं ते पाठ म्हटले जावे व लोकांना सर्व विषयाचें ज्ञान सहज प्राप्त व्हावें. पद्यात्मक रचना असल्याकारणानें तीं पाठ करण्यास सोपीं जात व लोकांच्या तोंडांत सारखीं घोळत राहिल्यानें नैतिक व धार्मिक उपदेशाचें कार्य

सुलभ होई. त्यांत सांख्य व वेदान्त तत्त्वज्ञानांचा सुंदर मिलाफ करून वैदिक क्रियाकर्मांच्या व कायद्याच्या नियमांचा पद्धतशीर संग्रह केलेला आहे.

बऱ्याच प्राचीन कालापासून या ग्रंथांच्या रचनेचें कार्य चालू आहे. तें काम अनेक व्यक्तींच्या हातून भिन्नभिन्न काळीं झालेल आहे; व विचारांत जे जे फरक पडले ते सर्व यांत सहजच अंतर्भूत झालेले आहेत. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य यांसारख्य धर्मप्रवर्तकांच्या मतांचा यांत संग्रह केला आहे. ग्रंथाचें स्वरूप संभाषणात्मक असून लोमहर्षण अथवा सोमहर्षण या व्यास शिष्यानें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें म्हणून तीं लिहिलीं आहेत.

या पुराणांचे सात्विक, राजस व तामस असे तीन भाग आंहेत व प्रत्येक भागामध्यें विवक्षित पुराणें नमूद केलेलीं आहेत तीं अशीं:—

सात्विकः—विष्णुपुराण, नारदपुराण, भागवतपुराण, गरुडपुराण, पद्मपुराण व वराहपुराण.

राजसः—ब्रम्हांड, वैवर्त, मार्कंडेय, भविष्य, वामन, ब्रम्ह.

तामसः—मत्स्य, कूर्म, लिंग, शिव, स्कंद आणि अग्नि.

सात्विकपुराणें वैष्णवमतांचीं आहेत, तामस शैव आहेत व राजस गोस्वामी व वल्लभाचार्य यांचीं मतें प्रसार करणारीं आहेत.

वर दिलेल्या अठरा पुराणांखेरीज इतर १८ उपपुराणें आहेत; व सर्वांची श्लोक-संख्या लौकिक समजुतीनें एक कोटी आहे; परंतु प्रत्यक्ष गणनेनें ती चार लक्षांवर आहे.

अठरा उपपुराणांचीं नावें खालीं दिल्याप्रमाणें आहेत:—

१ सनत्कुमार, २ नारदीय, ३ शिव, ४ वरुण, ५ अंसनस, ६ आदित्य, ७ नारसिंह, ८ पराशर, ९ कपिल, १० सांब, ११ कलिक, १२ भागवत, १३ दुर्वास, १४ महेश्वर, १५ मनव, १६ नंदी, १७ सौर, १८ वशिष्ट.

श्रीभागवत पुराणांत वृत्रासुर याच्या हननाची कथा दिली आहे. गायत्री मंत्राची प्रारंभींच चर्चा केलेली आहे. सारस्वतकल्पांतील लोकाचारांचें यांत उत्तम विवेचन केलें आहे. त्यानंतर वराह, प्रल्हाद, ध्रुव, वेन, पृथा, मन्वंतरांची व प्रजापतींची उत्पत्ति कपिलावतार, मत्स्यावतार, समुद्रमंथन, कृष्णावतार, यादव—निर्मूलन, उद्धवोपदेश कलियुगचर्चा इत्यादि विषयांचें यांत वर्णन आहे. त्याचप्रमाणें अग्निपुराणांत

ईशानकल्प, रामकृष्णावतार, शिवपूजेचे गूढ प्रकार, पृथ्वीचें वर्णन, निरनिराळे वंश, वैद्यक, भाषा, अलंकार, व्याकरण, लष्करी हालचाली इत्यादि विषयांची हकीकत यांत आलेली आहे. अग्निपुराणांत शस्त्रविद्या व धनुर्विद्येचें विवेचन आलेलें आहे व धनुर्वेदाची जी हानि झालेली आहे, त्यामुळें या पुराणास फारच महत्त्व आलेलें आहे. देवपुराणांत ब्रम्हास्त्र, पद्मपुराणांत भारतीय विस्तृत भूगोल व एकंदर विश्वाचा सामान्य भूगोल, गरुडपुराणांत सामुद्रिक, व फलज्योतिष, काहीं पुराणांत कला व उद्योगधंदे; अशा रीतीनें निरनिराळ्या पुराणांत निरनिराळ्या विषयांची हकीकत आलेली आहे. पुष्कळ भरकट व निरुपयोगी गोष्टींची यांत गर्दी झालेली आहे हें खरें; परंतु तत्वार्थी व शोधक मनुष्यास निःसत्व पदार्थांचें भूस व कोंडा काढूनसुद्धां यांत बरेंच तथ्य मिळेल. गतकालावर बराच प्रकाश पडेल व तत्कालीन सर्व गोष्टींचा संग्रह या दृष्टीनें तर त्यांचा फारच उपयोग आहे. एकादा चित्रकार ज्याप्रमाणें कुरूप मातीच्या ढेकळांना आपल्या कौशल्यानें सुंदर रूप देतो. त्याप्रमाणेंच या पुराणांचा उपयोग करून घेतला पाहिजे. व्यर्थ नाकें मुरडून उपयोग नाहीं. वाडवडिलांना फुकट दोष कोणासहि देतां येईल, कारण त्यास श्रम पडत नाहींत; परंतु या पर्वतप्राय ग्रंथसंपत्तीचा मननपूर्वक अभ्यास करून त्यांतील तत्त्वांचा, उपयुक्त गोष्टींचा व ज्ञानकणांचा संग्रह करण्यास असामान्य चिकाटी, उद्योग व बुद्धीची तरतरी लागते. या गोष्टी ज्याचें ठायीं असतील व ज्यानें असा व्यासंग केला असेल, त्यासच फक्त अधिकारानें बोलतां येईल. नाहीं ' तर मुखमस्तीति वक्तव्यं ' यांत कांहीं अर्थ नाहीं.

शेवटीं प्रोफेसर विल्सन यांचे मत देऊन पुरें करणें बरें. त्यांच्या मतें यांतील कांहीं गोष्टी ख्रिस्ती शकाच्या तीन शतकें पूर्वीच्या काळांतील आहेत. इतर राष्ट्रांतील तत्कालीन लोकांचे धर्मसमज, चमत्कारिक संस्था व नानाप्रकारच्या अतर्क्य गोष्टी यांची उत्पत्ति होण्यापूर्वी यापैकीं कांहींची रचना झालेली आहे.

प्रकरण १२ वें.

आर्यांचें तत्त्वज्ञान.

मनुष्य जातीनें आजपर्यंत हजारों साम्राज्यें निर्माण केलीं; परंतु कालानें केवळ लीलेनें तितकींहि जमीनदोस्त केलीं. मानवी कर्तबगारीचा अवशेष कोणत्याही रूपांत राहूं नये असा दुष्ट कालाचा कटाक्ष दिसतो. आजतागायत प्राचीन कलांचे, वाङ्मयाचे व बुद्धिविलासाचे बरेच अवशेष शाबूत आहेत; परंतु 'काल निरवधि व पृथ्वी विपुला' असल्यानें ह्यांपैकीं पुढें किती शिल्लक राहतात यावद्दल मन फारच साशंक रहातें. कारण काळाच्या दुर्विलसिताची हौस कधीं शमेल असें आजपर्यंतच्या अनुभवावरून अनुमान करवत नाहीं. मात्र एका गोष्टीपुढें कालास हात टेंकावे लागले व काल जर जडरूप असता तर त्याजपासून मानवजातीनें ह्या बाबतींत अजिंक्यपत्र चोपून घेतलें असतें. अशी कोणती जबरदस्त वस्तु मानवी हातामध्यें सांपडली असेल असा पुष्कळजणास संशय येईल ! प्रत्यक्ष इंद्राचें वज्र जरी येथें मानवजातीच्या मदतीस येतें तरी तें काळाच्या माऱ्यापुढें बोथट होऊन निरुपयोगी झाल्याशिवाय रहातें ना. मग जेथें इंद्राच्या वज्राचा पाड नाहीं तेथें इतर सर्व हत्यारें लटपटतील यांत काय आश्चर्य ? परंतु परमेश्वरी लीला पाहण्यास मिळते ती येथेंच. मनुष्याच्या जड इंद्रियांचा जर कोणी आधार घेईल तर त्याची फसगत झाल्याविना राहणार नाहीं. कारण मानवी देह बोलूनचालून नश्वर. जोडीस जोड मिळाल्याशिवाय कोठें शत्रु चीत झाला आहे काय ? काळ अदृश्य व कल्पनागम्य सबब त्याच्याच रूपाचें मानवी मन जेव्हां त्यास विरोध करण्यास भेटलें, तेव्हां मात्र काळानें हात टेंकले. मानवी मनाच्या परिश्रमाचें फळ तें तत्त्वज्ञान. या एका हत्यारानें मात्र काळास बरेंच पाणी दाखविलें व आपलें पृथ्वीवरील साम्राज्य आजपर्यंत अबाधित टिकवलें आहे. इतर सर्व साम्राज्यें गेलीं; परंतु याचें मात्र जसेंच्या तसेंच टिकून त्याचा उत्तरोत्तर उत्कर्षच चालू आहे. अशा साम्राज्यानें मानवजातीस घेरून टाकावे व त्यांच्या मनावर अम्मल चालवावा यांत काय आश्चर्य ? यच्चावत् प्राणी तत्त्वज्ञानरूप

सम्राटापुढें प्रणिपात घालीत आहेत. लहान असो, थोर असो, प्रबल असो, निर्बल असो, राव असो, रंक असो; सर्वांसच हा सारखा प्रिय आहे. याचा अंमल फार करडा, अनियंत्रित व बिनहरकत असला तरी, प्रजेस सुख, समाधान व शांति भरपूर लाधत आहे. हा अजातशत्रु असून याच्या राज्यांत सर्वत्र प्रेमळपणा व आनंदच पसरलेला आहे.

महान् महान् तत्त्ववेत्ते व सर्वांगपरिपूर्ण तत्त्वज्ञान-पद्धति यांवरून राष्ट्राचा मोठेपणा ठरविणें योग्य असेल तर त्याबाबतींत हिंदुस्थानास फारच उच्च स्थान मिळालें पाहिजे हें कोणीही समबुद्धीचा माणूस कबूल केल्याशिवाय रहाणार नाहीं. तत्त्वज्ञानाचा उगम केव्हां होतो व त्याची वाढ होण्यास राष्ट्राची स्थिति कशी असावी लागते याबद्दल प्रोफेसर मॅक्समुल्लर यानें एक सिद्धांत काढला आहे, तो असा:—राष्ट्रांत जिकडे तिकडे शांतता असून धनधान्याची समृद्धि आहे; कांहीं ठळक ठळक कुटुंबांजवळ विपुल संपत्ति सांठलेली आहे; सर्व लोकांना विद्या व कला यांचें ज्ञान होण्यास लागणारीं विद्यालयें व विद्यापीठें भरपूर आहेत; अशा स्थितींत पोटाकरितां अहर्निश झटणाऱ्या लोकसमूहामधून थोड्यांना विद्या-कला अशांसारख्या गोष्टींकडे लक्ष देण्यास सवड मिळते व त्यांतूनही फारच थोड्यांना त्यांचा ध्यास लागलेला असतो. अशा अल्पसंख्येंतून भावी तत्त्वज्ञानी व सर्व जनांच्या चित्तांना आल्हाद व शांति देणारे तत्त्वज्ञानी निर्माण व्हावयाचे असतात. हाच नियम जर हिंदुस्थानास लावला तर तो पूर्णपणें खरा ठरलेला पाहावयास मिळतो; आणि येथील जगाविख्यात तत्त्वज्ञान्यांची मोजदाद केल्यास वरील नियमान्वयें हिंदुस्थान सर्व जगाच्या गुरुस्थानींच शोभेल यांत कांहीं संशय नाहीं.

येथील भूमींत तत्त्वज्ञानाचें बीज उत्तम प्रकारें रुजून त्यापासून निरनिराळे तत्त्वज्ञानपद्धतीरूपी प्रचंड वृक्ष सर्व जगापुढें उभे आहेत. सारांश—भरतभूमि म्हणजे तत्त्वज्ञान्यांची खाणच आहे. बुद्धिप्रागल्भ्य व श्रेष्ठ संस्कृति या दोन बाबतींत प्राचीन व अर्वाचीन लोकांपेक्षां हिंदु लोक निःसंशय श्रेष्ठ आहेत व त्यांच्या विचारांचें क्षेत्र अमर्याद आहे असा मॅनिंगसाहेबाचा अभिप्राय आहे.

श्लेजेल म्हणतो कीं, " हिंदूंच्या विचारांत तडफ, भारदस्तपणा व विशुद्धता फार आहे ग्रीक लोकांना ज्या ज्ञानाबद्दल फार अभिमान वाटतो, तो हिंदूंच्या ज्ञानापुढें केवळ फिक्का पडल्यावांचून रहाणार नाहीं; आणि या दोघांस सूर्य व काजवा यांचींच उपमा शोभेल. "

प्रो. वेबर, मॅक्समुल्लर व श्लेजेल या तिघांनीं हिंदूंची अगाध बुद्धिमत्ता अचाट कल्पनाशक्ति, लोकविलक्षण तात्त्विक पृथक्करण, निसर्गदत्त प्रगल्भता, जन्मसिद्ध शोधकबुद्धि इत्यादि गुणांविषयीं फारच तारीफ केलेली आहे. व तत्त्वज्ञान आणि व्याकरण या शास्त्रांत त्यांनीं जे परिश्रम केले आहेत त्यांची थोरवी त्यांनीं आपल्याकडून होईल तेवढी गाइली आहे.

आर्यावर्तांतील सर्व सृष्ट पदार्थ व प्राचीन आर्यांच्या कला व शास्त्रें ज्याप्रमाणें अत्यंत विशाल आहेत, त्याचप्रमाणें त्यांचें तत्त्वज्ञानही जगद्व्याळ आहे. त्यांत सर्व मतांचा, सर्व तर्कपद्धतींचा, सर्व विचारप्रवाहांचा समावेश झालेला आहे. जगांतील इतर कोणत्याही भाषेंत प्रतिपादन झालेलें मत आर्यतत्त्वज्ञानांत नाहीं असें कधींच झालें नाहीं. महाभारतांत नाहीं असें कांहींच नाहीं. ॥ यदिहास्ति तदन्यत्र, यन्नेहास्ति न तत्क्वचित् ॥ असें वाक्य महाभारतासंबंधीं लोकविश्रुत आहे. परंतु तेंच जरी बरोबर आर्यतत्त्वज्ञानास लावलें तरी तंतोतंत लागू पडेल.

हंटरच्या मतें " बुद्धि, मन, जड इंद्रियें, आत्मा, दुःखोत्पत्ति, आत्म्याचें आत्यंतिक सुख, नियतिवाद, प्रयत्नवाद, सृष्टि व सृष्टिकर्ता यांतील परस्परसंबंध, परमेश्वराचें कारुण्य व मानवी प्राण्याचें दुःखमय जीवन, सुखदुःखविषमता इत्यादि अत्यंत कठिण विषयांचें विवेचन आर्यतत्त्वज्ञानांत विस्तारपूर्वक केलेलें आहे. ग्रीक, रोमन, मध्यकालीन व अर्वाचीन शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ यांच्या बुद्धीस वर दिलेले व त्याच जातीचे इतर विषय फारच अवघड व गूढ वाटले व त्यांची. ते सोडविण्याकरितां फार प्राचीन कालापासून धडपड चालू आहे. आर्यतत्त्वज्ञान्यांनीं आपल्या बुद्धिप्रकर्षानें, वक्तृत्वपूर्ण वाणीनें व शोधक मनानें त्यांचें कोडें प्राचीन कालींच उकलून ठेवलें, आणि ह्याच प्रयत्नाचें फल म्हणजे पाश्चात्य राष्ट्रांतील तत्त्वज्ञानाची वाढ होय. असें म्हणणें कदाचित् प्रथम धाडसाचें वाटेल; परंतु याच प्रकरणांत तें कसें सत्य व वस्तुस्थितीस धरून आहे हें दाखविण्यांत येईल.

आर्यांचें तत्त्वज्ञान सर्वव्यापी आहे. जगांतील सर्व तत्त्वज्ञानमतें आर्यतत्त्वज्ञानाच्या पोटांत समाविष्ट झालीं आहेत. आर्यतत्त्वज्ञानाचा पाया उपनिषदांवर रचलेला आहे. उपनिषदांमध्यें जगामधील सर्व प्रचलित मतें संग्रहीत झालीं आहेत. त्यांपैकीं कित्येक विचारपद्धति फोल असून त्यांच्या खटाटोपापासून प्रत्यक्ष फायदा फारच थोडा झालेला आहे. बरीच ग्रंथसंख्या असले शुष्कवाद माजविण्यांत व्यर्थ खर्ची पडलेली

आहे. विनाकारण अनेक पंथ उत्पन्न झाले ह्या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी मानसशास्त्रदृष्ट्या असें म्हणतां येईल कीं, केवळ एकाद्या विचारी पुरुषाच्या डोक्यांत एकादी कल्पना आली म्हणजे तिचा अखेर निर्णय होईपर्यंत दरम्यानच्या स्थितींत मानवी बुद्धि कसकसे खेळ करते, तिच्या कसरती कशा चालतात, आत्मसमर्थनाचे कसकसे प्रकार असतात व केवळ अदृष्ट, कल्पनामय विचारसृष्टींत मनुष्याच्या बुद्धीस किती उंच भराऱ्या मारतां येतात हें पाहिलें, म्हणजे मन क्षणभर स्व-सामर्थ्याच्या जाणीवेन उल्लासित होतें.

अशा प्रकारच्या तेजस्वी आर्यबुद्धीनें प्रसृत केलेला सर्वेश्वरवाद, स्पिनोझा व हेजेल यांचा तत्त्वज्ञानवाद, विश्वरूपी परमेश्वर, अध्यात्मज्ञान व आध्यात्मिक आचरण, जीवात्म्याचें परमात्म्यांत निमीलन, जन्ममरणाचें रहाटगाडगें इत्यादि विषयांवर पूर्वी जो प्रकाश पडला आहे त्यापेक्षां आधुनिक तत्त्वज्ञान्यांनीं त्यांत कोणतीही भर घातलेली नाहीं. अशा थोर तत्त्वज्ञानी आर्यांबद्दल सर वुइल्यम जोन्स त्यास हस्तगत झालेल्या माहितीवरून असें म्हणतो कीं, " न्यूटनसारख्या जगद्विख्यात तत्त्वज्ञान्याची कोणत्याही तऱ्हेनें काडीइतकी अप्रतिष्ठा करण्याची माझी इच्छा नाहीं; परंतु त्याचें ईश्वर-स्वरूपज्ञान व त्याच्या तत्त्वज्ञानाचा कांहीं भाग हीं उपनिषदांपेक्षां कोणत्याही बाबतींत निराळीं नाहींत अथवा उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचा तो अगदीं लहानसा भाग शोभेल. त्याचप्रमाणें सर्व सृष्ट पदार्थांमध्यें अदृष्ट असलेली सूक्ष्म विच्छक्ति व जिच्या योगानें आकर्षण, प्रतिसारण, उत्सर्ग, प्रतिबिंब, वक्रीभवन, विद्युत्, चेतना, स्नायूंची हालचाल इत्यादि क्रिया घडतात, तिला प्राचीन आर्यतत्त्वज्ञानांत पांचवें आकाशतत्त्व असें मानलेलें आहे. हें आकाशतत्त्व परब्रह्मापासून निघालें असें उपनिषदांत स्पष्ट म्हटलेलें आहे. आकाशापासून अग्नि, अग्नीपासून जल, या उत्क्रांतितत्त्वाला त्याचाच मुख्य आधार आहे. सबब ह्याही शोधाबद्दल न्यूटनला विशेष बहुमान दिला पाहिजे असें नाहीं. "

प्राचीन काळीं ह्या देशांत तत्त्वज्ञानाचा इतका कसून अभ्यास झाला कीं, तें केवळ वादाचा विषयच न राहतां त्याचें व्यवहारांतही संक्रमण झालें असावें असें कोणासही वाटेल; व हा तर्क हिंदूंच्या आचारांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास खरा आहे अशी खात्री पटते. मॅक्समुल्लर म्हणतो कीं, हिंदू लोक तत्त्वज्ञानाची चर्चा रस्त्यांत करतात. दीर्घ संस्कार असल्याखेरीज ही गोष्ट शक्य नसते हें निराळें सांगणें नको.

स्वामी रामतीर्थ, विवेकानंद यांचें हेंच म्हणणें असून त्यांनीं तें सिद्धही केलें आहे. आणि त्यांच्या श्रमाचें फल आज प्रत्यक्ष पहाण्यास मिळत आहे. आत्म्याचें अमरत्व ही गोष्ट हिंदूंच्या हाडींमाशीं इतकी खिळ्यामुळेंच त्यांस तत्त्वज्ञान म्हणजे तळहातावरील मळ वाटतो. प्राचीन काळीं ग्रीक व रोम शहरांमधील पंडितांस ही गोष्ट सर्वस्वीं मान्य नव्हती. साक्रेटीस प्लेटो यांना शेवटीं नाइलाजानें ती गोष्ट मान्य करावी लागली; परंतु याच्या उलट स्थिति हिंदुस्थानांत पहावयास मिळेल. चंद्रमौळी खोपटामध्यें राहणारा कुणबी, स्वयंपाकगृहांतील कामगिरी बजावून धर्माचरणाची सिद्धता करण्याकरितां वातींचे ढीगच्याढीग पाडणाऱ्या व पुराण श्रवण करणाऱ्या विधवा, संसाराची दगदग पार पाडतां पाडतां मेटाकुटीस आलेला व जीवनयात्रेचा अर्धाअधिक पल्ला गांठल्यानें आध्यात्मिक विचारांचें डोकावणें ज्याच्या पलित डोक्यामध्यें सुरू झालें आहे व कधीं कधीं अशाच बुद्धीनें कथा-पुराणाचा ओझरता परामर्ष घेणारा वयातीत गृहस्थ अशा प्रकारच्या संसाराच्या सर्व स्थितींतील हिंदी माणसांना आत्म्याच्या अमरत्वाबद्दल कोणतेंही आश्चर्य वाटणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर इतरही वेदान्तांतील तत्त्वें तीं भराभर म्हणूं लागतील अशी वेदान्ताची हिंदुस्थानांत स्थिति आहे; आणि याच कारणानें अर्ध्या अधिक जगांतील लोकसंख्येवर आर्यतत्त्वज्ञानाचा पगडा बसला आहे व बाकीच्या लोकांना कमी अधिक प्रमाणांत याची गोडी लागली आहे.

इतका दीर्घ व्यासंग ज्या लोकांचा होता व ज्यांना तत्त्वज्ञान म्हणजे जीवनाचा एक भाग आहे असेंच वाटत होतें अशा हिंदूंना जगाच्या गुरुत्वाचा मान मिळावा हें साहाजिक आहे. प्राचीन ग्रीक व इजिप्सियन लोक हिंदुस्थानांत येऊन अभ्यास करून परत जात आणि ग्रीक तत्त्वज्ञान म्हणजे आर्यतत्त्वज्ञानाच्या कांहीं भागांचें प्रतिबिंबच आहे असें पौर्वात्य भाषाकोविदांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. काउंट जॉनस्टन, कोलब्रूक वगैरे पंडितांनीं ही गोष्ट सिद्ध करून आर्यतत्त्वज्ञानाचा संचार युरोपांत कसकसा होत गेला व पाश्चात्य तत्त्वज्ञान म्हणजे आर्यतत्त्वज्ञानाचें अपत्य आहे हे मोठ्या खुबीदार व खात्रीलायक प्रमाणांनीं आपल्या ग्रंथांत विशद करून ठेवलें आहे.

आर्यावर्तांतील तत्त्वज्ञानास जगद्गुरुत्वाचा मान सर्व देशांतील पंडितांनी मोठ्या आनंदानें दिला आहे. पतिपत्नी, जनन्यपत्य ह्या जोड्या जशा आपण व्यवहारांत

पाहतों, तशीच गुरुशिष्यांचीही जोडी मानण्याचा प्रघात आहे. शिष्याविना गुरूचें महत्त्व फोल होय. संपत्ति जरी पुष्कळ असली, तरी सुवर्णालंकारांनीं शरीर जर सुशोभित केलें नाहीं, ऐहिक सुखोपभोग मर्यादेंत अनुभविले नाहींत अथवा दानधर्मानें तिचा सव्यय केला नाहीं, तर जमिनीच्या पोटांत अशोधित अवस्थेंत ती असली काय व लांकडी भिंतीच्या अंधार कोठडींत ठेविली काय सारखीच ! उपभोग, सद्व्यय, दान इत्यादि प्रकारांनीं संपत्तीच्या अस्तित्वास उजळा येऊन तिचें तेज जसें वाढीस लागतें त्याचप्रमाणें ज्ञानसंपत्तीचें दानक्रिया, अध्यापन इत्यादि प्रकारानें प्रदर्शन झालें पाहिजे. केवळ मनाच्या पेटींत ठेवून उपयोग काय ? अध्यापनानें तिचें सौंदर्य, महत्त्व व खानदानीपणा सर्व जगाच्या दृष्टीस पडला पाहिजे. आर्यांच्या तत्त्वज्ञानानें जो जगभर संचार केला तो उत्तमोत्तम शिष्यांच्या वळावर केला. सर्व जगाचें विद्यापीठ प्राचीनकालीं आर्यावर्त होतें. याच विद्यापीठांतून ग्रीक आद्य तत्त्ववेत्ता पायथागोरस तत्त्वज्ञान शिकून गेला व त्यानें तें मायभाषेंतून सर्व पाश्चात्य जगास शिकविलें पायथागोरसनें हिंदुस्थानांत येऊन आर्यतत्त्वज्ञानाचा अभ्यास केला व पुनर्जन्मवाद शिकून तो स्वदेशीं गेला. डॉ. एनफिल्डच्या मतें पायथागोरस, ॲनाक्झारकस, पायर्‍हो इत्यादि तत्त्ववेत्ते हिंदुस्थानांतूनच शिकून गेले. या मतास डॉ. एनफिल्डखेरीज इतरही विद्वानांचें पाठबळ आहे. स्वीडनमधील काउंट, पोकॉक, श्लेजेल, प्रिन्सेप, सर मोनियर विल्यम्स, अलेक्झांडर पोलिस्टर, वॉर्ड इत्यादि बडीं बडीं धेंडें या गोष्टीबद्दल स्पष्ट कबूली देत आहेत; तेव्हां यापुढें आणखी जास्त पुरावा देण्याचें कारणच दिसत नाहीं. पायथॉगोरिझम, मिथ्राइक इत्यादि नास्तिक वादाचे जे प्रकार आपण पाश्चात्य देशांत पाहतों, ते सर्व गौतमाच्या उपदेशापासून निघालेले आहेत. कारण पायथागोरस, पायर्‍हो, गौतम हे सर्व समकालीन होते असें वार्ड, प्रिन्सेप यांचें म्हणणें आहे. व हें जर खरें तर गौतमासारख्या जगत्श्रेष्ठ धर्मसंस्थापकाची तत्कालीन पाश्चात्य तत्त्वज्ञांन्यावर छाप पडली व त्यांनीं गौतमाचें अनुकरण केलें या गोष्टी अशक्य आहेत असें मानण्याचें कोणासच कारण नाहीं. प्राचीन ग्रीक लोक आर्यतत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठीं इकडे येत असत हें वरील विवेचनावरून स्पष्ट होत आहे. आतां ते कोणत्या मार्गानें येत असत व ग्रीक लोकांशिवाय इतर कोणकोणते लोक आर्यलोकांशीं कोणकोणत्या बाबतींत दळणवळण ठेवीत हें आपण पाहूं. प्रोफेसर विल्सन म्हणतो कीं " ख्रिस्ती धर्माच्या उदयकालीं तांबड्या समुद्राच्या मार्गानें युरोप व हिंदुस्थान यांचें

दळणवळण चालू होतें व ज्ञानसंपत्ति आणि व्यापाराचे सर्व जिन्नस हे हिंदुस्थानांतून अलेक्झांड्रिया येथें आणले जात." डेव्हिसच्या मतें "स्किथीॲनस या नांवाचा मनुष्य हिंदुस्थानाशीं व्यापार करीत असे. तो ख्रिस्तांच्या वारा प्रमुख शिष्यांशीं समकालीन होता. व्यापार करीत असतांना त्यानें तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला व जेव्हां जेव्हां तो हिंदुस्थानांत येई, तेव्हां तेव्हां येथील तत्त्वज्ञानाचाही पाठ घेऊन परत जात असे. असा क्रम चालू असतां त्याचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास बराच वाढला. त्यानें एक चार भागांचें पुस्तक रचलें, त्यावरून पुढें मनिचीच्या मतांचा प्रादुर्भाव झाला, असा एपिफॅरियस, युसेनियस, एपिफॅनियस व सिरिल यांचा त्याजवर मोठा आरोप आहे.

याच वेळीं ॲमोनियस् सॅकस् यानें अलेक्झांड्रिया येथें प्लेटोचें नूतनानुयायि मंडळ स्थापलें. या दोघांवरही तत्कालीन समाजाच्या कल्पनेप्रमाणें चेटकीपणा, भोंदूपणा, कापट्य असे नानाप्रकारचे आरोप आले. कारण कीं, समाजांत रूढ असलेल्या तत्त्वज्ञानाच्या प्रदेशांत न वावरतां हे नवीन तत्त्वें प्रसृत करूं लागले. त्या काळीं परमतासहिष्णुता फार प्रबल असल्यानें त्यांचेवर असे आरोप आले यांत कांहीं नवल नाहीं. मात्र आपणांस वरील मुद्याच्या दृष्टीनें एवढेंच पाहावयाचें कीं, हीं नवीन मतें त्यांचीं स्वतःचीं नसून हिंदुस्थानांतील दळणवळणाचा तो परिणाम होता; व तीं आपण हिंदुस्थानापासून शिकलों ही गोष्ट त्या तत्त्ववेत्त्यांनीं सुद्धां आपल्या ग्रंथांतरीं नमूद करून ठेविली आहे. असा हा प्रत्यक्ष पुरावा सांपडल्यानें युरोप व हिंदुस्थान यांच्या दरम्यान दळणवळण चालू होतें कीं नाहीं हा संशयच रहात नाहीं; त्याचप्रमाणें खऱ्या तत्त्वज्ञानाचा उदय कोठें झाला याबद्दल वादहि रहात नाहीं. आत्मा अविनाशी व अनंत असून जीव विनाशी व क्षणभंगुर आहे; परमेश्वर अंशरूपानें प्रत्येक प्राणिमात्रांत वास्तव्य करितो, अशा प्रकारची आर्यांच्या तत्त्वज्ञानाची रूपरेखा आहे.

खरोखर मानवी मनाच्या वाढीच्या इतिहासांत हे वेदना-विचार अगदीं क्रांतिकारकच समजले पाहिजेत व ह्यांच्या उत्पादकाचें नांव प्रत्येकास अत्यंत प्रिय व ईश्वरनामतुल्य वाटावें यांत काय आश्चर्य ? प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयांत वास करणाऱ्या परमेश्वरी अंशास ब्रह्म असें मानावें, हा शोध प्रथम शांडिल्य मुनीनें लावला. याच ब्रह्माचें वर्णन, विवेचन व उद्घाटन उपनिषदांत केलेलें आहे. गोल्डस्टकरच्या मतें उपनिषदांशिवाय त्यांच्याच तोडीचे संस्कृत ग्रंथ असंख्य होते; परंतु कालौघामध्यें

ते गडप होऊन गेल्यामुळें मनुष्यजातीची फार हानि झालेली आहे. याच नष्ट झालेल्या ग्रंथांच्या आधारें हल्लींचीं षड्दर्शनें तयार केलेलीं आहेत. यांशिवाय निरीश्वरवादी, अज्ञेयवादी जैन व बुद्ध मतप्रतिपादक असंख्य ग्रंथ आज हयात आहेत; परंतु आपण षड्दर्शनाकडेच प्रथम वळूं. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्व व उत्तरमीमांसा हीं त्या दर्शनांचीं नांवें होत.

न्यायदर्शन.

या दर्शनाचा कर्ता गौतम हा आहे व याच्या मतें पदार्थमात्राचें सत्य व यथार्थज्ञान होणें हाच मुक्तीचा खरा मार्ग आहे. पदार्थांचे खालीं दिल्याप्रमाणें त्यानें भाग पाडिले आहेत.

(१) प्रमाण (२) प्रमेय (३) संशय (४) प्रयोजन (५) दृष्टान्त (६) सिद्धान्त (७) अवयव (८) तर्क (९) निर्णय (१०) वाद (११) जल्प (१२) वितंड (१३) हेत्वाभास (१४) छल (१५ जाति (१६) निग्रहस्थान. वरील पृथक्करणानंतर प्रमेय, प्रमाण, त्यांच्या भिन्न भिन्न जाति आणि आत्मा, शरीर, मन, इंद्रियें इत्यादि गोष्टींचा त्यानें विचार केला आहे. यानंतर शरीर व आत्मा यांच्या मधील व्यापार मनातर्फे होत असतात; आत्म्यास पुनर्जन्म घ्यावा लागतो; परमेश्वर सर्वसाक्षी व सर्वज्ञानी असून तो अनंत जीवांपासून अगदीं भिन्न आहे; वेद हे प्रत्यक्ष परमेश्वरी आदेश आहेत व त्यांच्या शिकवणीप्रमाणें मनुष्यमात्रास वागलें पाहिजे; अविनाशी परमाणूंचें जगत् बनलेलें आहे इत्यादि सिद्धान्त त्यानें आपल्या ग्रंथांत स्पष्टपणें सोडवून दाखविले आहेत. सरतेशेवटीं नास्तिक मताचें खंडण करून परमेश्वरावर आपण विश्वास कां ठेवला पाहिजे याचें विवेचन केलें आहे. या दर्शनाचा संपूर्ण अभ्यास न करणारास असें वाटेल कीं, अनेक तर्कपद्धतींपैकीं ही एक होय. परंतु असें मानणें चुकीचें होईल. कारण न्यायदर्शनपद्धति ही एक वेदान्त-तत्त्वज्ञानाची स्वतंत्र व संपूर्ण शाखाच आहे. हीमध्यें बुद्धि, स्पष्ट ध्वनि, जाति, नानाविधपणा, व्यक्तित्व इत्यादि गोष्टींचें व्याख्यान फारच बहारीचें व अधिकारयुक्त. वाणीनें केलेलें आढळेल. व यांत कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, त्या युरोपियन पंडितांच्या अद्यापि लक्षांतही आल्या नाहींत. मॅनिंगबाई म्हणते कीं, " तर्कगम्य मानवी मनांतील अत्यंत गूढ प्रश्न गौतमानें साध्या व्यावहारिक भाषेनें सोडविलेले

पाहिलें म्हणजे त्याच्या अफाट बुद्धिसामर्थ्याचें कौतुक करावें तेवढें थोडेंच असें वाटतें." शास्त्रीय परिभाषेचें व शब्दांचें प्रथमतः योग्य वर्गीकरण करून त्याच्या पायावर विवेचनरूपी वरील इमारत उठवलेली आहे. असें युरोपांतील तर्कशास्त्राच्या अभ्यासावरून मत बनणें स्वाभाविक आहे; परंतु न्यायदर्शनांतील विवेचनपद्धति अगदीं स्वाभाविक व स्फूर्तिजन्य आहे. त्याचा प्रथम अभ्यास करून नंतर त्यांतील परिभाषेचें व शब्दांचें पृथक्करण करणें जरूर वाटल्यास करावें; नाहीपेक्षां त्याची मुळींच गरज नाहीं. मासल्याकरितां एक उदाहरण घेऊं. 'राजलोक मर्त्यजीवांच्या वर्गांतील असल्यानें ते सुद्धां मर्त्यच आहेत.' हा सिद्धांत युरोपियन व आर्यतत्त्वज्ञान या दोहोंस सारखाच संमत आहे; कारण मर्त्यपणा व मनुष्यपण हे दोन धर्म दोघांनाही सारखेच मान्य असल्यानें वरील सिद्धांत कोणासच खोटा म्हणतां येणार नाहीं. परंतु त्याची मांडणी करतांना युरोपियन तर्कशास्त्र म्हणेल कीं, 'सर्व लोक मर्त्य आहेत' व हिंदु तर्कशास्त्र म्हणेल कीं, 'जेथें मनुष्यत्व हा धर्म आहे, तेथें मर्त्यपणा हा असलाच पाहिजे.' दोघांचाही युक्तिवाद जरी एकच असला तरी हिंदूंची पद्धत जास्त सोपी व परिणामकारक आहे असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. ग्लेजेल म्हणतो कीं, गौतमाचें न्यायदर्शन कल्पनावादाचेंच एक स्वरूप असून त्यावें प्रतिपादन फारच सोपें व तर्कानुगामी असें आहे. ग्रीक लोकांस ही कला केव्हांच अवगत झाली नव्हती. त्याचप्रमाणें मॅक्समुल्लर व एलफिन्स्टन म्हणतात कीं, आधुनिक कालानें गौतमापेक्षां अजून कांहीं जास्त शोधून काढलें नाहीं; व ग्रंथसंख्येच्या दृष्टीनें पाहिलें तर ब्राह्मणांनीं या शास्त्रावर असंख्य ग्रंथ तयार केले होते असें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

वैशेषिक.

न्यायदर्शन व वैशेषिक दर्शन या दोघांमध्ये कोणताही तात्त्विक फरक नसून तीं एकमेकांचीं पूरकच आहेत असें म्हटल्यास चालेल. न्यायदर्शनाचा विशेष विस्तार वैशेषिक दर्शनांत केलेला आढळतो. या दोन दर्शनांचा समावेश मनःशास्त्रांत होतो. वैशेषिक दर्शनाचा कर्ता कणाद आहे. विश्वामधील सर्व वस्तूंचें सात प्रकारें वर्गीकरण कणादानें केलें आहे. ते सात प्रकार असेः—(१) द्रव्य (२) गुण (३) कर्म (४) सामान्य (५) विशेष (६) समवाय व (७) अभाव

कणादाच्या ग्रंथाचे दहा भाग आहेत न्यायदर्शनांत पदार्थमात्राचे १६ प्रकार

ते गडप होऊन गेल्यामुळें मनुष्यजातीची फार हानि झालेली आहे. याच नष्ट झालेल्या ग्रंथांच्या आधारें हल्लींचीं षड्दर्शनें तयार केलेलीं आहेत. यांशिवाय निरीश्वरवादी, अज्ञेयवादी जैन व बुद्ध मतप्रतिपादक असंख्य ग्रंथ आज हयात आहेत; परंतु आपण षड्दर्शनाकडेच प्रथम वळूं. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्व व उत्तरमीमांसा हीं त्या दर्शनांचीं नांवें होत.

न्यायदर्शन.

या दर्शनाचा कर्ता गौतम हा आहे व याच्या मतें पदार्थमात्राचें सत्य व यथार्थज्ञान होणें हाच मुक्तीचा खरा मार्ग आहे. पदार्थांचे खालीं दिल्याप्रमाणें त्यानें भाग पाडिले आहेत.

(१) प्रमाण (२) प्रमेय (३) संशय (४) प्रयोजन (५) दृष्टान्त (६) सिद्धान्त (७) अवयव (८) तर्क (९) निर्णय (१०) वाद (११) जल्प (१२) वितंड (१३) हेत्वाभास (१४) छल (१५ जाति (१६) निग्रहस्थान. वरील पृथक्करणानंतर प्रमेय, प्रमाण, त्यांच्या भिन्न भिन्न जाति आणि आत्मा, शरीर, मन, इंद्रियें इत्यादि गोष्टींचा त्यानें विचार केला आहे. यानंतर शरीर व आत्मा यांच्या मधील व्यापार मनातर्फे होत असतात; आत्म्यास पुनर्जन्म द्यावा लागतो; परमेश्वर सर्वसाक्षी व सर्वज्ञानी असून तो अनंत जीवांपासून अगदीं भिन्न आहे; वेद हे प्रत्यक्ष परमेश्वरी आदेश आहेत व त्यांच्या शिकवणीप्रमाणें मनुष्यमात्रास वागलें पाहिजे; अविनाशी परमाणूंचें जगत् बनलेलें आहे इत्यादि सिद्धान्त त्यानें आपल्या ग्रंथांत स्पष्टपणें सोडवून दाखविले आहेत. सरतेशेवटीं नास्तिक मताचें खंडण करून परमेश्वरावर आपण विश्वास कां ठेवला पाहिजे याचें विवेचन केलें आहे. या दर्शनाचा संपूर्ण अभ्यास न करणारास असें वाटेल कीं, अनेक तर्कपद्धतींपैकीं ही एक होय. परंतु असें मानणें चुकीचें होईल. कारण न्यायदर्शनपद्धति ही एक वेदान्ततत्त्वज्ञानाची स्वतंत्र व संपूर्ण शाखाच आहे. हीमध्यें बुद्धि, स्पष्ट ध्वनि, जाति, नानाविधपणा, व्यक्तित्व इत्यादि गोष्टींचें व्याख्यान फारच बहारीचें व अधिकारयुक्त. वाणीनें केलेलें आढळेल. व यांत कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, त्या युरोपियन पंडितांच्या अद्यापि लक्षांतही आल्या नाहींत. मॅनिंगबाई म्हणते कीं, " तर्कगम्य मानवी मनांतील अत्यंत गूढ प्रश्न गौतमानें साध्या व्यावहारिक भाषेनें सोडविलेले

पाहिलें म्हणजे त्याच्या अफाट बुद्धिसामर्थ्याचें कौतुक करावें तेवढें थोडेंच असें वाटतें.'' शास्त्रीय परिभाषेचे व शब्दांचें प्रथमतः योग्य वर्गीकरण करून त्याच्या पायावर विवेचनरूपी वरील इमारत उठवलेली आहे. असें युरोपांतील तर्कशास्त्राच्या अभ्यासावरून मत बनणें स्वाभाविक आहे; परंतु न्यायदर्शनांतील विवेचनपद्धति अगदीं स्वाभाविक व स्फूर्तिजन्य आहे. ह्याचा प्रथम अभ्यास करून नंतर त्यांतील परिभाषेचें व शब्दांचें पृथक्करण करणें जरूर वाटल्यास करावें; नाहींपेक्षां त्याची मुळींच गरज नाहीं. पासल्याकरितां एक उदाहरण घेऊं. 'राजलोक मर्त्यजीवांच्या वर्गांतील असल्यानें ते सुद्धां मर्त्यच आहेत.' हा सिद्धांत युरोपियन व आर्यतत्त्वज्ञान या दोहोंस सारखाच संमत आहे; कारण मर्त्यपणा व मनुष्यपण हे दोन धर्म दोघांनाही सारखेच मान्य असल्यानें वरील सिद्धांत कोणासच खोटा म्हणतां येणार नाहीं. परंतु त्याची मांडणी करतांना युरोपियन तर्कशास्त्र म्हणेल कीं, 'सर्व लोक मर्त्य आहेत' व हिंदु तर्कशास्त्र म्हणेल कीं, 'जेथें मनुष्यत्व हा धर्म आहे, तेथें मर्त्यपणा हा असलाच पाहिजे.' दोघांचाही युक्तिवाद जरी एकच असला तरी हिंदूंची पद्धत जास्त सोपी व परिणामकारक आहे असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. स्लेजेल म्हणतो कीं, गौतमाचें न्यायदर्शन कल्पनावादाचेंच एक स्वरूप असून त्याचें प्रतिपादन फारच सोपें व तर्कानुगामी असें आहे. ग्रीक लोकांस ही कला केव्हांच अवगत झाली नव्हती. त्याचप्रमाणें मॅक्समुल्लर व एलफिन्स्टन म्हणतात कीं, आधुनिक कालानें गौतमापेक्षां अजून कांहीं जास्त शोधून काढलें नाहीं: व ग्रंथसंख्येच्या दृष्टीनें पाहिलें तर ब्राह्मणांनीं या शास्त्रावर असंख्य ग्रंथ तयार केले होते असें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

वैशेषिक.

न्यायदर्शन व वैशेषिक दर्शन या दोघांमध्यें कोणताही तात्त्विक फरक नसून तीं एकमेकांचीं पूरकच आहेत असें म्हटल्यास चालेल. न्यायदर्शनाचा विशेष विस्तार वैशेषिक दर्शनांत केलेला आढळतो. या दोन दर्शनांचा समावेश मनःशास्त्रांत होतो. वैशेषिक दर्शनाचा कर्ता कणाद आहे. विश्वामधील सर्व वस्तूंचें सात प्रकारें वर्गीकरण कणादानें केलें आहे. ते सात प्रकार असेः—(१) द्रव्य (२) गुण (३) कर्म (४) सामान्य (५) विशेष (६) समवाय व (७) अभाव

कणादाच्या ग्रंथाचे दहा भाग आहेत न्यायदर्शनांत पदार्थमात्राचे १६ प्रकार

दिले आहेत. ते ६ पाहिजेत असें पहिल्या भागांत प्रतिपादन केले असून अभाव जो सातवा प्रकार त्यानें नवीन सांगितला, त्याचें विवेचनही दिलें आहे. कणादापूर्वी पदार्थांचे सहा प्रकार मानले जात होते. त्यांत कणादानें सातव्याची भर टाकली. आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत द्रव्य, तिसऱ्यांत आत्मा व अंतःकरण, चवथ्यांत व पांचव्यांत बाह्य सृष्टीचा मानवी शरीरावर घडणारा परिणाम, सहाव्यांत वैदिक धर्माचें मंडण, सातव्यांत गुण व समवाय, त्यांचे धर्म, जाति व परिपाक, आठव्यांत पारमार्थिक ज्ञान, नवव्यांत बुद्धि व विशेष आणि दहाव्यांत आत्मा व त्याचे गुण याप्रकारें अनुक्रमें विषयांचें विवेचन केलेलें आहे. न्याय व वैशेषिक या दोन दर्शनांमध्यें फरक नाहीं असें मागें सांगितलें; परंतु विचारसरणींत जो दोन ठिकाणां फरक आहे तो असाः—

(१) न्यायदर्शन विश्वांतील वस्तूंचे १६ भाग पाडतं तर वैशेषिकांत फक्त सातच आहेत. (२) न्यायदर्शनांत प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द अशीं चार प्रमाणें सांगितलीं असून, वैशेषिक दर्शनास प्रत्यक्ष व अनुमान एवढीं दोनच मान्य आहेत. यापेक्षां या दोन दर्शनांमध्यें आणखी फरक नाहीं.

भाषापरिच्छेदाच्या प्रस्तावनेत डॉ. रुअर म्हणतो कीं, कणादाचें परमाणुतत्त्व ग्रीक तत्त्वज्ञानापेक्षां फारच उच्चदर्जाचें आहे. आणि मॅनिंगवाईच्या मतें वैशेषिक दर्शनाची विचारसरणी अतींद्रिय शास्त्रापेक्षां जडशास्त्राकडे ज्यास्त झुकलेली दिसते. आधुनिक युरोपांतील विज्ञानदृष्टीनें पाहिलें असतां ध्वनिशास्त्राचा प्राचीन आर्यावर्तांत जो विचार झाला तो योग्य असून सांप्रत प्राप्त असलेल्या उपकरणसामुग्रीच्या अभावी त्यांना हें कार्य त्या वेळीं कसें करतां आलें याबद्दल मन बुचकळ्यांत पडतें व त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल राहून राहून आश्चर्य वाटतें. भाषापरिच्छेदाचा कर्ता विश्वनाथ हा स्पष्ट व अस्पष्ट ध्वनि यांचें योग्य स्पष्टीकरण करून असें म्हणतो कीं, कांहींच्या मतें ध्वनि म्हणजे एक प्रकारची हवेंत उत्पन्न होणारी तरंगपरंपरा आहे व दुसऱ्यांच्या मतें ध्वनि हा कदंबकलिकेप्रमाणें आहे. याच मतसांप्रदायाचा दुसरा एक सिद्धान्त तर्कसंग्रहांत दिलेला आहे तो असाः—आकाश अनंत व सर्वव्यापी असून त्यांत ध्वनीचा धर्म आहे. आतां वर दिलेले ध्वनिसंबंधींचे दोन सिद्धांत आधुनिक जडशास्त्राच्या निष्कर्षावर लावून पाहिले असतां कोणत्याही प्रकारें ठिकस ठरत नाहींत. यावरून त्या काळीं आर्यांच्या चौकस व जिज्ञासू बुद्धीच्या

किती विकास झाला होता याचा कोणालाही तर्क बांधतां येईल. आर्य रसायनशास्त्राच्या इतिहासकर्त्यानें असें म्हटलें आहे कीं, " कणादाच्या ध्वनिसिद्धांताने सर्वांस सादर विस्मय वाटल्यावांचून रहाणार नाहीं. उष्णता व प्रकाश हीं एकाच मूल पदार्थाचीं दोन भिन्न दृश्य स्वरूपें आहेत. ह्या त्याच्या शोधाबद्दल तितकाच आदर व विस्मय प्रत्येकाचे हृदयांत उत्पन्न होईल. सांख्यदर्शनाचा कर्ता कपिल. यानें कणादाच्या कांहीं सिद्धांतांचें त्याच्या पूर्वीच कथन केलें आहे. "

न्याय व वैशेषिक या दोन्ही दर्शनांस अनुमानाचे पांच प्रकार मान्य आहेत. ते असे:—(१) प्रतिज्ञा (२) हेतु (३) उदाहरण (४) उपनय व (५) निगमन.

उदाहरणार्थः—(१) वन्हिमान् पर्वतः
(२) यतः स धूमवान्
(३) यत्र यत्र धूमस्तत्र तत्र वन्हिः
(४) अयं धूमवान्
(५) तस्मात् उक्तपूर्वेण प्रकारेण अयं वन्हिमान्

पंचप्रमाणात्मक अनुमानपद्धतीवर अपुरेपणां व व्याप्त्येची सदोषता असे दोन आरोप केले जातात; परंतु त्यांत विशेष अर्थ नाहीं. कारण नैय्यायिकांच्या मतांचा निष्कर्ष या पंचप्रमाणात्मक अनुमानपद्धतींत आला आहे. या अनुमानपद्धतीचा ते फार अवलंब करतात. कारण तर्कशास्त्र व वक्तृत्वशास्त्र हीं एकमेकांचीं सहाय्यक आहेत. चिकित्सापूर्वक जें तत्त्व शोधून काढलेलें असतें तें लोकांस पटवून देण्याकरितां-त्याची सत्यता सिद्ध करण्याकरितां-वक्तृत्वाचें अंग असणें अवश्य आहे व त्याचकरितां न्यायशास्त्राबरोबर वक्तृत्वशास्त्राचा वाढ आर्य व ग्रीक तत्त्वज्ञानांत झालेली आपणास पहावयास मिळते. प्रथम गौतमानें आपल न्यायदर्शन द्विप्रमाणात्मक अनुमानपद्धतीनेंच मांडलें होतें; परंतु जेव्हां त्यास असें आढळून आलें कीं, याचा व्हावा तसा परिणाम होत नाहीं; तेव्हां त्यानें आणखी दोन प्रकार त्यांत घातले, व शेवटीं जो सिद्धांत कथन केला तो पांचवा प्रकार. अशा रीतीन हल्लींची पंचप्रमाणात्मक अनुमानपद्धति बनली आहे. आर्य व ग्रीक अनुमानपद्धतींत जो फरक आहे तो दोघांच्या मनोरचनेचा आहे. ग्रीक लोकांची दृष्टि फक्त वादच जिंकण्याकडे होती; परंतु हिंदूंची दृष्टि वादापेक्षां प्रतिपक्षाचें पूर्ण समाधान करणे ह्या गोष्टीकडे विशेष असल्यानें त्यांनीं ही पद्धति उपयोगांत आणली, असें हिचें समर्थन डॉ. बॅलंटाईन व मॅनिंगबाई यांनीं केलें आहे.

सांख्यदर्शन.

ख्य शब्द सम् व ख्या या दोन शब्दांपासून झालेला आहे; व त्यावरून संयोगात्मक तर्कशास्त्राचा बोध होतो. हा तत्त्वज्ञानपंथ अत्यंत जुना असून त्याचा संस्थापक कपिलमुनी आहे. याच्या मतें विश्वांत मूलतत्त्वें २४ असून २५ व्याला पुरुष अथवा आत्मा म्हणतात. ही पदार्थसंख्या कपिलांनीं निश्चित केली यामुळेंच त्यांच्या पंथास हें नांव प्राप्त झालें असलें पाहिजे. या २४ तत्त्वांतील प्रकृति हें जगाचें आदिकारण आहे. पुरुष व प्रकृति असे जगतांत दोन पदार्थ आहेत असें कपिलांचें तत्त्व असून येथूनच सांख्यांचा व वेदान्ताचा विरोध सुरू झाला. प्रकृति जड असून तींत उत्पतीचें सामर्थ्य नाहीं. मुळांत ती अक्रिय व चेतनारहित आहे. फक्त पुरुषाच्या सांनिध्यानें लोहचुंबक न्यायानें तिच्यांत चेतना व कार्यक्षमत्व उत्पन्न होतें. दुसरें विरोधाचें कारण असें कीं, जीवात्मा हा देहापासून भिन्न असून अणुपरिमाण आहे. हे जीवात्मे असंख्य असून अमर आहेत; प्रत्येक जीवात्मा भिन्न आहे, आणि एका शरिरांतून दुसऱ्या शरिरांत जाणारा आहे. पुरुष हा ईश्वर आहे असें त्यांनीं कोठे म्हटलें नाहीं. या विचारसरणीनें कपिलाची गणना गौतम, कणाद, बुद्ध अशांसारख्या निरीश्वरवादी लोकांमध्यें झाली, आस्तिकवादी म्हणतात कीं, आत्मा भिन्न नसून सर्व ठिकाणीं अदृश्यपणें भरलेला आहे. हें अद्वैत वेदान्ताचें मुख्य तत्त्व आहे. अर्थात् याच ठिकाणीं सांख्यांचा विरोध आहे; परंतु एका दृष्टीनें त्यांना निरीश्वरवादी असें जरी म्हटलें तरी वास्तवीकरित्या ते सर्वेश्वरवादी होते. योगसूत्रकार पतंजली हा पक्का सर्वेश्वरवादी असून त्यानें आपलें योगशास्त्र सर्वत्र सांख्यमताच्या पुष्टीस अर्पण केलेलें दिसतें. अत्यंत प्राचीन कालीं सुद्धां सांख्य व योग यांची अभिन्नता वर्णिलेली आहे, व तिचाच अनुवाद सौतीनें महाभारतांत केला आहे. तेव्हां अशा पुरुषास निरीश्वरवादी म्हणण्यापेक्षां सर्वेश्वरवादी मानणें हेंच अधिक युक्त आहे. निरनिराळ्या मतांचा इतिहास पाहून त्यावरून हें ठरविणें जास्त चांगलें. येथें फक्त निरनिराळ्या दर्शनांचा त्रुटित गोषवारा आम्हांस द्यावयाचा आहे सबब वरील अवघड वादांत आम्ही शिरत नाहीं.

न्याय व सांख्य यांमधील भेद.

न्यायदर्शनानें पुरुषाच्या ठिकाणीं निष्क्रियत्व आरोपित केलेलें नसून तो क्रियावान् आहे व कर्मफलभोगी आहे असें मानलें आहे; परंतु सांख्याच्या मतें पुरुष, सुखदुःखांहून भिन्न व अलिप्त मानला असून कर्म व कर्मफलाची त्यास मुळींच बाधा

होत नाहीं; कारण त्याचे ठिकाणीं त्यांनीं पूर्ण नैष्कर्म्य कल्पिलेलें आहे. पुरुष व प्रकृति यांचें जेव्हां सांनिध्य घडतें व लोहचुंबकाजवळ लोखंड आलें असतांना तें जसें हालचाल करूं लागतें त्याप्रमाणें प्रकृतीमध्यें पुरुषाच्या सहवासानें भावना व विचार उत्पन्न होतात परंतु मनुष्य अज्ञानानें पुरुषाच्या ठायीं भावनांचा व विचारांचा आरोप करितो व त्यास सुखदुःखांचा उपभोगी समजतो. सांख्याच्या मतें पुरुष प्रकृतीहून निराळा आहे सर्व क्रिया व सुखदुःखें. प्रकृतीच्या ठिकाणीं आहेत असें ज्ञान मनुष्याला झालें म्हणजे त्यास मोक्ष मिळतो, आणि हेंच अत्युच्च ज्ञान होय. सांख्याचें दुसरें मत असें आहे कीं, मुळांतच जें नाहीं त्यापासून अन्य वस्तू उत्पन्न होणें असंभाव्य आहे. जी वस्तू कोणत्याही स्वरूपांत अस्तित्वांत आहे तिला कांहीं तरी मूलाधार असलाच पाहिजे; त्याविना तिचें चालू अस्तित्वच संभवत नाहीं. गोल पदार्थ बनविण्याला ज्याचा तो बनविलेला असतो त्याचे ठिकाणीं गोलपणाचें बीज अत्यंत सूक्ष्म रूपानें वसत असतें. जरी जड दृष्टीस तें (बीज) भासमान होत नसलें तरी अदृश्य स्वरूपांत तें त्यामध्यें असतेंच.म्हणून त्यापासून दृश्य वस्तू उत्पन्न होते, व तत्समान आकार धारण करिते. न्यायाचा यास अगदीं विरोध आहे.

मिसेस मॅनिंग म्हणते कीं, " मानवी जीवनाच्या अत्यंत गूढ तत्त्वांचा उद्बोध करून ती सर्व जगास पटवून देण्यांत सांख्यांनीं जे परिश्रम केले ते केवळ बिनमोल आहेत. मनुष्य व त्याचप्रमाणें सर्व विश्वही विनाशी आहे. मनुष्याला वाटतें कीं, माझ्या ठिकाणीं फार मोठमोठे गुण व अनंत सामर्थ्य आहे; परंतु जेथें सर्व विश्वच विनाशी तेथें यःकश्चित् मनुष्याचा काय पाड ? फक्त परमात्माच सत्य असून अविनाशी व अनंत आहे. विश्वाचा विनाशीपणा सिद्ध करण्यांत व मानवी जीविताचा फोलपणा दाखविण्यांत सांख्याची चतुराई व कौशल्य कांहीं अपूर्वच दिसतें. ही गोष्ट त्यांच्या प्रतिपक्ष्यासही मान्य असून प्राचीन व अर्वाचीन सर्व पंडित याबद्दल त्यांजवर स्तुतीचा वर्षाव करित आहेत; परंतु पुरुषाचें अनंतत्व व चिरकालित्व सिद्ध करण्याचे कामीं सांख्यांनीं आपला हात आखडला असून बहुतेक मुग्धपणाच धरला आहे; आणि एकंदर विवेचनावरून असें वाटतें कीं, त्यांनीं जें लिहिलें आहे त्यापेक्षां त्यांचे ठिकाणीं पुष्कळच अधिक विचार शिल्लक होते. मग कारण कांहीं असो. कदाचित् त्यांचा निरीश्वरपणाच कारणीभूत असेल. "

सर हंटर म्हणतो कीं. " विश्वाची उत्पत्ति, व्यवस्थिति व उत्कर्ष यांचें जें

विस्तृत विवेचन सांख्यांनीं केलें आहे त्याचाच केवळ अनुवाद हल्लींच्या उत्क्रांतीवाद्यांनीं नवीन दृष्टीनें व नवीन भाषेनें केला आहे, व त्याच्यापेक्षां यांची कांहीं जास्त करामत आहे असें म्हणवत नाहीं

योगदर्शन.

परमात्मा व जीवात्मा यांचें स्वरूप कळण्यास, मानवी अंतःकरणांतील गूढतम गोष्टींचा थांग लागण्यास, आणि मनुष्यप्राण्यांच्या हृदयांत प्रामाणिक, यथार्थ व खरेखरे विचार काय आहेत यांचा बोध होण्यास योगशास्त्राखेरीज अन्य साधन नाहीं. अथवा दुसऱ्या तऱ्हेनें असें म्हणतां येईल कीं, अतींद्रियशास्त्र व मानसशास्त्र यांची उत्पत्ति व वाढ योगशास्त्राशिवाय होणें दुर्घटच आहे. पतंजलीनें आपल्या योगशास्त्रांत हेंच सिद्ध केलें आहे. त्याच्या ग्रंथाचे चार भाग आहेत. पहिल्या भागांत आत्म्याच्या स्वरूपाचें व योगाचें विवेचन केलेलें आहे. आणि योगाच्या आठ पायऱ्यांचें वर्णन दिलेलें आहे. त्या आठ पायऱ्या अशाः--

(१) यम (अ) अहिंसा, (आ) सत्यवचन, (इ) अस्तेय, (ई) ब्रह्मचर्य, (उ) दानाचा स्वीकार न करणें. (२) नियम (अ) शौच, (आ) इज्या, (इ) तपस् (ई) स्वाध्याय, (उ) उपस्थ-निग्रह. (३) शत आसनें. (४) प्राणायाम पूरक, रेचक, कुंभक (५) प्रत्याहार. (६) धारणा. (७) ध्यान. (८) समाधि.

याप्रकारें आठ पायऱ्या सांगून झाल्यानंतर समाधी व तिचे प्रकार यांचें वर्णन पहिल्या भागांत दिलेलें आहे. दुसऱ्या भागांत समाधी लावण्याची पद्धति सांगितलेली आहे. तिसऱ्या भागांत योगी मनुष्याला समाधीपासून केवढें अचाट सामर्थ्य प्राप्त होतें, समाधीपासून निरनिराळ्या स्थळी निरनिराळी शक्ति कशी प्राप्त होते, ध्यान व समाधि यांचे परस्पर संबंध, उदाहरणार्थ चंद्रलोकावरील योग्याचें सामर्थ्य गुरुलोकावरील योग्याच्या सामर्थ्यापेक्षां कसें निराळें असतें वगैरे व्याख्यान ह्या भागांत केलेलें आहे. शेवटीं चवथ्या भागांत मोक्षाचा विचार केलेला असून योग्याला भूतभविष्याचें ज्ञान, मृत्युकाल, दुसऱ्याच्या मनांतील विचार व अन्य प्राण्यांच्या ध्वनीचे ज्ञान कसें होतें याचा विचार केलेला आहे.

हिंदुस्थानांत योगी लोकांच्या अचाट, अतिमानुष अशा पराक्रमाच्या गोष्टी, त्यांचें अतींद्रिय ज्ञान, त्यांचें भविष्यकथनसामर्थ्य, त्यांनी समाधिस्थितींत झालेली प्रत्यक्ष

परमेश्वराची भेट व ब्रह्मसाक्षात्कार करवून देण्याची शक्ति इत्यादि प्रकार योगशब्दाबरोबर संबद्ध झालेले आहेत. हिंदुसमाजांत नुसत्या योगशब्दाला अर्थच नाहीं. जर कांहीं रूढ अर्थ असेल तर वर नमूद केलेल्या गोष्टीशीं तो संलग्न आहे. म्हणून हिंदु म्हणविणाराला त्याचें विशेष आश्चर्य वाटत नाहीं. पण जर याच्या उलट स्थिति असेल म्हणजे एकादा मनुष्य योगाची तालीम करित असेल, पतंजलीच्या आदेशाप्रमाणें वर्तत असेल, आणि जर योगानें प्राप्त होणारें सामर्थ्य मुळींच संपादन झालेलें नसेल तर मात्र आश्चर्य. कांहीं दिवस युरोपियनांना हें सर्व झूट, नजरबंद, गारुडीपणा, हातचलाखी, गौडबंगाल इत्यादिकांपैकीं कांहीं तरी असावें, खुळचट व भ्रमिष्ट लोकांचा हा खेळ आहे, शहाण्या मनुष्यानें इकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं असें वाटे. त्यांना योग म्हणजे शास्त्र होय असें वाटत नसे, हा सर्व भोळ्याभाबड्या लोकांच्या अज्ञानाचा परिणाम आहे असें ते समजत; परंतु पुढें युरोपियन पंडितांची व खऱ्या योगनिष्ठ पुरुषांची गांठ पडली व त्यांनीं त्यांचा गर्वपरिहार करून वेदान्तधर्माचें व हिंदु विद्येचें त्यांस यथार्थ स्वरूप दाखविलें. अशा प्रसंगांपैकीं एकदोहोंचें येथें वर्णन करूं म्हणजे खात्री होईल. अर्थात खालील उतारे युरोपियन लोकांनीं स्वानुभवानें लिहून ठेविले आहेत एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या खरेपणाविषयीं संशयच रहाणार नाहीं.

प्रो. विल्सन यानें लिहून ठेविलें आहे कीं, " एकदां एक ब्राह्मण हवेंत अधांतरी बसलेला आपण पाहिला. तशा स्थितींत तो एकदां बारा मिनिटें व दुसऱ्या खेपेस ४० मिनिटें असलेला दिसला. "

डॉ. मॅग्रेगॉर यानें शीखांचा इतिहास लिहिला आहे त्यांत खालील चमत्कारीक गोष्ट दिली आहे.

" १८३७ सालीं एका बगिच्यांत फारच विस्मयकारक गोष्ट घडली. एकदां एक फकीर लाहोर येथें आला व त्यानें जाहीर केलें कीं, अन्नपाण्याशिवाय वाटेल तितक्या दिवस लाकडी पेटींत कोंडून जमिनींत पुरून ठेविलें तरी आपणास कांहीं होणार नाहीं. प्रथमतः रणजितसिंग याचा या गोष्टीवर विश्वास बसेना, व म्हणून त्यानें ती गोष्ट प्रयोग करून खरी आहे कीं नाहीं हें पाहण्याचें ठरविलें. रणजितसिंगानें त्या फकिरास सांगितलें कीं, आपणास ही गोष्ट प्रत्यक्ष पहाणें आहे. लागलीच त्या फकिरानें त्याच्या म्हणण्यास होकार दिला. सर्व तयारी करण्यांत आल्यावर फकीर लाकडाच्या पेटींत

बसला, ती पेटी एका खोलींत पुरून टाकली व ज्या बागेच्या मध्यभागीं तीं खोली होतीं त्या बागेच्यासभोंवार कोट होता आणि दरवाज्यावर सशस्त्र पाहरा ठेविला होता. हेतु हा कीं, कोणीही कोणत्याही मिषानें आंत जाऊं नये; व त्या फकिराच्या अन्नपाणी व हवा मिळूं नये. बंदोबस्त अत्यंत कडक होता. अशा रीतीनें ४० दिवस व ४० रात्रीं निघून गेल्यावर स्वतः रणजितसिंगमहाराज, त्यांचा नातु, कांहीं सरदार, सेनापति वेंटम्, जमादार 'वाड' Wade व स्वतः मी इतकी मंडळी त्या फकिरास जमिनींतून वर काढून पेटींतून खुला केल्यावर तो जिवंत आहे कीं नाहीं हें पाहण्यास मुद्दाम गेलों होतों. त्यास बाहेर काढल्याबरोबर तो आमच्यापाशीं बोलूं लागला. तेव्हां आमचा आनंद गगनांत मावेना व आश्चर्यास तर पारावारच नव्हता. लागलीच तोफांचीं सरबत्ती देऊन गांवांत जिकडे तिकडे ही चमत्कारीक हकीगत जाहीर करण्यांत आली, व ठिकठिकाणीं आनंदोत्सव करण्यांत आले. महाराजांनीं त्यास लागलीच एक सोन्याची सांखळी देऊन त्याचा निरोप घेतला."

अशा प्रकारच्या गोष्टी हिंदुस्थानांत प्रत्यहीं घडत असतात. व त्या करून दाखविणारे योगी, संत, महंत ठिकठिकाणीं आहेत. फ्रायरला एका योगी पुरुषानें सूर्याकडे सारखी दृष्टि लावून ठेविली म्हणून आश्चर्य वाटलें. युरोपांत ही शक्ति अज्ञात असल्यानें त्यांस यावद्दल राहून राहून कौतुक वाटतें. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानांत ह्या गोष्टींचें कोणासच कांहीं वाटत नाहीं.

मीमांसा.

दर्शनांच्या शेवटल्या जोडीला मीमांसा असें म्हणतात. मीमांसेचे पूर्व व उत्तर असे दोन प्रकार आहेत. ते कालवाचक नसून क्रमवाचक आहेत. पूर्व मीमांसेंत ब्राह्मणग्रंथांत दिलेल्या कर्मकांडाचा विचार केलेला असून उत्तर मीमांसेंत परब्रह्माच्या स्वरूपाचा विचार केलेला आहे. अर्थात् या ज्ञानाला उपनिषदांचाच सर्वस्वी आधार आहे. किंबहुना ब्राह्मणग्रंथाच्या पाठीमागून उपनिषदग्रंथ तयार झाले असल्यानें व त्यांच्याच आधारें ही दर्शनें निर्माण झालीं असल्यानें त्यास हें नांव प्राप्त झालें.

पूर्व मीमांसेंत यज्ञयाग, अग्निहोत्र, दान इत्यादि क्रियांचें सविस्तर व सूक्ष्म वर्णन केलें आहे. या ग्रंथाचा कर्ता जैमिनी. यानें धर्म, अधर्म यांचा खल करून असें ठरविलें कीं, वेदाज्ञेप्रमाणें वागणें हाच खरा धर्म होय व त्यापासूनच सुखाची प्राप्ति आहे

उत्तर मीमांसेचा कर्ता प्रख्यात व्यास महर्षी हा होय. षड्दर्शनांपैकीं हें सर्वांत श्रेष्ठ असून यानें वेदान्तधर्माचा जोरानें पुरस्कार केला आहे. वेदान्तामध्यें परमात्मा व जीवात्मा यांच्या परस्परसंबंधाची चर्चा केलेली असते व ह्या पंथाचा उत्तर मीमांसा ग्रंथ प्रमाणभूत मानलेला आहे. ह्या ग्रंथामध्यें हिंदूंच्या असामान्य व लोकोत्तर बुद्धीचा जो विलास पहावयास मिळतो तसा इतरत्र कोठेंही आढळून येणार नाहीं. व्यासांनीं नास्तिक वादाचा पाडाव करून पुनश्च सर्वेश्वरवादाचें निशाण अध्यारोपित केलें आहे. आत्मज्ञानानेंच मुक्ति प्राप्त होणार आहे असा ब्रह्मसूत्रांचा मुख्य सिद्धांत आहे.

ब्रह्मसूत्रांविषयीं प्रो. मॅक्समुल्लर असें म्हणतो कीं, " प्रत्यक्ष प्राणापलीकडील गोष्टही दूर लोटण्याचें सामर्थ्य आलें पाहिजे म्हणजे मग दुसरी प्रियतम गोष्टच उरणार नाहीं. अशी जेव्हां मनाची तयारी होईल तेव्हां सर्व जीवात्म्यांचा ईश जो परमात्मा, त्याची भेट होईल. यमनियमयुक्त ज्ञानाची जेव्हां इतकी पराकाष्ठा होईल तेव्हां प्रत्यगात्मा व परमात्मा यांची एकरूपता होईल; परमात्म्यांत जीवात्म्याचें प्रतिबिंब दिसावयास लागेल, जीवशिवांचें ऐक्य होईल; जीवनस्थितीस शुद्धधर्माचा आदर्श, परमतत्त्वज्ञानाची प्रतिछाया व सत्यधर्माचें रहस्य यापैकीं कोणतेंही नांव शोभेल. " " याच मूळ कल्पनेचा विस्तृत उहापोह वेदान्तांत केला आहे; व ज्यानें वकलेचें तत्त्वज्ञान समजून घेऊन शिवाय उपनिषदें व ब्रह्मसूत्रें यांच्यांतील ज्ञान अधिगत केलें आहे त्यासच खात्रीपूर्वक असें सांगतां येईल कीं, उपनिषदें व ब्राह्मण यांतील तत्त्वज्ञानापुढें बर्कलेचें तत्त्वज्ञान अगदींच तुटपुंजें व खुरटें दिसतें. "

परमात्मा व जीवात्मा यांच्या संबंधाबद्दल मतैक्य कोठेंच दिसून येत नाहीं. रामानुजाचार्यांना ह्या दोघांमध्यें सेव्यसेवकांचा संबंध दिसतो. ते दोघे अगदीं स्वतंत्र असून जीवात्मे असंख्य आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. याच्या उलट शंकराचार्य म्हणतात कीं, परब्रह्म एकच असून त्याव्यतिरिक्त कांहीं नाहीं. डोळ्यांस जें दिसतें तें सत्य नसून भ्रामक आहे. व त्यास ते माया असें म्हणतात.

स्वामी दयानंदसरस्वती यांचें मत रामानुजाप्रमाणें आहे व परमात्मा व जीवात्मा यांचें ऐक्य कधींहि होणें शक्य नाहीं असें ते म्हणतात. परंतु लोकमतावर शंकराचार्यांच्या मताची विलक्षण छाप असून, सार्वत्रिक शंकराचार्यांच्या मताचाच अनुवाद केला जातो. हिंदु लोकांत सर्वेश्वरवादाचें प्राबल्य अतीशय असून आजता-

गायत मानवी बुद्धीनें तत्त्वज्ञानाचे जे निरनिराळे सांप्रदाय संस्थापित केले आहेत त्यापैकीं सर्वेश्वरवाद अतीशय श्रेष्ठ आहे.

सर वुइल्यम जोन्स म्हणतो कीं, "आचार्यभाष्यासारख्या सुंदर ग्रंथाचें एकाद्या युरोपियन भाषेंत संपूर्ण भाषांतर झाल्याशिवाय तत्त्वज्ञानाचा इतिहास पुरा होणार नाहीं. प्रत्यक्ष सरस्वतीस सुद्धां आचार्यभाष्याची महती गातांना शीण आल्याखेरीज रहाणार नाहीं."

जडसृष्टीचा विस्तार व तिचा अभेद्यपणा हे प्रकार प्रत्यक्ष दृष्टीस दिसत असतां ते नाकबूल करण्यांत काय हांशील ? परंतु वेदान्ताचें मुख्य तत्त्व असें आहे कीं, जरी हे प्रकार आपणास दिसले तरी ते खरे नव्हेत; दृष्टीच्या विकृत कार्याचा तो दोष आहे; त्याचें यथार्थ स्वरूप जसें दिसतें तसें नसून फार भिन्न आहे. मानवी दृष्टीचा हा भ्रम आहे. मानवी मनाच्या कल्पनेनें निर्मित केलेली ही सृष्टी आहे.

परब्रह्मज्ञानाच्या दृष्टीनें हें सर्व आभासरूप आहे. मनुष्याच्या कल्पना व्यक्त व दृश्य स्वरूपानें दिसूं लागल्या कीं, त्यास सृष्टि असें म्हणतात. सृष्टीचे बाह्य व नयनगोचर देखावे आणि तज्जन्य भावना ह्या आभासमूलक आहेत. जर यांतील आधारभूत चैतन्य क्षणभर आपलें कार्य बंद ठेवील तर त्याचा परिणाम दृश्यमान सृष्टीचा सर्वनाश हाच होईल. लौकिक समज दृश्य सृष्टि खरी मानण्याकडे असतो; तो दुरुस्त करून खरें रहस्य सांगणें हीच वेदान्ताची मुख्य कामगिरी आहे. एपिकारमस व प्लेटो यांचें हेंच मत असून सांप्रत याच मताची मोठ्या आवेशतेनें तरफदारी केली जाते; परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, त्याबद्दल आधुनीक लोकप्रिय लेखकांस आदर वाटत नाहीं. कदाचित् याचें कारण असें असूं शकेल कीं, आधुनीक पंडितांना ईश्वराचें सर्वसाक्षित्व, सौजन्य, सर्वज्ञता इत्यादि गुणांबद्दल खात्री नसेल; परंतु हिंदूंचें मत याच्या उलट असून ईश्वराच्या वरील गुणावर त्यांचा पूर्ण भरवंसा आहे, व अशा अव्यभिचारी भक्तीच्या पायावर त्यांनी वेदान्तशास्त्राची इमारत उभारली आहे." सर जेम्स मॅकिन्टॉश म्हणतो कीं, वेदान्त-तत्त्वांची कल्पना अतिशय विशुद्ध, सुंदर, खुबीदार, स्वाभावीक व स्वतंत्र आहे.

मीमांसा ग्रंथाच्या विवेचनपद्धतींत प्रथम पूर्वपक्ष सांगून नंतर उत्तरपक्ष मांडलेला असतो व शेवटीं मुख्य सिद्धांत कथित केलेला असतो. ह्या पद्धतीचें प्रो. मॅक्समुल्लर यांस फारच कौतुक वाटलें व त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, "आजपर्यंत जगांत चमत्कृति-जनक अशीं बरींच काव्यें व ग्रंथ निर्माण झाले; परंतु ह्या ग्रंथाची थोरवी कांहीं अपूर्वच आहे. धन्य आहे त्या महाभागाची कीं ज्याच्या बुद्धींतून असलें

पुस्तक उदयास आलें. प्रत्येक प्रकारच्या ज्ञानप्रसारास असलें साधन उत्पन्न करून तें इतकें सुव्यस्थित, सोपें, सर्वसंग्राह्य बनविणाऱ्या हिंदूच्या कल्पक बुद्धीची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. ''

साही दर्शनें वाचणारा व अभ्यास करणारा युरोपियन पांडित खरोखरच विरळा; त्यांस मुख्यत्वेंकरून भाषेची अत्यंत दुर्बोधता, तत्वज्ञानांतील परिभाषाकाठिण्य आणि आध्यात्मिक व बौद्धिक परिपक्वतेचा अभाव इत्यादि अडचणी फार जाचतात असें दिसतें. आर्यतत्वज्ञानाच्या कारंज्यांत उपनिषदांच्या झऱ्यांचे जोमदार प्रवाह वहात आहेत. उपनिषदांची संख्या एकंदर ५२ आहे. उपनिषदांत तत्वज्ञानात्मक विषयावर व्याख्यानें लिहिलीं असून त्यांच्या उपदेशरूप मंदानिलांपासून आध्यात्मिकतेच्या व महानुभावित्वाच्या लहरी सर्वत्र प्रसार पावतात; त्या लहरी सारख्या अन्यत्र कोठेंही पहावयास मिळणें फारच दुरापास्त. उदात्त तत्वज्ञान, गाढ विद्वत्ता, चिरस्थायी सिद्धान्त व सत्यपूर्ण तत्वें यांचा उपनिषदांत जो संग्रह केलेला आहे तो मानवी मनाच्या अजबखान्यांतील एक बिनमोल पदार्थ म्हणून मानला जाईल, व हिंदूच्या दृष्टीनें पाहिल्यास त्यांच्या अप्रतीम बुद्धिवैभवाचें तें एक अत्युत्कृष्ट स्मारक म्हणून जगापुढें सदैव उभें राहील.

कान्ट व शोपेनहौर यांच्या तत्वज्ञानाशीं उपनिषदांचा पूर्ण मिलाफ असून जेथें कमीजास्त भाग दिसतो तेथें उपनिषदांचीच सरसता प्रत्ययास येते. शोपेनहौर व डयुसन यांनीं जेव्हां मानवांच्या धार्मीक बुद्धीचा हिशेब घेतला तेव्हां त्यांस ख्रिस्ती धर्मांतील न्यू टेस्टामेंट (नवा करार) व उपनिषदग्रंथ यांतील धर्मोभिमुखता फार आवडली व त्यांचें असें मत झालें कीं, जगांत जोंपर्यंत हे ग्रंथ जिवंत आहेत तोंपर्यंत मानवी मनावरील धार्मिक दडपण नाहींसें होऊन जगांत जिकडे तिकडे पशुवृत्तीचा धुमाकूळ होण्याची भिती नाहीं; परंतु त्या दोन ग्रंथांमध्यें उपनिषदग्रंथ फारच उच्च कोटींतील आहेत असें त्यांचें म्हणणें आहे.

जर्मनतत्वज्ञ शोपेनहौर याचे उद्गार मननीय आहेत. '' ज्यू धर्मांतील अंधश्रद्धायुक्त समजुती व वेडगळ समज यांचें मनावर जें कीट वाढलें होतें व अशा अंधश्रद्धेच्या पायावर रचलेल्या तत्वज्ञानानें जो मनाला पंगुपणा आला होता तो सर्व उपनिषदवगाहनानें नाहींसा होऊन मन कसें प्रफुल्लित व जोमदार होतें तें पहा. सर्व जगांत उपनिषदग्रंथाच्या अभ्यासापेक्षां दुसरा कोणताही अभ्यास फलदायी व मनाच्या उच्च

स्थितीप्रत नेणारा नाहीं. माझ्या आयुष्यांतील उपनिषदध्ययन हेंच श्रेष्ठ सुख व मरणोत्तर प्राप्त होणारें आत्यंतीक सुखही तेंच.''

एलफिन्स्टनसाहेबाची ग्रीक व प्राचीन आर्य यांमधील तुलना खरोखर सदैव ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. तो असें म्हणतो कीं, '' हिंदूंचें सर्व विषयांतील ज्ञान बरेंच वाढलेलें होतें; तरी पण ईश्वर-स्वरूपज्ञानाचा जो भव्य दीप भारतीय आर्यांजवळ होता व ज्याच्या सहाय्यानें त्यांनीं सर्व आध्यात्मिक प्रदेश हिंडून त्यांत अभूतपूर्व व दुःसाध्य शोध लावले त्याचा एकादा मंद किरण सुद्धां विशाळ व गाढ ग्रीक विद्वत्तेला पैदा झाला नाहीं. तेणेंकरून तिला संशयरूप अंधकार व नास्तिकवादरूपी खाचखळगे यांतून मार्ग काढणें फार कठीण झालें.''

भगवद्गीता.

भगवद्गीता हा ग्रंथ वेदान्त तत्त्वज्ञानाच्या मुगुटावरील अत्यंत दैदीप्यमान हिरा होय. याच्या प्रभेनें त्या मुगुटांतील किंचित् हिणकस व कालांतरानें मलीन झालेला भाग पुन्हां उठावदार, तेजोमय व सुंदर दिसूं लागला; व एकंदर वेदान्त तत्वज्ञानास यानें अगदीं अपूर्व शोभा आली आहे. या जगांत ब्रह्मखेरीज इतर सर्व माया आहे. ब्रह्म तेवढें सत्य असून इतर सर्व मिथ्या व आभासरूप आहे. असल्या विचारसरणीनें कांहीं असामान्य, अलौकिक बुद्धिमान पुरुषास मनन करण्यास अवाढव्य क्षेत्र मिळालें, त्यांत ते तल्लीन झाले व जगास विसरून गेले; साधारण लोकांची बुद्धि असल्या कठीण विषयावर घासल्यानें फारच बोथट झाली; त्यास कोणत्या मार्गानें जावें हें कळेना. श्रेयस्कर व निःसंशय हितप्रद मार्ग कोणता हें न कळण्यानें समाज बेलगामी होऊन धरबंध सर्व सुटला; कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं; जिकडे तिकडे स्वतंत्र बुद्धीचें वारें खेळूं लागलें; परंतु सुकाणू मात्र कोणाच्या हातांत नाहीं. अशा स्थितींत समाजाचीं शकलें होणार हें ओळखून व्यासांसारख्या त्रिकालज्ञ महर्षींनीं हा ग्रंथ तयार केला व त्याची योजनाही चमत्कारिक ठिकाणीं केली: महायुद्धाचें तोंड लागणार व जिकडे तिकडे एकच रणधुमाळी माजणार अशा प्रसंगीं गीतेस आरंभ केला हें कसें? हा प्रश्न विचार करण्यासारखा असून बहुतेक विद्वानांनीं तो आपआपल्या मतीनें सोडविला आहे. परंतु अशा ठिकाणीं तो वाद अप्रस्तुत होईल सबब सोडून देणें बरें. शेवटीं कोणाही युरोपियन अगर हिंदी विद्वानांचे प्रशंसापर अभिप्राय न देतां हें प्रकरण पुरें करतों. कारण आर्यतत्त्वज्ञानाच्या

अभ्यासाची परिपूर्ती गीतेखेरीज होत नाहीं. सबब प्रत्येक पंडितास सानंद व साश्चर्य उद्गार काढावे असें वाटणें हा या ग्रंथाचाच विशेष आहे. परंतु त्याची योग्यता वाढविण्यास कोणाच्या प्रशंसेची त्यास जरूर नाहीं. तो स्वतः स्वायंभुव, रवीसारखा तेजस्वी असून सर्व जगाचें आध्यात्मिक जीवन नियमित करण्यास समर्थ आहे. सबब अशा ग्रंथाचा अध्ययनकाल हा प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांतील अत्यंत आनंददायी काल गणला जाणें अगदीं योग्य आहे. शेवटीं फिरून एकवार सर्वांस या ग्रंथाचा व्यासंग सवडीनुसार करण्यास सांगून रजा घेतों.

प्रकरण १३ वें.

भारतीय वैद्यशास्त्र.

ज्या प्रमाणें भारतीय आर्यांनीं इतर सर्व शास्त्रें पूर्ण वृद्धिंगत केलीं त्याचप्रमाणें त्यांनीं वैद्यशास्त्रासही वाढीच्या अत्युच्च शिखरास नेऊन पोचविलें होतें. सूक्ष्म निरीक्षणाची फार मोठी शक्ति, सर्वसामान्य सिद्धांत काढण्याची अजब युक्ती व पृथक्करणात्मक विवेचनाची जबर हौस इत्यादी गोष्टींना धिमेपणाच्या उद्योगाची जोड मिळाल्यावर शास्त्रांचा उत्कर्ष व्हावा यांत काय नवल ? परंतु एवढ्याच गोष्टी त्यास अनुकूल होत्या असें नाहीं तर त्यांची मायभूमी, खनिज, वनस्पत्य व इतर औषधीय लहान लहान झाडें यांच्या अफाट संपत्तीनें परिपूर्ण असल्यानें त्या शास्त्राची वाढ होण्यास फार मदत झाली. सर्व हवेंत, ऋतूंत, व सर्व भूमींत वाढणाऱ्या औषधींची येथें वाण नसल्यानें या शास्त्राचा अभ्यास करण्यास त्यांस फारच सोईचें पडलें. स्वतंत्र आर्यवैद्यकशास्त्र ज्यांनीं बनविलें त्यांनीं त्यावर पुष्कळच ग्रंथ रचले असले पाहिजेत ही गोष्ट कोणासही पटण्यासारखी आहे. परंतु दुर्दैवानें काळाच्या आसुरी लीलेनें त्यांचा नाश होऊन आज फारच थोडे ह्यात आहेत; त्यामुळें त्या शास्त्रांत आर्यांनीं किती प्राविण्य संपादन केलें होतें याचा नक्की ठाव लागत नाहीं. तत्वज्ञान, व्याकरण इत्यादि विषयांवरील असंख्य ग्रंथ आज उपलब्ध आहेत; परंतु वैद्यशास्त्राची तशी स्थिति नसल्यामुळें त्यांचा ह्या अत्यंत

महत्वाच्या शास्त्रांतील शोधांत किती प्रवेश झाला होता हें ठरविणें दुरापास्त झालें आहे. वास्तविक पाहतां वैद्यशास्त्र हें व्यावहारीक व प्रयोगात्मक शास्त्र आहे; म्हणून त्याची अशी हेळ्सांड होऊं नये; परंतु ह्याच्या अगदीं उलट प्रकार दिसतो त्यास नाइलाज आहे. तत्त्वज्ञान, व्याकरण, ईश्वरस्वरूपज्ञान वगैरे शास्त्र कल्पनात्मक, विचारात्मक व चित्ताल्हादक असून प्रत्यक्ष उपयुक्ततेच्या दृष्टीनें कमी किंमतीचीं आहेत; परंतु वैद्यशास्त्र सदैव व्यवहारोपयोगी असून यच्चावत् मनुष्यास त्याची जरूर आहे असें असतां त्यांचा नाश व्हावा हें दुर्भाग्य तर खरेंच, परंतु त्याबरोबर हयगय व अदूरदर्शीपणा हे आरोप आपोआप येऊन चिकटतात. असो. आतां अवशिष्ट वैद्यक ग्रंथ व प्राचीन संस्कृत ग्रंथ यांचा नाश होण्यापूर्वी इतर भाषेंत त्यांचीं जीं भाषांतरें झालीं असतील त्यावरून या शास्त्राच्या वाढीचा कांही इतिहास सांपडल्यास पाहूं.

प्रथमतः ह्या शास्त्राचा उत्पादक कोण याची चर्चा करूं. हिंदु लोकांत असा समज आहे कीं, या शास्त्राचा मूल उत्पादक धन्वंतरी असून त्यानें आपला शिष्य सुश्रुत यास हें शास्त्र पढविलें. दुसरी उपपत्ति अशी लागते कीं, चरक नांवाचा जो प्रख्यात वैद्यकग्रंथकार यास अग्निवेश यानें शिकवून तयार केलें व अग्निवेशाला ही विद्या आत्रेय मुनीपासून मिळाली. चरक म्हणतो कीं, मी मूल ग्रंथांत जेथें अतीशय लांबट भाग होते ते लहान व बेताचे केले व जे भाग अगदीं लहान होते ते थोडेबहुत वाढविले. एकंदरींत पाहतां हल्लीं जे वैद्यकावर प्रमाणभूत ग्रंथ म्हणून मानले जातात ते या दोघांचे—(चरक व सुश्रुत)-आहेत.

आर्यवैद्यकांत कोणकोणते विषय प्रतिपादले आहेत ते पाहूं. १९०५ सालीं मद्रास इलाख्याचे गव्हर्नर असलेले लॉर्ड अँप्थिल म्हणतात कीं, " हिंदुशास्त्रांत आरोग्याचे नियम हल्लींप्रमाणेंच सुधारलेल्या स्वरूपाचे होते; व प्रख्यात धर्मशास्त्रकार मनु याची आरोग्यरक्षक म्हणून फार दूरवर कीर्ति पसरली आहे. जगांतील अतीशय नामांकित आरोग्यसुधारक माणसांमध्यें त्याचा फारच उच्च दर्जा होता. "

सर वुइल्यम हंटर म्हणतो कीं, " आर्यवैद्यक इतर पूरक शास्त्राशीं फारच एकरूप झालेलें होतें. शारीर रचना, अवयव, जोड, स्नायू, रक्तवाहिन्या व शरीरघटक tissue धातु यांचा आर्यवैद्यकांत विस्तृत विचार झालेला आहे. हिंदूच्या सर्वमान्य व सर्वसंग्राहक वैद्यक ग्रंथांत वनस्पत्य, खनिज, प्राणीविषयक

सर्व वस्तूंचा समावेश झाला आहे; त्याची नामावळी बेसुमार विस्तृत झाली असून ह्यांतून वरींच नांवें युरोपीय वैद्यकानें उचलेलीं आहेत. औषधक्रिया मोठी खुबीदार असून, औषधाच्या वर्गीकरणाचे व सेवनाचे नियम फारच सूक्ष्म अतएव लांबलचक आहेत. आरोग्य, अन्नसेवन व आहार यांकडे फार बारीक दृष्टि दिलेली आहे. प्रो. विल्सनच्या मतें भारतीय आर्यांचें निदान अगदीं तंतोतंत प्रकृत स्थितीशीं जुळतें असून लक्षणांची व्याख्या व पृथक्करण सूक्ष्मगामी आहे. ह्याचप्रमाणें शस्त्रक्रियाही बरीच वाढली होती व औषधयोजनेंत तर त्यांचा हातखंडाच असे. कारण कीं, नैसर्गिक अनुकूलतेमुळें कोणत्याच औषधीची कधीं वाण नसे; शिवाय त्यांची चौकस बुद्धि, मेहनती स्वभाव, सूक्ष्म व खोल दृष्टि इत्यादि गुणांमुळें व वनस्पतींच्या विपुलतेमुळें ह्याची फारच भराभर वाढ झाली."

सांप्रतच्या युरोपियन व प्राचीन भारतीय वैद्यशास्त्रांत मोठा फरक म्हटला म्हणजे शस्त्रक्रियेचा. हल्लीं शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वी, सुपरिणामी व गुणकारी होण्याला खाजबरोबर इतर भौतिक शास्त्रांची जी प्रगति झाली आहे ती बरीच उपयोगी पडली हें शब्दशः सत्य होय. परंतु यावरून असें म्हणतां येणार नाहीं कीं, प्राचीन काळीं शस्त्रक्रिया नव्हती. तत्कालीन शास्त्रांच्या वाढीप्रमाणें या शास्त्रेचीही वाढ झाली होती. बेवर, एल्फिन्स्टन, व मॅनिंगबाई यांच्या मतें आर्यवैद्यककाळीं शस्त्रक्रिया फार पुढें गेलेली असून कित्येक बाबतींत चालू काळा सुद्धां त्यापुढें आपलें गेलें नाहीं असें म्हणावें लागतें. नाक, कान इत्यादि अवयव कापून नवे बसविणें हीं सध्यां कष्टसाध्य असलेलीं कामें त्या काळीं सहज करीत असत. त्याचप्रमाणें या कामीं लागणारीं शस्त्रें सुद्धां विलक्षण तीक्ष्ण, नाजूक व सूक्ष्म असत. फार काय, पण केससुद्धां उभा पिंजून देत असत असें म्हणतात. हस्तलाघव, चोखपणा वगैरे या कामीं लागणारे गुणही भरपूर दिसून येत. चिरफाड करणें, छाट मारणें, रक्तप्रवाह बंद करणें, सूक्ष्म हत्यारें तयार करणें, वनस्पतीचे पापुद्रे व कांडी यांवर प्रयोग करून विद्यार्थ्यांस शिकवणें, सुईणपण करणें, जिवावरील कामें करतांना धीर न खचणें, बायकामुलांची पाहणी करणें इत्यादि गोष्टी फार धिटाईनें, चतुराईनें, निश्चलपणें व काळजीनें केल्या जात. वर्गीकरण, कारणें, चिन्हें, शुश्रूषा, निदान,—भावी लक्षणें या गोष्टींचा आर्यांच्या शारीर शास्त्रांत प्रामुख्यानें अंतर्भाव होत असे. अश्वव्याधि, गजव्याधि यांचाही थोडा फार विचार झाला होता. परंतु प्रयोग व निरीक्षण या

दोन गोष्टी शस्त्रक्रियेंतील मुडदेफाडापेक्षां अधिक श्रेयस्कर असें सुश्रुताचें मत आहे.

अश्वरोगशास्त्रावरील एका. ग्रंथाविषयीं एलियटसाहेबानें पुढील उद्गार काढले आहेत. " लखनौ येथील राजग्रंथसंग्रहालयांत अश्वरोगशास्त्रावर एक ग्रंथ आहे. त्याचें भाषांतर ग्यासउद्दीन महंमदशहा खिलजीनें करविलें. या फारशी भाषांतरांत त्यास ' कुरटुल्मुल्क ' हें नांव दिलेलें आहे. सुश्रुताचा गुरु शालिहोत्र या नांवाचा एक ब्राह्मण होता व त्याच्याच नांवावरून हें नांव त्या पुस्तकास मिळालें, व हें भाषांतर १३८१ सालीं करण्यांत आलें.

ह्या ' कुरटुल्मुल्क ' फारशी ग्रंथास जी प्रस्तावना जोडण्यांत आली आहे त्यांत असें म्हटलें आहे कीं, कुधर्मी व भ्रष्ट हिंदु लोकांच्या भाषेकडे वारंवार जावें लागूं नये व त्यांजपाशीं संपर्क नको म्हणून हें पुस्तक तयार केलें आहे. जरी ह्या पुस्तकाच्या भाषांतराचें १३८१ असें साल दिलेलें आहे तरी तें चुकीचें असावें असें वाटतें; कारण ह्या तारखेशीं सुलतान ग्यासुद्दिन महंमद शहाची कारकीर्द जुळत नाहीं; तर तो ग्यासुद्दिन तखलग असेल तर हें साल ६० वर्षें मागें नेलें पाहिजे; बरें याच नांवाचा माळव्याचा सुलतान होता असें समजलें तरी १०० वर्षांची चूक होते; सर्वसाधारणपणें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, हें पुस्तक अकबराच्या पूर्वी तयार झालें आहे. या पुस्तकाचे ११ भाग असून ३० प्रकरणें आहेत. खालील-प्रमाणें भागांची वर्गवारी दिलेली आहे.

(१) जाती व नामें, (२) अश्वारोहण, निपज, गंध (३) तबेल्याची व्यवस्था व गोमाशांचा बंदोबस्त, (४) वर्ण व तऱ्हा, (५) ठिपके व वर्णच्छटा, (६) रोग व उपाय, (७) रक्तस्राव, (८) अवयवरचना, (९) भक्ष्य व आहार, (१०) स्थूल दिसण्याकरितां कोणतें अन्न द्यावें, (११) दांतांवरून वयोमर्यादा कशी ठरवावी.

याच विषयावर संस्कृतामधून आरबी भाषेंत ' किंताबुल्बैतारत ' या नांवाचें दुसरें एक पुस्तक बगदाद येथें तयार झालें होतें; परंतु त्याचा नामनिर्देशसुद्धां ' कुरा-तुल्मुल्क ' च्या संपादकानें केला नाहीं. यावरून तें त्याच्या पहाण्यांत आलें नसावें. असें वाटतें. त्याचप्रमाणें याच विषयावर आणखी एक पुस्तक शहाजहानच्या कार-कीर्दीत तयार झालें होतें.. त्याचें नांव ' शालोटारी ' असें होतें. मूळ ज्या संस्कृत ग्रंथाचें हें भाषांतर आहे त्याची १६०० श्लोकसंख्या आहे. मेवाडचा राणा अम्म-

सिंव्ह याजवर जहांगिरच्या कारकीर्दीत जेव्हां स्वारी झाली तेव्हां इतर संस्कृत पुस्तकां-बरोबर हें षोडश सहस्रात्मक श्लोकांचें पुस्तक सय्यद अबदुल्लाखान बहादुर जंग यास सांपडलें व त्याचें त्यानें भाषांतर केलें. अशा रीतीच्या या तीन ग्रंथांचा पूर्वेतिहास आहे. यावरून हें शास्त्र देखील किती पुढें गेलें होतें याची कल्पना येईल. शारीर शास्त्रासंबंधी सर्वसाधारणपणें प्रो. वेबर म्हणतो कीं, " वेदकालीन प्राण्यांच्या शारीरशास्त्राचें वरेंच ज्ञान आर्य लोकांस अवगत होतें. कारण प्रत्येक अवयवास भिन्न व योग्य शब्द सांपडतो व ही गोष्ट शास्त्राच्या वाढीशिवाय होणें शक्य नाहीं. मग मनुष्याच्या शारीरशास्त्राची गोष्ट कशाला हवी ? अमरकोशामध्यें मनुष्याचें शरीर व रोग यांसंबंधीं जे शब्द दिलेले आढळतात त्यांवरून वरील अनुमानच काढणें प्राप्त आहे. प्रोफेसर विल्सनच्या मतें संस्कृतमध्यें वैद्यकग्रंथाची बरीच मोठी संख्या असून त्यापैकीं प्रख्यात ग्रंथांचीं आरबी भाषेंत भाषांतरें झालीं आहेत. या भाषांतर ग्रंथामध्यें वैद्यकशास्त्राच्या शस्त्रक्रियेसुद्धां सर्व शास्त्रांचा उहापोह केलेला आहे व बिनचूक निरीक्षणं आणि सप्रमाण, यथान्याय व यथाशास्त्र औषध-योजना दिलेल्या आहेत.

सर्व सुधारणांची जननी, विद्यांचें माहेरघर, कलांचें विश्रामस्थान, धर्म व तत्वज्ञानाची मूलभूमी असें हें प्राचीन आर्यावर्त असल्यानें सर्व जगानें याच्या तोंडाकडे पहावें, यापासून शिकावें, याजकडून घ्यावें व उपकृत व्हावें यांत काय आश्चर्य ? शिक्षणानें व अध्यापनानें आर्यभूमीचे सर्व जगावर उपकार झालेले आहेत हें खरें; परंतु मनुष्यास जोपर्यंत शरीर ही वस्तू अत्यंत प्रिय वाटणार तोपर्यंत या बाबतींतले भारतीयांचे उपकार जगानें विसरणें म्हणजे महान् कृतघ्नपणा होय. सर्व युरोपनें प्राचीन हिंदुस्थानांतून वैद्यकाची कला नेलेली आहे. " मद्रास किंग इन्स्टीट्यूट ऑफ प्रिन्हेन्टिव्ह मेडिसीन् " या नांवाची संस्था उघडण्याचे वेळीं मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड ॲथिल साहेब म्हणतात कीं, " खरोखर हिंदू लोकांनीं कर्नल किंग साहेबाचें सदैव ऋणी असलें पाहिजे; कारण कीं त्यानें पुढील अभिमानाची गोष्ट प्रथम हिंदूंस समजावून दिली. ' युरोपखंड अगदीं रानटी स्थितींत होतें त्या वेळीं हिंदुस्थानांत उपचारात्मक व प्रतिरोधात्मक दोन्ही पद्धतींचीं औषधें तयार करण्याचीं तत्वें सर्वत्र महशूर झालीं होतीं. वैद्यकशास्त्र हिंदुस्थानांत तयार होऊन नंतर त्याचा प्रवेश युरोपांत झाला ही गोष्ट सर्वांस अवगत आहे कीं नाहीं कोण जाणे; परंतु वस्तुस्थिती अशी आहे. युरोपांतील वैद्य १७ व्या शतकापर्यंत आरबी ग्रंथावरून हें शास्त्र

शिकत; व स्वतः आरबांनीं तें हिंदुस्थानांतून नेलें होतें. प्राचीन सुधारणा पूर्वेकडून पश्चिमेस गेली असतां त्या सुधारणेच्या जन्मभूमींत–आर्यावर्तांत–तिचा मागमूसही उरूं नये हें केवढें आश्चर्य ?

आतां हें शास्त्र हिंदुस्थानांतून बाहेर कसें गेलें या हकीगतीकडे वळूं. या शास्त्राच्या देशांतरास ८ व्या शतकापासून प्रारंभ झाला. ७५३–७७४ च्या दरम्यान सिंधप्रांत आरबी खलीफ मनसूब याचे ताब्यांत होता. त्या वेळेस वकील–मंडळाबरोबर आणखीही विद्वान येत, येथें अभ्यास करीत, पसंत पडतील त्या ग्रंथाचीं भाषांतरें करीत, जे हिंदू विद्वान त्यांच्या बरोबर जाण्यास तयार असतील त्यांस बगदाद येथें घेऊन जात असा क्रम चालू होता. जे विद्वान येथून बाहेर गेले त्यांबरोबर ब्रह्मगुप्ताचा ब्रह्मसिद्धान्त व खंडखाद्यक हे ग्रंथ बाहेर गेले. या पंडितांच्या सहाय्यानें अल्फाझारी व याकूब हबन तारीक यांनीं या ग्रंथाचीं भाषांतरें केलीं. तेव्हांपासून या ग्रंथांचा फार प्रसार होऊन आरबी लोकांवर त्यांचीं फार छाप पडली, व आरबांना टॉलेमीच्या पूर्वी ज्योतिषशास्त्राचें याच ग्रंथावरून ज्ञान झालें. याच ज्ञानगंगेचा दुसरा ओघ हरूनच्या कालीं म्हणजे ७८६–८०८ च्या दरम्यान वहात होता. वैभवशिखराच्या उत्तुंग शिखरावर आरूढ झालेलें बरमाक नामक प्रधान कुटुंब वल्खहून राजघराण्याबरोबर बगदादला आलें होतें. मूळ वल्खशहरीं त्यांचा पूर्वज बुद्धधर्मी असून तेथील विहाराचा तो अधिपती होता. परंतु पुढें बुद्ध अंमल नष्ट झाल्यावर हें मुळचें बुद्ध कुटुंब महंमदानुयायी बनलें. परंतु त्या कुटुंबाचे ठिकाणीं मुसलमानी कडवेपणा नसून लोकांनाही तें कुटुंब मूळ शुद्ध मुसलमानी धर्माचें आहे असें वाटत नसे. या कारणानें म्हणा अथवा आनुवंशिक संस्कारांच्या प्रभावामुळें म्हणा, त्याचा हिंदुस्थानाकडे फार ओढा होता. त्यामुळें त्यांनीं हिंदुस्थानांत विद्वान पाठवून त्यास वैद्यशास्त्र व औषधें तयार करण्याची कृती पढवून नेलें. तसेंच हिंदुस्थानांतील विद्वान पंडित यास बगदाद येथें बोलावून त्यांस राजवैद्य व रुग्णालयपती केलें आणि त्यांच्याकडून आरबीमध्यें वैद्यशास्त्र, विषोपचारशास्त्र, औषधांची रासायनिक कृती, तत्वज्ञान, ज्योतीषशास्त्र व इतर विषय यांजवर ग्रंथ तयार करवून घेतले. यानंतर खुद्द मुसलमानपंडित बारमाकचे वकील म्हणून हिंदुस्थानांत येऊन हेंच काम करीत. उदाहरणार्थ अलमुबाफक या नांवाचा एक पंडित अल्बेरुनीच्या अगोदर थोडेच दिवस येऊन गेला होता.

त्याचप्रमाणें ९५०–६० मध्यें बगदाद येथें राज्य करणारा खलीफ; ७५३–७७४ मधील आलमानसूर; सासेनियन राजा नोशिरेवन (५३१–५७२) याचा समकालीन बर्झूयेह; बगदाद येथें राहणारे कांहीं ग्रीक, आद्य आरब ग्रंथकार सेरापियन आलमानसूरपाशीं असलेला ऱ्हाझी; शेख राहस् अथवा अबूअल्ली सिना (१०३६ मृत्यू) फिरोझशहा बादशहाचा नोकर आयाझुद्दिन खालीद या गृहस्थानीं अत्यंत परिश्रमानें, काळजीनें व दीर्घ व्यासंगानें संस्कृत वैद्यक ग्रंथांचीं आरबी भाषेंत भाषांतरें करून आरबी वैद्यकशास्त्र तयार केलें. यांपैकीं कांहीं स्वतः बादशहा असून बाकीचे पंडित होते. आरबी बादशहांनीं फार धूर्तपणानें, दूरदृष्टीनें, प्रजाहिततत्परतेनें शास्त्रज्ञान-लालसेनें आपल्या दरबारांतील पंडितांकडून त्यास मोठीं इनामें देऊन संस्कृत ग्रंथांच्या आधार आरबी वैद्यक ग्रंथ तयार केले व कांहीं ठिकाणीं निव्वळ भाषांतरें करविलीं. ह्या पंडितांच्या ग्रंथांमध्यें अश्विनीकुमार, चरक, सुश्रुत यांचीं नांवें ठिकठिकाणीं आलीं असून त्यांचे गुणानुवाद मोठ्या उदार मनानें गाइले आहेत; त्यांच्या बुद्धिमत्तेची तारीफ केलेली आहे; व त्यांच्या परिभाषाकौशल्याचें कौतुक केलें आहे. त्या वेळीं हिंदु विद्वानास सर्वत्र पाचरण केलें जात असे, त्यांस मोठ्या सत्कारानें नेऊन त्यांचा द्रव्यद्वारा उत्तम परामर्ष घेतला जात असे व त्यांजकडून भाषांतराचें काम करून घेण्याबद्दल त्यांची मनधरणी केली जात असे. याचीं खालीं दोन उदाहरणें देतों. अबूओसाहेबा नामक आरबी ग्रंथकार म्हणतो कीं, मंकानामक एक प्रख्यात आयुर्वेदविशारद होता. तो हिंदुस्थानांतून इराण येथें गेला; खलीफ हरून अलरशिद यास त्यानें बरें केलें; चरकाचा पारशी भाषेंत एक विषारी द्रव्यावरील ग्रंथ यानेंच भाषांतरित केला. असाच सालेह नामक दुसरा हिंदु विद्वान होता असें अबूओसाहेबा लिहितो. तो तत्कालीन पंडितांमध्यें अग्रगण्य असून आर्यवैद्यकाच्या पद्धतीनें उपचार करण्यांत अत्यंत कुशल होता. हा सुद्धां हरूनच्या कारकीर्दीत इराक येथेंच रहात असे. पुढें तो इजिप्त, पालेस्टाईन मधून प्रवास करीत असतां वाटेंत मरण पावला. तेव्हां त्यास इजिप्तमध्येंच पुरण्यांत आलें.

वरील एकंदर विस्तारावरून एवढें लक्षांत येण्यास हरकत नाहीं कीं, वैद्यकशास्त्र मूळचें हिंदूंचें असून त्यांनीं त्याची सर्व शाखांसह पूर्ण वाढ केली होती. अशा सर्वांग सुश्लिष्ट शास्त्राचा उपयोग युनानी पद्धत उभारण्यास सर्वांशीं झाला. यावरून मुसलमानी वैद्यशास्त्राचा सर्व डोलारा आर्यवैद्यकावर उभारला होता; व आरबी भाषेंतून पुढें हें शास्त्र युरोपांतील निरनिराळ्या देशांनीं उचललें. १७ व्या शतका-

पर्यंत युरोपियन वैद्यकशास्त्रास सर्वस्वीं याचाच आधार होता. चरकाचें नांव लाटीन भाषेंतील भाषांतरांत ठिकठिकाणीं पहावयास सांपडतें. ज्याअर्थी या लाटीन भाषेंतील ग्रंथावरून पुढें आधुनिक युरोपियन भाषांत आर्यवैद्यक उतरलें आहे. ल्याअर्थी हल्लींच्या युरोपांतील वैद्यकशास्त्राचा सुद्धां मुख्य आधार आर्यवैद्यकच आहे असें म्हटल्यास कांहीं वावगें होणार नाहीं.

वरील विवेचनावरून आर्यवैद्यक कोणकोणत्या मार्गांनीं युरोपांत गेलें हें कळणें सुलभ आहे. पहिला मार्ग सिंधमधून आरबी समुद्राच्या मार्गानें व दुसरा अफगाणिस्थान, इराण व अरबस्थानांतून. आरबांप्रमाणें पूर्वी ग्रीक लोकांनीं सुद्धां आर्यवैद्यकज्ञानाचा प्रसार व संरक्षण मोठ्या दक्षतेनें केलें. आक्टुआरियस नामक ग्रीक वैद्य व दुसरा ईटियस या दोघांनीं त्रिफळा कसा करावा याचें वर्णन आपल्या ग्रंथांत केलें आहे. यावरून केव्हांपासून आर्यवैद्यकाचा अभ्यास प्राचीन लोक आस्थेनें करीत होते हें दिसून येईल.

सर्व जगास ज्या आर्यवैद्यकानें शहाणें करून सोडलें त्यावर प्रो. विल्सन म्हणतो त्याप्रमाणें शेकडों ग्रंथ झाले असल्यास काय नवल ? यांपैकीं कांहीं मुख्य ग्रंथकारांचीं नांवें पुढें देतों.

आत्रेय, अग्निवेश, चरक, धंन्वंतरी, सुश्रुत, भारद्वाज, कपिस्थळ, भेल, लातुकर्ण, पाराशर, हरित, कश्यपरु, आश्वलायन, बादरायण, कात्यायन, वैजवापी, कुश, संस्कृत्यायन, बाभ्रव्य, कृष्णात्रेय, औद्दालकी श्वेतकेत, पंचाल, गोनार्दिय, गोणीकपुत्र, सुबंधु, शंकर, कंकायन.

नियरकस म्हणतो कीं, अलेक्झांडरच्या दरबारीं असलेल्या ग्रीक राजवैद्यांना सर्पदंशावर उपाय माहीत नव्हता, परंतु त्याच दरबारीं असलेल्या हिंदी वैद्यांनीं सर्पदंशावर ताबडतोब उपाय योजून रोगी बरे केले व जितके सर्पदंशाचे रोगी अस्तील तितके आपण बरे करूं असें जाहीर केलें. या ऐतिहासिक पुराव्यावरून सर्पदंशासारख्या अत्यंत प्राणघातक गोष्टींत विलक्षण सिद्धी मिळवून किती अनाथ लोकांनीं त्यांनीं जिवदान दिलें असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

आतांपर्यंत पुष्कळ गोष्टींचें विवेचन झालें. आतां भारतीय रसायन कोठपर्यंत पोंचलें होतें याबद्दल विद्वानांचें काय मत आहे तें पाहूं. एल्फिन्स्टनसाहेबांचा असा सरसकट शेरा आहे कीं, हिंदूंचें रासायनिक कौशल्य कल्पनातीत अतएव विलक्षण आश्चर्यकारक होतें. ह्या पुस्तकांत मोठ्या दुःखानें एक गोष्ट वारंवार लिहावी लागते

याबद्दल वाईट वाटतें; तीं ही कीं, काळाच्या सपाट्यांत 'माधव' नामक वैद्यग्रंथकारानें निर्दिष्ट केलेले बहुतेक ग्रंथ नाश पावले व त्यांपैकीं हल्लीं 'रसार्णव' हा एकच शिल्लक आहे. भारतीय रसायन शास्त्राच्या इतिहासकारानें आणखी एक रसरत्नाकर म्हणून ग्रंथ सांगितला आहे. तो म्हणतो कीं, रसार्णव व रसरत्नाकार हे प्रयोगप्रतिपादक ग्रंथ असून त्यांत सहजासहजीं किमयेच्या प्रश्नाचा विचार केला आहे. याशिवाय रसरत्नसमुच्चय म्हणून एक पद्धतशीर व बराच मोठा ग्रंथ असून त्यांतील विवेचनशैली, शास्त्रीय परिभाषा व विषयमांडणी इतकी सुबक व सफाईदार आहे कीं, तो ग्रंथ गेल्या थोड्या वर्षांच्या काळांत कोणी तरी लिहिला असावा असें वाटतें. यांत औषधें तयार करण्याची कृति, औषधांचीं नांवें व गुणधर्म आणि औषधोपयोगी वस्तु हीं सर्व दिलेलीं आहेत.

सुश्रुतासंबंधीं डॉ. रॉय म्हणतो कीं, सुश्रुताच्या ग्रंथांत (कॉस्टिक अल्कली) तयार करण्याच्या कृतींत लोहपात्रांत सोडाखाराचें मिश्रण ठेवावें ही जी सूचना दिली आहे ती चालू प्रयोगास व रसायनशास्त्रज्ञानास किती धरून आहे हें जर ताडून पाहिलें तर भारतीय आर्यांच्या इतक्या प्राचीन शोधाबद्दल व औषधें तयार करण्याच्या नैपुण्याबद्दल मन अगदीं आश्चर्यानें गुंग होऊन जातें. हा प्रयोग ढोंगीपणाचा, जडीबुटीचा, भोंदूपणाचा नसून सर्वांशीं शास्त्रसंमत आहे; बर्थेलॉट नामक एका विद्वानानें नवीन शोध लावून असें सिद्ध केलें आहे कीं, तो ग्रीकास ११ व्या शतकांत माहीत होता; परंतु सुश्रुताच्या ग्रंथावरून या शोधाचें सर्व महत्त्व संपुष्टांत येऊन आर्यांच्या कल्पकतेचें यथार्थ कौतुक होणें शक्य नाहीं असेंच मनास वाटूं लागतें. रसायनशास्त्राचा उपयोग वैद्यशास्त्रांत करून पाऱ्याच्या रसायनाचा उपयोग पोटांत घेण्याच्या कामीं प्रथम पॅरॅसेलस (१४९३–१५४१) यानें केला असा गौरवपर उल्लेख युरोपांतील प्रत्येक भाषेंतीलं रसायनशास्त्राच्या इतिहासांत केलेला आहे; परंतु भारतीय रसायनशास्त्राचा इतिहासकार म्हणतो कीं, पॅरॅसेलस यानें पूर्वेकडील देशांतून हें ज्ञान पैदा केलें असें मानण्यास बळकट आधार आहे.

धातूंच्या रसायनासंबंधीं डॉ. रॉय आपल्या 'भारतीय रसायनशास्त्राचा इतिहास' नामक ग्रंथांत असें लिहितो कीं, "आतांपर्यंत जीं कारणें दाखविलीं त्यावरून पाऱ्याचीं रसायनें तयार करण्याचे कामीं हिंदूंनींच सर्वांपेक्षां आघाडी मारली असें दिसून येईल. अथवा तीं तयार करणें हा त्यांचा आवडताच विषय होता असें

म्हटल्यास चालेल. सुश्रुत, चरक या दोघांचेच ग्रंथ जरी पाहिले व इतरांचे सोडून दिले तरी पोटांत घेण्यासाठीं धातूंच्या रसायनांचा उपयोग प्रथम हिंदूनींच केला असें निःसंशय ठरतें. ''

थोरल्या प्लिनीच्या काळापर्यंत पाऱ्याचे कोणकोणते औषधी गुणधर्म आहेत याचा युरोपांत निश्चय झाला नव्हता. प्लिनीनें पाऱ्यास सर्व धातूंमध्यें कनिष्ठ ठरवून त्यास विषाची उपमा दिली आहे. यावरून प्लिनीच्या काळापर्यंत युरोपाचें वैद्यक-विषयक ज्ञान किती वाढलें होतें याची कोणासही कल्पना करितां येईल.

पुढील एल्फिन्स्टनच्या उताऱ्यावरून आर्यवैद्यकाची व्याप्ती केवढी होती याची कल्पना करण्यास सोपें जाईल.

'' तेजाब, नत्रिकाम्ल, लोह, ताम्र व शिसें, कथील व जस्त यांचीं प्राणील मिश्रणें; लोह, ताम्र, पारद, अंज व सोमल-यांचीं गंधकयुक्त मिश्रणें, व लोह आणि शिसें यांचीं कारबानमय लवणें यांच्या कृती संस्कृत ग्रंथांत दिलेल्या असून त्या थोड्या चमत्कारीक आहेत. आर्यवैद्यक यांचा बिनदिक्कत उपयोग करीत असे. केवळ पारद व इतर खनिज पदार्थ पोटांत घेण्यास देत असत, एवढेंच नव्हें तर धुराच्या कामीं रक्तपादाचा उपयोग करून त्यापासून त्वरित व सुखकर लालास्राव उत्पन्न करीत; लस टोचण्याचाही त्यांचा प्रघात असे; व शस्त्रकलाभिज्ञास भूषणभूत व अभिमानास्पद अशी गोष्ट म्हणजे गर्भ कापून काढीत असत. शस्त्रक्रियेच्या १२७ हत्यारांचीं नांवें संस्कृत वैद्यकग्रंथांत दिलेलीं आहेत. ''

राष्ट्रीय विश्वविद्यालयावर व्याख्यान देत असतां १९०६ सालीं बेझंटबाई असें म्हणाली कीं, '' भौतिक शास्त्रें व रसायनशास्त्र यांत तुम्ही फारच मजल गांठलेली आहे; पण वैद्यकांत तुम्ही विशेष पुढें गेलां आहां. पाश्चात्त्य देशांत वैद्यक हें शास्त्र नसून अजून अंदाजावरच त्याचें बरेचसें काम चालले आहे. औषधें तयार करण्याच्या पाश्चात्त्य पद्धतीपेक्षां हिंदुस्थानांतील आर्य व युनानी या दोन्ही भेषज-पद्धती फारच पुढें गेलेल्या आहेत. '' प्राचीन भारतांत भेषजशास्त्र, आरोग्यशास्त्र व रसायनशास्त्र इत्यादि शास्त्रांचा किती विकास झाला होता हें सध्यां उपलब्ध असलेल्या ग्रंथांवरून व चिकाटीनें शोध लावणाऱ्या चिकित्सक विद्वानांच्या परिश्रमावरून दिसून येत आहे. भारतीय वाङ्मयामध्यें जों जों जास्त शोधक बुद्धीनें प्रवेश करावा तों तों प्राचीन तत्वज्ञानावर व शोधावर नवीन प्रकाश पडल्याशिवाय रहात नाहीं हें कोणासही प्राचीन-वस्तुसंशोधकांच्या वार्षिक अहवालावरून व मासिक पुस्तकावरून कळून येईल.

किंग इन्स्टिटयूट ऑफ प्रिव्हेन्टिव्ह मेडसिन् या संस्थेच्या सुरवातीस प्रारंभ करण्याच्या वेळीं मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड ॲंथिल् यांनीं जें भाषण केलें त्यावरून वरील म्हणण्याची प्रतीति आल्याशिवाय रहाणार नाहीं.

"प्राचीन आर्यावर्तांतून मुसलमान लोकांनीं वैद्यकशास्त्राचें ज्ञान स्वदेशीं नेलें होतें तें त्यांनीं हिंदुस्थानावर स्वारी करून येथें राज्य करण्यास आल्यावर परत आणलें. मध्यंतरीं पुष्कळ शतकें या ज्ञानाचा लोप झाल्यासारखा वाटत असे, परंतु मुसलमानांच्या आगमनानें तें ज्ञान परत स्वदेशीं आलें. उत्तर हिंदुस्थानांत मोंगल बादशहांनीं जीं जीं शुद्ध जलसंचयाची कामें करून लोकांच्या आरोग्याची तरतूद केली त्यांपैकीं बरींच सध्यां सुस्थितींत आहेत; त्यावरून मोंगल राजे आरोग्य-सुधारक होते, त्यांनीं प्रजेच्या शरीरस्वास्थ्याची व अनामयत्वाची पुष्कळच काळजी घेतली असें दिसतें. हल्लीं बिटिश अमदानींत म्युनिसिपालट्यांच्या संस्थापनेनें व कारभारानें त्याचप्रकारच्या लोकांच्या सुखसोयी वाढविण्यांत येत आहेत. शुद्ध जलसंचय, जलशुद्धीकरणाचीं कामें, पाण्याच्या दाबाचा उपयोग, लौकिक सुखाकरितां करून घेण्याकरितां बांधलेलीं कामें, दवाखानें, रुग्णालयें, वैद्यकपाठशाळा, साथींचा प्रसार न होण्याबद्दल केलेले कायदे, लोकांचें आरोग्यसंवर्धन होण्याकरितां म्युनिसिपालट्या (नगरमंडळ्या) व ग्राममंडळ्या यांजवर लादलेली जाबाबदारी, इत्यादि गोष्टी नवीन वाटतील, परंतु प्राचीन काळीं आर्यावर्तांत अस्तित्वांत असलेल्या गोष्टींचें हें फक्त अनुकरण आहे व यांत नवीन असें कांहीं नाहीं.

मध्यंतरीं अवनतीच्या फार प्रबल माऱ्यापुढें या सर्व लोकहितकारी गोष्टी नष्ट झाल्या, त्यांचा अवशेष सुद्धां क्वचित् राहिला नाहीं, यामुळें हिंदुस्थानांतील लोकांस त्या नवीन वाटत असून ब्रिटिश अंमलाबरोबर ज्या पुष्कळ गोष्टी आल्या त्यांपैकीच ही आहे असें वाटतें. परंतु खरी गोष्ट अगदीं उलट असून शिष्यावर गुरूस शिकविण्याची पाळी आली आहे एवढेंच नवीन आहे. काळाच्या असंख्य कौतुकास्पद लीलांपैकी ही एक आहे यापेक्षां दुसरें काय? इतिहासकार व प्राचीन-वस्तुसंशोधक यांच्या परिश्रमानें या गोष्टी प्रकाशांत येऊन प्राचीन आर्यावर्ताचें ज्ञानवैभव केवढें होतें, अवनतीच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें किती हानि होते, समर्थांच्या पदरीं केवढा दैन्यपणा येतो या सिद्धान्ताचें स्पष्टीकरण पहावयास मिळतें. या जगांत नवीन असें कांहीं नाहीं. हल्लीं जें आहे तें प्राचीन काळीं होतें, फक्त स्वरूप भिन्न असेल, पेहराव निराळा असेल, अथवा लौकिक ज्ञान व समजूत सर्वसामान्य

नसेल एवढाचं फरक; सर्वस्वी नवीन असें कोठेंहो आढळणार नाहीं. याच तत्वाचें सत्यत्वं हल्लीं रोगप्रतिबंधक पद्धतींत दृग्गोचर होतें. सेसंर्गानें व स्पर्शानें रोगांचा प्रसार होतो हें तत्व हल्लीं सर्वत्र सर्वज्ञात झालें असल्यासारखें दिसतें; परंतु कर्नल किंग म्हणतो कीं, तें प्राचीन काळीं लोकांस माहीत असून अधम व कनिष्ठ जातींच्या स्पृश्यास्पृश्यतेच्या चालीवरून समाजांत रूढ होतें हें कोणाही विचारी मनुष्यास समजल्याशिवाय रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें हिंदु व मुसल्मान लोकांत देवीची लस टोंचून देवीच्या साथीचा प्रतिकार करण्याची चाल होती. जेन्नरनें जो देवीच्या लसीचा शोध लावला तो नवीन नसून मागील ज्ञानांत थोडी फार भर टाकली असें म्हणतां येईल. कारण जेन्नरच्या पूर्वी युरोपांत सुद्धां हा उपाय माहीत होता, व तो कान्स्टांन्टिनोपलाहून युरोपांत गेला. तुर्की मुलुखांत व युरोपलगतच्या आशिया खंडाच्या भागांत वैद्यशास्त्र जें भरभराटीस आलें तें मूळ हिंदुस्थानांतूनच तिकडे गेलें याबद्दल कोणासच संशय घेण्यास जागा नाहीं.'' कारण ही गोष्ट मागील विवेचनांत स्पष्टपणें सिद्ध केलेलीच आहे. सबब गव्हर्नरसाहेबांच्या म्हणण्यास त्या गोष्टींचा पुरावा मिळून मागील विवेचन व हें भाषण हीं परस्पर पोषकच झालीं आहेत. गव्हर्नरसाहेब पुढें त्याच भाषणांत म्हणतात कीं, '' कर्नल किंगनें गायींच्या फोडांतून लस घेऊन ती मुलांच्या दंडांत घालणें व एका मुलाच्या फोडांतून लस घेऊन तिनें दुसरें मूल टोंचणें हा देवीच्या साथींतील उपाय धन्वंतरीच्या ग्रंथांत आढळतो असें सिद्ध केलें आहे.

धन्वंतरीच्या ग्रंथांत पुढील शब्द आहेतः—' गायींच्या वेंबीतून निघणारें प्रवाही द्रव्य अथवा मनुष्यप्राण्याच्या दंडांतून मिळणारें पातळ द्रव्य हें एका सुईच्या अग्रावर घ्या व त्यानें दंडांतून रक्त निघेपर्यंत टोंचा म्हणजे तें रक्तांत मिनेल. असें केल्यानें देवीचा ताप येईल.' हल्लींच्या देवी टोंचण्याच्या उपायाहून हा कोणत्याही प्रकारानें भिन्न नाहीं व जेन्नरच्या पूर्वी प्राचीन कालीं हिंदूनीं हा शोध लाविला होता असें मानण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं. त्याचप्रमाणें हल्ली प्लेगच्या दिवसांत स्थानत्याग व हवा शुद्ध करण्याचे जे प्रकार योजण्यांत येतात ते सुद्धा हिंदु वैद्यकशास्त्रांत सांगितलेले आहेत असें मानण्यास कर्नल किंगच्या शोधाचा वरकट पुरावा आहे. ''

प्रकरण चवदावें.

गणीत.

मनाची एकाग्रता व विचारांचें केंद्रीकरण या दोन गोष्टी प्राचीन हिंदु लोकांस फार उत्तम साध्य झाल्या असल्या-कारणांनें मानसिक स्वास्थ्य व आनंद यांचा त्यांना पूर्ण लाभ झाला होता. अशा मनस्थितीच्या लोकांच्या हातून काय होणार नाहीं ? मात्र यांना किती वर्षांची खडतर तपश्चर्या, केवढा मनोनिग्रह व कसला आत्मविश्वास पाहिजे याचा अनुभव प्रत्यक्ष तो प्रयत्न सुरू केल्याशिवाय कळणार नाहीं. परिणामीं गोड ते सर्वत्र गोड या न्यायानें आर्यांच्या ठायीं हे गुण मुळापासून होते असें गृहीत धरण्यास कोणतीच अडचण दिसत नाहीं. अशा प्रकारच्या मनाच्या तालमीनें त्यांस कोणतीही इंद्रिय-गोचर अथवा अतींद्रिय गोष्ट साध्य करणें कठीण जात नसे. या प्रकारच्या मनः-स्थितीला प्रत्यक्ष प्रमाणें असून शिवाय त्यांच्या वाङ्मयांत तीं पदोपदीं दृष्टोत्प-त्तीस येत. अशा मनोविकासी शिक्षणानें त्यांच्या मेंदूची तरतरी फार वाढून त्यांची धारणाशक्तीही जबरदस्त झाली होती. ही गोष्ट साध्य झाल्यानें सर्व प्रका-रचीं चित्तैकाग्रतामूलक व मानसविकासात्मक शास्त्रें, उपशास्त्रें त्यांस केवळ लीलेनें उत्कट स्थितीप्रत नेतां आलीं. मनाची एकाग्रता व कल्पनांचें केंद्रीकरण यांच्या भक्कम पायावर ज्या गणीतशास्त्राची इमारत नेहमीं उभारली जाते त्याचा हिंदू लोकांस अत्यंत छंद लागावा हें अगदीं साहजीक आहे. याला पुरावा पाहिजे अस-ल्यास भारतीय ज्योतीषाचा बस्स आहे. आर्यावर्तांत ज्योतिषशास्त्र किती प्राचीन काळीं भरभराटीस आलें हें पाहिलें म्हणजे वरील गोष्टीस निराळा आधार देण्याची मुळीं जरूरीच उरत नाहीं. अर्थात ज्योतिषाबरोबर गणितही आलेंच. गणित हें केवळ कल्पनागम्य शास्त्र असतां त्याचा हिंदूंनीं सर्व बाजूंनीं पूर्ण विकास करून त्याची मदत ज्योतिषशास्त्रास दिली हें पाहिलें म्हणजे क्षणभर असें वाटतें कीं, ह्या लोकांना प्रत्यक्ष सरस्वती प्रसन्न होऊन त्यांच्या घरीं दासीप्रमाणें वागत होती कीं काय ?

अथवा सृष्टीदेवीनें आपलें सर्व कल्पनाधन यांच्या चरणीं अर्पण करून यांस जगाच्या शिक्षणासाठीं पाठविलें होतें कीं काय न कळे. तें कांहीं असो; याबद्दल सर्व विद्वानांचें ऐकमत्य असून गणीतशास्त्राचे भारतीय लोक उत्पादक आहेत असें ठरलेलें आहे. ज्यांनीं गणीतशास्त्राची उभारणी केली त्यांनीं अंकपद्धती शोधून काढली असेल याबद्दल शंकाच रहात नाहीं. कारण त्याशिवाय गणीतशास्त्राचें एक क्षणभरही चालणार नाहीं. प्रख्यात जर्मन चिकित्सक श्लेजेल म्हणतो कीं, " मनुष्यानें आजपर्यंत जे जे शोध लावले त्यांपैकीं लिपीचा शोध पहिल्या प्रतीचा असून त्याच्या खालोखाल दशांश पद्धतीचा आहे असें इतिहासकारांनीं मानलेलें आहे; व यांपैकीं दशांशपद्धती-हीं हिंदूंचीच कल्पना आहे असा सर्वसंमत सिद्धांत आहे. "

प्रो. मॅक्डोनल्ड म्हणतो कीं, " विज्ञानशास्त्रांत सुद्धां युरोपखंड भारतभूमीचें अत्यंत ऋणी आहे. अंकपद्धतीचा प्रथम फार मोठा शोध करून आर्यांनीं जगावर उपकार केलेले आहेत. कारण ही पद्धत आधुनिक जगानें त्यांपासून उचललेली आहे. त्यानंतर मोजमापनाच्या कामीं फार फायदेशीर अशी दशांशपद्धती सुद्धां त्यांनींच शोधून काढली; हिचा परिणाम गणीतशास्त्राच्या वाढीवरच झाला नसून जगांतील सर्व सुधारणेवर व संस्कृतीवर झाला आहे. तेव्हां या गोष्टीची थोरवी वानावी तेवढी थोडीच होणार आहे. आठव्या व नवव्या शतकांत हिंदूंपासून आरबांनीं हीं शास्त्रें उचललीं व नंतर तीं आरबांबरोबर पाश्चिमात्य राष्ट्रांत आलीं. याच कारणानें बीजगणितास आरबी नांव प्राप्त झालें, परंतु त्याची खरी उत्पत्ती हिंदुस्थानांतच आहे. " वर जो प्रो. मॅक्डोनल्ड यांचा विस्तृत उतारा दिला आहे त्याचाच अभिप्राय पुढील लेखकांच्या याच विषयावरील लिहिण्यांत थोड्याफार शब्दफरकानें व्यक्त झाला आहे. सर मोनियर विल्यम्स, मॅनिंग, सर हंटर, प्रोफेसर वेबर व प्रो. विल्सन यांनीं जवळ जवळ सारख्याच शब्दांत वरील गणीतशास्त्राचें देशांतर कबूल केलें आहे. बीजगणितांतील पृथक्करणपद्धती, अंकपद्धती, दशांश लेखनपद्धती, हा गोष्टींच्या कल्पना हिंदू डोक्यांतून निघून त्यांस त्यांनीं पुढें शास्त्रीय स्वरूप दिलें. एकापासून नवांपर्यंत आंकड्यांचीं जीं नांवें आहेत त्यांच्या आद्य अक्षरांत व अंकांच्या लेखनपद्धतींत एक चमत्कारीक साम्य आहे. ह्या सर्व गोष्टींचें ज्ञान आरबांनीं करून घेतलें व त्यांजपासून तें पुढें युरोपांत फैलावलें हा मुख्य सिद्धान्त वर दिलेल्या युरोपियन पंडितांस मान्य आहे व तो त्यांनीं स्पष्ट व सरळ शब्दांत व्यक्त केला आहे.

अंकगणित.

मॅनिंगबाई, प्रो. वेबर व सर विल्यम हंटर यांच्या सारख्या अत्यंत मेहनती विद्वानांनीं निर्भीडपणें व स्पष्ट रीतीनें असें कबूल केलें आहे कीं, " बीजगणीत व सर्व प्रकारचें अंकगणीत यांत हिंदू लोकांनीं अत्यंत प्राविण्य संपादिलें होतें व या कामीं त्यांना कोणाचीही काडीमात्र मदत नव्हती. "

प्रख्यात इंग्लिश गणितज्ञ प्रो. वॉलेस म्हणतो कीं, " लीलावती ग्रंथांत अंकगणिताचा बहुत विचार केलेला आहे. अंकगणित शास्त्रांतील सर्वसाधारण नियम या ग्रंथांत दिले आहेत, एवढेंच नव्हे तर त्यांचा व्याज, देवघेव, मिश्रण, combination अंकपाश, श्रेणी, श्रेणींची बेरीज, अनिर्णीत प्रश्न व घनाकृतींचें मापन इत्यादि ठिकाणीं कसा उपयोग करून घ्यावयाचा हें सुद्धां सांगितलें आहे. हे नियम बिनचूक असून हल्लींच्या संशोधनाच्या रीतीनें पाहिलें असतां अगदीं सोपेही आहेत. यावरून उत्तरें सहज काढतां येतात. दशांश लेखनपद्धतीच्या उपयोगाचें यांत फारच सुंदर विवेचन आहे. "

परंतु लीलावती हा ग्रंथ अगदीं अलिकडच्या कालांतील असल्यानें त्यावरून हिंदुस्थानांतील खऱ्या गणितशास्त्राच्या वाढीचें ज्ञान होणार नाहीं. चेंवरच्या क्रमिक व शालोपयोगी अंकगणीतावरून सर्व गणीतशास्त्राची कल्पना करण जितकें अप्रयोजक होईल तितकेंच लीलावतीवरून सर्व जुन्या भारतीय गणितशास्त्राचें ज्ञानमापन करणेंही अप्रयोजक होईल. आंकड्यांच्या घडामोडीचा व्याप कल्पनातीत वाढल्यानें त्याकरितां प्राचीन आर्यगणीतज्ञांनीं जीं कोष्टकें व परिमाणें बनविलीं आहेत तीं पाहिलीं म्हणजे त्यांच्या गणीतज्ञानाच्या वृद्धीचें अनुमान करण्यास सोपें जाईल.

भूमिति.

भूमितिशास्त्रांत प्राचीन भारतीय आर्यांनीं अलौकिक कीर्ति संपादन केली होती हें तर महशूरच आहे. प्रो. वॉलेस यांचा खालाल लांबलचक उतारा घेणें जरा अप्रशस्त दिसेल, परंतु विषयाच्या महत्त्वाकडे दृष्टि दिली असतां तो गुणी जनांस रुचेल अशी आशा धरून तो घेण्याचें आम्ही धाडस करितों.

" ज्या एकाद्या पुस्तकांत त्रिकोणमितीशास्त्राचे उद्घाटन केलेलें आहे तें जरी कितीही प्राचीन कालीं रचलेलें असलें तरी विज्ञानशास्त्राच्या प्रारंभकालीं तें केव्हांही निर्माण होणें शक्य नाहीं. सूर्यसिद्धान्ताचें लेखन होण्यापूर्वी भूमितिशास्त्र हिंदु-

स्थानास अवगत असलेंच पाहिजे. सूर्यसिद्धांत हा ग्रंथ ख्रिस्ती शकापूर्वी निदान २०० वर्षें तयार झाला होता हें युरोपियन शोधकांनींच कबूल केलें आहे.

ग्रीस व अरेबिया ह्या देशांत त्रिकोणमितींतील जी अकराणिगत पद्धति रूढ होती तीहून सूर्यसिद्धान्त ग्रंथांतील पद्धत फारच भिन्न आहे. युरोपांत व्हीटा नामक प्रख्यात गणितज्ञाच्या पूर्वी सुमारें दोनशें वर्षें जे गणीती होऊन गेले त्यांस भूमितींतील जो एक सिद्धान्त अवगत नव्हता त्याच्याच आधारावर सूर्यसिद्धांतांतील त्रिकोणमितीची इमारत उभारली होती. या हिंदी त्रिकोणमितींत जी कंसज्या (sine of arc) योजलेली आहे ती ग्रीक लोकांस माहीत नव्हती; ते फक्त दुप्पट कंसाच्या पूर्णज्येचा chords of double arc उपयोग करीत असत. ज्या-चा (Sine) शोध आरबांनी लावला असें मानतात; परंतु ग्रीक लोकांपेक्षां जें हें जास्त ज्ञान आरबांस झालें तें हिंदूंपासून असें मानल्यास कोणतीही चूक होणार नाहीं. परिघाच्या भागेंत वर्तुलाची त्रिज्या सांगणें हा प्राचीन हिंदूंचा एक अपूर्वच शोध होय. टॉलेमी व इतर ग्रीक गणीती यांनीं त्रिज्येचे भाग पाडण्याच्या कामीं परिघाचा कांहीं संबंध आहे असें मुळींच मानलें नाहीं. ग्रीक लोकांस माहीत नसलेला ज्या (sine) चा उपयोग हाच हिंदू व ग्रीक त्रिकोणमितींतिल महत्त्वाचा फरक होय. रेखा-मापनाच्या कामीं ग्रीक लोक जो नियम पाळीत असत तो विज्ञानशास्त्रांतील एक फार मोठा शोध होय. आधुनिक काळांत ग्रीकानंतर प्रथमतः याचा उपयोग ब्रिग्ज-नामक गणितज्ञानें केला.

' हल्लीं तज्ज्ञांनीं असा शोध लावला आहे कीं, हिंदुस्थानांत भूमितीच्या सहाय्यानें तयार केलेलीं ज्योतिर्विषयक कोष्टकें होतीं; परंतु तीं केव्हां तयार झालीं याचा पक्का अदमास लागत नाहीं. कांहीं विद्वानांचें असें म्हणणें आहे कीं, फार प्राचीन कालीं प्रत्यक्ष वेध घेऊन तीं तयार केलेलीं असावीं व तो प्राचीन काल म्हणजे ख्रिस्तापूर्वी तीन हजार वर्षांचा असला पाहिजे असें बेली वगैरे विख्यात ज्योतिर्विदांचें म्हणणें आहे. आतां हें मत जर ग्राह्य धरावयाचें तर त्याबरोबरच त्या कालीं अगर त्या कालाच्या पूर्वी पुष्कळ वर्षें हिंदुस्थानांत भूमितीशास्त्राची वाढ झाली असली पाहिजे असें मानणें प्राप्त आहे. हीं दोन्ही तत्त्वें मान्य झाल्यावर भूमितींतील प्रास्ताविक व आरंभींचे कांहीं सिद्धांत हिंदुस्थानांतून युरोपांत म्हणजे

प्रोसमध्यें गेले असले पाहिजेत हें म्हणणें कोणासही सहज पटण्यासारखें आहे.

भूमितींतिल एक प्रख्यात सिद्धांत असा आहे कीं, काटकोन त्रिकोणाच्या कर्णावरील चौरसाचें. क्षेत्रफळ त्याच काटकोन त्रिकोणाच्या इतर दोन बाजूंवरील चौरसांच्या क्षेत्रफळांच्या बेरजेबरोबर असतें. तीन बाजूंची लांबी दिली असतां एकाद्या त्रिकोणाचें क्षेत्रफळ काढतां येतें हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. हे दोन्ही सिद्धांत ग्रीक लोकांस ठाऊक नव्हते व याच गोष्टीवरून हिंदू भूमिती-कोविदांची थोरवी सर्व जगाच्या प्रत्ययास येण्यासारखी आहे. ”

परंतु सूल्वसूत्रांची रचना खिस्ती शकापूर्वी ८ व्या शकांत झाली व युक्लिडच्या पहिल्या पुस्तकांतिल ४७ वा सिद्धांत पायथागोरासनें प्रथम सिद्ध केला असें जें मानण्यांत येतें तें बरोबर नाहीं. कारण पायथागोरसच्या पूर्वी विदान दोन शतकें तरी तो हिंदूंना माहीत होता याबद्दल पुरावा आहे. म्हणून पायथागोरसनें हिंदूंपासून भूमितीचें बरेंच ज्ञान उचललें असें जें श्रूडरचें म्हणणें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

एल्फिन्स्टन म्हणतो कीं, “ त्रिकोणाचें क्षेत्रफळ त्याच्या बाजूंनीं व्यक्त करतां येतें ही हिंदूंस पूर्ण अवगत असलेली गोष्ट क्लॅवियसनें युरोपांत प्रसिद्ध करीपर्यंत कोणास माहीत नव्हती. त्याचप्रमाणें त्रिज्या व परिघ यांजमधील परस्पर प्रमाण हिंदु लोक जें मानीत व तें ज्या मापनानें मोजण्यांत येई तें हल्लींच्या शोधावरून निघालेल्या प्रमाणाशीं पडताळून पाहतां अगदीं तंतोतंत जुळतें आहे. त्रिकोण व वर्तुळ यांच्या गुणधर्मांचें उद्घाटन वरील दोन उदाहरणांवरून केलेलें पाहिलें म्हणजे हिंदूंच्या भूमितीज्ञानाच्या खोलपणाची खात्री पटते. अगदीं गेल्या शतकापर्यंत ह्या गोष्टी युरोपियनांस माहीत नव्हत्या व त्याच हिंदूंस हजारों वर्षांपूर्वी माहीत असाव्या यापेक्षां त्यांची श्रेष्ठता सिद्ध करण्यास आणखी पुरावा तो कोणता पाहिजे ? ”

प्राचीन ग्रंथांचा जितका जितका जास्त शोध लागेल तितका तितका प्राचीन भारतीय आर्यांच्या ज्ञानराशीवर जास्त प्रकाश पडून. आधुनिक. ज्ञानधनमदोद्धत युरोपियन पंडित यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडून त्यांची दृष्टि निवळेल व हिंदुस्थानाबद्दल यथार्थ ज्ञान करून घेण्याची त्यांस इच्छा होईल असें दिसतें. असतु. शेवटीं काऊंन्ट जानस्टर्ना यानें दिलेलें एक उदाहरण देऊन हें भूमितीचें प्रकरण आटपूं.

काऊंन्ट जॉनस्टर्ना म्हणतो कीं, “ अकबर बादशहाच्या आयने अकबरी नामक सरकारी पुस्तकांत वर्तुलाचा व्यास परिघाच्या १२५०–३९२७

ह्या प्रमाणांत असतो असें दिलेलें आहे. अर्थात् हें प्रमाण हिंदूंपासून घेतलें आहे यांत शंका नाहीं. मेटियसचें ११३-३५५ हें प्रमाण व १२५०-३९२७ हें प्रमाण यांत वस्तुतः विशेष फरक नाहीं. आतां हें प्रमाण बसविण्यास एका वर्तुलामध्यें ७६८ भुजांचा बहुकोण काढतां आला पाहिजे व तो काढण्यास नुसत्या अंकगणीताच्या ज्ञानानें पुरें पडणार नाहीं. त्याकरितां वक्ररेषा व नवमांशाचें Ninth power दशमस्थानापर्यंत वर्गमूळ काढतां आलें पाहिजे. अर्थात् इतकें ज्ञान असल्याशिवाय त्यांनीं वरील प्रमाण ठरविणें अशक्य आहे. परंतु या गोष्टी ग्रीक अथवा आरब यांपैकीं कोणासच माहीत नव्हत्या. त्या ते पुढें हिंदूंपासून शिकले असले पाहिजेत. ''

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्राचीन काळीं हिंदूंचें भूमितीचें ज्ञान अफाट वाढलें होतें, व त्यांजपासून पुढें सर्व जगानें तें घेतलें ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी ढळढळीत असल्यानें त्याजविषयीं अपेक्षां जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं.

बीजगणीत.

बीजगणीतांतील प्राचीन भारतीय आर्यांस कोणकोणत्या गोष्टी माहीत होत्या हें पाहूं. प्रो. वॉलेस व कोलब्रूक यांच्या मतें करणी पद्धतीचें (urd roots) गणीत, अनेकवर्ण समीकरणांची सामान्य पृथक्करणपद्धती, एकवर्ण समीकरणाच्या अनिर्णित सिद्धान्ताचें सामान्य उत्तर काढण्याची रीती, अनेकवर्ण समीकरणाचे एक उदाहरण अनिश्चित पद्धतीनें सोडविलें असतां त्यावरून अनेक उत्तरें "काढण्यासाठीं सर्वसाधारण नियम योजणें, नियमीत संख्येस शून्यानें भागलें असतां भागाकार असंख्य येणें, अनेकवर्णात्मक समीकरणांचें उत्तर प्रथम ती एकवर्णात्मक अगर वर्गसमीकरणाच्या रूपांत विच्छेदून नंतर त्यास नित्य सामान्य नियम लागू करणें इत्यादि प्रकार त्यांस माहित होते. ह्या पद्धती म्हणजे अदमासाचें काम नसून शास्त्रशुद्ध, नित्य सर्वसंमत सिद्धांत आहेत; आणि त्यांचें ज्ञान त्यांनीं पद्धतशीर रीत्या संपादलें होतें हें प्राचीन ग्रंथावरून दिसून येतें. ला ग्रांज (La Grauge) याच्या संशोधनानें गणित, शास्त्रांत पुढें जी प्रगति झाली त्या काळापर्यंतच्या युरोपियन गणितज्ञानाइतकें हें आहे हें कोणीही कबूल करील.

प्लेफेअर म्हणतो कीं, '' बीजगणीताची परिभाषा ज्योतिषशास्त्राच्या पुस्तकांत वापरणें व या दोन शास्त्रांचा उपयोग परस्परांच्या परिपोषास करून घेणें अशी स्थिति

येण्यास अनेक वर्षांचा अभ्यास व अनेक विद्वानांचे अव्याहत परिश्रम अवश्य असावे लागतात.'' हिंदूंच्या एकंदर गणितशास्त्राचा अभ्यास केल्यास प्लेफेअर म्हणतो तशी स्थिति आहे असें दिसून आल्याशिवाय रहाणार नाहीं. ह्यावरून हिंदूंची गणित-शास्त्रांत झालेली प्रगती, त्यांच्या गणिताचा पुराणकालीनपणा व त्यांची स्वाभावीक कुशाग्र बुद्धि आणि योजकता हे गुण स्पष्ट होतात.

मागील अंकगणित व भूमिती यांच्या प्रतिपादनांत हिंदूंच्या अचाट बुद्धिचातुर्याचें व कल्पकतेचें जें समर्पक व आदरयुक्त युरोपियन पंडितांचें वर्णन दिलेलें आहे ते येथें फिरून देण्याची आवश्यकता दिसत नाहीं. कारण कीं, त्यांच्या कीर्तीचा परिमल त्रिखंड भेदून राहिला असल्यामुळें वास्तवीक या आगंतुक युरोपियन पंडितांच्या शिफारशीची मुळींच जरूरी नाहीं, परंतु हल्लीं आम्हांमधील आत्मप्रत्यय कमी झाल्यानें व ज्या त्या गोष्टींत परक्याकडे पाहण्याची संवय झाल्यामुळें प्राचीन शास्त्रग्रंथांत स्वतंत्र संचार करून पूर्वजांच्या कौतुकास्पद गोष्टींचा व कृतींचा परिचय करून घेणें होत नाहीं. सबब दुधाची तहान ताकानें भागवून घेणाऱ्यांच्या साठीं (आम्हांसाठीं) कित्येक वेळां पुनरुक्तीचा दोष पतकरून युरोपियन पंडितांचे आपल्या पूर्वजांबद्दलचे प्रशंसापर उद्गार द्यावे लागतात.

कोलब्रूक, मॅनिंगबाई, प्रो. मोनियर वुइल्यम्स, एल्फिन्स्टन यांचे मागें उद्धत केलेले उतारे परत देण्याची जरूर नाहीं. ह्यावरून एकच गोष्ट प्रामुख्यानें दिसते ती अशी कीं, ज्याप्रमाणें अंकगणीत व भूमिती या दोन शास्त्रांत जगाचें गुरुत्व हिंदुस्थानाकडे प्राचीन काळीं होतें त्याचप्रमाणें बीजगणितांतही होतें.

'एडिन्बरो रिव्ह्यू' नामक मासिकांत पुढील उतारा आहे. '' $Ax^2 + B$ (अक्ष^2+ब.) ही पूर्ण वर्गात्मक संख्या 'क्ष'च्या कोणत्या किंमतीनें होईल '' असा प्रश्न आहे. या प्रश्नाचा मोठा मजेदार इतिहास दिलेला आहे. डायफॅन्टस यानें हा प्रश्न सोडविण्याचा थोडाबहुत प्रयत्न प्रथम केला. नंतर फरमाट (Feremat) यानें १७ व्या शतकांत त्याच पद्धतींत आणखी फरक करून तो प्रश्न इंग्रजी बीजगणितज्ञाकडे पाठविला. शेवटीं त्याचें संपूर्ण व समाधानकारक उत्तर प्रख्यात यूलर नामक गणीतज्ञानें दिलें. परंतु शेवटीं यूलरची (Euler) रीत व भास्कराचार्यांची रीत एकच आहे असें आढळून आलें.''

पुढें त्याच मासिकाच्या २९ व्या भागाच्या १५३ पानावर असें

म्हटलें आहे कीं, " भास्कराचार्यांनीं जें विशिष्ट उदाहरण दिलेलें आहे तेंच लॉर्ड ब्रॉंकर यानें १६५७ सालीं स्पष्ट करून सांगितलें, आणि त्याच प्रश्नाचें जें सामान्य उत्तर १७६७ सालीं डीलाग्रांज यानें दिलें तें ब्रह्मगुप्त यानें दिलेल्या उत्तरापेक्षां मुळींच निराळें नाहीं. "

हिंदू व ग्रीक बीजगणितज्ञ यांजमध्यें जो एल्फिन्स्टनच्या मतें मुख्य फरक आहे तो नवीन शोधांच्या बाबतींत नसून रीतींच्या सोपेपणांत आहे. हिंदूंची बीजगणितांतील पृथक्करणाची एक फार आवडती रीत होती तिचा १६२४ पर्यंत जगास पत्ताही नव्हता. ती प्रथम बाचेट डी मेझेरिक यानें युरोपांत प्रसिद्ध केली व यूलरनें जिचा अंगिकार केला ती ह्याहून मुळींच भिन्न नव्हती.

हिंदूंच्या ज्योतींविषयक शोधांत व भूमितीच्या उपपादनांत बीजगणिताचा उपयोग केलेला दिसतो तो त्यांचाच शोध आहे व हा उपयोग करण्याची हातोटी पाहून सर्वांस त्याबद्दल मोठा विस्मय व आदर वाटतो.

हिंदूंच्या अंकगणीत, बीजगणीत व भूमिति, या शास्त्रांवरील ग्रंथांसंबंधानें कोलब्रूक म्हणतो कीं, " हल्लीं एकंदर गणितशास्त्राची जी वाढ झाली आहे त्या समयीं व सांप्रतच्या सुधारलेल्या पृथक्करणात्मक पद्धतीच्या कालीं ह्या पुस्तकांच्या भाषांतरापासून विशेष लाभ होईल असें वाटत नाहीं. परंतु गणितशास्त्राच्या इतिहासाच्या दृष्टीनें मात्र थोडाफार फायदा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. जेव्हां गणितज्ञाचें लक्ष प्रथम हिंदूंच्या ज्योतिषशास्त्राकडे व तत्संलग्न इतर विषयांकडे वेधलें गेलें त्या काळीं जर हें भाषांतराचें काम झालें असतें तर बीजगणितास त्या वेळीं मदत झाली असती. व गेल्या शतकांत ज्या रीती शोधून काढाव्या लागल्या व संशुद्ध कराव्या लागल्या त्या कराव्या लागत्या ना. "

हिंदूंच्या पडत्या काळांत समाजाची व शास्त्रांची वाढ होण्याचें बंद पडून कांहीं प्राचीन अवशेष शब्दूंच्या माऱ्यापुढें व आसुरी नाशलालसेपुढें शिल्लक उरतात कीं नाहीं याबद्दल अत्यंत धास्ती वाटावयास लागली होती. परंतु अशी स्थिति येण्याच्या पूर्वीं साधारणतः गणितशास्त्राची किती वाढ झाली होती हें दाखविण्यास ' ललितविस्तार ' नामक ग्रंथांतील एक उदाहरण घेऊं.

विल्के म्हणतो कीं, " बुद्धाच्या जन्माच्या पूर्वी त्याची परीक्षा घेण्यांत आली त्या वेळीं त्यास एका योजनांत किती परमाणु वसतात असा प्रश्न घालण्यांत आल

होता, व त्याचें त्यानें जें उत्तर दिलें त्यावरच विख्यात शास्त्रज्ञ आर्चिमिडिज यानें आपलें ' आरिनारीयस ' पुस्तक रचलें. ''

आतां गणितशास्त्रांतील एका भागाचा किंचित् विचार करून या शास्त्राचा निरोप घेऊं.

शून्यलब्धी (Differential calculus) याचा शोध आपण लावला असें पाश्चात्यांचें म्हणणें आहे; परंतु जगद्विख्यात गणिती भास्कराचार्य यानें या पद्धतीचा उपयोग केलेला आहे. मात्र एवढें खरें कीं, त्यानें पूर्वीच्या लेखकाप्रमाणें या विषयाचा सहज उपन्यास करून तो पुढें वळला आहे; सविस्तर वर्णन देण्याच्या व लांबलचक प्रतिपादन करण्याच्या भानगडींत तो पडला नाहीं असें त्याच्या ग्रंथावरून दिसतें.

स्पॉटिश्वूड व लेथब्रिज हे म्हणतात कीं, सांप्रतच्या शून्यलब्धीसारखी एक पद्धति भास्कराचार्यांच्या ग्रंथांत आढळते, व त्याच्या सारख्या ज्योतिष्यास ती अवश्य असल्यानें ती त्यास माहीत असली पाहिजे. हल्लींच्याच स्वरूपांत अगर परिणत अवस्थेंत ती असेल असें जरी आग्रहानें व नेटानें सांगतां आलें नाहीं तरी ती त्यास व त्याच्या पूर्वगाम्मी गणितज्ञास माहित असली पाहिजे यांत कांहीं शंका नाहीं.

प्रकरण पंधरावें.

ज्योतिषशास्त्र.

ज्योतिष शास्त्राच्या अभ्यासानें मन अतिशय प्रफुल्लित होतें. अगणित तारकांचें अफाट प्रदर्शन पाहून कोणाचें मन प्रशांत होणार नाहीं ? विश्वाच्या दरबारांतील अनेक वस्तूपैकीं तारकामय नभोमंडळ ही एक अत्यंत मूल्यवान् चीज आहे. निकट सहवासामुळें आपणास त्याचें विशेष कौतुक वाटत नाहीं; परंतु हें नभोवितान जरी दररोज दृष्टीस पडणारें आहे, त्यांतील असंख्य तारका व नक्षत्रें दररोज उगवतात व मावळतात हीं गोष्ट जरी चिरपरिचयाची आहे तरी त्याचें मनोहारित्व केव्हांही नष्ट झालेलें नाहीं.

रजनीच्या प्रशांत समयीं जर एकादा निसर्गभक्त झोपेस दूर सारून उघड्या प्रदेशांत येऊन बसला, व आकाशाकडे टक लावून नक्षत्रांच्या राशीसबंधानें विचार करूं लागला, तर त्याची रात्र केव्हांच निघून जाईल. रात्रीच्या वेळीं आकाशांत घडणारे फेरबदल व घडामोडी त्याच्या दृष्टीस आपोआप पडतील व जिव्हेस शीण न देतां, घसा कोरडा न करितां, कोणत्याही प्रकारचें पुस्तकादि साहित्य न बाळगतां त्यास किती तरी ज्ञान होईल! मिल्टन कवीनें म्हटल्याप्रमाणें आकाश हें परमेश्वरानें मनुष्यास दिलेलें पुस्तक आहे. त्यांतून त्या जगन्नियंत्याच्या उपदेशाचें पठण करणें, ईश्वरी आदेश समजून घेणें व परमेश्वरी स्वरूपाचें ज्ञान करून घेणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. ज्या मानानें ह्या पुस्तकाची तयारी होईल त्या मानानें प्रत्येक राष्ट्रास सुधारणासंपन्नतेचा चांद मिळेल ईश्वरी विश्वविद्यालयांत ज्योतिषशास्त्राचा विषय प्रमुख असून त्यांत प्रत्येक राष्ट्ररूपी छात्रास पदव्या मिळू शकतात. या पुस्तकांत जे मुख्य विषय आहेत ते असे:—सृष्टीच्या सर्वांगाचा अभ्यास, दिव्य तेजानें प्रकाशणाऱ्या गोलांच्या हालचाली, उत्पात, उल्कापात, ग्रहणें, युति, भिन्न ग्रहांचे उदयास्त, धूमकेतू, निरनिराळ्या ग्रहांपासून एकामेकांवर घडणारे परिणाम, परस्परांचीं—अंतरें, इत्यादि, इत्यादि. या विषयांचा अभ्यास जगाच्या आरंभापासून सुरू आहे व त्यांत प्रत्येक राष्ट्र आपल्या शक्तिप्रमाणें भर घालीत असून व प्राविण्याबद्दल जगाकडून धन्यवाद घेत आहे. तरी अजून कशास कांहीं पत्ता नाहीं अशी या शास्त्राची स्थिति आहे. विद्वानांच्या मतें ज्योतिषशास्त्र हें राष्ट्रसुधारणेचें चिन्ह असून संस्कृतीचें माप आहे. आतांपर्यंत ज्योतिषशास्त्राबद्दल विद्वान मंडळींत काय काय समजुती रूढ आहेत या पाहिल्या म्हणजे त्यापुढें त्यांच्या अनुरोधानें हिंदुस्थानच्या स्थितीचें प्राचीन काळापासून परीक्षण करण्यास बरें पडेल. डॉ. सर विल्यम हंटर व एक्रिनटन या दोन विद्वानांच्या मतानें हिंदुस्थानांत प्राचीन कालीं या विषयाची लोकांस फार मोठी अभिरुचि असून, त्यांत त्यांनीं अत्यंत प्राविण्य संपादन केलें होतें. सध्यां जिवंत असलेलें ज्योतिष वाङ्मय प्राचीन आर्यांच्या अफाट बुद्धीचें यथायोग्य प्रदर्शन करितें व त्यांच्या विमल आणि सात्विक संस्कृतीचें बिंब—प्रतिबिंब-न्यायाने सर्व जगास उदाहरण घालून देतें. परंतु एवढीच जर त्याची कामगिरी असती तर त्यास इतकें महत्व प्राप्त झालें नसतें. त्यास जी एवढी किंमत येते ती त्यापासून हिंदु संस्कृतीचा प्राचीन काळ ठरतो म्हणून. ऐतिहासिक अवशेष शिल्पक नसतां, प्राचीन लेख वगैरे मिळणें शक्य नसतां आणि इतर सर्व साधनांचा पूर्ण

अभाव असतां हिंदुस्थानचा प्राचीन काळ ठरविणें फारच अवघड जातें. अशा स्थितींत ज्योतिषग्रंथ हे त्या कामीं फार सहायभूत होत असल्यानें ह्या शास्त्राची भातव्वरी विशेष वाढली आहे. ज्योतिषशास्त्राचा इतिहासकार बेली म्हणतो कीं, "हिंदूंच्या ज्योतिष विषयक वेधांच्या तक्त्यावरून अनुमान काढतां त्यांचा प्राचीन इतिहास फार दूरपर्यंत जाऊन पोचतो; व त्यांचा हेब्रयू शास्त्रांशीं मुळींच मेळ बसत नाहीं. आजपर्यंत हेब्रयू शास्त्रें प्राचीन काल ठरविण्यास अत्यंत विश्वासार्ह, प्रमाणभूत व खात्रीलायक आहेत अशी विद्वानांची समजूत असे; परंतु अलीकडे बेलीच्या अत्यंत परिश्रमपूर्वक केलेल्या गणितावरून तो विश्वास डळमळून पडला आहे व विद्वानांचें लक्ष आर्य ज्योतिषाकडे प्राचीनकालनिर्णयार्थ लागलें आहे; व प्राचीन आर्यांच्या संस्कृतीबद्दल, आश्चर्यकारक विद्वत्तेबद्दल व आदरणीय संस्थाबद्दल पूर्ण ऐकमत्य दिसून येऊं लागलें आहे. परंतु एवढें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे कीं, हल्लीचे ग्रंथ अवशेष रूप असून, ज्यास व्यापक शास्त्र म्हणतात व ज्यावर दांडगी ग्रंथसंपत्ति असावी लागते ती सर्व नष्ट झाली आहे."

वेबरच्या मतानें हिंदुस्थानांत ख्रिस्तपूर्व २७८० मध्यें ज्योतिषाचा अभ्यास सुरू होता, परंतु कॅसिनी, बेली, जेंटिल, फेफेअर इत्यादि ज्योतिर्विदांच्या मतें तीन हजार वर्षांपेक्षां सुद्धां जास्त मागील काळांत हिंदुस्थानांत या शास्त्राचा अभ्यास सूरू असून त्या वेळचे ग्रंथ सुद्धां अजून अस्तित्वांत आहेत व त्यावरच वरील मंडळीची मोठी भिस्त आहे. अशा प्राचीन काळीं केलेल्या गणिताचें एक उदाहरण घेऊं. कलियुगाच्या प्रारंभीं ज्योतिषशास्त्र हिंदुस्थानांत पूर्णपणें भरभराटीस आले होतें असें काउन्ट-जॉन्स्टर्ना यानें सप्रमाण सिद्ध केलें आहे. तो म्हणतो कीं, "हिंदूंच्या ज्योतिर्विषयक गणितावरून कलियुग ख्रिस्ताच्या पूर्वी ३१०२ या वर्षीं फेब्रुआरीच्या २० व्या तारखेस २ तास २० मिनिटें व ३० सेकंदें या वेळीं सुरू झालें असें सिद्ध करितां येतें. हिंदू असें समजतात कीं त्या वेळीं ग्रहांच्या संस्मरणीय, युति होत्या व असें त्यांनीं आपल्या कोष्टकांत लिहून ठेवलें आहे. याच वेळचे गणित बेलीनें करून असें ठरविलें आहे कीं त्या वेळीं गुरु व बुध हे बरोबर क्रान्ति वृत्तावर होते, मंगळ ८° अंशावर असून शनि फक्त सातच अंशावर होता. त्यांच्या अशा स्थितींत ते सूर्य तेजानें निस्तेज होऊन कांहीं काळ अदृश्य होणें साहजिक आहे; व हिंदू ज्या चार ग्रहांच्या युति लिहून ठेवतात ते शनि, मंगळ, गुरु व बुध हेच क्रमानें

असावेत असें उघड दिसते. त्या वेळीं शुक्र जरी दिसणें शक्य नव्हतें तरी या ग्रहांची युति होण्यास कोणतीच हरकत दिसत नाहीं. हल्लीं त्या काळचें गणित करून पाहिलें असतां ब्राह्मणांच्या तत्कालीन गणिताशीं इतकें तंतोतंत जुळतें कीं त्यांनीं प्रत्यक्ष वेध घेऊन ते केलें असलें पाहिजे, ही समजूत ठाम होते.

" फ्रान्सचा राजा १४ वा लुई यानें लॉ बेरी नामक ज्योतिष्यास सयामच्या राजाकडे वकील म्हणून पाठविलें होतें. त्यानें १६८७ सालीं तेथें दिसलेल्या सूर्य-ग्रहणांचीं कोष्टकें बरोबर आणलीं. त्याचप्रमाणें कर्नाटकमधील पॅटूइलेट पाद्री व तिरवेलूर येथील जेंटिल यांनींहीं कांहीं तक्ते हिंदुस्थानांतून पाठविले होते. व ते सर्व पडताळून पाहतां इतके बरोबर जमले कीं सर्वांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं; व मजा अशी कीं ह्यापैकीं प्रत्येकानें आपआपले तक्ते हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतून व निरनिराळ्या वेळीं पाठविले होते; परंतु काकतालीयन्यायानें ते सर्व तक्ते एका ठिकाणीं होऊन त्यांतील प्रमाणांनीं एकाच सिद्धान्तास पुष्टि येण्यास मदत झाली. यावर बेलीचा काय अभिप्राय आहे तो पहा. ४३८२ वर्षांपूर्वीं हिंदु ज्योतिषशास्त्रज्ञांनीं घेतलेले वेध, लॉ बेरीनें पाठविलेले तक्ते व अलीकडच्या काळांत कॅसिनी व मेयर यांनीं केलेलीं गणितें यांमध्यें एका मिनिटाचा सुद्धां फरक पडत नाहीं. यावरून प्राचीन आर्यांनीं ते शोध घेण्याच्या कामीं केवढी दक्षता व सूक्ष्मदृष्टी योजलेली असेल याची कोणासही सहज कल्पना करितां येईल. चंद्राच्या गतींत हिंदु ज्योतिष्यांनीं जे संस्कार शोधून काढले तेच टायकोब्राही यांसही मिळाले. या सर्व गोष्टींवरून व प्रमाणांवरून हिंदू संस्कृतीचा काळ किती जुना आहे व त्यांची ह्या शास्त्रांत केवढी पारंगतता होती हें दिसून येईल. जर ३००० वर्षांपूर्वीं बेलीच्या गणिताप्रमाणें भूमिति व ज्योतिष या दोन शास्त्रांत हिंदूंनीं इतके अपूर्व प्रावीण्य संपादलें होतें तर तें ह्या स्थितीप्रत येण्यास याच्यामागें किती वर्षांचा अभ्यास कारणीभूत झाला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. कारण कीं त्या वेळीं अर्वाचीन मुद्रणसाहित्य नसल्यानें ज्ञानाचा प्रसार जलद होत नसे व अशा साधनाभावीं मन सुसंस्कृत, परिपक्व व स्वतंत्र विचारक्षम होण्यास त्यास धिमेधिमेच चालावें लागले असेल एरवीं अशा गोष्टी साध्य होत नाहींत. "

अनेक उदाहरणांवरून आर्यांच्या ज्योतिषज्ञानाच्या प्राचीनतेबद्दल सर्वांची खात्री पटण्यासारखी आहे. फार प्राचीन कालापासून त्यांची कीर्ति सर्वत्र प्रसृत

झालेली आहे. आरबी ग्रंथांवरून लातिन भाषेंत ज्या ज्योतिष ग्रंथांचें भाषांतर झालेलें आहे त्यांत गृहकक्षेच्या शिरोबिंदूला जो संस्कृत शब्द आहे तो तसाच योजण्यांत आला आहे. संस्कृत 'उच्च' शब्दावरून पुढें इतर युरोपियन भाषांत ऑक्स (Oux) हा शब्द बनलेला आहे; त्याचप्रमाणें रोमन शाहींत 'क्रानिकॉल पाशेल' नामक जें राजदप्तर लिहिण्यांत येत असे त्यांत योजिलेला 'अण्डुबेरियस' अथवा 'अर्डुबेरियस' हा आर्यभट्टाचाच अपभ्रंश असला पाहिजे व आरबांनींही 'अर्जबहार' म्हणून त्याची थोरवी गायिलेली आहे.

आर्यावर्तांत–ज्योतिषशास्त्र प्राचीन कालीं सर्व राष्ट्रांच्या अगोदर उदयास आलें म्हणून त्याची वाहवा करावयाची असें नाहीं. केवळ प्राचिनत्वामुळें आर्यावर्तास कोणीही महत्व देणार नाहीं. त्यांत टिकाऊ, सर्व काळीं लागू पडणारे व बिनचूक असे सिद्धान्त प्रतिपादले गेले आहेत म्हणूनच त्यास एवढी मोठी किंमत आहे. उदाहरणार्थ; सत्तावीस नक्षत्रें, बारा राशी, गृहांच्या मध्यम गति, विषुव चलन, पृथ्वीचें अंतरिक्षांत अधांत्री रहाणें अगर आलंबशून्य स्थिति, आपल्या आंसाभोंवतीं पृथ्वीची दैनंदिन फेरी, आपल्या आंसाभोंवती चंद्राची प्रदक्षिणा, त्याचें पृथ्वीपासून अंतर, गृहांच्या कक्षेची परिमाणें, ग्रहणांचें गणित या सर्व ज्योतिर्विषयक बाबी बिनचूक निरीक्षणानें व यथायोग्य अनुमानानेंच ठरविलेल्या आहेत व त्यामुळें आर्य ज्योतिषशास्त्राचें नांव जगभर गाजलेलें आहे. इतका अभ्यास व अशी बिनचूक व सर्वमान्य अनुमानें अति महान् संस्कृतीशिवाय केव्हांही अस्तित्वांत येणें शक्य नाहीं. प्रगल्भशास्त्रांची निपज म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे. वर्षेंच्या वर्षें लोटावीं तेव्हां कोठें एकादा सिद्धान्त अस्तित्वांत येतो. शास्त्रसंगोपन व वाढ हें काळजीचें, अभ्यासाचें, कालाचें व अभिरुचीचें काम आहे व या सर्व गोष्टी केवळ सुसंस्कृत राष्ट्रेंच करूं शकतात. रानटी स्थिति व शास्त्रप्रगति यांचें साहचर्य कोणीही क्षणभरसुद्धां कल्पिणार नाहीं. अशा अफाट व अगाध बुद्धिप्रकर्षानें ज्यांनीं ज्योतिषशास्त्राची उभारणी केली त्यांच्या सिद्धान्त सोडविण्याच्या रीती, गणिताच्या पद्धति, वेध घेण्याचे प्रकार व शोध करण्याची हातोटी अपूर्वच असणार यांत काय संशय ? ही गोष्ट एल्फिन्स्टन, प्रो. विल्सन यांनीं प्रांजलपणें कबूल केली आहे. सूर्यसिद्धान्ताचें भाषांतर प्रो. व्हिटनेनें आपल्या अमेरिकन प्राच्यमंडळाच्या नियतकालिकांत छापल्यावर असा वाद निघाला कीं नक्षत्रें कोणी शोधून काढलीं ? पारिसमधील प्रख्यात

वायोनामक ज्योतिषी च बर्लिनमधील प्रो. बेवर यांजमध्यें हा वाद चालू झाला. पहिल्याचें म्हणणें कीं हिंदूंनीं नक्षत्रें स्वतः कल्पिलेलीं नसून तीं चिनी लोकांपासून त्यांनीं घेतलीं. परंतु चिनी लोकांचा स्यू हा शब्द (Sieu) व हिंदूंचा नक्षत्र हा शब्द या दोन शब्दांत फार अंतर आहे. स्यूचा अर्थ फक्त एकच तारा असा आहे. याच्या उलट नक्षत्राचा अर्थ तारकासमूह अथवा तारकामय व्योमभाग असा आहे. ख्रिस्ती शकापूर्वी फार तर २००–३०० वर्षें हा शब्द चिनी लोकांस माहीत असावा; परंतु नक्षत्र हा शब्द वेदग्रथांत आढळून येतो असे बेवरचें म्हणणें आहे. यावरून हिंदूंची कल्पना व पुराणत्व आपोआप सिद्ध होत आहे.

आरब हे हिंदूंचे शिष्य असून आपलें ज्योतिषशास्त्र त्यांनीं बहुतेक आर्य ज्योतिषावरून रचलें. प्रो. बेवर व सर हंटर यांच्या मतें आरबांनीं सातव्या व आठव्या शतकांत हिंदू ग्रंथांचीं भाषांतरें करून नेलीं, व ते ब्राह्मण ज्योतिषाजवळ शिकले. हिंदू ज्योतिषांना आदरपूर्वक बोलावणें खलिफ हरूनल रशिद व अल्मामन यांच्या दरबारीं दिलेलें असे; व तेथें पुष्कळ विद्वान लोक हिंदुस्थानांतून जात; याच लोकांच्या सहाय्यानें खाली दिसेल्या सिद्धान्ताचें भाषांतर झालेलें आहे. आरबी भाषेंत सिद्धांताला सिन्दहेंड असा शब्द वापरलेला आहे. एकंदर नऊ सिद्धान्त आहेत ते असेः--

(१) ब्रह्मसिद्धान्त, (२) सूर्यसिद्धान्त, (३) सोमसिद्धान्त, (४) बृहस्पति-सिद्धान्त, (५) गार्ग्यसिद्धान्त, (६) नारदसिद्धान्त, (७) पाराशरसिद्धान्त, (८) पुलस्त्यसिद्धान्त, (९) वशिष्टसिद्धान्त.

युरोपियन लोकांस माहीत असलेल्या या सर्व सिद्धांतांत श्रेष्ठ म्हणजे सूर्यसिद्धांत होय. हा फार पुराणकालीं रचलेला असावा असा त्यांतील दोन श्लोकांवरून तर्क आहे.

कल्पादस्माच्च मनवः षड् व्यतीताः ससन्धयः ।
वैवस्वतस्य च मनोर्युगानां त्रियनो गतः ॥ २२ ॥
अष्टविंशाद्युगादस्माद्यातमे तत्कृतं युगम् ।
अतः कालं प्रसंख्याय संख्यामेकत्र पिण्डयेत् ॥ २३ ॥

प्रत्येक मनु–कृत, त्रेत, द्वापार व कली अशा–चार युगांचा मिळून झालेला असतो.

अर्थ--चालू वैवस्वत मन्वंतरापूर्वी संधिकालासह सहा मनु होऊन गेले

आहेत व चालू मनूचीं तीन युगें पुरीं झालीं आहेत. सबब एकंदर बेरीज केली असतां पहिल्या कृतयुगापासून आजपर्यंत एकंदर २७ युगें होऊन गेलीं व चालू अठ्ठाविसावें आहे. अशा तऱ्हेनें कालाचें मापन करून एकंदर संख्या काढावी. सूर्यसिद्धान्तरचनेच्या कालासंबंधीं वरील श्लोक लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. डेन्हीस व हाउटन यांच्या मतें पाराशरमुनि अनुक्रमें ख्रिस्तापूर्वी चवदाव्या व बाराव्या शतकाच्या अखेरीस असावा असें खुद्द त्यांच्या गणितावरून यांनीं काढलें आहे. अर्थात् काउन्ट जान्स्टर्ना म्हणतो त्याप्रमाणें खाल्डियन, अरब व ग्रीक यांच्यापूर्वी हा होऊन गेला यांत कांहींच संशय राहत नाहीं.

पाराशर मुनीच्या नंतर आर्यभट्ट फलज्योतिषी झाला. याचा नक्की काल अजून ठरला नाहीं; परंतु तो विक्रमादित्यापूर्वी होऊन गेला हें निश्चित आहे. युरोपियन पंडितांच्या मतें यास पृथ्वीची दैनंदिनगति, सूर्यचंद्राच्या ग्रहणांचे सिद्धान्त व अयनबिंदु व विषुव यांचें चलन इत्यादि गोष्टी माहीत होत्या. याचे मुख्य ग्रंथ तीन आहेत:—

(१) आर्यभट्टिका, (२) दशगीतिका, (३) आर्याष्ट-शतक.

आर्यभट्टानंतर अत्यंत विख्यात वराहमिहिर नांवाचा फलज्योतिषी होऊन गेला. ज्योतिषी म्हणून जरी याची कीर्ति कमी नसली तरी मुख्यत्वेंकरून हा फलज्योतिषी म्हणूनच प्रसिद्ध आहे. यानें ज्योतिषशास्त्रावर थोडी बहुत ग्रंथरचना केली आहे. परंतु याचे मुख्य ग्रंथ फलज्योतिषावरच लिहिलेले आहेत. हा ख्रिस्ती शकापूर्वी पहिल्या शतकांत होऊन गेला व विक्रमादित्याच्या नवरत्नांत याची गणना होत असे. नवरत्नांचीं नांवें पुढील श्लोकांत दिलेलीं आहेत:—

धन्वंतरिः क्षपणकोऽमरासिंहशंकु-।
वेतालभट्ट-घटखर्पर-कालिदासाः ॥

वराहमिहिराचे मुख्य ग्रंथ पुढें दिल्याप्रमाणें आहेत:-(१) बृहज्जातक, (२) बृहत्संहिता, (३) पूर्वीच्या पंचसिद्धान्तांचा सारांश.

मॅनिंगबाई लिहिते कीं, " बृहत्संहिता पुस्तकांतील अत्यंत चित्ताकर्षक गुण म्हटला म्हणजे विस्तृत सुबोध विवेचन होय. या ग्रंथाची प्रख्यात आरबी फलज्योतिषी अल्बिरुणी यानें फारच वाहवा केली आहे. यांत भूगोल, बांधकाम, खोदकाम इत्यादि विषयांची माहिती (फलज्योतिष या मुख्य विषयाशिवाय) भरपूर दिलेली आहे. "

शेवटचा जगविख्यात ज्योतिषी भास्कराचार्य होय. हा अगदीं अलीकडच्या काळीं म्हणजे १२ व्या शतकांत होऊन गेला. गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांतावरील सुबोध व खुबीदार विवेचन व इतर अनेक गणितग्रंथ याबद्दल याचें नांव अखिल ज्ञानी जनांस अवगत झालेलें आहे.

पृथ्वीच्या वर्तुलाकारासंबंधीं ऐतरेय ब्राह्मणांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे:—

" ह्या इंद्रलोकतुल्य समारंभानें कल्शऋषीचा मुलगा तूर यानें जनमेजयास पावन केलें व नंतर त्यानें संपूर्ण वर्तुलाकार पृथ्वी जिंकली. "

त्याचप्रमाणें भट्टी काव्यांतही वर्णन आहे.

पञ्जरमध्ये कक्षया परिवेष्टितः खमध्यगतः
मृज्जलशिखिवायुमयो भूगोलः सर्वतोवृतः

पृथ्वी, आप, तेज व वायु यांनीं युक्त असलेला हा भूगोल पिंजऱ्यामध्यें ठेवलेल्या पोपटाप्रमाणें आकाशाच्या पोकळींत फिरत राहिलेला आहे; व याच मताचा अनुवाद भास्कराचार्यांच्या गोलाध्यायांत केलेला आहे. ज्योतिषशास्त्रज्ञांची परंपरा पुढें कायम होती. तेराव्या शतकानंतर सतराव्या व अठराव्या शतकापर्यंत कित्येक ज्योतिषी होऊन गेले व त्यांपैकीं राजा जयसिंग याची हकिगत पुढें दिली आहे. केशव व गणेश दैवज्ञ हे मधल्या ३०० वर्षांत प्रख्यात ज्योतिषी होऊन गेले. परंतु ही परंपरा चालविणारे ज्योतिषी मध्यें होत असून त्याच मालिकेंतील शेवटचा राजा जयसिंग होय.

आर्यभूमींत तत्वज्ञानी, कवी, ज्योतिषी, गणिती इत्यादि निरनिराळ्या शास्त्रांतील पंडितांची एकसारखी परंपराच लागली होती असें दिसतें. मध्यंतरीं अनेक घडामोडी झाल्या, असंख्य राजक्रांत्या घडल्या, समाजपरिवर्तनेंही त्याचप्रमाणें अगणित झालीं. परंतु इतर प्रकारच्या वैभवास जशी ओहोटी लागलेली दिसते तशी ज्ञानलालसेस लागलेली दिसत नाहीं. याचा ताजा नमुना म्हणजे राजा जयसिंग होय. हा प्रख्यात ज्योतिषी नुकताच दोनशें वर्षांपूर्वी होऊन गेला. जयपूर, उज्जयिनी, मथुरा, काशी, दिल्ली इत्यादि ठिकाणीं यानें वेधशाळा बांधलेल्या असून त्यापैकीं काशी येथील वेधशाळा अजून त्याच्या कर्तबगारीची साक्ष देत आहे. यानें १७०२ सालीं प्रसिद्ध झालेलीं डी ला हायरची ज्योतिर्विषयक कोष्टकें दुरुस्त केलीं आहेत; व आपण स्वतः " झिज महंमदशाही " नामक एक नक्षत्रांची वर्गीकर-

णात्मक यादी लिहिली असून तिजवरून त्याच्या बुद्धिमत्तेची कल्पना करतां येते अथवा थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे त्यानें स्वहस्तानें उभारलेलें हें शास्त्रविषयक आपलें स्मारकच होय.

सर्व शास्त्रांपेक्षां या शास्त्रास उपकरणबाहुल्याची फार जरूर आहे. हल्लींप्रमाणें अति सूक्ष्म यंत्राची, वेधसाधनाची, निरीक्षणोपकरणाची मदत नसतां वर सिद्ध केल्याप्रमाणें. अति प्राचीन कालीं सुद्धां इतका गहन अभ्यास व्हावा हें खरोखर तत्कालीन विद्वानांस अत्यंत भूषणास्पद आहे यांत काय संशय ? प्रख्यात युरोपियन ज्योतिषी फेअर म्हणतो कीं, " ब्राह्मणांची शोध लावण्याची **चपलता व विनचूक शैली** खरोखर आश्चर्यकारक आहे. " या एकाच वाक्यावरून सर्व शास्त्रांच्या वाढीची उपपत्ति लागेल. पुढेंही यासच पुष्टि देणारा उतारा प्रो. स. विल्यमच्या लेखणींतून उतरला आहे. " ब्राह्मणपंडित दशलक्ष, महापद्म इत्यादि सारख्या गणितांतील संख्या सहज कल्पितात, व त्यांचा उपयोग गणिताच्या कामीं करून घेतात; या सारख्या संख्या काय आहेत, त्यांचा कसा व कोठें उपयोग करावयाचा, अशी भूस्तरशास्त्रज्ञ, ज्योतिषी वगैरे इतर देशांतील पंडितास मोठी अडचण पडते. परंतु हिंदू पंडितांना त्यांचें कांहींच वाटत नाहीं. अनंतपटी, असंख्यपणा, व यांच्या खालोखालच्या संख्या कल्पण्यास, त्यांना नावें देण्यास, त्या लोकांच्या बुद्धीच्या आटोक्यांत आणण्यास व गणितांत रूढ करण्यास त्यांस कांहींच अडचण भासत नाहीं. अडचण भासल्याबरोबर त्यांनीं काल्पनिक वस्तूस सत्य व व्यवहार्य सृष्टींत आणून सोडलेंच; त्यांच्या बुद्धीच्या टप्प्यांत कोणती गोष्ट येत नव्हती असें कधींच झालें नाहीं. परंतु आमच्या कम नशिबानें त्यांच्या बुद्धिविलासाचीं ग्रंथरूपी फलें फारच थोडीं आजतागायत हयात आहेत. परंतु त्यांत सुद्धां अजून असें कांहीं सिद्धान्त लिहिलेले आढळतात कीं त्यांची युरोपियन विद्वानांस फोड व्हावयाची आहे असें सर विल्यमचें म्हणणें आहे. उदाहरणार्थ, सूर्यसिद्धान्ताच्या दुसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभीं ग्रहांच्या गतीसंबंधीं जो एक चमत्कारिक सिद्धान्त केला आहे त्याचें कोडें अजून कोणांसच उकललें नाहीं. अस्तु. एवढ्यावरून आपल्या पूर्वजांनीं ज्योतिषशास्त्रांत केवढी भर टाकली, त्यांतील अक्षय सिद्धांत कसे अल्प साधनांनीं परंतु सूक्ष्मभेदी दृष्टीनें हुडकून काढले; त्यांचें प्रतिपादन किती उत्तम तऱ्हेनें व मनाजोगें केलें आहे हें पाहिलें म्हणजे मति अगदीं गुंग होऊन

जाते, व आपणास त्यांचे वंशज म्हणवून मिरविण्यास क्षणभर लाज वाटते. परंतु अजूनही जोपर्यंत संस्कार नष्ट झाले नाहींत; आम्ही अवनतीच्या कर्दमांत पूर्ण गाडले गेलों नाहीं तोंपर्यंत कामास लागल्यास त्यांच्या आशीर्वादानें पुन्हा पूर्वस्थितीवर येण्यास कांहीं वेळ लागणार नाहीं. आर्यभूवर परमेश्वराची पूर्ण कृपा आहे; परंतु तिची प्रजाच नादान निघाली तर देवानें तरी काय करावें ? सबब हा आमच्या वरील आरोप आम्ही कृतीनें काढून टाकूं तर पूर्वजांचें यश मलिन करण्याच्या आरोपांतून आपली सुटका होईल. नाहीं तर आजपर्यंत जी स्थिति भोगली तिच्यापेक्षां कष्टतर स्थिति भोगणें प्राप्त होईल हें निराळें सांगणें नकोच.

प्रकरण सोळावें.

युद्धकला व युद्धशास्त्र.

ऋग्वेदादि आद्य ग्रंथांपासून तों महाभारत, रामायण व अगदीं अलीकडील काळांतील संस्कृत व प्राकृत ग्रंथ घेतल्यास त्यांत युद्धाचीं रम्य वर्णनें, वीरांचे पराक्रम, धर्मयुद्धाचे नियम, सैन्यांची हालचाल, व्यूहाची रचना इत्यादि गोष्टी आपणास पदोपदीं पाहावयास मिळतील. त्याचप्रमाणें कित्येक ठिकाणचीं पराक्रमाचीं वर्णनें वाचल्यास तीं खरोखर कपोलकल्पित आहेत असं वाटल्यांशिवाय राहणार नाहीं. परंतु ज्या देशांत बलभीम, अर्जुन, भीम, बली, सगर, परशुराम इत्यादि पौराणिक योद्धे होऊन गेले त्यांच्या अनुमानावरून हीं वर्णनें खोटीं आहेत असें मानणं म्हणजे फारच धाडसाचें होईल. दुसरी गोष्ट अशी कीं, आर्यांनीं जेव्हां हा देश पादाक्रान्त केला त्या वेळची सुस्थिति, विपुलता, निर्भयता, स्वातंत्र्य वगैरे अनुकूलता लक्षांत घेतली असतां असे पराक्रमी पिंड पोसणार नाहींत असें तरी कां मानावें ? (वसाहतीच्या भागांत सांगितल्याप्रमाणें) ज्यांनीं त्या वेळीं ज्ञात असलेलें सर्व जग पादाक्रांत केलें त्यांचे पराक्रम असामान्य असल्यास आश्चर्य काय ? सबब कविकल्पनांचें अवगुंठन काढून टाकल्यास जो भाग राहील तो तत्कालीन योद्धांच्या वर्णनाचा; व असा भाग काहीं सामान्य प्रतीचा राहील असें कोणाही विचारी माणसास वाटणार नाहीं. हल्ली मात्र सर्व भूतलावर वसाहति स्थापणें

म्हणजे धाडसाचें व कौशल्याचें शतकृत्य असें मानलें जावें, आणि तत्कालच्या सिद्ध गोष्टी मात्र सब झूट म्हणून झिडकारिल्या जाव्या हा कोण जुलूम, पक्षपात व वृथाभिमान ? जर हे दुर्गुण टाकून निर्मल दृष्टीनें आपण प्राचीन इतिहासाकडे पाहिले तर त्या काळच्या वीरांचे लष्करी पराक्रम, नाविक कौशल्य, दर्यावर्दी धाडस, व्यूहरचनाचातुर्य इत्यादि गुण आपल्या डोळ्यांत भरल्याशिवाय राहणार नाहींत. त्या वेळचे व्यापारी किती दूरच्या दर्यावर्दी फेऱ्या करीत व अगणित संपत्ति आणीत हें पाहिलें म्हणजे तत्कालीन राजांजवळ नाविक बल असलें पाहिजे, व त्याच्याच मदतीनें ते अशा व्यापाराचें रक्षण करीत असावे हें आपणास दिसून येईल. मनु व स्ट्रॅबो या दोघांच्या ग्रंथांत असें नाविक बल व सरकारच्या अठरा कारखान्यांपैकीं नाविक कारखाना असल्याचें दिसून येतें. अर्थात हें ज्ञान लोकांमध्यें रूढ होण्यास त्या कालीं कांहीं साधनें असलीं पाहिजेत. राजाकडून शिक्षण मिळो, व्यापारी स्वतःच्या हिंमतीवर प्रत्यक्ष संकटाशीं तोंड देऊन व्यापारानें राष्ट्राची संपत्ति वाढवून अनुभविक शहाणे बनोत अथवा कांहीं ग्रंथ असोत; कोणत्याही कां रीतीनें होईना; लोक युद्धशास्त्रांत व दर्यावर्दी युद्धांत प्रवीण होते एवढी गोष्ट खरी. भारतभूमीच्या व वसाहतींच्या राज्याचें दान ईश्वरानें त्यांच्या हातावर सोडलें असें कांहीं कोणासच मानतां येणार नाहीं. शिवाय जरी धनुर्वेद हल्लीं लुप्त आहे तरी त्याचें नांव सर्वतोमुखीं असतां भलतेंच अनुमान करणें केव्हांही शहाणपणाचें होणार नाहीं. मात्र महाभारतांत, अग्निपुराणांत व इतर ग्रंथांत या विषयावर व्याख्यान रूपानें कोठें कोठें कांहीं माहिती आली आहे त्यावरून पूर्वी असा एक ग्रंथ असावा, त्यांत इतक्या प्रकारचे विषय प्रतिपादलेले असावे असें खात्रीलायक मानतां येतें. यासंबंधानें डॉ. हंटर म्हणतो कीं, "सैन्याच्या हालचाली, रचना, तळ, सैन्यपुरवठा यासंबंधी सविस्तर नियम असून त्यांपैकीं बरेच महाभारतांत दिलेले आहेत." दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी कीं, त्या वेळीं सैन्याचें आधिपत्य प्रत्यक्ष राजांच्या हातीं असून युद्धाचा बरा वाईट परिणाम त्यांच्या धोरणावर, कौशल्यावर, रणविद्येवर व पुढारीपणावर अवलंबून असे. परंतु राजे लढाईतून नामोहरम होऊन परत आल्याचीं उदाहरणें फारच क्वचित आढळतात. कारण अशा राजांस त्यांच्या आया, बहिणी व पत्नी तोंड दाखवूं नका असें साफ उत्तर देत. सबब हा घरांतील अपमान पत्करण्यापेक्षां रणशय्येवर अखेरच्या प्रसंगीं पडणेंच त्या काळच्या वीरांस ज्यास्त श्रेयस्कर वाटे. आणखी जे

राजे अमे पराक्रम करीत, व अखिल पृथ्वीचें राज्य जिंकून राजसूय यज्ञ करीत त्यांस लष्करी शिक्षण मिळत नसेल असें कसें म्हणतां येईल ? उलट तो एक क्षत्रियाच्या शिक्षणांतील महत्त्वाचा भाग असे असें आपणास पुराणांवरून दिसतें. गुरुगृहीं ही विद्या त्यास शिकविली जाई. राम व इतर राजपुत्र विश्वामित्रापाशीं धनुर्विद्या शिकले; लहुकुशांस वाल्मीकीनें पढविलें, पांडवांचा गुरु द्रोण असून त्यानें ती विद्या परशुरामापासून घेतली होती इत्यादि गोष्टी उघड उघड दिसत असतां लष्करी शिक्षणाची उपेक्षा होत होती असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. सबब तें कसें दिलें जात असे, त्यांत कोणकोणत्या अस्त्रांचा उपयोग होत असे तें पाहूं. हिंदू लोक युद्धाच्या कामीं ज्या युक्त्याप्रयुक्त्या योजीत त्या फारच महत्त्वाच्या आहेत. हिंदु लोक सैन्याची विभागणी खालीं दिल्याप्रमाणें करीत.

(१) उरस्, (२) कक्षा, (३) पक्ष, (४) प्रालिग्रह, (५) कोटी, (६) मध्य व , (७) पृष्ठ.

विभागणी केल्यानंतर शत्रुपक्षाच्या हालचाली, सामर्थ्य, स्थलाची अनुकूलता इत्यादि पाहून निरनिराळ्या विभागांची मांडणी व आंखणी करावी लागत असे. विभागांचे रचनेस व्यूह असे म्हणत. त्याचे दोन प्रकार आहेत. (१) मध्यभेदी, व (२) अंतर्भेदी. याशिवाय त्यांचे पोटभेद दिलेले आहेत व त्यांचीं नांवें आकारसादृश्यावरून ठेवलेलीं आहेत. पहिल्या व्यूहाचे सहा प्रकार आहेत. (१) मकरव्यूह, (२) श्येनव्यूह, (३) शकलव्यूह, (४) अर्धचंद्र, (५) सर्वतोभद्र (पोकळ चौरस), व (६) गोमूत्रिक.

दुसऱ्या भेदाचे चार प्रकार आहेत:--(१) दण्ड, (२) भुज, (३) मंडल, व (४) असंहत. यांखेरीज पोटभेद आहेत.

उदाहरणार्थ दंडाचे सतरा, भुजाचे पांच व मंडल आणि असंहत यांचे आणखी बरेच पोटभेद आहेत. अशा रीतीनें सर्व युद्धरचना शास्त्रोक्त असे. परंतु पुष्कळ वेळां सेनापतीच्या कल्पकतेवरून व परिस्थितीच्या मानानें आणखीहि प्रकार उपयोगांत आणावे लागत. ज्याप्रमाणें जरूरी भासते व अडचणी जास्त येतात त्याप्रमाणें दुसरे उपाय योजणें भाग पडतें अशा रीतीनें शास्त्राची वाढ होत असते. शास्त्राची वाढ खुंटली म्हणजे राष्ट्राची अवनति यास सुरुवात झाली असें समजावें. हाच न्याय आपणास महाभारतकाली दिसतो. त्या वेळीं हिंदु राष्ट्रांत चैत-

न्याचें वारें पूर्ण खेळत होतें. अर्थात् मागील लोकांनीं आपल्या अनुभवानें घालून दिलेले नियम त्या कालीं पुरे पडेनात. उदाहरणार्थ युधिष्ठिराने अर्जुनास सूची-मुखव्यूह रचण्यास सांगितलें असतां अर्जुनानें वेळ प्रसंग पाहून वज्रव्यूहाचा उपयोग केलेला दिसतो व दुर्योधनानें त्यावर अभेद्यव्यूहाची तोड योजिलेली दिसते. परंतु पुढें हिंदू राष्ट्राच्या ऱ्हासास प्रारंभ झाल्यावर स्वतंत्र कल्पनाशक्ति नष्ट झाली व याचाच परिणाम वाडलाच्या सपत्तावर अल्पसंतुष्टपण लोक समाधान मानू लागले. हा न्याय सर्वत्र सारखाच लागू असलेला दिसतो.

सैन्याचे मुख्यतः चार प्रकार असतः--(१) अश्वदल, (२) गजदल, (३) रथदल, आणि (४) पदाति. गजदलाचा उपयोग मेकॉलेनें म्हटल्याप्रमाणें सजीव लोह-दंडासारखा, शत्रूच्या संरक्षणसाधनाचा संहार व चुरा करण्याच्या कामीं करीत. प्रो. मॅक्सडंकर म्हणतो कीं, " चंद्रगुप्तानें सेल्यूकसला गज-बल दिलेलें होतें व त्याच्या जोरावर त्यानें अँटोगॉनस वर. फ्रिजियामध्यें इप्सस येथें विलक्षण जय मिळवून सीरीया व ऑशियामायनर हे प्रांत काबीज केले. " टेसियसच्या (Ctesias) मताप्रमाणें हिंदुस्थानांतील हत्तींच्या जोरावर सीरस (Cyrus) चा पराभव होऊन तो मारला गेला.

आतां यापुढें हिंदू लोकांच्या लष्करी गुणांचें थोडक्यांत कथन करूं. युद्धाच्या कालीं जिवाची पर्वा न धरतां शत्रूवर तुटून पडणें, कधीं.माघार न घेणें, .धन्याकरितां वाटेल ते हाल सोसणें, नेकी, इमान, सोशिकपणा, कर्तव्यदक्षता, साहस, पराक्रम, धैर्य, मितपणा इत्यादि गुण प्रमुखपणें पाळले जात. अर्काटच्या वेढ्याच्या वेळीं हिंदू शिपायांनीं दाखविलेला दिलदारपणा सर्वश्रुतच आहे. दुसरें उदाहरण १७८२ सालच्या टिपूबरोवरच्या लढाईंतलें आहे. सेनापति मॅथ्यू सर्व शिपायांसह शत्रूच्या हातांत सांपडला होता त्या वेळीं बाहेरच्या शिपायांनीं हरतऱ्हेनें व कोणत्याहि संकटास न जुमानतां आपल्याजवळची प्रत्येक पै किल्ल्यांत पाठविण्याची शिकस्त केली व त्यास सांगून पाठविलें कीं, " आमचें कसेंहीं होईल, आम्हांस काय वाटेल रीं चालेल; परंतु आपलें मात्र मांसाशिवाय चालणार नाहीं. सबब आम्ही आपल्या शक्तीप्रमाणें मदत पाठविली आहे त्याचा स्वीकार करावा. " सातसेकमा काली पेरुकी राज्यकर्त्यांच्या मुखातून व परकी प्रेक्षकांच्या लेखणींतून अशा प्रकारच्या गुणांचें वर्णन होतें, तेव्हां त्यांत सत्यता असेल याबद्दल कोणासच शंका घेण्यास जागा नाहीं.

युद्धाच्यां धुमश्चक्रींत आपल्या सैन्यास त्वेष व स्फुरण यावें म्हणून कोणीही परकी अथवा स्वजातीय सेनापति काय वाटेल ते प्रशंसापर उद्गार काढतील, परंतु युद्धाच्या उष्णतेबरोबर अशा प्रलापांतील गरमपणाही थंड होतो. शांततेच्या थंड कालीं लेखकाच्या थंड डोक्यांतून धन्यवादाचे उष्ण विचार व शब्द जेव्हां बाहेर पडतात तेव्हां मुळांत लेखकाच्या मेंदूवर अशा गुणांनीं खोल परिणाम केला असला पाहिजे असें मानल्यावांचून गत्यंतरच रहात नाहीं. अशा लेखकांपैकीं सर चार्लस नेपियर, सेनापति वूल्से, एल्फिन्स्टन, क्राइव्ह, लॉरेन्स स्मिथ, कूट, हॅलिबर्टन इत्यादि प्रमुख होत.

अशा पराक्रमी हिंदूंचीं हत्यारें काय होतीं हें जाणण्याची प्रत्येकास जिज्ञासा असणें अगदीं स्वाभाविक आहे. साधारणतः प्राचीन कालीं धनुष्याचा उपयोग सर्वत्र होत असलेला आपण पाहतों; परंतु हिंदूंची धनुर्विद्येंत फारच गति होती असें दिसतें. एका धनुष्यामधून एकाच वेळीं चार ते नऊ बाण सोडल्याचें प्रो. विल्सन सांगतो. अशा रीतीचें धनुर्विद्यानैपुण्य प्राचीन हिंदूंत सर्वत्र दिसतें. अर्जुनासारखे धनुर्धर, पृथ्वीराजासारखे शब्दवेधी, मत्स्यवेधी, अचुक नेम मारणारे कसलेले तिरंदाज, आपले बाण परत आणणारे पटु तिरंदाज सर्वत्र असत. आस्ट्रेलियन रानटी लोकांत 'बूमरँग' नांवाचें फिरून मागें येणारें बाणासारखे हत्यार पाहिल्यानंतर युरोपियन लोकांची खात्री झाली. तोपर्यंत त्यांस हिंदु लोक आपले बाण काम झाल्यानंतर परत घेत ही गोष्ट सुद्धां वेडेपणाची कल्पना आहे असें वाटे. दुसरें अतिशय उपयोगांत असलेलें हत्यार म्हणजे तरवार होय. ह्याची परकीयांस इतकी भीति वाटे व हिंदु लोक इतक्या कुशलतेनें याचा उपयोग करीत कीं, त्यांचें नांव सर्व लोकांत महशूर झालें आहे. या तरवारीच्या निष्ठुर व कौशल्यपूर्ण उपयोगावरून इतर भाषांत तद्दर्शक शब्दप्रयोग रूढ झाले आहेत. उदाहरणार्थ एक फारशी म्हण घेऊं. ती अशी आहे कीं, हिंदू उत्तर देणें म्हणजे हिंदुस्थानांतील तरवारीनें जखम करणें. त्याचप्रमाणें एका 'सोबाव मो आलक' या प्रख्यात आरबी काव्यांत असें म्हटलें आहे कीं, "जवळच्या नातलगांचा जुलूम हा हिंदु तरवारीच्या घांवांपेक्षां फारच कडक व वेदनादायक आहे."

वरील दोन्ही परकीय भाषेंतील अवतरणावरून एवढें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, हिंदु तरवारीची चव परकीयांस मिळाली असली पाहिजे. ज्या अर्थी भाषेमध्यें एवढा शब्दप्रचार रूढ होण्यापर्यंत मजल गेली त्या अर्थी हिंदूंनीं आपली

तरवार कशी गाजविली असेल, त्यांचा दरारा केवढा असेल, परकीय लोक त्यांस प्रथम कसे चळचळां कांपत असतील याची त्यावरून यथार्थ कल्पना होईल. ही जशी पराक्रमाची गोष्ट झाली तशी या हिंदू हत्यारांचें पाणी व धातु हीं सुद्धां उत्कृष्ट असत. कित्येक वर्षें त्यांजवर गंज चढत नसे. त्यांचा उपयोग होत असतांना तीं सहसा मोडण्याची भीति नसे; अशा तऱ्हेनें धातूची कमाई केलेली असे. वर दिलेल्या दोन हत्यारांशिवाय आणखीही पुष्कळांचा ते उपयोग करीत. त्यांचे मुख्यतः पांच वर्ग कल्पिलेले आहेत:—(१) यंत्रमुक्त–यंत्राच्या अगर कळीच्या साहाय्यानें फेकलेलीं अस्त्रें, (२) हस्तमुक्त–हातानें फेंकलेलीं, (३) मुक्तामुक्त–जंबिया, त्रिशूल, (४) तरवारी, गदा वगैरे, (५) नैसर्गिक–मूठ वगैरे. या खेरीज पुराणकालीं भिंदिपाल, तोमर,नाराच, परशु, कृपाण, क्षेपणी, पाश इत्यादि हत्यारें उपयोगांत असत.

सांप्रतच्या युद्धांतील वरील हत्यारांशिवाय तोफ हें एक विशेष हत्यार आहे. प्राचीन कालीं दारूचा उपयोग हल्लींइतका होत नसे ही गोष्ट खरी; म्हणून धुराची दारू प्राचीन लोकांस मुळींच माहीत नव्हती असें म्हणणें निवळ वेडेपणाचें होईल. युरोपियन लोकांची ही समजूत आहे व आपणच काय ते धुराच्या दारूचे शोधक असा त्यांस फार अभिमान आहे. परंतु प्राचीन ग्रंथांतील उताऱ्यांवरून आपणास तिच्याविषयीं कांहीं माहिती मिळाल्यास पाहूं. प्रथम महाकाव्यांतून व पुराणांतून वाटेल तेवढीं उदाहरणें देतां येतील. मात्र एवढें खरें कीं, पूर्ण खात्रीलायक शास्त्रीय ग्रंथ लुप्त झाल्यानें आपली तहान अशा रीतीनें निवडलेल्या असंबद्ध श्लोकावर व वाक्यावर भागवून घ्यावी लागते. परंतु या गोष्टीस इलाज नाहीं. असें जरी आहे तरी या तुरळक व तुटक माहितीवरून ही कला प्राचीन कालीं बरीच वाढीस लागली होती असें स्पष्ट दिसतें. प्रथम मध्ययुगाकडेच दृष्टि पोंचवूं. त्या वेळीं तोफा व बंदुका यांचा उपयोग सर्रास होत असे. ' पृथ्वीराज ' ग्रंथांत २५ व्या श्लोकांत म्हटलें आहे कीं, ' तोफा व बंदुका यांचा आवाज दहा कोस ऐकूं गेला.'

नृप पंग नयर छूटे अराब । कोटह कंगूर चठि चठि सिताब ॥
जंबूर तोप छूटही झनंकी । दश कोश जाय गोला भनंकि ॥
सिरदार मार बाराह रोह । लंगी अभंग वर हनै कोह ॥

अयोध्येच्या राजाच्या दरबारीं असलेला राजा कुंडनलाल नामक हिंदु इतिहासकार म्हणतो कीं "लिच्छम ' नामक एक फार मोठी तोफ अयोध्येमध्यें होती.

पण यापूर्वी ती अजमीरच्या महाराजापाशीं होती. टपालाची पद्धत व खातें असून युद्धशास्त्राबद्दलही त्यानें माहिती दिली आहे. (मुंतखाब टाफसी–अल अखबर पान १४९–५०)

माफी म्हणतो कीं, " अग्न्यस्त्रांचा उपयोग करण्यांत हिंदूंची पोर्च्युगीज लोकांवर फार कडी आहे." फरि आई सुज्ञा म्हणतों कीं, पोर्च्युगीज लोकांवर तोफांनीं हल्ला करणारें एक हिंदी जहाज आपण पाहिलें आहे. १५०२सालीं कालिकत बंदरांत अशींच जहाजें होतीं व १५०२ सालीं ३८० तोफांनीं झामोरिनच्या लोकांनीं हल्ला केला. "

यापुढें प्राचीन कालाकडे वळून तोफखान्यासंबंधीं कांहीं माहिती मिळाल्यास पाहूं. महाकाव्यें व पुराणें वाचीत असतांना आपणास अस्त्र हा शब्द फार आढळतो. उदाहरणार्थः––रामास निरनिराळीं अस्त्रें देतांना विश्वामित्र खालील दोन अस्त्रांचा उल्लेख करतो.

आग्नेयमस्त्रन्दयितं शिखरन्नाम नामतः । (रामायण.)

आग्नेयमस्त्रं लब्ध्वा च भार्गवात्सगरो नृपः ।
जिगाय पृथिवीं हत्वा तालजंघान्सहैहयान् ॥ (हरिवंश.)

" भार्गवापासून आग्नेय अस्त्र मिळविल्यानंतर सगर राजानें पृथ्वी जिंकली व तालजंघ आणि हैहय यांना ठार मारिलें. "

उर्वस्तु जातकर्मादि तस्य कृत्वा महात्मनः ।
अध्याप्य वेदानखिलांस्ततोस्त्रम्प्रत्यपादयत् ॥
आग्नेयन्तु महाबाहुरमरैरपि दुस्सहम् ।
स तेनास्त्रबलेनाजौ बलेन च समन्वितः ॥

अर्थः––त्यां महात्म्याचीं जातकर्में उर्व ऋषीनें करून त्याजकडून वेदाभ्यास करविला व नंतर देवांना सुद्धां असह्य असें जें आग्नेय अस्त्र तें त्यास दिलें. अशा तऱ्हेनें चतुरंग बल व अग्न्यस्त्र यांनीं युक्त असा तो राजा राम युद्धामध्यें सज्ज असे

ब्रह्मास्त्र या शब्दाचा उपयोग संस्कृत ग्रंथामधून वारंवार केलेला पहावयास मिळतो.

प्रोफेसर विल्सन आपल्या संस्कृत कोशांत त्याचा अर्थ ब्रह्मापासून (ब्रह्म शब्दापासून) निघालेलें जें काल्पनिक अस्त्र त्यास ब्रह्मास्त्र असें म्हणतात असा देतो.

श्रीमद्भागवतांत द्रोणपुत्र व अर्जुन यांचें ब्रह्मास्त्रानें झालेलें युद्ध वर्णिलें आहे. रेव्हरंड बानर्जी म्हणतो कीं, ब्रह्मास्त्र म्हणजे आधुनिक तोड्याची बंदूक होय. ब्लॅव्हॅट्स्की म्हणतो कीं, " प्राचीन कालीं हिंदु लोक अग्न्यस्त्राचा उपयोग करीत नसत असें म्हणतां येणार नाहीं. "

काश्मीरचा राजा व हल यांच्यामध्यें युद्ध झालें त्या वेळीं मातीचे हत्ती करण्यांत आले व ते योग्य प्रसंगीं फुटून जिकडे तिकडे धूर झाला असें लिहिलें आहे. यावर टीका करतांना एलियट लिहितो कीं, फक्त आपोआप भडका उडाला असें कसें होईल ? त्याकरितां कांहीं तरी ज्वालाग्राही पदार्थांची योजना केली असली पाहिजे.

ॲरिस्टाटल यास पाठविलेल्या पत्रांत अलेक्झांडर लिहितो कीं, " हिंदुस्थानांत माझ्या सैन्यावर भयंकर ज्वालायुक्त पदार्थ पडले. "

ह्याचप्रमाणें थेमिस म्हणतो कीं, " हिंदुस्थानांतील ब्राह्मण दूर उभे राहून जळणाऱ्या व गर्जना करणाऱ्या हत्यारांनीं लढतात. "

वरील उदाहरणावरून स्पष्टपणें एवढेंच दिसतें कीं, हिंदु लोक अशा अग्निमान अस्त्रांचा भरपूर उपयोग करीत. मात्र परदेशीय लोकांस त्यांचा उपयोग माहित नसल्यानें त्यांचा फार संहार होई व त्यांस अत्यंत विस्मय वाटे. प्रो. विल्सन म्हणतो कीं, " अशाच अस्त्रांपैकीं एक वज्रास्त्र म्हणून असे. त्याचा उपयोग दूर अंतरावर असलेल्या पदार्थांचा नाश करण्याच्या कामीं केला जाई. त्यास गति मिळण्यास दारूसारखा गतिदायक कांहीं तरी पदार्थ असला पाहिजे यांत संशय नाहीं. " याशिवाय वैद्यक ग्रंथ वाचले असतां दारूची कृति आर्यांस माहित नसावी असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. ज्या देशांत सोरा, गंधक व कोळसा हे दारूचे घटक मुबलक सांपडतात व ज्यांच्या वैद्यक ग्रंथांत सर्व खनिज पदार्थांचें सूक्ष्म विवेचन केलेलें आढळतें त्यांस या प्रत्येक अथवा तिघांच्या मिश्रणाचा ज्वालाग्राही धर्म माहीत नसेल असें मुळींच मानतां येणार नाहीं. सबब हिंदुस्थानांत अस्त्रें होतीं, त्याच्या कामीं दारूचा उपयोग करीत हें मागें सांगितलेलें अनुमान सिद्ध आहे असें मानण्याशिवाय इलाज नाहीं. वर दिलेल्या अनुमानापेक्षां जास्त स्पष्ट पुरावा रामायणांत मिळतो.

अयोध्येचें वर्णन करतांना व इतर ठिकाणींही असें स्पष्ट म्हटलें आहे कीं,

ज्याप्रमाणें ख्रियांस दागिने त्याप्रमाणें नगरीस गोपुरें व प्रासादतलें असतात. त्यांचें संरक्षण करण्यास तोफांची फार जरूरी आहे व त्या तटावर ठेवलेल्या असत.

पुराणांतरीं युद्धाचें व किल्ल्याचें वर्णन करतांना तोफांना शतघ्नी असें म्हटलें आहे. शतघ्नी म्हणजे शंभरांना मारणारी. संस्कृत कोशामध्यें जें यंत्र लोखंडाचे लहान गोळे अथवा इतर पदार्थ फेंकून शेंकडों माणसें मारते त्यास तोफ असें म्हणतात अशी शतघ्नीची व्याख्या दिली आहे; व तिला वृत्रघ्नी, काली असेंही म्हणतात.

शतघ्नी व इतर त्याच जातीचीं यंत्रें रामायणांतील खालील श्लोकांत सांगितलीं आहेत.

सर्ग.....	.....श्लोक.
३	१२, १३, १६, १७;
४	२३;
२१	शेवटचा.
३९	३६;
६०	५४;
६१	३२;
७६	६८;
८६	२२;

शतघ्नी लोखंडाची केलेली असून तिचा आकार झाडाच्या लट्ठ फांद्या अथवा खोडें यांसारखा असतो असें सुंदरकांडांत म्हटलें आहे व पुढेंही त्याच काव्यांत अशा तोफा केवळ किल्ल्यावर चढवून ठेवावयाच्या नसून त्या रणांगणावर ओढून नेतात असें म्हटलें आहे. रामायणाशिवाय पुराणांत निरनिराळ्या ठिकाणीं तोफा व बंदुका यांना ' सहस्रघाती ' ' उल्हाट यंत्रें ' अशीं नांवें दिलीं आहेत.

" राजपुरुषानें (Magistrate) विषयुक्त हत्यारें, तोफा बंदुका, अस्त्र अथवा एकादें कपटयंत्र यांच्या सहाय्यानें युद्ध करूं नये " या हिंदु धर्मशास्त्रांतील वाक्यावर टीका करतांना हालहेड म्हणतो कीं, " अलेक्झांडर यास हिंदुस्थानांत तोफा व बंदुका हीं हत्यारें पहावयास सांपडलीं ह्या आजपर्यंत भ्रामक वाटणाऱ्या विधानावर यापुढें लोकांचा विश्वास बसूं लागेल. हिंदुस्थान व चीन या देशांत फार प्राचीन काळापासून दारूचा उपयोग माहीत आहे. अग्न्यस्त्र म्हणजे वेळूच्या एकाद्या

नळांतून सोडलेला अग्निमुखाचा बाण. पूर्वी याच्या पुष्कळ तऱ्हा होत्या. त्यांपैकी एक चमत्कारिक अशी होती कीं, ' हें अस्त्र सुटल्यावर त्याचे हवेंत पुष्कळ विभाग पडत. असे विभाग पडल्यावर तें एकाद्या झाडाच्या फांदीसारखें दिसे. त्यांतील प्रत्येक भाग पेटलेला असून तो विझवणें फार अवघड जात असे; ' परंतु आलिकडे हें हत्यार नष्ट झालें आहे. या सर्व हत्यारांचा शोधक विश्वकर्मा होता असें म्हटलें आहे. ''

हिंदुस्थानचा परराष्ट्रीय मंत्री एलियट (१८४५) यानें प्राचीन कालीं हिंदुस्थानांत अस्त्रांचा उपयोग लोक कसा, कोठें व कितपत करीत असत, त्याचें स्वरूप कोणत्या प्रकारचें होतें, तीं उडविण्याची पद्धत काय होती, किती अंतरावरून तीं सोडलीं जात वगैरे सर्व गोष्टींची चर्चा केल्यावर शेवटीं म्हणतो कीं, '' गंगाकांठच्या प्रदेशांत निसर्गसिद्ध सोरा (Saltpetre) व उत्तर हिंदुस्थानांत गंधक सुबलक सांपडत असल्यानें व ह्या पदार्थांच्या ठिकाणीं भडका होणें, पेट घेणें वगैरे सहजप्राप्त धर्म असल्यानें त्यांचा अस्त्रांच्या कामीं उपयोग केला जात असे असें म्हणण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. अथवा हिंदुस्थानांत हे पदार्थ मूळचे विपुल असल्यानें त्यांपासून अशा अस्त्रांची युक्ति सुचली असावी असें हिंदूंच्या इतर सर्व विद्या व कला यांवरून मानण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. ''

येथपर्यंत तोफा, बंदुका वगैरे सर्व प्रकारचीं वन्ह्युत्पादक अस्त्रे यांविषयीं चर्चा केली. यानंतर जलास्त्रासंबंधीं कांहीं माहिती मिळाल्यास पाहूं. मूळचे शास्त्रग्रंथ लुप्त झाल्यानें हिंदुस्थानांत प्राचीन काळीं येऊन राहिलेले परदेशीय ग्रंथकार काय म्हणतात याजवर एकाद्या भिकाऱ्यासारखें विसंबून रहावें लागतें. त्यांची माहिती सर्वस्वीं विश्वसनीय आहे असें म्हणण्याचा आमचा कटाक्ष नाहीं. उलट आम्ही असें म्हणतों कीं, त्यास भाषेच्या अडचणीमुळें, देशास्थिति, चालिरीती, अल्पकालीन राहणें या सर्व गोष्टींमुळें विश्वसनीय माहिती मिळणें कठीण; पंरतु त्यांचे लेख म्हणजे इतिहास व आमचीं पुराणें म्हणजे ब्राह्मणांनीं रचिलेलीं थोतांडें, त्यांस शास्त्रीय ग्रंथांची किंमत देणें अयोग्य असा अलीकडे समज प्रसृत होत चालल्यामुळें अशा आक्षेपकांचें समाधान सुवर्णकार-कर्णछिद्र न्यायानें करणें बरें अशी आमची समजूत असल्यामुळें विशेषतः परदेशीय लेखकांचेच उतारे आम्ही उद्धृत करतों.

टेसियस, एलियन, फिलॉस्ट्रेटस, लासेन, युसेबी, सालबर्टी इत्यादि सर्व

ग्रंथकार प्राचीन कालीं हिंदु लोक युद्धाच्या कामीं दाहक पाण्याचा उपयोग करीत असें नमूद करतात. या दाहक जलाचे घटकावयव काय होते हें नक्की माहीत नाहीं; परंतु शत्रूंचीं नगरें, किल्ले, वाहनें, हत्यारें व लोक यांची जाळून राखरांगोळी करण्याच्या कामीं त्याचा उपयोग होत असे असें त्यांनीं म्हटलेलें आहे. अस्तु.

वरील सर्व निरूपणावरून वाचकांच्या लक्षांत एक गोष्ट आली असेल कीं, अर्वाचीन अत्यंत सुधारलेल्या युरोपियन युद्धशास्त्रावर मात करणारी अशी एक विद्या प्राचीन कालीं भारतीय आर्यांस अवगत होती व याच गोष्टीमुळें त्यांचें महत्व प्राचीन कालापासून लोक मान्य करीत आले आहेत. ती विद्या म्हणजे अस्त्र-विद्या होय; व तिचा उपयोग चालू काळांतील शिपाईगड्यास, रणधुरंधर सेनापतीस, रणगाजी महायोद्ध्यास माहीत नाहीं याबद्दल प्राचीन हिंदु लोकांचा त्यांस हेवा वाटावा हें अगदीं साहाजिक आहे. वर सविस्तर वर्णन केलेल्या दोन अस्त्रांखेरीज धूमास्त्र, वायवास्त्र, वर्षास्त्र अशीं अनेक अस्त्रें प्रचारांत होतीं. त्या योगानें शत्रूच्या बलावर, धुराचा, पावसाचा, वायूचा चोहोंकडून मारा करून त्यांची दृष्टि मंद व जड केली जात असे. हवेमध्यें नाना तऱ्हेचे विषारी पदार्थ, अनेक आकृतींचीं भयंकर जनावरें, हिंस्र पशु, नाग वैगरे प्राणी मिसळून दिले जात; त्यामुळें त्यास डोळे उघड-ण्याची छाती होत नसे. विषारी व रोगट धुरामुळें त्याचे घसे गुदमरून श्वास कोंडत असे. कधीं कानठळ्या बसविणारे असंख्य ध्वनि एकदम उठत तर कधीं एकाएकीं महापूर आणणारा जलौघ दृष्टीस पडे. कधीं कधीं तर निबिड अंधकार सर्वत्र पसरून शत्रु कोण, मित्र कोण याची ओळख पडेनाशी होई. कधीं कधीं विजांचा कडकडाट होऊन सर्व शत्रुसैन्य गर्भगळीत होत असे; अशीं एक ना दोन अनेक अस्त्रें प्रसंगविशेषीं उपयोगांत आणलीं जात. दुसऱ्या बाजूनें सोडलेलीं अस्त्रें पाहून एकमेक निवारक व प्रतिबंधक अस्त्रें सोडीत. रामायण, कार्तिकमाहात्म्य व इतर पुराणें या ग्रंथांत अशा प्रकारच्या अस्त्रांच्या अनेक मौजा सांगितल्या आहेत.

शेवटीं प्राचीन युद्धाच्या एका अंगासंबंधी दोन शब्द लिहून हें प्रकरण पुरें करूं. राम पुष्पक विमानांत बसून अयोध्येस परत आले, पुण्यवान लोकांना देव विमानें पाठवीत, तुकाराम सदेह विमानांतून वैकुंठास गेले वैगरे प्रकारच्या अनेक गोष्टी आपण पुराणांत वाचतों व ऐकतों. देव-दानवांचें युद्ध चाललें असतां कित्येक वेळां रणसंग्राम विमानांतून हवेंत चाले असेंहि वाचल्याचें प्रत्येकास आठवेल. आतां

हा प्रकारसुद्धां हिंदूंच्या सुपीक मेंदूचें एक फळ होय असें अगदीं कालपर्यंत सर्व पंडितांस वाटत नसे; परंतु महायुद्धानें ज्या अनेक खुळचट समजूतींचा निरास केला त्यांपैकींच ही एक होय. समुद्रसंचार करणें ही गोष्ट सुद्धां एका काळीं अशक्य कोटींतलींच समजली जात असे; परंतु जगच्छिक्षक कालानें हळुहळू ती गोष्ट खरी करून दाखविली व पुढें पुढें त्या गोष्टीचें लोकांस कांहींच वाटेनासें झालें आणि भूप्रवास व जलप्रवास सारखेच वाटूं लागले.

भूभागाप्रमाणेंच जलपृष्ठावरही राष्ट्रीय मालकी प्रस्थापित करण्याची धडपड निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें चालू झाली व त्याचेंच महायुद्ध हें दृश्य चिन्ह होय. ह्या युद्धांत कल्पनागोचर विमानांचा प्रत्यक्ष उपयोग होऊं लागला व पुढें कांहीं कालानें वातावरणावरही सत्ता स्थापण्याकरितां राष्ट्राराष्ट्रांमध्यें चढाओढ लागली व त्यामुळें यापुढें युद्धशास्त्रामध्यें क्रांति होऊन आजपर्यंतचे सर्व समज बदलून जाऊन लोकांच्या जीवनक्रमावर सुद्धां याचा परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आम्हांस जें कांहीं सांगावयाचें आहे तें हेंच कीं, प्राचीन हिंदु लोकांच्या कल्पना जगास एकदम पचनीं पडत नाहींत; कारण आर्यांची शक्ति व इतर जगाची शक्ति यांमध्यें फार तफावत असल्यानें एकाचा आहार दुसऱ्यास न मानवल्यास कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु आजपर्यंत सर्व जगास इतर गोष्टी पचनीं पडण्यास इतका काळ लागला त्याचप्रमाणें ही विभानाची युक्तीसुद्धां सर्व जगास पटून आर्यबुद्धीचें कौतुक करण्यांत व त्यांचे गुणानुवाद गाण्यांत सर्व जगास धन्यता वाटेल असा एक दिवस उजाडल्याखेरीज राहणार नाहीं अशी आमची खात्री आहे. अर्वाचीन हिंदूंनीं कालाप्रमाणें योग्य फरक आचरणांत करून बाकी पूर्वजांच्या पावलावर पावलें टाकीत चालल्यास ज्याप्रमाणें पूर्वजांची जीवनयात्रा क्षेमकर, सुखकर, कीर्तिप्रद झाली त्याप्रमाणें आमचीहि झाल्याशिवाय राहणार नाहीं. मात्र त्यांच्याप्रमाणें आध्यात्मिक जीवन ठेऊन निष्कलंक आचरणानें, अचाट तपस्येनें, अंतर्बाह्य शुचिभूतपणानें वागण्याचें असिधाव्रत त्यांनीं सांभाळले पाहिजे.

प्रकरण सतरावें.

संगीत व इतर शास्त्रें.

चिनी लोक संगीताला राजशास्त्र (शास्त्राणाम् राजा) असें मानतात. संगीताचा उद्भव मनुष्याच्या वृत्ति अगदीं तल्लीन असतात तेव्हांच होतो. सांसारीक काळजींच्या काचणींतून मनुष्याचें मन पूर्ण स्वतंत्र असतें, बाह्य परिस्थितीच्या एखाद्या आघातानें मनाची आनंदी वृत्ति जागृत होते, त्या वृत्तीचा विचारशक्तीवर पूर्ण अंमल बसतो, सर्जावतेचा वायु फक्त त्या एकाच वृत्तिरूप नलिकेच्या द्वारें बाहेर पडतो, अथवा क्षण-भर मनुष्यामधील अहंभाव नष्ट होऊन त्या भावनेशीं जेव्हां तो तद्रूप होतो अशा प्रशांत, एकांत व समाधीच्या वेळीं त्याच्या मुखावाटे जे ध्वनि बाहेर पडतात तेंच शुद्ध संगीत होय. अशा संगीताला इतरत्र तोड मिळणें अशक्य आहे. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे वेद होय. वेदांना जें इतकें महत्त्व आलें आहे याचें कारण हेंच होय. वेदांना अपौरुषेय म्हणतात व अत्यंत विशुद्ध गीताचें भाण्डार म्हणतात याचें कारण वेददृष्ट्या ऋषींची समाधियुक्त मानसिक स्थिति व एकतानता. मनुष्य जेव्हां अहंभाव विसरून परमात्मज्ञानामध्यें गर्क होतो, मानवी जीवाची परमात्म्याशीं एकतानता होते, तेव्हां अर्थात् ऐहिक बंधनें त्यास न बाधतां त्याच्या मुखांतून अत्युच्च स्थितीचे उद्गार लीलेलें निघूं लागावेत व असे दैवी स्फूर्तिरूप गोड आलाप अपौरुषेय वेद मानले जावेत हें कांहीं अनुचित नाहीं. पूर्वसंस्कार व शिक्षणसंस्कार यांच्या संयोगापासून उच्च मनोवृत्तीचें बीज रुजून पुढें मनाच्या कैवल्य स्थितीमुळें व निस्सीम एकतानते-मुळें त्या बीजरूप मनोवृत्ति उफाड्याच्या व पूर्ण वाढीच्या सुरम्य वल्ली दिसाव्या व त्यांपासून येणाऱ्या गानरूप वायुलहरींनीं मनास अत्यंत आनंद व्हावा यांत काय आश्चर्य ? भारतीय आर्यांचा संगीतप्रिय स्वभाव आहे. दिवसाच्या प्रत्येक भागांत बाह्य परिस्थितीप्रमाणें निरनिराळीं गाणीं गावीं असें त्यांस आवडतें. भारतीय आर्यांच्या संगतींत वर्षेंच्या वर्षें घालवावीं तेव्हां कोठें त्यांच्या मनःस्थितीचें कोडें पर-देशीय लोकांस उकलणें शक्य आहे. अर्थात् असें न करितां केवळ जातां जातां दृष्टि फेंकून अथवा रस्त्यांतून जातांना निकृष्ट वर्गांतील लोकांच्या तोंडून ऐकलेलीं पान-चट संगीतशून्य गाणीं, रस्त्यांतून निघालेल्या मिरवणुकीच्या वेळीं गायलीं जाणारीं

पद्यें व वाजविलीं जाणारीं वाद्यें यावरून सरसकट विधान ठोकून देण्याची घातुक व घमेंडखोरपणाची संवय युरोपियनांस लागलेली आहे. अशा बेजबाबदार घमंड्यानंदनांचे शब्द वेदतुल्य मानणारे आमचे स्वाभिमानशून्य व बालिश सुधारक आत्मनिंदात्मक स्वरांत बसविलेलीं गद्यगाणीं जेव्हां व्यासपीठावरून गाण्यास सुरवात करितात तेव्हां त्यांची टर उडावी, नंतर त्यांनीं बहुजनसमाजावर रुसावें व लोकांनीं त्यांच्या शब्दास कवडीचें मोल द्यावें हें अगदीं यथायोग्य आहे.

आर्यांचा स्वभाव संगीताप्रिय आहे असें ॲन विल्सन व कोलमन यांचें विधान मागें दिलेलेंच आहे. यापुढें कर्नल टॉड काय म्हणतो तें पाहूं.

" आर्य संगीत किती प्रगल्भ दशेस आलें होतें व त्याची तुलना युरोपांतील संगीताशीं करणें हें अद्याप सुद्धां अशक्य आहे. या गोष्टी प्राच्यविद्याविशारदांस अवगत नसून अभ्यास करण्यास योग्य आहेत हें कोणीही निःपक्षपाती विद्याव्यासंगी व शास्त्रभक्त पंडित कबूल करील. ग्रीसचें नांव विद्या व कला यांपाशीं अत्यंत निगडित झालेलें असलें तरी ज्या वेळीं भरतखंडांत ऋषींच्या तोंडून दिव्यगायनांचे कर्णमधुर आलाप सहज लीलेनें गायले गेले व पुढें त्याजवर आर्य संगीत शास्त्राची स्वतंत्र इमारत उभारली गेली तेव्हां तें राष्ट्र रानटी स्थितीतून बाहेर पडलें नव्हतें. " इतक्या जुनाट आर्य संगीत शास्त्राची अखंड परंपरा हिंदूंनीं चालू ठेविलीं आहे. यापासून पुढें हें शास्त्र प्रो. वेबर व बेनफी यांच्या मतें इराणी लोकांनीं घेतलें; इराणांतून अरबस्थानांत गेलें व अरबस्थानांतून गिडोड अरोझो यानें अकराव्या शतकांत युरोपांत नेलें असा याच्या प्रवासाचा क्रम मानण्यांत येतो. परंतु हा क्रम जरी हल्लीं सर्वमान्य झाल्यासारखा दिसतो तरी याच्यापूर्वी बरींच शतकें आर्य संगीतानें युरोपांत संचार केला असला पाहिजे. कारण स्ट्रेबो म्हणतो कीं, " कांहीं ग्रीक लोक संगीत शास्त्राची उत्पत्ति हिंदुस्थानांत झाली असें मानतात. सिटिरा (cittiara) नबला हीं वाद्यें सुद्धां हिंदुस्थानांतीलच आहेत असेंही त्यांचें म्हणणें आहे. " परंतु कर्नल टॉड् म्हणतो कीं, ' शुद्धलेखनपद्धतीच्या दृष्टीनें सिटिरा (cithiara) व नबला ह्या शब्दाचें विवरण केल्यास ते मुळचे सतार व तबला असावेत असें मानण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. यावरून हें शास्त्र अकराव्या शतकापूर्वी स्ट्रेबोच्या वेळीं ग्रीकांस माहीत होतें हें उघड आहे. दुसरें प्रमाण कर्नल टॉड म्हणतो त्याप्रमाणें असें आहे कीं, ग्रीक लोकांची लांबलचक, कर्णकटु, कंटाळवाणी संगीत लिपी, व टायमॉथियसनें शोधून काढलेली द्विश्रु-

तिक स्वरपंक्ति ही (chromati scale) सुद्धां अलेक्झांडरच्या वेळीं हिंदुस्थानांतून युरोपांत नेली असली पाहिजे; व यावरून हा अकराव्या शतकाचा काळ किती मागें ओढावा लागेल याची कोणासही सहज कल्पना होईल.

हिंदुस्थानांत वैदिक कालापासून संगीताची गोडी लोकांस किती आहे हें वरील विवेचनावरून कळून येईल.

संगीत पद्धतीनें ज्या प्रार्थना म्हणण्यांत येत त्यांचा समावेश सामवेदांत होतो. ऋचा ऋग्वेदांतील, परंतु त्या तालसुरांत बसवून त्यांचा स्वतंत्र सामवेद तयार करण्यांत आला. यावरून ऋषींना संगीताची किती गोडी होती हें कळून येणार आहे. यावरून पुढें स्वतंत्र गंधर्ववेद तयार करण्यांत आला होता व त्यांत संगीताचा कला आणि शास्त्र या उभय दृष्टीनें ऊहापोह केलेला होता. परंतु दुर्दैवानें इतर अनेक अमूल्य ग्रंथांप्रमाणें हाही काळाच्या जबड्यांत सांपडून लुप्त झाला व याज्ञ संबंधानें इतर ग्रंथांत जे ठिकठिकाणीं उल्लेख आलेले आहेत त्यांवरूनच त्याची महती व संगीत शास्त्राची सर्वांगीण वाढ याची कल्पना बांधावी लागते; असें जरी आहे तरी त्या गोष्टीस इलाज नाहीं. परंतु ठिकठिकाणच्या उल्लेखांवरूनही या शास्त्राच्या वाढीविषयीं अभ्यासशील विद्वानांची खात्री पटते. परंतु ज्यास व्यासंग न करितां केवळ आत्मपौढीवरच हिंदूंचा गचाळपणा सिद्ध करावयाचा असेल त्याकडे लक्ष देण्याचें मुळींच कारण नाहीं.

हल्लीं हिंदुस्थानांत ज्या प्रकारचा शास्त्रीय संगीताचा अभ्यास चालतो तें पाहूं. प्रथमतः रूढ असे सहा मुख्य राग असून त्यांजपासून छत्तीस रागिणी निघालेल्या आहेत. या छत्तीस रागिणींपैकीं प्रत्येकींतून आणखी तीन उपरागिणी बनविलेल्या आहेत व या उपरागिणींमधून आणखी अनेक सूक्ष्म रागिणी निर्माण करण्यांत आलेल्या आहेत. मात्र लक्षांत ठेवण्याची गोष्ट अशी कीं, या प्रत्येक रागिणींत, उपरागिणींत व सूक्ष्म रागिणींत मूल रागांमध्यें असलेल्या स्वरांकडे किंचित् सुद्धां दुर्लक्ष केलेलें नाहीं. मग कोणी असें म्हणेल कीं, इतक्या रागिणी तयार करण्याची काय जरूर ? तर त्याचें उत्तर असें कीं, कंठाला तालीम देऊन सृष्टींतील असंख्य आलापांचें अनुकरण करितां यावे म्हणून शास्त्रीय पद्धतीनें बसविलेले हे पाठ होय. सृष्टींत जे विविध आलाप ऐकूं येतात तेच सर्व आपल्या कंठानें व्यक्त करितां येतात हे आर्यांनीं रागरागिणीच्या सहाय्यानें प्रत्यक्ष सिद्ध केलें आहे. या

रागिणींची मोजदाद करीत बसण्यांत काय अर्थ आहे ? या सृष्टींत मानवकोटी-पासून सूक्ष्म कीटकयोनिपर्यंत किती आलाप आहेत याची संख्या कोणी ठरविली आहे काय ? याकरितां प्राचीन शास्त्रकारांनीं समुद्रांतील लाटांप्रमाणें त्या असंख्य आहेत असें जें ठरविलें आहे तें किती यथार्थ आहे बरें ?

याप्रमाणें रागरागिणींचा विचार केल्यानंतर स्वरांचा विचार केलेला आहे. स्वरांचे दुर्ग्यम व सूक्ष्म असे भेद पाडिलेले आहेत. अष्टमाचे हिंदू पद्धतीनें बावीस दुर्ग्यम स्वर पाडले आहेत.परंतु पाश्चात्य पद्धतीनें ते फक्त १२च पाडिलेले दिसतात. स्वरांचे आरोह, अवरोह व मध्यमावस्था आणि रागाच्या अनुरोधानें,प्रसंगाच्या अनुकूलतेनें व रसपरिपाकाच्या प्रचुर ज्ञानानें त्यांत कमी अधिक फेरबदल करणें हें प्रत्येक गवयाच्या नैपुण्याचें द्योतक आहे. पुष्कळ वेळां संगतिपटु युरोपियनास ह्या सूक्ष्म भेदांचें आकलन व अनुकरण करणें अत्यंत विकट जातें. म्हणून ते हिंदूंस नांवें ठेवून आपलें अज्ञान झांकण्याचा प्रयत्न करितात; परंतु असला प्रयत्न सिद्धीस जाणें कधीं तरी शक्य आहे काय ? व याच कारणाकरितां हिंदू गवई युरोपियन तज्ज्ञांच्या अभिप्रायास बहुशः फारशी किंमत देत नाहींत.

राग, रागिणी, स्वर व ताल यांस वाद्यांची जोड देणें फार अवश्य असून तशी ती हिंदु शास्त्रकारांनीं दिलेली आहे. मुख्य चित्र उठावदार पार्श्वभागाशिवाय फिकें दिसतें. अत्यंत लावण्यसुद्धां दागिन्यांशिवाय साधारणतः डोळ्यांत भरत नाहीं. तोच न्याय स्वरांचा. ताना, स्वर यांना योग्य वाद्यांची साथ मिळाली म्हणजे दुधांत साखर घातल्याप्रमाणें होते. असो. ही विद्या नुसती कंठगतच न राहतां तिला लौकिक प्रचारांत आणण्यासाठीं व ती सर्व जनांस सुलभ करण्याकरितां योग्य अशी परिभाषा बसवून स्वतंत्र संगीत लिपी अथवा स्वरचिन्हमाला तयार करण्यांत आली. प्रो. विल्सनच्या मतें हिंदूंनीं संगीत शास्त्र पूर्ण प्रगल्भ दशेस आणण्याकरितां स्वरसप्तक, स्वरमाला, ताली, सूर, स्वरांचें सूक्ष्म वर्गीकरण, द्विश्रुतीक स्वरग्राम व अनेकश्रुतीक स्वरग्राम इत्यादि गोष्टी निर्माण केल्या. यावरून त्यांचा व्यासंग, जिज्ञासा व आवड हीं व्यक्त होतात.

इतकी चर्चा केल्यावर एक मुख्य गोष्ट सांगावयाची राहिली ती अशी कीं, हे राग, रागिणी व ताल बसविण्यांत शास्त्रकाराचा करमणुकीशिवाय दुसरा एक हेतु होता. करमणूक करून घेणें हा प्राणिमात्रांचा धर्मच आहे; परंतु शास्त्राची कामगिरी

निव्वळ करमणुकीपेक्षां अगदीं निराळी आहे. एखाद्याच्या ठिकाणीं उपजतच तत्वज्ञानाचा उदय होऊन त्याला ब्रह्मप्राप्तीचा मार्ग खुला होईल; परंतु यामुळें जगास काय उपयोग ? याकरितां शास्त्राची जरूरी लागते. त्याचप्रमाणें एकादा निसर्गसिद्ध उत्तम गवई असेल; परंतु त्याची ती विद्या व करमणुकीचें साधन त्याजबरोबर लुप्त न होतां जगास त्याचा अखंड उपयोग व्हावा याच शुद्ध व सर्वप्रेमी बुद्धीनें शास्त्राची रचना करण्यांत आलेली असते. याच न्यायास अनुसरून भिन्न वेळीं भिन्न मनोभावना जागृत करून सर्व श्रोतृगणास समरस बनविणें हाच गायनशास्त्राचा प्रधान हेतु आहे. रागाचे मुख्य सहा भेद पाडिले आहेत ते असेः—

(१) हिंदोल—पुष्प-प्रसूनांचा सुगंध व मधुमासांतील मधु यांचा मधुर ठसा मनावर उठविण्याकरितां याचा उपयोग करण्यांत येतो.

(२) श्रीराग—सूर्यास्तकालीन नितान्त प्रशांतपणा व निस्तब्धता.

(३) मेघमल्हार—वर्षाऋतूंतील मेघनाद व विजेचा कडकडाट.

(४) दीपक—हा सध्यां लुप्त आहे त्यायोगें गायकाच्या शरीरांतून ज्योति निर्माण होऊन सभोवारच्या प्रदेशांत लखलखाट होतो व या ज्योतीमुळें स्वतः गवई गतप्राण होतो.

(५) भैरव—आगामी सूर्योदय, हिमबिंदुनिपात, विहगकूजित, प्रातःकालीन सुगंधी व बलदायक वायु इत्यादि.

(६) मालकंस—मानसिक चेतना व प्रस्फुरण.

हिंदु व पाश्चात्य पद्धतीमधील साम्य अर्थर व्हिटन यानें पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे. "द्विश्रुतीक सरणी व स्वरसप्तक हीं दोघांमध्यें सारखींच आहेत.

अष्टमत्रय, खरज, मधुरा व तार हा स्वरभेद उभयशास्त्रास मान्य आहे व पाणिनीच्या काळापूर्वी सप्त सुरांचीं आद्याक्षरें ठरलीं आहेत.पुढें ही स्वरचिन्हमाला इराणी लोकांनीं घेतली,नंतर तिचा संचार अरबस्थानांत झाला व तेथून ग्रीक लोकांनीं नेल्यामुळें मुळांतला हा विशेष ग्रीक स्वरमालेंत उतरला. आणखी एक साम्य सांगितलें पाहिजे तें असें कीं, ग्रीक लोकांच्या संगीत देवतेचें नांव ॲपोलो असून तिच्या सभोवतीं नऊ दासी असतात असें वर्णन आहे. हरीचा उत्सव ज्या वेळीं करण्यांत येतो त्यांत रासमंडळाचा नाच होतो. त्या वेळीं हरी हा आपल्या नवरागिणीनामक अप्सरांबरोबर नर्तन करितों.त्या नवरागिणी नवरसाच्या अधिष्ठात्री देवता आहेत असें मानण्यांत

येतें. ह्या कल्पनेंत व ॲपोलो आणि त्याच्या नव दासी या कल्पनेमध्यें साम्य नाहीं असें कोण म्हणेल ? ''

प्राचीन काळांतील मुख्य संगीतपटु भरत, ईश्वर, पर्ण व नारद हे होत. गेल्या कांहीं शतकांत गोपाल नाईक व तानसेन हे होऊन गेले. हे दोघे अकबराच्या दरबारीं होते. गोपाळ नाईक, यांस दीपराग अवगत होता. मागें सांगितल्याप्रमाणें हा दीपराग गाऊन मृत्यु पावला व असें करण्यास अकबर बादशहानें त्यास हुकूम केला होता अशी दंतकथा आहे. भरदुपारीं अकबराच्या हुकुमावरून श्रीराग गाइल्यानें जिकडे तिकडे रात्रींसारखा अंधःकार पडला अशी तानसेनाविषयीं लोकवार्ता आहे.

ज्योतिष, गणित, वैद्यक व लष्करी शास्त्र यांखेरीज इतर अनेक शास्त्रें हिंदुस्थानांत भरभराटीस आलीं असें हिंदूंच्या अचाट कामांच्या अवशेषावरून दिसतें. एल्फिन्स्टन म्हणतो कीं, '' शास्त्राच्या पूर्ण अभिवृद्धीकरितां हिंदू लोक फारच मेहनत घेतात व त्या कामीं बुद्धीची अपूर्व कुशाग्रता दाखवितात. ''

आयुर्वेदाची पूर्ण वाढ होण्यास प्राणिशास्त्र, विद्युत्, रसायन, इत्यादि शास्त्रांची आवश्यकता आहे. अस्त्रविद्या सफळ होण्यास रसायन. गतिशास्त्र, हवामानशास्त्र, भूस्तरशास्त्र, पदार्थविज्ञान इत्यादि सजातीय शास्त्रांचें थोडें फार अध्ययन पूर्वी झालें असलें पाहिजे. त्याचप्रमाणें विमानविद्येस अशाच प्रकारच्या दुसऱ्या शास्त्रांची आवश्यकता आहे. प्राचीन भव्य इमारती, व अजिंठा, कारला, वेरूळ, बदामी वगैरे ठिकाणचीं अफाट पांडवकृत्यें वं भयंकर कोरीव लेणीं तयार होण्यास वास्तुविद्येचें हलकें सलकें ज्ञान पुरणार नाहीं. खरोखर हीं पांडवकृत्यें व कोरीव लेणीं जगांतील अद्भुत चमत्कारांत मोडत असून त्यास लागणारें शिल्पज्ञान केवळ अतर्क्यच असलें पाहिजे.

पाश्चात्य राष्ट्रांत एवढे नामांकित वास्तुविद्यापंडित झाले, परंतु अजून कोणा सही इजिप्तसारखे मनोरे बांधण्याची कला साधत नाहीं. भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र यांचा संयोग प्राचीन कालीं आसपासच्या स्थानिक राजांनीं टॉलेमीसारख्या पीक पंडिताच्या मदतीनें केला होता; परंतु त्यांच्या कांठचा प्रदेश वाळवंटाचा व ताड असल्यानें हा संयोगी कालवा वारंवार बुजून जातो. सांप्रत काळीं तेंच काम केल्याबद्दल फ्रेंच शिल्पज्ञ लेसेप्स याचें नांव सर्वतोमुखीं झालें आहे, व तें तसें होणें

अगदीं रास्त आहे. मात्र आमची सध्यां एवढीच इच्छा आहे कीं, पूर्वीप्रमाणें तो बुजून जाऊं नये. इजिप्तमधील मनोरे स्वर्गांतून खालीं पडले अगर पृथ्वीच्या पोटांतून वर आले अशा दोन संभवनीय कल्पना प्राचीन लोकांस सुचल्या होत्या.

महाभारतांत मयसभेचें जें वर्णन आहे तें सुद्धां खरोखर अतीशय विस्मयकारक आहे. मयासुरानें दाखविलेल्या या खेळांत अती सूक्ष्मदर्शक यंत्रें, दुर्बिणी, घड्याळें वगैरे वस्तु होत्या असें वर्णिलें आहे. ही मयसभा एवढी मोठी होती कीं, त्यांत हजारों लोकांचा समावेश होई; परंतु ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेण्यास १०।१२ माणसें पुरे होत. त्याचप्रमाणें त्यांत अग्निरथाचेंहीं वर्णन आहे.

फार मोठ्या शक्तीच्या दुर्बिणी त्या वेळीं होत्या व अशाच प्रकारची एक इंद्रप्रस्थामध्यें संजयाजवळ होती व ती त्यास व्यासानें दिली होती असें सांगितलें आहे.

वनस्पतिशास्त्रासंबंधीं प्रो. विल्सन लिहितो कीं, " हिंदूंना वनस्पतींच्या अंतर्बाह्य दोन्ही गुणांचें ज्ञान होतें. त्यांनीं त्यांची विस्तृत याद तयार केली असून त्यांत त्यांचा व्यवहार्य उपयोग व त्यांच्या गुणधर्मांचीं दर्शक नांवें दिलीं आहेत अकबर-उल-सालेख या नांवाच्या वर्तमानपत्राच्या १८८७ सालांतील २५ नोव्हेंबरच्या अंकांत असें विधान आहे कीं, काश्मीरमध्यें नुकताच त्रिभागात्मक वनस्पतिकोश सांपडला आहे; हा कोश जगाच्युढें अद्याप न आल्यानें त्या विधानावर विश्वास ठेवणें कठीण आहे.

मालतीमाधव नाटकांत मालतीनें माधवाचें चित्त लोहचुंबकाप्रमाणें ओढून घेतलें असें वर्णिलें आहे. यावरून हिंदूंना कृत्रिम लोहचुंबक करण्याची कृति माहित असली पाहिजे असें दिसतें.

प्रो. विल्सन एका ठिकाणीं लिहितो कीं, " सृष्टींत निर्वात (Vacunm) स्थल नाहीं" हें तत्व हिंदूंस माहीत होतें. कांहीं यंत्रसाधनांनीं हवा काढून टाकतां येते. अशा वेळीं निरनिराळ्या अणूंमधील सांधा गेल्यानें ते एकत्र होऊन त्यांची रास व्हावी असें कोणीहि सहज मानील; परंतु हें वस्तुस्थितीस विसंगत असल्यानें त्याचें योग्य व समाधानकारक उत्तर पुढें दिल्याप्रमाणें दिलें आहे.

" दोन पदार्थांमध्यें अती सूक्ष्म इंध-क (ether) नांवाचें तत्व असल्यानें व तें सर्वत्र भरून राहिल्यानें अशा प्रकारची आपत्ति ओढवत नाहीं. अलिकडे

या तत्वांचा स्वीकार हळुहळू होत चालला आहे. ग्रहांचें भ्रमण व ध्वनीचें वहन यास तत्त्वामुळें होतें असें मानण्यांत येतें. निर्वात स्थलामध्यें ध्वनिसंचार होतो असें जें मानण्यांत येतें तें याच कारणामुळें. दोन परमाणू या तत्वामुळें ether (इंधक) भिन्न रहातात व हवा त्यास एकत्र खेचते. हवा दोन पदार्थांच्या संघट्टनाचें कारण असून तिजमध्यें स्पर्शधर्म आहे. अग्नीचा धर्म तेज होय; यामुळें आकृतिप्रदर्शन होतें. कित्येक ही क्रिया रंगामुळें होते असें मानतात; परंतु आकृति अथवा रंग प्रकाशाशिवाय व्यर्थ होत. जलाचा धर्म रुचि हा आहे. यावरून एकोणिसाव्या शतकांतील शोधांचें ज्ञान प्राचीन आर्यांस होतें असें मानण्यास कोणती हरकत आहे ? ''

चंद्राच्या आकर्षणशक्तीमुळें भरती-ओहोटीचा खेळ होतो. याचें ज्ञान पूर्वी होतें हें खालील रघुवंशांतील श्लोकावरून दिसून येईल.

तं तस्थिवांसं नगरोपकंठे ।
तदागमारूढगुरुप्रहर्षः ॥
प्रत्युज्जगाम क्रथकौशिकेंद्रः ।
चन्द्रं प्रवृद्धोर्मिरिवोर्मिमाली ॥

हत्तीच्या गंडस्थळांतून मद वाहतो ही गोष्ट स्ट्रॅबो यास प्राचीन ग्रीकांच्या वेळीं माहीत होती. नंतर तिची माहिती क्युव्हीयर यानें प्रसिद्ध करीपर्यंत पाश्चात्य जगास ती माहीत नव्हती. परंतु प्राचीन काव्यें एक काव्य असें सांपडणार नाहीं कीं, ज्यांत मत्तगजमदासंबंधीं उल्लेख नाहीं. यावरून सृष्टपदार्थशास्त्राची माहिती आर्यांस होती हें स्पष्ट होतें. सृष्टीच्या पोटांतील खनिज संपत्ति काढून ती शुद्ध करणें, महासागरांतून मोत्यें काढणें, खणी व विहीरी खोदणें इत्यादि सर्व कामांचें पूर्वी ज्ञान होतें. त्याचप्रमाणें हिरे, मोत्यें, इंद्रनील वगैरेचे गुणधर्म, जाति इतक्या बारकाईनें सांगितलेल्या आढळतात कीं, ह्या वस्तु सुद्धां त्यांच्या नजरेंतून व सूक्ष्म अवलोकनांतून राहिल्या नव्हत्या असें दिसतें.

पन्नास वर्षांपूर्वी विमानासंबंधीं बोलणें म्हणजे माथेफिरूपणासारखी बडबड करणें होय असें पाश्चात्य लोकांस वाटत असें; परंतु गेल्या पन्नास वर्षांत ही गोष्ट जवळ जवळ यशस्वी होऊन ती व्यवहार्य ठरली आहे व तिचा उपयोग गेल्या महायुद्धांत फार मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत असे. एका विचक्षण युरोपियन पंडितानें असें

म्हटलें आहे कीं, " हिंदुस्थानांत विमानविद्या हें स्वतंत्र शास्त्र असून त्याचा हिंदू लोक व्यावहारिक कामाकडे उपयोग करीत असत. "

या विद्येवरून एवढें होतें कीं, रसायन, यंत्रविज्ञान, हवामानशास्त्र वगैरे शास्त्रांचें अध्ययन प्राचीन काळीं हिंदुस्थानांत बहुत झालें असलें पाहिजे. विमानविद्या होती असें एकदां कबूल केलें कीं, अंतरिक्षांत वाहणारे वाऱ्यांचे निरनिराळे प्रवाह, हवेचे एकावरील एक थर, हवेची शीतोष्णता व घनता इत्यादि गोष्टींचें ज्ञान त्यांस असलेंच पाहिजे असें मानावें लागतें. यजुर्वेदांत (६, २१) विमानविद्येविषयीं स्पष्ट उल्लेख आढळतो.

उदाहरणार्थः—

समुद्रङ्गच्छ स्वाहा अन्तरिक्षङ्गच्छ स्वाहा ।
देवं सवितारङ्गच्छ स्वाहा ॥

मनु म्हणतोः—

संशोध्य त्रिविधं मार्गं षड्विधं च बलं स्वकम् ।
सांपरायिककल्पेन यायादरिपुरं शनैः ॥

कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, विमानविद्या हें व्यापक वायु-विद्येचें अंग आहे. (शतपथ ब्राह्मण ११, १४) याशिवाय शतपथ ब्राह्मणांत सर्पविद्येचा, आश्वलायन सूत्रांत विषविद्येचा व पाणिनीच्या ग्रंथांत लोहशास्त्राचा स्पष्ट उल्लेख आहे.

विद्युत् व लोहचुंबक या गोष्टीहि लोकांच्या पूर्ण परिचयाच्या होत्या. वेदान्ती मनुष्य नेहमीं असें म्हणत असतो कीं, विजेची उत्पत्ति मेघापासून होते व ही गोष्ट ट्यूलेट व इतर शास्त्रज्ञ यांच्या प्रख्यात प्रयोगावरून कोणासही कळण्याजोगी आहे. प्राचीन ऋषींना वैद्युत आकर्षणशक्ति माहीत होती व इतरही वैद्युत चमत्कार ठाऊक होते. या सर्व शास्त्रांच्या पूर्णतेविषयीं कथाप्रसंगानें व केवळ ठिकठिकाणच्या नाममात्र निर्देशानें एकाद्या हट्टी व आग्रही वावदूकाचें समाधान होणार नाहीं; परंतु त्यामुळें तीं ऋषींस माहीत नव्हतीं असें बिलकूल म्हणतां येणार नाहीं. याच्या उलट व्यवहारांत त्यांचा प्रत्यक्ष उपयोग केलेला पाहिला म्हणजे व्यवहाराचें संपूर्ण ज्ञान व शास्त्रीय बुद्धीचा यथायोग्य उपयोग यांचें ऋषींच्या आचरणांतील चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें.

शेवटीं एका गोष्टीचा विचार करून हें संकीर्णशास्त्रविवेचनात्मक प्रकरण पुरें करूं. निद्रा व भोजन हीं मानवी अथवा इतर कोणत्याहीं जीवनाचीं आधारभूत अंगे आहेत. हातीं असलेल्या साधनांचा अत्युत्तम उपयोग करून घेणें हें ज्ञानी मनुष्याचें मुख्य लक्षण होय. श्रम झाले असतां झोंप येणें हें अगदीं साहाजिक आहे. परंतु निद्रावश स्थिति असतां त्या स्थितीचा आरोग्याला जास्तींत जास्ती उपयोग कसा होईल हें पाहणें हेंच खरें शहाणपण होय.

कृमिकीटक, चतुष्पाद व अज्ञानी जन सर्व निजतात आणि ज्ञानी मनुष्यहीं निजतो; परंतु ज्ञानवान् मनुष्यानें आपल्या बुद्धीचा उपयोग करून जर आपलें शरीर झोंपेमुळें आरोग्यवान् करून त्याचा आध्यात्मिक उन्नतीकडे उपयोग केला नाहीं तर दोघांच्या स्थितींत काय फरक? झोंप कमी काल येऊन आरोग्य मात्र जास्त वाढविणें हें साध्य होण्यास झोंप घेण्याची एक शास्त्रनिष्ठ पद्धति ठरविली पाहिजे. झोपेपासून भरपूर समाधान मिळून शिवाय कालाची बचत झाल्यानें त्याच्या मनाची व ज्ञानाची उन्नति करून श्रेष्ठ पद मिळविण्यास उपयोग झाला पाहिजे.

अशी एक पद्धत तपोनिष्ठ, शास्त्रमग्न व दीर्घोद्योगी असे जे प्राचीन ऋषि त्यांनीं शोधून काढली होती. ही पद्धत आम्हां हिंदू लोकांत वंशपरंपरेनें चालत आहे. तिचा उपयोग करण्यास कालाचा अथवा स्थलाचा कोणताहो निर्बंध नाहीं. जेथें मानवी शरीर विश्रांतीकरितां पडेल तेथें ती आचरणांत आणतां येते. विद्युत् व लोहचुंबकत्व या दोन शास्त्रांतील प्रमेयावर तिची उभारणी झाली आहे. प्रत्येक माता आपल्या कुटुंबांतील मुलांस निजतांना बजाविते कीं, 'मुलांनों, दक्षिणेकडे अथवा पूर्वेकडे पाय करून निजूं नका बरं.' या हिंदी सतीच्या भाषणांत कांहीं अर्थ आहे अथवा नाहीं याचा फारसा विचार न करितां अंधश्रद्धामय धर्मशास्त्रांतील हें एक वचन आहे असें मानण्याचा बराच प्रघात आहे. परंतु कोणत्या ना कोणत्या कारणानें साधारणतः प्रत्येक हिंदू वर दिलेल्या दोन दिशेंकडे पाय करून निजण्याचें टाळतो. याची कांहीं शास्त्रीय उपपत्ति मिळाल्यास बरें होईल असें वाटल्यावरून बाबू सीतानाथरॉय यांनीं त्यासंबंधी आपले कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत, ते मननीय वाटल्यावरून पुढें देतों.

स्मृतिग्रंथ व विष्णुपुराण या ग्रंथांत गार्ग्य व मार्कंण्डेय ऋषींनीं ज्ञानप्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल तर पूर्वदिशेकडे डोकें करून निजावें; शरीरसामर्थ्य व दीर्घायुष्य पाहिजे असेल तर नेहमीं दक्षिणेकडे माथा करून निजावें; प्रवासांत असतांना पश्चिमेकडे डोकें करून निजल्यास चालेल; परंतु उत्तरेकडे डोकें व दक्षिणेकडे पाय करून कधींही निजूं नये; त्यायोगें भयंकर व्याधी जडते; सबब ज्यास निरामयत्व प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल त्यानें सदर आदेश पाळले पाहिजेत असें लिहून ठेवलें आहे.

याप्रमाणें आनुवंशिक संस्कारानें म्हणा अथवा संवयीनें म्हणा, बहुतेक हिंदू लोक या आदेशाचें पालन करतात. आतां आधुनिक शास्त्रीय दृष्टीनें यापासून काय निष्पन्न होतें तें पाहूं.

सूर्यकिरणांचा जो प्रवाह आपल्या पृथ्वीवर एकसारखा वाहत असतो त्यांत उष्णतोत्पादक विद्युत् (Thermal electricity) संमिश्रित असते.

हा प्रवाह पृथ्वीच्या पूर्व बाजूवर पडल्यानें व पृथ्वी वाटोळी असल्यानें पश्चिम भाग थंड राहून फक्त पूर्व भागच उष्णतापूर्ण असतो. ही किरणजन्य उष्णतोत्पादक विद्युत् पृथ्वींत भिनून पूर्वेकडून पश्चिमेकडे अशी हिंडत रहाते. या विद्युत्प्रवाहानें पृथ्वीच्या अंतर्भागांत लोहचुंबकाचे धर्म संपृक्त होतात व पृथ्वी ही लोहचुंबकगुणांनीं भरून जाते. परंतु सूर्यकिरणांची ही क्रिया भूमध्यरेषेवर एकसारखी घडत राहिल्यानें दर क्षणीं नवा विद्युत् तयार होत असते. म्हणून पूर्व क्षणीं उत्पन्न झालेल्या विजेस भूमध्यरेषेवर प्रदेशावर रहावयास मिळत नाहीं: सबब ही जुनी विद्युत् कांहीं दक्षिण ध्रुवाकडे व कांहीं उत्तर ध्रुवाकडे अशी पांगते व तेणेंकरून ह्या उभय ध्रुवांमध्यें लोहचुंबकाचे धर्म आपोआप भरपूर संचित होतात. अशा रीतीनें आपली पृथ्वी लोहचुंबकाचा एक अफाट लोळाच बनून जाते व याचें प्रत्यंतर म्हणजे होकायंत्राच्या कांट्याची स्थिति होय. हा कांटा नेहमीं दक्षिणोत्तराभिमुख असतो हें नव्यानें सांगण्याची मुळींच जरूर नाहीं. भूमध्य प्रदेशावर हा कांटा नेहमी भूमध्यरेषेशीं समांतर असून दक्षिण व उत्तर ध्रुवप्रदेशांमध्यें तो पृथ्वीच्या पातळीला कांहीं कोण करून एका बाजूला लवलेला असतो; व ह्या त्याच्या स्थितीला त्याचें बाक असें म्हणतात.

ज्याप्रमाणें पृथ्वीमध्यें लोहचुंबकाचे गुणधर्म उतरतात असें वर सांगितलें

त्याचप्रमाणें ते मानवी शरीरामध्येंही उतरतात; मात्र फरक इतकाच कीं, लोखंड अगर पोलाद ह्यामध्यें ते ज्या मानानें मिसळून जातात त्यापेक्षां फारच थोड्या प्रमाणांत ते आपल्या शरीरांत प्रवेश करितात. परंतु मुख्य प्रश्न येथें किती मिसळतात हा नसून ते मिसळतात कीं नाहीं हा आहे; व इतर कारणें सोडून दिलीं तरी रक्तांत लोहपरमाणु मिसळलेले असल्यानें त्याबरोबर लोहचुंबकधर्म शरीरांत प्रवेश करितो हें मानण्यास कोणासच शंका येणार नाहीं.

दक्षिणध्रुव व उत्तरध्रुव अशीं पृथ्वीचीं जशीं एवंगुणविशिष्ट दोन टोकें आहेत त्याचप्रमाणें पद व शीर्ष हीं मनुष्यदेहांतील तद्गुणविशिष्ट दोन टोकें होत.

ही चुंबकधर्मी ध्रुवद्वयाची आमच्या शरीरांत जी योजना करून ठेवलेली आहे त्यायोगें आमचें शरीरस्वाथ्य कायम राहून सुखाची प्राप्ति होते. परंतु ही शरीरानिष्ठ ध्रुवसंपन्नता (Polanity) जर कोणत्याही कारणानें ढळेल तर आमची निरामय स्थिति बदलून सर्व शरीरांत बिघाड होईल; रोग, व्याधि यांचा प्रसार होऊन अनवस्था-प्रसंग गुदरल्याखेरीज रहाणार नाहीं.

शरीरामध्यें चुंबकधर्म उत्पन्न होण्याला पृथ्वी हें मुख्य कारण आहेच, परंतु शरीरांत व शरीरावाहेर जो प्राणवायु पसरलेला आहे त्यायोगेंही ही क्रिया होत असते. प्राणवायु हा चुंबकधर्माचा उत्तम वाहक आहे व त्याचा शरीरावर परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाहीं. पृथ्वी व प्राणवायु (Oxygen) यांचा मनुष्यांच्या शरीरावर जरी सारखाच परिणाम व्हावा अशी समजूत आहे तरी शरीरांच्या भिन्न घटकावयवांमुळें तसा परिणाम होत नाहीं व आपणास मनुष्यदेहांची जी भिन्न भिन्न स्थिति आढळून येते त्याचें हेंच कारण होय.

सबब हें शरीर-स्वाथ्य कायम राखण्याकरितां सुप्तावस्थेंत शरीर कोणत्या स्थितींत ठेवावें याचा लोहचुंबकधर्मान्वयें विचार केलेला आहे. डोकें जेव्हां दक्षिणेकडे करून आपण निजतों तेव्हां आपल्या शरीराचा उत्तरध्रुव व पृथ्वीचा दक्षिणध्रुव हे सन्निध येतात. त्याचप्रमाणें जर आपण पूर्वेकडे डोकें करून निजलों तर अभ्यासानें अगर अन्य कारणानें डोक्यांत उत्पन्न झालेला दाह उष्णतोत्पादक विद्युत्पूर्ण किरणांच्या परिणामानें शमन पावतो व याच्या उलट निजलों तर हा प्रवाह पायामधून शरीरांतून संचार करील व डोक्यांतून बाहेर पडतांना उलट थोडेंबहुत उद्दीपन करील व मेंदूची साम्यावस्था व थंड स्थिति बंदलून जाईल. उष्णतेनें उष्णता मारणें, शीतानें शैत्याचा नाश करणें त्यांतीलच

हा प्रकार होय. डोकें व मेंदू हीं जगतांत सर्व प्रकारची कामगिरी करण्याचीं साधनें असल्यामुळें तीं स्वस्थ, थंड व शांत रहाणें हें अवश्य आहे. सबब पूर्वेकडे डोकें करून निजणें व त्याचप्रमाणें एकंदर शरीर निरोगी ठेवण्यास दक्षिणोत्तर निद्रा घेणें याची वरील विवेचनावरून थोडी तरी कल्पना येईल अशी आम्हास आशा आहे.

वर पूर्वेकडे डोकें करून कां निजावें याचें विवेचन करितांना आम्ही जें सांगितलें कीं, उष्णतोत्पादक विद्युत्प्रवाहाचा जेथें प्रवेश होतो (शरीरांत) तेथील मूळचा दाह शान्त होऊन ज्या भागांतून तो बाहेर पडतो तेथें थोडा दाह उत्पन्न करून निघून जातो, तर हा नियम भेषजीय विद्युच्छास्त्रांत अनेक प्रयोगांवरून सिद्ध असल्यानें त्याबद्दल कोणासच संशय घेण्याचें कारण नाहीं. मार्कंडेय व गार्ग्यमुनींनीं आन्हिकधर्मांत वरील आदेश कां लिहून ठेवले याचा थोडाबहुत खुलासा वरील आधुनिक शास्त्रीय उपपत्तीनें लागल्या खेरीज रहाणार नाहीं. त्यांची दृष्टि सार्वजनिक आरोग्याच्या, सुखाच्या व उन्नतीच्या विचारांनीं कशी भरून गेली होती व अज्ञ जनांस शास्त्रीय उपदेशापेक्षां धार्मिक आज्ञा जास्त बंधक वाटतात असें वाटल्यावरून त्यांनीं याच मार्गाचा अवलंब केला असें दिसतें व हें त्यांच्या विश्वकुटुंबी बुद्धीस अनुरूपच आहे.

विद्युत् व लोहचुंबकत्व यांचीं आणखी पुष्कळ उदाहरणें आहेत. या गोष्टी शरीर स्वास्थ्याला, आरोग्याला व बळकटीला आवश्यक वाटल्यावरून त्यांचा व्यवहारांत सर्वत्र उपयोग केलेला दिसतो.

(१) देवळावरील कळस सोनें, रुपें व तांबें या धातूंचे केलेले असतात व अलीकडे त्रिशूलाकार तांब्याच्या अथवा लोखंडाच्या कांबी अथवा गज इमारतीच्या अग्रभागीं बसविलेले असतात. दोन्ही उपायांनीं विजेच्या आघातापासून इमारतीचें संरक्षण व्हावें हा हेतु असतो.

(२) दंडांत अगर गळ्यांत सोनें, रुपें अथवा तांबें यापैकीं ऐपतीप्रमाणें एकाची पेटी, ताईत अथवा गोळक करून बांधतात. अभिमंत्रित तांदूळ अगर विभूति त्यांत असते परंतु मुख्यतः विद्युत्प्रयोगानें रोग बरे करण्याच्या पद्धतींत कमरपट्टे, आणि इतर अवयवांस बांधण्याचे पट्टे यांचा जो उपयोग होतो, तोच वरील जिन्नसांपासून होत असे व हल्लींही होत आहे. मात्र त्याची शास्त्रीय माहिती नसल्यानें त्याजवरील श्रद्धा कमी झालेली आहे.

(३) दर्भासन, मृगाजिन, व्याघ्राजिन, रेशमी व लोकरी आसनें यांचा उप-

योग विजेच्या आघातापासून संरक्षण होण्यास फार होतो. हल्लींप्रमाणें विद्युत्प्रतिबंधक मोठमोठ्या इमारती नसून जंगलांत पर्णकुटीकेमध्यें राहण्याचा जेथें सर्वत्र प्रचार असे तेथें या साधनांचा विजेपासून बचाव करण्याकरितां उपयोग करण्यांत यावा याचें काय आश्चर्य ? वरील जिन्नसांचा आसनाचे कामीं उपयोग केल्यानें पृथ्वीवर घडलेल्या विद्युदाघाताचा आपणास संपर्क पोहोंचत नाहीं. कारण आपलें शरीर व भूमि यांमध्यें हें विद्युन्निवारक आसन असल्यानें विद्युदाघात अशा आसनस्थाचे शरीरास इजा देण्यास समर्थ नसे.

हिंदूच्या समजुतींपैकीं आणखी एक दोन सांगून या विषयाचा निरोप घेणें बरें. हिंदू देवादिकांच्या मूर्तीचे चित्र काढलें असतां मुखाभोवतीं एक प्रभामंडळ काढलेलें असतें. अर्थात् तें चकाकार, चकचकीत व तेजस्वी असतें. पुष्कळ दिवस दिव्यत्वाच्या नांवाखालीं याची कोणी चौकशी केली नाहीं. जे ईश्वरी अंश आहेत त्यांच्या मुखाभोंवतीं अशी प्रभा असणें साहजिकच आहे अशी सार्वलौकिक समजूत होती. परंतु अशा तऱ्हेनें शास्त्रज्ञ लोकांचें व चिकित्सकांचें समाधान होणें अशक्य होतें. पुढें या बाबतींत आस्ट्रीयामधील शोधक रसायन-शास्त्रज्ञ यानें असा शोध लावला कीं, मनुष्यजातीसुद्धां सजीव, निर्जीव प्रत्येक नैसर्गिक पदार्थ, आणि तारका यांच्या भोंवतीं एक अत्यंत सूक्ष्म व जड दृष्टीला भासमान होणारें असें प्रभावलय असतें; परंतु शरीराच्या इतर भागासभोंवतालील यांतील परमाणु मुखाजवळील परमाणूपेक्षां अत्यंत विरल व हीनतेज असतात. सबब सर्व शरीराभोंवतीं असलेलें हें वलय भासमान न होतां फक्त मुखासभोंवतालीं असलेलेंच दृश्यमान होतें. आतां या शास्त्रीय शोधानें व प्रत्यक्ष प्रयोगानें एका गूढ गोष्टीस व्यवहाराच्या कोटींत बसवून अतर्क्यता व दिव्यता या भाववाचक अंध समजुतीस अर्धचंद्र दिला. मात्र त्यायोगें प्राचीन भारतीय ऋषिवर्यांची कीर्ति द्विगुणित झाल्यावांचून राहत नाहीं. कारण प्रयोगानें हें कोडें उकलण्यास जगास अद्यापपर्यंत कालावधि लागला. परंतु ऋषिजनांच्या ज्ञानचक्षूस याचें केव्हांच दर्शन झालें होतें ! जर या आधुनिक शास्त्रज्ञानें शोध करून हें कोडें उकललें नसतें तर आम्हीं मात्र चित्र काढतांना प्रभामंडळयुक्त मुख काढून तें तसें कां काढलें याबद्दल किती दिवस अज्ञानी राहिलों असतों कोण जाणें ! हिंदूची गतानुगतिक बुद्धि त्यास जगाच्या चढाओढींत टिकविण्यास उपयोगी पडली हें मात्र खरें. इजिप्सीयन गेले; बाबीलोनियन नामशेष झाले; इराणी स्मृतिशेष उरले; खाल्डियन लोक इतिहासांतच मात्र परिचित

राहिले. अशा प्रकारचे प्राचीन काळच्या लोकांच्या दैवाचे विलास दृष्टिपुढें उभे ठाकले म्हणजे गतानुगतिक बुद्धीनें कां होईना, जगाचे हे दिवस पाहण्यास आर्य राष्ट्र जगलें यावरून त्याला पुढें भाग्याचे दिवस येणार अशी मनाची स्वाभाविक समजूत होते व ती परमेश्वरी कृपेनें खोटी ठरणार नाहीं अशी आशा करण्यास बऱ्याच कारणें आहेत.

वरील व्हॅान रीशेन बॅकचें तत्त्व स्पृश्यास्पृश्यतेस लावून कांहीं सार निघतें कीं नाहीं हें पाहूं. एकाद्या हिंदू मेजवानीचे प्रसंगीं सर्व मंडळी जेवणास बसली असतां कधीं कोणी कोणास शिवणार नाहींत. आपल्या पानाभोवतीं पाण्याचें मंडल तयार करून जेवण होईपर्यंत त्याच्या बाहेरील पदार्थास स्पर्श करणार नाहींत. मुसलमानांमध्यें एका ताटांत जेवावें अशी कुराणाची आज्ञा आहे व तेणेंकरून प्रेम-संवर्धन होतें असें ते लोक मानतात. युरोपियन लोकांत जरी एका ताटाचा प्रेमवर्धक प्रकार नसला तरी एका मेजासभोंवतीं बसून एकमेकांस पेले ओवाळून यथेच्छ हात मारण्याची फार मोठी चाल आहे. अशा लोकांस हा प्रकार चमत्कारिक वाटल्यास काय आश्चर्य ? यांत प्रेम नाहीं, फक्त सामाजिक जुलूम म्हणून मेजवानीसारखे प्रसंग करतात असेंही त्यांस वाटेल. परंतु थोडा विचार केल्यावर ही गोष्ट साफ खोटी आहे असें कळून आल्याखेरीज राहणार नाहीं. प्रत्यक्ष एका कुटुंबांत आजा, बाप, मुलगा, भाऊ एकमेकांस जेवतांना शिवत नाहींत या प्रकारास काय म्हणावें ? यांत प्रेमाचा अभाव कोणास सांपडेल काय ? तर ही गोष्ट निराळ्या दृष्टीनें पाहिल्यास यांत थोडेंबहुत तथ्य आहे असें कोणासही आढळून येईल. हा आत्मिक शक्तिविकासाच्या प्रयत्नाचा मासला होय. आपली शक्ति क्षणोक्षणीं वाढत असते व ती जेवणाच्या व अन्नपचनाच्या वेळीं फार वेगानें काम करित असते. जगांत प्रत्येकाची शक्ति सारखी नसते व दोन कमी अधिक शक्ति एकत्र आल्या असतां त्यांचा कळह हा ठेवलेलाच असतो. तर ज्यांनीं आध्यात्मिक अभ्यासाच्या मार्गें आपलें चित्त लावलें आहे त्यांनीं अशा द्वंद्वापासून अलिप्त राहाण्याची इच्छा करावी व आपल्या आध्यात्मिक शक्तीस वाढण्यास पूर्ण अवसर द्यावा हें अगदीं साहजिक आहे. हा आत्मबल वाढविण्याचा अभ्यास एकानेंच करावा व दुसऱ्यानें करूं नये असें थोडेंच आहे ! परंतु आध्यात्मिक बलाची चाढ वरिष्ठ वर्गांत आढळते व म्हणून हा प्रकार ब्राह्मणांत आढळून येतो. हल्लींच्या ब्राह्मणांत तो अपभ्रष्ट स्वरूपांत असेल, परंतु प्राचीन आर्य शक्तीच्या पाठीस लागलेले होते म्हणूनच त्यांनीं तो प्रचारांत आणला. समाजांतील कोणत्याही व्यक्तीस आपलें मनोबल वाढविण्यास पूर्ण मुभा

आहे. अशा मार्गांतील अभ्यासकांच्या अंगीं व्हॅान रीशेन बॅक म्हणतो त्याप्रमाणें एक प्रकारची आकर्षक व वशीकरणात्मक शक्ति उत्पन्न होते व ती त्याच्या सभोवतीं पसरल्यानें त्यांच्या तांब्याभांड्यास, आसनास, दंडास, वस्त्रछाटीस व्यापून राहते यांत काय नवल ? परंतु इतर मनुष्यांचे विचार स्वार्थी असतात. साध्या मनुष्याचें मन आत्मनिष्ठ व ईश्वरनिष्ठ नसल्यानें त्यावर अहंकार व स्वार्थ यांच्या मिश्रणाचें फार घूट बसलेलें असतें व याजपासून जे किरण बाहेर पडणार ते मलीन व अशुद्ध असणार. निकृष्ट वर्गाकडे जसजसे आपण जाऊं तसतसे तामसी विचार-किरण त्यांच्यामधून जास्त बाहेर पडणार. मागें सांगितल्याप्रमाणें अशा विधर्मी किरणांचें संघटन झाल्यास त्याचा परिपाक म्हणजे युद्ध, व त्यांत सात्विक बलाचा विजय होणार हें खासच. तरी सुद्धां योगनिष्ठ व आत्मनिष्ठ यांस ही आत्यंतिक पायरी गांठावयाची असते त्यांस या शक्तिक्षयानें विलंब होतो. सबब असा नेमधर्मी पुरुष बहुधा नीच व पतित लोकांचा संपर्क व सहवास टाळीत असतो. असें केल्यानें आत्मिक बल अव्याहत वाढून त्याचा हेतु लवकर साध्य होतो. व्हॅान रिशेन बॅक म्हणतो कीं, हे मानसिक बलाचे किरण सात्विक असोत, राजसी असोत वा तामसी असोत, ते धातूच्या भांड्यापेक्षां मातीच्या अगर लांकडाच्या पात्रांत जास्त लवकर संचित होतात व म्हणूनच विटाळलेलीं मृण्मय व काष्ठमय पात्रें फोडून धातुमय पात्रें अग्निसंशोधित केलेलीं आपण पाहतों. असे तपोनिष्ठ पूर्वी आपली शक्ति यज्ञयाग व पुढेंपुढें ईशचिंतनांत घालवीत व जेणेंकरून लवकर सायुज्यमुक्ति मिळेल त्याची वाट पहात बसत. अशा लोकांनीं आपल्या आसपास इतरांस येऊं न दिल्यास त्यांत त्यांचा काय दोष आहे ?

वरील स्पृश्यास्पृश्य विचार व या प्रकरणांतील प्राचीन आर्यांच्या इतर चालीरीती ह्या सर्वांस सारख्याच मान्य व्हाव्या असें आमचें म्हणणें नाहीं. आम्हास एवढेंच सांगावयाचें कीं, ज्या गतानुगतिक बुद्धीनें आम्ही अनेक स्थित्यंतरांतून पार पडलों त्या बुद्धीवर नवीन शास्त्रांचे संस्कार करा व आपला प्राचीन धर्म व आचार अर्थशः समजून घ्या आमच्या आचारविचारावर नवीन प्रकाश पाडून युरोपियन त्याचें याथातथ्य सिद्ध करीत आहेत; परंतु तें आम्ही घेणें हें लाजिरवाणें आहे.

मागें सांगितलेल्या नष्ट राष्ट्रांच्या नाशाबीं जें सुख नव्हतें तें आम्हास मिळणार आहे; म्हणूनच आम्ही वांचलों आहों. तर नवीन शास्त्रांचें साहाय्य घेऊन प्राचीन चालीरीती समजून घ्या व द्या. आपलें जगत्श्रेष्ठत्व सिद्ध करा. आम्हास हल्लीं मान

मिळत नाहीं याचें कारण आमचें अज्ञान. प्राचीन कालीं जें योग्य होतें तेंच आम्हीं मात्र अजून उराशीं घेऊन बसलों आहों व अशा तऱ्हेनें अनौचित्याचा अपराध करून आम्ही आपलें हंसें जगाकडून करून घेत आहों. सबब आधुनिक साधनें नसतां केवळ चिंतनानें व किरकोळ उपकरणानें प्राचीन भारतीय आर्यांनीं जे शोध लावले तेच आज जगास सहाय्यभूत झाले व त्यांचीच आज पुनरावृत्ति होत आहे; परंतु त्याच शोधावर उभारलेल्या चालीरीती काल बदलल्यामुळें हास्यास्पद भासूं लागल्या. तरी त्या न टाकतां त्यावर आधुनिक शास्त्रांचा शोधक प्रकाशकिरण-प्रवाह टाका व त्यांचें संशोधन करून त्या परिस्थितीला जुळवून घ्या व आपल्या प्राचीन वंशजांच्या कीर्तीस शोभेल अशी कृति करण्यास लागा. म्हणजे या ज्ञानपवित्र, अनुभवी आत्मज्ञाननिष्ठ व वृद्ध भारतीय राष्ट्रास सर्व आधुनिक बाल राष्ट्रें शतशः प्रमाण करतील व ज्ञानाकरितां याची सेवा करतील अशीं चिन्हें आज दृग्गोचर होऊं लागलीं आहेत. यावरून काल अनुकूल असून ईश्वरी कृपा आहे हें स्पष्ट दिसत आहे. अशा वेळीं जर आम्ही आपलें कर्तव्य ओळखलें नाहीं तर मात्र आशा नाहीं. आळशी, उधळ्या व कंगाल आजोबा लवकर मरावा म्हणजे खाण्यास एक मनुष्य तरी कमी झाला असे निराशेचे विचार कधीं कधीं डोकावतात त्याचप्रमाणें राष्ट्रांच्या संसारांत फाजील लोकसंख्येनें बुभुक्षित झालेली कांहीं राष्ट्रें हिंदुस्थानाकडे साभिलाष दृष्टीनें पहात आहेत; अशा वेळीं मागें सांगितल्याप्रमाणें त्यांस चेले बनवून त्यांचा बकासुरी स्वभाव बदलून त्यांस शान्त, दान्त करणें व त्यांस वेदान्तधर्माचें ज्ञान देणें ही कामगिरी भावी पिढीवर अवलंबून असल्यानें पूर्वजांच्या विनमोल व लोकविस्मयकारक कृतीवर नजर देऊन त्याप्रमाणें वागलें पाहिजे; तरच आमचा तरणोपाय आहे व प्राचीन ऐश्वर्याची पुनरपि प्राप्ति होण्याची आशा आहे यापेक्षां दुसरें काय ?

प्रकरण १८ वें.

भारतीय बांधकाम व खोदकाम.

चीन आर्यावर्तांतील अत्युच्च संस्कृतीचे आणखी एक चिन्ह म्हटलें म्हणजे बांधकाम व खोदकाम होय. भव्य देवालयें, उंच उंच स्तूप, काळावरोबर झुंजणारे अभेद्य किल्ले, दीपमाळा, जयस्तंभ, कमानी, कोरीव लेणी, विहार वगैरे सर्व प्रकारचीं कामें पाहून अर्वाचीन शिल्पज्ञ थक्क होऊन जातात. कांहीं वेळ मनास अशी शंका येते कीं खरोखर अशा अपूर्व व प्रचंड कामाचे जनक तरी कोण असतील ? यांची रचना करणारे कोणी तरी राक्षस योनींतिल असावेत असें वाटतें. पंच महाभूतांना गुलाम बनवून जी अचाटशक्तीची कामें आज करून घेण्यांत येतात त्यापेक्षांही या कामाची बळकटी, प्रचंडपणा, भव्यपणा हे गुण कांहीं अजब आहेत. मिसेस मॅनिंग म्हणते कीं, हीं कामें प्रथम पाहिलीं म्हणजे यांचें वर्णन करण्यास वाचा असमर्थ होते; परंतु पुढें पुढें जास्त परिचय झाला म्हणजे त्यांतील असामान्य विस्मयकारकपणा नाहींसा होतो. परंतु कौतुक व सौंदर्य यांचें मनःपटलावर उमटलेलें चित्र कधींही पुसलें जात नाहीं.

येथील इमारतींचे विशेष म्हणजे बळकटी, टिकाऊपणा, सौंदर्य व भव्यता हे होत. महंमद गझनवीसारख्या अत्यंत कडव्या धर्मांध मुसलमानानें सुद्धां ही गोष्ट कबूल केलेली आहे. तो मथुरा येथें असतांना त्यानें खलीपास एक पत्र लिहिलें त्यांत तो म्हणतो कीं, महंमदी धर्माइतक्याच येथील इमारती बळकट आहेत. देवालयांचा नाश, मूर्तींचा उच्छेद व इतर ईश्वरस्वरूपी साकार वस्तूंची हानि हेंच ज्याचें ब्रीद व मुख्य धर्मकार्य त्या महंमद गझनवीनें अशी कबूली द्यावी यापेक्षां येथील इमारतींच्या बळकटपणाविषयीं दुसरा काय पुरावा पाहिजे ? आज हजारों वर्षें होऊन गेलीं; ऊन, पाऊस, थंडी, वीज, भूकंप आणि इतर अन्य प्रकारचे आघात सहन करून कांहीं इमारती जशाच्या तशा उभ्या आहेत. त्यांच्या सौंदर्यांत अगर भव्यपणांत कोणत्याही प्रकारचें

न्यून आलेलें नाहीं. मि. थार्नटन, प्रो. वेबर, फर्ग्युसन, लार्ड व्हॅलेनशिया यांसारख्या प्राच्यभाषाकोविद, कलापंडित व मार्मिक टीकाकार यांनीं मनापासून येथील प्रचंड, गंभीर, विस्मयकारक इमारतीची यथेच्छ स्तुति करून शेवटीं त्यांचें यथार्थ व सौंदर्यानुरूप वर्णन करणें अशक्य आहे अशी कबुली दिलेली आहे. एल्फिन्स्टन एका ठिकाणीं एका इमारतीचें वर्णन करतांना म्हणतो कीं, " खांब, गणेशपट्ट्या, खिडक्यांची कवाडें व मेहेरपी यांचीं कामें इतकी कांहीं सुबक व एकसारखी केलेलीं आहेत कीं त्यांच्या पट्ट्या साच्यांतून ओतून काढल्या आहेत कीं काय असा क्षणभर भास होतो. लता, वेली, पुष्पें, मानवाकृति, पशुपक्षी व इतर कांहीं काल्पनिक आकृति हीं सर्व एका ठिकाणीं मनोहर रीतीनें घालून त्याची कलाकुसरीचीं केलेलीं कामें खरोखर मनास चटका लावून सोडतात. खरोखर भिंती, दरवाजांच्या बाजवा व गणेशपट्ट्या सुबक कुसरीच्या कामानें व वेलबुट्ट्यांनीं इतक्या कांहीं नयनमनोहर केल्या आहेत कीं त्यांची बरोबरी करणारीं कामें दुसरीकडे क्वचितच पहाण्यास सांपडतील. "

पाँडिचरीच्या दक्षिणेस २० मैलांवर चलंब्रम् या नांवाचें एक अती भव्य मंदिर आहे. ३६० फूट लांब, २६० फूट रुंद अशा विस्तीर्ण पटांगणांत हें पवित्र भव्य मंदिर असून त्यास एक हजार खांब आहेत; व प्रत्येकाची उंची ६।७ पुरुष आहे. यावरून त्या देवालयाचा आकार केवढा असेल, त्याचें दर्शन किती उदात्त असेल याची कोणासही सहज कल्पना होईल असें युरोपियन पंडित डॉ. राबर्टसन व प्रो. हीरन म्हणतात; मग आम्हा हिंदूंस त्याचें चित्र मनश्चक्षूंसमोर सहज उभें करितां येईल यांत काय नवल ? एवढा वेळ दगडी देवालयाविषयीं विचार झाला. यापुढें खोदलेल्या देवालयाविषयीं (कोरीव लेण्याविषयीं) जगाचें मत काय आहे तें पाहूं. पांडवकूट्यें अथवा कोरीव लेणीं हीं ह्या देशाशिवाय अन्यत्र कोठेंच पहावयास मिळत नाहींत. यांचे ठिकाणीं दिसून येणारें कलाकौशल्य व बुद्धिचातुर्य कांहीं अगाध आहे असें प्रत्येकजण निर्मुक्तकंठानें म्हणत असतो.

वेरूळच्या लेण्याविषयीं प्रो. हीरनचा पुढीलप्रमाणें अभिप्राय आहे:— " पृथ्वीच्या पृष्ठभागावर व पोटांत शिल्पकलेला जेथें जेथें प्रवेश करून आपलें शोभिवंत काम, सुबकपणा, कसब, उदात्तपणा व गांभीर्य दाखवितां येईल तितकें सर्व तिनें या ठिकाणीं दाखविलें आहे. या लेण्यामध्यें जिनें, पूल, माड्या, गच्च्या, देवालयें, खांब, ढलेच (Porties) द्वारकमाची, मनोरे, भव्य पुतळे, उठावदार वेलबुट्ट्या

(reliefs) वगैरे सर्व कांहीं ३.हे. यांच्या दारांत पाऊल टाकतांना अंगावर एक-प्रकारचा काटा उभा राहिल्याशिवाय रहात नाहीं. वसुंधरेच्या नितांत पोटांत वर सांगितलेले सर्व प्रकार पोखरून काढलेले पाहिले डोक्यावर अत्यंत वजनदार पर्वताचें आच्छादन अवलोकन केलें व ह्या प्रस्तरमय भव्य इमारतीच्या दुवळ्या खांबावर नजर गेली व कित्येक ठिकाणीं निराधार भारी ओझ्याचें हें डोंगरी आढें व छप्पर दृष्टीस पडलें म्हणजे ज्याच्या हातून तें निर्माण झालें त्यांच्याबद्दल आदर, विस्मय, कौतुक व पूज्यभाव इत्यादि भावना मनामध्यें खेळूं लागतात व जर त्यांचे दर्शन होईल तर आपण किती धन्य होऊं असे विचार मनांत आल्याशिवाय राहत नाहींत." अशाच प्रकारचीं कारोमांडेल किनाऱ्यावरील सप्तमंदिरें असून त्यांचें शिल्पकाम, मानवी चातुर्य व कसब यांच्या अत्यंत थोरवीचें प्रदर्शन करीत राहील असें म्हटल्यास मिथ्यास्तुति कधींच होणार नाहीं. हीच स्तुति शब्दशः द्वारकेला लागू आहे.

इजिप्शियन, ग्रीक आणि हिंदी शिल्पकलेची तुलना करून प्रो. हीरननें असें ठरविलें आहे कीं, स्तंभावर बारीक नक्षी काढणें, वेलबुट्टी खोदून ते सुशोभित करणें, मनुष्य कृतियुक्त दगडी खांब खोदणें व त्यावरही अशीच कौशल्याचीं कामें करणें या बाबतींत भारतीय आर्यांनीं इतर देशांस किती तरी मागें टाकलें आहे !

चुनेगच्ची, भरभक्कम टिकाऊ गिलावा करणें, पाखीं व खांब चुन्याच्या पिठानें मढवून त्यामध्यें चित्रें खोदणें, गिलाव्याचें छत तयार करणें, खिडक्या, दारें यांचेंवर जाळीचें व नक्शीचें काम करणें, एकाच इमारतीस असंख्य खांब देऊन दगडी तुळया पसरणें व अशा रीतीनें सर्व काम दगडानें करणें इत्यादि आणखी कांहीं जास्त विशेष मॉर्निंग बाईनें सांगितले आहेत.

पुढें ही कला जास्त भरभराटीस बौद्ध धर्माचे कालीं आली. या धर्माचा प्रसार संबंध हिंदुस्थान, तिबेट, चीन, जपान, सिंहलद्वीप व पूर्वेकडील बेटें यांत होऊन भिक्षु व भिक्षुणी, श्रावि-क-का, संन्यासी व शिष्यबटु यांना नगराबाहेर विश्रामस्थानें पाहिजेत म्हणून विहाररूपानें तिचा प्रसार झाला. या निमित्तानें ती हिंदुस्थानांतून बाहेर जाऊन तिचा परिणाम मुसलमानी कमानी व ख्रिस्ती प्रार्थनामंदिरें यांजवर सुद्धां झालेला दिसतो असें प्रो. वेबर व कर्नल टॉड् यांचें म्हणणें आहे.

पुढें मुसलमानांनीं आपलें स्वतंत्र शिल्पशास्त्र इकडे आणलें, परंतु त्याचा व हिंदी कलेचा संयोग झाल्याबरोबर दुसऱ्याचाच ठसा पहिल्यावर पडला. याचें उदाहरण म्हणजे दिल्लीं शहरांतील सुप्रसिद्ध मशिदी, आग्र्याचा ताजमहाल, ग्वाल्हेरचा राजवाडा

हीं होत. हीं कामें, त्याप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांतील देवालयें; कार्ल्याच्या व अजिंठ्याच्या कोरीव लेणीं या ठिकाणीं संगमरवरी दगडांत खोदलेल्या वेलबुट्या, काटकोणाकृती जाळीची नक्षी आणि काश्मीरांतील इमारतींत अवयव व रंग यांचे प्रमाणबद्ध संमेलन पाहिलें म्हणजे मनांत अतीशय आदर उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. ह्यापासून भावी शिल्पज्ञांना सौंदर्य व गांभीर्य या बाबतींत फारच शिकण्यासारखें असून कदाचित इंग्लंडमध्यें शिल्पकलेची स्फूर्ति व नवीन अभिरुचि याजपासूनच उत्पन्न झाली असेल असें प्रांजलपणें कोल्मन व सर हंटर यांनीं कबूल केलें आहे.

कर्नल टॉड् या प्रख्यात रजपूत लोकांच्या इतिहासकारानें बरोली येथील देवालयांचें विस्तृत, हुबेहुब व चित्ताकर्षक शब्दचित्र दिले आहे. तो म्हणतो कीं, अशा सुंदर देवालयांचें सौंदर्य, गांभीर्य, तेजस्विता, ओज व मनोहारित्व यांचे यथार्थ वर्णन करणें हें जरी लेखणीचें काम असलें तरी तिला शीण आल्याशिवाय रहात नाहीं. कारण जेथें प्रत्यक्ष शिल्पकलेचीच परमावधि झाली तेथें लेखणी काय करणार?

अशा इमारती हिंदुस्थानच्या सर्व भागांत आहेत. ज्यांना विद्या नसेल, ज्यांचें मन सुसंस्कृत बनलें नसेल, वेदान्त, तत्वज्ञान, धर्म हें कळून घेण्याचें ज्यांस अवसान नसेल, त्यांनीं आपल्या पूर्वजांच्या कृतीची हीं जगन्मोहक स्मारकें एकवार पाहून आपण पैतृक ऋणांतून अंशतः तरी मुक्त व्हावें. ह्यांच्या सांन्निध्यांत असतांना पूर्वजांची बुद्धि, साहस, चिकाटी, अभिरुचि, परिश्रम, ज्ञानलालसा इत्यादि बाबतींत अणुमात्र स्फुरण झाल्यास मोठाच लाभ झाल्यासारखा होईल; निदान पुण्यस्थलांच्या दर्शनानें नेत्र पुनित होऊन, समाधान पावतील. मनास शांति मिळेल, चित्तांत चमत्कृति उत्पन्न होईल व हृदयांत मानवी जीवनाच्या उदात्तपणाचें प्रतिबिंब पडेल हा काय लहान लाभ आहे?

प्रकरण १९ वें.

विणकाम.

बुद्धीची कुशाग्रता, मानसिक विकासाची श्रेष्ठता, नेत्राचा सूक्ष्मभेदीपणा, श्रवणाचा नाजूकपणा, अभिरुचीचें श्रेष्ठत्व, हस्ताची वारकाई, कामधंद्यांत लगणारी शीघ्र ग्राहशक्ति इत्यादि थोर गुणांनीं दोनशें वर्षांपूर्वी हिंदु लोकांनीं काव्य, नाटक, कथा, पुराण इत्यादि वाङ्मयात्मक कामांत व चित्रकला, गाणेंबजावणें, शिल्पकाम वगैरे ललितकलांमध्येंच नैपुण्य संपादिलें होतें असें नाहीं: तर कलाकुसरीचें नक्षीकाम, खोदकाम, विणकाम कलाबतूचे, जडावाचें काम, ओतकाम, रसकाम, धातुकाम, कृषिकार्य, खनिज धातु काढण्याचें, कामसंशोधन काम, रंगकाम इत्यादि इत्यादि सर्व प्रकारचीं सुधारलेल्या देशांत होणारीं कामें त्यांच्या हातून फार नाजूकपणानें व सुबकपणानें होत असत, एवढेंच नव्हें तर बाह्य देशांतील लोक येथें येऊन त्या कला शिकून स्वदेशीं परत जात. कलाकौशल्याच्या कामांत हिंदु लोकांचा हात धरणें महामुष्कीचें आहे अशी सर्वांची समजूत होती; परंतु त्या पिढिजाद कसबी लोकांचा नाश खुल्या व्यापारपद्धतीनें झाला. संरक्षक जकातीच्या अभावानें, बुद्धिपुरःसर कारागिरीच्या नाशानें, स्वजातिविषयक प्रेमानें, भेदभावानें, अन्यायमूलक सवलतीनें व इतर अन्य कारणांनीं येथील हुन्नरकला १००--१२५ वर्षांच्या अवधींत साफ बुडून मागील कलाश्रेष्ठतेची आठवण सुद्धां बुजत चालली. स्वाभिमान नष्ट होऊन, आत्मविश्वास पार मावळत चालला. जिकडे तिकडे नैराश्य, दारिद्र्य, परावलंबीपणाचे काळेकुट्ट ढग पसरून अज्ञानाचा पूर्ण अंधकार समाजाच्या कोनाकोपऱ्यांत पसरून राहिला आहे. आत्मनिंदेनें भरलेले शब्द कर्णप्रांतावर धाडधाड येऊन आदळत आहेत, लोक किंकर्तव्यतामूढ होऊन हताश होत्साते मंदधी व जड बनत चालले आहेत. अशा वेळीं त्यांस प्रस्फुरित करून सुपथावर आणून सोडण्याचें सामर्थ्य जरी आपल्या अंगीं नसलें तरी अशा स्थितींत प्राचीन वैभवाच्या गुणाधिक्याच्या उत्तम स्थितीच्या दोन सुखद गोष्टी सांगून त्यांस धीर दिल्यास, त्यायोगें आपोआप त्यांस स्फुरण होऊन त्यांच्या मधून कोणी शक्कर्ता निर्माण होईल; नाही तर निदान अपाय होणार नाहीं हें खास; झाला तर उपायच होईल. सबब मशागतीचें काम करण्याचें आम्हीं योजिलें आहेत. सध्यां जरी अज्ञानाचें दाट आवरण सर्वत्र पसरून

हिंदू समाजांतील शिल्पज्ञ-रत्नें त्यांत अगदीं गाडलीं गेलीं आहेत. तरी अशा प्रकारचें काम कोणी हातीं घेतल्यास तें पुनरपि वर येऊन स्वतेजानें जगाचे नेत्र दिपवून टाकल्याशिवाय राहणार नाहींत. कांहीं लोकांस वाटतें कीं, हिंदुस्थानामध्यें कलाहुन्नराचा नायनाट झाला, तसें आम्हास वाटत नाहीं; परंतु या वेळीं आम्हांस चालू परिस्थिती संबंधीं कांहीं लिहावयाचें नसून प्राचीन कालीं येथील कलाकौशल्याची व हुन्नराची काय अवस्था होती हेंच मुख्यत्वेंकरून पहाणें आहे.

प्रथम आपण विणकामच घेऊं व त्यांत येथील हवामान, कारागिरांचें हस्तलाघव, नयनचापल्य, साधनसामुग्रीचे अल्पत्व व साधेपणा, पिढीजाद संस्कार व संवय यांचे प्राचुर्य याविषयीं युरोपियन इतिहासकार काय म्हणतात तें पाहूं. जेम्समिल व ऑर्म हे प्रख्यात इतिहासकार म्हणतात कीं, हिंदू लोक हे जरी शरीरानें कृश, नाजूक, सडपातळ असले तरी त्यांची दृष्टि फार खोल बारीक वहिवाटलेली आहे. हातांची बोटें अत्यल्प संवदेना जाणण्यास पूर्ण समर्थ असून, चपळाई सफाई व लवचिकपणा या बाबतींत बिनतोड आहेत. रेशमि कातण्याचे धंद्यांत हिंदी कारागीरांच्या स्त्रिया इतक्या पटाईत आहेत कीं,रेशमाच्या एका लहानशा कोशापासून वीस प्रकारचें सूत त्या हांहां म्हणतां कातितात. हें काम त्यांच्या इतकें अंगवळणी पडलें होतें कीं, वीस प्रकारच्या सुताच्या नमुन्यांतून कोणतीही एक तऱ्हा एकदम कातण्यास सांगण्याचा अवकाश कीं जरी पूर्वी निराळ्या प्रतीचा धागा लागला असला तरी तो एकदम बदलून बोलबोलतां त्या मागितलेला धागा काढून देतील.

प्राचीन कालीं तरी असा समज असे कीं, इतर कोणत्याहि खंडांतील लोकांपेक्षां हिंदु लोक हे हस्तनेत्रांदिकांचा खुबीदारपणा, कोमलता नाजूकपणा, इत्यादि बाबतींत श्रेष्ठ असून विणकामामधील धिम्मेपणा, चिकटपणा, सोशिकपणा, कल्पकता आणि व्यापारी जिन्नसाचे पैदासीचे कामीं लागणारीं हुशारी, तरबेजपणा व पटुत्व या गुणामुळें नाणावलेले होते. अशा कामास लागणारें हवामानाचें आनकूल्य येथें आहे व नैसर्गिक पदार्थांचीहि रेलचेल आहे. म्हणून इतर द्विपस्थांना यांचेविषयीं हेवा, आदर व आश्चर्य वाटल्यास त्यांत कांहीं वावगें नाहीं. या देशांतील कापूस फारच श्रेष्ठ दर्जाचा मानला जाई.

हल्लीं इजिप्त व अमेरिका हे देश कापसाच्या उत्कृष्ट निपजेंत अग्रेसर आहेत. परंतु प्राचीन कालीं सर्वच स्थिति उलट होती. त्या कालांत येथील कापूस त्याच्या गुणा

बद्दल अत्यंत नावाणलेला होता. खिस्ती धर्मयुद्धापासून या देशांतील कापूस प्रथम युरोपांत जाऊन तेथून तो अमेरिकेंत गेला आहे. आरब लोक त्या कालीं युरोप व हिंदुस्थान या दोन खंडामधील व्यापाराची ने-आण करीत व त्यांचे भाषेमध्यें कापसाला असलेल्या कुटा (Kuta) नामावरून इंग्रजी कॉटन (cotton) शब्द निघालेल्या असावा असा अंदाज आहे. अशा उत्कृष्ट कापसापासून त्या वेळीं सुंदर, सुबक, तलम, नाजूक पातळ, पिळदार टिकाऊ कापड निघत असून त्याचा खप त्या वेळीं ज्ञात असलेल्या सर्व जगांत होत असें कांहींही करून, कितीहि किंमत पडली तरी ती देऊन येथील मोहक झिरझिरीत, झगझगीत, खुमासदार कापड घेण्यासाठीं इतर द्वीपांतल्या राजे लोकांना, सरदार उमरावांना, धनाढ्य व्यापाऱ्यांना उत्कंठा लागलेली असे, असें भिल्ल, एल्फिन्स्टन, मूरे, थार्नटन त्यांच्या लेखावरून दिसतें. डोक्याची मलमल तर जगप्रसिद्धच आहे. तिच्याबद्दल अशी गोष्ट सांगतात कीं, एकदां अवरंगजेब बादशहा आपल्या मुलीस दाक्षिण्याभावाबद्दल रागें भरून म्हणाला कीं, " मुली हें काय ? त्वां आपलें सुकुमार व नाजूक शरीर वस्त्राच्छादित करून पुरुषांच्या दृष्टीस न पडावें असें करणें हें उचित नव्हें काय ? " त्यावरून ती मोठ्या अदबीनें म्हणालीं कीं, " बाबा, एकावर सात जामे मी नेसल्यें आहे, परंतु त्यांच्या पातळपणामुळें व नाजूकपणामुळें त्या सातही वस्त्रांतून माझें शरीर दिसतें त्यास मी काय करूं ? " ही कथा दंतकथा नसून बॉथ याच्या ' ढाक्यांतील कापसाचा धंदा " या पुस्तकांतून घेतली आहे. डॉ. वाटसन् यानें इंग्लंड व हिंदुस्थान या देशांतील कापसाच्या कापडाच्या निरानिराळ्या जातींचा अभ्यास करून येथील कापड इंग्लंडांतील यंत्रनिर्मित कापडापेक्षां जास्त पिळदार व टिकाऊ आहे असें ठरविलें आहे.

काश्मीरच्या शालीविषयीं हल्लीं सुद्धां सर्व युरोपभर प्रख्याति आहे. येथें वापरीत असलेलीं यंत्रें पूर्वी नव्हतीं व हल्लींही कोष्टी व एतद्देशीय कारागीर तीं वापरीत नाहींत; तरी सुद्धां मागाचा धंदा येथें इतक्या पूर्णावस्थेस पोंचला होता कीं, त्यांतील मालाच्या नाजूकपणाचे, तेजस्वीपणाचे व सुंदरपणाचे बाबतींत प्राचीन देशापैकी कोणालाही हिंदुस्थानची बरोबरी करवली नाहीं. त्याचप्रमाणें गालीचे, सतरंज्या, किनखापी कापड यांची गोष्ट. गालीचे मच्छलीपट्टण येथें फारच नामी होत असत व त्याची निपज हिंदी अभिरुचि व दृष्टि यांना अनुरूप होत असे. हल्लीं कैद्यांना तुरुंगांत जाडे-

भरंड, ओबडधोबड, बेढब व बैठकीवजा गालींचे विणण्यास शिकवितात त्यादरून मॅनिंग बाई म्हणते कीं, जेथें अशा उत्कृष्ट प्रकारचे गालीचे तयार होत तेथील कैद्यांना मोठ्या परोपकारबुद्धीनें ओबडधोबड व जाडेभरडे गालीचे विणण्यास शिकविण्याचा दिवस यावे याला दैवदुर्विलास याशिवाय दुसरें काय म्हणावें ?

डॉ. फॉबेस, वारसन सारख्या विणकाम-तज्ज्ञानें अहर्निश हिंदुस्थान व युरोप येथील सणंगांचा अभ्यास करून निःपक्षपात बुद्धीनें व नाइलाजानें असें म्हटलें आहे कीं, " खरोखर धन्य आहे हिंदू कारागिरांची ! आधुनिक यंत्रसामुग्रीची जोड नसतां केवळ साध्या मागावर इतकें सुबक कापड कसें काढीत कोणास ठाऊक ! त्यांची हत्यारें व साधनें पाहिलीं, तर तीं साधीं, आणि चालू काळास व शोधास विसंगत दिसतात, परंतु त्यांच्या चतुर हातास, कुशल डोळ्यांस व सरावलेल्या मनास तीं पुरेशीं आहेत असें वाटतें. उपयुक्तता, सौंदर्य, मोहकपणा, खुमारी इत्यादि गुण पाहिले तरी त्याही बाबतींत ते वरचढच. तेव्हां हा प्रश्न कसा सोडवावा हें मोठें कोडेंच आहे यांत शंका नाहीं. "

इतका वेळ सुती, लोकरी व रेशमी विणकामाची हिंदुस्थानांत प्राचीन काळीं काय स्थिति होती, येथील कारागिरांचें नैपुण्य किती होतें व साधनसामुग्री कशी साधी होती हें सांगितलें; परंतु रंगीत कापडाबद्दल कांहींच सांगितलें नाहीं. यापुढें रंगीत कापड, घडीव कामें, हिऱ्यामोत्यांच्या जडावाचीं कामें व इतर हरजिन्नसी हुन्नर यांचा संक्षेपतः विचार करूं.

दागदागिनें करणें, हस्तीदंताचीं शोभिवंत, सुबक व नाजूक कामें करणें. पशु-पक्षी, वेलवल्ली, पानें, फुलें, मनुष्य, देव यांचीं हस्तीदंती चित्रें व मूर्ति करणें, त्याच-प्रमाणें दागदागिन्यांवर तीं कोरणें. अंगठ्यांसारख्या सूक्ष्म ठिकाणीं ती बसविणें, भिंती, कागद, कापड यावर तीं रंगानें काढणें, चंदन, शिसवें व इतर योग्य लांकडांवर तीं रंगानें काढणें व कोरणें इत्यादि बाबतींत हिंदू कला अद्यापही राष्ट्रास हरि गेलेली नाहीं. मग ज्या काळीं हिंद राज्यें होतीं, राजाश्रय मोठा होता, धनिक लोक शौकी होते, अमीर-उमराव, सरदार, मानकरी यांस त्यांची हौस व शोक होता, संपत्ति विपुल होती, बाह्य देशाची चढाओढ नव्हती, देशांत शांतता असून जातिविशिष्ट धंद्यास मान होता त्या कालाची गोष्ट कशाला !

कापडाप्रमाणेंच येथील रंगाविषयीं फार पूर्वीपासून प्रसिद्धि आहे त्यांचे मुख्य

गुण म्हणजे तजेला, चमक, कायमपणा व अपुसटपणा हे होत. हे रंग वनस्पतींपासूनच मुख्यतः काढीत असत. हल्लींप्रमाणें खनिज रंग व कोळसा रंग हे पूर्वी बहुधा सुळींच ठाऊक नव्हते. रंगाचीं सर्व कामें वनस्पतींपासून काढलेल्या रंगापासून होत असत. असे रंग वनस्पतींपासून निरानिराळ्या पद्धतींनीं काढणें, त्यांचा साख धरणें, त्याचा कापडावर ठसा मारून चीटें बनविणें,सूत रंगविणें वगैरे सर्व कामें साध्या सोप्या पद्धतीनें कारागीर लोक आपल्या मोडक्यातोडक्या घरांत पोराबाळाकडून अथवा वहिणी-बायकांच्या हस्तें करवून घेत. मात्र त्यांचा रंग एकदा बसला कीं कधी काळीं निघण्याची आशाच नको. कच्चा रंग, पक्का रंग वगैरे सर्व तऱ्हा आणि निरानिराळ्या छाया व छटा यांचें संमिश्रण व लेपनकार्य इतक्या खुबीनें होई कीं, त्या कापडाची तो झकाकी, तेज, मनोहारित्व, छटाविलास पाहिला म्हणजे युरोपच्या पट्टराण्या रुसून बसत व त्यांची समजूत काढण्याकरितां त्यांचीं हौस, लज्जत, अभिरुचि व कल पाहून येथील व्यापारी व कारागीर तसा माल काढून त्यांची समजूत करीत व अलोट संपत्ति ओडीत, या रोमन इतिहासकारांच्या कुरकुरीचें मर्म ध्यानीं येतें. अशी संपत्ति परदेशांतून इकडे किती येई ! हा व्यापार कोण करीत असे ? तो कोणत्या मार्गानें होई यांचें सविस्तर वर्णन पुढील एका स्वतंत्र प्रकरणांत करण्याचें असल्यानें त्याविषयीं येथें हात आखडता घ्यावा हें बरें. मात्र एवढी गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे कीं, प्रथम वनस्पतीपासून रंग काढण्याची कला हिंदू राष्ट्रानेंच शोधून काढली व याचें उत्तम निदर्शक ' इंडिगो ' हा शब्द होय. वास्तविक नील हा शब्द हिंदुस्थानांत सर्वत्र रूढ असतां येथील नील या शब्दाचें असें रूपांतर कसें झालें याबद्दल सर्वांस आश्चर्य वाटेल; परंतु प्लिनीनें इंडिया या शब्दावरून इंडिगो असा शब्दप्रयोग केला व त्यावरून हल्लींचा इंडिगो हा शब्द रूढ झाला असला पाहिजे. प्रो. विल्सन, एल्फिन्स्टन, डॉ, टेनेंट, मिल, बॅक्कांफ्ट, हीरन प्रभृति पंडितांनीं रंगोपतच्या बाबतींत दिसून येणारी श्रेष्ठता अर्धवट आश्चर्यानें, अर्धवट नाइलाजानें कबूल केली आहे.

प्रो. विल्सनसाहेबानें लोखंडाच्या कामाविषयीं पुढील उद्गार काढले आहेत. " लोखंडाच्या ओतकामाची कला हिंदुस्थानांत किती वर्षांपासून रूढ आहे हे कांहीं निश्चित सांगवत नाहीं. इंग्लंडांत ती कालपरवां सुरू झाली असें हिंदुस्थानच्या इतिहासाकडे दृष्टि दिली म्हणजे वाटतें. कारण हिंदुस्थानांत ओतकाम, घडकाम, तारकाम, पोलादकाम हीं सर्व कामें फार वर्षांपासून होत आहेत. "

लोखंडास मऊ, चिवट व बाकदार करणें व नंतर त्यापासून पोलादी पाणीदार हत्यारें बनविणें ही कला हिंदूंस कोणी शिकविण्याची जरूरी नाहीं. डॉ. रॉय म्हणतो कीं, जरी डमास्कस येथील तरवारीच्या पात्यांची सर्वत्र कीर्ति गाजलेली असली तरी ती कला इराणी लोकांनीं येथून नेली असून त्यांच्यापासून त्यांतील रहस्य अरबांनीं ताडलें. दिल्लीमधील कुतुबमिनारच्या पुढें असलेला भव्य स्तूप आज १५०० वर्षांवर तेथें उभा आहे; त्यावर वारा, पाऊस, उन्ह, थंडी यांचा सारखा मारा होत असतां त्याजवर गुंजेएवढा गंज चढलेला नाहीं; त्याच्या मूळच्या सौंदर्यांत किमपि न्यूनपणा आलेला नाहीं अथवा त्यावरील कोरीव लेख यत्किंचित् सुद्धां मलीन झालेला नाहीं. त्याचप्रमाणें जगन्नाथपुरी येथील प्रचंड लोखंडी पट्टे, सोमनाथचे नक्षीदार व स्वलंकृत लोखंडी दरवाजे, नरवारची २४ फुटी तोफ हीं सर्व मोठ्या मूक घोषानें प्राचीन कालांतील हिंदूंच्या धातुकलाप्राविण्याबद्दल साक्ष देत आहेत. तसेच कनरुक (kanaruc) येथील देवळाच्या पाय्यास लावलेले लोखंडी वासे पाहिले म्हणजे येथें लोखंड ओतण्याची कला किती वर्षांपासून अवगत होती याची खात्री पटते व त्याचा सर्वत्र उपयोग होत होता हेंही त्यावरून कळून येतें. अस्तु. कुतुबमिनार पुढल्या स्तूपाचा एक तुकडा घेऊन त्याचें डॉ. मूरे व पर्सी यांनीं निरनिराळें रासायनिक पृथक्करण केलें असतां त्यांतच इतर धातूंची भेसळ नसून तें शुद्ध प्रसरणशील लोखंड आहे असें आढळून आलें. इतक्या उत्तम दर्जाचें लोखंड इतक्या वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत तयार होत असे हें पाहून कोणास अचंबा वाटणार नाहीं ? आणि तें असल्या प्रकारचें होतें म्हणूनच वर दिलेले लोखंडी स्मारकरूप जिन्नस आज जशाच्या तसे व मोडतोडीविना हयात आहेत. ग्लासगो व शेफिल्ड येथील लोखंडी जिन्नस व कारखाने प्रख्यात असून तेथल्यासारखे जिन्नस पूर्वी कच्छ येथें होत असत असें मॅनिंगबाई म्हणते; व पुढें तिचें म्हणणें असें आहे कीं, पूर्वी हिंदुस्थानांत गरजेपेक्षां जास्त लोखंड पैदा होत असल्यानें तें फोनिशियन व्यापारी घेऊन जात असत.

आणखी कांहीं किरकोळ गोष्टी सांगून हे प्रकरण बंद करूं. पीकपेरणीचा क्रम ही कला हिंदू शेतकऱ्यांस जात्याच इतकी परिचयाची झाली आहे कीं त्यांत कांहीं शास्त्रीय भाग व महत्व आहे असें त्यास वाटत नाहीं. मात्र खरी गोष्ट तशी नसून हल्लींच्या शास्त्रीय व चिकित्सक दृष्टीनें त्यांत बरीच सुधारणा होणें शक्य आहे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. परंतु चालू शतकाच्या मागें एकदोन शतकें जाऊन त्या अशा-

क्रीय कालीं या क्रमापासून झालेला फायदा व जमिनीची सुस्थिति पाहिली म्हणजे त्या गोष्टीचें जें जगास कौतुक वाटतें तें अगदीं सकारण आहे असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. त्याचप्रमाणें तावदानें, जरतारी काम, कलावतू व किनखापी काम, गालिच्चे, जनानी व चिकाचे पडदे, जडावाचे दागीने, नकशीदार व इतर कलाकुसरीचें जाळीदार काम, काच व बिल्लोरी काम, लाकडी काम, तीक्ष्ण धारेचीं पाणीदार हत्यारें, इत्यादि जिन्नसांवरून भारतीय कलाप्रावीण्याबद्दल प्रत्येकाची खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं. ज्याच्या सुबकपणाची व मोहकपणाची नक्कल करणें अशक्य आहे अशीं विणकामें, मौक्तिकरत्नजडित दागिने, भरजरीच्या जिन्नसाचे नमुने, मूल्यवान नक्षीदार कामें, अपूर्वरंग मिश्रणानें सजविलेले गालिच्चे, रंगाचा उठावदारपणा व विलक्षण प्रभा यामुळें तेजस्वी दिसणारीं (enamel) मिनाचीं कामें, कमानी, मेहरपी, वेलबुट्या व जाळ्या इत्यादि कोरून तयार केलेले लांकडी जिन्नस, चित्राविचित्र मोलवान शस्त्रें इत्यादि पदार्थांचे नमुने १८५२ सालच्या आंतरराष्ट्रीय लंडनच्या प्रदर्शनांत मांडले होते. ते पाहून पाश्चात्य कलापटूंनीं माना तुकविल्या, बुद्धिवर्चस्वानें भारून जाऊन भारतीय कलाप्रावीण्य ठामपणें कबूल केलें, व डॉ. फार्बस वॉटसनसारखे कलातज्ज्ञ असें म्हणू लागले कीं, इंग्लंडांतील कारागिरानें हिंदुस्थानांतील प्रत्येक कलाकौशल्याची वस्तु पाहून त्याप्रमाणें आपल्या साच्यांत व नमुन्यांत फरक केला पाहिजे. अशा रीतीनें अहंमन्य पाश्चात्य कलापटूंकडून व कारागिराकडूनही मूकप्रशस्ति हिंदी कलेनें आपल्या अनाथ, दुबळ्या व अज्ञानी कारागिरांस मिळवून दिली आहे. तिचा येथें थोडक्यांत सारांश दिला आहे. ज्यास इच्छा होईल त्यांनीं ज्या पुस्तकांतून ही माहिती मिळविली आहे तीं सविस्तर वाचावीं व आपल्या भारतीय कलेचें विनम्र झालेलें शीर वर करून त्यावरोबर आपली कीर्ति वाढवावी व स्वतंत्र आणि बाणेदार चरितार्थक्रमाचा मार्ग सुधारावा हें प्रत्येक कलाप्रेमी जनास नम्रतापूर्वक सांगणें आहे.

प्रकरण २० वें.

व्यापार आणि संपत्ति.

इतर कोणत्याही गोष्टीपेक्षां व्यापाराच्या बाबतींत आज हिंदुस्थानची जी स्थिति दिसून येत आहे तींत व प्राक्कालीन स्थितींत खरोखर जमीन अस्मानाचें अंतर आहे. एक काल असा होता कीं, युरोप, आशिया व आफ्रिका या तिनही खंडांच्या व्यापाराचीं सूत्रें एकटा भारतदेश हलवीत होता. ज्या देशानें सोन्याचा धूर, कापराच्या मजलसी, अत्तराचे सडे, मोत्यांच्या रांगोळ्या, कस्तुरीचा बुक्का, गुलाल असे श्रीमंतीचे चोचले भोगले त्या देशांतील लोकांस स्वतःच्या घरांत हक्कानें गरम भाकरीचा तुकडा व घोटभर पाणी सुखानें व स्वतंत्रपणें खावयास मिळूं नये हा दैवाचा कोण दुष्ट खेळ ! जेथें स्वतंत्र राज-सिंव्हासनें अलंकृत झालेलीं असावीं तेथें परराक्षित, बेगडी व दागिनेवजा सिंव्हासनें आढळावीं; ज्यांनीं परदेशीयांस आपल्या व्यापारानें सुखासमाधानानें लुटावें त्यांजकडून आपण स्वतः पिळून जाण्याचा प्रसंग यावा, तेथें पूर्वी तळपत असलेला ऐश्वर्यरूपी रविराज मावळल्यामुळें अशी ही स्थिति यावी हें केवढें दुर्भाग्य ! मागील ऐश्वर्य-मदाची ही ओहोटी असेल अथवा तर्क करून ही परिस्थितीची कुरघडी कशी झाली याची चर्चा व विचिकित्सा करून तरी काय उपयोग ? परंतु असें म्हणून भागत नाहीं. प्रमादशील मनुष्यस्वभावानुरूप जरी चुका घडल्या तरी त्यांचें निरसन करून सुस्थिति संपादण्याकडे मानवी मनाचा कल असतो म्हणून प्राचीन कालीं आपला दर्यावर्दी व्यापार केवढा होता, येथें जहाजें बांधून त्यांतून येथील जिन्नस परदेशांत व्यापारी कसे नेऊन घालीत व सुवर्णाचे ढीग या देशांत कसे येऊन पडत; खलाशी कोण, व्यापारी कोण; आपला व्यापार कोणत्या मार्गानें चाले; कोणकोणते जिन्नस येथून बाहेर जात, जकातीची व संरक्षणाची काय व्यवस्था होती इत्यादि प्रश्न या प्रकरणांत अत्यंत संक्षिप्तपणें विवेचण्याचें आम्ही योजिलें आहे.

पंचतंत्र, हितोपदेशापासून तो तद्दत महान महान ललितवाङ्मयांतील प्रबंधापर्यंत कोणतेंही एक पुस्तक घेऊन त्यांतील सामाजिक परिस्थितीचें अध्ययन करा म्हणजे

त्यांत एक गोष्ट मुख्यत्वेंकरून लक्षांत येईल ती अशी कीं, येथें धनाढ्य व्यापारी असत; व्यापाराकरितां ते मोठमोठे प्रवास व जलपर्यटनें करीत व बाहेरच्या देशांतून अपार संपत्ति मिळवून आणीत. उदाहरणार्थ शाकुंतल नाटकांत धनवृद्धि या नांवाचा व्यापारी समुद्रांत बुडून बेपत्ता झाला व त्याची पाठीमागें क्रोडो रुपयांची संपत्ति होती असें लिहिलें आहे. नलदमयंती आख्यानांत अशाच गोष्टीं पहावयास मिळतात; रामायण व मनुस्मृति यांमध्यें जहाजाच्या तारणावर कर्ज काढल्याचीं उदाहरणे सांगितलीं आहेत; मनुस्मृतींत बऱ्याच ठिकाणीं नमूद केलेले आहेत. खुष्कीचे मार्ग, जलमार्ग व उभय देशांच्या सरहद्दीवर चालणाऱ्या व्यापारांत कांहीं तंटे बखेडे झाल्यास ते कसें मोडावे हें सांगितलें आहे; व्यापाऱ्यांची एक सुरस कथा दशकुमारचरित्रांतही आहे; यावरून एल्फिन्स्टन, सर विल्यम, जोन्स, मॅनिंगबाई व प्रो. हीरन यांनीं हिंदू लोक मोठे धाडसी दर्यावर्दी व्यापारी असले पाहिजेत म्हणून जें ठोक सिद्धान्तरूप विधान केलें आहे तें अगदीं अक्षरशः खरें आहे. कारण तत्कालीन समाजाचा आदर्श म्हणून जर तत्कालीन वाङ्मय मानण्यास आम्हीं तयार असतो तर त्याजपासून निघणारे सिद्धान्त हेही प्रत्येकाला मान्य असलेच पाहिजेत. सबब वरील सिद्धान्ताविषयीं कोण शंका घेईल असें मानण्याचें मुळींच कारण दिसत नाहीं.

येथील व्यापारी लांब पल्ल्याच्या फेऱ्या करीत, समुद्रावर वर्षानुवर्षें काढीत, व जहाजें भरून संपत्ति घेऊन परत स्वदेशीं येत; अशाच प्रकारची गोष्ट आपणास सत्यनारायणाच्या कथाप्रसंगीं सांगण्यांत येते. हा एक सिद्धान्त मान्य केल्यावर ओघानेंच येथें जहाजें बांधण्याचे कारखाने असले पाहिजेत असें मानावे लागतें. प्रो. मॅक्स डंकर म्हणतो कीं अशा प्रकारचे जहाजें बांधण्याचे कारखाने येथें असून, येथील व्यापारी बहुतेक सर्व युरोपखंडाशीं व्यापार करीत असत. फार प्राचीन काळापासून फोनिशियाशीं हिंदुस्थानचा व्यापार होता. ख्रिस्ती सनापूर्वी दहाव्या शतकांत इस्त्राईल लोकांचा सालोमन व टायरचा हीराम या दोघांनीं हिंदुस्थानास जहाजें पाठवून येथून हस्तिदंत, चंदन, माकडें, मयुर, सोनें, चांदी, हिरे इत्यादि पदार्थ 'ओफीर' जातीपासून खरेदी करून नेले. आतां 'ओफीर' हा शब्द बरेच दिवसांपासून वादाचा विषय होऊन बसला आहे व त्यावरून हिंदी व्यापाराचा बाह्य देशाशीं असलेला संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. तेव्हां या मजेदार शब्दाविषयीं थोडीशी हकीगत देऊं. टॉलेमीच्या मताप्रमाणें 'अभिरिया' (Abhiria) नांवाचा देश सिंधु

नदीच्या मुखाशी होता. अर्थात् अभिरिया देशाच्या नांवावरून त्यांत आभीर लोक रहात असावेत हें उघड दिसतें. हल्लीं काठेवाडांत ' अभीर ' नांवाच्या लोकांची एक जात आहे व ही जात आणि टॉलेमीनें सांगितलेली जात एकच असावी असें अनुमान करण्यास स्थानसादृश्यामुळें व सान्निध्यामुळें मुळींच हरकत नाही असें दिसतें. प्रो. लासेनच्यामतें ' ओफीर ' नामक बंदर नैऋत्य किनाऱ्यावर असावें आणि मॅनिंग वाई म्हणते कीं, तें पश्चिमकिनाऱ्यावर असलें पाहिजे. याशिवाय स्मिथच्या बायबलकोशाचे कर्ते यांनीं ही जात आफ्रिकेच्या भागांत कोठें तरी असावी असें अनुमान ठोकून दिलें आहे. ह्या एका शब्दाविषयीं इतके विसंगत तर्क लढविलेलेले पाहिले म्हणजे मन साशंक होऊन मुख्य प्रश्नास बव्हकटी येणें बाजूला रहाते. अर्थात् ज्या मानानें हा ' ओफीर ' शब्दाचा उलगडा होईल त्या मानानें येथील परदेशाशीं होणाऱ्या व्यापारावद्दल निश्चितपणा येईल. याकरितां ' तार्शीश ' (Tarshish) व्यापारी लोकांनीं जो माल खरेदी केला त्यांतील जिन्नसांच्या यादीवरून तो हिंदुस्थानांतील, आफ्रिकेंतील अथवा अन्य देशांतील हें ठरविणें सोपें आहे. सर्व जिन्नसांची लांबलचक यादी वगळून ' सालोमन ' व ' हिराम ' यास हिंदू व्यापाऱ्यांनीं पाठविलेली अशी एकच वस्तु आपण घेऊ कीं त्यावरून सर्व प्रश्नाचा छडा लागून मुख्य सिद्धान्त बळकटपणें प्रस्थापित होण्यास मदत होईल. ती वस्तु म्हणजे मोर होत. त्या काळांत हिंदुस्थानाखेरीज कोठेंही हे पक्षी मिळत नसत. अलेक्झांडरच्या स्वारीपूर्वी हे पक्षी ग्रीस, रोम अथवा इजिप्त येथें बिलकूल माहित नव्हते. ते त्यानें ह्या स्वारीनंतर आपल्याबरोबर स्वदेशीं नेले. पुढें पुढें ह्या सुंदर पाखरांचा शोकी व ढंगी रोमन लोकांमध्यें इतका बडेजाव वाढला कीं, सरदार घराण्यांतील मेजवानीच्या प्रसंगीं मोरांच्या जिभेवांचून अडत असे. मिष्टान्नभोक्ते व विलासी सरदार आपल्या विद्दिणींचा रुसवा मोराच्या कोंवळ्या लुसलुशीत जिव्हांनीं काढीत असत. अशा प्रकारची चैन झाडण्यास व प्रथमतः ती उत्पन्न होण्यास राजवाड्यांत काढलेलीं सुंदर चित्रें, नाटकांत लिहिलेलीं वर्णनें व अन्तःपुरांत व विहारगृहांत ठेवलेलीं हीं पाखरें कारणीभूत झालीं. ' सालोमन ' व ' हिराम ' यांनीं हे पक्षी हिंदुस्थानांतून पैदा केले यास बळकट पुरावा आहे. मॅक्स मुल्लर, जेसेनियस, इमर्सन, टेनेट व प्रोफेसर लासेन या सर्व पंडितांनीं एकमतानें असें कबूल केलें आहे कीं, हिब्रू भाषेंतील मयूरवाचक शब्द मूळ संस्कृत शब्दावरून तयार झाला आहे व परदेशांतीले लोक प्रत्यक्षपणें त्यांची हिंदू लोक करीत असलेली मजा

पाहून मोहीत होऊन गेले व त्यांनीं येथून हें मोहक पाखरूं स्वदेशी नेलें.

जशी मोराच्या व्यापाराची मजेदार हकीगत वर दिली तशीच हस्तिदंताचीही आहे. हे दोन्ही जिन्नस पूर्वी व्यापाराचे मौल्यवान् पदार्थ होते व त्यांचे मूलस्थान हिंदुस्थान हें निश्चित झालें म्हणजे परदेशी व्यापारी ते येथून नेत व भारतीय प्राचीन व्यापार भूमध्यसमुद्राच्या लगतचा युरोपचा भाग, आफ्रिकाद्वीपकल्प येथपर्यंत पसरला होता हें सिद्ध करण्यास सोपें जातें. म्हणून हस्तिदंताविषयीं याच उद्देशानें चार शब्द जास्त लिहिणें उचित आहे.

हिंदुस्थान व आफ्रिका या दोन्ही द्विपांत हत्ती पुष्कळ सांपडत असत. परंतु ते धरून पाळणें, त्यास माणसाळवणें, त्यांचा विलासाचे प्राणी म्हणून उपयोग करणें हे सर्व चैनीचे प्रकार फक्त हिंदुस्थानांतच माहीत होते. आफ्रिकेंत यापैकीं कोणताही प्रकार ठाऊक नसे. हिंदुस्थानांतील राजे लोकांच्या अठरा कारखान्यांत गजशाळा म्हणून एक स्वतंत्र भाग असे. राजलक्ष्मीचा गजलक्ष्मी म्हणून एक प्रकार असे; राज्य-वैभवाचें हें चिन्ह असल्यानें आपआपल्या ऐपतीप्रमाणें लहान मोठे सर्व सरदार कांहीं हत्ती बाळगीत असत व त्यास ' इभ ' असें म्हणत. याच ' इभ ' नांवानें हस्तिदं-ताचा हिंदी बाजाराच्या पेठांत मोठा क्रयविक्रय होत असे. हिंदुस्थान, असीरिया, इजिप्त, ग्रीस, रोम येथें या पदार्थांची फार आवड असल्यानें त्या कालीं त्याचा फार खप होत असे. लासेनच्या मताप्रमाणें इजिप्शीयन लोकांस हत्ती बाळगणें, माणसाळ-वणें वगैरे उद्योग माहीत नसल्यानें त्यांच्या भाषेंत असलेल्या हस्तिदंतवाचक ' एबू ' शब्दाची उत्पत्ति ' इभ ' शब्दापासून लावणें हें योग्य दिसतें. मॅनिंगबाई म्हणते कीं, ग्रीस व इजिप्त या देशांत हस्तिदंतवाचक शब्द इभ शब्दापासून तयार होऊन नंतर त्याचें एलिफास हें रूपांतर झालें असलें पाहिजे. परंतु एलिफास या शब्दाची खरी उत्पत्ति मात्र कळत नाहीं. होमरच्या पूर्वी हस्तिदंताचा उपयोग ग्रीस देशांत माहीत होता. व खुद्द होमर हा सुद्धां आपल्या काव्यांत त्याचा पुष्कळ वेळां उल्लेख करितो. परंतु ग्रीक लोकांनीं आराबेलाच्याच कारकीर्दीत हस्तिदंत हा पदार्थ प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिला असें इतिहासावरून दिसतें. डरायसच्या सैन्याबरोबर असे पुष्कळ हत्ती होते व ते माहुतासह हिंदुस्थानांतून आणलेले होते असें इतिहासांतरीं नमूद आहे. एलिफास या हस्तिदंतवाचक शब्दावरून ह्या द्विदन्ती भव्य प्राण्यास ग्रीक लोकांनीं पुढें तेंच नांव दिलें व ॲरिस्टाटलनें तें आपल्या जोरदार लेखणीनें रूढ केलें. एकंदरींत सर्व विवेचनाचा निष्कर्ष एवढाच कीं, हस्तिदंत हा पदार्थ व मोर हा प्राणी परदेशी

व्यापारी हिंदुस्थानांतून नेत व येथें ते उत्तम पैदा होत असत.

ग्रीक लोकांना साखरेचा उपयोग प्रथम हिंदुस्थानांतच माहीत झाला. शर्करा या संस्कृत शब्दापासून ग्रीक भाषेंतलि शुगर शब्द झाला आहे व अरबस्थान आणि इराण या देशांतून प्रवास करीत असतां मूळ शब्दप्रयोगांत इतका फरक होणें अगदीं साहजिक आहे.

सेल्यूसीडीच्या कारकीर्दीत हिंदुस्थान व सीरीया यामध्यें फार जोराचा व्यापार सुरू होता. फोनिशिया, इराण, बाबीलोन, टायर इत्यादि तांबडा समुद्र यांच्या लगतच्या देशांत भारतीय लोखंड, उंची वस्त्रें, चिटें इत्यादि पदार्थांचा व्यापार फार जारीनें चालत असे. परंतु हें ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध करण्यापूर्वी इजिप्तपाशीं हिंदुस्थानचा असलेला व्यापारी संबंधच प्रथम ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध करूं म्हणजे मागाहून या देशापासून वर दिलेले देश लांब नसल्यानें त्याही देशांशीं तो तसाच जोरानें चालत असला पाहिजे हें सिद्ध करण्यास कांहीं कठीण जाणार नाहीं.

जुन्या करारांतील उत्पत्ती-पुराणांत जोसेफच्या भाउबंदांनीं त्यांस इस्मायली (Ishmaelites) लोकांस विकलें असें लिहिलें आहे. हे लोक गिलीडहून (Gilead) इजिप्तला सुगंधी पदार्थ, हिंगासारखे स्वादिष्ट रस, चीक आणि रक्तचा बोळ हे पदार्थ उंटावर घालून नेत असत असें लिहिलें आहे. कांहीं लोकांचे असें म्हणणें आहे कीं रक्तचा बोळ हा पदार्थ अबिसीनियन व्यापारी आपल्या देशांतून आणीत असत. कारण तो पदार्थ त्यांच्या देशांत बहुत पिकत असे, परंतु डॉ. रॉईल म्हणतो कीं, रक्तचा बोळ नांवाचा इजिप्ती बाल (Bal) शब्द संस्कृतांतील मूष्ठ ' बोल ' शब्दावरून झालेला असला पाहिजे; व यावरून विकण्याकरितां तो हिंदुस्थानांत तयार होत असला पाहिजे असें मानावें लागतें. याशिवाय रेशमी कापड, मोतीं, हिरे, चिटें व इतर जिन्नस हिंदुस्थानांतून इजिप्तमध्यें जाण्याकरितां अलेक्झांड्रिया येथें उतरत असत. तांबडा व भूमध्य समुद्र यांच्या लगत असलेल्या देशाशीं होणाऱ्या हिंदुस्थानच्या व्यापाराची अलेक्झांड्रीया ही फार वर्षें उतारपेठ होती. केप ऑफ गुडहोपचा शोध लागल्या कालापासूनच या बंदराचें महत्व कमी झालें, नाहीं तर त्याच्यापूर्वी सर्व युरोपियन व्यापाराचें तें नाकच होतें असें म्हटल्यास यत्किंचित् सुद्धां अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदी व्यापारी लोकांचीं गलबतें तांबड्या समुद्रांतील मियॉस हॉरमॉस येथें पहिला टप्पा करीत व तेथून अलेक्झांड्रिया येथें जात. याशिवाय ग्रुष्कीच्या

मार्गानें पामीर(Palmyra) मधून दुसरा एक रस्ता होता, परंतु पेरिप्लस व डेन्हीस वगैरे लेखक म्हणतात कीं, जलमार्गानेंच पूर्वी या व्यापाराचा हमरस्ता होता.

इजिप्तखेरीज हिंदुस्थानचा ग्रीसपाशीं फार मोठा व्यापार चाले. मागें सांगितल्याप्रमाणें होमरच्या काव्यांत उल्लेखिलेल्या हस्तिदंताखेरीज नीळही येथून ग्रीसमध्यें फार जात असे. येथें त्या पदार्थास नीळ म्हणतात, पोर्च्युगीज भाषेंत ॲनिल (anil) म्हणतात, आरबीमध्यें नीळच (Neel) म्हणतात; परंतु ग्रीसमध्यें मात्र त्यास हिंदुस्थानच्या नांवावरून इंडिगो म्हणत असत व हल्लींही त्याचप्रमाणें इंग्लिश भाषेमध्यें इंडिगो म्हणतात. जस्ताला असलेल्या संस्कृत नांवाचाच होमरनें उपयोग केला आहे; या सर्व प्रमाणावरून ग्रीस व हिंदुस्थान यांच्यामध्यें व्यापारी दळणवळण होतें असें प्रत्येकाला वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

ग्रीसनंतर रोमकडे लक्ष पुरवूं व तेथें कोणकोणत्या मालाचा खप होत होता तें पाहूं. पेरिप्लस व टेसियस (ctesias) यांच्या माहितीप्रमाणें सुती कापड, मलमल, चिट, दालचिनी व इतर सर्व मसाल्याचे जिन्नस, हिरे, मोती, गोमेद, पाच, व इतर कमी दर्जाचे खडे, पोलाद, औषधी, सुवासिक पदार्थ, लाख इत्यादि जिन्नस जहाजें भरभरून रोमकडे जात. मिरी, दालचिनी वगैरे सर्व मसाल्याचें सामान पुरविण्याचें काम प्राचीन कालीं भारतवर्षानें उचललें होतें असें तत्कालीन इतिहासकारांकडून व अर्वाचीन शोधकांकडून कळून येतें. याशिवाय मॅनिंगबाई म्हणते कीं, जटामावशी, टाकळा, बोस, वेत, देवधूप, गुगुळ इत्यादि पदार्थही पुरवले जात असत.

या सर्व पदार्थांखेरीज हिंदुस्थानाकडून रोमला तलम रेशमी कापड फार जात असे. ह्या रेशमी कापडाचा रोमन स्त्रियांना त्यांच्या वैभवकालीं इतका शोक लागला होता कीं, रोमन लोक भारास भार सोनें देऊन तें घेत असत असें इतिहासावरून दिसतें. आम्ही ज्याप्रमाणें हल्लीं सोन्याच्या वाहतीसंबंधीं इंग्लंड व इतर युरोपियन राष्ट्रें यांजविरुद्ध तक्रार करतो व सोन्याची परदेशी निर्गत म्हणजे राष्ट्रीय दारिद्र्याचें व अवनतीचें एक लक्षण मानतो तेच विचार मोठ्या प्लिनीनें आपल्या ग्रंथांत नमूद केले आहेत. तो म्हणतो कीं " प्रतिवर्षीं असल्या तलम रेशमी कापडाकरितां हिंदुस्थानांत ४० लक्ष रुपये रवाना होत असतात. " दुसऱ्या खात्रीलायक प्रमाणावरून असें कळतें कीं, हिंदुस्थानच्या व्यापाऱ्याजवळ रकमा व्याजीं लावून सुखानें चार पैसे मिळावे म्हणून रोममधून प्रतिवर्षी ६ कोटी रुपये हिंदुस्थानाकडे धांव घेत. इजिप्त, सीरिया,

रोम इत्यादि ठिकाणीं माल पोचविण्यासाठीं व व्यापाराची ने-आण करणारी ट्रॉलेमीच्या कारकीर्दीत १२५ जहाजें रोम व आसपासच्या बंदरांत नांगरलेलीं दिसत व हीं सर्व हिंदुस्थानांत तयार होऊन फक्त युरोपला माल पुरविण्याचें काम करीत असत.

हिंदुस्थानचा पश्चिम किनारा सोडल्यानंतर प्रथम जो किनारा लागतो तो अरबस्थानचा. याच देशाशीं फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानचा व्यापार चालत असे. पेरिप्लसच्या पूर्वी तीनशें वर्षें होऊन गेलेला ॲगारथार्चिडस यानें यिमेन व पट्टल यांच्यामध्यें व्यापार चालू होता असें लिहून ठेवलें आहे. पॉटिंजर म्हणतो कीं, पट्टल म्हणजे सिंधमधील हैद्राबाद व हें जर खरें असेल तर प्रो. हीरन म्हणतो कीं. सिंधुनदीच्या मुखानें होणारा हा अत्यंत प्राचीन जलमार्गीय व्यापार होय यांत शंका नाहीं. मनूच्या वेळीं—अर्थात आधुनिक युरोपियन पंडितांच्या मताप्रमाणें म्हटलें म्हणजे ख्रिस्ती शकापूर्वीं दहा शतकें--हिंदू व साबी लोक यांच्यामध्यें व्यापाराची घडामोड होत होती. अलेक्झांडरच्या कालीं मॅसिडोनियाचा निआरक्स नामक सेनापति इराणी आखतांत आल्यानंतर त्यास असें कळलें कीं, आसिरियाला जाणारा माल प्रथम मस्कत येथें उतरतो व तेथून तो पुढें जातो, सबब हिंदी माल मिळण्याचें हेंच मुख्य ठिकाण होय असें त्यास तेथें सांगण्यांत आलें. हे सर्व ऐतिहासिक पुरावे पाहिल्यावर कोणाचा विश्वास प्राचीन भारतीय व्यापारी घडामोडी व दर्यांप्रवास यावर बसल्या खेरीज रहाणार आहे? हा सर्व व्यापार गुजराथेमधील बनये (वाणी) लोक यांच्या हातीं होता. या लोकांचा हा पिढ्यानुपिढ्या धंदा असल्यानें त्यास तो पूर्ण अंगवळणी पडलेला होता व आहे हें सध्यां सुद्धां आपण पाहातों. अरेबिया, फेलिक्स येथें त्याच्या मोठंमोठ्या वखारी असून तेथें हे आपला व्यापार मोठ्या मजेनें चालवीत असतात. त्यांच्या मालमत्तेच्या अदमाशी किंमतीवर त्यास तेथील सरकारास थोडा कर द्यावा लागत असे; परंतु तेवढ्यानें त्यांचें उत्तम संरक्षण होऊन त्यांच्या व्यापारांत कोठें खो येत नसे.

आफ्रिका खंडांत फक्त इजिप्तपाशींच हिंदुस्थानचा व्यापार चाले असें नसून झांझीबार व तांबड्या समुद्रालगत असलेल्या सर्व बंदरीं चालत असे. मिऑस हॉरमॉस हें तांबड्या समुद्रांतील व्यापाराचें केंद्र होतें म्हणून मागें सांगितलेच आहे. पेरिप्लसनें झांझीबारपासून डेलगाडोपर्यंतच्या सर्व बंदरांचीं नांवें आपल्या पुस्तकांत दिलीं आहेत व इजिप्तपाशीं असलेल्या व्यापारी दळणवळणाचें कथन करितांना तो पुढें असें लिहितो कीं, " तांदूळ, इतर धान्यें, लोणी तिळाचें तेल, साखर, हलकें भारी असें दोन्ही प्रकारचें

कापड हे जिन्नस कोंकण प्रांताच्या अंतर्भागांतून व भडोच बंदरामधून इकडे येतात. ॲरियन या ग्रंथकाराची या गोष्टीला पुष्टी आहे.

प्रो. हीरनचा असा तर्क धावतो की, हिंदुस्थानांत जो इतका सोन्याचा संचय होता याचें कारण सोन्याच्या खाणी आफ्रिकेच्या ज्या प्रदेशांत होत्या त्या देशापाशीं हिंदुस्थानचा असलेला व्यापार होय.

हिंदू बनिये व ग्रीसमधील व्यापारी हे एडनच्या आखातांत गार्डाफूईच्या भूशिराजवळ सोकोट्रा येथें वसाहत करून राहिलेले होते असें पेरिप्लसनें स्वच्छ लिहून ठेविलें आहे. एकंदरींत हल्लीं सुद्धां त्या लोकांची प्रवृत्ति पाहिली म्हणजे हा सर्व व्यापार त्यांच्या हातीं असल्याबद्दलचा जो येवढा वेळ ऐतिहासिक पुरावा दिला त्यास पुष्टि येते. हल्लीं सुद्धां हिंदुस्थानाबाहेर जे थोडे हिंदी व्यापारी आहेत ते गुजराथेमधील बनिये अगर खोजे लोकच होत व यांच्या पूर्वजांनीं तो प्राचीन व्यापार चालविला असला पाहिजे असें मानण्यास कोणतीच धास्ती नाहीं. कारण हा त्यांचा फार प्राचीन काळापासून पिढीजाद धंदा आहे असें मागें सांगितलेंच आहे.

आतांपर्यंत पाश्चात्य व्यापाराचें विवेचन झालें, परंतु पौर्वात्य व्यापारही कांहीं कमी नव्हता. चीन, आस्ट्रेलिया, गंगापारद्वीपकल्प, आन्हामलाक्का इत्यादि देशांशीं बंगालच्या उपसागरांतून व्यापार चालत असें. हिंदुस्थानांतून जो माल निघे तो गंगानदीच्या मुखालगत असलेल्या बंदरांतून अथवा कारोमांडल किनाऱ्यावरील बंदरांतून ग्रीस, रोम या देशांशीं दळणवळण वाढल्यामुळें पुढें इकडेही व्यापार सुरू झाला असें नसून मूळपासूनच इकडेही व्यापार सुरू असें. स्वतः जहाजें बांधावीं व बंगालच्या उपसागरासारख्या तुफानी दर्यावर व्यापार करीत हिंडावें हें प्राचीन आर्यांस बाळकडूच असे. पेरिप्लसच्या पुस्तकांत कारोमांडेल किनाऱ्यावरील जहाजें सुटण्याचीं बंदरें दिलीं आहेत, यामुळें या गोष्टीचा काल्पनिकपणा जाऊन त्यास भरभक्कम ऐतिहासिक पुराव्याचें स्वरूप आलें आहे. कापडाबद्दल मच्छलीपट्टण व इतर गंगेच्या मुखाजवळील व्यापारी ठिकाणें पेरिप्लसनें दिलेलीं आहेत; त्या नांवानेंच तीं हल्लींही प्रसिद्ध आहेत असें आपण जाणतों. मग त्या वेळीं पेरिप्लस म्हणतो त्याप्रमाणें त्या बंदरांतून व्यापार चालत असे याच गोष्टीवर आपणास गैरविश्वास कसा करितां येणार ?

सिंहलद्वीप.

सिंहलद्वीपाची नैसर्गिक ठेवण व स्थिति पाहिली म्हणजे त्याच्या प्राचीन व्यापारी

प्रसिद्धीबद्दल ज्ञनांत यथार्थ कल्पना उभी रहाते. एका काळीं भारतीय व्यापाराचें तें केंद्रस्थान होतें; व त्या कामाकारितां लागणारीं तेथील सुरक्षित बंदरें अनुकूल परिस्थिति पाहिली म्हणजे सहजच तें स्थान भारतीय प्राचीन व्यापाऱ्यांनीं मध्यवर्ती ठिकाण म्हणून पसंत केलें असल्यास त्यांत काय नवल ?

याची पुष्कळ नांवांनीं पूर्वीपासून प्रसिद्धि आहे. 'ओनीसिक्रीटस" (onesicritus) यानें त्यास प्रथम टाप्रोवेन अशी संज्ञा दिली. त्याची उपपत्ति टाप म्हणजे द्वीप व राहन अथवा रावण हा प्रसिद्ध राजा अर्थात् रावणाचें बेट अशी लावलेली आहे.

टॉलेमीनें असें म्हटलें आहे कीं त्यास पूर्वी पॅलेसिमुंडी असें म्हणत; व त्यास फिनीचाही पाठिंबा आहे. परंतु टॉलेमीच्या कालीं त्यास सालिस व तेथील लोकांस सालो (Saloe) असें म्हणत व ह्यापासून पुढें सेवन व नंतर हल्लींचें सीलोन झालें असावें अशी दुसरी उपपत्ति आहे.टालाकोरी, मोदुद्दी, आमुरोग्राममू, मोआग्राममू (महाग्राममू) इत्यादि प्रख्यात व्यापारी ठिकाणांचीं नांवें टॉलेमीनें दिली आहेत. प्रो. हीरनच्या मतें ख्रि. पू. २०० वर्षें याची व्यापारावद्दल फारच प्रख्याति होती.

ॲरियन म्हणतो कीं " सीलोनचा उत्तर भाग हा फार सुधारलेला असून त्या वेळीं पूर्वेस चीनपर्यंत व पश्चिमेस इतालीपर्यंत ह्या बेटाचें दळणवळण होतें. "

कॉसमॉसनें साधारणतः अलीकडच्या काळची जी थोडीबहुत सीलोनविषयीं हकीगत दिली आहे त्यावरून त्या बेटाच्या व्यापाराचा विस्तार केवढा प्रचंड होता हे दिसून येईल.

" हिंदुस्थान, इराण, एथिओपिया यांच्या साधारण मध्यभागीं हें बेट वसत असल्यामुळें याच्या किनाऱ्यास असंख्य जहाजें लागतात व येथूनही तितकींच दूरदेशीं जातात. चीन वगैरे पूर्वेकडील देशांच्या मध्यभागांतून रेशीम, लवंगा वगैरे जिन्नसांचे पुरवठा येथें होतो. हे जिन्नस मलबार व कल्याण येथें पाठवून तेथून पोलाद व कापड आणविलें जातें. सिंध येथून कस्तुरी आणवून तेथें वर दिलेले जिन्नस येथून रवाना होतात; इराण, येमेन, आदुले वगैरे ठिकाणीं हेच जिन्नस येथून पाठविले जातात. व तेथून आलेले जिन्नस फिरून पूर्वेकडील चीन वगैरे देशांच्या मध्यभागांत नेऊन पोंचविले जातात. या रीतीनें हिंदी महासागरांतील प्राचीन अफाट व्यापाराची हें बेट म्हणजे महापेटच होती असे म्हणण्यास हरकत नाहीं. "

अलेक्झांडरच्या कारकीर्दीतिल इतिहासकारांनीं सीलोन बेटास टॅप्रोबेन असें नांव देऊन त्याच्या भरभराटीची व व्यापारवृद्धीची सुरस वर्णनें लिहून ठेविली आहेत. टोलमीच्या कारकीर्दीतही हें बेट असेंच प्रसिद्ध होते. यावरून सरासरीनें पाहतां इ. स. पू. ५०० वर्षापासून तो इ. स. ५०० वर्षापर्यंत या बेटाची फार चलती असून व्यापार-धंदा, कलाविद्या व इतर सर्व प्रकारची संस्कृति यांनीं हें बेट गजबजलेलें होतें. याप्रमाणें एक हजार वर्षे या बेटाचा पश्चिमेस आफ्रिका, येमेन, मलबार व पूर्वेस चीन व त्याच्या पलीकडच्याही देशापर्यंत व्यापार पसरलेला होता. आक्रोलियन व्यापाराची चढउतारही येथेंच होत असे.

ज्याप्रमाणें व्यापारांत याची प्रसिद्धि होती तशीच विद्या, कला, संस्कृति वगैरे सर्व प्रकारच्या बाजूनें याची भरभराट होऊन तें उत्तम संस्कृतीवान् बेट म्हणून गाजत होतें. याचा व हिंदुस्थानचा संबंध फार दिवसांचा होता. हें हिंदुस्थानाचा एक भाग अशीच सर्वांची समजूत होती. सेतुबंधानें हा संबंध पुढें निकट होऊन हिंदुस्थानांतील रहिवाशी येथें येऊन राहिले. त्यांच्याबरोबर त्यांच्या विद्या, कला, शास्त्रें व धर्म येऊन सर्व बाजूनें याची सुधारणा झाली. अर्थात् हल्लींचे राहिवाशी सुद्धां भाषा, धर्म, जात व संस्कारानें हिंदूशी संलग्न असल्यास नवल काय ? प्राचीन हिंदुस्थानाशीं याचा निकट संबंध होता याबद्दल कांहीं अवशेष हल्लीं सांपडत असून परदेशीय इतिहासकारांचे या-विषयीं उतारे स्पष्ट आहेत. इ. स. ५००-६०० च्या पुढें याचें महत्त्व कमी कमी होऊं लागलें. तरी जेव्हां प्रथम युरोपियन रहिवाशी येथें येऊन राहूं लागले तेव्हां त्यांस येथील मूळच्या भव्य इमारती, प्रचंड देवालयें व संस्कृतीचे अवशेष पाहून फार अचंबा वाटला; येथें साधी तळी बांधलेली होती ती मोठ्या मोठ्या अर्वाचीन सरोवराएवढी होती. या बेटाची प्रबलता, संपत्ति, वैभव, नैतिक व सामाजिक संस्मरणीय कृत्यें याची नोंद ॲरियन, कॉसमॉस (५६० इ. स.) युरोपियन फिरस्ते, इतिहासकार व इतर नामांकित लेखक यांनीं ख्रि. श. पहिल्या शतकापासून करून ठेविली आहे व त्या सर्वांचें प्राचीन काळांत व्यापारी घडामोडींत व व्यवहारांत हें बेट सर्वांच्या पुढें होतें या-विषयीं ऐकमत्य आहे.

व्यापार हें राष्ट्राच्या संस्कृतीचें, वैभवाचें व सामर्थ्याचें पूर्ण द्योतक आहे हा सिद्धान्त सर्वमान्य होण्यास कोणतीच हरत दिसत नाहीं. प्लिनी, ॲरियन, कॉसमॉस, पेरिप्लस वगैरे ज्या प्राचीन इतिहासकारांनीं सीलोनचें भरपूर वर्णन केलें आहे त्यांच्याच ग्रंथांत

हिंदुस्थानच्या दाक्षिण टोकाच्या मलबार व कारोमांडेल या उभय किनाऱ्यावरील बंदरांचें, व्यापारानें समृद्ध झालेल्या शहरांचे व एकंदर व्यापारोपयोगी ठिकाणाचें भरपूर वर्णन आहे; जिन्नसांची माहिती आहे; संपत्तीची चमत्कृतिजनक वर्णनें आहेत त्यावरून या अत्यंत महत्वाच्या राष्ट्रीय घडामोडींत व सुधारणेच्या क्षेत्रांत प्राचीन हिंदूंनी केवढी थोरवी संपादन केली होती हें स्पष्ट दिसून येतें. व त्यावरून कोणालाही स्पष्टपणें व मुकाट्यानें त्यांच्या प्राचीन वैभवाबद्दल, विद्याकलांबद्दल, संस्कृतीबद्दल व सर्वांगीण सुधारणा, अचाट कर्तृत्वशक्ति व विलक्षण धाडस याबद्दल सपशेल कबूली द्यावी लागेल. मानवांच्या संस्कृतींत भर टाकल्याबद्दल निर्विकारी व सूज्ञ पुरुष ती आनंदानें देतलिच, परंतु विकारवश, मदांध लेखकांना व इतिहासकारांना ती देणें भाग पाडण्याइतका भरभक्कम ऐतिहासिक पुरावा त्यांच्याच सजातीय विद्वानांनीं व लेखकांनीं जमविलेला असल्यानें वक्र वदनानें कां होईना, परंतु ती दिल्याशिवाय गत्यंतर नाही.

प्रकरण २१ वें.

खुष्कीचे व्यापारी रस्ते.

आतांपर्यंत भारतीय व्यापार जलमार्गानें कसकसा चालत होता याचें निरूपण केलें. परंतु हिंदुस्थानांतील त्या वेळीं प्रसिद्ध गजबजलेलीं बंदरें कोणती होतीं हें प्रथम सांगून नंतर भारतीय व्यापार उत्तर व मध्य आशियाखंडांत कोठपर्यंत पसरला होता हें पाहूं.

पेरिप्लस व कॉसमॉस यांनीं वर्णिलेलीं (१) भडोच (२) मंगलोर (३) नेलीसेरम् (४) सिंध हैदराबाद (५) कल्याण (६) वसई (७) धारापूरी (८) सिंधू (९) सुरत (१०) सिबूर (११) पारती (१२) मंगरुथ (१३) सालोपट्टण (१४) नेलोपट्टण (१५) पुदपट्टण हीं मुख्य बंदरे होत.

ज्याप्रमाणें हिंदुस्थानचा व्यापार दर्यामार्गानें चीन, तुर्कस्थान, इराण, बाबीलोन, इजिप्त, ग्रीस व रोमबेटापर्यंत पसरला होता त्याचप्रमाणें या शहरीं जाण्यास खुष्कीचाही

मार्ग होता. चीनपाशीं मुख्यत्वेंकरून रेशमाचा व्यापार चालत असे तरी हिंदुस्थानांत रेशीम तयार होत नसे असें कांहीं म्हणतां येणार नाहीं.

उत्तर आशियांत सोनेरी मैदान 'इदेस्टी' व कोबीचे मैदान येथपर्यंत हिंदू व्यापारी फेऱ्या करीत असत. ते अशा लांब पल्ल्याच्या फेऱ्या करण्याच्या वेळीं एकटे बाहेर पडत नसत अथवा घरीं परत लवकर जात नसत. प्रवास फार दूरचा व धोक्याचा पडल्यानें ते एक हजार, दोन हजार अशा मोठमोठ्या टोळ्या करून ४।५ वर्षें बाहेर असत व नंतर यथेच्छ पैसा मिळविल्यावर घरीं जात. त्या वेळीं दळण-वळणाच्या साधनाची कमतरता असल्यानें परत मार्ग सांपडण्यासाठीं ठिकठिकाणीं कांहीं खुणा व ओळखीचीं चिन्हें ठेवावी लागत. अशा प्रकारचें चिन्ह म्हणून " तारवती-सुलेमान " ह्या नांवाचा एक दगडी मनोरा होता. मध्य आशियांत गेल्यावर पुढें पूर्वे-कडे चीनपर्यंत फेरी करावयाची असल्यास ह्या मनोऱ्यापासून वळावें लागतें असें टॉलेमी व टेसीयस हे सांगतात. अफाट महासागराच्या पृष्ठभागावर प्रवास करीत अस-तांना नक्षत्रपुंज, होकायंत्र व दीपगृह यांचां उपयोग होतो त्याप्रमाणें आशिया खंडाच्या मध्यभागीं असलेल्या अती विस्तृत ओसाड व भयाण मैदानावर प्रवास करीत असतांना कांहीं अंशीं समुद्राप्रमाणें स्थिति होते; पुढला मागला मार्ग कळण्याची अती पंचाईत पडते; अशा वेळीं वाटसरूंना मार्ग कळण्यास साधन असावें व एकमेकांची भेट होऊन परस्परांकडील हकीगत कळावी म्हणून त्या वेळीं हा तारवतीसुलेमान या नांवाचा उंच मनोरा बांधला होता. येथें सर्व व्यापाऱ्यांचा तळ पडत असे. येथें कांहीं दिवस विश्रांती घेऊन, ठरविलेला कार्यक्रम पुरा करून, निश्चित केलेल्या भेटी घेऊन नंतर पुढचाहि मार्ग सर्व व्यापारी सुधारीत. काबूल अथवा बॅक्ट्रीया येथून प्रवासास आरंभ केला असें धरलें तर उत्तर दिशेकडे तोंड करून उत्तर--अक्षांशाच्या ४१ अंशापर्यंत जावें लागे. नंतर एक मोठा पर्वत ओलांडून होशान अथवा आँश या मैदानांतून पुढें जावें लागे. या मैदा-नांतून बरेच चालून गेल्यानंतर तारवतीसुलेमान या मनोऱ्याजवळ जाऊन पोंचत असत. येथें आल्यानंतर कोबीच्या मैदानास पोंचण्याच्या वाटेवर काशगर हें प्रख्यात शहर व मोठमोठे पर्वत लागत. याशिवाय खोटेन व अक्सू ही शहरेंहीं वाटेंत लागत. या प्राचीन नगरावरून कोशोटी या शहरांतून चीनच्या सरहद्दीवरील 'सेचू' या शहरास जाण्याचा एक मार्ग होता; व हाच पुढें पेकीन या प्रख्यात जुन्या शहरास जात असे. काबूल-पासून पेकिनपर्यंतच्या या सर्व मार्गाची लांबी दोन हजार पांचशें मैल होती.

पश्चिमेकडील व्यापाराचे मार्ग सांगितलेल्या मार्गाशिवाय आणखी दोन रस्ते होते. हिंदुस्थानांतून प्रथम व्यापारी निघाले म्हणजे सिंधमार्गानें पामीर या प्रख्यात प्राचीन श्रीमंत शहरास जात; व तेथून सीरियाच्या बंदरांतून रोम व इतर युरोपांतील शहरें यांजकडे जाण्यास वळत.

दुसरा मार्ग हिमालयाच्या उत्तर उतरणीवरून जात होता. हिमालयाच्या उत्तरेकडील रांगा ओलांडून पार गेल्यावर ऑक्झस नदीच्या कांठानें कास्पीयन समुद्रावर जावें लागे व नंतर तेथून ज्या शहरास जावयाचें असेल त्या मानानें निरानिराळ्या दिशेकडे वळावें लागे; परंतु हिमालयाच्या घाटांतून ऑक्झस नदीच्या कांठानें आलें असतां कास्पियन समुद्र हा सर्वांत मोठा तळ असे व येथून युरोपच्या निरानिराळ्या भागांत जावयास मार्ग असत.

रोमचा ऱ्हास झाल्यानंतर त्याची जागा ' बसोरा ' (Bassora) या शहरानें पटकावली व तेथें माल पोचण्यासाठीं हिंदुस्थानांतून आलेला माल ' ऑर्मस ' या शहरीं उतरत असे.

येथपर्यंत भारतीय व्यापाराची परदेशाशीं होणारी वडामोड व दळणवळणांचे मार्ग यांचें विवेचन केलें. ज्या लोकांचा बाह्य देशाशीं एवढा अफाट व्यापार चालत असे त्यांचा परस्पराशीं स्वदेशांत किती तरी जास्त पटीनें सहवास घडून मालाची देवघेव व अदलाबदल चालली असेल याची कल्पना करणें कांहीं अशक्य नाहीं. व्यापाराचा व सुधारणेचा परस्पर संबंध काय याचें मार्गे वर्णन केलें आहे. सर्व प्रकारचे चैनीचे व शोकाचे पदार्थ, उंची उंची वस्तु, दुर्मिळ जिन्नसा यांचा खप एवढ्या विस्तारलेल्या देशांत व नानाविध अत्युच्च संस्कृतीच्या लोकांमध्यें व्हावा यांत काय आश्चर्य ? भारतवर्षांत उत्पन्न होणाऱ्या सर्व महार्ह सुखसोयींच्या, विलासाच्या व चैनीच्या वस्तूंचा उपयोग भारतीय लोक भरपूर करून घेत. एवढेंच नव्हें तर बाहेरच्या देशांत पैदा होणारे मूल्यवान पदार्थ तेथील लोकांस कशा तऱ्हेनें उपयोगांत आणावे हें माहीत नसल्यानें त्यांचाही फायदा भारतीय आर्यांसच मिळत असे.

येथील प्राचीन रहिवाश्यांची अभिरुचि थोर, उपभोगाचे मार्ग नीतीला धरून, सुखविलासाची पद्धत नमुनेदार व एकंदर रहाणी संस्कृति-पोषक पडल्यानें त्याचें समाधान करण्याकरितां व मागणी पुरविण्याकरितां व्यापाऱ्यांचे तांडेच्या तांडे एकसारखे प्रवास करीत असत. अशा व्यापाऱ्यांच्या तांबडा समुद्र, इराणी आखात इजिप्त व

टायर या ठिकाणीं गांठी पडत, तेथें मालाची अदलाबदल होई व नंतर स्वदेशास ठिकठिकाणचे व्यापारी परत जात.

हिंदुस्थानची एकंदर भूगोलिक परिस्थिति पाहिली म्हणजे व्यापाराची आंखणी व घडामोडीचे अंतर्गत मार्ग व विभाग सृष्टीनें आंखूनच दिले आहेत असें वाटतें. पूर्व टोकापासून पश्चिमटोकापर्यंत व उत्तरेस काश्मीरपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र राजमार्ग पसरलेले होते. या रस्त्यांच्या कांठीं हिरवी गार प्रछाय झाडांची रांग, विहिरी व खाणावळी असून कोसांचे दगड पुरलेले होते. अशा प्रकारच्या राजमार्गांपैकीं तक्षशिलेपासून पाटलीपुत्रापर्यंत सुमारें ११०० मैलांचा एक रस्ता असून दुसरा अयोध्या--हस्तिनापुरावरून पंजाबांत गिनाबेराजापर्यंत गेलेला होता.

याशिवाय सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा व इतर जहाजें जाण्यायेण्याजोग्या ज्या नद्या होत्या त्यांतून अंतर्मार्गांतील व्यापार चालत असे. दक्षिण हिंदुस्थानांत तागर Tagara व प्रुथमा Pluthama यांतून सर्व माल भडोच येथें उतरत असे.

उत्तर हिंदुस्थानांतील लांबलांबच्या प्रदेशांतील सर्व माल उज्जनी येथें येऊन उतरत असे. कारण हे ठिकाण हिंदुस्थानच्या मध्यभागीं असून आसपासच्या सर्व भागांची मागणी येथून पुरविली जात असे आणि ही मागणी पुरविल्यानंतर जो माल शिल्लक उरे व बाह्य देशास जाण्यासाठीं सांठविला जात असे त्याचें हें ठिकाण म्हणजे बखारच होती व येथूनच परदेशीं जाणारा माल भडोचकडे रवाना होत असे.

आतांपर्यंत वर्णिलेल्या व्यापारांच्या सर्व पद्धतींहून यात्रांची एक पद्धत पृथ्वीवरील सर्व देशांत रूढ आहे. हल्लींच्या दळणवळणाच्या साधनांच्या विपुलतेमुळें त्यांचें महत्व कमी होऊन त्या आजिबाद बंद होतात कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. त्यांचें पूर्वीचें व्यापारी महत्व हल्लीं आजिबाद नाहींसें होऊन त्यांत थोडें बहुत फक्त पूर्वीचें धार्मिकच स्वरूप शिल्लक राहिलें आहे. हरिद्वार, काशी, प्रयाग, गया, नर्मदा, कृष्णा, गोदावरी यांच्या कांठचीं क्षेत्रें रामेश्वर वगैरे सर्व क्षेत्रांत वर्षाच्या निरनिराळ्या काळीं लाखों लोक भाविकपणें जमत, परस्पर सुखसोयींच्या व सार्वजनिक हिताच्या प्रश्नांची आपोआप चर्चा होई व अशा रीतीनें एकमेकांच्या विचारास बाहेर पडण्यास अवसर मिळे; परंतु हल्लीं सर्वच रहाणी बदलल्यानें यात्रांचे पूर्वीचे दीर्घप्रवासी व धोक्याचें स्वरूप बदलून तें करमणुकीचें व धार्मिक भावनांच्या परिपूर्तीचें एक साधन हल्लीं होऊन राहिलें आहे.

प्रकरण २२ वें.

भारतीय संपत्ति.

येथून अत्यंत मूल्यवान जिन्नस, हिरे, मसाल्याचे पदार्थ, उंची उंची रेशमी वस्त्रें, भारी किमतींचे इतर व्यापरी व बनावट पदार्थ यांची लाखों रुपयांची निर्गत आफ्रिका व युरोप खंडांत होत असे. यामुळें मागें सांगितल्याप्रमाणें फिनीसारखे रोमन इतिहासकार अधर्वट द्वेषबुद्धीनें, अधर्वट चढाओढीच्या इर्षेनें व राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें हिंदुस्थानाकडे जाणाऱ्या सुवर्णप्रवाहाची मोजदाद करून लोकांस इशारत देत असत. ह्या जगद्व्याळ व्यापारामुळें सर्व जगांतून सुवर्णौघ सारखा हिंदुस्थानांत आल्यानें येथें इतकी संपत्ति साठली होती कीं, त्याविषयीं दूरदेशच्या लोकांमध्यें नानातऱ्हेचे प्रवाद सुरू असत. अफाट संपत्तीचें उदाहरण द्यावयाचे असल्यास हिंदुस्थानचें नांव सर्वमुखीं झालें होतें. येथील संपत्तीविषयीं परदेशीय लोकांमध्यें फार चमत्कारिक अजब व अद्भुत गोष्टी रूढ झाल्या होत्या. भारतभूमी म्हणजे कुबेरनगरी व येथील व्यापारी व लोक म्हणजे सर्वत्र कोट्याधीश, येथील लोकास दारिद्र्याचा विटाळ नाहीं. सुख, चैन, भोग, विलास यांमध्यें वाढल्यानें भारतीय लोकांस गरिबीचें व निर्धनपणाचें स्वप्न सुद्धां पडत नसेल. रत्नखचित वाडे, हिरंजडित प्रसादतलें, इंद्रनीलविशोभित कासारें, कमलपूर्ण पुष्करणी, सोन्याचांदीनें मढविलेलीं देवळें व गोपुरें, सौगंधिक पदार्थांनीं, मसाल्याच्या जिनसानीं रुचकर व मधुर खाद्यपेयांनीं, अमोल दागदागिन्यांनीं कल्पनाघटित अनेकरंगी वेलबुट्यांनीं भरजरी कापडांनीं, गालिचे, किनखापी व मखमलीचे कपड्यांनीं चैन; व विलासांच्या सर्व साधनांनीं बजबजलेल्या पेठा; छत्री, मोर, शुक सारिका, पारावत, हरिणें, ससे इत्यादि पाळीव पशूंनीं सुशोभित गृहें; अशा प्रकारचा थाट हिंदुस्थानांत सर्वत्र असला पाहिजे असें चित्र परदेशीय व्यापाऱ्यांच्या व गरीब आणि अज्ञान झालेल्या लोकांच्या मनश्चक्षूंपुढें सदैव उभें असे. त्यांची साभिलाष दृष्टि सारखी हिंदुस्थानाकडे लागलेली असे. प्रत्येकास वाटे कीं, एकदा तरी अशा पुण्यभूमींचें दर्शन व्हावें म्हणून हजारों परकीय लोक येथें येऊन जात. एकदा ही-

भूमि पाहून गेल्यावर कित्येकांच्या तोंडास पाणी सुटे, कांहीं धाडशी व तामसी लोक दुष्टबुद्धीनें येथील संपत्तीचा पारिछार करण्यास टपलेले असत. परंतु जोपर्यंत अवमतीचें बीज येथें मुळींच रुजलें नव्हतें तोंपर्यंत अशा सर्व आशाळभूतांच्या व आसुरी बुद्धीच्या लोकांच्या श्रीमुखांत वसून त्यांस येथून जीव घेऊन पळता पळतां नाकीं नऊ येत. परंतु एकदा पडत्या काळास सुरुवात झाल्यानंतरोबर अशाच आसुरी लोकांच्या टोळधाडीनें येथील वैभवाचें मातेरें केलें, पशुसम नरवीरांनीं कला भ्रष्टविली, नीति बुडविली, धनश्रीचे घिंडवडे काढले, अभिरुचीची बेअब्रू केली, राजवैभव धुळीस मिळाविलें, भक्ति निराधार केली, विद्या दारोदार लाविली, शास्त्रांना निराधार होऊन पळ काढावा लागला, संस्कृतीस वनवासास लावून पाशवीपणाला राज्यपदारूढ केलें. अशा रीतीनें सर्व जगाच्या लोहचुंबकास निर्वीर्य करून परदेशीय बलाढ्य राक्षसी तरवारबहादुरांनीं येथील अगणित संपत्तीची वाटेल तशी विल्हेवाट लाविली. समशीतोष्ण हवामान, अगाध संपत्तीच्या खाणी, तेजस्वी व भव्य राजगृहें यांच्या सुरम्य वार्ता ऐकून अलेक्झांडरपासून तो अहंमदशहा अबदालीपर्यंत सर्व परदेशी लुटारू यांनीं सारखा धुमाकूळ घालून नेववेल तेवढी संपत्ति नेली. रुचिर रविकिरणमय प्रदेश, धन-धान्यसमृद्ध भूमि, अफाट व्यापार यामुळें संकलित झालेली संपत्ति ऐकून व पाहून मॅसिडोनियन वीर अलेक्झांडर हा प्रथम भरतभूमींत उतरला.

या मॅसिडोनियन बहादरानें भरतभूमींत पाय टाकल्यावरोबर आपल्या शिपायांस असें सांगितलें कीं, "माझ्या शूर पठ्ठ्यानों, आतां तुम्ही प्रत्यक्ष सुवर्णभूमींत पाय ठेवणार आहांत; तुमच्या मायदेशापेक्षां येथें अगणितपट संपत्ति असून तेथें करामत दाखविणें हें तुमचें काम आहे, तरी तें पाहून घ्या." अशी दणदणलेली भरत-भूमीची कीर्ति ऐकून एकामागून एक या देशावर स्वाऱ्या होऊन आतां तो निष्कांचन झाला आहे हें निराळें सांगणें नकोच. मिल्टनच्या पूर्वी होऊन गेलेल्या विद्वानांनीं व आल्फ्रेडील प्रत्येक युरोपियन पंडितानें या देशाविषयीं लिहितांना कौतुकोद्गार काढले नाहींत असें क्वचितच झालें आहे. सुलतान महंमद गझनवी याच्या एकाच उदाहरणावरून येथील महाप्रचंड संपत्तीची कोणालाही कल्पना येईल. याची हकीगत कोणास नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. सोरटी सोमनाथ येथील शिवाची मूर्ति फोडून जी संपत्ति त्यानें बाहेर काढली, तिला मोजण्यास त्याला योग्य अशी संख्याच मिळेना. मथुरेंत २६ दिवस राहून हजारों मूर्ति आटविण्याचा सपाटा सारखा सुरूच होता. परंतु मथुरा सोडून कनोजला गेला तेव्हां त्याचे तेथें डोळेच दिपून गेले. तरी सोमनाथ, मथुरा येथें

राहिल्यानें त्यास हिंदुस्थानची संपत्ति म्हणजे काय याचाही थोडा फार परिचय झाला होता. अशा स्थितींत एकापेक्षां एक वरचढ सधन शहरें पाहिलीं म्हणजे या बुभुक्षित भिक्षाडी वृत्तीच्या परदेशी लुटारूस आश्चर्य कां वाटावें समजत नाहीं. परंतु जेथें दररोजची पंचाईत अशा गृहस्थास कांहीं दिवस मेजवानी देऊन नंतर दुसरीकडे पूर्वापेक्षां श्रीमंत घरीं नेऊन सोडलें तरी याची मूळची हलकट वृत्ति थोडीच एकदम बदलणार! असो. सोनें व हिरे यांची या भूमींत पैदासच फार होत होती. मलबार किनाऱ्यावरील कालिकत शहरापाशीं असलेल्या नेलीसेरम् शहरीं मोत्यांचा फार मोठा व्यापार चालत असे. हिंदुस्थानच्या खाणींतील जवाहीर संपत्ति फार प्रख्यात होती. हिरे, पाचू, गोमेद, बिरोजा, पीतस्फटिक अथवा पुष्पराग इत्यादि जिन्नस या खाणींतून निघत असत. सोनें येथें मुबलक सांपडतें अशी प्राचीन काळापासून प्रसिद्धि आहे. दक्षिण देश व मलबार प्रांत येथें सोन्याच्या खाणी असत; धारवाड येथेंही कांही दिवसांपूर्वी सोन्याची खाण लागलेली आहे. शिवाय पोवळीं, पाचू, हिरकण्या, लोलक वगैरे जवाहीर संपत्ति अगाध मिळतच होती. जगांत जीं नामांकित रत्नें व हिरे आज आबालवृद्धांस माहीत आहेत तेही येथील खाणींतूनच निघालेले आहेत. ब्रुटसची माता सव्हीलिया इजला ज्युलियसनें नजर केलेलें मोती व ज्युलियसची प्रख्यात राणी क्लिओपॅट्रा इच्या कानांतील मौक्तिकवलय हीं हिंदुस्थानांतूनच तिकडे गेलीं होतीं. हल्लीं दोन हिरे जगप्रसिद्ध आहेत; एक कोहिनूर व दुसरा पिट्. जरी पिट्चें वजन कोहिनूरपेक्षां फाजील असलें तरी कोहिनूरच्या पाण्यानें सर्व जगास मोहित करून अखिल जगाज्जिव्हेवर त्याचें नांव आरूढ झालें आहे. पिट्चें वजन पूर्वी १० कॅरॅट होतें व हल्लीं फक्त १३६½ कॅरॅटच आहे. त्याची हल्लींची किंमत ४८०००० पौंड आहे व तो पारीस येथील राजगृहाच्या एका स्वतंत्र दिवाणखान्यांत ठेवलेला आहे. कोहिनुरचें वजन १०६¼ कॅरॅट असून त्याची किंमत १००००० पौंड आहे. या दोन्ही हिऱ्यांचा व विशेषतः कोहिनुरचा एक स्वतंत्र इतिहास होईल इतकी कालांतरानें त्याच्या भोवतीं माहिती व कथा गोळा झाली आहे. त्याचप्रमाणें कालानें त्यास एक प्रकारचें महात्म्य व पावित्र्य आलें आहे.

स्त्रीला स्वरूप व राष्ट्राला संपत्ति जशीं अलंकाररूप आहेत व त्यामुळें सर्व जगाचा त्यांच्यावर सारखा डोळा असतो, तसाच प्रकार हिंदुस्थानचा झालेला आहे. आरब, तार्तार, मोंगल यांच्यांतील गझनवी, घोरी, तयमूर, नादिरशहा व शेवटचा अहंमदशहा अबदाली हे सर्व इकडे कशाकरितां लोटले? सोफोकल्सनें एका ठिकाणीं

म्हटलें आहे कीं, " सर्व दुःखांत संपत्तीचें दुःख अत्यंत वाईट आहे. मनुष्यजातीच्या मागें असंख्य व्याधि आजपर्यंत लागल्या व नाहींशा झाल्या; परंतु या संपत्तिरूप व्याधीचा नायनाट अद्याप झाला नाहीं व पुढें होईल असें दिसत नाहीं. याच्या योगानें शहरें उध्वस्त झालीं असून त्यांतील कुटुंबें देशोधडीस लागलीं आहेत; निर्मल अतःकरण भ्रष्ट होऊन सद्गुणी मनाची अधमाधम कर्माकडे प्रवृत्ति होते. " अशी ही आपन्मूलक संपत्ति चांगली कशी म्हणावी हें समजत नाहीं; परंतु व्यवहारांत संपत्ती-कडे चांगुलपणाचा भाग येत नाहीं हें प्रत्यक्ष अनुभवविरुद्ध असल्यानें नाकबूल करितां येत नाहीं: विद्या, कला यांची वृद्धि होण्यास संपत्ति हेंच मूळ कारण होय; ललित-कलांचें संगोपन व संवर्धन करणारी संपत्ति हींच जननी होय. कित्येक वेळेला राष्ट्रीय आपत्ति याच्या योगानेंच टळल्या आहेत. थोडक्यांत म्हणजे संपत्ति ही दुपाती तरवार असून तिचा सदुपयोग होण्यास योग्य योजकाचीच दुर्लभता असते असें म्हणावें लागतें.

प्रकरण २३ वें.

आर्यांचा धर्म.

धर्मासारख्या विषयावर अधिकारी लेखणीला पोक्तपणें व अत्यंत दूरदर्शीपणें लिहिण्याला आजन्म अभ्यास लागतो. परंतु नुस्त्या ग्रंथपठनानेंच ती योग्यता येईल असें मानणें विलक्षण धाडसाचें होईल. अलौकिक बुद्धिमत्ता, असामान्य विवेचन-शैली, अखंड अभ्यास, अनेक जन्मांचे संस्कार व तयारी, आध्यात्मिक अभ्यासाची व तालमीची पराकाष्ठा, परमश्रेष्ठ नैतिक व आध्यात्मिक शुचिर्भूतता, वाणीचा रसाळपणा, निश्चयात्मक बुद्धि, त्रिकालज्ञान, निर्दोष तर्कपद्धति, इत्यादि गोष्टींची भरपूर मदत लागते. ' वसुधैव कुटुंबकं ' या तत्त्वाचें प्रत्यक्ष आचरण पदोपदीं व क्षणोक्षणीं सिद्ध करून द्यावें लागतें; त्यागाची तयारी किती लागते याचें प्रत्यक्ष अनुभवाशिवाय अनुमान करणें अत्यंत धाडसाचें होईल; हाल, अपेष्टा, कष्ट, छल सोसण्यास व त्रिकालसत्य सिद्धांताचें प्रतिपादन व आचरण करण्यास मनाचा खंबिरपणा व शरीराची सहनशीलता किती असावी लागते हें तत्त्वज्ञानी धर्मसंस्थापक यांच्या ऐतिहासिक माहितीवरून कळेल. मनाची ईश्वराविषयीं तन्मयता व ध्यास किती असावा लागतो हें निदान हिंदु वाचकांस तरी सांगण्याची मुळींच जरूरी नाहीं. जगांतील अन्यायमूलक विषमता नाहींशी व्हावी, प्रेमाचें साम्राज्य सर्वत्र पसरून भेदभावाचें बंड पार मोडून जावें, अखिल मानवांस शांति व ज्ञानप्राप्ति व्हावी; जगांतील अज्ञानाचा पूर्ण निरास होऊन ईश्वरी

दरबारांत कोणास मज्जाव नसावा. जगांतील सर्व दुःखें नाहींशीं होऊन अध्यात्म-ज्ञानाची प्राप्ति सर्वांस व्हावी, व त्याकरितां स्वाभिमान, स्वार्थ यांना तिलांजुळी देऊन परहित व परार्थ साधण्यासाठीं ज्याची सर्वसंगपरित्यागपूर्वक तयारी झाली आहे अशाच सत्पुरुषास धर्मासंबंधीं बोलणें लिहिणें व उपदेश करणें या गोष्टींचा अधिकार आहे. प्रस्तुत लेखकाच्या ठिकाणीं तशांपैकीं एकही गुण असेल कीं नाहीं याबद्दल त्यास जबरदस्त शंका आहे परंतु मागील सर्व प्रकरणांवरून वाचकांच्या लक्षांत असें येऊन चुकलें असले कीं, स्वतःचे विचार प्रदर्शित करण्यापेक्षां उत्तम पुरावा गोळा करून भारतीय श्रेष्ठत्व सर्व लोकांच्या निदर्शनास आणणें हेंच मुख्य काम आहे. आपल्या ठिकाणीं धर्मासारख्या विषयावर स्वतंत्र जोरदार विचार प्रदर्शित करण्याची ताकद नाहीं हें समजून हा विषय अजिबाद गाळल्यास आतांपर्यंत केलेले श्रम व्यर्थ होऊन काम अर्धवट राहील; अशी भीति वाटत असल्यानें आपल्या हातून होईल तसें अल्प-प्रमाणांत कर्तव्य म्हणून काम करावें; त्यांत कांहीं न्यून राहिल्यास-तसें तें बरेंच राहणार अशी भीति आहे--ज्ञानी पुरुष दूर करतील एवढें समाधान मानून घेऊन पुढील कार्यास लागूं.

सत्य व श्रेष्ठ धर्म प्रेममूलक, शांत व निरुपद्रवी असतो. खऱ्या धर्माचें निशाण रक्तस्रावानें विटाळलेलें नसून धर्मसंस्थापक हा मदांध, अरेराव व जुलमी केव्हांही आढळून येणार नाहीं. विध्वंस, नाश हे शब्द यांच्या दरबारांत कधींही ऐकूं येणार नाहींत साहाय्य, ज्ञानदान, दुःखविमोचन व सुधारणा या चार कोणशिलांवर धर्माच्या उज्ज्वल वैभवाची उत्तुंग इमारत उभारली जाते, व त्यांत लोकहित हीच मुख्य दैदीप्यमान मूर्ति नांदत असते अशी धर्माची मिल्लर यानें जी व्याख्या दिली आहे ती किती यथार्थ आहे व हिंदू धर्माच्या बाबतींत ती तंतोतंत लागू असून यांत थोडीशी हिंदुधर्मानें भरच घातली आहे असें दिसून येईल.

अत्यंत त्रस्त मनाला शांति देणारें उत्तम औषध म्हणजे धर्म होय. समाजामध्यें सर्व लहानथोर मंडळींत एक प्रकारचा बंध दिसतो तो खरोखर धर्मानेंच उत्पन्न केला आहे. मनुष्यमात्राच्या सर्व व्यवहारांत धर्म भरून राहिला आहे व विशेषतः हिंदु-समाजाच्या दृष्टीनें ही गोष्ट सांगणें ज्यास्त अगत्याचें आहे. संगतीवरून मनुष्याची ज्याप्रमाणें परीक्षा होते त्याचप्रमाणें धर्मावरून राष्ट्राची परीक्षा होते. राष्ट्रामध्ये कोणते विचार उसळत आहेत, लोकांची मनोभावना कोणत्या प्रकारची आहे, ज्ञान, संस्कृत व परार्थ यासंबंधानें लोकांच्या विचाराला कसें वळण लागलें आहे व त्यायोगें त्या

राष्ट्राची भवितव्यता काय आहे हें अजमावण्यास सोपें जातें. साध्या गोष्टीवरून, क्षुल्लक कार्यावरून अथवा सहज साध्या दिसणाऱ्या कामावरून व वागणुकीवरून ज्याप्रमाणें व्यवहारांत मनुष्याची परीक्षा होते त्याप्रमाणें धर्मावरून जगाच्या सुधारणेंत प्रत्येक राष्ट्राला आंपली पदवी ठरवून द्यावयाची असते.

धर्म हें राष्ट्राच्या उच्च वा नीच संस्कृतीचें गमक आहे. धर्म या शब्दाभोंवतीं आचारात्मक असंख्य व्यवहारांचें जाळें माजलेलें दिसतें; परंतु धर्माची खरी ओळख म्हणजे परमात्मज्ञानाची प्राप्ति होणें, परमार्थज्ञानाची गुणाधिक्यता व श्रेष्ठता नीतिशास्त्र, तत्वज्ञान, वाङ्मय, विज्ञान व सर्वसाधारण उन्नति यांजवर अवलंबून असल्यानें ज्या मानानें हीं शास्त्रें प्रगल्भदशेस येऊन लोकांचीं मनें सुसंस्कृत होतील त्या मानानें तो धर्म अधिकाधिक श्रेष्ठ असें ठरणार हें उघड आहे.

हिंदुस्थानांतील वैदिक धर्माचा इतिहास व त्याची उदात्त शिकवण यांची प्रत्यक्ष व्यवहारांत असलेल्या धर्माशीं तुलना केल्यास खरोखर वाईट वाटतें व आचरणांत इतका फरक कशानें घडला हा एक मोठा प्रश्न मनापुढें उभा रहातो. सर्व वस्तूंच्या मुळाशीं असलेला वैदिक धर्म यास स्वस्थानापासून पदच्युत करून लौकिक, विकृत, हिणकस, जडवादी धर्मानें त्याचें स्थान पटकाविलें आहे व मागें सांगितल्याप्रमाणें अर्वाचीन कालच्या हिंदूंची अवनति, त्यांची चालू धर्मव्यवस्थिति, समाजरचना, नैतिक समजुती व कित्येक हिडिस चालीरिती यांवरून स्पष्ट होते.

जडसृष्टि व परमात्मा यांच्या परस्परसंबंधाचें विवेचन व आत्म्याचीं चिरंतन तत्त्वें यांचा ऊहापोह वेदामध्यें केलेला आहे. सर्व सृष्टींतील यच्चयावत् जीवांशीं प्रेममय वर्तन ठेवणें, त्यांच्या दुःखानें दुःखित होणें व सुखानें सुखी होणें हेंच वैदिक धर्माचें रहस्य आहे. या तत्त्वाचें स्पष्ट प्रतिबिंब बुद्धाच्या पुढील वचनांत दिसून येईल.

" माझ्या वैय्यक्तिक परमसुखाची मला मुळींच पर्वा नाहीं; अथवा मी अखेरच्या प्रशांत अवस्थेंत एकटाच रहाण्याला बिलकूल तयार नाहीं. परंतु चिरंतन सर्वत्र माझा वास असावा; माझ्याबरोबर प्रत्येक प्राणिमात्र मुक्त होऊन शाश्वत सुखाचा वाटेकरी व्हावा अशी माझी इच्छा आहे, व त्याकरितां मी जन्मोजन्मीं प्रयत्न करीन व तसें घडून आल्याशिवाय माझें कधींही समाधान होणार नाहीं. जगांतील प्रत्येक दुःख व हाल यांचा पूर्ण निरास होऊन प्रत्येक मजबरोबर मुक्ति-सुख भोगण्यास तयार होईल तेव्हांच मी आपला प्रयत्न बंद करीन! " केवढी ही अचाट महत्त्वाकांक्षा! व कोण हें विश्वव्यापी प्रेम!

हिंदुधर्मांत सृष्टि आणि मनुष्य यांचे एकमेकांशीं असलेले संबंध, मनुष्याचे ठिकाणीं बद्धत्व कशानें येतें या विषयीं दृढ झालेलीं चिरंजीव तत्त्वें व अढळ सिद्धान्त यांचा अंतर्भाव होतो. या अढळ सिद्धांतांना एका दृष्टीनें विज्ञान अथवा शास्त्रें व दुसऱ्या दृष्टीनें पारमार्थिक तत्त्वज्ञान असें मानण्याचा प्रघात आहे. यांतील प्रमेयें फक्त चिरकाल नांदणाऱ्या गोष्टींनाच लागू आहेत; कमलजलवत् असार गोष्टींचा यांत मुळींच विचार केलेला नाहीं. यांच्या ठिकाणीं भेदभाव मुळींच नसून सर्वत्र याची व्याप्ति सारख्या प्रमाणांत आहे. हिंदू असो अगर अरब, युरोपियन, अमेरिकन, आफ्रिकन, चिनी कोणताही असो, त्यांस त्यांच्या अध्ययनापासून सारखेंच ज्ञान होऊन परमार्थाची प्राप्ति होण्याला सर्वांना सारखाच मार्ग या मोक्षशास्त्रानें मोकळा करून दिलेला आहे.

हिंदुधर्म पौरुषवादी आहे, प्रयत्नवादी आहे; म्हणजे त्यास परमेश्वराचें आस्तित्व मान्य नाहीं असें कोणींही समजूं नये. परंतु परमेश्वर निष्क्रिय असून मनुष्य आपल्या कर्मांनें बांधलेला आहे.. तो जसें पेरील तसें त्यास फळ मिळेल; परमेश्वर निराकार, निर्गुण व निष्क्रिय असल्यानें कर्मफलाच्या भानगडींत तो मुळींच पडत नाहीं. जो तो आपल्या कर्मफलाचा उपभोगी आहे; अर्थात् कर्म करून स्वाभिप्राय-सदृश फल उत्पन्न करणें हें पुष्कळांशीं मनुष्याच्या स्वाधीन आहे. तो आपला पंगुपणा व्यक्त करण्यास केव्हांही तयार नाहीं. 'परमेश्वराला भक्तांचा हट्ट पुरा करणें भाग पडतें.' या साधुसंतांच्या वचनावरून मनुष्य आपल्या भावी सुखाचा स्रष्टा आहे असें म्हट-ल्यास त्यांत कांहींही वावगें होणार नाहीं. परंतु ही स्थिति इतर धर्मांत आढळून येत नाहीं. त्यामध्यें ईश्वर हा एकाद्या ऐहिक नृपतीप्रमाणें कल्पिलेला असून मानवी मनो-धर्मांचे आरोप त्याच्या ठिकाणीं केलेले आहेत, अर्थात भक्त हा आत्मनिष्ठ व प्रबल व्यक्ति कल्पिलेली नसून त्याच्या बऱ्यावाईट कर्मांबद्दल तो ईश्वराच्या न्याय दया कारुण्य इत्यादि भावनांवर पूर्णपणें अवलंबून रहातो असें मानलें आहे. ह्याच ठिकाणीं हिंदुधर्माचा व इतर धर्मांचा विरोध येऊन याच्याच योगानें त्यास वैशिष्ट्य प्राप्त झालेलें आहे.

परमेश्वराचें खरें ज्ञान प्राचीन ऋषींस झालें होतें अशाबद्दलचीं उदात्त, स्पष्ट व गंभीर वचनें त्यांच्या अनेक ग्रंथांत पहावयास मिळतात; व संस्कृत भाषेंतील हें ज्ञान, वचनें व विचार इतर कोणत्याहि भाषेंत इतक्या स्पष्टपणें व सोप्या रीतीनें लिहि-लेलीं आढळणार नाहींत. या ज्ञानास ब्रह्मज्ञान असें म्हणतात. ''एकमेवाद्वितीयं ब्रह्म''

हें वाक्य सर्वतोमुखीं असून वादाच्या वेळीं सर्व भर याच्या वरच असतो. याच्या-शिवाय लोकांच्या ध्यानींमनीं इतर कोणताच विषय नसतो. ब्रह्मास सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, सर्वशास्तृ व अनन्त असें मानण्यांत येतें.

'सर्व प्राचीन संस्कृत धर्मग्रंथांना फक्त एकच परमेश्वर मान्य आहे. त्याचें स्वरूप तेजोमय आहे. तत्कालीन प्रत्येक ब्राह्मणाची खटपट जड व बंधनकारक वस्तुग्रामाच्या संसर्गापासून मुक्त होऊन अशा प्रकाश-तेजोरूप परमेश्वराशीं तादात्म्य पावावें म्हणून असे. त्या वेळीं परमेश्वराची जडमूर्ति करून पुजण्याचा प्रघात नव्हता. अथवा प्रतिमा-पूजेची वहिवाट मनूच्या काळापर्यंत मुळींच रूढ नव्हती. श्राद्धकर्म ही हिंदुधर्मांतील एक महत्त्वाची संस्था आहे. प्रो. मॅक्समुल्लर म्हणतो कीं, "अजून हिंदु लोकांत श्राद्ध-कर्माची परंपरा नष्ट झालेली नाहीं. त्यांतील उदात्त हेतु, गंभीर विचार व थोर कल्पना यांची जाणीव जरी फार थोड्यांस असली तरी ती चाल अजून अव्याहत चालत आलेली आहे. अंत्यविधि, अंत्येष्टि, दहनकर्म इत्यादि शब्द हिंदूंच्या कानास कटु व अमंगल लागतात. याचें कारण मानवी जीवनाच्या ऐहिक थोरवीबद्दल व भावी उत्कर्षाबद्दल त्याचे ठिकाणीं पूर्ण निष्ठा असते. माता, पिता, पुत्र यांच्या पुण्यस्मरणाचा श्राद्धरूप प्रसंग न पाळण्यानें खरोखर मोठी धार्मिक हानीच होणार आहे. सबब ही चाल जितकी दृढमूल होईल तितकी, धर्माचरणास बळकटी येऊन मानवी जीवनाबद्दल गांभीर्य व उच्चताप्रधान भावना या सुविरूढ होऊन समाजस्थैर्यास निःसंशय मदत होणार आहे."

आतां या गोष्टीसंबंधीं मतभेद असूं शकेल. परंतु जगच्चालक परमेश्वराशीं तादात्म्य पावण्याची स्थिति प्राप्त होण्यास शरीर हें अत्यवश्य साधन आहे असें जोंप-र्यंत प्रत्येकाचें प्रामाणिक मत असेल, तोंपर्यंत त्याच्या उपजत पंगू स्थितींत निष्काम बुद्धीनें जिवाची पर्वा न करितां त्यास वाढविण्याची जबाबदारी ज्यांनीं मोठ्या आनंदानें पत्करली, ऐहिक व पारलौकिक सुखसेवनास त्यास समर्थ करण्याची ज्यांनीं अहर्निश खटपट केली, त्या पूज्य मातापितरांचें पुण्यस्मरण केल्यानें खात्रीनें हितच होईल: व अशा तऱ्हेनें कृतज्ञता व्यक्त केल्यास त्यांत काय गैरवाजवी होणार आहे?

आतांपर्यंत निवेदन केलेल्या सर्व विशेषांत पुढील विशेष फारच उत्तान, मनो-ग्राही व ढोबळ असून त्याची सर इतरत्र कोठेंही आढळून येणार नाहीं. हिंदुधर्माची रचना शास्त्रशुद्ध पायावर झालेली आहे. ज्या वेळीं चालू हिंदुधर्माची रचना झाली त्या वेळीं अर्वाचीन भौतिक शास्त्रें अज्ञानपर्वताच्या कोणत्या निबिड व भयाण गुहेंत आपलीं

तोंडें खुपसून बसली होतीं कोणास ठाऊक ? परंतु वेदद्रष्ट्या ऋषींचें ज्ञान इतकें अमोघ व बिनचूक आहे कीं, त्यांत अजूनपर्यंत कोठेंही न्यूनपणा आलेला कोणासही स्मरत नाहीं. ऋषींच्या सृष्टयुत्पत्तीच्या कल्पना व ईश्वराविषयींच्या कल्पना, यांचा आधुनिक भौतिक शास्त्राशीं काडीमात्र विरोध नसून त्यांच्या योगानें ह्या विचारास व कल्पनेस उलट बळकटीच आलेली आहे. असा विलक्षण योग इतर कोणत्याच धर्मांत पहावयास मिळत नाहीं. तत्त्वज्ञान, शास्त्रें व ईश्वरोत्पत्ति आणि जगदुत्पत्ति याविषयीं ठाम झालेल्या समजुती यांत अणुमात्र सुद्धां फरक आढळून येऊं नये हाच हिंदुधर्मांतील अपूर्व प्रकार होय याचमुळें आर्यावर्तास सर्व धर्मांची जननी अशी संज्ञा आहे. नोहाचा प्रलय, माता मेरीची कौमार्य स्थिति, महंमदाचें सगर्व स्वानुयायांस आश्वासन, ख्रिस्ताचें प्रलयानंतर न्यायदान, इत्यादि कुराण व बायबलांत दिसून येणाऱ्या तत्त्वज्ञानविरोधी गोष्टी वेदांत मुळींच आढळत नाहींत. वेद व उपनिषदें यांतील तत्त्वें कोणत्याहि निकषावर घासून पाहिलीं तरी त्यांत अणुमात्र हिणकस द्रव्य आढळणार नाहीं व याच कारणानें आज हजारों वर्षें अनेक रजोगुणी व सशस्त्र धर्मवीरांस तोंड देऊन हा धर्म अवानिस्तलावर गंभीरपणानें आपला उपदेश जगतास करीत आहे. जगांतील अर्धे लोक याचे पक्के अनुयायी असून इतर अर्ध्याहून कमी असणाऱ्या लोकांनीं याचा उपदेश स्वीकारून आपल्या धर्मांस मात्र निराळें नांव दिलें आहे. त्यांचें निशाण जरी भिन्न दिसलें तरी मुळांत याच गुरुपाशीं त्यांचा अभ्यास झालेला आहे असें पूर्णविचारांतीं दिसून येईल. खऱ्या गुरूला आपल्या बहुश्रुत व पंडित शिष्याकडून पराजय होण्यांत मोठें भूषणच वाटतें. तींच स्थिति आर्यधर्मांची आहे. हा शमप्रधान, गंभीर, पूर्ण ज्ञानी गुरु असल्यानें त्यास इतर शिष्यसम धर्माकडून पराजय होण्यांत आनंदच वाटला आहे. परंतु तामसी व अपरिपक्व धर्मांनीं पितृरूप हिंदुधर्मावर शस्त्र उगारून त्याचा छल केला आहे. यांची शिष्यपरंपरा वाढविण्याची पद्धत म्हणजे समशेरदर्शन, अडवणूक आणि फसवेगिरी ! असा प्रकार आर्यावर्तांत कोठेंही पहावयास मिळणार नाहीं. इतर धर्मांत असहिष्णुतेचें बंड विलक्षण असून तत्त्वज्ञानी व शास्त्री लोकांचा छल वेदेतर धर्मांनीं केलेला सर्वत्र पहावयास मिळेल. गॅलिलिओ, कोपरानिकस, ब्रूनो इत्यादि तत्त्वज्ञानी लोकांचे बळी या लोकांनीं घेतलेले आहेत,परंतु त्यांच्याच काळीं हिंदुस्थानांत झालेल्या सर्व प्रकारच्या मताभिमानी लोकांस यत्किंचित् सुद्धां त्रास पोंचला नाहीं. यावरून वैदिक धर्मांची सात्विकता, बळकटी, आत्मश्रद्धा, तात्विक विशुद्धता इत्यादि गुणांची परीक्षा होणार आहे. हिंदुधर्मानें उपदेशकांच्या टोळ्या करून परकीयांस ' दे माय धरणी ठाय ' केलें नाहीं अथवा अडाणी,

गरीब, नडलेल्या लोकांस नाडून नाखुषीनें त्यांच्या गळ्यांत परकीय धर्माचें लोढणें अडकवून दिलें नाहीं. डेला व्हॅली नामक एका प्रख्यात ख्रिस्तभक्तानें आपल्या 'पूर्व-हिंदुस्थानची सफर' या पुस्तकांत बरोबर हेच विचार प्रदर्शित करून हिंदी लोकांस दुष्काळानें अनाथ व अन्नान्न करून सोडले नसते तर येथें एकही ख्रिस्त ठेवण्याची जरूरी नव्हती अशी स्पष्ट कबूली दिली आहे.

'नाइन्टींथ सेंचरी' नामक प्रख्यात मासिकांतील जर्सीच्या काउन्टेसचे खालील विचार मननीय आहेत:—

"हिंदुस्थानांतील उच्च जातींतील विचारवान् लोकांना ज्या शंका येतात व भीति वाटते त्यांचें निरसन ख्रिस्ती धर्मानें होणें ही अशक्य गोष्ट आहे. मनांत उद्भवणाऱ्या अत्युच्च आशा व त्यांची तृप्ति करण्यास उपनिषदें पूर्ण समर्थ आहेत. प्राचीन ऋषींचें सूक्ष्म तर्कशास्त्र हा एक अभेद्य तट असून त्यांतील वादविवाद व विवेचनपद्धति हिंदू तत्वज्ञानाचें पूर्ण संरक्षण करण्यास पुरेशी आहे जगामध्यें दिसून येणारी विषमता सुखदुःखाची व्यस्त प्रमाणांत झालेली वांटणी हे प्रश्न कर्माच्या तत्त्वानें सोडविलेले आहेत. आत्म्याची खळवळ व तळमळ शांत करण्यास एका विशिष्ट मूर्तीवर ध्यान देऊन बसावें हा उपाय सांगितलेला आहे. पुढें ही प्रतिमा बिंदुसमान कल्पून नंतर कांहीं दिवसांनीं तो बिंदु आपणामध्येंच आहे अशी भावना करण्याचा प्रयत्न करावा. हा प्रयत्न सिद्ध झाला म्हणजे मन आत्मविचारांत दंग होतें व अशा वेळीं ऐहिक इच्छा व सुखलालसा पार मावळून मन आत्मिक प्रेमानंदांत पोहूं लागतें. हिंदू तत्त्वज्ञानाची ही स्थिति म्हणजे परमावधि होय; परंतु अशा अत्युच्च आर्यतत्वज्ञानानें सुद्धां ज्यांचें समाधान होत नाहीं अशांस ख्रिस्ती धर्म कसें समाधान देणार? ख्रिस्ती धर्मामध्यें इतकी योग्यता थोडीच असणार!"

अर्वाचीन भौतिक शास्त्रांशीं कोणत्याहि एका तत्वज्ञानाचा पूर्ण मेळ असेल तर तो आर्यतत्वज्ञानाचा होय. बुद्धाचें तत्वज्ञान मूलतः आर्यतत्वज्ञानापासून भिन्न नसल्यानें त्याचा विचार करण्याचें कारणच नाहीं. आर्यतत्वज्ञानानें व धर्मानें बहुतेक सर्व जगावर आपला अंमल बसविला आहे. "आर्यांच्या वसाहति".या प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें जगाच्या सर्व भागांत आर्य लोक पसरून ते तेथें वसाहति करून राहिले आहेत. अर्थात् त्यांच्याबरोबर त्यांचा धर्म व तत्वज्ञान जाणें हें अगदीं साहजिक आहे. परंतु जरा थोडा वेळ हा विचार बाजूला ठेविला तरी सध्यांच्या सर्व जगाच्या लोकसंख्येवरून आर्यापेक्षां अधिक संख्या हिंदुधर्मी असून बाकीची ख्रिस्ती, मुसलमानी, ज्यू व रानटी अशी आहे.

ग्राह्यां सर्व जगाची लोकसंख्या ढोकळ मानानें एक (१०००००००००) अब्ज आहे असें धरलें तर फक्त त्यांपैकीं हिंदू व बौद्ध धर्मी मिळून ५३०००००० आहेत व बाकीचे ४७००००००० अहिंदू आहेत. ख्रिस्तभक्त बॉर्डे म्हणतो कीं, " हिंदु तत्वज्ञान व धर्म यांचें प्राबल्य जगाच्या अजून बऱ्याचशा भागावर असून जपान, चीन, तार्तरी, हिंदुस्थान, ब्रह्मदेश, सयाम, सिव्हलद्वीप, इत्यादि ठिकाणीं हिंदु-पद्धतीनेंच पूजाअर्चा चालू असून विचार व भावना यांजवरही त्याचेंच प्राबल्य आहे. " जे धर्म प्रत्यक्षपणें हिंदुस्थानांत उगम पावले नाहींत त्यांचे वरही हिंदू विचारांचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. जॉनस्टर्ना म्हणतो कीं, 'बौद्ध धर्माची तत्वें बहुतेक इतर सर्व धर्मांत मिसळलेली आढळून येतात. ज्यू लोकांतील मोझेजसंबंधींची जगदुत्पत्ति व हिंदूंची जगदुत्पत्ति यांमध्यें मुळींच फरक नसून वास्तविक पहिली दुसरीपासून निघालेली स्पष्ट दिसते.'

ख्रिस्ती धर्मांत ' ग्रीक चर्च ' या नांवाचा एक पंथ आहे. त्याची प्रिन्सेपनें पुढीलप्रमाणे उपपत्ति दिली आहे.

' ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्याच्या वेळीं कांहीं बुद्ध भिक्षु धर्मांतर करून युरोपांत येऊन राहिले. तेव्हां त्यांचे बरोबर हल्ली ' ग्रीक चर्च ' पंथांत रूढ असलेले धार्मिक आचार व सण हिंदुस्थानांतून बाहेर गेले. हिंदुस्थानांतूनच राजसत्तात्मक राज्यकारभारपद्धति, प्रार्थना, आन्हिक धार्मिक क्रिया, महाजन मंडळें, अस्थिपूजा, चमत्कार, वेष, मुंडन इत्यादि प्रकार युरोपांत प्रविष्ट झाले. "

ख्रिस्ती धर्म उदयास येण्यापूर्वी शेंकडों वर्षे जे ऋषि होऊन गेले त्यांचेच शब्द व वचनें कित्येक ठिकाणीं बायबलांत आलेलीं दिसतात. ' दुसऱ्यांनीं तुजपाशीं जसें वागावें अशी तुझी इच्छा असेल तसेंच तूं दुसऱ्याशीं वागत जा. ' हें बायबलांतील अगदीं वेदतुल्य वचन आहे. आतां याज्ञवल्क्याचें वचन पहा. ' हा आत्मा आमचा नव्हे; ज्या जड शरीरानें आम्हास धर्माचें आचरण करितां येतें त्याचा रंग तयार होणें हें तरी आमच्या मुळींच स्वाधीन नाहीं. शरीर असेपर्यंत फक्त धर्मानें वागणें आपलें कर्तव्य आहे. म्हणून आपणास जें आवडणार नाहीं तें आपण दुसऱ्यास तरी कसें द्यावें ? '

ऋग्वेदांत सर्व धार्मिक आकांक्षांचें फारच उदात्त व गंभीर उच्चारण झालें आहे, त्यामुळें जी संस्कृति आर्यावर्तांत पसरली तीच आज आपणास सर्वत्र पसरलेली दिसते असें डेल्वॉस म्हणतो.

ज्याप्रमाणें रेशमाचे किडे अगर फुलपाखरे यांची पहिली व दुसरी अवलाद यांत मुळींच संबंध नसतो तशी मनुष्यजातीची स्थिति नाहीं. ही जात प्रगमनशील व बुद्धिमान असल्यानें हिच्या एका पिढीचा व दुसऱ्या पिढीचा अनेक गोष्टींमुळें संबंध जडलेला असतो. अथवा दुसरी पिढी मागील पिढीचे गुणदोष घेऊन येते, त्याचप्रमाणें धर्मांची स्थिति आहे. एक धर्म पार नष्ट होऊन दुसरा उत्पन्न झाला; पहिल्याचा दुसऱ्याशीं काडीमात्र संबंध नाहीं असें कधीही होणें शक्य नाहीं. जगांतील ज्ञानपरंपरा व अभिवृद्धीस असें झाल्यानें मोठाच धोका येईल. प्रत्येक तत्व नव्यानें शिकावयाची पाळी येईल; मागील आम्हास कांहीं नको असें म्हटल्यास आज जगाची जी सुस्थिति दिसते तिच्या अत्यल्पांशाइतकी सुद्धां ती झाली नसती. म्हणून जो धर्म अस्तंगत होतो तो भावी वर्धिष्णु, तडफदार, जोमदार आपल्याला पुढें करून आणि मागें सरतो. भारतवर्षांतून इजिप्शियन धर्म निघाला; इजिप्शियन धर्मांतून मोझेसनें आपलीं ज्यू धर्मशास्त्रें तयार केलीं व या शास्त्रांवर ख्रिस्ती धर्माची उभारणी झाली. पारशी धर्म, ज्यू लोकांचा धर्म व ख्रिस्ती धर्म यांतून महंमदी धर्माचा उदय झाला.

बौद्ध धर्म म्हणजे ब्राह्मणी धर्माविरुद्ध शुद्ध बंड होय. यायोगें त्याला क्रान्तिकारक रूप जरी आल्यासारखें भासलें तरी ज्या कारणांकरितां हें बंड उभारलें गेलें तीं कारणें नाहींशीं झाल्यावरोबर भिन्न नांवानें पूर्वीचा हिंदुधर्म वावरूं लागला व एवढ्या नाममदानें जेव्हां तो बेहोष झाला तेव्हां श्रीमच्छंकराचार्यांनीं त्याचा गर्वपरिहार करून हिंदुधर्मास मूळ सिंव्हासनावर पुन्हा आरूढ केलें.

हिंदुधर्म अथवा वैदिक धर्म आणि बौद्ध धर्म यांमध्यें समान तत्वें कोणतीं आहेत तीं पाहूं. (१) दोघांनाहि वेदांचें जनकत्व मान्य आहे, (२) दोघांनाहि त्रिमूर्तीची कल्पना पसंत आहे; मात्र प्रत्येकांतील मूर्ति निराळ्या आहेत. (३) उभयतांना पुनः जन्म (४) व आत्म्याचें परमात्म्यांत विलीन होणें या गोष्टी मान्य आहेत.

भेद पुढीलप्रमाणें आहेतः – (१) वेद अपौरुषेय नसून अत्युच्चदर्जाची महासिद्धान्तसंस्थापक पुरुषाची ती कामगिरी होय, (२) चातुर्वर्ण्याची संस्था मान्य नाहीं. (३) दुय्यम देव व उपदेव हे मान्य नसून ते फक्त पुण्यपुरुष व धर्मसुधारक होत. (४) देवाच्या कल्पनेंत फार अंतर आहे.

सर आर्नोल्डच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे निर्मर्याद विश्वप्रेमाचें अखंडत्व, विश्वाच्या आत्यंतिक सुखाच्या व स्वातंत्र्याच्या आशेचें अमरत्व व वैय्यक्तिक सुखाचा निरास आणि विश्वव्यापक प्रेममय आशेचें अनंतत्व हे बौद्ध धर्माचे विशेष होत.

अशा जगत्प्रेमी बौद्ध धर्माचा अंमल ब्रह्मदेश, सयाम, हिंदी आचिपेलागोमधील बहुतेक बेटें, सिंव्हलद्वीप, तिबेट, मंगोलिया, जपान, नेपाल, भूतान या देशांत चालू काळांत सुरू आहे व एका काळीं तो सर्व पृथ्वीवर पसरला होता असें मानण्यास कारणें आहेत. तुर्कस्तान, इराण, इजिप्त, रोम, स्कान्दिनाव्हिया व ब्रिटिश बेटें यांमध्यें तर तो बहुत करून चालूच होता.

जन्स्टर्न म्हणतो कीं, " आसाम, पेगू, आव्हा व सीलोन येथें बुद्धास गोदाम म्हणतात; सयामांत समन; जपानांत अमिध बुद्ध, चीन कोरियामध्यें फो अथवा फाही; बंगाल व नेपालमध्यें शाक्यासिंग; भूतानमध्यें धर्मराय; तिबेटमध्यें आदि-बुद्ध व महामुनि; आणि मंगोलियामध्यें शाक्यमुनि " अशीं देशपरत्वें नांवें आहेत.

इ. स. ६५ सालीं मिंग्टी बादशहाच्या कारकीर्दीत " भारण " व " मतंग " या दोन बौद्ध भिक्षूंनीं चीनमध्यें प्रथम बौद्ध धर्म नेला. ते मुळचे पंजाबांतील तक्षशिलेचे राहिवाशी होते. चिनांतील " गीती " व ग्रीसमधील " स्किथी " हे एकच असून ते शाक्यकुलाचे मूल उत्पादक असावेत असा कांहींजणांचा तर्क आहे.

बौद्ध धर्माचा विस्तार सर्व जगभर झाला असें जर कोणी म्हटलें व त्याच्या स्पष्टीकरणार्थ उदाहरणें दिलीं नाहींत तर हल्लींच्या चिकित्सक काळांत त्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाहीं; व त्याच्या म्हणण्याकडे कोणी लक्षही देणार नाहीं उदरनिर्वाहाच्या प्रश्नानें सर्व लोकांचीं मनें अगदीं उत्फुल्ल भरून गेलीं असतां, दिवसोंदिवस जीवनकलह फार विकट होत असतां, वाङ्मय विषयाकडे कोणास लक्ष देण्यास सवड आहे ? पूर्वपरंपरा, इतिहास, प्राचीन वैभव, पूर्वजांची कीर्ति व पराक्रम हे विषय मनुष्यमात्रास प्रिय आहेत, परंतु त्यांचा अभ्यास करण्यास शेंकडा एकदोघांना सुद्धां फुरसत नाहीं; सबब करमणूक व परिश्रमरहित ज्ञानप्राप्ति होण्याला लेखकाची लेखणी अधिकारी व विषयाची मांडणी चित्ताकर्षक, मुद्देसूद व समर्पक पाहिजे. स्वतःसंबंधानें कोणालाही कांहीं लिहितां येणें जरी अशक्य नसलें तरी अवघड आहे. सबब आत्मश्लाघेचा दोष स्वीकारण्याऐवजीं प्रस्तुत विषयावर (बौद्ध धर्माचा जगद्व्याप) आणखी कांहीं विश्वसनीय माहिती देणें बरें.

बुद्धदेवाच्या पादुका हिंदुस्थान व बाहेर ठिकठिकाणीं आढळून आल्या आहेत. अशा आजपर्यंत सहा पादुका उपलब्ध आहेत. त्या साधारणतः डोंगरांतील 'खडक व' कातळ अशा ठिकाणीं खोदलेल्या आहेत. बौद्ध लोकांची अशी समजूत आहे कीं, जोंपर्यंत अशा पादुका अस्तित्वांत असून लोक त्यांचें दर्शन घेत आहेत तोंपर्यंत महापूर,

प्रलय, उल्कापात वगैरे पंचभूतात्मक आपत्तीपासून भीति नाहीं. अशा पादुकांची एक जोडी मक्केस आहे व महंमदी धर्माचा उदय होण्याच्या पूर्वी तेथें अनेक बौद्ध यात्रेकरू जात असत. या पादुकांस फाबत् असें म्हणतात. अरबस्थानांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता हें वरील उदाहरणावरून दिसून येईल. इजिप्तमध्यें नाईल नदीच्या कांठीं सुद्धां हा धर्म पसरला होता. इजिप्ती लोकांचे ' हर्मीज नांवाचे पवित्र धर्मग्रंथ आहेत. त्यांमध्यें बौद्ध धर्मांतील बहुतेक तत्त्वें गोवलेलीं आहेत. पुनर्जन्म, पूर्वजन्म, मानवी आत्मा परमेश्वरी अंश आहे व येथील यात्रा संपविल्यानंतर तो परत परमात्म्यांत विलीन होतो इत्यादि तत्त्वें स्पष्ट वैदिक व बौद्ध धर्मांतील असल्यानें व तींच इजिप्ती लोकांच्या पवित्र धर्मग्रंथांत आल्यानें वरील अनुमानास पूर्ण दृढता येते. याशिवाय हीं तत्त्वें हर्मीज व थॉड यांच्या संवादांत आहेत. आतां थॉड् हा वॉढ व बुद्ध अशा परंपरेनेंच सिद्ध झालेला शब्द आहे हें कोणाही विचारी माणसास दिसल्याशिवाय राहणार नाहीं. पिमांडरचे " हर्मीज ' ट्रिसमेजिस्टस " या नांवाचें संवादात्मक दुसरें एक इजिप्ती पुस्तक आहे; त्यांत त्रिमूर्तींच्या तत्त्वावर पिमँडर व थॉड् यामध्यें झालेला संवाद दिला आहे. खाल्डियन, बॅबिलोनियन, कॉल्चीसचे लोक, व असिरी यांजमध्यें बौद्ध धर्माचा पूर्ण प्रसार झाला होता, इत्यादि माहिती जॉन्स्टर्नो याचे पुस्तकांत दिली आहे. आरामांतील सामाराइट लोक व पॅलेस्टाईनमधील इसेनी लोक हेही बुद्धानुयायीच होते. इसेनी लोक बाह्यतः जरी ख्रिश्चन होते तरी त्यांचे सर्व आचार बौद्ध धर्मानुकूल होते व खाइस्टला ते बुद्धदेव मानीत असत.

ग्रेटब्रिटनमधील ड्रुइड हे आपले कडील ब्राह्मण जातीप्रमाणें श्रेष्ठ वर्णाचे लोक होते. त्यांच्यामध्यें पूर्वजन्म, पुनर्जन्म, आत्म्याचें व परमात्म्याचें संमेलन हीं तत्त्वें असून उत्पादक, संरक्षक, विनाशक या तीन धर्माच्या देवांचें त्रिकुट आपल्या कडील त्रिमूर्तीप्रमाणेंच होतें. हे लोक पुढें ग्रेटब्रिटन सोडून सीझरच्या स्वारीपूर्वी फ्रान्स, जर्मनी, स्पेन इत्यादि देशांमध्यें उपदेश करण्याकरितां गेले. ह्यांचा हा सर्व कारभार ख्रिस्ती धर्माच्या पूर्वकालीन होता. त्याच वेळेला स्कांदिनाव्हीया व पूर्व आशियांत आल्ताई पर्वतापर्यंत बौद्ध धर्माचा विस्तार झाला होता. त्यावरून हे ड्रुइड लोक सुद्धां बुद्धानुयायीच असले पाहिजेत, असें वाटतें. स्कांदिनाव्हियाच्या द्वीपकल्पांत बौद्ध धर्माचा मूळ संस्थापक ' व्होडिन ' या नांवाचा होता व त्यास अर्वाचीन भाषेंत ' ओडिन ' असें म्हणतात. व्हॉड्, भॉड्, बुद्ध या उतरत्या शब्दपरंपरेकडे लक्ष दिलें तर बुद्ध या शब्दास ' इन् ' या प्रत्यय लागून व्होडिन् हा शब्द

सिद्ध झाला असें वर वर पाहणारासही दिसून येईल. ज्या ज्या देशांत बौद्ध लोक जाऊन राहिले व जेथें त्यांनीं देशपरिस्थितीप्रमाणें हिंदुशास्त्राच्या आधारावर ज्या ज्या पुराणकथा, धार्मिक प्रमेयें व शास्त्रीय सिद्धांत प्रस्थापित केले त्यांमध्यें व प्रत्यक्ष हिंदु-धर्मशास्त्र, पुराणें, व तत्त्वज्ञान यामध्यें निकट साम्य आढळून यावें यांत काय आश्चर्य? बौद्ध धर्म झाला तरी हिंदुधर्माचा सुधारलेला प्रकार असें असल्यानें बौद्धधर्मांकित सर्व देशांतील शास्त्रें, पुराणें व तत्त्वज्ञान यांत एकवाक्यता व एकरूपता दिसून येणें हें क्रम-प्राप्तच आहे स्कान्दिनाव्हियांतील ग्रंथांत तर हें साम्य इतकें दिसून येतें कीं, हिंदूंचें तेथें स्थलांतर व निवास या गोष्टी मान्य केल्याशिवाय हें कोडें केव्हांच उलगडत यावयाचें नाहीं. कर्नल टॉड् म्हणतो कीं, 'हिंदुस्थानामध्यें स्वारी करणारे सर्व इंडोसीथियन योद्धे हे बुद्धधर्मी असल्यानें त्यांच्यामध्यें व रजपुतांमध्यें चालीरीति व पुराण-कथा यांमध्यें अगदीं जवळचें साम्य दिसतें.

स्कान्दिनाव्हियांतील लोकांच्या पवित्र धर्मग्रंथांना " एड्डा " असें म्हणतात. वेद व एड्डा या दोन शब्दांमध्यें उच्चार-साधर्म्य स्पष्टच आहे; परंतु त्यांतील विषयामध्यें जी एकरूपता आहे ती खालीं दिली आहे.

(१) गंधर्वांनीं, यक्षांनीं वैगरे देवकोटींतील स्वर्गस्थ राहिवाश्यांनीं ब्रह्मदेवाला जे प्रश्न केले आहेत व त्यांस ब्रह्मदेवानें जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांच्या सारखींच प्रश्नोत्तरें ' एड्डा ' मध्यें आहेत.

(२) एड्डामध्यें असलेला " मिडगार्डचा सर्प " व वेदांमधील विष्णूचा शेषनामक सर्प हे सारखेच दिसतात.

(३) हिंदु कालमानाप्रमाणें कालाचे चार विभाग कल्पून त्यांपैकीं प्रत्येकास युग अशी संज्ञा देण्यांत आली आहे. कृत, त्रेत, द्वापार व कलि अशीं तीं चार युगें होत. त्यांपैकीं कलियुगाची ४३२०० वर्षें असतात; या संख्येस २, ३, ४ यांनीं गुणलें असतां अनुक्रमें द्वापर, त्रेत व कृत या युगांची वर्षसंख्या मिळते. आतां आपण एड्डाकडे पाहूं. त्या ग्रंथांत "बाल हॉल " नामक राजवाडा असून त्यास ५४० दरवाजे आहेत. यांतील प्रत्येक दरवाज्यांतून ४३२०० शूर देव-सैनिक राक्षसांशीं झगड-ण्याकरितां बाहेर पडतात असें वर्णन केलें आहे. आतां हें रूपक काढून टाकलें असतां ४३२०० ही सैनिकसंख्या कलियुगाच्या वर्षसंख्येशीं बरोबर मिळतीं आहे. असें स्पष्ट दिसतें. यावरून उभय धर्मांमध्यें युगसंख्या व वर्षसंख्या सारख्या आहेत असें अगदीं उघड आहे. ह्या चार प्रमाणांनीं व वेद आणि ' एड्ड ' यांच्या सादृश्यानें

स्कांदिनाव्हियामध्यें बुद्धाचा धर्म दृढमूल होऊन फार दिवस नांदला होता असे स्पष्ट दिसतें.

एवढा वेळपर्यंत स्कान्दिनाव्हिया व भारत वर्ष यांतील दोन धर्मांत असलेलीं समान स्थलें, समान तत्त्वें, सारख्या कल्पना, सदृश चालीरीति, अभिन्न पुराणकथा, एकरूप तत्त्वज्ञान यांचें दिग्दर्शन केलें. तीच पद्धत इजिप्त व भारत वर्ष यांस लावून त्यापासून हिंदुस्थानांतून बौद्ध धर्म इजिप्तमध्यें कसा गेला, त्याचा विस्तार व व्याप तेथें कसा वाढला हें स्पष्टपणें कळण्यास जीं साधनें उपलब्ध आहेत त्यांकडे अनुक्रमानें वळूं.

दोन्ही धर्मांत प्रथमतः एकच ईश्वर असें मानलें असून पुढें तत्त्वज्ञानाचा ऱ्हास होत जाऊन ईश्वराच्या असंख्य मूर्ति मानण्यांत येऊं लागल्या. पूर्वीची उदात्त विश्वव्यापी ईश्वराची कल्पना बिघडून जाऊन हजारों रूपें ईश्वरास देण्यांत आलीं. ईश्वर विश्वव्यापी अद्वितीय असून गुणभेदानें प्रथम त्यास तीन स्वरूपें देण्यांत आलीं. इजिप्ती व आर्यधर्म या दोघांनाही ही त्रयी संमत आहे. पूर्वजन्म, पुनर्जन्म, चातुर्वर्ण्य, हिंदूंचा ओंकार, व इजिप्ती लोकांचा ॲमन्; उभय देशांतील कमलाकार सूर्यमंडळाची कल्पना, अमरत्वनिदर्शक चिन्हें; वंध्या स्त्रियांच्या नवसाचा प्रकार, गंगानदीवर ठिकठिकाणीं शिवालयें असतात, त्यांचे सारखीच नाइल नदीवर शिवलिंगाकार 'फॅलस' चीं देवळें इत्यादि साम्यस्थळें पाहिलीं म्हणजे इजिप्ती धर्माची उत्पत्ति हिंदु धर्मापासूनच झाली असली पाहिजे याविषयीं बिलकूल शंका रहात नाहीं. याखेरीज जानस्टर्नानें पुढील तीन चार उदाहरणें त्याच सिद्धांताच्या बळकटीप्रित्यर्थ दिलीं आहेत.

(१) हेरोडोटस, प्लेटो, पायथागोरस, सोलन, फिलोस्ट्रेटस इत्यादि पंडितांनीं याच प्रश्नास दुजोरा दिला आहे.

(२) इजिप्तच्या दक्षिण भागांतील देवालयांपेक्षां उत्तर इजिप्तमधील देवालयें जास्त जुनीं; थीब्स, एलिफंटाईन येथें असलेल्या देवालयांपेक्षां मेरूमधील जास्त जुनी; थीब्सचीं देवालयें टेंटिरा व अबिडॉस येथील देवालयांपेक्षां पुराण; आणि टेंटिरा व अबिडासचीं मेंफिस, हेलिओपालीस व साईस यापेक्षां प्राचीन; अशीं एकापेक्षां एक जुनेपणांत देवालयांची परंपरा आहे; परंतु ही सर्व हिंदू देवालयांची नक्कल आहे असें नीबर, वेंहलेन्शिया, च्यांपोलियन व वॅलिंग्टन या विद्वानांचें म्हणणें आहे.

(३) जोसेफस, आफ्रिकॅनस, युसेबियस यांस अबिडॉस व साईस या देवालयांत जीं जुनीं कागदपत्रें सांपडलीं तीं त्यांनीं काळजीपूर्वक वाचून, अभ्यास करून

जतन करून ठेविलीं; तीं क्रमाक्रमानें आपणास उपलब्ध झालीं आहेत; त्यांवरून पाहतां प्रस्तुत सिद्धान्त जास्त दृढ होतो.

(४) मानेथोनें इजिप्तच्या राजांच्या ज्या वंशावळी दिल्या आहेत, त्यावरून कालगणना केली तर हिंदु कालगणना-कोष्टकाच्या किती तरी नंतर हा इजिप्तमधील काल येतो, व यामुळें हिंदुस्थानांतून बौद्ध धर्म इजिप्तमध्यें गेला असें म्हणण्यास कांहींच आडकाठी दिसत नाहीं.

(५) अबिसीनियांतील ज्यू व ख्रिश्चन यांचा पुढील हकिगतीवर फार दृढ-विश्वास आहे व त्यांच्या मध्यें ही दंतकथा फार प्राचीन कालापासून चालत आली आहे.

" अबिसीनिया व तांबडा समुद्र आणि बाबेंलमांडेंबची सामुद्रधुनी व दक्षिणेकडील प्रदेश यांमध्यें असणारी पर्वतांची रांग ही नोहाचा नातू कुश व त्याचें कुटुंब यांचें आद्य निवासस्थान होय. त्यांनीं पुढें अब्राहामच्या कारकीर्दीत ' आक्झम ' नामक शहर बांधलें व येथून पुढें नाइल व अतबारा या दोन नद्यांच्या संगमापाशीं असलेल्या मेरु बेटापर्यंत नाईलच्या कांठाकांठानें ते खालीं सरकत गेले. " या पुराण-कथेचा विचार केला व वर दिलेलीं इतर सर्व प्रमाणें पूर्णपणें संशोधिलीं म्हणजे हिंदु-राष्ट्राचा वडीलपणा पूर्णपणें सिद्ध झाल्याशिवाय रहाणार नाहीं असें जानस्टर्न म्हणतो.

सृष्टयुत्पत्तिसंबंधीं बौद्ध धर्मांत पुढील कथा प्रसिद्ध आहे. " स्वर्गांत रहाणारे देव, यक्ष, किन्नर वगैरे आणि भूरणमधील देवदूत व दुय्यम देव हे पृथ्वीवर कधीं कधीं फिरावयास येत; तेव्हां त्यांच्याबरोबर त्याच्या सुंदर व तेजस्वी स्त्रिया असत. मनःशुद्धीमुळें व आत्मपावित्र्यानें त्यांस कामवासना होत नसे. कांहीं कालानंतर आदि-बुद्धानें त्यांचे ठायीं जायफळ खाण्याची प्रेरणा केली; तें खाल्यानंतर त्यांचे ठायीं काम-वासना प्रदीप्त होऊन त्यांस पृथ्वीवर रहाणेंच बरें वाटूं लागलें, आणि नंतर यांजपासून-च मनुष्यजातीची उत्पत्ति झाली. "

ग्रीक लोकांची तीच कथा थोडक्यांत अशी आहे:—" त्यांचा देव कॉनस याच्या मनांत जगत् उत्पन्न करण्याचें आलें. त्यानें प्रथम दिनरजनीघटित काल निर्माण करून त्याच्या पोटांत एक अंडें ठेऊन दिलें. या अंड्यापासून त्रिमूर्ति उत्पन्न झाल्या व त्यांनीं आद्य स्त्रीपुरुष उत्पन्न केले; व या जोडनिंतर सर्व प्रजा निर्माण झाली. "

आतां पहिल्या बौद्ध पुराणकथेवरून बायबलांतील व कुराणांतील सृष्टयुत्पत्तिकथा रचल्या गेल्या हें अगदीं उघड दिसतें, व दुसऱ्या कथेचा उद्गम हिंदु शास्त्रांतील ब्रह्मा-

ण्डाच्या कल्पनेवरून झाला असला पाहिजे, याशिवाय दुसरें अनुमान काढणें अशक्यच आहे.

मॅक्समुल्लरच्या मतें असीरियन, इजिप्शयन व ग्रीक पुराणांचा पाया हिंदु पुराणेंच होत, व हिंदु पुराणांची सर्व इमारत वेदावर उभारली आहे.

उदाहरणार्थ–ग्रीक पुराणांतील व हिंदु पुराणांतील देवतांचा जो काळजीपूर्वक अभ्यास करील त्याला असें दिसून येईल कीं, भारतीय आर्य ज्या वेळीं येथून ग्रीस देशांत राहावयास गेले त्या वेळीं त्यांनीं येथून पुराणें बरोबर नेलीं असलीं पाहिजेत व पुढें क्रमानें या देवतांच्या कल्पनेवर आसपासची परिस्थिति, भूरचना, ऋतुकाल इत्यादि गोष्टी पाहून नवीं पुराण-रचना तेथें झालीं असावीं. कारण पुष्कळ देवतांमध्यें, त्यांच्या पराक्रमामध्यें व एकंदर सर्व कृत्यांमध्यें इतकें तंतोतंत साम्य आहे कीं, ग्रीक नांवें वगळल्यास त्या हिंदू देवताच आहेत असा खात्रीनें भास होईल. उदाहरणार्थ:—

ज्युपिटर	=	इंद्र
ज्यूनो	=	दुर्गा, पार्वती (इंद्राणी)
अपोलो	=	कृष्ण
व्हिनस	=	रति
सिरेस	=	श्री
सिबेल	=	पृथ्वी
नेपच्यून व युरेनियस	=	वरुण
मिनेर्व्हा	=	सरस्वती
मार्स	=	स्कन्द
प्लुटो	=	यम
प्लुटस	=	कुबेर
व्हल्कन	=	विश्वकर्म
कुपीड	=	काम
मक्युरी	=	नारद
ओरोरा	=	उषा
इओलस	=	वायु
जॅनस	=	गणेश

डायोस्कुरी (कॅस्टर व पोलक्स) = अश्विनीकुमार
स्टिक्स = वैतरणी
ईडा = कैलास
ऑलिंपस् = मेरु

मागें सांगितल्याप्रमाणें रामायण व महाभारत यांवरून ग्रीक व इतर क्रिश्चन पुराणकथा तयार झालेल्या असाव्यात व हिंदुशास्त्रांतील सर्व देवता पृथ्वीवर निरनिराळ्या नांवांनीं पुजिल्या जातात असें तुलनात्मक अभ्यास करणारास दिसून येईल असें मॉरीस व सर वुइल्यम जोन्स यांचें म्हणणें आहे.

शेवटीं डब्ल्यू. डी. ब्राऊन यांचा अभिप्राय देऊन हा ग्रंथ पुरा करूं. " सर्व जगांतील वाङ्मय व ईश्वरोत्पत्तिशास्त्र हें हिंदूंच्यांच अखंड परिश्रमाचें फळ होय असें पूर्वग्रहरहित व निर्विकार मनानें काळजीपूर्वक अभ्यास करणारास वाटल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. ईश्वरोत्पत्तिसंबंधानें हल्लीं जगांत रूढ असलेलीं सर्व मतें मूळ हिंदूंच्याच कल्पनेवरून निघालीं आहेत. प्राचीन भारतीयांना मूर्तिपूजा ठाऊक नव्हती, म्हणून ते अविद्य किंवा असंस्कृत नव्हते; त्यांस हल्लीं कांहीं लोक रानटी म्हणतात तसे ते मुळींच नसून त्यांच्या ठिकाणीं गाढ विद्वत्तेला शोभणारी व विशाल प्रतिभेला अनुरूप अशी गंभीर कवित्वस्फूर्ति व नितांत आणि अगाध विचारशक्ति वास करीत होती. त्यांच्या वाङ्मयाचें संपूर्ण भाषांतर झाल्यास आधुनिक संस्कृतिरूप प्रमदा या जुन्या, टाकाऊ समजल्या जाणाऱ्या वाङ्मयरूप रुचिर, मोहक व सुगंधि पुष्पाकडे साभिलाष दृष्टीनें पाहून त्याच्या प्राप्तीविषयीं आतुर झाल्याशिवाय रहाणार नाहीं असें आजन्म विद्याव्यासंगी प्राच्यविद्याविशारद प्रो. मॅक्समुल्लर, जॅकोलिट, सर विल्यम जोन्स हे छातीठोकपणें सांगतात. "

समाप्त.

REFBK-0002047